मराठी

॥ तुलसी रामायण ॥

सुलोचना खांडेकर

।। मराठी तुलसीरामायण ।।

पुण्यं पापहरं सदा शिवकरं विज्ञानभक्तिप्रदम् ।
मायामोहमलापहं सुविमलं प्रेमांबुपूरं शुभम् ।
श्रीमद्रामचरित्रमानसमिदं भक्त्यावगाहंति ये ।
ते संसारपतंगघोरकिरणैर्दह्यन्ति नो मानवाः ।।



तुलसीदास (इ. स. १५३२-१६२३)

आनंदकानने ह्यस्मिन जंगमस्तुलसीतरुः ।
कवितामंजरी यस्य रामभ्रमरभूषिता ॥

मराठी तुलसीरामायण

गोस्वामी तुलसीदासांच्या रामचरितमानसाचा
पद्यानुवाद

सुलोचना खांडेकर

कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
पुणे ३०.

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०.

मुद्रक : वि. ना. भंडारे, स्वानंद मुद्रणालय,
२०३ शनिवार पेठ, पुणे ३०

मुखपृष्ठ : स्टुडिओ सालकर, पुणे.

प्रकाशन क्रमांक : ८६५

पहिली आवृत्ती : १९८०

सर्व हक्क सुरक्षित

किंमत तीस रुपये.

प्रस्तुत आवृत्तीसाठी वापरलेल्या सवलतीच्या
दरातील कागदाबद्दल महाराष्ट्र शासनाचे आभार.

विद्यादान आणि सुसंस्कार
यांच्यासाठी तन-मन अर्पिणारे
माझे पती

कै. प्रोफेसर रा. का. खांडेकर

यांच्या पुण्यस्मृतीस--

मनोगत

वाडवडिलांचे आशीर्वाद आणि बालवयात त्यांनी जीवनावर घडविलेले संस्कार यांमुळे संत तुलसीदास यांचे ' रामचरित मानस ' या अमर महाकाव्याचा पद्यानुवाद करण्याची मला प्रेरणा मिळाली. संत वाङ्मयाची गोडी मला लहानपणी लागली होती. आजोबा वारकरी पंथाचे. पंढरपूरजवळील वाखरी येथे राहणारे; त्यामुळे ज्ञानेश्वरीचे वाचन, पठण दररोज घरी होत असे. आजोबांनंतर हा वारसा माझ्या वडिलांकडे आला. रोज सकाळी न चुकता ज्ञानेश्वरीचे पठण ते स्वतःच्या खड्या आवाजात करीत असत.

हल्ली मोठ्या प्रमाणावर बालवाङ्मय निर्माण होऊ लागले आहे. मुलांच्या ज्ञानात विविध विषयांची भर पडत आहे. आमच्या काळात म्हणजे साठ वर्षांपूर्वीचा काळ-असे विविध ज्ञान प्राप्त करून घेण्याची सोय उपलब्ध नव्हती. वा. गो. आपटे यांचे ' आनंद ' हे एकुलते एक मासिक दर महिन्यास आम्हाला वाचावयास मिळे. त्यावर आम्ही घरातील मुले तुटून पडत होतो. याव्यतिरिक्त दोन पद्यमय पुस्तके आमच्या वाचनात असत. ती म्हणजे परशुराम तात्या गोडबोले यांचे ' नवनीत ' व ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांचे ' भक्तिमार्गप्रदीप. ' ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्या आणि स्फुट गोष्टी अशांसारखी पुस्तके आम्हाला हातात धरावयास हिंमत होत नसे. कारण तशी परवानगी वडीलधाऱ्या मंडळींकडून मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे संतवाङ्मयाचेच ' बाळकडू ' आम्हाला लहानपणी लाभले, त्याच्याबद्दल गोडी लागली आणि त्याचे कायमचेच संस्कार मनावर घडले.

माहेरी इंदुरास आमच्या घरी राजस्थानातील एक भय्या रखवालदार म्हणून येत असे. भय्याचा साथीदार म्हणजे तुलसीदासांचे ' रामचरित मानस.' तो दोहे, चौपाया सुरावर म्हणून दाखवावयाचा. त्या मधुर काव्यातील प्रास, नादमाधुर्य यात आमचे मन गुंगून जावयाचे. त्यावेळी ' मानसांतील ' एक अवाक्षरही समजत नसे; पण त्यातील ताल, लयबद्धता आणि लालित्य यांचा खोल ठसा मनावर उमटला होता. भय्या आपला पोपट बरोबर घेऊन येई. त्याला तो बोलायला शिकवी. मिठ्ठूचा पहिला पाठ ' पढो मिठ्ठू, राम ! राम !' मिठ्ठूला अजून कंठ फुटला नव्हता; पण काहीतरी सूर काढून तो भय्याला साथ देत असे. पुढे मिठ्ठू मोठा झाल्यावर तो त्याला पुढील दोहा शिकवू लागला. ' पढो भय्या !'

चित्रकूटके घाटपर भइ संतन कि भीर ।
तुलसीदास चंदन घिसे तिलक देत रघुवीर ।।

याचप्रमाणे मानसातीलही दोहे, चौपाया यांची गेयता, त्यातील ताल, नाद आणि माधुर्य हे अर्थाशिवाय कानात घुमत.

विवाहानंतर सासरी पुण्यास आले. मला शिक्षणाची आवड आहे असे पाहून माझे आदरणीय पती कै. प्रो. रामचंद्र काशीनाथ खांडेकर यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यास उत्तेजन दिले. वृद्ध मामंजी यांनी साथ दिली. मामंजी वाल्मीकीच्या संस्कृत रामायणाचे पठण करीत असत. मुखाने मोठ्याने सतत रामनामाचा जप करीत. माझ्या पाहण्यात तर मामंजी राममयच झालेले होते. महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण झाल्यावर पुण्यातील नाणावलेल्या मॉडर्न हायस्कूल–मुलींचे, पुणे ५, या ठिकाणी मुख्याध्यापिका म्हणून सेवा करण्याची संधी सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि संस्थेचे आद्य संस्थापक कै. प्रो. शंकर रामचंद्र कानिटकर यांच्यामुळे लाभली हे मी माझे मोठे भाग्य समजते.

नोकरी संपून निवृत्त झाल्यानंतर योगायोगाने मुलाकडे दोन वर्षे दिल्लीत वास्तव्य झाले. सांस्कृतिक परंपरा जतन करणाऱ्या सामान्य लोकांच्या वस्तीच्या बाजूने फिरावयास जात असताना लहानपणी ऐकलेल्या दोहे, चौपाया यांचे सूर कानावर येऊ लागले; यामुळे बालपणात घडलेल्या संस्कारांची आठवण झाली. वाटेत ठिकठिकाणी ‘तुलसीमंडल’ अशी पाटी दिसली. उत्सुकता म्हणून एका घरी आतमध्ये जाऊन चौकशी केली; तेव्हा समजले की त्या ठिकाणी ‘मानसाचे’ पाठ होतात. एक महाराष्ट्रीय स्त्री ओळख नसताना आस्थापूर्वक चौकशी करून हिंदी भाषेतील ‘मानसाचा’ पाठ ऐकण्यास येण्याची उत्सुकता दाखविते हे पाहून त्यांना आश्चर्य तर वाटलेच पण तितकाच आनंदही झाला. आमची जणू कित्येक वर्षांची ओळख आहे अशा थाटात गप्पा झाल्या. विविधतेतून भारतीय संस्कृतीची एकता कशी असते याचा त्यावेळी प्रत्यय आला.

नोकरी चालू असताना आपल्या कार्यात व्यग्र राहिल्याने दिवसांमागून दिवस कसे निघून जातात याची कल्पना सेवानिवृत्तीचा काळ अगदी जवळ येऊन ठेपेपर्यंत येत नाही. तोपर्यंत चाहूलही लागत नाही की आपण वृद्ध झालो आहोत. तेव्हा सेवानिवृत्तीनंतर काहीतरी कार्यात मन कायमचे गुंतवून ठेवावे म्हणजे आपले अखेरचे दिवस असेच चटकन निघून जातील असा काहीसा विचार डोक्यात होता. ‘मानसा’चे पठण ऐकताच गतस्मृती जागृत होऊन या महाकाव्याच्या अंतरंगातील सौंदर्याचा आस्वाद घ्यावा, त्याचा अभ्यास करावा असे त्यावेळी मी ठरविले. ‘मानसाच्या’ प्रमाण मानलेल्या कोणकोणत्या प्रती आहेत याची माहिती मला फर्ग्युसन कॉलेजमधील हिंदीचे प्राध्यापक डॉ. स. म. परळीकर आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे येथील ग्रंथालयातील ग्रंथपाल श्री. ब. का. विप्रदास यांनी मोठ्या आस्थेने दिली. रामायणाचे एक अभ्यासक, मुंबईच्या पोदार कॉलेजमधील

हिंदीचे प्राध्यापक डॉ. ग. न. साठे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून उत्तेजन दिले. या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

'मानसाचे' वाचन चालू असता या नादमधुर आणि प्रसादयुक्त काव्याचा रसाळपणा आणि गोडवा यांचा प्रत्यय येऊ लागला. बाळपणी बाह्य सौंदर्यावर आकृष्ट झालेले मन आता अंतरंगातील सौंदर्याकडे अधिक ओढ घेऊ लागले. मग असा विचार मनात आला की, स्वांत:सुखाय आपण 'मानसाचा' अनुवाद केला तर त्या निमित्ताने मानसाचे सखोल वाचन होईल. दरवेळी 'मानसांत' अवगाहन केल्याने त्यातील नाना रत्नांच्या पैलूंचे एक आगळेच तेजस्वी दर्शन घडेल.

महाराष्ट्रात संतवाङ्मयाची परंपरा आहे. संतवाङ्मयाची आवड आहे. चिकित्सक वृत्तीने त्याचा अभ्यास केला जातो. या दृष्टीने महाराष्ट्रीय जनतेसाठी, जनतेच्या वाणीत 'मानसा'चा पद्यानुवाद करण्याचा मी संकल्प केला. मराठी जनतेला ओवी आणि अभंग धार्मिक ग्रंथांमुळे अधिक परिचित, त्यामुळे जवळचे वाटत असल्याने अनुवाद मी ओवी आणि अभंग या छंदात केला आहे. ओवी मुक्तछंदाप्रमाणे गद्यप्राय असूनही त्यात पहिल्या तीन चरणात अंतिम यमक असल्याने गेयता आहे. अभंग हा छंद गेय आहेच. 'मानसातील' दोहा, सोरटा आणि चौपाई हे छंद ओवीबद्ध रचले आहेत. प्रत्येक दोहा, सोरटा, चौपाई यांकरिता प्रत्येकी एकच ओवी असा अनुवाद केला असल्याने 'मानसातील' जो संख्याक्रम आहे त्यात बदल झालेला नाही. त्यामुळे त्यांचा अनुवाद पडताळून पाहण्यास सुलभ झाले आहे. दोहा, चौपाई याव्यतिरिक्त जे छंद आहेत त्यांचा अनुवाद अभंग छंदात केला आहे. देव आणि ऋषिमुनींनी केलेली स्तुतिपर स्तवने मानसात आहेत. काही हिंदी, काही संस्कृत, आणि काही संस्कृत-हिंदी मिश्रित आहेत. त्या अनुवादात त्यांचे छंद शक्यतो बदलले नाहीत; संस्कृत–हिंदी मिश्रित स्तवनात मूळ संस्कृत तसेच ठेवून हिंदी' ऐवजी मराठीची योजना केली आहे. भारतीय प्राकृत भाषांची जननी या दृष्टीने किंवा समन्वय साधावा म्हणून तुलसीदासांनी सातही सोपानातील प्रथम आलेले मंगलाचरण संस्कृतमध्ये रचले आहेत. त्याचा मी मराठीत अनुवाद केला आहे.

दिल्लीला असताना इ. स. १९७२ च्या जानेवारी महिन्यात अनुवाद करण्यास मी आरंभ केला. बालकांडाचा अनुवाद पूर्ण झाल्यावर मुलाची बदली लंडनला झाली. मला तिकडे जावे लागले. त्या ठिकाणी अनुवादाचे काम चालू ठेवून इ. स. १९७३ च्या मार्चमध्ये मी अनुवादाचे काम पूर्ण केले. 'इंडिया हाऊस' ग्रंथालयात मला लागणारे हिंदी संदर्भ ग्रंथ मिळाले. प्रभु रामचंद्राच्या कृपेने परदेशात राहूनही काम पूर्ण करता आले. प्रेक्षणीय स्थळे बघणे, परिचित व्यक्तींच्या गाठीभेटी घेणे यात मधून मधून वेळ जात असे. एरव्ही नियमितपणे अनुवादाचे काम होई. बाळसेदार, हसतमुख असा माझा लहानगा नातू चि. आदित्य 'हूं हूं'

अशी साथ देऊन जवळ खेळत पडून राही. जणू तोही माझ्या कामाला उत्तेजन देत होता. साधारण १०० दोहे यांचा अनुवाद करून झाला म्हणजे हस्तलिखिताच्या फोटोस्टॅट प्रती काढून रजिस्टर पार्सलने भारतात तज्ज्ञ व्यक्तींकडे अवलोकनार्थ पाठवीत असे, त्यांच्याकडून उत्तेजनपर पत्रे आली म्हणजे काम करण्यास अधिक उमेद येई.

इ. स. १९७४ मध्ये मी भारतात परत आले. पुणे विद्यापीठामधील हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. आनंद प्रकाश दीक्षित यांचा परिचय होण्याचा योग घडून आला. मी 'मानसा'चा पद्यमय अनुवाद केला आहे असे समजताच डॉ. दीक्षित यांनी तो वाचण्याची उत्सुकता दर्शविली. माझ्याकडे हस्तलिखित प्रत तयार होतीच. त्यांचे वाचन चालू असतानाच त्यांनी तो छापून घेण्यासाठी मला उत्तेजन दिले.

माझे मेहुणे श्री. माधवराव ढवळे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. छापण्याच्या बाबतीत जी काय मदत लागेल ती देण्याचे त्यांनी मला आश्वासन दिले. त्यांचे निकट स्नेही संगम प्रेसचे श्री. माधवराव पटवर्धन हे मुद्रण आणि प्रकाशन या विषयात जाणकार आहेत. जेव्हा 'मानसा'च्या अनुवादाचा प्रश्न काढला तेव्हा श्री. पटवर्धनांनी पुण्यातील कॉंटिनेंटल प्रकाशनाचे नाव सुचविले. ह्या संस्थेचे संचालक श्री. अनंतराव कुलकर्णी व त्याचे थोरले चिरंजीव श्री. अनिरुद्ध कुलकर्णी ह्यांनी अनेक धार्मिक, सामाजिक ग्रंथांचे प्रकाशन करून भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांची ओळख वाचकांना करून देण्याचे स्तुत्य कार्य आजवर केले आहे. ह्या उभयता पिता-पुत्रांनी मला उत्तेजन देऊन मुद्रणाचे व प्रकाशनाचे काम मोठ्या आनंदाने स्वीकारले. ह्या त्यांच्या मदतीबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

ह्या अनुवाद हिंदी वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना उपयुक्त होईलच परंतु तुलसीदासकालीन परकीय सत्तेच्या सांस्कृतिक संघर्षाच्या समयी भारतीय संस्कृतीची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न लोकनायक, लोकवाङ्मयकार तुलसीदासांनी रामकथेच्या द्वारे किती तळमळीने आणि तल्लीनतेने केला आहे ह्याचा परिचय महाराष्ट्रातील सामान्य जनतेला होईल. या दृष्टीने अनुवादाचे शैक्षणिक मूल्य जाणून महाराष्ट्र सरकारच्या कागद वाटप समितीने सवलतीच्या दराने कागद उपलब्ध करून दिला त्याबद्दल मी शासनाची आभारी आहे. स्वानंद मुद्रणालयाचे संचालक श्री. भंडारे बंधू यांनी छापण्याचे काम आपुलकीने केले. चित्रकार सालकर यांनी उत्कृष्ट चित्रे तयार करून दिली. या दोघांचीही मी ऋणी आहे. माझ्या कुटुंबातील मुलगे, सुना, मुलगी आणि जावई हैद्राबादचे डॉ. वैजनाथ पारगावकर, बंधू-भगिनी व इतर आप्तजन, माझ्या वर्गभगिनी आणि पुण्यातील प्रसिद्ध समाजसेविका श्रीमती प्रमिलाबाई गाडगीळ, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र

राज्य श्री. ल. ग. राजवाडे यांच्या पत्नी सौ. चंद्रावतीदेवी राजवाडे, मैत्रिणी व विद्यार्थिनी, तसेच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने या कार्याशी संबंध आला अशा सर्व व्यक्ती यांनी वेळोवेळी उत्तेजन देऊन सहकार्याचा हात पुढे केला त्या सर्वांची मी आभारी आहे. श्री. ब. का. विप्रदास यांच्याशी वेळोवेळी झालेल्या वाङ्मयीन चर्चेमधून नानाविध कल्पना निर्माण झाल्या व अनुवादास योग्य वळण लागण्यास मदत झाली. त्यांनी आपला अमूल्य वेळ खर्च केल्याबद्दल त्यांना माझे हार्दिक धन्यवाद.

श्री. माधवराव ढवळे यांच्या पत्नी आणि माझी भगिनी कै. सौ. मालती ढवळे ही मला वरचेवर म्हणत असे, 'ताई, तू एवढा मोठा उद्योग केलास, आता छापण्याचे काम लवकर होऊन दे.' परंतु आमच्या दुर्दैवाने ग्रंथ छापून झालेला बघावयास ती आमच्यात नाही. परमेश्वर तिच्या आत्म्यास शांती देवो !

मध्ययुगीन वाङ्मयातील हा दिव्य खजिना महाराष्ट्रातील सर्वसाधारण वाचकाला डोळे भरून पाहता यावा या हेतूने मी या अनुवादाचा प्रयत्न केला आहे. कार्य संपूर्ण करण्यास परश्वराने या उतार वयातही मला शारीरिक आणि मानसिक बळ दिल्याने साफल्य लाभल्याचा हा एक आगळाच आनंद आहे.

श्रीरामचरणी भक्तिभावे मस्तक नमवून
जनताजनार्दनाच्या सेवेस सादर.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

प्रथम सोपान–बालकांड

मंगलाचरण १, गुरुचरणवंदन, संतांना नमन २, खलजनवंदन ३, संत-असंतपदवंदन ४, सीतारामसयसृष्टि जाणून तिला वंदन, कवीचे आत्मलघुत्व वर्णन ५, श्रेष्ठकवींना वंदन, वाल्मीकि, वेद, देवदेवता आदींना वंदन ८, अयोध्यानगरीस, दशरथासह सकल परिवारास वंदन ९, नामवंदना, राम-नाममहिमा १०, रामगुण, रामायणाचे माहात्म्य, मानसनिर्मितीची तिथी, मानसाचे रूपक आणि माहात्म्य १७, याज्ञवल्क्यभारद्वाज संवाद, प्रयागमाहात्म्य, २०, सतीचा भ्रम, सतीकृत रामपरीक्षा २३, शंकरकृत सतीत्याग, शिवसमाधी २५, सतीचे दक्षयज्ञगमन, सतीचा अपमान २७, योगाग्नीत दहन, यज्ञविध्वंस, पार्वतीचा जन्म, तिची तपस्या २८, पार्वती बरोबर विवाह करण्यास रामाची शिवास विनंती, सप्तर्षींनी घेतलेली पार्वतीपरीक्षा ३२, मदनाने केलेले देवकार्य, मदनदहन, देवांची शिवास विवाह करण्याविषयी विनंती ३४, शंकरांची विचित्र विवाह वरात ३७, शंकरपार्वती–विवाह ४१, शिवपार्वती संवाद ४४, अवतार हेतू ४८, नारद गर्व परिहार, त्यांचा शिवगण, विष्णू यांना शाप ५०, मनुशतरूपातप, वरदान ५६, प्रतापभानूची कथा ५९, रावणकुंभकर्णादींचा जन्म, तपश्चर्या, वरप्राप्ती, ऐश्वर्य, अत्याचार ६७, पृथ्वी, देव यांनी केलेले विष्णुस्तवन, विष्णूंचे वरदान ७०, दशरथकृत पुत्रकामेष्टी यज्ञ ७३, रामलक्ष्मणादिकांचे जन्म, बाललीला विश्वामित्रांचे अयोध्येत आगमन व रामलक्ष्मणासह गमन विश्वामित्रयज्ञाचे रक्षण ७४, अहिल्योद्धार, रामलक्ष्मणासह विश्वामित्रांचे मिथिलेत आगमन ८१, जनकाची भेट, नगरीचे निरीक्षण ८२, पुष्प-वाटिकेत रामसीता यांचे परस्पर दर्शन ८६, सीतेने केलेली पार्वतीपूजा, देवीचे वरदान ८९, रामलक्ष्मण संवाद ९०, रामलक्ष्मणासहित विश्वामित्रांचा यज्ञशाळेत प्रवेश ९१, सीतेचा यज्ञशाळेत प्रवेश ९३, जनकप्रतिज्ञेची बंदी-जनांकडून घोषणा ९४, जनकाची निराशाजनक वाणी, लक्ष्मणाचा क्रोध ९५, धनुष्यभंग ९८, जयमाला अर्पण ९९, परशुरामाचे तेजोहरण १००, दशरथांना विवाहाचे आमंत्रण, त्यांचे आगमन आणि स्वागत १०७, रामसीता विवाह आणि देणग्या १२०, रामसीतेसह दशरथाचे अयोध्या-गमन १३०, अयोध्येतील आनंदोत्सव, रामचरित्र यशोगानमहिमा १३६.

द्वितीय सोपान
अयोध्याकांड

मंगलाचरण १३९, रामराज्याभिषेकाची तयारी, देवांनी केलेली सरस्वतीची प्रार्थना १४०, मंथरेची शिकवण व कैकेयीचा बुद्धिभ्रंश १४३, कैकेयीचे कोपगृहात गमन, दशरथकृत कैकेयीची मनधरणी, दशरथ शोक १४७, सुमंत आगमन, सुमंताचा रामांना निरोप १५२, रामकैकेयी संवाद १५३, रामकृत दशरथसांत्वन, अयोध्यावासी जनांना दुःख १५४, रामकौसल्या संवाद, सीताराम संवाद, रामकौसल्या संवाद, रामलक्ष्मण संवाद, लक्ष्मणसुमित्रा संवाद, १५७, रामसीतादशरथ यांची अखेरची भेट १६५, रामसीता, लक्ष्मण यांचे वनगमन १६७, राम व गुहक यांची शृंगवेरपूर येथे भेट १६९, लक्ष्मणनिषादसंवाद, रामसीतासुमंतसंवाद १७०, केवटाचे प्रेम, गंगा पार करून प्रयागगमन १७३, रामभारद्वाज संवाद, यमुनातीरवासी यांचे प्रेम १७६, तपस्वी आगमन, वन्यजनांचे प्रेम १७७, रामवाल्मिकीसंवाद १८२, चित्रकूट निवास, कोळीभिल्लद्वारासेवा १८५, सुमंताचे अयोध्यागमन, सर्वत्र शोक दशरथविलाप, १९०, दशरथप्राणोत्क्रमण १९२, वसिष्ठांनी केलेले सर्वांचे सांत्वन व भरतास केलेले पाचारण १९३, भरताचे आगमन व शोक १९४, भरतकौसल्यासंवाद, दशरथाचे उत्तरकार्य १९५, वसिष्ठभरतसंवाद १९८, भरताचे भाषण व चित्रकूटगमन २००, निषादाला भरताविषयी संशय २०४, भरतनिषाद भेट, संवाद २०५, प्रयागक्षेत्री भरतभारद्वाज मीलन, भरताचा सत्कार २१०, इंद्रबृहस्पती संवाद २१४, सीतेचे स्वप्न, भरतागमनवार्ता ऐकून लक्ष्मणास आलेला क्रोध, रामकृत लक्ष्मणाची समजूत आणि भरताची प्रशंसा २१७, रामभरत भेट, पित्याच्या मृत्युबद्दल शोक व श्राद्ध २२२, वनवासीयांद्वारा भरताचा सत्कार, कैकेयीचा पश्चात्ताप, वसिष्ठांचे भाषण २२६, रामभरतादिकांचा संवाद २२८, जनकागमन २३३, कौसल्यासुनयना संवाद, सीतेचे शीलसौंदर्य २३७, जनकसुनयना संवाद, भरताचा महिमा २३९, जनकवसिष्ठसंवाद २४०, इंद्राची चिंता २४१, रामभरतसंवाद २४२, भरताचे चित्रकूटभ्रमण, तीर्थजलस्थापना २४६, रामभरतसंवाद, पादुकाप्रदान, निरोप घेणे, भरताचे अयोध्यागमन, पादुकांची स्थापना, भरताचा नंदिग्रामी निवास २४७.

तृतीय सोपान
अरण्यकांड

मंगलाचरण, जयंताची कुटिलता आणि शिक्षा २५३, अत्रिऋषींची भेट,

अत्रिकृत रामस्तवन २५४, अनसूयेचा जानकीला उपदेश २५५, विराधवध, शरभंगमुनीचे योगाग्निदहन २५७, राक्षसवधाची प्रतिज्ञा, सुतीक्ष्णमुनीकृत रामस्तुती, राम व अगस्त्यमुनी यांची भेट, रामाचा दंडकवन प्रवेश, जटायूमीलन २५८, पंचवटी निवास, रामलक्ष्मण संवाद २६१, शूर्पणखेचे पंचवटीत आगमन व तिचा रामलक्ष्मणांशी संवाद २६२, शूर्पणखानासिकाकर्णच्छेदन, खरदूषणवध, शूर्पणखेची रावणापाशी तक्रार, सीतेचा अग्निप्रवेश व माया सीता २६३, रावणमारीचसंवाद, मायामृग, मारीचवध २६७, यतिवेषधारी रावण, सीताहरण, सीताविलाप, जटायुरावणयुद्ध २६९, रामविलाप २७०, रामजटायुसंवाद, जटायुकृत रामस्तुती २७१, कबंधवध, उद्धार, शबरीच्या आश्रमांत रामांचा प्रवेश, नवविधाभक्तिकथन २७२, पंपासरोवराकडे प्रस्थान, रामकृत वसंत ऋतुवर्णन २७४, रामनारद संवाद २७६, सत्संगमाहात्म्य २७७.

चतुर्थ सोपान

किष्किंधाकांड

मंगलाचरण, रामहनुमान संवाद, रामसुग्रीव मैत्री २७९, सुग्रीवाचे दुःख, वालीवधाची प्रतिज्ञा, रामकृत मित्रलक्षणवर्णन, सुग्रीवाचे वैराग्य, रामवालीसंवाद, वालीचा वध व उद्धार २८१, ताराविलाप व तिचे सांत्वन, सुग्रीवराज्याभिषेक २८४, वर्षाऋतुवर्णन व शरदऋतुवर्णन २८५, रामलक्ष्मण यांचा सुग्रीवावर कोप २८७, सुग्रीव रामसंवाद, सीताशोधार्थ वानरप्रेषण २८८, गुंफेत तेजस्विनीचे दर्शन २८९, संपातीवानरगण भेट, संवाद २९०, जांबुवंताचे हनुमानाला सीताशोधार्थ उत्तेजन २९१.

पंचम सोपान

सुंदरकांड

मंगलाचरण २९३, मारुतीचे लंकाप्रयाण, सुरसेशी भेट, छाया पकडणाऱ्या राक्षसीचा वध, लंकावर्णन, लंकिनी वध, लंकाप्रवेश २९४, लंकाशोभावर्णन, मारुतीबिभीषणसंवाद, मारुतीचे अशोकवनगमन व सीतादर्शन २९५, सीतारावणसंवाद, त्रिजटेचे स्वप्न व सीतेचे सांत्वन, मुद्रिकादर्शन, मारुतीसीता संवाद २९७, मारुतीकृत अशोकवनविध्वंस, अक्षयकुमारवध, मारुतीबंधन ३००, मारुतीरावणसंवाद ३०१, लंकादहन, सीतेचा निरोप, कपीसह मारुतीचे सुग्रीवाकडे आगमन ३०३, रामाला सीतासंदेशकथन ३०५, रामसुग्रीव यांचे समुद्रतटी प्रयाण, मंदोदरीरावणसंवाद ३०६, रावणबिभीषणसंवाद ३०८, बिभीषणाचे रामाकडे आगमन, शरणप्राप्ती ३०९.

रामकृत बिभीषणाभिषेक, रावणदूतांचे रामाकडे प्रयाण ३१२, लक्ष्मणाचे पत्र देऊन दूताचा रावणाला उपदेश, सागरगर्व परिहार ३१४.

षष्ठ सोपान

लंकाकांड

मंगलाचरण ३१७, नलनीलद्वारा सेतुबंधन, रामकृत रामेश्वर स्थापना ३१८, सेनेसह रामकृत समुद्रोल्लंघन, रावणाची व्याकुळता, रावणमंदोदरीसंवाद, रावणप्रहस्तसंवाद ३१९, सुवेल पर्वतावरून दिसणारे चन्द्रोदयवर्णन, रामकृत रावणाच्या छत्रमुकुटकुंडलांचा भंग ३२२, मंदोदरीचा रावणास उपदेश, राम-महिमाकथन ३२३, दूत अंगद, लंकागमन, अंगदरावणसंवाद ३२४, मंदोदरीचा रावणास पुन्हा उपदेश ३३२, अंगदरामसंवाद, युद्धारंभ ३३३, माल्यवंतरावणसंवाद ३३७, लक्ष्मणमेघनादयुद्ध आणि लक्ष्मणमूर्च्छा ३३९, संजीवनी आणण्यासाठी मारुतीचे उड्डाण, कालनेमी रावणसंवाद, मकरी व कालनेमी उद्धार, मारुतीभरत संवाद ३४०, रामविलाप, लक्ष्मणशुद्धि व रामाचा आनंद ३४२, रावणकुंभकर्ण संवाद, बिभीषणकुंभकर्णसंवाद ३४३, कुंभकर्ण युद्ध, कुंभकर्णाचा वध ३४४, मेघनादकृत रामांचे नागपाश-बंधन ३४७, गरुडागमन व रामबंधमुक्तता, मेघनादयज्ञ व कपिकृत यज्ञ-विध्वंस ३४८, मेघनादवध, ३४९, रावणाचे युद्धभूमीकडे प्रयाण, रामाचा विजयरथ वानरराक्षसांचे युद्ध, ३५१, लक्ष्मणरावणयुद्ध, रावणमूर्च्छा ३५२, रावणयज्ञविध्वंस, रामरावण युद्ध ३५३, इंद्राकडून रामाकरिता रथप्रेषण, रामरावण युद्ध ३५५, बिभीषणरावणयुद्ध, रावणहनुमानयुद्ध, रावणाची मायारचना, मायानाश ३५९, घोर युद्ध, रावणमूर्च्छा ३६०, त्रिजटासीतासंवाद ३६१, घोर युद्ध, रावणमायाविस्तार, रावणवध, सर्वत्र जयध्वनी ३६२, मंदोदरी विलाप, रावणाचे उत्तरकार्य, बिभी-षणास राज्याभिषेक ३६५, रामसीतामीलन व सीतेचा अग्निप्रवेश ३६७, देवांनी केलेले रामस्तवन, मृतकपिसैन्य जीवन ३६८, शंकरकृत रामस्तवन बिभीषणाची प्रार्थना, भरतप्रेमदर्शने वर्णन ३७१, विमानातून बिभीषणाकृत वस्त्राभूषणाचा वर्षाव ३७२, पुष्पकारूढ रामांचे कपिसमवेत अयोध्यागमन, रामचरित्र महिमा ३७२.

सप्तम सोपान

उत्तरकांड

मंगलाचरण ३७५, भरतमारुती भेट ३७६, रामाचे अयोध्यागमन, भरत-मीलन व अपूर्व आनंद ३७८, रामराज्याभिषेक, वेदस्तुती व शिवस्तुती

३८१, रामांनी सुग्रीवादिकांना दिलेल्या देणग्या व निरोप ३८५, रामराज्य वर्णन ३८७, पुत्रप्राप्ती, अयोध्येची रमणीयता ३८८ सनकादिक मुनीश्वर-कृत रामस्तवन ३९१, भरतरामसंवाद, रामांचे प्रजेला उद्देशून भाषण, नगरवासीयांची कृतज्ञता ३९२, रामवसिष्ठसंवाद ३९६, बंधुंसह रामांचे आंबराईत आगमन, नारदकृत रामस्तुती, शिवपार्वती संवाद, ३९७, गरुडमोह, ४००, गरुडभुशुंडीमीलन व रामचरित्रकथन ४०२, भुशुंडी-पूर्वजन्मकथावर्णन, कलियुगवर्णन ४०६, गुरुजींचा अपमान, शंकरांनी दिलेला शाप ४१९, गुरुजीकृत रुद्राष्टक ४२०, शंकराकडे गुरुजींची क्षमायाचना, शापानुग्रह ४२१, भुशुंडीचे लोमेशमुनीपाशी गमन, लोमश-मुनींचा आशीर्वाद ४२३, ज्ञानभक्तीनिरूपण, ज्ञानदीपक व भक्तीचा महिमा ४२६, गरुडाचे सप्तप्रश्न व भुशुंडीचे उत्तर ४२९, रघुपतीभक्तिमाहात्म्य, तुलसीदासकृत प्रार्थना ४३५, रामायणफलश्रुती ४३६.

तुळसीदासांची आरती
ठळक मुद्रणदोष.

प्रस्तावना

तुलसीदास आणि त्यांच्या रामचरितमानसाचे स्वरूप

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या संत कवींप्रमाणे तुलसीदास हे अलौकिक संत कवी होऊन गेलें. महाराष्ट्रीय संतांप्रमाणे हे उत्तर भारतातील संत अत्यंत लोकप्रिय आहेत. महाराष्ट्र सारस्वतात ज्ञानेश्वरीने 'ग्रंथराज' म्हणून मानाचे स्थान पटकाविले आहे तसेच मानाचे स्थान 'रामचरित मानस' या ग्रंथाला हिंदी सारस्वतात लाभले आहे. तुलसीदासांनी आपल्या समर्थ वाणीने, आपल्या आचार-विचाराने आर्यधर्माची सेवा केली. त्यांच्या काळात परकीयांच्या आक्रमणामुळे धर्म आणि संस्कृती यांच्यावर जी ग्लानी पसरली होती ती 'मानसाच्या' पठणाने दूर होण्यास मदत झाली. 'मानसाच्या' द्वारे सद्धर्माची सद्‌गुणांची आणि सदाचाराची उच्च तत्त्वे तुलसीदासांनी सामान्य जनतेच्या अंतःकरणात रुजविण्याचा प्रयत्न केला. उत्तर भारतात 'मानस' हे जनमानसात इतके रुजले आहे की, आजही घराघरातून त्याचे नित्य वाचन आणि पठण चालू असते. गरिबाची झोपडी असो की धनिकाचा बंगला असो दोन्ही ठिकाणी सारख्याच प्रेमाने आणि भक्तिभावाने त्याची पारायणे होतात. रसाळ रामकथेबरोबर या महाकाव्यात माधुरी', पदलालित्य, लयबद्धता आणि गेयता असल्यामुळे ते श्रवण करीत असताना आगळाच आनंद प्रतीत होतो.

तुलसीदासांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला. बांदा जिल्ह्यातील यमुनेच्या दक्षिणेस असलेल्या राजापूर गावी संवत १५८९ श्रावण शुद्ध सप्तमीस (इ. स. १५३२) तुलसीदास जन्मले. यांचे वडील जातीने ब्राह्मण असून नाव आत्माराम दुबे आणि मातेचे नाव हुलसी होते. मुलगा मूळ नक्षत्रावर जन्मला असल्याने ते आई-वडिलांना अशुभ सूचक होते; त्यामुळे त्यांनी या मुलाचा त्याग केला. मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या एकनाथांचे मातापिता त्यांच्या बालपणी वारले. परंतु एकनाथांचा सांभाळ, संगोपन त्यांच्या आजोबांनी केले. हुलसीला आपल्या मुलाचा कळवळा येऊन तिने ते बालक एका गरीब पण कनवाळू स्त्रीच्या स्वाधीन केले. तुलसीदास चारपाच वर्षांचे झाल्यावर ती मृत्युमुखी पडली. हे आता घरावेगळे झालेले पोरके पोर ना कोणाचा आधार ना कोणाचे प्रेम. तुलसीदासांनी दारोदार वणवण हिंडावे, भिक्षा मागावी; दया आल्यास कोणी चारपाच शिळेपाके तुकडे दिले तर ते खावे आणि कोठे तरी रात्रीचा आसरा घ्यावा. अशा दारिद्र्यदैन्यावस्थेत भटकत असताना त्यांना बाबा नरहरीदास स्वामींच्यासारखे प्रेमळ सत्पुरुष भेटले. त्यांचे भाग्य आता उदयाला आले. माता, पिता आणि गुरु हे जणू स्वामींच्या रूपाने अवतीर्ण

झाले. पूर्वी होऊन गेलेले महान संत हे अत्यंत विनम्रशील आणि प्रसिद्धिपराङमुख असल्यामुळे त्यांनी त्यांच्या जीवन चरित्रावर किंवा स्वतःच्या कुटुंबाविषयी आपल्या काव्यग्रंथात वा इतरत्र फारसा उल्लेख केलेला आढळत नाही. त्यामुळे तुलसीदासांबद्दल विश्वसनीय अशी माहिती शोधून काढण्यास कठीण पडते; पण त्यातल्या त्यात विद्वान पंडितांना मान्य असा काहीसा त्रोटक भाग मिळाला तर तो ग्राह्य धरावा लागतो. 'मानसातील' बालकांडात प्रारंभीचे मंगलाचरण झाल्यावर प्रथम ते आपल्या गुरूंना वंदन करतात. त्या ठिकाणी त्यांनी आपल्या गुरूंच्या नावाचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात–

बदउँ गुरु पद कंज कृपा सिंधु नररूप हरी।

नररूपाने हरी म्हणजे नरहरी असे जे माझे कृपासिंधू गुरु आहेत त्यांच्या पद-कमलांना मी वंदन करतो. या त्यांच्या गुरूंनी त्यांचे पुत्रवत पालन केले. तुलसीदास तल्लख बुद्धीचे होते. त्यानी गुरुगृही राहून अध्ययन केले आणि त्यांची मनोभावे सेवा केली. काही वर्षे लोटल्यानंतर गुरूशिष्यांनी मिळून तीर्थयात्रेस आरंभ केला. वाटेत ते संतमहंताचे दर्शन घेत घेत घाघरा आणि शरयू या नद्यांच्या संगमावर असलेल्या वराह क्षेत्री आले. तेथे तुलसीदासांनी अनेक वेळा गुरुमुखाने रामचरित्र ऐकले. रामभक्तीचे बीजारोपण त्यांच्या अंतःकरणात याच वेळी झाले. शेवटी गुरूंबरोबर तुलसीदास काशीक्षेत्री आले. तेथे त्यांची शेषसनातन महाराज यांच्याशी गाठ पडली. तुलसीदासांची तेजस्वी प्रज्ञा आणि प्रतिभा पाहून महा-राजांनी त्यांना आपल्या घरी ठेवून घेतले. पुन्हा या ठिकाणी त्यांचे अध्ययन सुरू झाले. वेदवेदांग, पुराण, इतिहास, काव्यकला इ. विषयांचा संपूर्ण अभ्यास करून गुरूंची अनुज्ञा घेऊन आपली जन्मभूमी राजापूर या ठिकाणी तुलसीदास परत आले. तेथे आल्यावर दीनबंधू पाठक यांची स्वरूपसुंदर कन्या रत्नावली हिच्याशी त्यांचा विवाह झाला. तुलसीदास आपल्या पत्नीसह सुखाने संसार करू लागले. आयुष्यात प्रथमच तुलसीदासांना घराचा आसरा, प्रेम, सुखशांती लाभल्याने आपल्या पत्नीने माहेरी जाऊ नये असे त्यांना वाटण स्वाभाविक होते. त्यामुळे ते तिला माहेरी पाठवीत नसत. पत्नीला मधून मधून माहेरी जावेसे वाटे. एकदा तुलसीदास घरी नाहीत असे पाहून रत्नावली भावाबरोबर माहेरी गेली. बायको माहेरी गेल्याचे त्यांना घरी आल्यावर समजले. अंधारी रात्र होती. यमुनेला पूर आला होता अशा स्थितीत ते यमुना नदी पार करून आपल्या सासुरवाडीस गेले. लगोलग रात्रीच्या संकटांना तोंड देऊन पती आपल्याला भेटावयास आले या त्यांच्या प्रापंचिक आसक्तीमुळे तिला मनस्वी चीड आली. तिने त्यांची चांगली कानउघडणी केली त्यासंबंधी पुढील उद्गार प्रसिद्ध आहेत–

लाज न लागत आपको दौडे आयहु साथ ।
धिक् धिक् ऐसे प्रेमको कहा कहहुँ मैं नाथ ।
अस्थिचर्ममय देह मम ता मैं जैसी प्रीती ।
तैसी जो श्रीराम महँ होति न तौ भवभीती ।

'जळो तुमचे जिणे. या अस्थिचर्म देहावर जितके प्रेम केले तितकेच जर श्रीरामचंद्रावर दाखविले तर तुम्ही या भवदुःखातून मुक्त व्हाल.'

पत्नीच्या मुखानेच जणू भगवंतांनी त्यांना त्यांच्या जीवितकार्याचा आदेश दिला. तुलसीदासाच्या हृदयाला ते वाग्बाण झोंबले. एकही क्षण तेथे न थांबता ते माघारी वळले. त्यांच्या अंतःकरणात विरक्ती निर्माण झाली. रामदासांनी लग्नमंडपात लग्नाला उभे असताना 'सावधान' ऐकताक्षणीच पळ काढला आणि ते खरोखरीच सावध होऊन त्यांच्या अंगी वैराग्य निर्माण झाले. जनतेत जागृती करण्याचे आपले ध्येय साकार होण्यासाठी बंधमुक्त झाले. तसाच प्रकार या शब्दांमुळे तुससीदासांच्या बाबतीत घडला. गृहस्थाश्रमाचा वेष टाकून ते साधू बनले आणि परमार्थाच्या मार्गाला लागले.

तुलसीदास पुन्हा गृहहीन झाले. पण 'हे विश्वची माझे घर' अशी त्यांची स्थिती झाली. इतर साधुसंतांप्रमाणे ते तीर्थयात्रेस निघाले. आसेतु हिमाचल हिंडले. अखिल भारतवर्ष त्यांनी नजरेने नीट न्याहळला. तेथील लोकस्थितीचे त्यांनी बारकाईनें निरीक्षण केले. संतांच्या सहवासात त्यांना अधिक ज्ञानप्राप्ती झाली. त्यांचा अनुभव व्यापक आणि विशाल झाला. निरनिराळ्या जाती जमातींच्या सहवासामुळे त्यांचे आचारविचार, त्यांची भाषा यांचा अभ्यास तुलसीदासांना सहजसुलभ झाला.

तीर्थाटन करीत असताना सामान्य जनतेची दीन, असहाय्य, करुणाजनक अवस्था तुलसीदासांनी प्रत्यक्ष पाहिली. त्यांचे मृदू, संवेदनशील अंतःकरण द्रवले. दुष्ट, ऐषआरामी, विलासी अशा परकीय सत्तेने जनतेला त्रस्त करून सोडले होते. प्रजेवर जुलुमजबरदस्ती करून त्यांची पिळवणूक चालू होती. अर्थ आणि काम यांच्या पूर्ततेसाठी प्रजेचे शोषण करणे क्रमप्राप्त होते. शासनाप्रमाणे उच्चवर्गही चैनी, विलासी झाला होता. अधिकारी वर्गाची 'हांजी, हांजी करून सामान्य जनता स्वाभिमानशून्य झाली होती. नाना धर्म, नाना पंथ समाजात रूढ झाल्याने माझाच पंथ श्रेष्ठ म्हणून परस्पर कलह सुरू झाले. त्यामुळे समाज दुभंगला होता. परिश्रम करूनही कुटुंबपोषणापुरती धनप्राप्ती नव्हती. यांमुळे अनाचाराचे प्राबल्य अधिकच वाढले. दैन्य, दारिद्रय यामुळे निष्क्रियता आली. सत्कर्मांचा लोप झाला व्यक्तिगत, सामाजिक सदाचार नष्ट झाले.

झूठइ लेना झूठइ देना। झूठइ भोजन झूठ चबेना ।।

या नीचांचे देणे घेणे म्हणजे सर्वच खोटयाचा व्यवहार. घरी नुसते चणे फुटाणे खाल्ले तर हे चोर पंचपक्वान्नावर हात मारला म्हणून सांगतील. समाजाची घडी संपूर्णपणे विस्कळित झाली होती. शेतकऱ्याला शेतीची साधने उपलब्ध नव्हती. वाण्याचा व्यापार चालेना. क्षत्रिय भित्रे बनले. सेवकवर्ग लाचार बनला. ब्राह्मण वेदाचा विक्रय करू लागले. त्यागी महान व्यक्तीचा अपमान होऊ लागला. कवडी कवडीसाठी प्रियजनांची हत्या होऊ लागली. पोटासाठी मुलाबाळांची विक्री होऊ लागली. कारण उदर-पोषण्याचे काम मिळण्यास अडचण पडू लागली. त्यामुळे सर्वच जनता चिंताग्रस्त झाली.

'कपटपटू' लबाडी करून समाजाला खूष ठेवील तो संत. धनवंत पापी असूनही तो कुलीन. ज्याची दाढी आणि नखे वाढली आहेत तो तपस्वी याप्रकारे लोभ, मोह, मत्सर, दंभ, स्वार्थ इत्यादी दुर्गणांनी समाज पोखरला गेला होता; इतकी अधोगती समाजाला प्राप्त झाली होती. तुलसीदासांच्या काळातील समाजाच्या परिस्थितीचे हें अगदी त्रोटक वर्णन दिले आहे, 'मानसाच्या' उत्तर कांडात कलियुगातील सामाजिक दुर्दशेचे जे वर्णन आले आहे, ते तुलसीदासांच्या समकालीन समाजाच्या अधोगतीचे चित्रण आहे. आपल्या काळातील अत्याचार आणि अनाचार म्हणजे रावणादी राक्षसांचे अत्याचार असे त्यांनी मानले आहे.

परद्रोही परदारारत परधन परअपवाद ।
ते नर पाँवर पापमय देह धरे मनुजाद ॥

परद्रोही, परस्त्रीशी संबंध ठेवणारे, चोर, लुच्चे, नीच, परनिंदासक्त असे हे पापी नर नरदेह धारण करणारे राक्षसच म्हणावयास पाहिजेत. इतके सत्यस्थितीचे स्वरूप तुलसीदासांनीं कलियुगाचे निमित्त करून समाजापुढे ठेवले. तुलसीदासांनी हे जे सामाजिक दुर्दशेचे चित्र उभे केले आहे. ते काल्पनिक नसून ऐतिहातिक सत्य आहे. सामाजिक अवनतीचे, किडलेल्या कुजलेल्या समाजाचे इतके विस्तारपूर्वक सूक्ष्म वर्णन तुलसीदासांच्या तीव्र बुद्धिमत्ता आणि विशाल परिपक्व भावपूर्ण अंतःकरणाचे द्योतक आहे.

या सामाजिक अधोगतीमुळे तुलसीदासांचे अंतःकरण भूतदयेने कळवळले. लोककल्याणाचा त्यांना ध्यास लागला. लोकांचे शीलसंवर्धन करावे, त्यांना सदाचार संपन्न करावे, हा 'बुडालेला जन' वर काढावा अशी रामदासांप्रमाणे तुलसीदासांनी चिंता वाहिली. त्या दोघांना स्वतःचा प्रपंच नव्हता. पण आता विश्वाचा प्रपंच त्यांच्यामागे लागला. यावर एकच तोडगा दोघांनी सांगितला. भव्य, दिव्य, उदात्त अशा आदर्श प्रभू रामचंद्रांच्या संपूर्ण चरित्राचे श्रवण करावे, गायन करावे आणि मनन करावे. राम हे सामान्य नराप्रमाणे असून त्यांच्यातील आदर्श गुण-

समुच्चयामुळे ते नारायण स्वरूप झाले आहेत. विश्ववंदनीय असे ‘ श्रीरामचरितमानस ’ हे महाकाव्य तुलसीदासांच्या दिव्य प्रतिभेतून निर्माण झाले. त्याच्यामागील खरी प्रेरणा म्हणजे लोककल्याण, समाजाचा उद्धार, सदाचार, सत्प्रवृत्ती यांचा प्रचार आणि प्रसार होय. तुलसीदासांना नीतिभ्रष्ट झालेल्या समाजाला शीलसंपन्न बनवावयाचे आहे. धर्माचे राज्य उभारावयाचे आहे. भारतीय संस्कृती ही सत्य, प्रेम, त्याग, सेवा इत्यादी सात्त्विक गुणांवर आधारली आहे. अहंकार, स्वार्थ, क्रोध, मोह, लोभ इ. तामसी गुण आपल्या संस्कृतीत त्याज्य आहेत हे तुलसीदासांना सामान्य जनतेच्या मनावर पक्के बिंबवावयाचे होते. रामचरितमानसात आदर्श मानवी जीवनाचा साक्षात्कार घडविल्यामुळे युगायुगाला प्रभावित करणारे असे ते झाले आहे. रामदासांनी ‘ रामकथा ’ ब्रह्मांड भेदून पैलाड नेली, हेच महान् कार्य तत्पूर्वी तुलसीदासांनी केले.

तीर्थाटन करीत असताना तुलसीदासांनी रामकथेचा प्रचार आणि प्रसार करण्यास सुरुवात केली. ‘ बहुजन सुखाय बहुजन हिताय ’ हे ध्येय सतत तुलसीदासांनी डोळ्यापुढे ठेवले. त्यापासून ते कधीच च्युत झाले नाहीत. त्यांचे भ्रमण चालू असताना त्यांनी ठिकठिकाणी मारुतीची मंदिरे उभारली. मारुती म्हणजे ‘ बलभीम ’ शक्तीचे प्रतीक. तसेच हातात धनुष्य बाण घेतलेले, मारुतीचे स्वामी धनुर्धारी राम त्यांचीही प्रतिष्ठापना केली. त्यांना समाजाला नुसतेच नीतिमान करून सोडावयाचे नव्हते तर बलसंपन्नही करावयाचे होते. प्रत्येक मंदिरात शरीर संवर्धनासाठी त्यांनी आखाड्यांची योजना आखली. शरीर संवर्धनाबरोबर मनावर उच्च संस्कार घडावे म्हणून रामायण, महाभारत यांसारख्या महाकाव्यांवर कीर्तन, प्रवचन, विचार विनिमय सुरू करून देवळाची सांस्कृतिक केंद्रे बनविली. समाजातील सर्व थरातील लोकांना एकत्र आणून परस्पर बंधुभाव वाढवून समाजात एकता निर्माण करण्याचा प्रयत्न तुलसीदासांनी केला.

साधारण १२ ते १४ वर्षे भ्रमण झाल्यानंतर काशीस आल्यावर रामकथा कथनास त्यांनी पुन्हा प्रारंभ केला. कधी अयोध्या, कधी काशी तर कधी चित्रकूट असे ते फिरत असत.

सामाजिक हीनता व दारिद्र्य घालविण्यासाठी त्यांना याच्यावर एकच रामबाण औषध–एकच दिव्य संजीवनी दृग्गोचर झाली ती म्हणजे रामाची गुणगाथा. त्यामुळे स्वतःला आणि जनमानसाला ‘ परमविश्राम ’ लाभेल अशी त्यांची श्रद्धा होती. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी रामचरणी समर्पित केले. त्यांचे जीवन राममय झालें. आदी कवी वाल्मीकी व त्यांचे आदी महाकाव्य म्हणजे रामायण यांच्यापासून त्यांना स्फूर्ती प्राप्त झाली. सुरुवातीस विद्वान पंडिताप्रमाणे त्यांनी संस्कृतमध्ये रचना करण्यास सुरुवात केली. त्याबद्दल एक आख्यायिका प्रसिद्ध

आहे. दिवसा ते जेवढी रचना करीत तेवढी ती रात्रीतून लुप्त होऊन जाई. असे आठ दिवस झाल्यानंतर त्यांना स्वप्नात उमाशंकरांचे दर्शन झाले. शंकरांनी त्यांना आदेश दिला, 'तू स्वभाषेत काव्यरचना कर. संस्कृतच्या उद्योगात पडू नकोस. ज्यामुळे अखिल मानवाचे कल्याण होईल तेच करणे श्रेयस्कर आहे. तू अयोध्येला जाऊन राहा आणि तेथेच काव्यरचना कर. माझ्या आशीर्वादाने सामवेदाप्रमाणे तुझे काव्य यशस्वी होईल.' एवढे बोलून उमाशंकर अंतर्धान पावलें. तुलसीदासांना उमाशंकरांच्या दर्शनाने धन्य वाटले आणि ते मोठ्या उत्साहाने, आनंदाने अयोध्येला गेले. आधुनिक मनोवैज्ञानिक दृष्टचा असे म्हणता येईल की, ज्या गोष्टीविषयी आंतरिक तळमळ असते, ज्याचा रात्रंदिवस निदिध्यास लागलेला असतो ते ध्यानी, मनी, स्वप्नी दिसत राहते. तुलसीदासांच्या काली वेदशास्त्र, पुराण यांच्यावरील ग्रंथ प्राकृत भाषेत करणे म्हणजे अब्रह्मण्यम् मानले जाई. पण शंकराच्या म्हणजे प्रत्यक्ष महादेवाच्या दृष्टांतामुळे प्राकृत भाषेत असे ग्रंथ रचण्यास धार्मिक मान्यता प्राप्त झाली असेही कदाचित म्हणता येईल. काही असो, तुलसीदासांनी लोक-भाषेत रामकथा रचण्यास सुरवात केली. अयोध्येत संवत १६३१ मध्ये चैत्र शुद्ध नवमीला (इ. स. १५७४) रामजन्माच्या शुभमूहूर्तावर प्रात:काली पवित्र अशा शरयू नदीच्या तीरावर बसून त्यांनी आपले 'रामचरितमानस' रचण्यास प्रारंभ केला. दोन वर्षे सात महिने आणि सव्वीस दिवसात मानसाची रचना संपूर्ण झाली. संवत १६३३ मार्गशीर्ष शुद्ध पंचमी (इ. स. १५७६) रामविवाहाचा शुभदिन हा मानसाच्या समाप्तीचा दिवस आहे. 'मानस' रचण्यासाठी घेतलेले आधारभूत ग्रंथ कोणते आणि 'मानस' रचण्याचा हेतू कोणता याचा स्पष्ट उल्लेख बालकांडातील सुरुवातीच्या मंगलचरणानंतर तुलसीदासांनी केला आहे.

नाना-पुराण-निगमागम संमतं यद् ।
रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि ।
स्वांत:सुखाय तुलसी रघुनाथगाथा ।
भाषानिबंधमतिमंजुलमातनोति ।। बा. कां ७ ।।

वेदशास्त्र, पुराण, इतिहास अनेक रामायणे यात सामावलेले ज्ञानभांडार यापासून सामान्य जनता वंचित झाली होती. त्यातील सारसर्वस्व रामकथेचा आधार घेऊन प्राकृत जनांना तुलसीदासानी खुले करून दिले. प्राकृत भाषा विद्वज्जनांना त्याकाळी मान्य नव्हती. तरीही ते आत्मविश्वासाने म्हणतात 'मी हा काव्यप्रबंध अत्यंत मंजुळ मधुर अशा स्वभाषेत म्हणजेच जनतेच्या भाषेत रचून त्याचा विस्तार केला आहे. ज्ञानेश्वरांनी जेव्हा भगवद्गीतेवरील भाष्य प्रथमच मराठीत लिहिले त्यावेळी मराठीलाही मान्यता मिळाली नव्हती. त्यांनी मराठी संबंधी असेच स्पष्ट विचार आत्मविश्वासाने मांडले आहेत. 'माझा मऱ्हाठाची

बोल कौतुके। परि अमृतातेही पैंजा जिंके ॥' मला स्वत:ला परम सुखाचा, शांतीचा लाभ व्हावा यासाठी मी ही रघुनाथ–गाथा रचली असे तुलसीदास विनम्रभावाने सांगतात. मानसकाव्याच्या उत्तरकांडाच्या शेवटी म्हणतात या मतिमंद तुलसीदासाला रामकथा रचण्याने त्याच्या मनाला परमशांती प्राप्त झाली आहे. जे साध्य होते ते साधले यामुळे त्यांच्या मनाला संपूर्ण समाधान लाभले आहे. आपल्या कार्याची व्याप्ती ते स्वत:पुरती मर्यादित दाखवीत. पण संकल्प स्वत:पुरताच होता तरी तो सर्वांना सुखावह झाला. त्यातील भारतीय शाश्वत मूल्ये युगायुगाला प्रभावित करणारी आहेत. त्यांच्या ' उच्चरुचीचे ' महान फळ पदरात पडले आहे.

रघुनाथ गाथेला मी ' रामचरितमानस ' असे नाव का दिले याचा उल्लेख तुलसीदासांनी केला आहे.

रचि महेस निज मानस राखा ।
पाइ सुसमउ सिवा सन भाषा ॥ १ ३४ । ६ ॥

महेशांनी रामचरित मनात रचले आणि योग्य वेळी ते पार्वतीला कथन केले. त्यामुळे त्याचे नाव ' रामचरितमानस ' ठेवले. आरंभीच त्यांनी म्हटले आहे की, स्वांत:सुखाय मी रामकथा रचली पण पुढे असा उल्लेख केलेला आढळतो या कथेचे जे जे लोक श्रवण करतील त्या सर्वांना मन:शांती लाभेल. कशामुळे तर––

' मन करि विषय अनल बन जरई ।
होई सुखी जौं एहिं सर परई ॥ १ । ३४ । ४ ॥

मनरूपी हत्ती विषय विकाररूपी दावानलात जळत पडला आहे तो जर या रामचरितमानसरूपी सरोवरात येऊन पडला तर तो सुखी होईल. मानसात अवगाहन केले तर ' काक होई पिक बक मराल ' थोडक्यात म्हणजे मनातील दुष्प्रवृत्ती नष्ट होऊन मन शुद्ध, पवित्र, सात्त्विक होईल. कारण बहुजन हितातच तुलसीदासांचे सुख सामावले आहे. मानस ' मंगल भवन अमंगलहारी ' आहे अशा मोठ्या उत्स्फूर्त भावनेने ते नमूद करतात. त्यांच्या अंगी असलेली शालीनता आणि विनम्रभाव नजरेतून सुटत नाहीत. ते म्हणतात––

कबि न होऊ नहिं बचन प्रबीनू ।
सकल कला सब बिद्या हीनू १ । ८ । ४
कबित बिबेक एक नहिं मोरें ।
सत्य कहउँ लिखि कागद कोरें ॥ १ । ८ । ६ ।

मी कवी नाही, वक्ता नाही. विद्या कला मला अवगत नाहीत. नाना अलंकार नाना छंद प्रबंध यापैकी मला कशाचेही ज्ञान नाही. विद्वत्ता नाही की काव्य-

शक्ती नाही हे मी शपथपूर्वक सत्य सांगत आहे. स्वतःच्या बुद्धिमत्तेबद्दल ते लिहितात--

मति अति नीचि ऊँचि रुचि आछी ।
चाहिअ अमिअ जग जुरइ न छाछी ।। १ । ७ ।४

माझी बुद्धिमत्ता अत्यंत कमी प्रतीची आहे. पण अभिरुची, आवड श्रेष्ठ उदात्त आहे. अमृत मिळावे अशी इच्छा पण जगात साधे ताकाचे पाणी मिळण्याची अडचण पडते.

जब बालक कह तोतरी बाता ।
सुनहि मुदित मन पितु अरु माता ।। १ । ७ । ५ ।।

माता-पिता मोठ्या कौतुकाने लहान मुलांचे बोबडे बोल ऐकतात. त्याप्रमाणे विचारी मंडळी रघुपतीचे गुणगाण केलेली माझी कविता गोड मानून घेतील.

स्वतः पंडित विद्वान असूनही ते आपल्याला कवी किंवा पंडित म्हणवून घेण्यास त्यांना संकोच वाटतो. ते अखिल चराचर सृष्टीला 'सियाराममय' जाणून वंदन करतात.

तुलसीदास सर्वच बाजूंनी स्वतःकडे कमीपणा घेऊन आपली शालीनता प्रकट करतात. जग सियाराममय मानण्याने त्यात लहानमोठा गरीबश्रीमंत असा भेद राहात नाही. समता आणि एकता याचे बीजारोपण या सिद्धान्तात दिसून येते. शालीनतेबरोबर त्यांचा आत्मविश्वासही नजरेत भरतो. ज्ञानेश्वरादी सर्व संतांमध्ये हे गुण, आपल्याला प्रकर्षाने पाहावयास मिळतात. श्रोत्यांना उद्देशून ते म्हणतात– 'सज्जनहो, पवित्र अशा गंगेप्रमाणे सर्वांचे हित करणारी कीर्ती, कविता आणि संपत्ती असेल तरच ती उत्कृष्ट आहे असे म्हटले जाते. रामचंद्रांचे चरित्र सर्वांचे अनंत कल्याण करणारे आहे. माझी कविता हीन प्रतीची असेल, फिकी असेल, पण श्रोतेहो, तुमच्या कृपेने माझा हेतू सुलभ होणार आहे.' त्याला ते दाखला देतात. रेशमाचे सुंदर नक्षीकाम साध्या तरटावर केले तरी ते खुलून दिसतेच ना. 'तुम्ही ही कथा मन लावून ऐका आणि आपणच माझ्यात सुधारणा करा.' अशी तुलसीदास श्रोत्यांना लडिवाळपणे विनंती करतात. तुलसीदास रामाचे परमभक्त आहेत. रामाच्या केवळ स्मरणाने उदात्त, पवित्र भावना निर्माण होतात. त्यांचे चरित्र महान आहे ते श्रवण केले असता 'कलिमल मनोमल' नाहीसा होतो. 'रामचरित मानस' या त्यांच्या लोकोत्तर महाकाव्याबद्दल त्यांना कवी वाल्मीकीचा अवतार असे मानले आहे. संतचरित्रकार सत नाभादास आपल्या भक्तमालेत तुलसीदासांबद्दल लिहितात--

कलिकुटिल जीव निस्तार–हित वाल्मिकी तुलसी भयो ।।

दुष्ट कलीमुळे पीडित अशा पापी जीवांचा उद्धार करण्यासाठी आद्य कवी

वाल्मीकीच तुलसीदासांच्या रूपाने अवतीर्ण झाले आहेत. भक्तमालेचा ते सुमेरू म्हणून त्यांनी त्यांचा गौरव केला आहे. कविवर्य मोरोपंतांनी आपल्या संत चरित्रात 'तुलसीदास स्तव' म्हणून तुलसीदासांवर रचलेल्या आर्यामध्ये उल्लेख केला आहे.

श्रीवाल्मीकीच झाला तुलसीदास रामयश गाया।
तरीच प्रेमरसाची खाणी तशीच वश गा या ।।

अशा तऱ्हेने त्यांच्या हयातीत तुलसीदासांची लोकवाङ्मयकार संत अशी ख्याती झाली.

'मानस' जनभाषेचे काव्य आहे. ते हिंदी भाषेत लिहिले असून ती हिंदी अवधी व व्रज-भाषा यांचा सुंदर मिलाफ आहे. त्यामुळे भाषेच्या दृष्टीने युगप्रवर्तक रचना आहे. तुलसीदासांनी या भाषा भगिनींचे मधुर मीलन केले. त्यांना एकत्र गोवून त्यांची मैत्री शाश्वत स्वरूपाची केली. तुलसीदासांच्या द्रष्टेपणाचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. भाषा त्यांच्यापुढे सदैव हात जोडून उभी असे. त्यांना त्याकरिता कष्ट धडपड कधी करावी लागली नाही. मानवाच्या कल्याणाची तळमळ अंतःकरणात सदैव असल्याने समाजाला कितीतरी गोष्टी त्यांना सांगावयाच्या होत्या. जीवनातील शारीरिक, मानसिक, आत्मिक समस्या उकलून या समाजाच्या पुढे मांडावयाच्या होत्या. सरस्वती त्यांच्या जिव्हेवर नाचत होती. हिंदीबरोबर संस्कृत, फारशी या भाषांचा गाढा अभ्यास त्यांनी केला होता. त्यांचे विचार सहजपणे सुलभतेने शब्दांच्या वाटेने मुखातून बाहेर पडत. त्यांची भाषा एखाद्या कसलेल्या कलावंताप्रमाणे प्रासादिक, भावपूर्ण आणि मधुर आहे. जनमानसाला तिने प्रभावित केले आहे.

'मानस' ग्रंथ प्राकृत भाषेत लिहिल्याने काशीतील कर्मठ पंडितांचा विरोध तुलसीदासांना सहन करावा लागला. पंडितजन त्यांच्या ग्रंथाला मान्यता देण्यास तयार होईनात. एकनाथांच्या 'भागवता'ला याच कारणामुळे पैठणमधील कर्मठ ब्राह्मणांनी उपेक्षित ठेवले होते. म्हणून पैठणहून ते काशीक्षेत्रातील विद्वज्जनांकडून मान्यता मिळविण्यास काशीला गेले. पण बहुजन समाजाच्या हितासाठी मराठी भाषेत लिहिल्याने भागवत अत्यंत लोकप्रिय झाले आणि लोक त्यांना नावाजू लागले. पण गीर्वाण भाषेच्या अभिमानी पंडितांना ते बघवेना. काशीला गेल्यावर त्यांना तोच अनुभव आला. आपल्या लोकप्रिय ग्रंथांना मान्यता मिळविण्यासाठी तुलसीदास आणि एकनाथ दोघेही एकाच वेळी काशीत होते असे म्हणतात. दोघांनीही विरोधाला न जुमानता स्वभाषांचा पुरस्कार केला. आपल्या मनाची शांती ढळू न देता शास्त्री पंडितांची समजूत घालून उभयतांनी आपल्या ग्रंथांना मान्यता मिळविली आणि मोठ्या थाटात रथातून काशीक्षेत्री या ग्रंथांची

मिरवणूक काढली. तुलसीदासांच्या मान्यतेचे प्रकरण तुलसीदास कालीन आचार्य मधुसूदन सरस्वती यांच्यावर सोपवले गेले होते. त्यांनी समग्र 'मानस' ग्रंथ वाचून पाहिला. वाचल्यानंतर त्यांचे मन प्रसन्न झाले आणि त्यांनी आपला अभिप्राय पुढील संस्कृत श्लोकात व्यक्त केला आहे.

आनंद कानने ह्यस्मिन जंगमस्तुलसीतरुः ।
कवितामंजरी यस्य रामभ्रमरभूषिता ॥

या आनंदवनात एक फिरता तुलसी नावाचा वृक्ष आहे. त्या तुलसीला आलेल्या काव्य मंजिरीवर रामरूपी भ्रमर बसल्याने ते सुशोभित दिसत आहे.

तुलसीदासांना वाल्मीकींचा अवतार म्हणून मानले गेले तरी त्यांनी आपले स्वतंत्र वैशिष्टच प्रस्थापित केले आहे. वाल्मीकींनी आर्यसंस्कृतीचा परमोच्च आदर्श मानवाला दाखविण्यासाठी नरश्रेष्ठ पुरुषोत्तम असे रामाचे ठिकठिकाणी वर्णन केले. वाल्मीकींचे रामायण आर्यसंस्कृतीच्या सामाजिक आणि राजकीय नीतीचे विशाल भांडार आहे. तुलसीदासांचा राम केवळ नरश्रेष्ठ पुरुषोत्तम नसून तो भगवंताचा अवतार असल्याने प्रत्यक्ष भगवंतच आहेत म्हणून 'मानसात' भक्तिरसाचा प्रवाह अखंड वाहत आहे. वाल्मीकी रामायणात वीर आणि शांत रस प्रामुख्याने आढळतात. तुलसीदासांनी स्वतःच्या काळातील सामाजिक, राजकीय रीतीनीतींचा परिचय मानसात करून दिला आहे. तुलसीदासाचे युग तुर्की, इस्लामी आणि हिंदू यांच्या सांस्कृतिक संघर्षाचे युग होते. म्हणून युगदर्शनाच्या पद्धतीत दोघांच्यामध्ये महदंतर आहे. वाल्मीकी रामायणात यथार्थ चरित्र चित्रण आहे. तर तुलसीदासांच्या मानसांत भक्तीची छाप आणि भक्तीचा प्रचार ठिकठिकाणी दिसून येतो. मानसांत वीररसापेक्षा भक्ती आणि शांत रस विशेषत्वे मनावर ठसतात. अधर्म, अनीती यांचे निर्मूलन होण्यासाठी तुलसीदासांच्या मते मानसिक विकृती लोभ, मोह मत्सर इत्यादी विकार नष्ट झाले पाहिजेत. सर्वगुणशीलसंपन्न अशा आदर्श रामाची भक्ती केल्यास अंतःकरण शुद्ध पवित्र होते असा त्यांचा विश्वास आहे. व्यक्तीचा मनोमल नाहीसा होतो. प्रेमभाव, त्याग, सेवा समता, बंधुता या उच्च भावना सर्वाभूती परमेश्वर आहे असे मानले तरच त्या निर्माण होतील. येथे परमेश्वरभक्तीमध्ये त्यांनी पूजाअर्चा इत्यादी कर्मकांडाचे प्रस्थ माजविले नाही. उलट असे भोंदू ढोंगी समाजातून नाहीसे झाले पाहिजेत यावर त्यांचा अधिक कटाक्ष होता. केवळ रामाचे नामोच्चारण केले तरी चित्तवृत्ती स्थिर होतील आणि मानवाला मोक्षप्राप्ती होईल. हा मोक्ष म्हणजे स्वर्गात जाऊन भोग भोगणे नव्हे तर आसुरी दुष्ट प्रवृत्तींपासून सुटका होय. नराचा नारायण होणे या उदात्त भावनेने सामाजिक नैतिक मूल्ये प्रस्थापित होण्यासाठी त्यांनी भगवंताची भक्ती हे साधन मानले

आहे. पण हा भक्तीचा महिमा गाण्यास मानवाची उन्नती होणे ही त्यांच्या अंतरात्म्यातील तळमळ त्यांना प्रेरणा देते.

तुलसीदासांचे ' मानस ' हा ग्रंथ केवळ काव्य नाही तो केवळ नीतिमय नाही किंवा नुसताच भक्तीचा महिमा सांगणाराही नाही. त्यात मानवाच्या संपूर्ण मानवतेचे आदर्शयुक्त चित्रण आहे.

हे महाकाव्य साहित्याच्या उच्च कसोटीला उतरणारे आहे. भाव, भाषा आणि प्रबंधरचना प्रसंग आणि घटना यांची अशी गुंफण साधली आहे की, त्या एकातून एक अशा सहजपणे बाहेर येतात. वाचक त्यात रमून जातो. त्या त्या घटनांशी त्या त्या स्थलांशी समरस होतो. ' मानसाच्या ' रूपकाचे वर्णन करताना तुलसीदास म्हणतात. वेदपुराण या समुद्रापासून तयार होणारे संतसाधू हे मेघ असून ते रामाचे सुयश रुपी सुंदर, मधुर, मनोहर आणि मंगलकारी अशा जलाचा वर्षाव करीत आहेत. ते जल सात्त्विक बुद्धीभूमीत असलेले गंभीर असे हृदय त्याठिकाणी येऊन साठते तेच हे पवित्र ' मानस '.

बरषहि राम सुजस बरबारी। मधुर मनोहर मंगलकारी ।१।३५।३

' मानसात ' जे बुद्धीने पूर्ण विचार करून अतिशय उत्तम तऱ्हेने रचलेले चार संवाद आहेत ते या पवित्र शुभद मानसाचे चार मनोहर घाट आहेत ते चार संवाद असे :– शंकरपार्वती संवाद, याज्ञवल्क्य ऋषी भारद्वाजमुनी संवाद, भुशुंडी गरुड संवाद, आणि शेवटी तुलसीदास संत यांचा. श्रोता आणि वक्ता यांची प्रश्नोत्तरे, पात्रापात्रांचे संवाद यांचे दुवे शृंखला पद्धतीने बेमालूम सांधलेले आहेत.

सात कांडे या मानससरोवराचे सप्त सोपान. अमृताप्रमाणे मधुर अशा सुयश जलावर होणारा तरंग विलास हा मनाला प्रसन्न करणारे उपमा रुपकादि अलंकार होत. यातील चौपाया या जलावर पसरलेल्या घनदाट मनोहर कमलिनी. त्यावर छंद, सोरठा आणि दोहा या बहुरंगी कमलांचे समूह शोभिवंत दिसत आहेत. मानसातील काव्यगुण हे इतस्ततः विहार करणारे जलचर मीन, संतांची सभा या सरोवराच्या चौबाजूस असलेली आंबराई आणि भक्तियुक्त श्रद्धा हा तेथील बहरलेला वसंत. क्षमा, दया आणि भक्तीचे निरूपण हे तेथील लतांचे मंडप, यमनियमादी ही फुले आणि हरिचरणी प्रेम हा त्या फुलांतील मधुर रस आणि ज्ञान हे फळ होय. मानस या शब्दावर श्लेषार्थ चढवून तुलसीदासांनी मनोज्ञ असे सांग रूपक तयार केले आहे. ' मानसात ' त्यांनी प्रामुख्याने काय सांगितले आहे, कसे सांगितले आहे आणि त्यापासून फलप्राप्ती काय होते हे सामान्य जनांना, सुलभरीतीने समजेल अशा हृदयगंम आणि नानाविध कल्पनांनी नटवले आहे. सरोवर आणि त्याच्या

परिसराचे रमणीय वर्णन आणि त्याद्वारे त्यावर चढविलेला आध्यात्मिक साज हे तुलसीदासांच्या कल्पनाशक्तीचे आणि सामाजिक मनाचे द्योतक आहे.

मानसातील व्यापक सौंदर्यामुळे सर्व प्रकारच्या लोकांना त्या काव्याने आकर्षित केले आहे. साहित्यिक रसिकांना यांत उत्तम काव्याचा आदर्श दिसतो, विद्वान पंडितांना यांत द्वैत, अद्वैत, सगुण निर्गुण. जीवात्मा, परमात्मा, ज्ञानभक्ती अशा निरनिराळचा विवाद्य सिद्धान्ताचा समन्वय दृष्टीस पडतो. नीतिज्ञ लोकांना तुलसीनीती प्रतीत होते तर सामान्य जनांना गृहस्थाश्रम धर्माच्या उच्च आदर्शाचा साक्षात्कार होतो. प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर मेळ साधून आदर्श प्रापंचिक जीवनच आध्यत्मिक उन्नती, मानसिक स्वास्थ्य आणि समाधान कसे प्राप्त करून देते हे कर्तव्यतत्पर आणि गुणसागर राम यांच्या आदर्श जीवनाचे चरित्रचित्रण भावमधुर लालित्यपूर्ण आणि रसाळ अशा लोकभाषेत वर्णन करून जनताजनार्दनाला सादर केले आहे. रामायणातील कथा पूर्वी होती ती आजतागायत तशीच आहे. परंतु तुलसीदासांची प्रज्ञा आणि प्रतिभा यांनी मानसातील रामकथेवर एक आगळाच अलौकिक साज चढविला आहे.

आपली संपूर्ण समाज व्यवस्था गृहस्थाश्रम धर्मावर आधारलेली आहे. व्यक्तीचे सुख समष्टीच्या सुखात सामावलेले आहे. त्यामुळे गृहस्थाश्रम धर्माचा पाया भक्कम मजबूत पाहिजे. तुलसीदासांच्या काळात परकीय संस्कृतीचा प्रभाव पडू लागला होता. त्या परकीय संस्कृतीत अनेकपत्नीत्व मान्य होते. त्यामुळे स्त्रियांना पळवून नेणे, अनेक स्त्रियांशी विवाहबद्ध होणे या गोष्टी सर्रास चालू होत्या. आपल्या संस्कृतीची समाजाला ओळख करून देणे संत या नात्याने तुलसीदासांनी आपले कर्तव्य मानले आणि एक पत्नी, एक वचनी, एक बाणी अशा रामाची प्रतिष्ठापना केली.

पुत्रप्रेमापायी रामविरहामुळे येणाऱ्या दशरथाच्या मृत्यूचे वर्णन वाचताना डोळे पाणावतात, तर वनात भ्रमण चालू असतांना केव्हा स्वतःच्या हातांनी तयार केलेली पुष्पमाला सीतेच्या वेणीत घालत असताना नाजूक शृंगाराने मन प्रसन्न होते. पार्वती विवाहाच्या वेळी शिवाच्या नंदीवरील विचित्र वरातीचे अद्‌भुत रम्य वर्णन वाचून गंमत वाटते. दशरथाच्या पुत्रजन्माचे वेळी झालेल्या आनंदोत्सवात धावपळीत आपणही सहभागी आहोत असे वाटते. येथे गृहस्थाश्रमातील आपल्याला मातृधर्म, पितृधर्म, पतिधर्म, पुत्रधर्म, भ्रातृधर्म, शिष्यधर्म यांचे परमोच्च दर्शन घडते. गृहजीवनातील हे सर्वस्पर्शी चरित्रचित्रण तुलसीदासांनी हुबेहूब डोळचापुढे उभे केले आहे तुलसी दास हे सिद्धहस्त शैलीकार आहेत त्यांची वर्णन शैली अप्रतिम आहे. भाषाशैली भावनाकूल, नादमाधुर, प्रसादपूर्ण आहे. तल्लीनता रचनाचातुर्य अलंकार योजना, भावाविष्कार आणि रसपरिपोष या गुणांमूळे मन कथेत रमून जाते.

संत असंत वर्णनामुळे संताबद्दल प्रेम आदर आणि असंतांबद्दल चीड उत्पन्न होते. युद्धाचे वीरश्रीयुक्त वर्णन आवेश निर्माण करते तर भगवद्भक्तीचे निरूपण वाचताना अंतःकरणाला शांतीसुखाचा लाभ प्राप्त होतो. प्रसंगवर्णन, स्वभाववर्णन, निसर्गवर्णन ऋतुवर्णन वस्तुवर्णन अत्यंत परिणामकारक रीतीने रंगविली आहेत.

व्यक्ति चित्रणाच्या दृष्टीने मानस अतिशय उत्कृष्ट काव्य आहे. इथे मानवी भावनांचे मार्मिक चित्र कुशलतेने रेखाटले आहे. यात मानवी मनोभावनांचा आदर्श उभारला आहे. तसेच मानवी जीवनातील द्वंद्वांचे, संघर्षाचे दर्शनही आहे, रामलक्ष्मणांचे भरतावरील असीम प्रेम तर वाली सुग्रीव आणि रावण बिभीषण यांच्यामधील बंधु विद्रोह; अडाणी साधेभोळे भिल्ल, किरात, कोळी, यांच्यासारखे वनचर तर धूर्त, बुद्धिमान, शूर, सुग्रीव, हनुमान आणि अंगदासारखे राजकारणपटू, परमप्रिय पुत्र राम याच्या वियोगामुळे होणाऱ्या असह्य दुःखाने दशरथाचा मृत्यू तर कुटिल कुमती कैकेयीला प्रिय पुत्र भरत याला मिळणाऱ्या राज्यामुळे आनंद; दुष्ट, कामांध शूर्पणखेसारख्या राक्षसिणी तर पतिपरायण, पवित्र अशा सीता, मंदोदरी; दुष्ट, दुराचारी, मदोन्मत्त रावण तर विनयशील, शीलसंपन्न, सदाचारी राम. विरोधाभास दर्शविणारी अशी जिवंत चालती बोलती पात्रे, प्रसंग, घटना चलत्, चित्रपटाप्रमाणे भराभर डोळ्यांसमोर येतात.

तुलसीदासांची वर्णनशैली आणि सूक्ष्म निरीक्षण त्यांनी रंगवलेल्या विविध पात्रांच्या द्वारे आपल्याला दिसून येते. त्यांची चालती-बोलती सजीव पात्रे अंतःकरणाचा ठाव घेतात. प्रत्येक पात्रांतील नाजूक भावछटा निरनिराळ्या प्रतीकांच्या द्वारे ते आपल्याला उलगडून दाखवतात. सामान्य माणसाच्या जीवनात आढळणारी नाती आणि त्यांतील संघर्ष, परस्पर प्रेमभाव, त्याग व कर्तव्यदक्षता त्यांनी मोठ्या कुशलतेने आपल्यापुढे मांडली आहेत. मग ती पति-पत्नी, माता-पुत्र, सासू-सुनेमधील असोत वा भावा-भावा मधील किंवा स्वामी–सेवकांतील असोत. स्वतः संसारी पुरुष नसतानासुद्धा तुलसीदासांनी आपल्या प्रतिभापूर्ण, प्रभावी कल्पनाशक्तीने ह्या सर्व नात्यांमधील भावनांच्या सूक्ष्म लहरी वाचकांच्या अंतःकरणाला हेलावून सोडतात. अशामुळे सामान्य माणसाला तुलसीरामायण वाचताना आपण एक महाकाव्य वाचत आहोत असे न वाटता आपल्याच जीवनाच्या काही भागांचा चित्रपट पाहत आहोत असा भास होतो. ह्यामुळे तुलसीरामायण वाचायची लोकांना अधिकच गोडी उत्पन्न झाली व श्रीरामप्रभूंच्या जीवनाचा संदेश खेड्यापाड्यात पोहोचवायचा तुलसीदासांचा निर्धार साकार झाला. एखाद्या प्रसंगाचे वर्णन करताना ते इतके तन्मय होऊन जातात की वाचकांना असे वाटते की ते स्वतःच त्या प्रसंगामध्ये सहभागी झाले आहेत आणि त्याचा उपभोग घेत आहेत.

मनुष्य स्वभावाचा सर्वांगीण परिचय, निसर्ग सौंदर्याची आवड, सूक्ष्म

निरीक्षण, कल्पनाशक्ती, उत्कृष्ट भावाविष्कार आणि रसाविष्कार, पात्रानुरूप समर्पक शब्दयोजना, भाषेचे लालित्य, नादमाधुर्य आणि लयबद्धता यामुळे मानसातील गोडवा अपूर्व आहे. पानापानावरील दोहे, चौपाया यांत आपल्याला यांची असंख्य उदाहरणे देता येतील.

तुलसीदासांनी रामराज्याचे चित्र मोठ्या भावुकपणे रंगविले आहे. 'मानसाच्या' अखेरीस रामराज्य सुरू होते. राजा कर्तव्यदक्ष, तशीच प्रजा कर्तव्यदक्ष. येथे कोणी दुःखी नाही, दरिद्री नाही, सर्वच धर्मनिरत आणि सर्वगुणसंपन्न. सर्वांचे देह निरोगी आणि सर्वच सुंदर.

अनिमादिक सुख संपदा रही अवध सब छाई ।

धनधान्याची समृद्धी, वैभवसंपत्ती, सर्वत्र आबादी आबाद अशा कल्याणकारी रामराज्याचा उपभोग प्रजा घेऊ लागते. राम खऱ्या अर्थाने प्रजारक्षक होऊन प्रजेचे पुत्रवत पालन करू लागतो व राजा आणि प्रजा प्रसन्न मनाने कालक्रमण करू लागतात.

महात्मा गांधी 'मानसाचे' नित्य पठण करीत असल्याने त्यांना तेच रामराज्य अभिप्रेत होते. स्वराज्याचे सुराज्य होऊन रामराज्य आले पाहिजे. ह्या रामराज्याची तहान अजून भागलेली नाही. तुलसीदासांच्या काळी परकीय राज्यात सद्गुणाची, नीतीची, सदाचारांची समाजाला जेवढी आवश्यकता होती तितकीच ती सद्यः स्थितीत भासत आहे,

उत्तर कांडात अत्यंत कळकळीने रामांनी प्रजेला उद्देशून भाषण केले आहे—

सुनहु सकल पुरजन मम बानी । कहउँ न कछु ममता उर आनी ।
नहिं अनीति नहिं कछु प्रभुताई । सुनहु करहु जो तुम्हहि सोहाई ।।
जौं अनीति कछु भाषौं भाई । तौ मोहि बरजहु भय बिसराई ।। ७।४२।२

'हे प्रजाजन हो, माझे भाषण तुम्ही सर्वांनी ऐकून घ्यावे. मी मनात स्वार्थ ठेवून बोलत नाही. मी अनीतिपूर्ण भाषण करणार नाही. मी आत्मस्तुतीपर शब्द बोलणार नाही. मी काही अनुचित, अन्यायाचे, दोषास्पद असे काही बोलू लागलो तर कुठल्याही तऱ्हेची मनांत भीती न बाळगता तुम्ही खुशाल मला त्याचा जाब विचारा, मला बाजूला सारा. राज्याचे स्वामी लोकच.' पूर्वी वंशपरंपरा राज्यपद मिळत असूनही आदर्श राजा किती निःस्वार्थी, अनासक्त, न्यायी, उदार आणि क्षमाशील राहून प्रजेवर वात्सल्यपूर्ण प्रेम करणारा असू शकतो याचे सजीव चित्रण अत्यंत तळमळीने तुलसीदासांनी जनतेसमोर ठेवले आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' सर्व राष्ट्र, सर्व विश्व जणू एकच कुटुंब आहे इतका परस्पर ऐक्यभाव निर्माण करण्यास प्रेम, त्याग, सेवा या मौलिक गुणांशिवाय ते शक्य आहे काय? परकीय सत्तेच्या काळीही तुलसीदासांना प्रजातंत्र शासन प्रणाली मान्य होती. जो राजा

प्रजेला अनीतिमान बनवतो, दुःखी कष्टी करतो तो राजा केवळ नरकाचा अधिकारी असतो. ज्यावेळी भरत रामाच्या भेटीला वनात जावयाचे ठरवितो त्यावेळी कौसल्या भरताला समजावून सांगते– महाराज स्वर्गात, राम वनांत आणि भरता, तूही तिकडे चाललास मग प्रजेचे रक्षण कोण करणार; अशा राजाला नरकवास भोगावा लागतो. रामराज्य या शब्दातच लोकाराधना आहे. राजाचे निरंकुशत्व, सुलतानशाही तुलसीदासांना मान्य नाही. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कल्याणकारी रामराज्याची किती आवश्यकता आहे ते तुलसीदासांनी जनमानसावर ठसविण्याचा प्रयत्न केला.

जनजागृतीसाठी तुलसीदासांनी त्यांच्याकाळी म्हणजे चारशे वर्षांपूर्वी रामलीला सुरू केली. रामलीलेच्या द्वारे जनमानसाचे रंजन करता करता तुलसीदासांनीं मानवी जीवनाच्या उच्च ध्येयाचा साक्षात्कार घडविला. 'मानसात' संगीत, नृत्य आणि नाटच या तीनही कलांचा सुंदर मिलाफ झाल्याने 'मानसावर' आधारित रामलीला अत्यंत लोकप्रिय झाली. रावणाच्या रूपाने दुष्ट प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून त्याचे दहन करतात, आणि आदर्श रामाच्या सत्प्रवृत्तींचा विजय दाखवून रामराज्याची द्वाही फिरवितात. स्वातंत्र्यापूर्वी जे राष्ट्रीय आंदोलन झाले त्यावेळी रामलीला या दृश्य काव्याने राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनात जागृती निर्माण करण्याचे मोठे कार्य केले. सीतेच्या रूपाने भारत लक्ष्मी, रावणाच्या रूपाने परकीय राज्याचा ताप आणि रामाच्या रूपाने स्वातंत्र्याचा अवतार. अशा कल्पनेने रामलीलेचे स्वागत होई.

बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी लिहिणारे तुलसीदास यांनी लोकवाङ्मयकार लोकशिक्षक म्हणून मानाचे स्थान पटकाविले. रामांचा स्वार्थत्याग, स्वाभिमान, लोकसंग्रहचातुर्य हे गुण पाहून त्यांना राष्ट्रीयत्वाची जाणीव होते. 'मानसा' चे महान चरित्रनायक हे मर्यादा पुरुषोत्तम असून त्यांनी आपले राज्य समृद्ध, सुखशांतीपूर्ण आणि आनंदमय असे करून दाखविले. समाजाची मर्यादा स्थिर राखण्याचा प्रयत्न करणारा म्हणून तो मर्यादा पुरुषोत्तम, पुरुषोत्तमाचा उपासक पुरुषोत्तम–पुरुषश्रेष्ठच असावयास पाहिजे. जनतेच्या नसानसात रामचरित्र भिनविण्यासाठी तुलसीदासांनी आयुष्यभर प्रयत्न केले. राष्ट्रीय, सामाजिक आणि धार्मिक उत्थापनाचे कार्य केले. कल्याणकारी रामराज्याने अखिल विश्व आनंदमय, मंगलमय करणे हाच महान संदेश तुलसीदासांनी 'मानसाच्या' रूपाने दिला आहे.

पाश्चात्य पंडितांनी मानस महाकाव्याचा गौरव केला आहे. मानसाचे इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन आदि भाषात अनुवाद झाले आहेत. सुप्रसिद्ध इंग्लिश इतिहासकार व्हिन्संट स्मिथ म्हणतो, 'मानस हे हिंदूंचे बायबल आहे. 'मानसा' इतकी लोकप्रियता बायबलालाही लाभलेली नाही. अकबर बादशाहाने अनेक

हिंदूंची राज्ये जिंकली पण लाखो हिंदूंची अंतःकरणे जिंकून त्यावर तुलसीदासांनी बादशाहाप्रमाणे अधिराज्य गाजविले. ‘ मानस ’ आणि ‘ बायबल ’ यामधील काही काही धार्मिक तत्त्वामध्ये इतके, साम्य आहे की रामाच्या ऐवजी तेथे जीसस ख्राइस्टचे नाव घातले तरी चालेल. तसे पाहिले तर सर्व धर्मांचा मूळ पाया ज्या मौलिक तत्त्वांवर आधारली आहेत. (सत्य, प्रेम, त्याग, अहिंसा,) ती मौलिक तत्त्वे सर्व धर्मांत सारखीच आहेत.

जोपर्यंत पृथ्वीतलावर नद्या वाहात राहतील आणि पर्वतांचे अस्तित्व असेल तोपर्यंत रामकथेचा प्रसार होत राहील इतके जबरदस्त आकर्षण रामकथेत आहे. पौर्वात्य देशात रामकथेने इ स. तीनशे चारशेच्या सुमारास प्रवेश केला. सिलोन, ब्रह्मदेश, मलेशिया आणि इंडोनेशिया या ठिकाणी उत्तर भारताप्रमाणे रामलीला सुरू झाली. रामायणावर आधारित नृत्य, नाटच, छाया-नाटच त्या ठिकाणी अतिशय लोकप्रिय झाले आहे. ‘ मानसा ’ची अन्य भारतीय भाषेत भाषांतरे झाली आहेत. तसेच मुघलांच्या काळी फारसी आणि उर्दू भाषेत भाषांतरे झाली. तुलसीदासांनी म्हटल्याप्रमाणे—

राम अनंत गुण अनंत अमित कथा विस्तार।

राम अनंत असून त्यांचे गुणही अनंत आहेत. तेव्हा त्याच्या कथेचा विस्तारही अनंतच असला पाहिजे.

या काव्याने जनमानसाची पूर्ण पकड घेतली आहे. मानसाच्या पठणाने सहृदय वाचकांना सुखशांती प्राप्त होते. मानसातील वैचारिक कल्पना आजच्या युगालाही लागू पडतात. आपल्या ज्वलंत प्रतिभेने आणि आत्मविश्वासाने तुलसीदासांनी धार्मिक, राजकीय, आणि सामाजिक मतांचा समन्वय साधून ते मानवतेच्या समीप येतात; सर्व मतांचा समन्वय साधून त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न केला.

असे हे समाजसुधारक लोकनायक, लोकवाङ्मयकार, लोककल्याणासाठी सदैव तळमळणारे महान रामभक्त संत कवी होते.

संवत सोलसौ असी असी गंग के तीर
सावन स्यामा तींज सनि तुलसी त्यजो शरीर॥

संवत १६८० मध्ये श्रावण वद्य तृतीयेस इ. स. १६६३ काशीतच गंगेच्या पावन असी घाटावर ईश्वर-चरणी विलीन झाले. मृत्यूची चाहूल. त्यांना लागली होती; रामनामाचा जप चालू असतानाच पुढील दोहा त्यांच्या मुखावाटे बाहेर पडला.

रामनाम जस बरनि कै भयो चहत अब मौन।
तुलसी के मुख दीजिए अबहि तुलसी सौन।

‘ मुखाने रामनाम घेत असताना मृत्यू येत आहे. या तुलसीदासाच्या मुखात आता पवित्र तुलसीपत्र आणि सोने ठेवा.’

या महान् लोकोत्तर रामभक्ताला शतशः प्रणाम ! ! !

बालकांड–प्रथम सोपान

नमोस्तु गजवदन गणपती । नमोस्तु वाग्देवी सरस्वती ।
वर्ण-अर्थ-रस-छंद निर्मिती । मंगल करिती सकलांचे ।। १
वंदितो भवानीशंकर दैवत । श्रद्धा विश्वास मूर्तिमंत ।
जयांच्या कृपेविण न देखत । अंतस्थ ईश्वर सिद्धजन ।। २
वंदितो गुरू मूर्तिमंत शंकर । नित्य बोधमय जणु महेश्वर ।
जयाचा आश्रित वक्र चंद्र । जाहला सर्वत्र वंदनीय ।। ३
आता वंदितो कवीश्वर कपीश्वर । विशुद्ध विज्ञानाचे आगर ।
श्रीसीतारामगुणवनविहार । करिती अति आदरे ।। ४
रामवल्लभा सीतेसी नमन । उत्पत्तिस्थितिलय आदिकारण ।
करी सकलांचे संपूर्ण कल्याण । तापत्रय निवारी दासांचे ।। ५
जयाच्या मायेसी वश विश्व चराचर । तथा ब्रह्मादि सुर-असुर ।
जयाच्या सत्ते सत्य भासे संसार । जैसे रज्जू दिसता होई सर्पभ्रम ।। ६
तो कारणांचे कारण रामनामे ईश । करीत मी वंदन तयास ।
भवाब्धि तरणे इच्छा जयास । तया नौका केवळ रामपद ।। ६·१
जी रघुनाथकथा रामायणात । अन्यत्र वा निगमागमपुराणसंमत ।
ती सुरस कथा मंजुळ काव्यात । विस्तारे करी तुलसी स्वान्तः सुखा ।। ७
जो शुभ गुणांचे सदन । बुद्धिराशी गणनायक गजवदन ।
कार्यसिद्धी होत करिता स्मरण । करो तो अनुग्रह मजवरी ।। १
जयाच्या कृपे मूक होई वाचाळ । पंगु चढे गहन गिरी अचळ ।
जो दग्ध करी कलिमल । तो दयाळू प्रभू कृपा करो ।। २
नील सरोरुह श्यामल वर्ण । कोमल अरुण वारिजनयन ।
जयाचे क्षीरसागरी सदा शयन । तो मम हृदयी वास करो ।। ३

कुंदइंदुसम गौर वर्ण । दीनावरी करी प्रेम जो उमारमण ।
शंकर परम करुणायतन । तो मदनारि कृपा करो ।। ४
कृपासिंधु गुरुरूप नरहरी । तयाच्या पदकमला मी वंदन करी ।
जयाचे वचन मोहतम सारी । जेवि रविकिरण तमासी ।। ५
वंदितो गुरुपदपद्मपराग । जयांस सुरुची सुगंध सरस अनुराग ।
नष्ट करी सकल भवरोग । अमृत मुळीचे चारु चूर्ण जणू ।। १
गुरुपदरजसुकृति शिवतनूवरील । निर्मल विभूति मंगलमय मंजुळ ।
दूर करी भक्तमनमुकुरमळ । टिळा लाविता गुणगण वश करी ।। २
श्रीगुरूपदनखाच्या रत्नाची ज्योती । स्मरता येई हृदयी दिव्य दृष्टी ।
विनाशी अज्ञानतमा ती दीप्ती । जया उरीं प्रकटे तो भाग्यवान ।। ३
विमल नेत्र अंतरीचे उघडती । दोष दुःख भवरजनीचे मिटती ।
रामचरितरत्ने माणिक दिसती । गुप्त प्रकट जेथे ज्या खाणीत ।। ४
जैसे घालूनी नेत्री सुअंजन । साधकसिद्ध सुजाण ।
शैली वनी भूतळी निधान । कौतुके बघती नानाविध ।। १
गुरुपदरज मृदु मंजुळ अंजन । नयनामृत नेत्रदोष विभंजन ।
घालुन विमलविवेकलोचन करून । भवमोचन रामचरित्र वर्णितो ।। १
प्रथम वंदितो विप्रचरण । अज्ञानजनित संशयाचे करिती हरण ।
संतसमाज सकल गुणखाण । करितो प्रणाम प्रेमे सुवाणीने ।। २
संतचरित्र जणु शुद्ध कापुस । फळ जयाचे गुणमय नीरस ।
झाकती परछिद्र साहून दुःखास । पावती यश वंदनीय जगी ।। ३
संतसमाज तीर्थराज जंगम । मोदमांगल्यांचा संगम ।
तेथे गंगाजलधारा रामप्रेम । ब्रह्मतत्त्वप्रचार सरस्वती ।। ४
विधिनिषेधमय कलिमलहरणी । कर्मकथा ती रविनंदिनी ।
शोभे हरिहरकथा त्रिवेणी । मोदमंगलता लाभते श्रवणमात्रें ।। ५
अक्षयवट निजधर्मी अचल विश्वास । तीर्थराजी सुकर्मसमाज करी वास ।
सदासर्वदेशी सुलभ सकलांस । आदरे सेविता क्लेश शमवी ।। ६
हा तीर्थराज अकथनीय अलौकिक । दावी महिमा प्रकट फलदायक ।। ७
संतसमाजप्रयागमहिमा ऐकून । प्रेमे मुदितमने तयात स्नान करून ।
साधती चारी अर्थ भक्तजन । याच देहा राहुनी जिवंत ।। २

तीर्थराज स्नानाचे फळ प्राप्त तात्काळ । काक होई पिक बक मराळ ।
हे ऐकून कोणा आश्चर्य न वाटेल । संतसंगतिमहिमा नसे गुप्त ॥ १
मुनि वाल्मीकि नारद अगस्ती । स्वमुखे निज वृतांत कथिती ।
जितुके नाना जड चेतन जीव जगती । जलचर स्थलचर नभचर ॥ २
मती कीर्ती गती भलेपण भूती । जेथे जैसे यत्न तैसे ते पावती ।
हा सत्संगतीचा प्रभाव वदती । वेदी लोकी न उपाय दुजा ॥ ३
कैंचा विवेक सत्संगावाचून । न लाभे सत्संग रामकृपेविण ।
सत्संग मोदमांगल्यमूळ जाण । जयाचे साधन फूल फळ सिद्धी ॥ ४
सत्संगे शठ होती सुजन । परिस स्पर्शे लोहाचे सुवर्ण ।
सर्पमणीसम न त्यजिती निजगुण । जरी संतासी कुसंग घडे ॥ ५
विधि हरिहर कवि पंडित यांची वाणी । संतमहिमा गाता जाई संकोचुनी ।
न वर्णू शके मी अज्ञानी । जैसे शाकविक्या न पारखी रत्नगुण ॥ ६

वंदितो समताचित्त संत । शत्रु वा मित्र जे न मानीत ।
करिती दोन्ही करां सम सुगंधित । अंजलीतील सुंदर सुमने ॥ ३ (क)

संत स्नेहशील तयांचें सरळ मन । जगहितचिंतक स्वभाव जाणून ।
कृपा करून बालविनंती ऐकून । द्यावी तयांनी प्रीती मज रामपदी ॥ ३ (ख)

सद्भावे आता वंदितो खलजन । हितकर्त्यांसी प्रतिकूल कारणाविण ।
परविनाशीं हर्ष उत्कर्षी दुःखदारुण । वाटे लाभ परहित हानीत ॥ १
ते राहू हरिहरयशशशीस । पर विनाशी वीर सहस्त्रबाहूसदृश ।
सहस्त्राक्षापरी लक्षिती परदोष । परहित घृतात मन माशीसम ॥ २
क्रोधी यमसदृश तेजी जणू अग्नी । धनेशासम अघअवगुण धनी ।
सुखी कुंभकर्णापरी शयनी । जयाचा उदय हितनाशक केतूसम ॥ ३
पर अपकारा तनु त्यजती । जणूं गारा वितळून नासती शेती ।
सहस्त्रमुखे रोषे परदोषा वानिती । त्या खलशेषांसी वंदन ॥ ४
पुन्हा प्रणाम तया पृथुराजसमान । सहस्त्र कानी करिती पापश्रवण ।
इंद्रासम ते तया करितो वंदन । हितकर जया सुरानीक[1] ॥ ५
वचन वज्रापरी प्रिय सदा जयांस । सहस्त्र नेत्रे निरखिती परदोष ॥ ६

असो शत्रुमित्र वा उदासीन । श्रवणी पडता जयांचे कल्याण ।
जळती खल ही खलरीती जाणून । तयांना वंदन प्रेमभावे ॥ ४

केली मी खलां प्रार्थना । परी न त्यजतील कुवर्तना ।
काक मांसत्याग करीना । जरी प्रेमे तया प्रतिपाळिला ।। १
वंदितो संत असंत यांचे पद । दुःखद उभय परी अल्प भेद ।
संतवियोग मरणासम दुःखद । दारुण क्लेश खलमीलनी ।। २
उभय सवे जगी जन्मती । कमळजळुसम भिन्नता दाविती ।
सुरासम असाधू साधू सुधा ती । जनक एकच जलधी जगी ।। ३
निजकर्मानुसारे सुजन कुजन । जोडिती यशापयशाचे धन ।
सुधा सुधाकर सुरसरिता सज्जन । गरळ अनल खल कर्मनाशा[२] ।। ४
जाणती सकल यांचे गुण अवगुण । जैसा जया जो रुचे तो तया प्रमाण । ५
भला भलेपणा पावत । नीच नीचता ग्रहण करीत ।
अमरत्वे सुधेची प्रशंसा होत । मृत्यूने गरळ स्तुती ।। ५
अवगुण दुष्टांचे साधूंचे गुण । उभय उदधीसमान गहन ।
केले अल्प तयांचे वर्णन । त्याग संग्रह न करावा जाणल्याविण ।। १
सुष्ट दुष्ट ब्रह्मा करी निर्माण । वेदी विभागिले गुणदोष जाणून ।
कथिती हे वेदइतिहासपुराण । गुण अवगुण मिश्रित विधिप्रपंच ।। २
सुखदुःख पापपुण्य दिनरात । सुजाति कुजाति संतअसंत ।
सुजीवन मरण विष अमृत । देवदानव उच्चनीच ।। ३
माया ब्रह्म जीवशिव । लक्ष्मी अलक्ष्मी रंकराव ।
गोहिंसक विप्र मरू मालव । गंगा कर्मनाशा मगध काशी ।। ४
स्वर्ग नरक विरक्ती अनुराग । वेदशास्त्रें केले गुणदोष विभाग । ५
विधात्याची विश्वरचना । जड चेतन गुणदोषांची घटना ।
संत करिती गुण ग्रहणा । हंसक्षीर न्यायाने ।। ६
जंव विधाता ऐसा देई विवेक । तंव दोषा त्यजून मन गुणी अनुरक्त ।
मायावशें भले भलेपण सोडित । हा प्रताप काळकर्म स्वभाव यांचा ।। १
हरीचा भक्त ऐसे दोष दूर करी । सुयश देउनी दुःख दोष निवारी ।
सत्संगे खल वृत्ति सुधारी । परि न भंगे स्वभाव मलिन ।। २
शठांचा देवेष फसवी सकलांना । वेष प्रतापे पूजीले तयांना ।
जाणिले राहु रावण कालनेमी यांना । कपट न लपे अंती कदापी ।। ३
कुवेष असता संता सन्मानती । जैसे जांबुवंत हनुमंत जगी ।
कुसंगे हानि लाभ सुसंगती । जाणती ही रीति वेदी लोकी ।। ४

पवनासंगे रज चढे गगनी । नीच रज होई मलिन जलमीलनी ।
शुकमैना साधू असाधू भवनी । एक भजे रामा दुजी देई शिव्या ।। ५
धूम्र कुसंगे होई काजळ । पुराण लिहिता शाई मंगल ।
धूम्रासवे अग्नि वायु जळ । होई जलद जगजीवन दाता ।। ६
ग्रह औषधी जळ वस्त्र वात । सुसंग वा कुसंग पावताच ।
होती सुवस्तु वा कुवस्तु जगात । जाणती हे विचारी चतुर लोक ।। ७ (क)
प्रकाश अंधार समान उभय पक्षात । परि विधि नामभेद करीत ।
जाणून शशी पोषक शोषक । दिधले तया यशापयश ।। ७ (ख)
जगी जितुके जीव जड चेतन । तितुके सकल राममय जाणून ।
तयांच्या पदकमला कर जोडून । करितो मी वंदन सदा ।। ७ (ग)
देव दानव नाग नर । गंधर्व पक्षी प्रेत पितर ।
वंदितो सकला तैसे निशाचर किन्नर । मजवरी तुम्ही आता कृपा करा ।।७ (घ)
लक्ष चौऱ्यांशी योनीत । जाति चार जळी स्थळी नभात ।
जाणून सीताराममय समस्त । करितो प्रणाम कर जोडुनी ।। १
तुम्ही कृपानिधान मज दास मानून । कृपा करा कपट सोडून ।
करितो विनंती तुम्ही सकल सुजाण । नसे मज भरवसा बलबुद्धीचा ।। २
इच्छा वर्णावे रघुपतीचे गुण-आगर । परि अल्प मति मी अगाध चरित्र ।
मम मति नीच मनोरथ थोर । उपाय एकही मज न सुचे ।। ३
मति अति नीच रुचि उच्च सुंदर । वांछी अमृत परि न मिळे तक्र ।
धिटाईस क्षमा करतील सज्जन वर । मन लावून ऐकतील बाळबोल ।। ४
बाळकाचे हे बोबडे वचन । ऐकती मातापिता मने प्रसन्न ।
हसतील क्रूर कुटिल जन । जे मानती भूषण परदूषणी ।। ५
सुरस वा अति नीरस । निज काव्य न रुचे कवणास ।
हर्षित होती परिसुन परकाव्यास । ऐसे सुजन न बहुत जगी ।। ६
जगी बहु नर सर सरिता समान । जी निज जळ वृद्धीने प्रसन्न ।
विरळा सागरासम सज्जन । जो उचंबळे पूर्ण शशी पाहून ।। ७
अभिलाषा बहु मी न बहु भाग्यवान । परि मज एक विश्वास महान ।
ऐकून हे सुखावतील सुजन । दुष्ट जन करितील उपहास ।। ८
खल परिहासे होईल मम हित । कोकिळकंठ कठोर वदे काक ।
हसे चातका दर्दूर हंसा बक । जैसे खल विमल वाणीसी ।। १

जे नसती रसिक वा रामभक्त । हास्यरस कथा तयांना सुखद ।
मम मति भोळी भाषा प्राकृत । हसणे उचित तो न दोष ।। २
जया न बुद्धी वा प्रभुपदी प्रीती । कथा ऐकता तया वाटेल नीरस ती ।
जया सुमति हरीहर पदी रती । मधुर लागेल तया रघुवीर कथा ।। ३
कथा रामभक्तीभूषित जाणन । सुवाणीनें वर्णता ऐकतील सुजन ।
मी न कवि वा न वचनप्रवीण । सकल कला विद्याविहीन ।। ४
न जाणें मी नाना अर्थ वा छंद । नाना अलंकार वा शब्दप्रबंध ।
न जाणें मी भावभेद वा रसभेद । काव्यगुणदोष नानाविध ।। ५
नसे मज काव्यविवेक ज्ञान । सत्य वदतो कोऱ्या कागदी लिहून ।। ६
मम रचना सकल गुणरहित । परि तयात एक गुण विश्वविदित ।
हे जाणून विवेकी बुद्धिमंत । परिसतील तीमनोभावे ।। ५
एथे रघुपति नाम उदार । पवित्र वेदपुराणांचे सार ।
जपती जे उमेसह शंकर । अमंगलहारी मंगलमय ।। १
सुकविकृत रचना विचित्रपूर्ण । परि न शोभे रामनामाविण ।
ललना न सुंदर वस्त्रावाचून । जरी सालंकृत शशीवदना ।। २
कुकविकृत वाणी गुणाविण । परि ती रामनाम यशोखाण जाणून ।
बुधजन करिती कथन पठण । गुणग्राही संत मधुपापरी ।। ३
एथे न एकहि काव्यरस । परि रामप्रताप प्रकट तेणे सुरस ।
हाच मम मनीं संपूर्ण विश्वास । कवण न होई महान सत्संगे ।। ४
धूम्र कटुता त्यजून होई सुगंधित । चंदनासंगे अति सुवासिक ।
भाषा ग्राम्य वर्णनविषय उच्च । करी मंगल जगता रामकथा ।। ५
हरी कलिमल । देई मंगलता । रघुनाथकथा । तुलसीची ।
गंगा ती पावन । कुटिल गतीची । काव्यसरितेची । तैशी गती ।
प्रभुयशसंगे । भली ती भासेल । सद्भक्ता करील । सुप्रसन्न ।
शंकराच्या अंगी । स्मशान विभूती । पावन करी ती । स्मरताच ।। १
श्रीरामयशसंगे मम काव्य । सकलांसी रुचेल ते दिव्य ।
मलयगिरीसंगे वंदनीय । होती तरुकाष्ठ जरी क्षुद्र ।। १० (क)
दुग्ध शुभ्र सुरभी श्यामवर्ण । अति गुणद सकल करिती पान ।
गिरा ग्राम्य परि गाती ऐंकती सुजन । सुयश श्रीसीतारामाचे ।। १० (ख)

तेजस्वी रत्ने माणिक मोती । सर्प गिरि गज यांचे शिरी न शोभती ।
नृपमुकुटा अधिक शोभा देती । खुलविती लावण्य ललनातनूचे ॥ १
तैसे सुकवि काव्य वदती सुजन । अन्यत्र उपजे अन्यत्र शोभवी स्थान ।
भक्तांस्तव ब्रह्मलोक सोडून । येई धावत शारदा स्मरता तिज ॥ २
रामचरित्रसरोवरात स्नानाविण । कोटि उपायें न होई तिचे श्रमहरण ।
कवि पंडित मनी विचार करून । गाती कलिमलहारी यश हरीचे ॥ ३
करिता प्राकृत जनांचे गुणगान । शारदा बडवी कपाळ पस्तावून ।
हृदयसिंधूमति शिंपली समान । शारदास्वाती सुजन वदती ॥ ४
जंव वर्षे तयात वरवारी विचारू । तंव होई काव्य मुक्तामणीसम चारू ॥ ५
काव्य मुक्तामणी युक्तीने ओविती वेधून । रामचरित सुंदर धाग्यात सुजन ।
करिती तया विमल हृदयी धारण । तंव शोभे ते भावभक्तीने ॥ ११
जे पापी कराल कलिकाळी जन्म घेती । वेष हंसाचा परी काकसम वर्तती ।
वेदमार्ग टाकून कुपंथ धरिती । ते कपटमूर्ती कलिपापघट ॥ १
शठ म्हणवितो मी भक्त रामाचा । परि किंकर काम क्रोध कांचन यांचा ।
अधार्मिक दांभिक भक्तीचा । प्रथम गणावा तयात मज ॥ २
ऐसे किती वर्णू मम अवगुण । होईल ते अपार पुराण ।
म्हणोनी केले अल्प अवगुण वर्णन । शहाणे जाणतील संपूर्ण सकल ॥ ३
मम सविनय प्रार्थना जाणुनी । दोष न देतील ती ऐकुनी ।
जर संदेह तयांच्या येईल मनी । मजहून जाणावे ते अधिक मूर्ख ॥ ४
मी न कवि न चतुर कथाकार । यथामति गातो रामचरित सार ।
कोठे रघुपति कथा अनंत अपार । कोठे संसारी आसक्त क्षुद्र मी ॥ ५
वायु उडवी सुमेरूसम गिरीस । सांगा काय तया पुढती रुइस ।
जाणून अमित राम प्रभुतेस । बावरे मम मन कथागानी ॥ ६
शारदा विधाता महेश । पुराण निगमागम शेष ।
नेति नेति म्हणती जयास । करिती जयाचे निरंतर गुणगान ॥ १२
प्रभूचा महिमा सकल जाणती । परी वर्णनाविण कोणी न राहाती ।
वेद तयाचे कारण दाविती । प्रभाव हा बहुविध भक्तीचा ॥ १
एक अनिच्छ अरूप अनाम । अज सच्चिदानंद परमधाम ।
व्यापक विश्वरूप भगवान श्रीराम । दावी नाना लीला दिव्य देह घेऊन ॥ २

अपूर्व लीला भक्तहितालागी। दावी कृपाळु प्रभु प्रणत अनुरागी।
करी कृपा ममता भक्तावरी जगीं। क्रोध कदापी मनीं नुपजे ।। ३
गतप्रदाता दीनदयाळ। रघुराज स्वामी सरळ सबळ[४]।
हे जाणून बुध करिती पुनीत सुफल। निजवाणी हरियश वर्णून ।। ४
त्याच कृपावळे रघुपति गाथा। गातो नमवून रामपदी माथा।
गाइली प्रथम मुनींनी हरियश कथा। तोच पथ चालता मज सुगम ।। ५
महान सरिता अति अपार। बांधिती सेतु नृप तयावर।
परम लघु पिपीलिका करिती पार। परिश्रमावाचून तया[४] ।। १३
यापरी दावून स्वमनास परमबळ। रचितो रघुनाथकथा रसाळ।
व्यासादिक कवि श्रेष्ठ सकळ। वानिती जे आदरे हरिसुयश ।। १
वंदितो त्या श्रेष्ठ कवींचे पदकमल। मम मनोरथ ते पूर्ण करितील।
प्रणाम कलियुगकवींना सकल। जे वर्णिती रघुपति गुणसमूह ।। २
जे प्राकृत कवि विद्वान अती। स्वभाषेत हरिचरित्र रचिती।
आहेत जाहले होतील पुढती। कपट सोडून नमन तया ।। ३
प्रसन्न होऊन आपण द्यावे वरदान। होवो संतसमाजी काव्यसन्मान।
जे काव्य मानिती बुध हीन। तयास्तव वृथा श्रमती मूढ कवी ।। ४
सुंदर कविता कीर्ति संपत्ती। गंगामातेसम जी हितकर्ती।
श्रीराम कीर्ति थोर परि क्षुद्र मम उक्ती। या विसंगतीस्तव वाटे मज चिंता।। ५
तुमच्या कृपाप्रसादे सुलभ मजसी। जैसी शोभे रेशिम वीण तरटासी।। ६
काव्य आदरती सुजन। जेथे विमल सरळ चरित्रवर्णन।
शत्रूहि विसरती वैर जे ऐकून। कौतुक करिती आदरे ।। १४(क)
काव्य न होई विना निर्मल मती। मम बुद्धिबल अल्प अती।
मी कवींस वारंवार करीत विनंती। गातो श्रीहरियश कृपा करा ।। १४ (ख)
कवि पंडित हो हे रामचरितमानस। तुम्ही तयातील सुंदर राजहंस।
मी बालक विनवी तुम्हांस। सुरुची पाहून कृपा करा ।। १४(ग)
जयाने रचिले रामायण। त्या वाल्मीकि मुनी पदकमला वंदन।
खरासहित परी कोमल प्रसन्न। सदूषण परी दोषरहित ।। १४(घ)
वंदितो चारी वेदांस। जलयानासम भववारिधीस।
वर्णिता श्रीराम विमलयश। न खेद जया स्वप्नीही ।। १४(ङ)

विधात्याच्या पदरजांस नमस्कार । जयाने निर्मिला भवसागर ।
जेथे सुधा धेनु शशी हे संत येती वर । तैसे विषवारुणी हे खल ।। १४(च)
देव विप्र ग्रह बुध यांचे चरण । वंदून करितो सविनय कथन ।
होऊन मजवरी प्रसन्न । सकल मनोरथ पुरवावे ।। १४(छ)
वंदितो पुन्हा सरस्वती गंगा यांस । दाविती पवित्र मनोहर चरित्रास ।
गुणश्रवणपठणे एक नाशी अज्ञानास । गंगा स्नानजळपाने पाप हरी ।। १
मम मातापिता गुरु भवानी महेश । दीनबंधू नित्य दाता प्रणाम तयास ।
जे सीतापतीचे स्वामी सखा दास । खरे हितकर्ते तुलसीदासाचे ।। २
शंकर गिरिजा देखून कलीस । जगत हिता रचती शावरमंत्रास ।
तों जपता शिवप्रभाव येई प्रत्ययास । अर्थ अक्षरांत जरी मेळ नसे ।। ३
तो महेश जर होईल अनुकूल । करीन कथा मोद मंगल मूळ ।
स्मरता उमामहेश प्रसाद मिळेल । मग गाईन रामचरित्र हर्षभरे ।। ४
शोभे रात्र तारागणशशीसहित जैसी । मम कविता शिवकृपे शोभेल तैसी ।
जे प्रेमे कथितील या कथेसी । ऐकतील समजून सावधान चित्ते । ५
होतील ते रामचरणी अनुरक्त । सुमंगळभागी कलिपापरहित ।। ६
स्वप्नामाजीं साच येऊन । जर होतील हरगौरी प्रसन्न ।
मी केले जे काव्यभाषा प्रभावाचे कथन । ते सर्व सत्य होईल ।। १५
वंदितो आता पावन अवधपुरी । कलिमल विनाशिनी शरयुवारी ।
रामाचे प्रेम अपार जयांवरी । माझा प्रणाम त्या नगरनरनारींसी । १
सीता निंदकासी केले पापमुक्त । निजधामी वसविले करून शोकरहित ।
जिची कीर्ति सकल जगा विदित । त्या दिक्प्राची कौसल्येसी वंदन । २
जेथून प्रकटे रघुपती चारु शशी । खलकमला हिम सुखद जगतासी ।
दशरथासह सकल राज्ञीसी । पुण्य मंगलमूर्ती मानून ।। ३
कायावाचामने करितो वंदन । कृपा करा सुत सेवक जाणून ।
धन्य मानी विधाता जयास निर्मून । महिमासीमा रामपितामाता ।। ४
जयाचे रामपदी अपार प्रेम । त्या राजा दशरथास प्रणाम ।
जंव राज्य त्यजून वना जाई राम । तंव त्यागी तृणवत प्रियतनू । १६
परिवारासह वंदितो मी जनकास । जे रामपदी दाविती गूढ स्नेहास ।
योगभोगात राखिती गुप्त प्रेमास । बघून रामास प्रकट करिती ।। १

वंदितो प्रथम बंधु भरत । जयाचे न वर्णू शके नेमव्रत ।
जयाचे रामपदकमली मन रत । न सोडी सान्निध्य लुब्ध मधुपापरी ।। २
प्रणाम लक्ष्मणपदकमलांस । जो शीतळ सुंदर सुखद भक्तांस ।
रामकीर्ति विमल पताकेस । जयाचे यश दंडसम ।। ३
तो सहस्रशीर्ष शेष जगकारण । अवतरून करी भूमिभय हरण ।
सौमित्र गुणागर कृपानिधान । होवो मजवरी प्रसन्न सदा ।। ४
नमितो शत्रुघ्नपदकमल । भरत अनुगामी शूर सुशील ।
प्रार्थितो हनुमानास पुण्यशील । जयाचे यश वर्णिती स्वये राम ।। ५
वंदितो पवनकुमार हनुमान । खलवनासी अग्नि ज्ञानघन ।
जयाचे हृदयमंदिर वसतीस्थान । धनुर्धारी श्रीरामाचे ।। १७
सुग्रीव जांबुवंत बिभीषण । अंगदादिसमस्त वानरगण ।
वंदितो तयांचे शुभदचरण । अधम शरीरी राम प्राप्त जया । १
जितुके रघुपती चरणाचे उपासक । खगमृग सुरासुर नरासहित ।
श्रीरामाचे निष्काम सेवक । त्या सकलांच्या पदकमला वंदितो ।। २
शुकसनकादिक मुनि नारद । जे मुनिवर विज्ञान, विशारद ।
वंदून तयांचे धरितो पद । हे मुनीश, दास जाणोनी कृपा करा ।। ३
जगज्जननी जानकीजनकसुता । करुणानिधी रामाची प्रिय कांता ।
नमन तिच्या पदकमला आता । जिच्या कृपे लाभेल निर्मल मती ।। ४
राम राजीवनयन हातीं शरचाप । सुखदायक निवारिती भक्तांचा ताप ।
पदकमला वंदून स्मरतो प्रताप । कायावाचामने श्रीरघुनाथांचा ।। ५
जैसे वाणी अर्थ वीचि जळ म्हणती भिन्न । परि ते वास्तव असती अभिन्न ।
तैसे सीताराम तयांच्या पदा वंदन । जयांना प्रिय परम दीनदु:खित ।। १८
आता वंदितो रघुवीर नाम । जे अग्नि भानु शशी तत्त्व परम ।
अगुण गुणनिधान अनुपम । विधि हरिहर वेदप्राण ।। १
रकार अग्निबीज शिववाचक । अकार सूर्य बीज विष्णुवाचक ।
मकार चंद्रबीज विधिवाचक । त्रिकांड कर्मज्ञान भक्तियुक्त ।। १-१
जो महामंत्र महेश जपती । जेणे काशीत मिळेल मुक्ति उपदेशिती ।
जयाचा महिमा गणराज जाणती । रामनामप्रभावे प्राप्त अग्रपूजा ।। २
नामाचा प्रताप आदिकवि जाणती । मरा उलटें जपून पवित्र होती ।
एक रामनाम सहस्रनामासम शिव कथिती । नाम पतिसवे सदा जपे भवानी ।। ३

शंकरउमेची बघून रामनाम प्रीती । स्त्रीभूषण सती निजभूषण मानिती ।
नामाचा महिमा शिव पूर्ण जाणती । जेणे कालकूट देई तया अमृतफळ ॥ ४
वर्षाॠतु जणु रघुनाथ भक्ती । रा म श्रेष्ठ वर्ण श्रावण भादव शोभती ।
तेथे सुदास हीच धान्य निर्मिती । ऐसे म्हणे तुलसीदास ॥ १९
राम मधुर वर्णतनूचे नयन दोन । भक्तांचे ते असती जीवन ।
सदा सुलभ सुखद करिता स्मरण । इहपरलोकी सौख्यलाभ ॥ १
कथिता ऐकता स्मरता मधुर विशेष । रामलक्ष्मणांसम प्रिय तुलसीस ।
विभक्त करिता न्यूनता प्रीतीस । जीवब्रह्मासम एकरूप ॥ २
ते नरनारायण सम सुभ्राते । जगत्पालक विशेष सुजन त्राते ।
शशिभानूसम जगहितकर्ते । भक्ति सुंदरीची कर्णफुले ॥ ३
मोक्षामृताचा जणु स्वाद तोष । कूर्मशेषासम धारण करिती वसुधेस ।
भ्रमरापरि भक्तमनकमलांस । यशोदा जिव्हेसी कृष्णबलराम ॥ ४
रामनाम या दोन अक्षरात । छत्ररूप पहिला रकार विराजत ।
दुसरा मुकुटमणी मकार शोभत । ऐसे हे उभय वर्ण तुलसी म्हणे ॥ २०
न दिसे भेद नामी नामात । परि स्वामी सेवकांसम प्रीति परस्परात ।
जाणती अकथ अनादि बुद्धीने शुद्ध । नामरूप दोन्ही उपाधि देवाच्या ॥ १
कथणें प्रमाद लघुगुरू यांत कोण । तारतम्ये जाणती साधु भेदगुण ।
रूप दिसते नामा अधीन । न होई रूप ज्ञान नामाविण । २
न कळे विशेष रूप नामाविण । करतलगत परि न होई ज्ञान ।
रूप न देखता घडे नामस्मरण । स्नेह विशेषें हृदयी ठसे ॥ ३
अकथनीय महिमा नामरूपांचा । जाणणें सुखद परि न वर्णवे साचा ।
सगुणनिर्गुणी नाम साक्षी तयांचा । चतुर दुभाषी हा देई ज्ञान उभयांचे ॥ ४
रामनाम रत्नदीप धरी । मुखद्वाराच्या जिव्हा उंबरठ्यावरी ।
प्रकाश वांछिसी तू अंतर्बाह्य जरी । मिळेल तो तुज तुलसी म्हणे ॥ २१
जागती योगी नाम जिव्हें जपून । जे मुक्त विरक्त विधिप्रपंचातून ।
अनुभवती ब्रह्मसुख संपूर्ण । अकथ अनुपम नामरूपरहित ॥ १
जे जाणू इच्छिती गूढ रहस्य । नाम जिव्हे जपून ते करिती साध्य ।
नाम जपता साधक होती तन्मय । पावती अष्टसिद्धी अणिमादिक ॥ २
नामजप करून भक्त आर्त । होती सुखी संकटमुक्त ।
असती जगी चार प्रकारचे भक्त । पुण्यात्मे पापरहित उदार ॥ ३

सुकवि कुकवि नरनारी सकळ । स्तविती यथामती नृपाळ ।
ईश अंशे उपजे जो परम कृपाळ । सुशील सुजाण साधुनृप ।। ४
सकला सन्मानी नृप वचन ऐकून । जनांची गति भक्ति विनय जाणून ।
प्राकृत नृपांचा हा स्वभाव जाण । अयोध्यानाथ राम ज्ञानी शिरोमणी ।। ५
निर्मल स्नेहे तोषती राम । कोण मंद मलिन जगी मजसम ।। ६
या दुष्ट दासाची राखतील । रुचि प्रीति दीनदयाळ ।
चालविलें जलयानापरि उपल[४] । केले ऋक्षकपीस बुद्धिमान सचिव ।। २८(क)
मी म्हणवतो म्हणती मज रामदास । राम साहती हा उपहास ।
मी सेवक तुलसीदास । श्रीसीतानाथ स्वामींचा ।। २८(ख)
हा मम दोष धिटाई बहुत । ऐकून मम पाप नरकहि नाक मुरडीत ।
हे जाणून कल्पित भये मी भयभीत । न देखती दोष राम स्वप्नीही ।। १
ऐकून देखून सुचित्त नयने पाहून । मम भक्ति मति राम करिती वर्णन ।
वदता वाटे मूढासम परि निर्मल मन । संतुष्ट राम जाणून भक्तभाव ।। २
विस्मरती प्रभु भक्तांचे दोष । शतदा स्मरती तयांचे सद्भावास ।
पापास्तव व्याधासम वधिती वालीस । तेच दुष्कर्म सुग्रीव करी ।। ३
तैशीच बिभीषणाची कृती । स्वप्नी राम न ते स्मरती ।
मीलनसमयी भरता सन्मानती । राजसभेत वानिती तयाचे गुण ।। ४
कपि शाखेवर प्रभु तरुतळाशी । परि स्वसमान केले तयांसी ।
शीलनिधान स्वामी म्हणे तुलसी । रामासम अन्यत्र नसे ।। २९(क)
रामा तू आमुचा कल्याणकारी । सकलांचे तू कल्याण करी ।
मानिली जर ही उक्ति खरी । सदा कल्याण तुलसीचे होईल ।। २९(ख)
कथिले मी मम गुणदोषांस । आता करितो प्रणाम सकलांस ।
वर्णितो रघुवीर विमल यश । ऐकता होईल नष्ट कलिपाप ।। २९(ग)
याज्ञवल्क्ये जी कथा सुंदर । कथिली भारद्वाजा मुनिवर ।
कथितो तोच संवाद मनोहर । सुख मानुनी ऐका सज्जन हो ।। १
महेशे रचिले सुंदर चरित्रास । कृपा दावून ते कथिले उमेस ।
शिवे अर्पिले ते काकभुशुंडीस । रामभक्त अधिकारी जाणून ।। २
काकभुशुंडी समर्पी याज्ञवल्क्याम । मनि गाऊन दाविती भारद्वाजास ।
श्रोतावक्ता जाणती हरिलीलेस । उभय समशील समदर्शी ।। ३

मुनीस असे त्रिकाल ज्ञान । जाणती करतळी आवळ्या समान ।
असती अन्य हरिभक्त जे सुजाण । श्रवण कथन मनन करिती ते ।। ४
मी पुन्हा गुरूपासून । वराहक्षेत्री ऐकिले कथावर्णन ।
बालपण असे अजाण । नुमजले मज रहस्य तियेचे ।। ३०(क)
रामकथा गूढ अती । श्रोते वक्ते ज्ञानी असती ।
कलिपापे ग्रासित मी मूढमती । कैसी ती मजसी समजेल ।। ३०(ख)
वारंवार गुरु करिती कथन । यथामति मी केली ग्रहण ।
ती मी भाषाबद्ध करीन । जेणे मम मना संतोष होईल ।। १
मम बुद्धि बल विवेक जाणून । हरिप्रेरणें तैसी कथा कथीन ।
करील निज संदेहमोहभ्रमहरण । रचितो भवनदीतरणी कथा ।। २
बुधास विश्राम सकल जनरंजनी । रामकथा कलिपाप विभंजनी ।
रामकथा कलिसर्पासी लांडोर असुनी । अरणी ज्ञान अग्नीसी ।। ३
रामकथा कलिकामधेनु असुनी । संतांस सुंदर मुळी संजीवनी ।
ती पृथ्वीतळी अमृत तटिनी । भुजंगिणी भयभंजक भ्रमभेका ।। ४
असुर सेनेसम नरकविध्वंसक । गिरीनंदिनी सुरसंतांसी हितकारक ।
रमेसम संतसमाजक्षीराब्धीत । विश्वभार पेलण्या जणू अचल क्षमा ।। ५
यमुनेसम यमदूतमुखा शाई लावण्यासी । जीवनमुक्ति हेतूस काशी ।
जणु रामास प्रिय पावन तुलसी । तुलसीदास हितासी हुलैसीसम[१] ।। ६
नदी नर्मदेसम प्रिय शिवासी । सकल सिद्धीसुखसंपत्ती राशी ।
माता अदिती जणु सद्गुण सुरगणांसी । रघुवरभक्तिप्रेमाची परिसीमा ।। ७
रामकथा मंदाकिनी पवित्र । चित्त चित्रकूट सुंदर ।
तुलसी म्हणे सुंदर स्नेहवनी विहार । करिती सीतारघुनाथ ।। ३१
रामचरित्र चिंतामणी मोहक। संतसुमती स्त्रीशृंगार वेधक ।
रामगुणगण जगमंगलकारक । देती मुक्ति धर्म धन परम धाम ।। १
सुरगुरू ज्ञानवैराग्ययोगांसी । सुरवैद्य भवरोगनाशासी ।
मातापिता सीताराम प्रेम निर्मिण्यासी । व्रतधर्मनेमासी बीज जणू ।। २
पापसंतापशोकशामक । इहपरलोकी प्रिय पालक ।
अगस्तीसम लोभसागर शोषक । विचार भूपाचे शूर सचिव ।। ३
कामक्रोधकलिपापगजगणांसी । जणु सिंहछावा तयांच्या संहारासी ।
पूज्य प्रियतम अतिथी उमारमणासी । दारिद्र्यदावानलासी कामदघन ।। ४

मंत्रमहामणी विषयसर्पास । मिटवी कठिण ललाट लेखास ।
दिनकरापरि सारी महामोहतमास । भक्तसाळीसी पालक जणु मेघ ।। ५
इच्छित वस्तुदानी देवतरुसदृश । हरिहरासम सुलभ सुखद सेवेस ।
तारागण सुकवि शरदमननभास । श्रीराम भक्तासी जीवनधन ।। ६
सकलसुकृताचे फळ महाभोग । जगहितास्तव निर्मल संत ।
गंगातरंग मालेसम पुनीत । भक्तमनमानसी राजहंस ।। ७
कुमार्ग कुतर्क कुचाळी । कपट दंभ पाखंड कलिकाली ।
काष्ठदहन जैसे प्रचंड अनली । दुर्गुणदग्धास्तव तैसे रामगुण ।। ३२ (क)
रामचरित्र जणु राकेशकर । सर्वांसी भासे अति सुखकर ।
लाभप्रद विशेष हितकर । चकोरचित्तास सज्जनकुमुदास ।। ३२ (ख)
भवानी प्रश्न करी जैसे । शंकर विस्तारे कथिती तैसे ।
कथाकाव्य मी रचीन विचित्र ऐसे । सकल हेतु वर्णून गाईन ।। १
ही कथा न ऐकिली जयांनी । न व्हावे स्तिमित ऐकून तयांनी ।
कथा अलौकिक ऐकून ज्ञानी । आश्चर्य न पावती जाणून ।। २
जगी रामकथेसी नसे पार । ज्ञानीमनी ऐसा विश्वास साचार ।
नानाप्रकारचे राम अवतार । अपार रामायण शतकोटी ।। ३
कल्पभेदे सुंदर हरिचरित । अनेक परि मुनीश्वर गातात ।
हें जाणून न धरावा संशय मनांत । कथा ऐकावी सादर प्रेमाने ।। ४
राम अनंत गुण अनंत । चरित्र विस्तार असे अमित ।
जयांचे विचार पुनीत । ऐकून ते विस्मय न पावती ।। ३३
ऐसे संशय दूर करून । गुरुपदपंकजरज शिरीं धरून ।
करितों पुन्हां सर्वां विनंती कर जोडून । दोष न येवो कथारचनी ।। १
सादर नमून शिवास । वर्णितों विमल रामगुण गाथेस ।
कथारंभ संवत सोळाशे एकनीस । करितां हरिपदीं माथा ठेवून ।। २
मंगळवार नवमी मधुमास । अयोध्यी केले प्रकाशित चरित्रास ।
वेद वदती जन्मोत्सवास । चालत येती सकल तीर्थे ।। ३
सुरासुर मुनी नाग खग येती । प्रेमे रघुनाथा सेविती ।
सुजन जन्ममहोत्सव करिती । सुंदर कीर्तिगान करिती रामाचे ।। ४
सज्जनवृंद करिती स्नान । शरयुजलात अति पावन ।
जपती रामनाम करून ध्यान । श्यामतनु सुंदर रामाचे ।। ३४

दर्शन स्पर्श स्नान जळपान । हरती पाप कथिती वेदपुराण ।
शरयु महिमा अमित अति पावन । विमलमति शारदा न वर्णू शके ।। १
परमधामदा अयोध्या सुशोभन । सकला विदित ती अतिपावन ।
जीव चारी योनीतील त्यजता तेथे प्राण । चुकविती जन्ममरण फेरे ।। २
अयोध्यापुरी मनोहर पावन । सकलसिद्धिप्रद मंगलखाण ।
केला विमलकथा आरंभ हे जाणून । नष्ट काममददंभ ऐकता कथा ।। ३
कथेचे नाम रामचरितमानस । परिसता पावती परमशांतीस ।
विषय वनअग्नीत जाळून मनगजास । होती सुखी पडता ते मानससरी ।। ४
रामचरितमानस प्रिय मुनींस । सुंदर पावन रचित महेश ।
करी नष्ट दारिद्रच दु:ख दोष । कलियुगी कुकर्म सकल पाप ।। ५
ठेविती निजमानसी रचून महेश । सुसमय पाहून कथिती उमेस ।
यास्तव देती नाम रामचरितमानस । हर हृदयी जाणून अति हर्षे ।। ६
तीच कथा सुखद सुशोभन । सादर ऐका सुजन हो मन लावून ।। ७
जैसे मानस आहे जे घडले तयात । प्रचार हेतूस्तव जगात ।
कथितो तेची सकल वृत्त । स्मरून उमावृषकेतूस ।। ३५
शंभुकृपे प्राप्त स्फूर्ति बुद्धीसी । यास्तव रामचरितमानस कवि तुलसी ।
यथामति रची मनोहर कथसी । सज्जन हो सुचित्ते ऐकून सुधारावी ।। १
सुमति भूमि हृदय अगाधस्थान । साधुघन उदधि वेदपुराण ।
वर्षती मधुर मंगल प्रसन्न । मनोहर राम सुयश जळ ।। २
सगुण लीलांचे सविस्तर कथन । तीच निर्मलता करी मळ हरण ।
प्रेमाभक्तीचे न करवे वर्णन । तीच जळ मधुरता शीतळता ।। ३
ते जळ सत्कर्म साळीसी हितकर । तेच रामभक्ताचे जीवन सुखकर ।
जळ पावन ते येता मेधामहीवर । जमून मग वाहे श्रवणमार्गे ।। ४
सुमानस सुस्थळी भरून स्थिर । मुरले ते सुखद शीत रुचिसुंदर ।। ५
रचिले बुद्धीने करून विचार । अति सुंदर संवाद चार ।
तेचि घाट चार मनोहर । पावन शुभद मानसाचे ।। ३६
प्रथम संवाद शिवपार्वतीचा । दुजा काकभुशुंडीचा ।
तिसरा याज्ञवल्क्यभारद्वाजाचा । चवथा तुलसीदाससंतांचा ।। ३६·१

सप्तकांड सुंदर सोपान । ज्ञाननेत्रे निरखिता प्रसन्न मन ।
रघुपति महिमा अबाधित निर्गुण । ते अगाध श्रेष्ठ जळ वर्णितो ।। १
सीतारामयश सलिल सुधासम । उपमा तरंग विलास मनोरम ।
सघन कमलिनी चौपाई अनुपम । मंजु मौक्तिकशिंपा काव्ययुक्ती ।। २
छंद सोरठा दोहा मंजुळ । शोभे बहुरंगी कमलकुल ।
तयांचा मकरंद पराग परिमळ । ते सुभाव सुभाषा अनुपम अर्थ ।। ३
पुण्यपुंज मंजुळ भृंगतती । हंस जणु ज्ञानविचारविरक्ती ।
ध्वनि वक्रोक्ती काव्यगुणजाती । ते मीन मनोहर नानाविध ।। ४
धर्मअर्थकामादि चार । ज्ञानविज्ञानसरस विचार ।
नवरस जपतप हे रम्य जलचर । शोभती सुंदर जलाशयी ।। ५
पुण्यात्मे संत नाम यांचे गुणगान । ते विचित्र जल विहंगासमान ।
संतसभा चहू बाजू आम्रवन । श्रद्धा जणु वसंतऋतू ।। ६
भक्तिनिरूपण विविधविधान । क्षमादयादम जाणावे तरुलता वितान ।
शमयमनियम फळ फूल हे ज्ञान । फळरस प्रेम हरिपदी वेद वदती ।। ७
कथेमाजी अन्य अनेक प्रसंग । ते शुकपिक बहुरंगी विहंग ।। ८
पुलक वाटिकाबागवन । आनंद सुविहंग विहार समान ।
माळी तोच जयाचे निर्मळ मन । शिंपी तयावरी प्रेमजळ सुनेत्रांनी ।। ३७
जे सावधान चित्ते गाती हे चरित । ते मानसाचे चतुर रक्षक ।
ऐकती नरनारी जे आदरपूर्वक । ते अधिकारी देव मानसाचे ।। १
विषयखल हे बगळे काक । अभागी न जाती जळानिकट ।
शुक्तिकीटक भेक शेवाळे न तयात । यापरी विषयरस कथा नाना न तेथे ।। २
या कारणे मनी भयभीत । बिचारे विषयीजन बगळे काक ।
सरासमीप येणे तया कठिण बहुत । रामकृपेविण न येऊ शकती ।। ३
घोर कुसंग हा कुपंथ कराळ । वचन तयांचे जणु व्याघ्रसिंहव्याळ ।
गृहकामकाज नाना जंजाळ । ते दुर्गम अति विशाल पर्वत ।। ४
मोहमदमानवन अति घोर ।। कुतर्क नाना सरिता भयंकर ।। ५
जे श्रद्धापथधनरहित । नसे जया संतांची संगत ।
वा जया न प्रिय रघुनाथ । ते मानसासमीप नच जाती ।। ३८
जरी कष्टे तेथे कुणी पोचेल । जाताच निद्राहिव तया येईल ।
उरी मूर्खता हुडहुडीने त्रासेल । जाऊन न घडेल स्नान अभाग्यासी ।। १

न घडे सराचे स्नानपान । परत फिरे अभिमाने तेथून ।
तयासी विचारती जव कोणी जन । तव सरनिंदा करून समजावी ॥ २
तयांना न विघ्ने व्यापती । जयांना राम कृपादृष्टीने विलोकती ।
ते आदरे सरी स्नान करिती । घोर तापत्रये न ते दग्ध ॥ ३
ते नर सरास कधी न सोडती । जयांचे ठायी रामचरणभक्ती ।
हे बंधो जे सरी स्नान वांछती । करावा तयांनी सुचित्तें सत्संग ॥ ४
ऐसे मानस मानसनेत्रांनी पाहून । कवीची बुद्धी निर्मल करिता स्नान ।
आनंदउत्साह हृदयी जाई भरून । उसळे प्रेमप्रमोदप्रवाह ॥ ५
तेथून सुंदर काव्यसरिता निघाली । राम विमलयशजळे भरलेली ।
शरयु नाम मांगल्याची मुळी । लोकवेदमत मंजुळ तट ॥ ६
सुमानस नंदिनी नदी पावन । समूळ उपटी कलिपापतरुतृण ॥ ७
त्रिविध श्रोतागण उभय तटांवर । तेची ग्राम नगर पुर ।
संतसभा अयोध्या अनुपम सुंदर । सकल सुमांगल्याचे मूळ ॥ ३९
गंगा सरिता रामभक्ती पावन । मिळे तिज शरयु सुकीर्ति सुशोभन ।
सानुज राम समरयश शोण । तो सुंदर महानद मिळे तया ॥ १
वाहे गंगाधारा भक्ती उभयांत । शोभे ती ज्ञानवैराग्यांसहित ।
त्रिविधतापहारक त्रिमुखी भयदायक । जाई रामस्वरूप सिंधूप्रती ॥ २
मानसमूळशरयु मिळे गंगेस । ऐकता हे करील पावन सज्जनांस ।
तयांतील कथा विचित्र विशेष । जणु वनबागा नदी तीरी ॥ ३
जे वऱ्हाडी उमामहेश विवाहात । ते सरितेतील जलचर अगणित ।
रामजन्म महोत्सव आनंद । आवर्ततरंगाची मनोहरता ॥ ४
चारी बंधूंचे बालचरित । विपुल बहुरंगी कमलासम शोभत ।
नृपराज्ञीपरिजनांचे सुकृत । तेचि जलविहंग भ्रमर जणू ॥ ४०
सीतास्वयंवर कथा मधुर । तीच सरितेची छबी मनोहर ।
कुशलप्रश्न नदीनौका सुंदर । केवट कुशल उत्तर सविवेक ॥ १
ऐकून करिती परस्पर कथन । शोभती सरितातटी ते यात्रिक गण ।
घाट सुबद्ध सुंदर रामश्रेष्ठवचन । परशुराम क्रोध घोर धारा ॥ २
रामविवाह अनुजांसहित । जलाची वृद्धी शुभद सकला सुखद ।
कथा ऐकता जे हर्षित पुलकित । ते पुण्यात्मे करिती स्नान मुदितमने ॥ ३

रामअभिषेक मंगल थाट । जणू पर्वकाळी मेळावा विराट ।
जिचे फळस्वरूप महान संकट । ती कुमति कैकेयी शेवाळे ।। ४
अगणित उत्पात संपूर्ण । शांत करी भरतचरित्र जपयज्ञ ।
कलिपाप खल अवगुणवर्णन । ते बगळे काक जळ कर्दम ।। ४१
साही ऋतूंत कीर्तिसरिता सुंदर । अति पावन सदा मनोहर ।
रामजन्मोत्सव सुखद शिशिर । उमाशिवविवाह हेमंत ।। १
रामविवाहोत्सववर्णन । मोदमंगलमय वसंतदर्शन ।
दुःसह ग्रीष्म रामवनगमन । पथकथा रविताप उष्ण पवनसम ।। २
निशाचरांसी युद्ध वर्षा घोर । सुरकुळधान्यासी मंगल सुखकर ।
रामराज्यी सुखसमृद्धी विनय फार । तोची निर्मल शरद सुखद ।। ३
गुणगान सतीशिरोमणी सीतेचे । ते निर्मल गुण जलाचे ।
भरत स्वभाव शीतळतेचे । न करवे वर्णन सदा एकरस ।। ४
चारी बंधूंचे परस्पर बोल । पाहणे हासणे एकत्र खेळ ।
बंधुभाव मीलन प्रेमळ । सुवास माधुरी जलाची ही ।। ४२
मम आर्तभाव विनयदीनता । जलाची अति ललित लघुता ।
अद्भुत जल गुणकारी ऐकता । आशातृष्णा हा मनोमळ दूर करी ।। १
हे पाणी श्रीरामप्रेमासी पोषक । सकल कलिपापदुःखभंजक ।
भवश्रमशोषक संतोष तोषक । शमवी दुरितदारिद्रय दुःखदोष ।। २
कामक्रोधमोहमदविनाशक । विरक्ती विमलज्ञानवर्धक ।
मिटती पापताप निश्चित । आदरे करिता स्नानपान ।। ३
जे या जले निज हृदय न क्षालत । ते अधम कलिकाळे वंचित ।
भवमृगजलासी निरखून तृषित । फिरती माघारी दुःखित मृगापरी ।। ४
यथामति जळगुणांचा विचार करून । तयात मनासी घालून स्नान ।
भवानीशंकराचे करून स्मरण । कथितो कवि तुलसी सुंदर कथा ।। ४३ (क)
रामपदकमल हृदयी धरून । तयांचा कृपाप्रसाद पावून ।
कथितो मुनिवरद्वयांचे मीलन । तयांचा शुभद सुंदर संवाद ।। ४३ (ख)
मुनी भारद्वाज प्रयागी वसती । तयांना रामपदी प्रेम अती ।
जितेंद्रिय दयाशील शुद्धमती । परमार्थमार्गी परम चतुर ।। १
माघमासी मकर राशीत रविभ्रमण । तीर्थराजी तव सकलांचे आगमन ।
देवदानवकिन्नरनरगण । आदरे करिती स्नान त्रिवेणीत ।। २

वेणीमाधवपदकमला पूजिती । अक्षयवटस्पर्शे पुलकित होती ।
भारद्वाज आश्रम पावन अती । मुनिवरांसी प्रिय परम रम्य ।। ३
मुनिऋषिगण तेथे जमती । जेथे ते प्रयागस्नाना जाती ।
हर्षे सकल प्रात:स्नान करिती । कथिती हरिगुणकथा परस्परा ।। ४
ब्रह्मनिरूपण धर्मविधान । तत्त्व विभागाचे सुरस वर्णन ।
ज्ञानवैराग्ययुक्त भक्तिकथन । करिती आदरे प्रेमाने ।। ४४
ऐसे माघमासभर करून स्नान । निज निज आश्रमी जाती मुनिगण ।
प्रति संवत महान आनंद लुटून । फिरती मकरस्नान पूर्ण करून ।। १
यापरि मकरस्नान पूर्ण करून । माघारी जाती आश्रमी मुनिगण ।
परम ज्ञानी याज्ञवल्क्य मुनिचरण । वंदून भारद्वाज घेती ठेवून तया ।। २
आदरे चरणसरोज प्रक्षाळून । पवित्र आसनी बैसवून ।
तयांचे सुयश वर्णून करिती पूजन । बोलती पुनीत मृदु वचन ।। ३
नाथ एक संदेह मम मनात । करगत तुमचे सकल वेदतत्त्व ।
मी वदू तरी लज्जाभय युक्त । परि न पुसता हानी होईल ।। ४
प्रभो ऐसी नीती सांगती संत । तेची श्रुतिपुराण मुनि गात ।
नुपजे निर्मल ज्ञान हृदयात । संशय लपविता गुरुपासुनी ।। ४५
ऐसे चिंतून प्रकट करिती अज्ञान । वदती दूर करा नाथ कृपा करून ।
सांगती संतवेद पुराण । रामनाममहिमा अपार ।। १
शिवभगवान ज्ञानी गुणराशी । संतत रामनाम जपती अविनाशी ।
जगी चारी जीव परमपदासी । पोचती मृत्यु घडता काशीत ।। २
तो रामनामाचा महिमा मुनीश । दयाळू शिव करिती तोच उपदेश ।
प्रभो पुसतो मी हा कवण राम सर्वेश । बोध करा मज कृपानिधी ।। ३
एक राम दशरथसुत । तयाचे चरित्र संसारा विदित ।
स्त्रीविरहे अतिदु:खित । क्रोधे तयाने वधिला रावण रणी ।। ४
प्रभो तोच हा राम की अपर । जयाचे नाम जपती शंकर ।
वदावे विवेके करून विचार । तुम्ही सर्वज्ञ सत्यधाम ।। ४६
जेणे होईल मम भ्रम निरास । नाथा तैसे सांगावे विस्तारून कथेस ।
रघुपतिमहिमा विदित तुम्हास । मग बोलती हासून याज्ञवल्क्य । १
रामभक्त तुम्ही कायावाचामने । तुमची चतुरता मी जाणे ।
वांछिता रामगूढगुण परिसणे । केला ऐसा प्रश्न जणु मूढापरी ।। २

तात मन लावून ऐका सादर । कथितो रामकथा सुंदर ।
महामोह विशाल महिषासुर । भीषण कालीदेवी रामकथा ।। ३
रामकथा शशिकिरणसमान । संतचकोर तयांचे करिती पान ।।
उमेने ऐसाच विचारितां प्रश्न । वदती विस्तारे महादेव ।। ४
यथामति संवाद महेशाचा । कथितो हेतु समय तयाचा ।
हे मुनिवर नाश होईल दुःखाचा । मन लावुनी श्रवण करा ।। ४७
एके समयी युगी त्रेता । शंभु अगस्ति ऋषीपाशी गेले असता ।
संगे घेऊन भवानी जगन्माता । अखिलेश्वर जाणून ऋषि पूजिती ।। १
रामकथा मुनिवर वर्णिती । ऐकून महेश परम सुख मानिती ।
ऋषि सुंदर हरिभक्ति पुशिती । अधिकारी जाणून कथिती शंभू ।। २
रामगुणगाथाकथन ऐकून । काही दिन राहती उमारमण ।
मग मुनींची आज्ञा घेऊन । चालले भवनी दक्षकुमारीसंगे ।। ३
ते समयी महिभार उतरण्यासी । हरि अवतरती रघुवंशी ।
पितृआज्ञेस्तव त्यजिती राज्यासी । दंडकवनी साधुवेषे फिरती प्रभू ।। ४
हृदयी चिंतित जाती हर । हरिदर्शन कैसे घडेल साचार ।
गुप्तरूपी हा प्रभुअवतार । सकला कळेल मी जाता ।। ४८ (क)
शंकरउरी क्षोभ अती । मर्म तयाचे न जाणे सती ।
तुलसी म्हणे शिवमनी भीती । परि दर्शनलोभे लोचन उत्सुक ।। ४८ (ख)
मनुजहस्ते रावण मागे मरण । प्रभु करितील सत्य ब्रह्मवचन ।
वेळ पस्ताव्याची जर समीप न जाईन । विचार करिता उपाय न मिळे ।। १
यापरि होती शोकवश महेश । ते समयी जाई दशशीर्ष ।
तो नीच संगे घेऊन मारीचास । त्वरित जाहला मारीच मायामृग ।। २
कपटे मूर्ख करी वैदेहीचे हरण । प्रभुप्रभाव न जाणे रावण ।
हरि येती बंधूसहित मृग वधून । देखता आश्रम तयांच्या नयनी जल ।। ३
विरहे व्याकुळ नरासम रघुनाथ । वनी फिरती बंधुद्वय सीता शोधित ।
प्रभु संयोगवियोग अतीत । ते प्रत्यक्ष अनुभविती विरहदुःख ।। ४
रघुपति चरित्र रम्य विचित्र अती । परम ज्ञानी जन ते जाणती ।
मतिमंद जे विमोहवश होती । धरिती हृदयी अन्य काही ।। ४९
ते समयी शंभू पाहती रामास । उपजे हृदयी हर्ष विशेष ।
नेत्रभरे निरखिती लावण्यसिंधूस । कुसमय जाणून नच वदती ।। १

जय सच्चिदानंद जगपावन । जयघोषे निघाले शशिभूषण ।
वारंवार पुलकित कृपानिधान । शिव जात होते सतीसह ॥ २
शंभूची दशा सतीने पाहुनी । उपजे संदेह तिज मनी ।
शंकर जगी वंद्य जगदीश मानुनी । सुरनरमुनि शिर नमविती ॥ ३
ते नृपसुतास करिती प्रणाम । वदून सच्चिदानंद परमधाम ।
नावरे हृदयातील प्रेम । शोभा पाहून मग्न होती ॥ ४
परब्रह्म व्यापक मायारहित । अज अगम्य अनिच्छ अभेद ।
जयासी न जाणती वेद । कैसा होईल तो देहधारी नर ॥ ५०
जो विष्णू सुरहिता नरतनुधारी । तो सर्वज्ञ यथा त्रिपुरारी ।
अज्ञापरी शोधील तो का नारी । असुरारि श्रीपती ज्ञानधाम ॥ १
शंभुवाणी कदापि न असत्य । सकल जाणती शिव सर्वज्ञ ।
सतीचे मनी असा अपार संशय । ज्ञान न प्रकटे हृदयात ॥ २
जरी प्रकट न बोले भवानी । सर्व जाणून हर वदती अंतरज्ञानी ।
नारी स्वभावे ऐसा संशय तव मनी । परि तो न धरावा कधी सती ऐक ॥ ३
जयाची कथा अगस्त्यऋषी गाती । कथिली मुनीस मी जयाची भक्ती ।
ज्ञानी मुनी जयाची सेवा करिती । तेच मम इष्ट देव रघुवीर ॥ ४
मुनि ज्ञानी योगी । सिद्धशुद्ध चित्ती । जयास ते ध्याती । निरंतर ।
पुराण निगम । आगम जाणती । वर्णितात कीर्ति । नेति नेति ।
ब्रह्मांडाचा धनी । तोच हा श्रीराम । व्यापी परब्रह्म । मायापती ।
नित्य निजतंत्र । रघुकुलमणी । अवतरे जनी । भक्तहिता ॥ १
बहु वेळां शिव वदले सतीस । परि न पडे हृदयी प्रकाश ।
हरि मायेचे बळ जाणून महेश । बोलती तिज हसून ॥ ५१
तव मनी बहुत संदेह जर । जाऊन घ्यावी परीक्षा तर ।
तू येशील माघारी तोवर । बैसतो मी वटछायेत या ॥ १
जेणे मोह भ्रम होईल दूर । तैसा यत्ने करावा विवेकविचार ।
बाई काय करू ऐशी मनी अस्थिर । निघाली शिवाची आज्ञा घेऊन सती ॥ २
मग शंभु करिती मनी अनुमान । नसे दक्षकन्येचे कल्याण ।
समजावून न जाई अज्ञान । विधिविपरीत न तिचे कुशल ॥ ३
घडेल जे रचती कृपानिधान । का फोडावे फाटे तर्क करून ।
जपती शिव हरिनाम ऐसे वदून । तव गेली सती सुखधाम रामाप्रती ॥ ४

हृदयी वारंवार विचार करून । करी सती सीतेचे रूप धारण ।
चालली पथी पुढे होऊन । येती जेथून राम नरभूप ।। ५२
लक्ष्मण पाहून उमाकृत वेष । होई चकित भ्रम हृदयी विशेष ।
प्रभूचा प्रभाव ज्ञान मतिधीरास । होई गंभीर न वदू शके ।। १
सुरस्वामी सर्वसाक्षी अंतरज्ञाने । सतीचे कपट त्वरित जाणे ।
अज्ञान मिटे जयाच्या स्मरणे । तोच राम भगवान सर्वज्ञ ।। २
पाहा नारीस्वभावाचा प्रभाव । देव साक्षी लपवी वेष नाव ।
प्रशंसून हृदयी मायाबळभाव । वदती हसून राम मृदुवाणी ।। ३
सतीस केला प्रभूने प्रणाम । पित्यासहित कथिले निज नाम ।
का फिरसी वनी एकली काय काम । वदती मग कोठे शिव सांग मज ।। ४
गूढ मृदु रामाचे वचन ऐकुनी । सतीस वाटे संकोच मनी ।
ती भयभीत पथ आक्रमुनी । सचिंत जाई शिवाप्रती ।। ५३
न मानिले मी शंकरवचना । रघुनाथ जाणती मम अज्ञाना ।
जाऊन उत्तर काय देऊ पतींना । दारुण दाह हृदयी उपजे ।। १
श्रीराम सतीचे दुःख जाणती । निजप्रभाव प्रकट दाविती ।
देखे कौतुक मार्गी जाता सती । सन्मुख राम सीतालक्ष्मणासह ।। २
माघारी वळता देखे प्रभूस । सवे बंधुसीता सुंदर वेष ।
जेथे पाही तेथे प्रभू सर्वेश । सेविती तया चतुर सिद्धमुनी ।। ३
देखे शिवब्रह्माविष्णू अनेक । प्रभाव जयाचा एकाहून एक अधिक ।
विविध वेषे देव होऊन सेवक । चरण वंदिती रामाचे ।। ४
देखिल्या तिने विधात्री लक्ष्मी सती । अगणित अनुपम सुंदर अती ।
जे जे वेष ब्रह्मा-सुर घेती । तयांची अनुकूल रूपे सकल शक्ती ।। ५४
जेथे तेथे देखिले जितुके रघुपतीस । तितुके देखिले शक्तीसह सुरांस ।
संसारातील चराचर जीवास । पाहिले सकल अनेकविध ।। १
बहु वेषे देव प्रभूस पूजिती । न अन्य रामरूप देखिती ।
बहुत रघुपति अवलोकिती । सीतेसह परि न अन्य वेष ।। २
तेच रघुवर तोच लक्ष्मण तीच सीता । सती अति भयभीत ते पाहता ।
हृदय कंपित तनूची शुद्धि जाता । नयन मिटुनी मार्गी बैसे ।। ३
पाहिले मग उघडून लोचनांस । काही न दिसे दक्षकुमारीस ।
वारंवार वंदून रामपदांस । निघे ती गिरीशाप्रती ।। ४

गेली महेशासमीप सती । ते हसून कुशल पुसती ।
कैसी घेतली परीक्षा ती । निवेद मज सकल वृत्तांत ।। ५५
सती रामाचा प्रभाव जाणून । भयवशे ठेवी गुप्त शिवापासून ।
म्हणे स्वामी तुम्हांसम केले नमन । न घेतली परीक्षा तयांची मी ।। १
तुम्ही वदता ते असत्य न होत । हा अति विश्वास मम मनात ।
जाणिले सतीकृत सकल चरित । ध्यान धरून शंकरांनी ।। २
राममायेसी नमन करून । जिच्या प्रेरणे सती वदे असत्य वचन ।
हृदयी विचार करिती शंभु सुजाण । बलवान भावी इच्छा हरीची ।। ३
घेतला सतीने सीतावेष । शिवहृदयात विषाद विशेष ।
जर दावीन आता प्रेम सतीस । भक्तिपथ होईल लुप्त अनीति पसरेल ।। ४
सती परम पुनीत टाकणे न उचित । प्रेम करणे ते पापयुक्त ।
महेश न वदती काही प्रकट । परि तयांच्या हृदयी संताप अधिक ।। ५६
तव शंकर नमिती प्रभुपदास । आला विचार हृदयी स्मरता रामास ।
सतीची भेट न आता या तनूस । मनी संकल्प केला शिवाने ।। १
ऐसे चिंतून मतिधीर शंकर । चालले भवना स्मरून रघुवीर ।
गगन वाणी गर्जे सुंदर । भक्ति उत्तम दृढ जय महेश ।। २
न अन्य करिती ऐसा पण । तुम्ही रामभक्त समर्थ भगवान ।
सती सचिंत नभोवाणी ऐकून । संकोचे पुसे शिवास ।। ३
सांगा कोणता पण कृपाळा । हे सत्यधाम प्रभु दीनदयाळा ।
बहुपरि सती विनवी महेशाला । परि न काही वदती त्रिपुरारी ।। ४
करी अनुमान सती हृदयात । जाणती सर्वज्ञशिव सकल वृत्तांत ।
शंभुसवे मी केले कपट । नारीस्वभाव मूढ अज्ञानी ।। ५७ (क)
पाहा प्रीतीची रीति कैसी । भाव दुग्धाचा दुग्धमिश्रित जलासी ।
परि मिसळता कपट आम्लासी । होई जल विलग जाई स्वाद ।। ५७ (ख)
हृदयी होता करणीचे स्मरण । शोक अमित न करवे वर्णन ।
शिव कृपासिंधु अगाध महान । न प्रकट करिती अपराध मम ।। १
शंकराचा रोख अवलोकुनी । हृदयी व्याकुळ प्रभूने त्यजिले म्हणुनी ।
न बोलवे तिज निज पाप जाणुनी । हृदय तिचे आव्यासम जळे ।। २
सखी सचिंत जाणून शंकर । कथिती कथा सुखास्तव सुंदर ।
पथी वर्णिती इतिहास मनोहर । मग पोचती कैलासासी विश्वनाथ ।। ...३

त्यजीन यास्तव त्वरित देहासी । हृदयी धरून शिव चंद्रमौलीसी ।
ऐसे वदून योगाग्नीत जाळिले तनूसी । तव उडाला हाहाःकार यज्ञशाली ।। ४
ऐकून सतीचे मरण । शिवगण करिती यज्ञाचे विध्वंसन ।
यज्ञाचा विनाश पाहून । भृगु मुनीश रक्षिती यज्ञास ।। ६४
समाचार हा मिळाला शंकरास । क्रोधे धाडिले वीरभद्रास ।
केला जाऊन तयानें यज्ञाचा विध्वंस । यथोचित देवा फळ दिधले ।। १
शिवद्रोहयाची जैसी गती । तैसीच होई जगा विदित दक्षस्थिती ।
जन सकल हा वृत्तांत जाणती । म्हणोनी मी वर्णिले संक्षेपे ।। २
मरणसमयी वर मागे हरीस सती । राहो जन्मोजन्मी हरपदी प्रीती ।
तनु पावुनी जन्मे पार्वती । जाऊन गृही हिमगिरीच्या ।। ३
जव शैलगृही जन्मली पार्वती । येती तेथे सकल सिद्धिसंपत्ती ।
जेथे तेथे मुनि सुआश्रम बांधिती । हिमगिरि तया देई उचित स्थान ।। ४
शैली सदा सुमनफळांसहित दिसती । वृक्ष नूतन नाना तरुजाती ।
तेथे खाणीत प्रकट होती । नानाविध रत्ने सुंदर ।। ६५
पुनीत जळे सरिता वाहती । खगमृगमधुप सुखी राहती ।
सकल जीव वैरभाव सोडिती । प्रेम करिती गिरीवरी ।। १
शोभे शैल येता गिरिजा गृहात । रामभक्ति पावता जैसा भक्त ।
गृही तयाच्या मंगलोत्सव नूतन नित । यश गाती जयाचे ब्रह्मादी ।। २
समाचार हा नारद जाणती । कौतुके गिरिगृही येती ।
करिती तयांचे स्वागत गिरिपती । देती आसन पद प्रक्षाळून ।। ३
पत्नीसह मुनिपदांस वंदून । चरणजळ भवनी शिंपवून ।
निज भाग्याचे गिरि करी वर्णन । घाली मुनिचरणी बोलावून सुता ।। ४
त्रिकालज्ञ सर्वज्ञ तुम्ही हे मुनिवर । गति तुमची पोचे सर्वत्र ।
आता हृदयी करून विचार । सांगावे गुणदोष कन्येचे ।। ६६
मुनि हसून बोलती गूढ मृदुवाणी । सुता तुमची सकल गुणखाणी ।
सुंदर सहज सुशील शहाणी । उमा अंबिका भवानी तियेचे नाम ।। १
कन्या तव सुलक्षणी सुंदर । होईल सदा पतीसी प्रियकर ।
राहील सौभाग्य अचल निरंतर । मातापित्यासी देईल यश ।। २
पूज्य होईल सकल जगासी । दुर्लभ न काही सेविता तिजसी ।
नारी संसारी स्मरता हिचे नामासी । पतिव्रत असिधारी चढतील ।। ३

कन्या तव हे शैला सुलक्षण । ऐक आता तियेचे दोन चार अवगुण ।
अगुण अमान मातापिताविहीन । संशयहीन उदासी ।। ४
योगी जटाधारी मनी अकाम । नग्नवेष अमंगल परम ।
मिळेल तिजसी स्वामी यासम । रेखा हस्तावरी ऐशाच ।। ६७
मुनिवाणी ऐकून ती सत्य मानिती । उमा हर्षित परि दुःखित दंपती ।
नारद तयाचे रहस्य जाणती । स्थिति एक परि भाव मनी भिन्न ।। १
हिमगिरी गिरिजा मैना मैत्रिणी । पुलकित शरीर नयनी पाणी ।
कदापि असत्य न देवऋषीची वाणी । उमा मनी धरी वचन ते ।। २
शिवपदकमली उपजला स्नेह । मीलन कठिण येई मनी संदेह ।
सखीसमीप बैसली नसे निर्वाह । प्रीति लपवी कुवेळ जाणून ।। ३
असत्य न होई देवर्षीची वाणी । दुःखित दंपती चतुर मैत्रिणी ।
वदे गिरिराज धीर धरुनी । वदा नाथ कवण उपाय करू ।। ४
ऐक हिमवंता म्हणती मुनी । भाळी जे दैवाने दिले लिहुनी ।
न मिटवू शकती ते कोणी । देवदानव मुनिनरनाग ।। ६८
तदपि मी सुचवितो एक उपाय । होईल सिद्धि जर दैव सहाय्य ।
मिळेल तोच वर उमेस नसे संशय । वर्णिला जैसा मी तुम्हांपाशी ।। १
जे जे केले वर दोषांचे वर्णन । ते ते दिसती शिवात मम अनुमान ।
सकल वदतील दोष गुणांसमान । जर होईल विवाह शंकराशी ।। २
जरी शेषावरी हरि करिती शयन । न मानिती तो दोष बुधजन ।
भानुअग्नि करिती रसशोषण । तयांना मंद न वदती कुणी ।। ३
शुभअशुभ जल वाहते गंगेत । परि तिज न कोणी वदती अपुनीत ।
समर्थासी नसे दोष हे तात । रवि पावक सुरसरितेपरी ।। ४
तयांसी स्पर्धा करतील जर । ते ज्ञान अभिमानी मंद नर ।
नरकात पडतील कल्पभर । जीव ते होतील का ईशसम ।। ६९
गंगाजळकृत मदिरा जाणून । संत न करिती तिचे पान ।
परि गंगेस मिळता ती होई पावन । तैसे अंतर ईश्वरजीवात ।। १
शंभु सहज समर्थ भगवान । या विवाही सर्वपरि होईल कल्याण ।
परि आराधनेसी महेश कठिण । तप करिता तयास्तव सत्वर संतुष्ट ।। २
यदि तप करील तव कुमारी । भावी घटना मिटवील त्रिपुरारी ।
जगी असती अनेक वर जरी । परि शिवास सोडून न अन्य तिज वर ।। ३

वरदायक प्रणतार्तिभंजन । कृपासिंधु भक्तमनरंजन ।
न इच्छित फळ शिवाच्या आराधनेविण । कोटि योगजपसाधने न मिळे ।। ४
ऐसे वदून स्मरून हरीस । देती नारद आशीर्वाद गिरिजेस ।
कल्याण होईल हे गिरीश । आता दे संशय सोडून ।। ७०
वदून ऐसे नारद गेले ब्रह्मलोकास । आता ऐका पुढील चरित्रास ।
एकांत मिळता मैना वदे पतीस । नाथा न जाणिला अर्थ मुनिवचनाचा ।। १
जर अनुकूल घर वर कुळ कन्येसी । तर द्यावी उमा ऐशा वरासी ।
न तो ठेवीन कुमारी तिजसी । हे नाथा उमा मज प्राणप्रिय ।। २
योग्य वर न मिळेल जर गिरिजेसी । जन म्हणतील मूर्ख तुम्हांसी ।
न होईल मग उरी दुःखदाहासी । हे जाणून पतिदेवा विवाह करा ।। ३
वदे पडून पदी ठेवून मस्तक । तव गिरिराज म्हणती स्नेहासहित ।
अग्नीहि प्रकट होईल शशीत । परि नारदाचे वचन न असत्य ।। ४
प्रिये हा शोक सर्व टाकून । करावे तू भगवंताचे स्मरण ।
जयाने केली पार्वती निर्माण । कल्याण सकल तोच करील ।। ७१
सुतेवरी तव प्रेम इतुके जर । जाऊन कर उपदेश तिज तर ।
करावे तप जेणे मिळतील शंकर । अन्य उपाये न क्लेश मिटती ।। १
सहेतु रहस्यमय नारदाचे वचन । वृषकेतु सुंदर गुणनिधान ।
तरी मिथ्या संदेह हा दे सोडून । शंकर निष्कलंक सर्वपरी ।। २
ऐकून पतीचे वचन मनी हर्षित । गिरिजेप्रति उठून गेली त्वरित ।
पाहता उमेस अश्रु येती नयनात । बैसवी तिज अंकी स्नेहभरे ।। ३
वारंवार तिज धरी उरासी । कंठ दाटला न बोलवे तिजसी ।
सुखद वचन वदली मातेसी । सर्वज्ञ भवानी जगन्माता ।। ४
ऐक माते मी सांगते ते । देखिले मी एका सुंदर स्वप्नाते ।
ऐसा उपदेश करी माते । एक गौरकाय विप्रवर ।। ७२
शैलकुमारी करावे तप जाऊन । नारद वदले ते सत्य मानून ।
मातापित्यासी रुचले मुनिवचन । तप दुःखदोषभंजक सुखद ।। १
तपोबळे प्रपंच रची विधाता । तपोबळे विष्णु जगत्राता ।
तपोबळे शंभु संहारकर्ता । तपोबळे शेष महीभार धरी ।। २
सृष्टीस आधार तप हे भवानी । करावे तप तू हे जाणून मनी ।
माता विस्मित वचन ऐकुनी । बोलावून गिरीस स्वप्न कथिले ।। ३

बहुपरि समजावून मातापित्यासी । चालली हर्षे उमा तप करण्यासी ।
प्रिय मातापिता आप्तजनांसी । बोलवेना ते व्याकुळ अती ।। ४
तव वेदशिरा मुनि येऊन । सकलांसी सांगती समजावून ।
पार्वतीचा महिमा ऐकून । पावती समाधान सकल ।। ७३
उमा प्राणपतीचे पद हृदयी धरून । करू लागली तप वनी जाऊन ।
सोडी भोग पतिपदांस स्मरून । जरी कोमल तनु तिची न योग्य तपा ।। १
विसरली देहास तपात मन । पतिचरणी नितनव प्रेममग्न ।
सहस्र वरुषें कंदफळे खाऊन । मग शत वरुषे गेली शाक खाता ।। २
दिन काही जळवायूचे भोजन । काही दिन उपवास कठिण ।
केली भक्षण संवत सहस्र तीन । शुष्क बेलपाने महीवर पडलेली ।। ३
मग सोडिले तिने शुष्कपर्णा । तदा उमेचे नाव जाहले अपर्णा ।
गंभीर वाणी भेदे गगना । पाहून उमेची क्षीण तनू ।। ४
ऐक हे गिरिराजकुमारी कोमल । जाहले तव मनोरथ सफळ ।
सोड दु:सह क्लेश सकल । आता त्रिपुरारि मिळतील तुज ।। ७४
ऐसे तप न कोणी केले भवानी । जाहले अनेक धीर मुनि ज्ञानी ।
आता उरी धरी ब्रह्मावरवाणी । जाणून सत्य सदा संतत पवित्र ।। १
पिता बोलावू येतील जव । जा गृही हट्ट सोडून तव ।
भेटता सप्तर्षि ठेवावी जाणीव । होईल सत्य देववाणी श्रेष्ठ ।। २
गगनातील ब्रह्मावाणी ऐकून । पुलकित तनु गिरिजा प्रसन्न ।
केले मी सुंदर उमाचरित्र गान । ऐका आता सुशोभन शंभुचरित्र ।। ३
जव केला त्याग तनूचा सतीने जाऊन । जाहले शिवमन विरक्त तदापासून ।
जेथे तेथे ऐकती रामगण । जपती सदा रघुनायक नाम ।। ४
शिव चिदानंद सुखधाम । विगत मोह मद काम ।
स्मरोनी सकल लोकअभिराम । विचरती मही ठेवून राम हृदयी ।। ७५
शिव कोठे उपदेशती मुनिवरांस ज्ञान । करिती कोठे रामाचे गुणवर्णन ।
जरी निष्काम सुजाण भगवान । भक्तसतीच्या विरहदु:खे दु:खित ।। १
काळ यापरि गेला बहुत । रामपदी प्रेम होई वृद्धिगत ।
शिवनेमव्रत प्रेम यांस राम देखत । तैसेच अविचल भक्तिचिन्ह हृदयी ।। २
तव प्रकटती राम कृतज्ञकृपाळ । रूपशीलनिधी तेज विशाळ ।
तुम्हाविण न अन्य हे व्रत पाळील । ऐसे वानिती बहुपरि शंकरास ।। ३

शिवासी राम समजाविती । पार्वतीची जन्मकथा कथिती ।
गिरिजेची करणी पावन अती । विस्तारे वर्णिती कृपानिधी ।। ४
यदि तुमचा मजवरी स्नेह अपार । ऐकावी मम विनंती हे महेश्वर ।
करावा विवाह शैलजेसी शीघ्र । हेच मागणे मज द्यावे ।। ७६
शिव वदती ऐसे न उचित जरी । न भंगीन स्वामींचे वचन तरी ।
तुमची आज्ञा धरीन शिरी । नाथ हाच मम परम धर्म ।। १
मातापिता गुरू यांचे वचन । विचाराविण पाळावे शुभ जाणून ।
तुमची आज्ञा न करीत उल्लंघन । मम हितकारी तुम्ही सर्वपरी ।। २
प्रभु संतुष्ट ऐकून शिववचना । भक्तिज्ञानधर्मयुक्त रचना ।
प्रभु म्हणती हे शिवा राखिलेत पणा । आता राखावे हृदयी मी कथिले ते ।। ३
ऐसे वदून राम अंतर्धान पावती । शंकराची मूर्ति उरी ठेविती ।
तोच सप्तर्षि येती शिवाप्रती । तव वदती शिव मधुर वचन ।। ४
पार्वती समीप जाऊन । प्रेमपरीक्षा तिची घेऊन ।
आणवावे तिज गृही गिरीस सांगून । करावा तिचा संदेह दूर ।। ७७
पाहती ऋषि कैसी गौरीसी । जणु मूर्तिमंत तपस्या जैसी ।
का इतुके घोर तप करिसी । हे शैलकुमारी वदती मुनी ।। १
आराधना कोणाची काय इच्छिसी । का न सत्य मर्म आम्हां कथिसी ।
वदे सती वाटे संकोच मनासी । हसाल मज मूढता पाहून ।। २
उपदेश न ऐके हटवादी मन । मानिले सत्य नारदाचे वचन ।
उडू पाहते पंखांविण । भिंत उभारू इच्छिते जळावरी ।। ३
पाहा मुनि मम अविवेका । इच्छिते असो शिव सदा भर्ता ।। ४
ऋषि हसती ऐकून गौरीचे वचन । वदती तव संभव गिरिपासून ।
नारदाचा उपदेश ऐकून । सांग नांदले घर कुणाचे सुखे ।। ७८
जाऊन केला उपदेश दक्षपुत्रांसी । न देखिले तयांनी फिरून भवनासी ।
विध्वंसिले चित्रकेतूचे घरसंसारासी । केली तीच गति हिरण्यकश्यपाची ।। १
जें नरनारी नारद वचन ऐकती । गृहत्याग करून निश्चित भिकारी होती ।
आपणांसम सकलांस करू पाहती । मुनिवेष परि कपटी मन ।। २
तयांच्या वचनी विश्वास ठेवून । वांछिसी पति सहज उदासीन ।
कुवेष नरकपाली निर्लज्ज निर्गुण । अकुल अगेह नग्न सर्पधारी ।। ३

ऐसा पति मिळता सांग कैचे सुख । भुलथापा भुलली फसवितो तो ठक ।
पंचमते विवाह करून त्रिपुरांतक । सतीस सोडून तिज मृत्युमुखी घाली ।। ४
भिक्षा मागून निर्वाह करिती । न चिंता उरी सुखे झोपती ।
ऐसे फटिंग दिगंबर एकाकी । कैसी टिकेल स्त्री ते भवनी ।। ७९
अजून तरी मानावे आमुचे वचन । शोधिला आम्ही तुज वर छान ।
सुशील सुंदर सुखद पावन । जयाचे लीलायश वेद गाती ।। १
दूषणरहित सकल गुणराशी । लक्ष्मीपति वैकुंठपुरवासी ।
ऐसा वर आणू मिळवून तुजसी । ऐकून वदली हसत भवानी ।। २
सत्य वदता गिरिपासून मम जनन । सोडीन देह परि हट्ट न सोडीन ।
कनक निघते पाषाणातून । जाळिले तरी निज गुण न सोडी ।। ३
नारदवचनास न मी सोडणार । मज न भय राहो वा जावो घरदार ।
न स्वप्नी सुखसिद्धी तया साचार । जया न विश्वास गुरुवचनी ।। ४
जाणा महादेव अवगुणांचे भवन । विष्णुसकल गुणनिधान ।
परि जेथे रमते जयाचे मन । तयासी तेथेच काम असे ।। ८०
जर भेटता प्रथम आपण मुनीश । शिरी धरिले असते तुमच्या बोधास ।
वर मानून अर्पिला जन्म शंभूस । गुणदोषाचा विचार आता कोण करी ।। १
जर तुम्हांस हृदयीं हट्ट विशेष । विवाह योजल्याविण न रहावे तुम्हांस ।
कौतुककर्त्यांसी नसे आळस । जगी अनेक कन्या उपवर ।। २
जन्म कोटी मम हाच पण । वरीन शंभूस न तो कुमारी राहीन ।
कदापि न सोडीन मी नारदाचे वचन । जरी स्वये महेश कथिती शतवेळा ।। ३
वदे जगदंबा मी पाया पडते । जाहला विलंब तुम्ही जावे गृहाते ।
जय जय भवानी जगदंबिके । प्रेम पाहून वदती ज्ञानी मुनी ।। ४
शिव भगवान तू माया आहेस । मातापिता तुम्ही सकल जगास ।
चालले मुनि नमून चरणांस । वारंवार पुलकित तनु हर्षे ।। ८१
मुनी जाऊन हिमवंतास धाडिती । विनवून गिरिजेस गृही आणिती ।
उमेची कथा सकल ऐकविती । सप्तर्षि जाऊन शिवापाशी ।। १
ऐकून पार्वतीचे प्रेम शिव आनंदमग्न । मग गृही जाती सप्तर्षि अतिप्रसन्न ।
तव शंभु सुजाण मन स्थिर करून । करू लागती ध्यान रघुनाथाचे ।। २

ते समयी तारकासुर बलवान । भुजबळ प्रताप तेज महान ।
तयाने लोकलोकपाळांस जिंकून । सुख संपत्तिहीन केले देवांस ।। ३
अजिंक्य तो अजर अमर । विविध लढाई करून हरले सुर ।
ब्रह्माचाप्रति जाऊन करिती पुकार । तव देव दुःखित दिसती तयासी ।। ४
विधाता समजावी सकलांसी । मृत्यु येईल तारकासुरासी ।
रणी तोच जिंकील असुरांसी । जव शंभुवीर्ये उपजेल सुत ।। ८२
मम वचन ऐकून करा उपाया । होईल सफळ कार्य ईश्वर देईल सहाय्या ।
दक्षयज्ञी सतीने जाळिली काया । घेतला जन्म हिमाचलगृही ।। १
शिवपतिलागी आचरले तपास । जाहले शिव समाधिस्थ सोडून सर्वांस ।
जरी दिसते हे भारी असमंजस । तरी ऐका विनंति मम एक ।। २
जाऊन धाडा शिवाप्रति मदनास । शंकरमनी निर्मील तो क्षोभास ।
तंव जाऊन नमवू शिर शिवास । बळेच तयाचा विवाह करू ।। ३
ऐसा देवहितास उपाय उत्तम । वदती सकल हा अनुपम ।
सुर स्तविती कामास प्रेमे परम । प्रकटे तव पंचबाण मीनकेतु ।। ४
कामासी कथिती व्यथा सुर । मग तयाने केला मनी विचार ।
तव हसून वदला पंचशर । शंभुविरोधी कल्याण नसे ।। ८३
परी कार्य करीन मी तुमचे निश्चित । उपकार परम धर्म वेदविहित ।
तयास सदा स्तविती संत । जे परहितालागी सोडिती देहास ।। १
ऐसे वदून निघाला सकला वंदून । हस्तकांसह करी चाप घेऊन ।
शिवविरोध करिता मम खचित मरण । पथी जाता ऐसे चिंती काम उरी ।। २
पसरवी आपुला प्रभाव विस्तार । निजवश करून सकल संसार ।
वेदमर्यादा लोपे क्षणभर । जव अति कोपला मदन मीनकेतू ।। ३
ब्रह्मचर्यव्रत संयम ज्ञान । धैर्य धर्म जप विज्ञान ।
विरक्ति योग सदाचरण । गेली ही विवेकसेना भये पळून ।। ४
पळाला विवेक । हस्तकांसहित । रणातील भट । पाठमोरे ।
तेच अवसरी । सद्ग्रंथ पर्वत । तयांच्या गुहेत । लपतात ।
आता ब्रह्मदेवा । काय हो होणार । कोण रक्षणार । जगतास ।
कोण दोनशीर्षी । कोपे जयावर । रतिपति मार । शस्त्रधारी ।। १
जे सजीव जगी चराचर । म्हणती जयांना नारीनर ।
निज मर्यादा सोडून ते तर । जाहले वश मदनासी ।। ८४

कामवासना सकलांच्या मनी येती । लता पाहून तरुशाखा लवती ।
सरिता प्रक्षुब्ध सिंधूप्रति धावती । संगम करिती तलावतळी ।। १
वानिली ही जडजीवांची स्थिती । कैसी वानावी मग सजीवांची गती ।
समय विसरून कामवश होती । नभजळस्थळचर पशुपक्षी ।। २
सकल लोक जाहले कामांध व्याकुळ । न बघती चक्रवाक निशादिन वेळ ।
देवदानव किन्नर व्याल । भूतवेताळ पिशाच्च प्रेत ।। ३
हे तर सदा कामाचे गुलाम जाणून । न केले मी तयांचे दशावर्णन ।
सिद्ध विरक्त मुनि योगी महान । तेही जाहले योगभ्रष्ट कामवश ।। ४
तपस्वी योगीश । कामवश जंव । पामरांची तंव । काय कथा ।
चराचर सृष्टी । दिसे नारीमय । पूर्वी ब्रह्ममय । देखियेली ।
अबला पाहती । जग नरमय । जग नारीमय । पुरुषास ।
कामाची करणी । दोन घडीभरी । ब्रह्मांडांतरी । राहियेली ।। १
न राहिले कोणी धैर्यवान । मदने जिंकिले सकलांचे मन ।
जयांचे करिती रघुवीर रक्षण । वाचले तेचि ते समयी ।। ८५
जाहला खेळ हा घडीचा दोन । तोच शंभूपाशी पोचला मदन ।
भीति तयाला शिवास बघून । आली मग पूर्वस्थिति जगी ।। १
सकल जीव सुखी जाहले त्वरित । जैसे मद जाता मदोन्मत्त ।
दुरोधर्ष[1] दुर्गम भगवंत । रुद्र पाहता भयभीत मदन ।। २
मागे फिरता लज्जा काज न होत । करी उपाय जाणून मरण निश्चित ।
रुचिर ऋतुराज प्रकटवी त्वरित । नव कुसुमित शोभे तरुराजी ।। ३
वन उपवन वापिका तडाग । परम सुशोभित दिशा विभाग ।
जेथे तेथे उचंबळे अनुराग । ते पाहून मृतमनीहि मदन जागा ।। ४
कामदेव जागा । मृतांच्या मनांत । वन सुशोभित । न वानवे ।
कामाग्नीचा मित्र । पवन सुगंध । शीतल सुमंद । वाहू लागे ।
विकसती सरी । कमळे विपुल । गुंजत मंजुळ । मधुकर ।
हंस शुक पिक । मधुर बोलती । अप्सरा करिती । नृत्यगान ।। १
कामदेव दावी कोटिकला । परि सेनेसह तो हारला ।
कामदेवाचा क्रोधाग्नि भडकला । जंव शिवाची अचल समाधि न भंगे ।। ८६
आम्रतरु सुंदर शाखा बघून । मनी संतप्त तयावरी चढला मदन ।
पुष्पचाप शरसंधान लावून । आकर्ण ताणले तयास ।। १

सोडिले शिव हृदयात पंचबाण । जागृत शिव समाधि भंग होऊन ।
क्षोभले विशेष ईश्वराचे मन । नेत्र उघडून बघती चौफेर ।। २
आम्रपल्लवी मदनास विलोकित । शिव क्रोधे संतप्त त्रैलोक्य कंपित ।
तृतीय नेत्र उघडता क्षणात । देखताच कामाप्रति तो जळून भस्म ।। ३
हाहाकार उडे जगात । असुर सुखी सुर भयभीत ।
भोगी कामसुखाची चिंता करीत । साधुयोगी जाहले निश्चित ।। ४
योगी निष्कंटक । मदननिधन । मूर्च्छित ऐकून । मदनस्त्री ।
करी ती आक्रोश । करुणा भाकीत । जाई ती त्वरित । शंभूपाशी ।
अति प्रेमे करी । विविध विनंती । सन्मुख उभी ती । कर जोडी ।
कृपाळु शंकर । शीघ्र तो प्रसन्न । अबला पाहून । शिव बोले ।। १
आता पतीचे नाव हे रती । राहील अनंग यापुढती ।
देहाविण व्यापेल सकला जगी । पतिमीलन प्रसंग ऐक आता ।। ८७
जंव यदुवंशी कृष्णावतार । होईल हरण्यास महीभार ।
कृष्णतनय होईल तव भ्रतार । जाण सत्य हे मम वचन ।। १
रति गेली शिववाणी ऐकून । आता दुजी कथा करितो वर्णन ।
ब्रह्मादि देव ऐकती वर्तमान । निघाले सकल ते वैकुंठाप्रती ।। २
सुरब्रह्माविष्णुसहित । जाती जेथे होते शिव कृपानिकेत ।
प्रशंसती तया पृथक पृथक । तव प्रसन्न होती शशिभूषण ।। ३
बोलती कृपासिंधु शंकर । का येणे जाहले कथावे हो सुर अमर ।
ब्रह्मा म्हणे हे अंतरज्ञानी महेश्वर । करितो विनंती भक्तिवशे ।। ४
हे शंकर सर्व देवांच्या हृदयात । परम उत्साह असे तात ।
निज नयने पाहू इच्छित । विवाह तुमचा महेश ।। ८८
हा उत्सव बघू नेत्र भरून । ऐसे काही करावे हे मदनमदमोचन ।
कामास जाळून दिले रतीस वरदान । अति भले केले कृपासिंधो ।। १
शासन करून मग कृपा दाविती । समर्थांचा हा सहज स्वभाव मानिती ।
करी अपार तप पार्वती । करावा स्वीकार तिचा हे नाथा ।। २
ब्रह्मावाणी ऐकून प्रभूची आज्ञा स्मरून । तथास्तु म्हणती शिव सुख मानून ।
जय सुरस्वामी सुर वदून । वर्षती सुमने दुंदुभी वाजविती ।। ३
अवसर जाणून सप्तर्षि येती । ब्रह्मा त्वरित गिरिगृही पाठविती ।
भवानीच्या भवनी प्रथम जाती । वदती मधुर विनोदी वाणीने ।। ४

तदा तू नारदाचा उपदेश मानून । अवमानिले आमुचे वचन ।
जाहला असत्य तव पण । महेशाने जाळिले मदनास ।। ८९
ऐकून बोलली हसून भवानी । उचित कथिले मुनिवर विज्ञानी ।
वदता तुम्ही मदना जाळिले म्हणुनी । शंभु होते का कामी आजवरी ।। १
शिव सदा योगी मी जाणत । अज अनिंद्य अभोगी कामरहित ।
केली मी शिवाची सेवा प्रेमासहित । कायावाचामने करून ।। २
ऐका तर माझा पण हे मुनीश्वर । कृपानिधी करितील सत्य सत्वर ।
कथिले तुम्ही कामास जाळी हर । ते तुमचे महान अज्ञान ।। ३
अग्नीचा स्वभाव विशिष्ट । हिम न कधी जाई तया निकट ।
जाता समीप निश्चित नष्ट । तोच न्याय महेशमदनासी ।। ४
प्रीति विश्वास तियेचा बघून । तिचे वचन ऐकून मुनि प्रसन्न ।
जाती भवानीस शिर नमवून । पोचती ते हिमाचलापाशी ।। ९०
सकल वृत्त गिरिपतीस सांगती । ऐकता मदनदहन दुःखी होती ।
मग रतिवरदान कथा कथिती । ऐकून हिमवंत बहुत सुखी ।। १
शंभूचा प्रभाव मनी जाणून । आदरे मुनिवरासी बोलावून ।
शुभदिन नक्षत्र वेळा शोधून । ठरविती वेदविधियुक्त लग्न शीघ्र ।। २
हिमाचल देई पत्रिका सप्तर्षीस । करीत विनंती धरून चरणास ।
जाऊन ती देती विधात्यास । वाचता प्रीति न मावे हृदयात ।। ३
ब्रह्मा सकला दाविती पत्रिका वाचून । तंव हर्षित सकल सुरमुनिगण ।
नभी वाद्ये वाजती पुष्पवृष्टि होऊन । शोभती मंगलकलश दशदिशी ।। ४
सजवू लागले सुरगण । तयांची विविध यानविमान ।
होती शुभद मंगल शकुन । गायन करिती अप्सरा ।। ९१
शिवगण करिती शिवशृंगार । जटामुकुटी सजविती अहिमौर ।
तनूस विभूति वस्त्र व्याघ्रांबर । घालिती कंकणकुंडले सर्पाची ।। १
ललाटी शशि शिरी गंगा सुंदर । भुजंग उपवीत तीन नेत्र ।
कंठी विष नररुंड माळ उरावर । अशिव वेष परि कृपाळु शिवधाम ।। २
शिवकरी त्रिशूळ डमरू शोभती । चालले चढून नंदीवर वाद्ये वाजती ।
शिवास पाहून सुरांगना हसती । वदती या वरा उचित वधु नसे जगी ।। ३
सुरसमूह विष्णुब्रह्मादी । वाहनी चढून वऱ्हाडी निघती ।
सुरसमाज अनुरूप अती । परि वरायोग्य वऱ्हाड नसे ।। ४

विष्णु बोलाविती दिक्पालांना । हसोनी ऐसे वदती तयांना ।
करावे विलग विलग निज दलांना । निज दलासमवेत चालावे ।। ९२
बंधुहो आमचे वऱ्हाड वरा न उचित । का हसे करावे जाऊन परनगरीत ।
मग होती विलग निजसेनेसहित । सुर हसून विष्णुवचन ऐकून ।। १
सस्मित मनोमनी महेश । हरि न त्यजती व्यंग वचनास ।
बोलावती सकला धाडून भृंगीस । ऐकून प्रिय वचन विष्णूचे ।। २
आले शिवाची आज्ञा ऐकून । प्रभुपदकमला करिती नमन ।
हसती शिव निजगणास पाहून । नाना वाहनी वेष नाना ।। ३
बहुमुखी कुणी कुणी मुखहीन । बहुकरपद कुणा कुणी पदकरांविण ।
अति धष्टपुष्ट कुणी कुणी तनुक्षीण । बहुनयनांचे कुणी नयनहीन कुणी ।। ४
पावन कुणी वा । कुणी अपावन । कुणी पुष्ट क्षीण । वेषधारी ।
कराल भूषण । नरमुंडधारी । रुधिरशरीरी । माखलेले ।
अगणित गण । श्वानसूकरांचे । खरशृगालांचे । मुख तया ।
नानाविध प्रेते । पिशाच्चयोग्यांची । जमतात साची । वानू कैसे ।। १
हर्षे नाचती गाती गीत । स्वैर वर्तने पिशाच्चभूत ।
दिसती ते अति विपरीत । बोलती भाषा बहु विचित्र ।। ९३
जैसे वऱ्हाड तैसाच सजला वर । चालती नाच तमाशे पथावर ।
इकडे हिमाचल शृंगारी मंडप विचित्र । विशाल अति हर्षित होऊन ।। १
जगी जितुके तितुके सकल शैल । वर्णनातीत ऐसे लघुविशाल ।
निमंत्रण तयांना धाडी हिमाचल । तैसे वनसागरसरितासर यांसी ।। २
स्वेच्छारूपी सुंदर तनुधारी । समाजासहित श्रेष्ठ नारी ।
जाती हिमवंताचे घरी । प्रेमे मंगल गीत गाती ।। ३
प्रथम सुशोभित करी गृहे गिरिवर । जाती तेथे तेथे योग्यतेनुसार ।
अवलोकून नगरीची शोभा सुंदर । ब्रह्माची कुशलता लघु भासे ।।
पाहून वाटते । सौंदर्य पुरीचे । नैपुण्य ब्रह्मचाचे । अति तुच्छ ।
वनबागकूप । तडाग सरिता । त्यांची सुंदरता । कैसी वानू ।
गृही गृही ध्वज । तोरणे मंगल । पताका विपुल । शोभतात ।
चतुर सुंदर । पुरुषवनिता । मोह मुनिचित्ता । पाहूनीया ।। १
जेथे स्वये जगदंबा अवतार । कैसे वानावे ते नगर ।
ऋद्धिसिद्धीसुखसंपत्तीचे आगर । नित नतन अधिकाधिक तेथे ।। ९४

जंव वऱ्हाड येई नगरानिकट। शोभा अधिक धांदल नगरीत।
नटन हिमगिरि स्वागता जात। आदरे नाना वाहने सजवून ॥ १
होती ते हर्षित पाहून सुरसमाजास। होती सुखी देखून विष्णूस।
जंव देखती शिवदलास। तयांची वाहने तंव उधळती भीतीने ॥ २
सुजाण वृद्ध धीर धरिती। बालके जीव घेऊन पळती।
भवनी जाऊन मातापित्यांसी पुशिती। भये कंपित तयांची तनू ॥ ३
काय वदावे काही न वदवे। ही यमसेना की वऱ्हाड म्हणावे।
वर वेडा तयाने नंदीवरी यावे। भूषणे तयाची व्यालकपालभस्म ॥ ४
तनूवरी भस्म। सर्पादि भूषण। जटाधारी नग्न। भयंकर।
संगे भूतप्रेत। योगिनि पिशाच्च। मुख भयानक। असुरांचे।
जिवंत राहील। वऱ्हाडी पाहून। खरा पुण्यवान। म्हणावा तो।
मग तो पाहील। पार्वतीचे लग्न। बालके लहान। सांगतात ॥ १
हा महेशाचा समाज जाणून। जननीजनक हसती मनापासून।
बालका बहुपरी सांगती समजावून। भीति त्यजून निर्भय व्हा ॥ ९५
व्याही करून स्वागत वऱ्हाडीजनांस आणिती। सकला सुंदर जानोसा देती।
सजवी मैना शुभ आरती। गाती संगे मंगल गीत नारी ॥ १
शोभे सुवर्ण तबक सुंदर हस्तांत। हराच्या औक्षणा निघाली हर्षित।
अबला विशेष भयभीत। जंव बघती भीषण रुद्रवेष ॥ २
अति भये पळून शिरती भवनात। जाती महेश जानोश्यात।
भयदुःख भारी मैनेच्या हृदयात। बोलावी जंव ती शैलजेस ॥ ३
अति प्रेमे तिज घेई अंकावर। येई नीलकमलनयनी नीर।
म्हणे विधाता देई तुज रूप सुंदर। का निर्मिला ऐसा बावळा वर मूढाने ॥ ४
देई ब्रह्मदेव। रूप ते सुंदर। तुजसाठी वर। बावळा का।
दिसावे जे फळ। कल्पतरुवरी। यावेच का तरी। बाभळीस।
पडू गिरीहून। जळू पावकात। उडी सागरात। तुजसवे।
येवो अपकीर्ती। जावो घरदार। लग्न न होणार। जितेपणी ॥ १
पाहून गिरीनारीसी दुःखित। अबला होती व्याकुळ बहुत।
मैना विलाप करी रडून वदत। स्मरून सुतेच्या स्नेहास ॥ ९६
नारदाचे मी वाईट न चिंतिले। का नांदते घर तयाने उजाडिले।
का उमेसी ऐसे उपदेशिले। जेणे मूढ वरास्तव करी तप ती ॥ १

सत्य हेच तया ना मोह ना माया । उदासीन न धन धाम ना जाया ।
परघरघातक न भयलाज तया । वांझ कैसी प्रसववेदना जाणे ।। २
भवानी जननीस व्यथित पाहून । बोले विवेके मृदु वचन ।
ब्रह्मलिखित अटळ जाणून । माते विचार करून सोड शोक ।। ३
बावळा नाथ ललाटी लेखिला । तरी दोष का द्यावा कवणाला ।
कैसी पुसशील तू दैवरेषेला । माते का घेसी कलंक वृथा ।। ४
का घेसी कलंका । माते सोडी शोक । विषादा उचित । नसे काळ ।
सुख आणि दुःख । लिखित भाळी जे । जाईन मी जेथे । मिळेल गे ।
श्रुत उमावाणी । विनीत कोमल । अबला सकल । अति दुःखी ।
ब्रह्मचासी दूषण । नानापरि देती । अश्रुंसी ढाळिती । नेत्रांतून ।। १
ते समयी नारदासहित । तैसेच सप्तर्षि समवेत ।
जाई निजभवनी त्वरित । हिमाचल समाचार ऐकून ।। १७
तव नारद कथिती पूर्व कहाणी । सकला सांगती समजावुनी ।
मैना ऐक मम सत्य वाणी । तव सुता भवानी जगज्जननी ।। १
अजा अनादिशक्ति अविनाशिनी । सदा शंभुअर्धांगनिवासिनी ।
जग संभवपालनलयकारिणी । धारण करी स्वेच्छे लीलावपू ।। २
दक्षगृही प्रथम जन्मा जाई । तनु सुंदर पिता सती नाम देई ।
मग सतीचा शंकरासी विवाह होई । कथा प्रसिद्ध ही जगात ।। ३
एकदा सती शिवसंगे जाता । देखे रघुकुलकमलसविता ।
न मानी शिववचना मोह होता । घेतला सीतावेष भ्रमवशे ।। ४
घेताच पाहून । सीतावेष सती । शंकर त्यजती । दोषास्तव ।
हराच्या विरहे । पितृगृही गेली । योगाग्नीत जाळी । निजतनू ।
तव गृही जन्म । तप करी घोर । आवडीचा वर । मिळावया ।
संशय सोडावा । तुम्ही हे जाणोनी । सर्वदा भवानी । शिवप्रिया ।। १
जव ऐसे वदती नारद । तव मिटला सर्वांचा विषाद ।
वार्ता पसरली क्षणात । नगरीत सकला घरोघरी ।। १८
तव मैना हिमवंत आनंदित । वारंवार वंदिती पार्वतीचे पद ।
सकल नगरवासी हर्षित । शिशुपुरुषस्त्रीयुवावृद्ध ।। १
सजवती नाना कनककलशांस । करू लागती मंगल गानास ।
अनुसरून सूपशास्त्र रीतीस । करिती खाद्यपेये नानाविध ।। २

स्वये माताभवानीचे भवन । कोण वर्णील ते साहित्यभोजन ।
आदरे वऱ्हाडियांसी देती आमंत्रण । विष्णुब्रह्मादि देव सकल जातीचे ।। ३
भोजनास विविध पंक्ती बैसती । चतुर वाढपी वाढू लागती ।
सुरांसी जेवता नारी बघती । घालती उखाणे मृदुवचने ।। ४
मंजुळ स्वराने । उखाणे घालती । वचन बोलती । व्यंगपूर्ण ।
देव सावकाश । भोजन करिती । विनोद ऐकती । मोदभरे ।
भोजनसमयी । जन सुखावती । मुखांनीहि कोटी । न वानवे ।
आचवून होता । तांबूल अर्पिती । जन स्थानी जाती । जानोश्यात ।। १
मग मुनि येऊन हिमवंता । वाचून दाखविती लग्नपत्रिका ।
बोलावणे धाडिती देवदेवता । विवाहसमय विलोकून ।। ९९
देवगणांस आदरे बोलाविती । सर्वांस यथोचित आसने देती ।
वेदविधिपूर्ण वेदी सजविती । नारी गाती गीते शुभदमंगल ।। १
अति दिव्य सुशोभन सिंहासन । ब्रह्मारचित न करवे वर्णन ।
बैसती शिव विप्रांस वंदून । स्मरती हृदयी प्रभुराम ।। २
मग मुनीश्वर बोलाविती उमेसी । सखी शृंगारून आणती तिजसी ।
सुर मोहित पाहून रूपासी । लावण्य वर्णवे ते ऐसा जगीं कोण कवी ।। ३
जाणून जगदंबा शिवभामा । सुरमुनी करिती प्रणामा ।
भवानी सौंदर्याची सीमा । कोटि मुखासी शोभा न वर्णवे ।। ४
कोटि मुखांसीही । वर्णन अशक्य । ऐसे ते लावण्य । जननीचे ।
लज्जित शारदा । तैसे शेष श्रुती । कोठे मंदमती । तुलसी हा ।
लावण्याची खाण । माता भवानी ती । गेली शिवाप्रती । मंडपात ।
संकोचे न पाही । पतीचे चरण । भृंगापरि मन । रमे तेथे ।। १
मुनींची आज्ञा मानुनी । पूजिती गणेशास शंभुभवानी ।
न घ्यावी शंका ऐकून मनी । देव जाणावे अनादी ।। १००
जैशी वेदोक्त विवाहाची रीती । तैसीच महामुनि अनुसरती ।
कन्येचा हस्तकुश गिरीराज धरिती । भवानी जाणून समर्पिती भवा । १
पाणिग्रहण जंव करिती महेश । हर्षित होती तंव सुरसुरेश ।
मुनि करिती वेदमंत्रघोष । जय जय शंकर वदती सुर ।। २
वाद्ये वाजती विविध विधान । होई नानाविध पुष्पवृष्टि नभातून ।
जाहले हर गिरिजेचे लग्न । आनंद ओसंडे ब्रह्मांडी ।। ३

दासीदास अश्व रथ हत्ती । धेनु रत्न वस्त्र विपुल अती ।
अन्न कनकपात्रे यानांत चढविती । आंदण वस्तूंचें वर्णन न करवे ॥ ४
दिधली देणगी । मग जोडी कर । वदतो भूधर । नम्रवाणी ।
अर्पावे काय मी । पूर्णकाम हर । धरिले अखेर । शिवपदा ।
कृपेचे सागर । दयाळू महेश । श्वशुरा संतोष । देती तदा ।
शिवपदपद्मा । धरून मैनेने । प्रेमपूर्ण मने । वदली ती ॥ १
प्राणाहून प्रिय माझी उमा । गृहकिंकरी होऊन करील गृहकामा ।
करावी अता अपराधाची क्षमा । प्रसन्न होऊन वर द्यावा । १०१
शंभु समजाविती सासूस । मग गेली भवनी नमून शिवपदांस ।
बोलावून घेई जननी उमेस । बैसवून अंकी बोध करी ॥ १
करावी सदा शंकरपदपूजा । यापरता नारीधर्म न दुजा ।
आलिंगून हृदयी प्रिय गिरिजा । वदता लोचने येती भरून ॥ २
का विधि निर्मी नारी जगात । पराधीन न सुखी स्वप्नात ।
अति प्रेमे माता विव्हळ होत । अनुचित समय जाणून धीर धरी ॥ ३
वारंवार भेटे पडे पदांवरी । परम प्रेम कैसे वर्णावे तरी ।
भवानी मातेसी हृदयी धरी । भेटून सकल नारींसी ॥ ४
पुन्हा ती मातेसी । निघाली भेटून । देती सर्व जन । आशीर्वाद ।
घडी घडी पाही । वळून मातेला । सखी नेती तिला । शिवापाशी ।
शंकर याचका । करिती संतुष्ट । उमासमवेत । गृही जाती ।
वर्षती सुमने । अमर हर्षित । दुंदुभी नभात । दुमदुमे ॥ १
तव हिमवंत जाती । पोचविण्यास शिवा प्रेमेअती ।
वृषकेतु तयांचे सांत्वन करिती । निरोप देती तयास ॥ १०२
आले गिरिराज सत्वर भवनी । सकल शैल सरोवरास बोलावुनी ।
आदरे दान बहुमान देउनी । बोळविले सकलांसी हिमवंते ॥ १
जंव शंभु आले कैलासास । तंव सुर गेले निज लोकांस ।
जगन्मातापिता भवानीमहेश । यास्तव तुलसी न वानी शृंगारा ॥ २
विविध भोगविलास उमाशंभु करिती । गणांसमवेत कैलासी वसती ।
हरगिरिजा नित्य नवे विहार करिती । ऐसा गेला विपुल काळ ॥ ३
तव जन्मला षड्वदन कुमार । मारिला तयाने रणी तारकासुर ।
षण्मुख जन्मकथा प्रसिद्ध फार । लोकी पुराणी निगमागमी ॥ ४

षण्मुखमहिमा । महापराक्रम । तैसे कर्मजन्म । जगा ज्ञात ।
याची हेतुस्तव । कार्तिकचरित । संक्षेपे कथित । म्हणे कवी ।
उमाशंभुलग्न । कथा जे गातात । वा जे कथितात । नरनारी ।
शुभद कार्यात । मंगल लग्नात । सदा पावतात । बहु सुख ॥ १
सिंधुसम अपार गिरिजारमणचरित । वेदांसही तयाचा पार न लागत ।
अज्ञानी पामर अतिमंद । तुलसीदास कैसे वर्णील ॥ १०३
रसाळ शंभुचरित्र ऐकुनी । अति सुखी होती भारद्वाज मुनी ।
लालसा वाटे कथाश्रवणी । नेत्रांत नीर रोमावली तनूवरी ॥ १
प्रेमवशे मुखे न शब्द निघती । दशा पाहून मुनी हर्षित होती ।
हे मुनीश तुमचा जन्म धन्य म्हणती । गौरीश तुम्हा प्राणप्रिय ॥ २
जयास शिवपदकमली न रती । स्वप्नीही ते रामास न रुचती ।
विश्वनाथपदी शुद्ध भक्ती । हेच लक्षण रामभक्ताचे ॥ ३
शिवासम कोण रघुपतीचा व्रतधारी । सोडिती सतीसम निष्पाप नारी ।
प्रतिज्ञापूर्वक रामभक्ति दृढ करी । ऐसा शिवासम कोण प्रिय रामास ॥ ४
मी शिवचरित्र सांगून प्रथम । जाणिले तुमचे मर्म ।
तुम्ही रामभक्त पावन परम । सकल विकाररहित दोषहीन ॥ १०४
मी जाणिले तुमच्या गुणशीला । कथितो ऐका अता रामलीला ।
हे मुनि तुमचा समागम आज घडला । न वर्णवे मज मनांतील सुख ॥ १
अति अपार हे मुनीश रामचरित । वर्णू न शकती शेष कोटि शत ।
तथापि मी वर्णितो यथाश्रुत । स्मरून गिरापति धनुर्धारी प्रभू ॥ २
शारदा कठपुतळी समान । अंतरज्ञानी राम सूत्रधार जाण ।
जयावरी तो कृपा करील भक्त जाणून । त्या कविउरअंगणी वाणीस नाचवील ॥ ३
प्रणाम करितो त्या कृपाळु रघुनाथास । वानितो तयाचे शुद्ध गुणगाथेस ।
परम रम्य गिरिवर कैलास । जेथे उमाशिवनिवास सदा ॥ ४
तपस्वी मुनिवृंद सुर । सिद्ध योगीजन किन्नर ।
हे पुण्यात्मे राहती कैलासावर । सेविती शिवास सुखकंद ॥ १०५
जे हरिहरांसी विन्मुख जया न धर्मरती । ते नर स्वप्नीही तेथे न जाती ।
गिरीवर वटवृक्ष विशाल अती । नित नूतन सुदर सर्व काळ ॥ १
त्रिविध समीर छाया शीतळ अती । ते शिवविश्राम स्थळ श्रुती गाती ।
एकदा तरुतळी प्रभु जाती । तरु विलोकिता हृदयी आनंद ॥ २

दासीदास अश्व रथ हत्ती । धेनु रत्न वस्त्र विपुल अती ।
अन्न कनकपात्रे यानांत चढविती । आंदण वस्तूंचें वर्णन न करवे ।। ४
दिधली देणगी । मग जोडी कर । वदतो भूधर । नम्रवाणी ।
अर्पावे काय मी । पूर्णकाम हर । धरिले अखेर । शिवपदा ।
कृपेचे सागर । दयाळू महेश । श्वशुरा संतोष । देती तदा ।
शिवपदपद्मा । धरून मैनेने । प्रेमपूर्ण मने । वदली ती ।। १
प्राणाहून प्रिय माझी उमा । गृहकिंकरी होऊन करील गृहकामा ।
करावी अता अपराधाची क्षमा । प्रसन्न होऊन वर द्यावा । १०१
शंभु समजाविती सासूस । मग गेली भवनी नमून शिवपदांस ।
बोलावून घेई जननी उमेस । बैसवून अंकी बोध करी ।। १
करावी सदा शंकरपदपूजा । यापरता नारीधर्म न दुजा ।
आलिंगून हृदयी प्रिय गिरिजा । वदता लोचने येती भरून ।। २
का विधि निर्मी नारी जगात । पराधीन न सुखी स्वप्नात ।
अति प्रेमे माता विव्हळ होत । अनुचित समय जाणून धीर धरी ।। ३
वारंवार भेटे पडे पदांवरी । परम प्रेम कैसे वर्णावे तरी ।
भवानी मातेसी हृदयी धरी । भेटून सकल नारींसी ।। ४
पुन्हा ती मातेसी । निघाली भेटून । देती सर्व जन । आशीर्वाद ।
घडी घडी पाही । वळून मातेला । सखी नेती तिला । शिवापाशी ।
शंकर याचका । करिती संतुष्ट । उमासमवेत । गृही जाती ।
वर्षती सुमने । अमर हर्षित । दुंदुभी नभात । दुमदुमे ।। १
तव हिमवंत जाती । पोचविण्यास शिवा प्रेमेअती ।
वृषकेतु तयांचे सांत्वन करिती । निरोप देती तयास ।। १०२
आले गिरिराज सत्वर भवनी । सकल शैल सरोवरास बोलावुनी ।
आदरे दान बहुमान देउनी । बोळविले सकलांसी हिमवंते ।। १
जंव शंभु आले कैलासास । तंव सुर गेले निज लोकांस ।
जगन्मातापिता भवानीमहेश । यास्तव तुलसी न वानी शृंगारा ।। २
विविध भोगविलास उमाशंभु करिती । गणांसमवेत कैलासी वसती ।
हरगिरिजा नित्य नवे विहार करिती । ऐसा गेला विपुल काळ ।। ३
तव जन्मला षड्वदन कुमार । मारिला तयाने रणी तारकासुर ।
षण्मुख जन्मकथा प्रसिद्ध फार । लोकी पुराणी निगमागमी ।। ४

षण्मुखमहिमा । महापराक्रम । तैसे कर्मजन्म । जगा ज्ञात ।
याची हेतुस्तव । कार्तिकचरित । संक्षेपे कथित । म्हणे कवी ।
उमाशंभुलग्न । कथा जे गातात । वा जे कथितात । नरनारी ।
शुभद कार्यात । मंगल लग्नात । सदा पावतात । बहु सुख ॥ १
सिंधुसम अपार गिरिजारमणचरित । वेदांसही तयाचा पार न लागत ।
अज्ञानी पामर अतिमंद । तुलसीदास कैसे वर्णील ॥ १०३
रसाळ शंभुचरित्र ऐकुनी । अति सुखी होती भारद्वाज मुनी ।
लालसा वाटे कथाश्रवणी । नेत्रांत नीर रोमावली तनूवरी ॥ १
प्रेमवशे मुखे न शब्द निघती । दशा पाहून मुनी हर्षित होती ।
हे मुनीश तुमचा जन्म धन्य म्हणती । गौरीश तुम्हा प्राणप्रिय ॥ २
जयास शिवपदकमली न रती । स्वप्नीही ते रामास न रुचती ।
विश्वनाथपदी शुद्ध भक्ती । हेच लक्षण रामभक्ताचे ॥ ३
शिवासम कोण रघुपतीचा व्रतधारी । सोडिती सतीसम निष्पाप नारी ।
प्रतिज्ञापूर्वक रामभक्ति दृढ करी । ऐसा शिवासम कोण प्रिय रामास ॥ ४
मी शिवचरित्र सांगून प्रथम । जाणिले तुमचे मर्म ।
तुम्ही रामभक्त पावन परम । सकल विकाररहित दोषहीन ॥ १०४
मी जाणिले तुमच्या गुणशीला । कथितो ऐका अता रामलीला ।
हे मुनि तुमचा समागम आज घडला । न वर्णवे मज मनांतील सुख ॥ १
अति अपार हे मुनीश रामचरित । वर्णू न शकती शेष कोटि शत ।
तथापि मी वर्णितो यथाश्रुत । स्मरून गिरापति धनुर्धारी प्रभू ॥ २
शारदा कठपुतळी समान । अंतरज्ञानी राम सूत्रधार जाण ।
जयावरी तो कृपा करील भक्त जाणून । त्या कविउरअंगणी वाणीस नाचवील ॥ ३
प्रणाम करितो त्या कृपाळु रघुनाथास । वानितो तयाचे शुद्ध गुणगाथेस ।
परम रम्य गिरिवर कैलास । जेथे उमाशिवनिवास सदा ॥ ४
तपस्वी मुनिवृंद सुर । सिद्ध योगीजन किन्नर ।
हे पुण्यात्मे राहती कैलासावर । सेविती शिवास सुखकद ॥ १०५
जे हरिहरांसी विन्मुख जया न धर्मरती । ते नर स्वप्नीही तेथे न जाती ।
गिरीवर वटवृक्ष विशाल अती । नित नूतन सुदर सर्व काळ ॥ १
त्रिविध समीर छाया शीतळ अती । ते शिवविश्राम स्थळ श्रुती गाती ।
एकदा तरुतळी प्रभु जाती । तरु विलोकिता हृदयी आनंद ॥ २

निजकरे पसरती व्याघ्रांबर । शंभु सहज बैसती तयावर ।
कुंदइंदुदरसम गौर शरीर । मुनिवस्त्रधारी दीर्घ बाहू ।। ३
चरण तरुणअरुणअंबुजसम । नखद्युति हरिते भक्तहृदयतम ।
त्रिपुरारीची भूषणे भुजंग भस्म । आनन लाजवी शरच्चंद्रछबीस ।। ४
जटामुकुट सुरगंगा शिरावर । नलिनीसम नेत्र विशाल सुंदर ।
नीलकंठ लावण्यभांडार । भाळी शोभे बालचंद्र ।। १०६
शोभती कैसे बैसलेले कामारी । जणू शांतरस तनुधारी ।
पार्वती उत्तम समय जाणून अंतरी । माता भवानी गेली शंभुपाशी ।। १
जाणून प्रिया करिती आदर । वामभागी आसन देती तिज हर ।
पूर्वजन्मकथा चित्तात विचार । हर्षे बैसताच शिवासमीप ।। २
पतीचे हृदयी अधिक प्रेम जाणून । बोले प्रियवाणी उमा हसून ।
जी कथा साधेल लोककल्याण । पुसू इच्छिते शैलकुमारी ती ।। ३
हे त्रिपुरारी विश्वनाथ मम नाथ । तुमचा महिमा त्रिभुवनास विदित ।
सकल पदपंकजाची सेवा करीत । चराचर नागनरदेव ।। ४
प्रभु समर्थ सर्वज्ञ महेश्वर । सकल कलागुणांचे आगर ।
योगज्ञान वैराग्याचे भांडार । शरणागतासी नाम कल्पतरुसम ।। १०७
जरी मजवरी प्रसन्न हे सुखराशी । जाणता सत्य मज निज दासी ।
प्रभो करावे दूर मम अज्ञानासी । नानाविध रामकथा वर्णून ।। १
कल्पतरुतळी जयाचें भवन । का साहील दारिद्र्यदुःख तो दीन ।
करून ऐसा विचार हे शशिभूषण । दूर करा मम मतिभ्रम ।। २
प्रभो जे मुनी परमार्थवादी । रामासी म्हणती ब्रह्म अनादी ।
शेष शारदा पुराण वेद आदी । करिती गुणगान रघुपतीचे ।। ३
जपता तुम्ही दिनरात्र रामनाम । हे कामारि कोण कोठला सांगा तो राम ।
हा अगुण अलक्ष्य परमधाम । की अयोध्यानृपाचा सुत राम ।। ४
कैसा ब्रह्म जर तो नृपाचा सुत । स्त्रीविरहे का मति भ्रांत ।
महिमा ऐकून बघून हे चरित । होई भ्रम मम बुद्धीसी ।। १०८
कोण अन्य व्यापक ब्रह्म इच्छारहित । सांगा मज समजावून हे नाथ ।
अज्ञ जाणून न धरावा क्रोध मनात । वदावे जेणे मिटेल मोह मम ।। १
देखिली रामाची प्रभुता मी वनात । न कथिली तुम्हा मी अति भयभीत ।
मम मलिन मनास न बोध होत । मी भोगले तयाचे फळ योग्य । २

मम मनी संदेह अल्प अजुनी । कृपा करा विनविते कर जोडुनी ।
बहु बोध केला तदा प्रभूंनी । नाथ न धरावा क्रोध जाणून हे । ३
तैसा विमोह नाही मज आता । रुचते मम मना रामकथा ।
सांगा पुनीत रामगुणगाथा । शेषनागभूषणा सुरनाथा ।। ४
वंदिते पदा महीवर टेकून शिर । विनविते तुम्हा जोडून कर ।
श्रुतिसिद्धान्तांचे मंथुनी सार । वर्णावे निर्मल रघुवीरयश ।। १०९
नारी म्हणून न योग्य अधिकारासी । कायावाचामने मी तुमची दासी ।
साधु न लपविती गूढ तत्त्वासी । जंव पावती अधिकार आर्तभक्त । १
अति आर्तभावे पुसते सुरराया । निवेदा रामकथा दावून दया ।
निर्गुण ब्रह्म सगुण रूप धराया । का वांछी सांगा चिंतून हे ।। २
प्रभु मग सांगा रामावतार । तैसेच बालचरित्र उदार ।
कथावे जानकीविवाह कैसा प्रकार । सोडिले राज्य रामाने दोष कुणाचा ।। ३
केले अपार चरित्र वनी राहून । वदा नाथा कैसा वधिला रावण ।
केली बहुलीला राज्यावर बैसून । सांगा सकल हे शंकर सुखशील ।। ४
हे कृपाधाम वदा मजसी । कैसे राम दाविती अद्‌भुत चरित्रासी ।
कैसे गेले निजधामासी । प्रजेसह रघुवंशमणी ।। ११०
प्रभो मज सांगा तत्त्व समजावून । जयात ज्ञानी-विज्ञानी मुनि मग्न ।
भक्ति विरक्ति ज्ञान विज्ञान । वर्णावे सकल विभागांसह ।। १
अनेक रहस्ये रामकथेत । विमल विवेके तुम्ही निवेदा नाथ ।
दयाळा न राखावे काही गुप्त । हे प्रभो मी न पुसले जे ।। २
तुम्ही त्रिभुवनस्वामी गुरुवेद वर्णिती । अन्य क्षुद्र जीव कैसे रहस्य जाणती ।
शिवाच्या मनास प्रश्न रुचले अती । सहज सरळ सुंदर उमेचे ।। ३
हराच्या हृदयी आले रामचरित्र । नेत्री भरले जळ प्रेमे तनु पुलकित ।
आले रघुनाथरूप हृदयात । जेणे परमानंद शिवासी अपार सुख ।। ४
दोन घटिका मग्न ध्यानानंदरसात । मग शिव मनासी करिती जागृत ।
तव महेश रघुपतिचरित । वानू लागले हर्षाने ।। १११
मिथ्या भासे सत्य ज्ञानाविण । जैसा भुजंगभ्रम रज्जू पाहून ।
जग मिथ्या भासे होता ज्ञान । जैसे जागृत होता जाई स्वप्नभ्रम ।। १
वंदितो तोच बाळरूप राम । सिद्धी सुलभ जपता जयाचे नाम ।
अमंगलहारी मंगलधाम । कृपा करो दशरथ अंगणविहारी तो ।। २

रामासी त्रिपुरारि प्रणाम करिती । हर्षे सुधासम वाणी उच्चारिती ।
धन्य धन्य गिरिराजकुमारी पार्वती । तुजसम उपकारी नसे कोणी ।। ३
पुससी रघुपतिकथाप्रसंग । गंगेसम पावन करी तो सकल जग ।
रघुनाथचरणी दाविसी अनुराग । केला प्रश्न तू जगहिता ।। ४
रामकृपेने हे पार्वती । तव मनी वा स्वप्नी न येती ।
शोकमोहसंदेहभ्रम आदी । कोणतेही विकार मज वाटे ।। ११२
म्हणोनी शंका तीच घेतलीस । कथिता ऐकता जी हितकर सर्वांस ।
जयांनी कानी न ऐकिले हरिकथेस । सर्पबिळासम ती श्रवणछिद्रे ।। १
जयांनी न घेतले संतांचे दर्शन । मोरपंखनेत्रासम तयांचे लोचन ।
ते शिर कटु कद्दूसमान । हरिगुरुपदासी न नमिते जे ।। २
जयांच्या हृदयी हरिभक्तीस नसे स्थान । ते जिवंत प्राणी प्रेतासमान ।
जी जिव्हा न करी रामगुणगान । ती भासे दर्दुरजिव्हेसम ।। ३
वज्रकठोर निष्ठुर ती छाती । हरिचरित्र ऐकता न हर्षे जी ।
ऐक गिरिजा लीला रामाची । जी देवहितकारी परि मोहवी दैत्यांसी ।। ४
रामकथा सुरधेनुसमान । तिज सेविता करी ती सुखदान ।
संतसमाज हा सुरलोक जाणून । कोण न ऐकेल ही रामकथा ।। ११३
रामकथा करटाळी सुंदर । संशयविहंगा उडवी दूर ।
रामकथा कलिवृक्षासी कुठार । ऐक आदरे ती गिरिराजकुमारी ।। १
सुंदर रामनाम गुणचरित । जन्मकर्म अगणित श्रुति गात ।
जैसे राम भगवान अनंत । तैसे अनंत कीर्तिकथागुण ।। २
उमे तव रामप्रीति पाहून । यथाश्रुत यथामति कथा कथीन ।
सहज सुंदर पार्वती तव प्रश्न । सुखद संतसंमत प्रिय मजसी ३
परि एक शंका मज न रुचली । जरी मोहवशे हे भवानी तू कथिली ।
हा राम अन्य कुणी तू वदली । जयासी श्रुति गाती ध्याती मुनी ।। ४
अधम नर या परि ऐकती कथिती । जयास मोहपिशाच्च ग्रासती ।
ते सत्य असत्य न जाणती । पाखंडी हरिपदविन्मुख ।। ११४
मूढ अंध अभागी अज्ञानी । विषयमळ जयांच्या मनदर्पणी ।
न देखिली संतसभा स्वप्नी तयांनी । ऐसे हे लंपट कुटिल कपटी ।। १
जो वदे वेदअसंमत वाणी । जो न जाणे निज लाभहानी ।
मनमुकुर मलिन नयनावाचुनी । कैसा दीन तो पाहील रामरूप ।। २

जयांस न निर्गुणसगुणविवेक । जे बरळती कल्पित वचन अनेक ।
तयांची बडबड न वाटे अघटित । हरिमायावशे ते भ्रमती जगी । ३
जे वातरोगी मद्याने उन्मत्त भूतवश । ते न बोलती शुद्धीत वचनास ।
जयांनी केले महामोहमदपानास । न ऐकावे तयांचे प्रलाप ।। ४
ऐसा हृदयी विचार करून । टाकून संशय भजावे रामचरण ।
हे गिरिराजकुमारी ऐक मम वचन । जे भ्रमतमासी रविकिरणांसम ।। ११५
सगुणनिर्गुणरूपी न भेद । गाती मुनि पुराण पंडित वेद ।
अज अरूप निर्गुण अव्यक्त । तोच भक्तप्रेमवशे सगुण होई ।। १
कैसे ते सगुण जे गुणरहित । जैसे जळ हिमगार न विलग ।
तया ठायी कैसा मोहप्रसंग । जयाचे नाम भ्रमतिमिरास सूर्य ।। २
राम सच्चिदानंद दिनेश । न तेथे मोहनिशा लवलेश ।
सहज प्रकाशरूप भगवान ईश । नसे तेथे विज्ञानरूप प्रातःकाळ ।। ३
जीवाचे धर्म हर्ष विषाद ज्ञान । अज्ञान अहंता अभिमान ।
परि राम परमानंद परेश पुराण । ब्रह्मव्यापक जग जाणे ।। ४
पुराणपुरुष प्रसिद्ध प्रकाशनिधान । प्रकट माया जीव जगाचे स्वामी जाण ।
तेच मम स्वामी रघुकुलभूषण । ऐसे वदून नमविती माथा उमेश ।। ११६
निज भ्रम न जाणे पुरुष अज्ञानी । प्रभूसी मोह म्हणती मूढ प्राणी ।
जैसे घनपटल दिसता गगनी । लपला भानु ऐसे अविचारी वदे ।। १
जो अंगुली घाली लोचनात । तया दिसती शशि दोन प्रकट ।
जैसे नभ तमधूमधूळीने शोभत । तैसाच मोह उभे रामाचे विषयी ।। २
विषयइंद्रियदेवता जीवासहित । परस्पर सहाय्याने करिती सचेत ।
या सकलांचा जो परम प्रकाशक । तोच राम अनादि अयोध्यापती ।। ३
हे जगत् प्रकाश्य प्रकाशक राम । मायेचा स्वामी ज्ञानगुणधाम ।
मोहासी सहाय्य लाभे जयाच्या सत्ते परम । तंव भासे जडमाया सत्य अशी ।।४
शिंपलीत भास होई चांदीचा । तैसा सूर्यकिरणी जळाचा ।
भ्रम न दूर करू शके कोणी यांचा । यद्यपि ही मृषा प्रचीति त्रिकाळी ।। ११७
यापरि जग हे हरिआश्रित । जरी असत्य भासे दुःखद ।
शिर कापिले कुणी जरी स्वप्नात । जागृतिविना न दुःख दूर ।। १
जयाच्या कृपे मिटतो भ्रम । गिरिजे तोच हा कृपाळु श्रीराम ।
यथामति गाती निगमागम । न जाणिला कुणी तयाचा आदिअंत ।। २

पायावाचून चाले ऐके कानाविण । नाना कर्मे करी हातावाचून ।
भोगी सकल रस नसता आनन । महान वक्ता वाणीविना ।। ३
तनूवाचून स्पर्श पाही विनानयन । नासिकाविण करी सुवास ग्रहण ।
जयाचा महिमा न करवे वर्णन । ब्रह्माकरणी ऐसी अलौकिक ।। ४
जयास वेदबुध ऐसे वानिती । मुनिवर जयाचे ध्यान करिती ।
तोच दशरथसुत अयोध्यापती । भक्तहितरत भगवंत ।। ११८
प्राणी मरताना पाहून काशीत । जयाच्या नामबळे मी करितो शोकमुक्त ।
तोच प्रभू माझा रघुनाथ । चराचर स्वामी हृदयअंतरज्ञानी ।। १
विना इच्छा जंव नर नाम घेती । तंव अनेक जन्मकृत पापे जळती ।
जे नर आदरे स्मरण करिती । ते भवसिंधु तरती गोपदापरी ।। २
तोच राम परमात्मा हे भवानी । तयास भ्रम तव अनुचित ही वाणी ।
ऐसा संशय येताच मनी । ज्ञानवैराग्यगुण सकल नष्ट होती ।। ३
शिवाची भ्रमनाशक वाणी ऐकुनी । कुतर्काची रचना गेली मिटुनी ।
प्रीतिप्रचीती आली रघुपतिचरणी । मिथ्या दारुण भावना जाहल्या नष्ट ।। ४
प्रभूचे पदकमल धरी वारंवार । जोडन निज कमलासम कर ।
बोलली गिरिजा वचन सुंदर । जणु प्रेमरसाने परिपूर्ण ।। ११९
शशिकरसम शीतल वाणी ऐकून । शरदआतपरूपी मोह गेला मिटून ।
हे कृपाळू केले मम संशयाचे निरसन । यथार्थ रूप जाणिले मी रामाचे ।। १
कृपा तुमची नाथा घालवी विषादा । जाहले सुखी प्रभूचा प्रसाद पावता ।
आपुली किंकरी मज मानावे आता । जरी नारीस्वभावे मी मूढ अज्ञानी ।। २
राम ब्रह्म चिन्मय अविनाशी । सर्वरहित सर्वहृदयपुरवासी ।
प्रथमची पुशिले ते सांगा मजसी । जर प्रभु प्रसन्न मजवरती ।। ३
नाथा नरतनु घेतली हेतु कवण । हे वृषकेतु सांगा मज समजावून ।
परमनम्र उमेचे वचन ऐकून । रामकथेवरील प्रीति पुनीत ।। ४
तंव कामारि सहज सुजाण । मनी तोषले शंकर कृपानिधान ।
बहुपरि उमेसी प्रशंसून । पुनरपि वदती तिजसी ।। १२० (क)
भवानी ऐक आता शुभकथेस । विमल रामचरितमानस ।
काकभुशुंडि कथिती गरुडास । विहंगनायक तो श्रवण करी ।। १२० (ख)
कैसा घडला संवाद उदार पावन । मग पुढे तो तुज कथीन ।
रामावतार तूं आता करी श्रवण । पवित्र परम सुंदर ।। १२० (ग)

हरीचे गुणनाम अपार अमित । तयाचे रूप तैशा कथा अगणित ।
हे उमे तू आदरे ऐक । कथितो मी यथामती ॥ १२० (घ)
ऐक गिरिजे हरीचे चरित्र सुंदर । निगमागम गाती विशुद्ध मनोहर ।
कवण कारणे घडला हरीचा अवतार । ते इदमित्थं न सांगू शके ॥ १
राम अतर्क्य बुद्धिमनवाणीसी । हे सुजाण मम मत कथितो तुजसी ।
सांगती यथामति सकलांसी । जे वेदपुराणसंतमुनी ॥ २
कथितो तेच कारण सुमुखी तुजसी । जे कारण दिसे मम बुद्धीसी ।
जंव जंव ग्लानि येई धर्मासी । माजती असुर अधम अभिमानी ॥ ३
न वर्णवे ऐसी अनीति करिती । विप्रसुरधेनुधरणीसी पीडती ।
तंव तंव प्रभु विविध तनु धरिती । सज्जनाची पीडा हरिती कृपानिधी ॥ ४
असुरा मारून सुरांस स्थापिती । निज वेदाची मर्यादा रक्षती ।
जगी यश निर्मल विस्तारिती । हाच हेतु असे रामजन्माचा ॥ १२१
तेच यश गाऊन भक्त भव तरती । कृपासिंधु भक्तहितास्तव तनु घेती ।
रामजन्माचे हेतु अनेक असती । अति विचित्र एकाहून एक । १
जन्म एक दोन करितो वर्णन । हे सुमति भवानी ऐक चित्ते सावधान ।
द्वारपाल हरीचे प्रिय दोन । जयविजय यास जाणती सकल ॥ २
विप्रशाप मिळे उभय बंधूंस । देहे जाहले असुर तामस ।
हिरण्यकश्यपु हिरण्याक्ष । हरती इंद्राचा मद जगास विदित ॥ ३
ते विजयी वीर विख्यात रणी । वधिले एकास वराहरूप धरूनी ।
दुसरा वधिला देवे नृसिंह होउनी । भक्त प्रल्हादाचे यश विस्तारिले ॥ ४
जाहले तेच उभय पुन्हा निशाचर । अति पराक्रमी महावीर ।
रावणकुंभकर्ण बलवान थोर । सुरांस जिंकिती विदीत जगा ॥ १२२
विप्रशाप बाधे जन्म तीन । न मुक्त जरी वधितो भगवान ।
पुनरपि साधण्या तयांचे कल्याण । धरिती शरीर प्रभु भक्तप्रेमी ॥ १
तदा मातापिता कश्यप अदिती । विख्यात दशरथ कौसल्या नामे जगी ते ।
संसारी पावन चरित्रास दाविती । अवतार ऐसा घेऊन एक कल्प ॥ २
एक कल्पी पाहिले दुःखित सुर । जिंकी तयांस रणी जलंधर ।
जरी शंभु करिती संग्राम घोर । दैत्य महाबळी न मरे मारून ॥ ३
परम सती असुराधिपाची नारी । तिच्या प्रतापबळे न जिंकी तया त्रिपुरारी । ४

कपटे भंगती तिचे व्रत। ऐसे सुरकाज प्रभु साधित।
तंव ती कोपे प्रभूस शाप देत। जंव जाणिले मर्म तयांचे तिने ।। १२३
कौतुकनिधि कृपाळु भगवान। हरि मानिती तिचा शाप प्रमाण।
तोच जलंधर जाहला रावण। वधून रणी रामे दिले परमपद ।। १
राम नरदेह करिती धारण। एका जन्मी तयाचे हे कारण।
प्रभूच्या प्रतिअवताराचें कथावर्णन। ऐका भारद्वाज कवि वानिती नानापरी ।।२
एकदा प्रभूस नारद शाप देती। म्हणोनी प्रभु एक कल्प अवतार घेती।
ऐकून वाणी स्तिमित पार्वती। वदे ती नारद विष्णुभक्त पुन्हा ज्ञानी। ३
कारण कोणते मुनि शाप देती। कोणता अपराध रमापति करिती।
मुनि मना मोह वाटे आश्चर्य अती। पुरारि सांगा हा प्रसंग मज ।। ४
तव महेश वदले हसुनी। नसे कोणी मूढ वा ज्ञानी।
राम जैसे जया करिती ते क्षणी। तो शीघ्र होई तैसाची ।। १२४(क)
करितो रामगुणगाथा वर्णन। हे भारद्वाज आदरे करावे ते श्रवण।
तुलसीदास म्हणे त्यजून मदमान। भजावे भवभंजक रघुनाथ ।। १२४(ख)
हिमगिरीत एक गुहा पावन। वाहे समीप गंगा सुशोभन।
नारद मनासी ती रुचली पाहून। तेथील आश्रम पुनीत सुंदर ।। १
निरखिती शैलसरिताविपिन। रमापतिपदी रमले तयांचे मन।
जाहले समाधीत सहज मग्न। गेली दक्षाची शापबाधा हरि स्मरता ।। २
इंद्र भयभीत मुनीची स्थिती पाहून। बोलावून मदना केला सन्मान।
म्हणे जा मम हितास्तव सेना घेऊन। निघाला मीनध्वज काम हर्षे ।। ३
उपजे भय देवेंद्र मनात। देवर्षि मम इंद्रपद वांछीत।
जो कामी लोलुप जगतात। भीति तया सकलांची कुटिल काकसम ।। ४
शुष्क हाड घेऊन पळे श्वान। मृगराज येताना निरखून।
वाटे मूर्खास सिंह ते घेईल ओढून। तैसी न लज्जा वाटे सुरपतीस ।। १२५
जंव मदन गेला आश्रमात। निज माये तयाने निर्मिला वसंत।
विविध तरू बहुरंगी कुसुमित। कूजती कोकिळा गुंजती मधुप ।। १
शीत मंद सुगंध वात। कामाग्नीसी करी प्रज्वलित।
रंभादि देवांगना समस्त। मदनकलेत प्रवीण ।। २
मधुर तानतरंगासहित गान। करिती विविध क्रीडा कंदुक घेऊन।
सेना देखून मदन प्रसन्न। पसरवी पुनरपि मायाजाल अनेक ।। ३

कामाची कला न व्यापी मुनीस । तव भीति मदनास जाणून निज नाश ।
परि रक्षितो रमापति जयास । मर्यादा तयाची कोण थांबवू शके ।। ४
हस्तकांसहित मदत भयभीत । जाणून निज पराजय मनात ।
मग वदे वचन अति आर्त । जाऊन धरी मुनिचरण ।। १२६
क्रोध न आला नारदमुनीस । संतोषविले प्रिय वचने मदनास ।
मग आज्ञा घेऊन वंदून चरणांस । गेला अनंग सेनेसह ।। १
मुनींची सुशीलता निजकरणी । वानिली कामे इंद्रसभेत जावोनी ।
मनी स्मिमित सकल हे एकोनि । हरीस नमून ते स्तविती मुनीसी ।। २
तंव नारदमुनि शिवाप्रति जाती । जिंकिले कामास अहंकार मनी अती ।
मदनचरित्र मुनि शंकरास कथिती । प्रिय मानून मुनीस वदती शिव ।। ३
हे मुनि परोपरी विनवितो तुम्हांसी । जैसी कथा निवेदिली तुम्ही मजसी ।
तैसी कधी न कथावी हरीसी । प्रसंग येताच ठेवावी गुप्त ।। ४
शंभूने केला हितास्तव उपदेश । परि न रुचला तो नारदास ।
आता ऐका हे भारद्वाज कौतुकास । हरीची इच्छा महाबलवान ।। १२७
घडते जैसे राम करू इच्छिती । न कोणी ऐसे जे अन्यथा करिती ।
तंव नारद ब्रह्मलोकास जाती । मुनीसी जंव न रुचे शंभूचे वचन ।। १
एकदा करी घेऊन सुंदर वीणा । गानप्रवीण मुनि गाती हरिगुणा ।
क्षीरसिंधुप्रति करिती मुनि गमना । जेथे वेदान्ततत्त्व श्रीनिवासवास ।। २
हर्षे भेटले उठून रमाकांत । बैसती आसनी ऋषिसमवेत ।
हे मुनि केली दया दिनांनी बहुत । वदती हसून चराचर स्वामी ।। ३
मदन चरित्र कथिती नारद हरीस । जरी शिवाने प्रथम बजाविले तयास ।
रघुपतीची माया प्रचंड विशेष । जया न मोही ऐसा कोण जगी ।। ४
वदती म्लान वदन करून । मधुर वचन श्रीभगवान ।
नष्ट मोहकाममदमान । हे मुनिराज होताच स्मरण तुमचे ।। १२८
ऐका मुनि मोह जयाचे मनात । कैसी ज्ञानविरक्ति तयाचे हृदयात ।
तुम्ही मतिधीर ब्रह्मचर्यव्रती रत । कैसा पिडील तुम्हा मदन ।। १
नारद वदले साभिमान । सकल कृपा तुमची भगवान ।
पाहती प्रभु करुणानिधि मनी चिंतून । गर्वतरुअंकुर महामुनि हृदयी ।। २
वेगे तो मी समूळ उपटीन । सेवकाचे हित हाचि मम पण ।
मम लीला होईल तैसेच मुनिकल्याण । योजीन उपाय अवश्य तोच ।। ३

तंव नारद हरिपदी ठेवून मस्तक । चालले हृदयी अहंकार अधिक ।
श्रीपति करिती निजमाया प्रेरित । ऐका आता तिची कठिण करणी ।। ४
प्रभुमायेने रचिले नगर । शतयोजन तयाचा विस्तार ।
रचनेत दिसती विविध प्रकार । वैकुंठाहून अधिक रम्य ।। १२९
वसती नगरीत सुंदर नरनारी । जणु मदनरति तनुधारी ।
नृप शीलनिधि वसे त्याच नगरी । अगणित अश्वगज सेनेसह ।। १
शत इंद्रांसम वैभवविलास । रूपतेजबळनीति यांचा निवास ।
विश्वमोहिनी कुमारी तयास । लक्ष्मीहि मोहित निरखिता जिचे रूप ।। २
तीच हरिमाया सकल गुणखाण । त्या शोभेचे न करवे वर्णन ।
असंख्य नृप तेथे करिती आगमन । करू इच्छी स्वयंवर नृपबाला ।। ३
मुनि विनोदी नगर प्रवेशती । नगरजनांस सकल वृत्त पुशिती ।
ऐकून समाचार मुनि नृपगृही येती । मुनीस बैसवी भूप पूजन करून ।। ४
आणून कन्येस दाखवी नारदास । भूपति विश्वमोहिनी कुमारीस ।
म्हणे हे नाथ सांगावे गुणदोषांस । हृदयी विचार करून ।। १३०
विसरले वैराग्य मुनी सुरूप पाहून । बहुत काळ तिज निरखिती रोखून ।
देखता तिचे लक्षण हरपती भान । मुनि हर्षित परि न करिती प्रकट ।। १
जो हिला वरील तो अमर होईल । समरी तयासी न कोणी जिंकील ।
चराचर जीव सेवा करितील । शीलनिधीची कन्या वरील जया ।। २
मुनि सकल लक्षण हृदयी ठेविती । नृपासी काही अन्यथा कथिती ।
परि सचिंत मनी नारद जाती । सांगून नृपास सुलक्षण कन्येचे ।। ३
मजसी वरील कुमारी जेणेकरून । तैसेच चिंतून यत्न करीन ।
विधात्या मिळेल बाला उपाये कवण । आता जप वा तप कैसे या समयी ।। ४
हा ऐसा शुभ अवसर । पाहिजे रूप सतेज सुंदर ।
जेणे भाळेल कुमारी मम लावण्यावर । मज जयमाला अर्पील ।। १३१
हरिपाशी मागेन ऐसी सुंदरता । होईल बहुत वेळ तेथे पोचता ।
परि हरिसम मज न अन्य हितकर्ता । तोच सहाय्य करील या समयी ।। १
बहुपरी तदा प्रभूस करिता विनंती । लीलामय प्रभु कृपाळु प्रकटती ।
प्रभूस पाहून मुनींचे नेत्र निवती । होती हर्षित कार्य साधेल जाणून ।। २
अति दीन होऊन कथिती वृत्तांत । म्हणती कृपा करून व्हावे सहाय्यक ।
अन्य उपाये ती मज न लाभता । प्रभो म्हणून द्यावे मज निजरूप ३

हे नाथा जेणे होईल मम हित । मी आपुला दास करावे ते त्वरित ।
वदले दीनदयाळ प्रभु करून स्मित । पाहून विशाल निज मायाबळ ।। ४
जेणे होईल तुमचे परम हित । तेच करीन ऐका हो नारद ।
न अन्यथा काही करीन निश्चित । नसे असत्य कदापि मम वाणी ।। १३२
कुपथ्य मागे व्याकुळ रोगी । परि वैद्य न देई ऐका मुनि योगी ।
साधीन सकळ, केवळ तव हितालागी । अंतरधान पावती प्रभु ऐसे वदून ।। १
मायेच्या वश जाहले मूढ मुनी । न जाणती हरीची अगूढ स्पष्ट वाणी ।
ऋषिराज गेले शीघ्र त्या स्थानी । उभारला जेथे विवाहमंडप ।। २
वस्त्रालंकारे नृपति शोभती । जाऊन निज निज आसनी बैसती ।
रूप सुंदर, मुनि मनी प्रसन्न अती । की सोडून मज न अन्या वरील ती ।। ३
मुनिहितास्तव कृपानिधान । देती कुरूपता न करावे वर्णन ।
परि वंदिती सकल नारद जाणून । चरित्र हे ठावे नच कवणा ।। ४
तेथे होते रुद्राचे गण दोन । जाणती ते रहस्य ज्ञान ।
पाहत फिरती ब्राह्मण वेष घेऊन । परम मौज तेथील ।। १३३
नारदाच्या हृदयी रूपाचा अभिमान । पंक्तीत बैसती जेथे जाऊन ।
तेथे होते महेशाचे गण दोन । विप्रवेषे न जाणती कुणी ।। १
ऐकविती व्यंग वचन मुनीस । सुंदरता दिधली हरीने तयास ।
भुलले कुमारी पाहून लावण्यास । यासच वरील जाणून हरी ।। २
मुनीस मोह मन मायेच्या हाती । प्रसन्न मने शंभुगण हसती ।
जरी मुनि विचित्र वाणी ऐकती । बुद्धिभ्रंशे न उमगे तया ।। ३
नाकळे कवणास मुनिचरित्र विशेष । नृपकन्येने देखिले त्या रूपास ।
मर्कटवदन भयंकर देहास । पाहता उपजे क्रोध हृदयी तिच्या ।। ४
चालली सखीसह नृपनंदिनी । भासे जणु राजहंसगामिनी ।
सरोजकरांत जयमाला घेउनी । फिरे विलोकित महीपांस ।। १३४
ज्या बाजू बैसले नारद गर्वे फुगून । त्या बाजूस न पाही कुमारी ढुंकून ।
पुन्हा पुन्हा मुनि उठती चडफडून । शिवगण विहसती पाहून दशा ।। १
आले तेथे नृपतनुधारी प्रभु कृपाळ । कुमारी हर्षे अर्पी तया जयमाळ ।
निराश जाहला नृपसमाज सकल । जंव लक्ष्मीपति जाती वधूस घेऊन ।। २
मुनीचे मतिभ्रंशाने व्यथित मन । जणु मोती गळावे गाठ सुटून ।
वदती तव मस्करीने शिवगण । पाहावे जाऊन दर्पणी निजमुख ।। ३

ऐसे वदून पळती ते भयभीत । मुनि देखती प्रतिबिंब जळात ।
वेष पाहून अति कोपित । देती गणांस कठोर शाप ॥ ४
जाऊन व्हा तुम्ही निशाचर । उभय पापी कपटी अपवित्र ।
हसला मज आता चाखा फळ साचार । पुन्हा कुणा मुनीस हसाल का ॥ १३५
पुनरपि पाहती रूप जळांत । मूळ रूप परि मन न शांत ।
जाती कमलापतिप्रति त्वरित । थरथरती अधर कोप मनी ॥ १
देईन शाप वा त्यजीन प्राणास । जगी केला मम उपहास ।
संगे घेऊन राजकुमारीस । भेटले मार्गात दैत्यारि प्रभू ॥ २
बोलती देवांचे स्वामी मधुर वचन । कोठे चालला मुनि व्यथित होऊन ।
मायावशे मुनीस न राही भान । उपजला क्रोध शब्द ऐकून ॥ ३
वदती न बघवे तुम्हा परसंपदेस । तुमची ईर्षा कपट विशेष ।
सिंधुमंथनी फसविले रुद्रास । सुरांस केले प्रेरित करविले विषपान ॥ ४
सुरा असुरांस शंकरास विष देऊन । कौस्तुभ लक्ष्मी स्वये स्वीकारून ।
स्वार्थसाधु दाविले कुटिल रूप म्हणून । सदा तुमचा कपटाचा व्यवहार ॥ १३६
परम स्वतंत्र तुम्ही न कोणी शिरावरी । मना रुचेल तैसे करणार तरी ।
न हर्ष वा विषाद तुमच्या उरी । भल्यासी खल खलासी भला करिता ॥ १
धीट तुम्ही ठकवाठकवी करून । नसे भय तुम्हास सदा उत्साही मन ।
शुभाशुभ कर्म न बाधे तुम्हा अजून । न सुधारले कुणी तुम्हा आजवरी ॥ २
थोरा घरी दिधले वाण । कृतकर्माचे फळ पावाल आपण ।
ठकविले मज जी तनु देऊन । तीच धारण कराल मम शाप ॥ ३
कपिरूप दिधले तुम्ही मजसी । कपीच येतील तुमच्या सहाय्यासी ।
नारीविरहे होईल दुःख तुम्हांसी । केले महा अनहित म्हणुनी ॥ ४
शाप शिरी करून धारण । प्रसन्न मने प्रभु तया विनवून ।
मायाप्रभाव घेती आकर्षून । कृपानिधी भगवान तंव ॥ १३७
जंव मायेस हरि दूर करिती । तेथे न रमा न राजकुमारी दिसती ।
मुनि सभय हरिचरण धरिती । वदून हे प्रणतहारी मज रक्ष ॥ १
मृषा होवो मम शाप कृपाळ । मम सकल इच्छा वदती दीनदयाळ ।
केली मी दुर्वचने विपुल । मुनि म्हणती कैसे मिटेल पाप ॥ २
जपावे शकरशतनाम । मिळेल हृदया त्वरित विश्राम ।
नसे मज प्रिय अन्य शिवासम । न सोडावा हा विश्वास चुकून ॥ ३

जयावरी कृपा न दाविती त्रिपुरारी । हे मुनी नसे मम भक्ति तयावरी ।
विचरा महिवरी हे धरून उरी । आता न माया बाधेल तुम्हा ।। ४
बहुपरी मुनीसी बोध करून । प्रभु शीघ्र पावती अंतरधान ।
करीत रामाचे गुणगान । निघाले नारद सत्यलोका ।। १३८
शिवगण मुनीसी पथी देखती । गत मोह तयांचा मन प्रसन्न अती ।
गण सभय नारदाप्रति येती । पद धरून वदती दीनवाणी ।। १
मुनिराया न विप्र आम्ही हरगण । मिळालें फळ अपराधास्तव महान ।
शाप दूर करा हे कृपानिधान । मग वदती नारद दीनदयाळ ।। २
तुम्ही उभय निशाचरजन्मा जाल । मिळेल तुम्हा तेज वैभव बळ ।
भुजबळे जंव विश्वासी जिंकाल । तंव विष्णु नरतनू घेतील ।। ३
हरिहस्ते तुम्हा समरी मरण । व्हाल मुक्त जीवनमरणातून ।
चालले उभय मुनिपदा वंदून । जाहले निशाचर उचित समयी ।। ४
एका कल्पी हा हेतू धरून । प्रभु करिती नररूप धारण ।
भूमिभारभंजक भगवान । सुररंजक सज्जनासी सुखद ।। १३९
ऐसे प्रभूचे जन्मकर्म अनेक । अति सुंदर सुखद अलौकिक ।
करिती मनोहर लीला किती एक । युगी युगी अवतरोनी ।। १
तंव तंव गाइली कथा मुनींनी । परम पुनीत काव्य रचुनी ।
सूज्ञांस न वाटे विस्मय ऐकोनी । वर्णन विविध अनूप प्रसंगांचे ।। २
हरि अनंत हरिकथा अनंत । बहुपरि कथिती ऐकती संत ।
सुंदर रामचंद्राचे चरित । गुणगानासी अपुरी कोटिकल्पे ।। ३
हा प्रसंग कथिला तुज भवानी । कैसी हरिमाया मोहवी मुनीज्ञानी ।
भक्तहितकर्त्या प्रभूची गूढ करणी । सेवेसी सुलभ दुःखहारी ।। ४
नसे सुरनरमुनि या कवणात । जो मायाबळे न मोहित ।
ऐसा विचार करून मनात । भजन करा महामायास्वामीचे ।। १४०
आता दुजा हेतु शैलकुमारी । कथितो विस्तारे श्रवण करी ।
ज्याकारणे जाहला भूप अयोध्यापुरी । अगुण अरूप अज ब्रह्म ।। १
प्रभु दिसले तुज फिरत वनी । बंधूसह मुनिवेष घेउनी ।
जयाचे चरित्र अवलोकून भवानी । जाहली होतीस तू भ्रमवश ।। २
अजुनी न नष्ट ते तव दुबळेपण । ऐक ते चरित्र करी भवरोगहरण ।
यथामति तुज ते कथीन । त्या अवतारातील प्रभुलीला ।। ३

हे भारद्वाजमुनि ऐकून शिववचन । हासली उमा प्रेमे संकोचून ।
वृषकेतु करू लागले वर्णन । प्रभूच्या अवतारहेतूचे ।। ४
कथितो रामकथा हे मुनी । परिसावी ती मन लावुनी ।
कलिकालातील पाप हरुनी । मंगलकारक होईल सकला ती ।। १४१
राज्ञी शतरूपा स्वायंभु मनुभूप । जयापासून जाहली सृष्टि अनूप ।
उत्तम धर्माचरणी परस्परा अनुरूप । दंपतीचे आजहि वेद गाती यश ।। १
नृप उत्तानपाद तयांचा सुत । तयाचा सुत ध्रुव हरिभक्त ।
मनूचा कनिष्ठ पुत्र प्रियव्रत । वेदपुराण स्तविती तया ।। २
देवहूती तयाची कुमारी । जी कर्दममुनीची प्रिय नारी ।
येती कपिल कृपाळु तिच्या उदरी । दीनवत्सल आदिदेव प्रभु ।। ३
केले सांख्यशास्त्राचे प्रकट वर्णन । तत्त्वविचारी भगवान मुनि निपुण ।
त्या मनूने दीर्घकाल केले राज्यपालन । मानिली प्रभुआज्ञा सर्वपरी ।। ४
गृही वसता आले वृद्धपण । परि न निघे विषयातून मन ।
गेला जन्म हरिभक्तिविण । जाणून हृदयी अति दुःखी ।। १४२
बळेच मनु देई राज्य निजपुत्रासी । स्त्रीसह मग जाई वनासी ।
विख्यात तीर्थवर नैमिषासी । स्थळ पुनीत साधकां सिद्धिदायक ।। १
वसती तेथे सिद्धमुनी । नृपराज्ञी निघाले हर्षित मनी ।
शोभती मतिधीर पथी निमिषवनी । जणु मूर्तिमंत ज्ञानभक्ति ।। २
पोचती ते गोमतितीरावर । हर्षे स्नान करिती घेऊन निर्मल नीर ।
जाणून राजर्षि धर्मधुरंधर । सिद्धमुनिज्ञानी येती भेटीसी ।। ३
जी जी सुंदर तीर्थे होती । यात्रा तेथील तयांकडून करविती ।
संतांसवे नित्य पुराण ऐकती । नेसती वल्कले कृशशरीर ।। ४
द्वादश अक्षरांचा मंत्र । दंपती जपती अति प्रेमे साचार ।
वासुदेवपदकमलांवर । जडले अति मन तयांचे ।। १४३
शाककंदफलादि भक्षिति । सच्चिदानंद ब्रह्म स्मरती ।
मग हरिस्तव तप करिती । फळमूळ सोडून करिती जलपान ।। ४
हृदयी अभिलाषा निरंतर । प्रभु नयने पाहावा सत्वर ।
अगुण अनादि अनंत अक्षर । चिंतिती जया परमार्थवादी ।। २
नेति नेति वेद जयास निरुपिती । निजानंद अनूप निरुपाधि ।
जयाच्या अंशे प्रकटती । अनेक ब्रह्माविष्णूशिव । ३

ऐसा महाप्रभू वश सेवकांस । भक्तालागी धरी दिव्य देहास ।
जर वेद मानिती सत्य या वचनास । तर होईल मनीषा आमुची पूर्ण ।। ४
ऐसी वरुषे गेली सहा सहस्र । राहती करून जलआहार ।
मग घेती वायूचा आधार । सप्त सहस्र संवत ।। १४४
तोहि त्यजिला वरुषे दश सहस्र । उभय ठाकले एक पदावर ।
विधाता हरिहर पाहती तप अपार । मनुसमीप येती बहु वेळा ।। १
बहु लोभ दाविती म्हणती मागा वर । परि न चळती ते परमधीर ।
अस्थिमात्र राहिले शरीर । परि न मनी लेशपीडा ।। २
निजदास मानिती प्रभु अंतरज्ञानी । अनन्य भक्त तापस नृपराणी ।
माग माग वर जाहली नभोवाणी । परम गभीर कृपामृतेपूर्ण ।। ३
मृतास जीवनदात्री ऐसी वाणी । हृदयी शिरली श्रवणरंध्रांतुनी ।
जणु नृपराज्ञी आले आताच भवनातुनी । ऐसी जाहली काया परमपुष्ट ।। ४
सुधासम वाणी श्रवण करून । तनु पुलकित प्रफुल्लित मन ।
मनु बोले दंडवत घालून । प्रेम हृदयी समावेना ।। १४५
प्रभो सेवकासी तू सुरतरुसुरधेनू । वंदिती विधिहरिहर तव पदरेणू ।
सेवेसी सुलभ सुखद म्हणे मनू । प्रणतपालचराचराचा स्वामी तू ।। १
हे अनाथहित जर स्नेह आम्हांवर । तर प्रसन्न होऊन द्यावा हाचि वर ।
जयास्तव यत्न करिती मुनिवर । जो शिव हृदयी वसे सदा ।। २
जो भुशुंडिमनमानसहंस । स्तविती वेद सगुणनिर्गुण जयास ।
पाहावे आम्ही नयनभरे तयास । हे प्रणतवत्सला कृपा करा ।। ३
विनीत मृदुल प्रेममय वचन । परमप्रिय दंपतीचे ऐकून ।
भक्तवत्सल प्रभु कृपानिधान । विश्वव्यापक भगवान प्रकटती ।। १
नील सरोरुह नील रत्न । नील नीरधर यापरी श्याम वर्ण ।
प्रभूची ऐसी शोभा निरखून । लज्जित कोटि कोटि शतकाम ।। १४६
शरच्चंद्रासम छबीसीमा मुखकांती । कंठ दरासम कपोल हनु चारु अती ।
अरुण ओष्ठ नासिका सुंदर दंतदीप्ति । लाजवी हास्य शशिकिरणावलीस ।। १
नवअंबुजनयन सुंदर । भासे ललित दृष्टिक्षेप मनोहर ।
लाजवी मदनचापा भ्रुकुटी चेतोहर । ललाटपटली टिळा प्रकाशमय ।। २
कर्णी मकरकुंडले शिरी शोभे मुकुट । कुरळे केस भृंगावलि भासत ।
उरी श्रीवत्स रुचिर वनमाळा रुळत । चमकती रत्नहार भूषणे ।। ३

बंधुबंधूत अति प्रीती । दोषकपटरहित माया अती ।
ज्येष्ठ सुतास राज्य देऊन नृपती । जाई वना हरिचिंतना ।। ४
जंव प्रतापरवि जाहला नृपती । देशात तंव द्वाही फिरविती ।
प्रजापालन वेदविधिपूर्ण अती । न दिसे राज्यी पाप लेश ।। १५३
नृपहितकर्ता सचिव बुद्धिमान । नामे धर्मरुचि शुक्रासमान ।
सचिव शहाणा बंधु बलवान । प्रतापी रणधीर स्वये नृप ।। १
तयाची चतुरंग सेना अपार । अमित सुभट समरी झुंजार ।
बघून सेना नृप हर्षित साचार । नगारे झडती घडाघडा ।। २
दिग्विजयास्तव सेना सजवून । निघे नृप शुभदिनी डंका वाजवून ।
जेथे तेथे लढाई करून । जिंकिले बळे सकल भूप ।। ३
बाहुबळे जिंकिले सप्तखंड । सोडिले नृपगणा घेऊन दंड ।
जाहला सार्वभौम पृथ्वीचा अखंड । प्रतापभानु एक चक्रवर्ती ।। ४
भुजबळे केलें विश्व स्ववश । केला मग निजपुरीत प्रवेश ।
सेवून धर्मार्थकाममोक्ष । भोगिलें सुख नरेशें यथाकाल ।। १५४
भूप प्रतापभानु महाबलवान । भूमि जाहली कामधेनु समान ।
दुःखविरहित सुखी प्रजाजन । धर्मशील सुंदर नरनारी ।। १
सचिव धर्मरुचीची हरिपदी प्रीती । नृप हितास्तव उपदेशी नित नीती ।
गुरुसुरविप्रसंत यांस नृप पूजी । करी तयांची सदा सेवा ।। २
वेदशास्त्री जे नृपधर्मवर्णन । सुखे करी तयाचे पालन ।
प्रतिदिनी देई दानप्रदान । वेदशास्त्रपुराण श्रवण करी ।। ३
नाना वापी कूप तडाग । सुमनवाटिका सुंदर बाग ।
विप्रभवन सुरमंदिर विभाग । उभारिली सुंदर तीर्थक्षेत्री ।। ४
नाना यज्ञ सांगती वेदपुराण । एक एक ऐसे करून ।
एक सहस्र वेळा करी पूर्ण । अति प्रेमे भूपाळ ।। १५५
कदापि न फलकामना तया मनी । भूप विवेकी परम ज्ञानी ।
कायावाचामने धर्म करुनी । अर्पी वासुदेवा सुजाण तो ।। १
एकदा नृप सुंदर अश्वावर चढून । मृगयेस्तव साहित्य सजवून ।
गेला विंध्याचल वनी गहन । उत्तम मृग वधिले तयाने ।। २
नृप देखे वराह फिरत वनी । जणु लपला राहू शशीस ग्रासुनी ।
शशि विशाल न मावे वदनी । क्रोधवशे न गिळी तया ।। ३

कथिली ही शोभा दंतांची कराल । तनु अति पुष्ट बाहु विशाल ।
फुरफुरे अश्व ऐकता चाहूल । स्तिमित बघे कान उभारुनी ।। ४
जणु निलगिरीशिखर । ऐसा दिसे तो विशाल सूकर ।
अश्वासी टाच मारी नृपवर । न उरली तया अन्य गती ।। १५६
अश्वरव अधिक येता बघून । वराह धावे वेगे जणु पवन ।
त्वरित नृपे केले शरसंधान । बाण देखता पडे धरणीवरी ।। १
सूं सूं बाण फेकी महीष । वाचवी वराह कपटे तनूस ।
जाई भूप मागे क्रोधवश । लपत कधी प्रकटत धावे वराह ।। २
पळाला पशु दूर वनी गहन । गजवाजी न प्रवेशती ते वन ।
नरेश जाई वराहामागून । एकला साहून अति क्लेश ।। ३
भूपास अति धीट पाहून । सूकर लपे खोल गुहेत जाऊन ।
पथ दुर्गम नृप वळे पस्तावून । महागहन वनी पथ न मिळे ।। ४
अति श्रमे नृप तृषितक्षुधित । चालला तो अश्वासमवेत ।
सरितासरजळ वनी शोधत । होई विव्हळ जळाविण ।। १५७
पाहे आश्रम फिरता वनात । नृप वसे तेथे कपटे मुनिवेषात ।
पळाला निज सेना सोडून रणात । जिंकिला तयाचा देश प्रतापभानूने ।। १
प्रतापरवीचे सुभाग्य जाणुनी । निज दैवास दोष देउनी ।
बहु दुःखी न गेला तो भवनी । न भेटला अभिमानी प्रतापभानूस ।। २
क्रोध आवरून तो नृपरंक । राहिला वनी तापसवेषात ।
ओळखे प्रतापरवीस त्वरित । जंव गेला नृप तया समीप ।। ३
राजा तृषित न जाणे तापसास । मानिले महामुनि पाहून सुवेष ।
उतरून अश्वावरून वंदिले तयास । परि चतुर नृप न सांगे निजनाम ।। ४
विलोकून तृषित नृपास । दावी जलाशय तपस्वी तयास ।
केले जलपानस्नान सहर्ष । भूपतीने निजअश्वासह ।। १५८
नृपाचा श्रमपरिहार होताच । तपस्वी तया नेई आश्रमात ।
दिले आसन जाणून सूर्यास्त । मुनि मग वदे मृदु वाणी ।। १
तू कोण का एकला वनी फिरसी । सुंदर तरुण का जिवावर उदार होसी ।
दया दाटते मम मानसी । पाहून तव लक्षण चक्रवर्तीचे ।। २
वदे नृप नामे प्रतापभानु अवनीश । तयाचा सचिव मी ऐका मुनीश ।
विसरलो पथ येऊन शिकारीस । भाग्यवान मी घडले पददर्शन ।। ३

मज गमे तव दुर्लभ दर्शन । म्हणोनी येतील मजला सुदिन ।
नगर तुमचे सत्तर योजन । वदे मुनि हे तात जाहला अंधेर ।। ४
निशा घोर गंभीर पसरत । गहन वनी पथ न दिसत ।
जाणून हे राहावे आश्रमात । जावे एथून प्रभात होताच ।। १५९ (क)
तुलसी म्हणे जयाची भवितव्यता जैसी । तया सहाय्यता मिळे तैसी ।
येई चालत सहज तयापाशी । वा सवे घेऊन जाई ती ।। १५९ (ख)
बरे हे नाथ वदून आज्ञा मानून । बैसे नृप अश्व तरूस बांधून ।
नृप स्तवी निज भाग्या वंदून । प्रशंसी मुनीस बहुपरी ।। १
मग बोले मृदु सुंदर वचन । प्रभो दावितो धिटाई पिता मानून ।
मुनीश मज सुतसेवक गणून । सांगावे निज नाम मज ।। २
नृप तया न जाणे तो जाणे नृपास । भूपाचे शुद्ध हृदय मुनि कपटी विशेष ।
कपटबळे करू इच्छी कार्यास । नृप वैरी तशात क्षत्रिय जातीचा ।। ३
राज्यस्मरण होताच तो दुःखित । सूडाग्नि आव्यासम धगधगे हृदयात ।
सरळ नृपवचन ऐकून हर्षित । होताच स्मरण वैरभावाचे ।। ४
बोले वचन कपटमिश्रित । मुनि मृदुल युक्तिसहित ।
मी निर्धन गृहद्वाररहित । यास्तव भिकारी मम नाम असे ।। १६०
नृप म्हणे तुम्ही विज्ञाननिधान । तुम्हासम जे गलाभिमान ।
ते निजस्वरूप सदा लपवून । साधिती कुवेषामाजी कुशल ।। १
पुकारती यास्तव वेदसज्जन । हरीसी प्रिय परम द्रव्यहीन ।
तुम्हासम अधन अगेह भिकारी पाहून । संदेह वाटे शिवब्रह्मा ।। २
जे असाल तुम्ही ते असा नमन चरणी । दया करा स्वामी कृपा करोनी ।
नृपाची सहज प्रीति पाहोनी । तैसा निजवचनी विशेष विश्वास ।। ३
संपूर्ण निजवश करून नृपास । बोले मुनि दावून अधिक स्नेहास ।
ऐक कथितो सत्य नृपेश । राहिलो एथे बहुत काळ ।। ४
न भेटले कोणी वनी मजसी । न केलें प्रकट मी मम नामासी ।
जी दग्ध करिते तपकाननासी । ती लोकमान्यता अग्निसम ।। १६१ (क)
तुलसी म्हणे पाहून सुवेष । भुरळ पडते मूढा तैसी चतुरास ।
वचन सुधासम परि मोर सर्पास । भक्षितो जरी दिसे सुरम्य सुंदर ।। १६१ (ख)
म्हणून राखिला गुप्त जगी मम वेष । न अन्य प्रयोजन मज सोडून हरीस ।
न कळविता कळते सर्व प्रभूस । मग सांग कोणते फळ प्राप्त लोकरंजनी ।। १

शुचि सुमति तू मज प्रिय परम । दाविसी मजवरी प्रतीतिप्रेम ।
जर ठेवीन गुप्त चरित्र मम । दोष दारुण मज लागेल ।। २
जो जो मुनि सांगे कथा उदास । तो तो नृपाठायी उपजे विश्वास ।
पाहुन कायावाचामने स्ववश । वदे तापस बकध्यानी ।। ३
हे बंधो एकतनु मजसी म्हणती । मग शिर नमवून वदे नृपती ।
मी तव सेवक अनुरागी अती । हे जाणून सांगा नामाचा अर्थ ।। ४
उपजली आदिसृष्टि प्रथम जंव । जाहली मम उत्पत्ति तंव ।
मग न घेतली अन्य तनु यास्तव । मम नाम राहिले एकतनु ।। १६२
न करावे पुत्रा आश्चर्य मानसी । दुर्लभ न काही तपस्व्यासी ।
तपबळे ब्रह्मा रची जगतासी । तपबळे जाहला विष्णु जगत्राता ।। १
तपबळे शंभु संहार करी । तपे न अगम्य काही संसारी ।
हे ऐकून जडे नृपाची प्रीति मुनीवरी । मग मुनि सांगे पुरातनकथा ।। २
कर्मधर्म अनेक इतिहास निवेदून । केले ज्ञानवैराग्याचे निरूपण ।
उत्पत्तिस्थितिलयकथेचे वर्णन । करी विस्तारे आश्चर्यपूर्ण ।। ३
ऐकून हे महीप जाहला मुनिवश । मग प्रकट करी निज नामास ।
जाणतो मी तुज हे नृपा वदे तापस । मज रुचले तव कपट ।। ४
हे महीश ऐक ऐसी ही नीती । नृप निज नाम कदापि न कथिती ।
तुजवरी मम बहुत प्रीति । तव चतुरता पाहुनिया ।। १६३
नाम तव प्रतापदिनेश । सत्यकेतु तव पिता नरेश ।
जाणतो सकल गुरुप्रसादे विशेष । न कथिले निजहानि जाणून ।। १
हे तात पाहून तव सरळ स्वभाव । नीतिप्रीतिप्रतीति अतीव ।
उपजे मनी ममताभाव । तू पुसले म्हणून कथा कथितो ।। २
नसे संशय मी आता प्रसन्न । रुचेल ते माग मनापासून ।
भूप हर्षित ऐकून वचन । मग पदा धरून करी विनंती ।। ३
तव दर्शने हे मुनि कृपासागर । मज हस्तगत धर्मादि अर्थ चार ।
मागतो हा सुखास्तव दुर्लभ वर । स्वामीसी प्रसन्न पाहून ।। ४
होवो तनु जरामरण दुःखरहित । समरी मी अजिंक्य व्हावे सतत ।
महीवरी राज्य करावे मी कल्पशत । एकछत्र रिपुहीन ।। १६४
बोले तपस्वी तथास्तु हे नृपेश । परि कारण कठिण एक ऐक तयास ।
नरेशा सोडून केवळ विप्रकुलास । तव पदी काळ माथा नमवील ।। १

तपबळे विप्र सदा बलवान । तयांचा कोप होताच रक्षील कोण ।
ब्रह्माविष्णुमहेश होतील तव आधीन । नृपा करिशील जर विप्रांसी वश ।। २
न मानवे कोणी बलिष्ठ ब्रह्मकुलास । उचलून भुजा मी कथितो सत्यास ।
कोणत्याही काळात नसे तव नाश । विप्रशापावाचून ऐक महीपाळ ।। ३
राजा प्रसन्न ऐकून वचनास । म्हणे न कोणी करील मम नाश ।
तव प्रसादे हे कृपानिधान मुनीश । सदासर्वदा आता मम कुशल ।। ४
एवमस्तु ऐसे वदुनी । पुन्हा बोले मग दुष्ट कपटी मुनी ।
जर कुणा कथिशील पथभूलभेट वनी । तयाचा न दोष मजवरती ।। १६५
न कथावी कवणा ही कहाणी । कथिता होईल अति हानी ।
जर जाईल ती षट्कर्णी । नाश तव ही वाणी मम सत्य ।। १
द्विजशापे वा करून हे प्रकट । ऐक भूपा तुजसी मृत्यु खचित ।
जरी कोपतील हरिहर मनात । न अन्य उपाये तव निधन ।। २
स्वामी हे सत्य वदे नृप पदा धरून । द्विजगुरुकोप होता रक्षील कोण ।
गुरु रक्षितील ब्रह्मकोपापासून । गुरुविरोधी न त्राता जगी ।। ३
तव वचना न मानीन जरी । नाश होईल मज न चिंता तरी ।
मम मन व्यापी भय एकचि परि । हे प्रभो विप्रशाप अति घोर ।। ४
कैसे होतील ते विप्र मजसी वश । कृपा करा सांगा म्हणे नरेश ।
न मानीत मी हितकर्ता कोणास । हे दीनदयाळा तुम्हासी त्यजूनिया ।। १६६
नृपा ऐक विविध उपाय जगी । सिद्धि कठिण कष्टसाध्य दिसती ।
परि एक उपाय सुलभ अती । विघ्न तयात असे एक पण ।। १
नृपा ती युक्ति मम आधीन । परि तव नगरात जाणे कठिण ।
न गेलो कोठे जन्मापासून । कवणाच्याही गृहीग्रामी ।। २
हानि होईल जरी न जाईन । वाटे आला प्रसंग कठिण ।
ऐकून नृप बोले मृदु वचन । नाथा वानिती वेदनीति ऐसी ।। ३
ज्येष्ठ कनिष्ठावरी स्नेह करी । तृणास धरी निजशिरावर गिरी ।
तरंगे फेन अगाध जलधीवरी । संतत शिरी धरी धरणी धुळीस ।। ४
नृप वदे ऐसे पदांस धरून । कृपा करा हे स्वामी दयाघन ।
प्रभो तुम्ही दीनदयाळ सज्जन । सोसावे इतुके दुःख मजस्तव ।। १६७
नृप आपुल्या आधीन जाणून । बोलला तपस्वी कपटी प्रवीण ।
ऐक हे नृपा करितो सत्यकथन । नसे दुर्लभ मज काही जगी ।। १

करीन मी तव काज निश्चित । कायावाचामनें तू मम भक्त ।
ठेविता गुप्त प्रभाव फलदायक । योगयुक्तितपमंत्र यांचा ।। २
जंव मी अन्न शिजवीन भूपाळ । ते वाढावे तू मज न कुणी जाणेल ।
तंव जो जो ते अन्न भक्षील । तो तो आज्ञा मानील तव ।। ३
तयाचे गृही जे करितील भोजन । भूपा तेहि होतील तव आधीन ।
नृपा करावा हा उपाय जाऊन । सोडावा संकल्प एक वरुषाचा ।। ४
नितनूतन द्विज सहस्रशत । बोलवावे परिवारासहित ।
तव संकल्पकाळपर्यंत । शिजवीन मी अन्न प्रतिदिनी ।। १६८
यापरि अति अल्पकष्टे नृपाळ । होतील तव आधीन विप्र सकल ।
होमहवन यज्ञ विप्र करितील । त्यायोगे होतील देव सहज वश ।। १
आणिक एक सांगतो लक्षण । या वेषे मी कधी न येईन ।
निज माये मी करीन हरण । पुरोहिताचे तव राया ।। २
तपोबले करीन तया मज समान । वरुष एक एथे तया ठेवीन ।
राया तयाचा वेष धारण करून । साधीन मी तव कार्यसिद्धी ।। ३
निशा उलटली आता करावे शयन । तव मम भेट होईल दिनांनी तीन ।
निद्रेत तुज गृही पोचवीन । तव अश्वासह तपोबले ।। ४
येईन मी पुरोहित वेषात । जंव बोलावीन तुज एकांतात ।
कथा ऐकवीन मी तुज निश्चित । तू मग मज जाणशील ।। १६९
करी शयन नृप आज्ञा मानुनी । बैसला आसनी कपटी ज्ञानी मुनी ।
अति निद्रा भूपास श्रमित म्हणुनी । परि शठास न निद्रा अधिक चिंता ।। १
तंव आला कालकेतु निशाचर । जयाने भुलविले नृपा वेषे सूकर ।
तपस्वी नृप तयाचा परम मित्र । जाणे तो भीषण मंत्रजाल ।। २
तयाचे अजिक्य दशबंधु पुत्रशत । सुरांसी देती दुःख अति दुष्ट ।
पाहून विप्रसंतसुर दुःखित । रणी वधिले तयांना पूर्वीच नृपे ।। ३
खल स्मरून पूर्वीचे वैर । तपस्वी नृपाचा घेई विचार ।
रिपुनाशाची युक्ति योजिली सत्वर । न जाणे प्रतापभानु भावी विधिघटना ।।४
रिपु तेजस्वी जरी एकला । न गणावे कदापि लघु तयाला ।
आजही दुःख देई रविशशीला । धडावेगळा शेषशिर राहु ।। १७०

तपस्वी नृप पाहून निजमित्रास । सुखी जाहला हर्षे भेटून तयास ।
कथिले तयाने सकल कथेस । तव अति सुखे वदला निशाचर ॥ १
नृपा मानिला तू मम उपदेश । जाण आता साधला रिपुनाश ।
चिंता सोडून करी शयन हे नरेश । औषधाविना विधाता व्याधि दूर करी ॥ २
म्हणून रिपुमूळ कुळासहित । चतुर्थ दिनी मी भेटेन निश्चित ।
तापसी नृपास तोषवून बहुत । निघाला मायावी असुर अति क्रोधी ॥ ३
वाजीसहित भानुप्रतापास । पोचवी तो एका क्षणात गृहास ।
राज्ञीसमीप झोपवून नृपास । बांधिले अश्वास अश्वगृही ॥ ४
उचलून राजपुरोहितास । गेला घेऊन तया वनास ।
मग मायावशे करी भ्रमिष्ट बुद्धीस । ठेवून दिले गिरिगुहेत तया ॥ १७१
स्वये घेतले पुरोहिताचे रूप । निजला जाऊन शेजेवर अनुप ।
प्रभातसमयी नृप होता जागृत । भवनास पाहून अति स्तिमित ॥ १
मनीचा महिमा नृपे जाणिला मनात । राज्ञीस न कळता उठला हळूच ।
चढून अश्वावरी गेला वनात । न जाणती नगरनरनारी कोणीही ॥ २
आला नृप नगरी दोन प्रहरी । वाजती वाद्ये उत्सव घरोघरी ।
विलोकी अति स्तिमित मग स्मरण करी । जंव देखे पुरोहितासी नृप ॥ ३
भासले नृपा तीन दिन युगसमान । कपटी मुनीच्या पदी मति लीन ।
आला पुरोहित समय जाणून । समजावून सांगे सकल काजा ॥ ४
नृप प्रसन्न जाणताच गुरूस । भ्रमवशे न शुद्धि तयास ।
मग शतसहस्र विप्रकुटुंबांस । दिधले आमंत्रण भोजना त्वरित ॥ १७२
पुरोहिते केली चतुर्विध पाकसिद्धी । वेदविहित षड्रस भोजनादी ।
पक्वान्ने चटण्या शाक न गणू शकती । सकल पाकसिद्धी मायामय ॥ १
रांधिती विविध पशूंचे आमिष । मिसळे खल तयांत विप्रमांस ।
बैसविले सकल विप्र भोजनास । आदरे पद प्रक्षाळून तयांचे ॥ २
जंव नृप वाढी अन्न विप्रांसी । तंव सकल ऐकती नभोवाणीसी ।
विप्रवृंदहो उठोनी जावे गृहासी । महा हानी यात सेवू नये अन्न ॥ ३
अन्नात मिसळले विप्रमांस । मग द्विज उठती ठेवून विश्वास ।
नृप व्याकुळ मति मोहवश । भवितव्यवशे मुखे न निघती शब्द ॥ ४
तदा सकोप विप्र वदती । मनी काही विचार न करिती ।
परिवारासह हे मूर्ख नृपती । हो निशाचर जाऊन तू ॥ १७३

रे नीच क्षत्रिया म्हणती नृपासी । सपरिवार विप्रनाश वांछिसी ।
ईश्वरे रक्षिले आमुच्या धर्मासी । तू सपरिवार नष्ट होशील ।। १
तव नाश एक वरुषांतच होईल । कुळात जळदाता कुणी न राहील ।
शाप ऐकून नृप भये विकल । तोच जाहली सुंदर गगनगिरा ।। २
हे विप्रहो शाप अविचारे दिधला । भूपे न काही अपराध केला ।
चकित विप्र ऐकता नभोवाणीला । तव जाई भूप पाकशाळेत ।। ३
तेथे न अन्न ना सैंपाकी विप्र । फिरला राया मनी चिंता अपार ।
विप्रांसी कथिला वृत्तांत समग्र । पडे महीवरी व्याकुळ भयभीत ।। ४
दोष न तव जरी हे भूपती । होणारे न चुकेल विप्र वदती ।
विप्रशाप भयानक अती । टाळताही न कधी टळे ।। १७४
बोलून ऐसे जाती द्विज । नगरवासी हा जाणती वृत्तांत ।
दैवा दूषण देऊन मनी चिंतित । हंस घडविता घडविले वायसास ।। १
पोचवून भवनी नृपपुरोहितासी । सांगे वृत्तांत कालकेतु तपस्व्यासी ।
तो खल मुनि पाठवि पत्रे सकलांसी । आले भूप सत्वर सुसज्ज सेनेसह ।। २
डंका वाजवून घेरिले नगर । नानापरी लढले रणी वीर ।
झुंजता मरती योद्धे शूर । बंधूसह पडे धरणीवर नृप ।। ३
निर्वंश जाहले सत्यकेतूचे कुळ । कैसे असत्य होतील विप्रबोल ।
रिपूस जिंकून नृप सकल । जाती निजनगरी पावून यश ।। ४
ऐका हो मुनि भारद्वाज याज्ञवल्क्य वदत । जंव विधाता होई विपरीत ।
धूळ मेरूसम जनक यम भासत । रज्जु वाटे सर्पासम ।। १७५
ऐका हो मुनि तो नृप समयानुसार । परिवारासह जाहला निशाचर ।
तयास वीस भुजदंड दश शिर । नामे रावण शूर वीर प्रचंड ।। १
भूपाचा अनुज नामे अरिमर्दन । जाहला तो बळधाम कुंभकर्ण ।
जो धर्मरुचि सचिव पुण्यवान । जाहला तो सापत्न लघुबंधु ।। २
नामे बिभीषण जाणे जग । विज्ञाननिधान विष्णुभक्त ।
नृपाचे सकल सेवक सुत । जाहले भयानक घोर असुर ।। ३
इच्छारूप खल जातीचे अनेक । कुटिल भीषण तया नसे विवेक ।
पापी हिंसक कृपारहित । विश्वपीडादायक न वर्णवे ।। ४
पुलस्त्य मुनिकुळी जन्मले सकळ । अति पावन अनूप निर्मळ ।
तदपि ब्राह्मणांच्या शापे केवळ । जाहले ते पापरूप ।। १७६

विविध तप करिती बंधु तीन । अति उग्र न करवे वर्णन ।
ब्रह्मा जाती निकट तप बघून । वदती माग वर प्रसन्न मी तात ।। १
करी विनंति पदा धरून रावण । ऐका हो जगदीश बोलिला वचन ।
वानरमानव जात सोडून । न यावे मज मरण अन्य हस्ते ।। २
एवमस्तु वदती शिव तप महान । पाहून दिला वर मी ब्रह्मा मिळून ।
पाहता जाहले विस्मित ब्रह्मयाचे मन । जव प्रभु जाती कुंभकर्णाप्रति ।। ३
जर हा खल करील नित्य आहार । तर उजाड करील सकल संसार ।
मागे षण्मास निद्रा तो निशाचर । शारदाप्रेरणे फिरली मति तयाची ।। ४
मग ब्रह्मा बिभीषणाप्रती जाती । वर माग पुत्रा तया म्हणती ।
मागे तो प्रभुपदकमली प्रीति । अनन्य निर्मल निष्काम ।। १७७
ब्रह्मा निघाले तया वर देऊन । बंधु गेले गृही हर्षित होऊन ।
सुंदर नारी लावण्यखाण । मंदोदरी नाम मयकन्या ।। १
दिली रावणा मयाने तिज आणुनी । होईल तो असुरपति हे जाणुनी ।
जाहला हर्षित सुंदर नारी पाहुनी । मग केले विवाह उभय बंधूंचे ।। २
सागरामाजी त्रिकूट पर्वत । अति दुर्गम तो विधातानिर्मित ।
अपार भवने कनकरत्नजडित । सजविली मयासुरे बहुत ।। ३
नागकुलासी जैसी भोगवती । इंद्रनिवासा जैसी अमरावती ।
तयाहून अधिक सुरम्य अती । लंका नामे विख्यात जगी ।। ४
चारी दिशेने जलवेष्टित । खंदक गहन गभीर भासत ।
दृढ कनककोट रत्नखचित । रचना तयाची वर्णनातीत ।। १७८ (क)
ज्या कल्पामाजी हरिप्रेरित । होई असुरपति प्रबळ अतुलित ।
तोचि शूरवीर सेनेसहित । वसे लंकानगरीत ।। १७८ (ख)
प्रथम तेथे वसती निशाचरभट । सकला सुर संहारिती समरात ।
मग इंद्रप्रेरणे वसतीस्तव येत । यक्ष कोटि कुबेराचे ।। १
दशाननासी समजे तो वृत्तांत । वेढिले गडा तयाने सेनेसहित ।
पाहून सेनेसह शूर भट । जीव घेऊन यक्ष पळती ।। २
फिरून मग देखे नगरी दशशीर्ष । नष्ट चिंता होई सुख विशेष ।
त्या सहज सुंदर दुर्गम नगरीस । करी रावण निज राजधानी ।। ३
दिली भवने योग्यतेनुसार । केले रावणे सुखी सकल असुर ।
धावून एकदा गेला कुबेरावर । आणिले पुष्पक यान जिंकून । ४

एकदा जाऊन रावण असुरेश । कौतुके उचली कैलासास ।
जणूं तोलून निजबाहुबळास । आला माघारी बहुत सुख पावून ।। १७९
सुखसंपत्तिसेनासुत । जयप्रतापबळबुद्धि अमित ।
नितनूतन सकल वृद्धिगत । प्रतिलाभे लोभ अधिक वाटे ।। १
भ्राता कुंभकर्ण बलवान । जगी न दुजा योद्धा तयासमान ।
निद्रिस्त षण्मास करून मद्यपान । जागृत होता करी त्रस्त त्रैलोक्य ।। २
जर तो प्रतिदिनी करिता आहार । केले असते नामशेष विश्व सत्वर ।
न वर्णवे तो समरधीर । असंख्य प्रबल वीर तयासम ।। ३
मेघनाद रावणाचा ज्येष्ठ सुत । वीरांमाजी अग्रभागी जगात ।
न कोणी राही तया सन्मुख रणात । सुरनगरीत भयभीत सुर ।। ४
वीर कुमुख अकंपन वज्रदंत । धूमकेतु अति काय शूर बहुत ।
असती ऐसे अनेक असुरभट । जो एकला जिंकू शके जगता ।। १८१
ते कामरूप माया जाणत। दयाधर्म स्वप्नीही न दावीत ।
एकदा दशमुख बैसून सभेत । देखे निज अगणित परिवार ।। १
पुत्रपौत्र परिवार सेवक । कैसी गणावी निशाचरयोनी अमित ।
विलोकी सेना अभिमानयुक्त । क्रोधपूर्ण वचन वदे मदोन्मत्त तो ।। २
ऐका हो निशाचर दलवीर । वैरी आमुचे सकल सुर ।
बघून राक्षस प्रबळ वीर । सामोरे ठाकून न लढती ।। ३
एकच उपाये सुरांचे मरण । समजावून सांगतो करावे श्रवण ।
यज्ञहोमश्राद्धद्विजभोजन । आणावी बाधा सर्व धर्मकार्यी ।। ४
होतील देव क्षुधाशीण बलहीन । मग मज येतील शरण ।
तव ठेवून सर्वथा मम आधीन । वधीन वा सोडीन तया ।। १८१
मग बोलावी मेघनादासी । बोध करून वाढवी वैरबळासी ।
म्हणे लढणे अभिमान ज्या सुरांसी । वा जे सुर समरधीर बलवान ।। १
जिंकून तया समरी आणावे बांधून । पुत्र उठला आज्ञा शिरी धरून ।
गदा उचलून स्वये निघाला रावण । यापरि आज्ञा देऊन सकलांना ।। २
चालता दशानन डोले अवनी । गर्जना ऐकून गर्भ गाळिती सुररमणी ।
क्रोधे येत रावण हे ऐकुनी । मेरूगुहेत आश्रय घेती सुर ।। ३
दिग्पाललोकांस जाई दशकंधर । सुंदर असून भासे शून्य सर्वत्र ।
करी भयंकर सिंहनाद वारंवार । पाचारून सुरां गालिप्रदान करी ।। ४

फिरे जगी धावत तो रणमदोन्मत्त । परि शोधून न मिळे प्रतिभट ।
वरुणकुबेररविशशिवात । अग्निकाळयमादि अधिकारी ।। ५
सिद्धसुरनागमनुजकिन्नर । तयांना त्रस्त करी हठपूर्ण साचार ।
ब्रह्मा सृष्टीतील तनुधारी नारीनर । होती वश दशमुखासी ।। ६
पाळती तयाची आज्ञा सकल भयभीत । नित्य येऊन चरणी शिर नमवीत ।। ७
भुजबळे करी विश्वासी वश । न राखिले स्वतंत्र कवणास ।
नृप मांडलिक मुकूटमणि दशशीर्ष । निज इच्छेनुसार राज्य करी ।। १८२ (क)
देवयक्षगंधर्वनागनरकिन्नर । तयांच्या कन्या सुंदर ।
बाहुबळे अन्य कुलीन नारी सुंदर । जिंकून तयांसी विवाह करी ।। १८२ (ख)
जे कथिले इंद्रजितासी । पहिलेचि करून ठेवी तो त्या कार्यासी ।
दिधली प्रथमचि आज्ञा जयांसी । ऐका आता तयांची करणी ।। १
भीमरूप दिसती पापी निशाचर । त्रस्त करिती ते सुरनिकर ।
देती अति उपद्रव असुर । मायाबळे घेती विविधरूपे ।। २
जेणे होईल धर्म निर्मूळ । ते करिती सर्व वेदप्रतिकूल ।
ज्या ज्या देशी द्विजधेनु दिसतील । त्या त्या नगरग्रामा लाविती आग ।। ३
कोठेही न दिसे शुभ आचरण । नसे देव विप्र गुरू यांसी मान ।
न दिसे हरिभक्ति तप वा ज्ञान । न ऐकती वेदपुराण स्वप्नीही ।। ४
जपतपयोग । यज्ञभाग वार्ता । वैराग्य ऐकता । दशानन ।
चाले न कुणाचे । धावे तो उठून । करी विध्वंसन । सकलांचे ।
भ्रष्ट आचरण । ऐसे संसारात । कानी न पडत । धर्मवार्ता ।
वेदशास्त्र सांगे । तया देई त्रास । घालवी तयास । अन्य देशी ।। १
न वर्णवे अनीति घोर । जी करिती क्रूर निशाचर ।
तयांची अति प्रीति हिंसेवर । नसे सीमा पापासी ।। १८३
वाढले चोर जुगारी खल बहुत । जे परधनपरस्त्रीलंपट ।
मातापिता देवांसी न मानीत । घेती सेवा संतांकडून ।। १
जयांचे ऐसे आचरण भवानी । ते जाणावे सर्व निशाचर प्राणी ।
बघून अतिशय धर्मग्लानी । धरणी व्याकुळ भयभीत ।। २
गिरिसरितासिंधुभार मज न इतुका । भासे मज परद्रोह्याचा जितुका ।
धरणी धर्मासी विपरीत देखता । न वदू शके ती भीति रावणाची ।। ३

करी हृदयी विचार धेनुरूप धरून । गेली जेथे होते सुरमुनिगण ।
सांगे निज दुःख रोदन करून । परि न करू शके काही कुणीही ।। ४
जाती ब्रह्मलोका । सुरमुनिगण । गंधर्व मिळून । तदा वेगे ।
भयशोके दुःखी । धेनु तनुधारी । धरणी विचारी । तया संगे ।
ब्रह्मा सर्व जाणे । करी अनुमान । नसे ते आधीन । माझे काही ।
दासी तूं जयाची । तोच अविनाशी । साहाय्य दोघांसी । देईल तो ।। १
ब्रह्मा म्हणे हे धरती मनी धीर धरून । करावे तू प्रभुपदाचे स्मरण ।
प्रभु जाणती भक्ताची विपत्ति दारुण । करितील तिचा नाश त्वरित ।। १८४
सुर बैसोनी करिती विचार । कोठे भेटेल प्रभु कैसा करावा पुकार ।
कोणी म्हणे गाठावे वैकुंठपुर । प्रभुनिवास क्षीरसागरी म्हणे कोणी ।। १
जयाच्या हृदयी जैसी भक्ति प्रीती । प्रभु प्रकटे तेथे सदा तैशा रीती ।
त्या सभेमाजी होतो मी हे पार्वती । समय जाणून वदलो मी ।। २
हरि व्यापक सर्वत्र समान । मी जाणे होई प्रेमे प्रकट भगवान ।
स्थळ कोठे कैचे प्रभुविण । देश काळ दिशा वा उपदिशांत ।। ३
प्रभु चराचरमय अनासक्त । गुप्त काष्ठाग्निसम प्रेमे प्रकटत ।
सकलांसी रुचले मम मत । साधु साधु म्हणून ब्रह्मा वाखाणी ।। ४
ऐकताच हे ब्रह्मचास हर्ष मनात । तनु पुलकित अश्रु नयनांत ।
तो मतिधीर होऊन सावधान चित्त । कर जोडून करी स्तुती ।। १८५
जय भगवंत । प्रणतपालक । सुरांचा नायक । सुखदाता ।
जय असुरारी सिंधुसुताकांत । गोद्विजांचे हित । तुझे हाती ।
सुरमहीपती । अद्‌भुतकरणी । जाणत न कोणी । तुझे मर्म ।
करा अनुग्रह । सहज दयाळा । परम कृपाळा । आम्हांवरी ।। १
आनंद स्वरूप । जय अविनाशी । सर्वांतरवासी । सर्वव्यापी ।
अज्ञेय स्वरूप । चरित पुनीत । मायाविरहित । मुकुंदा तू ।
मोहासी सांडिती । असती विरागी । अति अनुरागी । मुनिवृंद ।
तेची मुनिवर । निशिदिनी ध्याती । गुणगण गाती । अनंताचे ।
सच्चिदानंद तू । तूची दयाघन । जय कृपाघन । जय जय ।। २
न घेता साहाय्य । त्रिसृष्टि सृजन । नसे दुजा कोण । प्रभुविण ।
आम्ही न जाणत । पूजा वा भक्तीस । आम्हांवरी लक्ष । ठेवो हरी ।
संसाराचे भय । तयाचे भंजन । दासांचे रंजन । करी सदा ।
कायावाचाकर्मे । त्यजून मानासी । शरण प्रभूसी । सुरगण ।। ३

शेषऋषिवर । वेद सरस्वती । कोणी न जाणती । अनंतासी ।
दीनांवरी प्रेम । वेद ते पुकारी । भगवान हरि । दया करो ।
भववारिधीसी । पर्वत मंदर । तू गुणमंदिर । सुखपुंज ।
मुनिवरसिद्ध । सुर भयभीत । माथा नमवीत । प्रभुपदी ।। ४
धरासुर भयभीत जाणून । ऐकून तयांचे भक्तिपूर्ण वचन ।
वाणी गंभीर होई गगनातून । शोक संदेह दूर करी ।। १८६
भीति न धरावी हे मुनि सिद्धसुरेश । तुम्हांस्तव घेईन मी नरवेष ।
मम अंशासह मनुज अवतारास । धारण करीन मी पवित्र सूर्यवंशी ।। १
कश्यप अदिति करिती महातपास । पूर्वीच दिधला वर मी तयांस ।
घेऊन दशरथ कौसल्यारूपास । अयोध्येत प्रकटले नरभूप ।। २
तयांचे गृही घेईन अवतार । रघुकुलतिलक बंधुरूपे चार ।
नारदवचनपूर्ति हाच निर्धार । अवतरेन मम पराशक्तीसह ।। ३
सकल भूमीचा भार वाहीन । निर्भय व्हा हो तुम्ही सुरगण ।
ही ब्रह्मवाणी श्रवण करून । त्वरित वळले सुर शांतचित्ते ।। ४
तंव ब्रह्मा समजावी धरणीस । झाली अभय आला हृदयी विश्वास ।। ५
विरंचि गेले निजलोकासी । ऐसे सांगून सुरगणांसी ।
घेऊन महीवर वानर तनुसी । हरिचरणाची सेवा करा ।। १८७
सुर जाती निजधामासी । धरतीसह सकला लाभे शांति मनासी ।
संतुष्ट ऐकून ब्रह्मयाचे आज्ञेसी । लागती झडकरी निजकार्या ।। १
वानर अवतार घेती पृथ्वीवर । महाप्रतापी बलवान अपार ।
तयांची आयुधे गिरीतरुनख साचार । हरीची वाट पाहती मतिधीर ।। २
गिरी काननी वसती कपिगण । निजसेना सुंदर सज्ज करून ।
केले मी हे रुचिर कथन । ऐका आता मध्येच सोडले ते ।। ३
रघुकुलमणि नृप अयोध्येत । दशरथ नामे वेदविख्यात ।
शारंगपाणी भक्ति हृदयात । धर्मधुरंधर गुणी ज्ञानी ।। ४
तयाच्या प्रिय कौसल्यादि पत्नी तीन । पवित्र अति तयांचे आचरण ।
पतीस मानिती देवासमान । हरिपदकमली दृढ भक्ती ।। १८८
एकदा भूपति मनात । उपजला खेद मज न सुत ।
नृप मग गुरुगृही जाऊन त्वरित । चरण धरून विनंति करी ।। १

निज सुखदुःख कथिले गुरूसी । वसिष्ठ बहुपरि समजाविती तयासी ।
होतील सुत चार धरावे धीरासी । जे भक्तभयहारी त्रैलोक्यी विदित ।। २

वसिष्ठ बोलाविती श्रृंगी ऋषीसी । करिती ते पुत्रकामेष्टि यज्ञासी ।
मुनि सद्भावे देती आहुतीसी । अग्नि प्रकटे हविष्यान्न घेऊन ।। ३

जे विचार वसिष्ठ हृदयात । ते साधले तू सर्व निश्चित ।
हवि विभागून जिला जैसा उचित । दे आता नृपा तैसा जाऊन ।। ४

ऐसे सकल सभेसी समजावून । पावती अग्निदेव अंतर्धान ।
नृप परमानंद मग्न । हर्ष हृदयी समावेना ।। १८९

तंव राया प्रिय राणीसी बोलाविती । कौसल्यादि तेथे चालून येती ।
अर्ध भाग कौसल्येसी देती । शेष अर्ध्याचे केले उभय भाग ।। १

नृप एक भाग देती कैकेयीस । सम विभागती पुन्हा शेष हवीस ।
प्रसन्न करिती देववून सुमित्रेस । कौसल्या कैकेयी हस्तांनी ।। २

राहिल्या सर्व गर्भवती नृपनारी । हृदयी हर्षित सुखी बहुत यापरी ।
जव अवतरला गर्भात हरी । सुखसमृद्धि लाभली जनतेस ।। ३

राज्ञी सुशोभित करिती भवन । शोभा शील तेज खाण ।
काळ लोटला काही ऐसा सुखपूर्ण । आला समय प्रभु प्रकट होण्याचा ।। ४

योग लग्न ग्रह तिथि सकल । दिसती ते पूर्ण अनुकूल ।
हर्षित सृष्टि चलअचल । सुखमूळ असे रामजन्म ।। १९०

नवमी तिथि मधुमास पुनीत । शुक्लपक्ष हरिप्रिय अभिजित ।
माध्यान्ह न अति उष्ण वा शीत । काळ पावन लोकांस शांतिप्रद ।। १

शीतमंद सुगंध पवन । हर्षित सुर संतमन प्रसन्न ।
रत्नमय गिरि कुसुमित वन । स्रवती सरिता सुधाधारा ।। २

विरंचि उचित समय जाणून । चालले सुरांसह विमान सजवून ।
सुरगणपूर्ण विमल गगन । गंधर्व करिती गुणगाना ३

वर्षती सुमने ओंजळीतून । दुंदुभी निनादे गर्जे गगन ।
नागदेव मुनि करिती स्तवन । निज निज उपहार अर्पिती ।। ४

सुरसमूह करून स्तुती । गेले निज निज धामाप्रती ।
जगन्निवास प्रभु प्रकटती जगी । शांती देती अखिल लोका ।। १९१

कौसल्या हितासी । दिनांचा दयाळु । मनाचा कृपाळु । प्रकटला ।
मुनिमन हारी । अद्‌भुत रूपासी । पाहून मातेसी । हर्ष दाटे ।
शोभेचा सागर । नेत्रा अभिराम । तनु घनश्याम । विलसते ।
भुजात आयुधे । कंठी वनमाळा । भूषणे ल्यायला । रावणारि ।। १
दोन्ही कर जोडी । माता स्तुति करी । अनंता मुरारि । कैसे वानू ।
वेदपुराणात । मायागुणज्ञान- । अतीत अमान । कथियेला ।
श्रुति संत गाती । सुखाचा सागर । गुणांचा आगर । लक्ष्मीपति ।
भक्तप्रेमासाठी । जन अनुरागी । मम हितालागी । प्रकटला ।। २
रोमरंध्रामाजी । मायेने निर्मित । ब्रह्मांडे अनेक । वेद गाती ।
विवेकी पुरुष । दावी उपहास । कैचा गर्भवास । प्रभु करी ।
मातेच्या त्या ज्ञाना । हासले श्रीकांत । विविध चरित । वांछीतसे ।
मातेसी सांगती । प्रभु पूर्वजन्म । असो पुत्रप्रेम । माझे ठायी ।। ३
मोहित मति ती । बोले पुन्हा माता । टाक रे अनंता । स्वरूप हे ।
दावी शिशुलीला । दयाळा परम । सुख अनुपम । माऊलीसी ।
सुरभूप बाळ । ऐकून वचन । कर्कश रोदन । करी तदा ।
म्हणत तुलसी । रामाचे चरित । जन जे गातात । भवमुक्त ।। ४
विप्रधेनुसुरसंतहित । यास्तव प्रभु मनुजावतार घेत ।
तनु असे निज इच्छानिर्मित । मायागुण इंद्रियातीत ।। १९२
शिशुरोदनध्वनि सर्वा प्रिय अती । ऐकून राज्ञी लगबगे धावती ।
दासी संभ्रमे पळत सुटती । सकल पुरवासी आनंदित ।। १
पुत्रजन्म दशरथे कानी ऐकून । होई तया आनंद ब्रह्मानंदासमान ।
तनु पुलकित प्रेमपूरित मन । बुद्धीसी धीर देऊन उठती ते ।। २
होई शुभ जयाचे ऐकता नाम । तोच प्रभु आला गृही मम ।
नृप मनी आनंद परम । म्हणती वाजवा वाद्ये वाजंत्री बोलावून ।। ३
मग गुरू वसिष्ठासी बोलाविती । येती नृपद्वारी घेऊन द्विजांसी ।
जाऊन पाहती अनुपम बालकासी । रूपराशी गुणवर्णता न संपती ।। ४
नंदीमुख श्राद्ध करुनी । जातकर्मादि संस्कार भवनी ।
सुवर्ण धेनू वस्त्ररत्नमणी । नृप दान करिती विप्रांसी ।। १९३
ध्वजपताकातोरणे नगरी विलसती । न करवे वर्णन कैसी सजविती ।
होई गगनातून सुमनवृष्टी । ब्रह्मानंदी मग्न सकल लोक ।। १

जाती ललना वृंदवृंद मिळून । सहज शृंगार करून धावती उठून ।
कनक कलश शुभ द्रव्ये तबकी भरून । गात प्रवेशती भूपद्वारी ।। २
आरती करून वस्तु ओवाळती । वारंवार शिशुचरण धरिती ।
मागधसूत वंदीजन गायक गाती । गुण पावन रघुनायकाचे ।। ३
नृप सकलांस देती दान । मिळे जया ते करिती प्रदान ।
कस्तुरीचंदनकुंकुम पसरून । पथी तयांचा माखला चिखल ।। ४
घराघरांतून येती मंगल सूर । प्रकटे शोभा सुखकंद रघुवीर ।
नगरातील सकल नारीनर । होती सर्वत्र आनंदित ।। १९४
कैकेयीसुमित्रा राज्ञी दोन । सुंदर सुतासी देती जनन ।
ते ऐश्वर्यसुखसमृद्धि वर्णन । शेषशारदेसीही न करवे ।। १
अयोध्या सुंदर ऐसी सुशोभित । जणु निशा प्रभुमीलना येत ।
भानु देखता मन संकोचित । परि विचार करून संध्या जाहली ती । २
चंदनाचा धूप जणु तमधूसर । अरुणलाली उडणारा गुलालअबीर ।
नृपभवनकलश इंदु उदार । मंदिररत्नसमूह जणू तारांगण ।। ३
भवनी वेदध्वनी मधुर कोमल । वाटे सुखद जणु पक्ष्यांची किलबिल ।
भानु कौतुक बघता विसरला चाल । गेला एक मास कैसा न कळे तो ।। ४
मासभर हा दिवस एकच । मर्म तयाचे कोणी न जाणत ।
रथासह तिष्ठे भानु अयोध्येत । मग निशा कैसी मानावी ।। १९५
हे रहस्य न कळे कवणास । रवि चालला करीत गुणगानास ।
पाहती सुरमुनिनाग महोत्सवास । निघाले भवना वर्णित निजभाग्य ।। १
ऐक गिरिजा तव मति रामपदी रत । म्हणोनी कथितो तुज एक गुपित ।
मी काकभुशुंडीसंगे असता जात । मानव रूपाने न जाणिले कोणी ।। २
परमानंदे प्रेमसुखे फुलून । फिरलो मार्गातून देहभान हरपून ।
तयासच या शुभ चरित्राचे ज्ञान । ज्यावरी असेल रामकृपा ।। ३
ते समयी जे जैसे आले । भूपाने दिधले तया जे रुचले ।
धेनुगजरथअश्वहेमरत्न दिधले । तैशीच नानाविध वस्त्रे ।। ४
नृप करी संतुष्ट सकलांस । जन देती आशीर्वादास ।
तुलसीदासाचे हे स्वामी बाळईश । चारी पुत्र होवो चिरंजीव ।। १९६
दिन ऐसे काही जाती । न कळे दिनरात यांची गती ।
नृप ज्ञानी मुनीसी बोलाविती । नामकरण समय समीप जाणून ।। १

पूजा करून नृप वदती मुनीसी । ठेवावे नाम जे रुचेल मनासी ।
मुनि म्हणती नामे अनेक तयासी । परि कथितो मी यथामती ।। २
आनंदसिंधु सुखराशी । जयाचा एक कण सुखी करी त्रैलोक्यासी ।
शांतिदाता अखिल जगतासी । तो नामे राम सुखधाम ।। ३
जो विश्वाचे भरणपोषण करीत । तयाचे नाम असे भरत ।
जयाच्या स्मरणमात्रे शत्रुनाश निश्चित । तो वेदविख्यात नामे शत्रुघ्न ।। ४
रामप्रिय भ्राता शुभलक्षणधाम । जो सकल जगा आधार परम ।
तयाचे लक्ष्मण उदार नाम । ठेविले गुरु वसिष्ठांनी ।। १९७
ऐसे विवेके गुरु नाम योजीत । वदती नृपा वेदतत्त्व तव चारी सुत ।
मानिती सुख बाललीलारसात । जे मुनिधन शिवप्राण भक्तसर्वस्व ।। १
राम निज हितैषी स्वामी बाळपणापासून । दावी रामचरणी प्रेम लक्ष्मण हे जाणून ।
उभय भ्राते भरतशत्रुघ्न । दाविती प्रीति परस्पर स्वामीदासासम ।। २
जोडी सुंदर श्यामगौर वर्ण । दृष्ट काढिती माता लावण्य पाहून ।
चारी सुत शीलरूपगुणनिधान । तदपि अधिक सुखसागर राम ।। ३
कृपाचंद्रप्रकाश रामाच्या हृदयात । किरण तयाचे मनोहर हास्य सुचवीत ।
कधी कडेवरी कधी पाळण्यात । हे लाडक्या वदून माता कुरवाळी ।। ४
अज व्यापक ब्रह्म निरंजन । प्रभु विनोदरहित निर्गुण ।
तो प्रेमभक्तीस वश होऊन । खेळे कौसल्येच्या मांडीवरी ।। १९८
कामकोटिछबि श्याम शरीर । जणु नीलकंजजलदासम गभीर ।
अरुणपदपंकज नखज्योति सुंदर । जणु कमलदलावरी स्थिर मोती ।। १
पदतळ वज्रध्वजअंकुशचिन्हांकित । नूपुरध्वनि ऐकून मुनिमन मोहित ।
कटि किंकिणी उदर त्रिरेखांकित । जयाने देखिली तोच जाणे नाभि गभीर ।। २
विशाल भुज भूषणे विभूषित । छातीवर वाघनख अतिसुशोभित ।
रत्नहारपदके उरी रुळत । भृगुलांछन बघून मन लुब्ध ।। ३
कंबुकंठ हनुवटी सुंदर । अमित मदन लावण्य आननावर ।
शुभ्रदंतद्वय अरुण अधर । नासिका तिलक सौंदर्य कैसे वर्णावे ।। ४
गाल सुचारु कर्ण सुंदर । बोबडे बोल अति प्रिय मधुर ।
काळे कुरळे जावळ शिरावर । सावरून बहुप्रकार रचिले मातेने ।। ५
पिवळे झबले शोभे तनूवर । प्रिय लागे रांगणे जानुहस्तावर ।
तोचि जाणे जो पाही स्वप्नी सुंदर । न वर्णवे तें रूप श्रुतिशेषा ।। ६

सुखनिधान मोहरहित । ज्ञानवाणीइंद्रियातीत ।
दावी बाललीला पुनीत । मातापित्याशी प्रेमवश होऊन ।। १९९
ऐसे जगत्पितामाता राम । अयोध्यावासी जनासी सुखधाम ।
जयांचे रघुनाथचरणी प्रेम । हे भवानी तयांची ही प्रत्यक्ष गती ।। १
रघुपति विन्मुख जे कोटि यत्न करिती । ते भवबंधनातून न सुटती ।
मायेसी प्रभूची अति भीति । केले वश जिने चराचरा ।। २
प्रभु भ्रूकटिवलासे नाचविती मायेस । ऐसा प्रभु टाकून भजावे कोणास ।
कायावाचामने सोडून चतुरतेस । भजताच करील कृपा रघुराज ।। ३
ऐसी विविध बालक्रीडा करून । सुख देती सकल पुरजना रघुनंदन ।
माता डोलवी कधी मांडीवरी घेऊन । कधी झुलवी प्रेमे पाळण्यात ।। ४
कौसल्या होई प्रेममग्न । न कळे कैसे जाती रात्रदिन ।
माता पुत्रप्रेमाधीन होऊन । करी गान बाललीलांचे ।। २००
जननी एकदा रामासी न्हाऊ घालून । झोपवी पाळणी तीटकाजळ करून ।
हेतु मनी कुळदेवतापूजन । तदा जाई सत्वर स्नानासी ।। १
पूजन करूनी नैवेद्य समर्पीत । स्वये जाई मग पाकशाळेत ।
मागुती पूजास्थानी येत । तव भोजन करिता देखे पुत्रासी ।। २
जाई जननी शिशुपाशी भयभीत । पाहिला बाळ पाळण्यात निद्रिस्त ।
पुन्हा देखिला भोजनकरिता सुत । तंव थरथरा कापे अधीर मनी ।। ३
उभय स्थळी पाहिले मी बालक । हा मम मतिभ्रम वा अविवेक ।
बघून व्याकुळ मातेसी रघुनायक । प्रभु तदा करिती मधुर हास्य ।। ४
प्रभु दाविती मातेसी प्रचंड । निजरूप अद्‌भुत अखंड ।
रोमरोमाप्रति कोटिब्रह्मांड । दिसती प्रभूच्या रूपावरी ।। २०१
पाहिले अगणित रविशशिचतुरानन । बहु गिरी सिंधुसरिता महीकानन ।
काळकर्मस्वभाव गुणज्ञान । पाहिले ते कधी न ऐकिले जे ।। १
देखे अतिप्रबळ मायेसी । जी उभी सभीत जोडून करासी ।
पाहिला जीव नाचवी माया जयासी । पाहिली भक्ति जी सोडविते जीवा ।। २
तनु पुलकित मुखी न निघे वचन । पदी शिर नमविले नयन मिटून ।
मातेसी अति स्तिमित बघून । पुन्हा बाळरूप घेती श्रीराम ।। ३
स्तुति न करवे भयचकित माता । म्हणे जाणिला मी सुत जगत्पिता ।
समजावी तिज बहुपरि जगत्राता । माते न कुणा कथावी वार्ता ही ।। ४

कौसल्या विनवी वारंवार । मग जोडून निज कर ।
प्रभो तव मायेने अपार । मज न व्यापावे कदापी ।। २०२
बहुविध बाललीला हरि करिती । सेवका अति आनंद देती ।
कालांतरे कुमार मोठे होती । सुखी करिती आप्तजना ।। १
गुरु करिती चूडाकर्मसंस्कार । दिधले विप्रांसी दान अपार ।
ऐसे चरित परम मनोहर । चारी सुकुमार करीत फिरती ।। २
कायावाचाकर्मे जो अगोचर । तो प्रभु नृपअंगणी करी विहार ।
भोजनसमयी जंव बोलावी नृपवर । मित्रगणासी न येती सोडून ।। ३
कौसल्या जंव बोलावू जात । तंव प्रभु येती दुडुदुडु धावत ।
म्हणती वेद जया नेति शिव न पावे अंत । धावे बळेच जननी धरण्यास तया ।। ४
धुळीने माखलेल्या तनूने प्रभु येता । नृप हासून बैसवी मांडीवर सुता ।। ५
प्रभु भोजन करिती परि चंचल मन । संधि साधून सर्वत्र न्याहाळून ।
दहिभात मुखासी माखून । पळती हर्षे आरोळचा देत ।। २०३
बाळरामचरित्र सरळ सुंदर अति । शारदाशेष शंभुश्रुति गाती ।
जयांची न बाललीलांवरी प्रीती । विधाता घडवी तया भाग्यहीन ।। १
जंव भ्राते कुमारदशेत येती । तंव मौजीबंधन मातापिता करिती ।
राम अध्ययनास्तव गुरुगृही जाती । अवगत सर्व विद्या अल्पकाळी ।। २
चारी वेद जयाचा सहज श्वास । तो प्रभु अध्ययन करी कौतुक जगास ।
करिती राजकुमार सकल नृपक्रीडेस । विद्याविनयनिपुण गुणशील ते ।। ३
करतळी अति शोभे धनुष्यबाण । मोहित चराचर रूप पाहून ।
स्तिमित नरनारी तेथील प्रेमे देखून । ज्या पथावरी खेळती चारी बंधु ।। ४
अयोध्येतील नगरवासी । स्त्रीपुरुष आबालवृद्धांसी ।
प्रिय प्राणाहून या सकलांसी । कृपाळु श्रीरामचंद्र ।। २०४
बंधुसखा सवे घेवोनी । श्रीराम जाती नित्य मृगयेसी वनी ।
मृग वधिती मनी पावन जाणोनी । आणून दाविती प्रतिदिनी नृपासी ।। १
जो मृग वधिती रघुनंदन । तो जाई सुरलोकी तनु सोडून ।
मित्रअनुजासह करिती भोजन । पाळिती आज्ञा मातापित्यांची ।। २
जेणे होतील सुखी नगरजन । करिती लीला तैसी कृपानिधान ।
ऐकती वेदपुराण मन लावून । मग स्वये समजाविती अनुजांसी ।। ३

प्रातःकाळी उठती रघुनंदन । मातापिता गुरूंसी करिती वंदन ।
नगरातील करितो कामे आज्ञा घेऊन । चरित्र बघून भूपति हर्षित ।। ४
अगम्य व्यापक अज निर्गुण राम । नसे तयास रूप वा नाम ।
दाविती चरित्र बहुविध अनुपम । भक्तहितास्तव भगवान ।। २०५
चरित्र गाइले मी हे विस्तृत । ऐका मन लावून पुढील वृत्तांत ।
वनी आश्रम जाणून पुनीत । वसती विश्वामित्र महामुनि ज्ञानी ।। १
जपयज्ञयाग मुनि करिती । पाहून यज्ञ निशाचर धावती ।
मारीच सुबाहु यांचे तया भय अति । त्रास देऊन दुखविती मुनीसी ।। २
चिंता व्यापी गाधिसुताचे मन । पापी असुरांसी न मृत्यु हरिविण ।
प्रभु अवतरले करण्या महिभार हरण । ऐसा विचार मनी करिती मुनी ।। ३
या मिषे मी घेईन प्रभुपददर्शन । उभय बंधूंस आणीन विनंति करून ।
ज्ञानवैराग्य सकल गुणखाण । तो प्रभु पाहीन नेत्रभरे ।। ४
यापरी करून मनोरथ बहुत । मुनि तेथून निघती त्वरित ।
स्नान करून शरयु जलात । पोचले नृपदरबारी ते ।। २०६
जंव नृपा कळले मुनिआगमन । मीलनासी जाती घेऊन विप्रगण ।
दंडवत घालून करिती सन्मान । बैसविती आणून निज आसनी ।। १
पूजा करिती चरण प्रक्षाळून । म्हणती न धन्य आज दुजा मजसमान ।
करविले बहुप्रकार भोजन । तेणे जाहले मुनिवर प्रसन्न ।। २
मग घालून चारी सुतांसी चरणी । मुनि हरपले देहभान रामा पाहुनी ।
मग्न जाहले मुखशोभा देखुनी । पूर्ण चंद्रावरी जणु चकोर लुब्ध ।। ३
असुरगण उपद्रव देती मजसी । आलो म्हणोनी साहाय्य घेण्यासी ।
अनुजासह दे रघुनाथ मजसी । होईन सनाथ मी निशाचरवधे ।। ४
हे नृपा प्रसन्न मने द्यावे तयांना । सांडून निज मोहअज्ञाना ।
साधावे सुतांच्या बहु कल्याणा । धर्मयशप्राप्ति तेणे तुज होईल ।। २०७
नृप परिसती अप्रियवचन । कंपित हृदय मुखकांति म्लान ।
वदती अविचारे केले कथन । हे विप्र वृद्धावस्थी सुत चार ।। १
मागा भूमिधेनुधनकोश । हर्षे अर्पीन सकल अशेष ।
नसे अन्य प्रिय काही देहप्राणासरिस । देईन हे मुनि तया एका क्षणी ।। २
हे स्वामी सुत मज प्रिय प्राणासमान । राम प्रिय विशेष कैसा देईन ।
कोठे ते निशाचर घोर भयाण । कोठे परम सुंदर सुत किशोर ।। ३

ऐकून प्रेमरसपूर्ण नृपवाणी । हृदयी हर्षित मुनि ज्ञानी ।
तंव वसिष्ठ बहुपरि समजावुनी । घालविती नृपाचा संदेह ।। ४
आदरे बोलाविती उभय पुत्रांसी । उपदेश करून धरिती पोटाशी ।
नाथा सुत मम प्राण वदती मुनीसी । आता पिता तुम्हीच न अन्य कोणी ।। ५
पुत्रांसी उदंड आशीर्वाद देऊन । करिती तयांना मुनींच्या स्वाधीन ।
नमिती सुत जननींचे चरण । जाऊन तयांच्या महालांत ।। २०८ (क)
ते पुरुषसिंह वीर दोन । मुनिभयहरणा चालले मनी प्रसन्न ।
अखिल विश्वकारणाचे कारण । कृपासिंधु मतिधीर ते ।। २०८ (ख)
विशाल उरबाहु अरुण नेत्र । नीलजलजश्याम तमालसम शरीर ।
कसले कटी पीत वस्त्र भाता वर । सुंदर चापबाण उभय करी ।। १
श्याम गौर सुंदर भ्राते दोन । विश्वामित्रासी परम निधान ।
चिंतिती जाणले मी द्विजभक्त भगवान । प्रभु मम हितास्तव त्यजती पिता ।। २
पथी जाता मुनि त्राटिका बघती । ऐकून ध्वनि क्रोधे धावे ती ।
राम एकशरे तिज वधती । मुक्ति देती जाणून दीन ।। ३
मग ऋषि निजनाथास ओळखून । विद्यानिधीस त्या करिती विद्यादान ।
जेणे तनु होई तेजस्वी बलवान । करी क्षुधातृष्णा संपूर्ण नष्ट ।। ४
सर्व शस्त्रास्त्रे समर्पण करून । जाती निज आश्रमी प्रभूस घेऊन ।
देती कंदमूळफळांचे भोजन । जाणून प्रभु भक्तकैवारी ।। २०९
सुप्रभाती प्रभु सांगती मुनीस । निर्भये करावे यज्ञयागास ।
ऐकून मुनि करिती होमहवनास । यज्ञरक्षण करिती स्वये प्रभु ।। १
मारीच क्रोधे धावे वार्ता ऐकून । तो मुनिद्रोही सवे निशाचर घेऊन ।
मग फेकती राम फळाविण बाण । जेणे शत योजन सिंधुपार गेला तो ।। २
अग्निबाणे वधिले सुबाहूस । लक्ष्मण संहारी निशाचरसेनेस ।
असुर वधून केले निर्भय द्विजांस । तंव सकल सुरमुनि करिती स्तुती ।। ३
तेथे पुन्हा काही दिन रघुराया । राहून करिती विप्रांवर दया ।
भक्तिहेतुस्तव मुनि कथिती तया । कथापुराण प्रभूस ज्ञात जरी ।। ४
मुनि आदरे कथिती समजावून । प्रभो पाहावा धनुर्यज्ञ जाऊन ।
रघुकुलनाथ धनुष्ययज्ञ ऐकून । हर्षे निघाले मुनिसंगे ।। ५
मार्गी एक आश्रम पाहती । खगमृगजीवजंतु तेथे नसती ।
शिळा पाहून प्रभु मुनीस पुशिती । मग मुनि कथा कथिती विस्तारे ।। ६

गौतमपत्नी असे शापवश । धरी मग ती शिळादेहास ।
उत्सुक ती प्रभुचरणरजस्पर्शास । हे रघुवीर तिजवरी कृपा करा ।। २१०
पावन चरण । शोकास सारिती । शिळेस स्पर्शती । भगवान ।
पाही ती रामास । सुखाचे कारण । करासी जोडून । उभी ठाके ।
प्रेमाने अधीर । तनु पुलकित । शब्द न निघत । मुखातून ।
महाभाग्यवान । चरण धरी ती । नेत्रांतून येती । अश्रुधारा ।। १
कृपाभक्ति पावे । प्रभूसी जाणिले । धीरासी धरिले । अहिल्येने ।
निर्मल वाणीने । प्रभुस्तुति करी । ज्ञानगम्य हरि । जयजय ।
प्रभु तू पावन । अशुभ मी नारी । दशाननअरि । सुखदाता ।
राजीव लोचन । भवभय हारी । शरण मी नारी । रक्षी प्रभो ।। २
मुनि शाप देती । केले माझे भले । शापा मी जाणिले । अनुग्रह ।
पाही नेत्रभरे । हरि मुक्तिदाता । दर्शनमहत्ता । शंभु जाणे ।
करिते मी भोळी । विनंति प्रभूस । न मागे वरास । अन्य आता ।
पदकमलांचे । प्रेमरसपान । मधुकरमन । याचीतसे ।। ३
प्रकटत गंगा । पदी ज्या पुनीत । महेश धरीत । शिरावरी ।
हरीचे ते पद । ब्रह्मा जे पुजीत । शिरी मी ठेवीत । कृपासिंधो ।
ऐसी स्तुति करी । गौतमाची नारी । वारंवार धरी । हरिपदा ।
पावे तोच वर । मना जो रुचत । पतिलोकी जात । आनंदाने ।। ४
ऐसा प्रभु दीनदयाळ । दावी दया कारणाविण ।
हे शठमना कपट जंजाळ त्यजून । भजावे तू प्रभूसी तुलसी म्हणे ।। २११
मुनि जाती रामलक्ष्मणांसहित । जेथे जगत्पावन गंगा वाहत ।
सुरसरिता कैसी महीवर येत । विश्वामित्र कथिती ती कथा ।। १
तंव ऋषिसहित प्रभु करिती स्नान । विप्रांसी विविध दाने देऊन ।
मार्ग आक्रमती मने प्रसन्न । पोचती जनकपुरी निकट ।। २
नगर अति रम्य पाहोनी । हर्ष दाटे रामलक्ष्मण मनी ।
वापीकूपसरसरितामधुनी । जल सुधासम सोपान रत्नांचे ।। ३
गुंजारव करिती मधुमत्त भृंग । मधुर रव करिती बहुरंगी विहंग ।
वाहे त्रिविध समीर अति सुखद । विकसती कमळे नाना वर्णांची ।। ४

सुमनवाटिका बागवन शोभत । भरलेले फळांफुलांनी सुपल्लवित ।
नगराच्या चौपरिसरात । विहंगनिवासस्थाने विपुल ।। २१२
कैसे वर्णावे ते सुंदर नगर । मन जेथे जाई तेथे लुब्ध तयावर ।
असती चारु रोचक बाजार । रत्नमय छज्जे जणु ब्रह्मारचित ।। १
कुबेरासम धनिक श्रेष्ठ व्यापारी । नाना वस्तु घेऊन बैसती बाजारी ।
पथचौक सुबक सुखकारी । संमार्जित संतत सुगंधी द्रव्याने ।। २
मंगलमय सकल मंदिरे सुंदर । जणु मदन रेखांकित चित्रे तयांवर ।
शुचि सुशील नगरनारीनर । धर्मशील ज्ञानी गुणवंत ।। ३
जेथे अति अनूप जनकनिवास । स्तिमित सुर देखून तेथील विलास ।
चित्तचकित देखता राजकोटास । जणु रोखित शोभा त्रिभुवनांची ।। ४
शुभ्र धामास द्वारे रत्नखचित । सोनेरी नानाविध सुरचित ।
सीतेचा महाल सुंदर शोभिवंत । कैसी तयाची शोभा वर्णावी ।। २१३
राजद्वार कणखर वज्रमय सुंदर । जमती तेथे भूपभाटनिकर ।
असती जेथे अश्वगजरथ अपार । ऐशा वाजीगजशाला विशाल ।। १
बहुत सचिव सेनानी शूर । सदने तयांची जणु भूपतिमंदिर ।
नगराबाहेरी वाहती सरितासर । उतरती तयां समीप विपुल महीप ।। २
एक सुंदर आंबराई तेथे बघती । अनुकूल सुखसोयी सकल असती ।
मम मन सांगे कौशिक वदती । उतरावे हे रघुवीरा एथेच । ३
बरे नाथ-म्हणती कृपानिकेत । राहती तेथे मुनिवृंदांसमवेत ।
तव जनकनृपासी समाचार मिळत । ऋषि विश्वामित्र आगमनाचा ।। ४
संगे घेऊन सचिव ज्ञानी लोक । गुरु शूर वीर द्विज अनेक ।
मुनिमीलना जाई नृप जनक । अति प्रसन्न मुदित मने ।। २१४
मुनिचरणी नृप ठेवी मस्तक । आशीर्वाद देती मुनि कौशिक ।
वंदून विप्रवृंदास जनक । आनंदित जाणून महाभाग्यवान ।। १
कुशल प्रश्न करून वारंवार । बैसविती नृपास विश्वामित्र ।
तोच फुलवाटिका पाहुन सुंदर । आले उभय भ्राते ते समयी ।। २
श्यामगौर मृदु वय किशोर । लोचना सुखद विश्वचित्तचोर ।
उत्थापन देती सकल येता रघुवीर । मग विश्वामित्रासमीप बैसविती ।। ३
बंधुद्वय पाहता सुखी सकल । रोमांचित तनु नयनी प्रेमजल ।
बघून मूर्ति मनोहर कोमल । जाहला विशेष विदेही विदेहजनक ।। ४

प्रेमनिमग्न नृप जनक । मग धीर धरून दाविती विवेक ।
मूनिपदांवर ठेवून मस्तक । बोलती वाणी गद्‌गद गभीर ।। २१५
सांगा कोण ही सुंदर बालके नाथ । मुनिकुलभूषण वा नृपकुलपालक ।
वा उभय वेषे येई तोच ब्रह्मव्यापक । नेति नेति बोलती वेद जया ।। १
स्वभावे मम विरक्त मन । परि मी मुग्ध जणु चकोर चंद्रा पाहून ।
न ठेवावे गुप्त मजपासून । पुसतो मी हे सद्‌भावे ।। २
पाहता बालका उपजे अनुराग । मन बळेच करी ब्रह्मसुख त्याग ।
मुनि हसून म्हणती तुम्ही कथिता उचित । वचन तुमचे मिथ्या न होईल ।। ३
हे प्रिय सकल प्राणीमात्रांस । हसती प्रभु ऐकून वाणीस ।
दशरथसुत भूषण रघुकुलास । पाठवी नरेश मम हितास्तव ।। ४
बंधुवर उभय लक्ष्मणराम । रूपशीलबलधाम ।
असुरांसवे करिती संग्राम । यज्ञाचे रक्षण करिती जगसाक्षी ।। २१६
म्हणती नृप आपुले पाहून चरण । न करू शके मम पुण्यप्रभाववर्णन ।
श्यामगौर सुंदर भ्राते दोन । आनंदासही देती आनंद ।। १
तयांची बंधुप्रीति अतिपावन । मना रुचते परि न करवे वर्णन ।
हे स्वामी वदती जनक हर्षित होऊन । ब्रह्मजीवांपरि यांचे सहज प्रेम ।। २
बघती नृप प्रभूसी वारंवार । हृदयी अति उत्साह पुलकित शरीर ।
मुनीस स्तवून ठेविती पदी शिर । मग घेऊन जाती नगरी नृपेश ।। ३
सुंदर सदन सुखद सर्वकाळ । ते निवासस्थान देती भूपाळ ।
पूजासेवादि करून सकल । जाती राया गृही आज्ञा घेऊन ।। ४
ऋषिसंगे रघुवंशभूषण । करिती विश्राम घेऊन भोजन ।
लक्ष्मणासह बैसती कृपानिधान । तव उरला एक प्रहर दिन ।। २१७
लालसा विशेष लक्ष्मण उरी । जाऊन पाहावी जनकपुरी ।
मुनीपासून संकोच प्रभूभय परी । प्रकट न वदता मनी हसे ।। १
जाणती राम बंधूचे मन । भक्तवात्सल्य येई हृदयी उसळून ।
मग आज्ञा गुरूंची घेऊन । वदती सस्मित सविनय ।। २
हे नाथ लक्ष्मण नगरी पाहू इच्छित । परि संकोचभये प्रकट न करीत ।
नगरी दाखवून आणीन त्वरित । द्याल आपण जर आज्ञा ।। ३
ऐकून मुनीश सप्रेम वदती । कैसी तू न पाळशील नीती ।
राखता तुम्ही धर्ममर्यादारीती । भक्तिवश सुखदाता भक्तांसी ।। ४

तुम्ही उभय बंधु सुखनिधान । जाऊन या सकल नगरी पाहून ।
सफळ करावे नगरजनांचे नयन । सुंदर वदने तुमची दावून ।। २१८
मुनिपदकमला बंधु वंदिती । जनलोचनसुखदाता मग जाती ।
बालकवृंद बघून लावण्य अती । सवे जाती मन नेत्र तयांचे लुब्ध ।। १
पीतवसन कसती भाता कटी । चारु चापशर हाती धरिती ।
तनूस अनुरूप चंदन उटी लाविती । ऐसी जोडी मनोहर श्यामगौर ।। २
सिंहासम गर्दन बाहू विशाल । उरी रुळे सुंदर गजमौक्तिक माळ ।
रक्तवर्ण कमलासम नेत्र लाल । तापत्रय निवारक चंद्रवदन ।। ३
कनकफुले कर्णी विलसती । ते बघताच जणू चित्त चोरती ।
दृष्टि मनोहर वक्र भृकुटी । शोभे तिलक भाळी जणु मोहोरछाप ।। ४
सुंदर शिरी चौकोनी टोपी रुचिर । केस कुरळे काळेभोर ।
बंधु दोघे नखशिखांत सुंदर । शोभा जेथे जैसी उचित तैसीच ।। २१९
भूपसुत आले बघावया नगर । पुरवासियांस जंव कळे समाचार ।
तें कामधाम टाकून धावती सत्वर । जणु जाती दरिद्री लुटण्यास निधी ।। १
सहजसुंदर बंधुद्वयास बघती । नयनसाफल्य पावून सुखी होती ।
भवनगवाक्षातून युवती । बघती प्रेमे रामरूप ।। २
सप्रेम कथिती परस्परांस वचन । सखे हे लावण्य जिंकी कोटि मदन ।
ऐसे लावण्य कोठे न केले श्रवण । सुरासुरनरनागमुनि यांत ।। ३
विष्णु चतुर्भुज विधाता चतुरानन । शिव पंचानन वेष भयाण ।
न अन्य देव इतुके लावण्यखाण । जे उपमेस्तव उचित तया ।। ४
वय किशोर वर्ण गौरश्याम । सुषमासदन सुखधाम ।
शत कोटि कोटि काम । ओवाळून टाकावे तनूवरी ।। २२०
हे सखे ऐसा तनुधारी कोण । जयास न होई मोह हे रूप पाहून ।
दुजी सप्रेम बोलली वचन । अग ऐक शहाणे मी ऐकिले ते ।। १
हे उभय दशरथाचे सुत । बालराजहंसांची जोडी शोभत ।
कौशिक मुनींच्या यज्ञाचे रक्षक । असुर जयांनी वधिले रणी ।। २
जो राजीवाक्ष श्यामशरीरवर्ण । तो मारीच सुबाहूचा मद करी हरण ।
कौसल्येचा सुत सुखखाण । धनुर्धारी तयाचे नाम राम ।। ३
जयाचा सुवेष जो गौरवर्ण किशोर । उभा रामापाठी करी चापशर ।
तो लक्ष्मण नामे लघु भ्राता सुंदर । ऐक सखे तयाची माता सुमित्रा ।। ४

उभय बंधु मुनिकाज करिती । मग अहिल्येसी उद्धारिती ।
आता धनुष्ययज्ञ बघण्या उत्सुक अती। ऐकून वचन हर्षित अति नारी ।। २२१
दुजी बोले पाहून राम लावण्यरूप । हे सखे सीतेसी हा वर अनुरूप ।
जव देखेल तयासी भूप । बळेच करील विवाह पण सोडून ।। १
कोणी एक वदे भूपति यास जाणत । आदरे सन्मानिले मुनिसमवेत ।
सखे परि नृप पणास न सोडीत । दैववशे अविवेकी हटवादी ।। २
अन्य म्हणे जर ब्रह्मा समंजस असेल । ऐकिले देत सकळा उचित फळ ।
तर हा वर सीतेसी निश्चित मिळेल । गडे संदेह न यात तिळमात्र ।। ३
दैवयोगे येईल सुयोग जर । कृतकृत्य होतील सकल नारीनर ।
सखे या योगासी आम्ही ऐसे आतुर । की या नाते ते येतील कधी तरी एथे ।। ४
ऐक सखे जर हा विवाह न घडेल । तर कुमारदर्शन दुर्लभ होईल ।
जर पूर्वकृत पुण्य बहुत असेल । निश्चित येईल हा सुयोग ।। २२२
अन्य म्हणे सखे सत्य तव बोल । हा विवाह सकलांचे हित साधेल ।
दुजी बोले अगे किशोर कोमल श्यामल । परि शंकर चाप घोर कठोर ।। १
हे शहाणे दिसते सकल असमंजस । ऐकून वदे दुजी मृदु वाणीस ।
म्हणती कोणी कोणी ऐशा वचनास । हे दिसती लघु परि प्रभाव थोर यांचा ।। २
पदकमलधुळीचा स्पर्श पावून । पापी अहिल्या गेली तरून ।
हा विश्वास ना सोडावा चुकून । कैसा न तोडील तो शिवधनुष्य ।। ३
ज्या ब्रह्म्याने घडविले सुंदर सीतेस । त्यानेच रचिले सावळ्या वरास ।
हर्षित सकल ऐकून या वचनास । ऐसेची घडो बोलती मृदुवाणी ।। ४
सुमुखी सुनयना स्त्रीवृंद । वर्षती सुमने मने हर्षित ।
जेथे जेथे बंधु दोन जात । महा परमानंद तेथे तेथे ।। २२३
कुमार जाती नगराच्या पूर्व दिशेस । ज्या स्थानी रचिला मंडप धनुर्यज्ञास ।
देखती विस्तृत चारू फरसबंदीस । विमल वेदिका शोभे जयावरी ।। १
चहु बाजूला कांचन मंच विशाल । बैसतील तयावरी महीपाल ।
तयामागे भोवताली मंचमंडल । सुशोभित भव्य वर्तुळाकृति ।। २
काहीसे जे उंच सुंदर अधिक । बैसतील तेथे नगरलोक ।
बहुरंगी धवलधाम अनेक । विशाल मनोहर तया समीप ।। ३
यथायोग्य कुळानुसार स्थानी । बघतील नारी तेथे बैसोनी ।
आदरे नगरबालक वचन वदुनी । दाविती यज्ञमंडप प्रभूस ।। ४

या मिषे शिशू होऊन प्रेमवश । प्रभूच्या अंगासी करिती स्पर्श ।
तयांची रोमांचित तनू होई हर्ष । जंव ते न्याहाळती बंधूद्वय ।। २२४
शिशु जाहले प्रेमवश राम जाणती । सप्रेम मंडपास स्तविती ।
शिशु निज रुचिअनुसार पाचारती । तंव जाती बंधु स्नेहे समीप । १
राम दाविती अनुजासी रचना । बोलून मृदु मनोहर वचना ।
जी माया रची ब्रह्मांडभुवना । लव निमिषात जयाच्या आज्ञेने ।। २
भक्तिस्तव दीनदयाघन । स्तिमित होती यज्ञशाळा पाहून ।
गुरूपाशी जाती कौतुक बघून । विलंब जाणून मनी भीति ।। ३
जयाचे भये वाटे भीति भीतीस । ते प्रभु भक्तीचा प्रभाव दाविती शिशूंस ।
प्रेमे मधुर कथा कथिती तयांस । मग बळेच घेती निरोप ।। ४
सभय सप्रेम विनीत । उभय बंधु अति संकोचित ।
गुरूपदकमली ठेवून मस्तक । बैसती आज्ञा घेऊन ।। २२५
संध्यासमयी मुनि आज्ञा देती । मग सकल संध्यावंदन करिती ।
रुचिर रजनीचे दोन प्रहर होती । कथितां इतिहासपुराणकथा ।। १
तंव मुनींनी जाऊन केले शयन । बंधु उभय चेपती गुरुचरण ।
विरागी करिती जपयोगसाधन । जयाच्या पदकमलप्राप्तीस्तव ।। २
उभय बंधु जणू प्रेमा जिंकिती । प्रेमे गुरुपदकमला चुरती ।
जंव वारंवार मुनि आज्ञा देती । तंव रघुवीर जाती शयनासी ।। ३
चेपी रामपद हृदयी लावून लक्ष्मण । भयप्रेमासहित परम सुख पावून ।
शयन करी पदकमला उरी धरून । जरी प्रभु सांगति वारंवार झोप बाळा ।। ४
निशा संपताच उठे लक्ष्मण । करून कुक्कुटरव श्रवण ।
मग उठती जगत्पती राम सुजाण । प्रातःसमयी गुरूंच्या पूर्वीच ।। २२६
प्रातर्विधि उरकून करिती स्नान । गुरूसी वंदिती नित्यकर्म करून ।
पूजासमय जाणून गुरुआज्ञा घेऊन । सुमनांस्तव निघती उभय बंधु ।
सुंदर भूपबाग बघती जाऊन । जेथे वसंत राही लुब्ध होऊन ।
शोभती बहुरंगी लतावितान । असती नाना मनोहर तरू ।। २
नव पल्लव पुष्पे फळे विलसती । निजवैभवे कल्पवृक्षासी लाजविती ।
शुकचातकचकोरकोकिळा कूजती । मयूर नृत्य करिती मोदभरे ।। ३
जलाशय सुंदर मध्यवाटिकेत । सोपान तेथे विचित्र रत्नजडित ।
बहुरंगी कमळे जळी चमकत । जळखग कूजती गुंजारव भृंगांचा ।। ४

विलोकून बागसरोवर । प्रभु बंधुसहित हर्षित साचार ।
ते आरामस्थान परम मनोहर । जे सुखदायक रामासी ॥ २२७
चौफेर पाहून पुसती माळीगणांस । मुदित मनें तोडिती पत्रफुलांस ।
आली सीता तेथे ते समयास । गिरिजापूजनास धाडिले मातेने ॥ १
सीतासंगे सख्या शहाण्या सुंदर । गाती गीत वाणी मनोहर ।
सरसमीप शोभे गिरिजामंदिर । मनमोहित ते न वर्णवे । २
करून सरी स्नान सखीसमवेत । गेली गौरीमंदिरी सीता मने मुदित ।
करून पूजन प्रेमे अधिक । मागे सुंदर वर निज अनुरूप ॥ ३
एक सखी सोडून सीतेस । गेली बघावया फुलवाटिकेस ।
तेथे बघून उभय बंधूंस । प्रेमे विवश आली सीतेसमीप ॥ ४
तिची ती दशा पाहुनी । पुलकित गात्रे जल नयनी ।
सांग गे कारण का तू प्रसन्न मनी । पुसती सकल सख्या तिजसी ॥ २२८
बाग बघावया आले दोन कुमार । सर्वपरी सुंदर वय किशोर ।
कैसे वर्णू ते उभय श्यामगौर । वाचा नयनहीन नेत्र विनावाणी ॥ १
सख्या सकल सुजाण ऐकून हर्षित । जाणती सीता अति उत्कंठित ।
एक वदे हे सखे तेच हे नृपसुत । ऐकिले जे आले काल मुनिसंगे ॥ २
घालून निजरूपमोहिनी । स्ववश केले नगरस्त्रीपुरुषांसी ।
ठायीं ठायीं जन वर्णिती लावण्यासी । ते देखावया योग्य देखणे आवश्यक ॥ ३
सीतेसी प्रिय वाटे सखीचे वचन । दर्शनालागी व्याकुळ लोचन ॥
चालली प्रिय सखीसी पुढे घालून । प्रीती पुरातन न जाणली कुणी ॥ ४
स्मरण होताच नारदवचनाचे । मनी उमजली प्रीति पावन ।
विलोकी चहु बाजूस चकित होऊन । जणू भयभीत बालमृगी ॥ २२९
कंकणकिंकिणिनूपुरध्वनि ऐकून । वदती लक्ष्मणा राम हृदयी चिंतून ।
जणु वाजवी दुंदुभी मदन । धरून मनी विश्वविजयहेतु ॥ १
ऐसे वदून वळती त्या बाजूस । जणु नयन चकोर सीतामुखशशीस ।
नेत्र स्थिरावती देखता सुंदरीस । संकोचे निमी त्यजी नेत्रपलक जणू ॥ २
होती अति सुखी सीतेचे सौंदर्य बघून । हृदयी स्तविती परि न मुखे येई वचन ।
विरंचि निज निपुणता मूर्त करून । दाखविती सकल विश्वाला ॥ ३
सुंदरतेला करिते सुंदर ती । लावण्यगृही जणु प्रकाशे दीपज्योती ।
सकल कवींच्या उपमा उच्छिष्ट असती । आता कोणती उपमा देऊ सीतेसी ॥ ४

सीतेची शोभा हृदयी वर्णून । प्रभू निजस्थितीचा विचार करून ।
बोलती समया अनुकूल वचन । अनुजासी अति पवित्र मने ।। २३०
हीच जनकतनया हे लक्ष्मण । धनुष्ययज्ञाचे कारण ।
गौरीपूजनास सख्यांसी घेऊन । प्रकाश देत फुलवाडीत फिरे ।। १
जिचे अलौकिक लावण्य पाहून । क्षोभे मम मन सहज पावन ।
विधाता जाणत तयाचे कारण । मम शुभांग स्फुरते ऐक हे तात ।। २
विदित सहज गुण रघुवंशीयांचे । मन कुमार्गी पद न ठेवी तयांचे ।
स्वप्नीही न देखिले मी मुख परस्त्रीचे । ऐसा मम मनी अढळ विश्वास ।। ३
रणी पाठ शत्रूसी न दाविती । न जाई मन दृष्टि परस्त्रीवरती ।
न मिळे नकार याचकासी कधी । ऐसे नरवीर जगी थोडे ।। ४
बोलत असता अनुजासी वचन । सीतारूपावरी लुब्ध राममन ।
मधुपापरी ते करी पान । मुखसरोजमकरंदरसाचे । २३१
स्तिमित सीता देखे चौफेर । मनी व्यथित न देखता राजकुमार ।
बालमृगनयना जेथे टाकी नजर । जणु वर्षती तेथे श्वेतकमळपंक्ती ।। १
तव लतेआड सख्या दाविती । श्यामगौर सुंदर अती ।
बघून रूपा लोचन मोहित होती । हर्षित जणु जाणिले निजनिधीस ।। २
रामाचे सौंदर्य पाहता स्तिमित लोचन । स्थिरावती पापण्या निश्चल नयन ।
अधिक प्रेम म्हणून हरपे देहभान । जणु देखे चकोरी शरच्चंद्रासी ।। ३
लोचनमार्गे हृदयी राम आणून । पलकद्वारे लावी ती सुजाण ।
जंव सख्या जाणती सीता प्रेमाधीन । तंव सलज्ज न बोले ती काही ।। ४
प्रकटले ते लताकुंजातून । ते अवसरी बंधु दोन ।
विमलचंद्र दोन मेघपटला सारून । जणु येती निघून बाहेरी ।। २३२
शोभेची सीमा सुंदर उभय वीर । नीलपीतकमलांची कांति तनूवर ।
मोरपंख विलसे शिरावर । खोविले कुसुमकळ्यांचे मधून गुच्छ ।। १
भाळी टिळा श्रमबिंदु शोभत । सुंदर कर्णभूषणे लावण्य विलसत ।
भृकुटिवक्र केस कुरळे रुळत । नव सरोजासम नेत्र आरक्त ।। २
हनुवटी नासिका कपोल सुंदर । हास्यविलास अति मनोहर ।
न वानू शके मुखकांति साचार । जया विलोकिता लाजती बहु मदन ।। ३
कंबुसम गर्दन उरी मणीमाळ । कामकलभशुंडासम भुज सीमाबळ ।
वाम करी द्रोण पुष्पांसह कोमल । सखे बहु सुंदर हा सावळा कुमार ।। ४

केसरीकटीवरी विलसे पीतांबर। शोभे ऐसा शोभाशीलसागर।
देखून भानुकुलभूषण कुमार। हरपती सख्या देहभान ।। २३३
एक चतुर सखी धरून धीर। वदे सीतेसी धरून कर।
का न घेसी पाहून भूप किशोर। मग करावे ध्यान गौरीचे ।। १
सलज्ज तंव सीता उघडी नयन। पाहिले सन्मुख रघुसिंह दोन।
नखशिखांत रामशोभा बघून। स्मरून पितापण मन क्षुब्ध तिचे ।। २
जंव प्रेमवश देखिले सीतेस। भय वाटे तंव सकल सख्यांस।
होईल उशिर जाऊ आता गृहास। येऊ उदयीक वदे सस्मित सखी। ३
रहस्यवाणीने सीता लज्जित। विलंब जाणून मातेचे भय मनात।
अति धीरे रामरूप हृदयी आणीत। पित्याच्या आधीन जाणून फिरे माघारी ।। ४
तरुमृगविहंगांचे मिष करून। पाही वारंवार रामरूप वळून।
रघुवरसौंदर्य पाहता निरखून। वाढे हृदयी बहुत प्रीती ।। २३४
निघाली श्याममूर्ति ठेवून हृदयात। शिवचाप कठिण जाणून व्यथित।
सीता जाता जंव प्रभु पाहत। जणु सुखस्नेहशोभागुणखाण ।। १
तंव राम परम प्रेम मृदु शाई घेऊन। चारु चित्तभिंतीवर चित्र ठेविती रेखून।
मग सीता भवानीमंदिरी जाऊन। कर जोडून करी स्तुती ।। २
जय जय गिरिवरराजकिशोरी। जय महेशमुखचंद्रचकोरी।
जगज्जननी दामिनिद्युतिगात्री। जय गजवदनषडाननमाता ।। ३
नसे तुज आदि मध्य वा अंत। वेद न जाणे तव प्रभाव अमित।
स्ववश विहारिणि विश्वा करी मोहित। भव उत्पत्तिस्थितिलयांचे कारण तू ।। ४
ज्या सती पतीस देव मानिती। तव प्रथम गणना तयात करिती।
शारदा शेष न वानू शकती। तव अमित महिमा हे माते ।। २३५
चारी अर्थ सुलभ तव सेवा करूनी। हे त्रिपुरारी प्रिये वरदायिनी।
तव पदकमलपूजन करूनी। हे देवी सुरनरमुनि सुखी होती। १
मम मनोरथ तू जाणसी। सकलांच्या हृदयनगरी वास करिसी।
म्हणोनी प्रकट न करी मम कामनेसी। ऐसे वदून वैदेही चरणा धरी। २
सीतेच्या विनयप्रेमावश होई भवानी। निखळे माळ हासली जगज्जननी।
सीता प्रसादमाळ शिरी ठेवी धरूनी। बोलली गौरी मग प्रसन्न मने। ३
सीते मम सत्य आशीर्वाद करी श्रवण। तव मनकामना होतील पूर्ण।
सदा शुभ सत्य नारदवचन। तोचि मिळेल वर जो तुजसी प्रिय ।। ४

रुचेल मनासी । सहज सुंदर । सावळा तो वर । मिळेल गे ।
जाणे तव प्रेम । करुणनिधान । असे तो सुजाण । रघुवीर ।
गौरीआशीर्वाद । जानकी ऐकत । मैत्रिणी हर्षित । सीतेसवे ।
तुलसी म्हणत । घडी घडी सीता । पुजून गिरिजा । जाई गृही ।। १
भवानी अनुकूल जाणून । सीता हर्षित न करवे वर्णन ।
तिचे वाम अंग पावे स्फुरण । जे मूळ मंजुळ मंगलांचे ।। २३६
सीतेचे सौंदर्य मनी स्तविती । उभय बंधु मग गुरुसमीप जाती ।
मुनीसी राम वृत्तांत कथिती । सरळ स्वभावे न कपट मनी ।। १
सुमने घेऊन मुनि पूजा करिती । मग आशीर्वाद बंधुद्वयांस देती ।
तुमच्या कामना पूर्ण होतील म्हणती । रामलक्ष्मण हे ऐकताच सुखी ।। २
मुनि विज्ञानी करून भोजन । कथिती काही कथा प्राचीन ।
घेती आज्ञा मावळताच दिन । जाती मग संध्यावंदनास्तव ।। ३
उगवे सुंदर शशि पूर्व दिशेसी । सीतेसम मुख पाहून सुख रामासी ।
मग केला विचार निज मानसी । नसे हिमकर सीतावदनासम ।। ४
तयाचा बंधु विष जन्म सिंधूत । अखिल दिन निस्तेज कलंकित ।
कैसा बापुडा गरीब चंद्र पावत । निष्कलंक सीतामुखसमता ।। २३७
क्षयवृद्धि तया दुःखद विरही स्त्रीस । मिळता संधि राहु ग्रासी तयास ।
कमळद्रोही शोकप्रद चक्रवाकीस । बहु अवगुणी बा चंद्रमा तूं ।। १
तव उपमा देणे वैदेहीमुखास । असे अनुचित तो महान दोष ।
शशिनिमित्ते वानिती सीतावदनास । मध्य निशा जाणून जाती गुरुसमीप ।। २
करिती मुनिपदसरोजा प्रणाम । आज्ञा घेऊन करिती विश्राम ।
रात्र संपता उठती श्रीराम । बोलू लागले मग बंधूस बघून ।। ३
जाहला अरुणोदय पाहा हे ताता । कमळचक्रवाक भुवनांसी सुखदाता ।
बोले लक्ष्मण जोडून उभय हस्ता । प्रभूचा प्रभाव सूचक मृदुवाणी ।। ४
अरुणोदये संकोचे कुमुदिनी । तारागण होती निस्तेज गगनी ।
जैसे तव आगमन ऐकोनी । जाहले नृपती बळहीन ।। २३८
नृप नक्षत्रांपरि लुकलुकती । परि चापभंगतम न दूर करिती ।
निशा संपता सकल हर्षित अती । खग मधुकर कमळ चक्रवाक ।। १
प्रभो तैसे तव सकल भक्त । शिवचाप भंगता होतील मुदित ।
जाहला सूर्योदय श्रमाविण करीत तम नष्ट । पसरे प्रकाश जगी लुप्त नक्षत्रे ।। २

रघुराया भानु निज उदयमिष करून । नृपासन्मुख करीत प्रभुप्रताप दर्शन ।
तव भुजबळ महिम्याचे उद्घाटन । होत प्रकट या धनुष्यभंगाने ॥ ३
बंधुवचन ऐकून प्रभु स्तिमितवदन । शुचिर्भूत होऊन करिती संध्यास्नान ।
येती गुरुसमीप नित्यकर्म उरकून । वंदिती सुंदर गुरुपदकमळांसी ॥ ४
इकडे जनक बोलाविती शतानंदासी । पाठविती विश्वामित्राप्रति तयांसी ।
शतानंद सांगती मुनिवरासी । विनंति जनक राजाची ॥ ५
प्रणाम करून शतानंदासी । बैसती श्रीराम गुरुपाशी ।
चलावे मुनि वदती वचनासी । पाठविले आमंत्रण जनकाने ॥ २३९
जाऊन बघावे सीतास्वयंवर । पाहावे कोणा देई महत्पद ईश्वर ।
वदे लक्ष्मण कृपा होईल जयावर । तोची पात्र शिवधनुर्भंगास ॥ १
मुनि प्रसन्न ऐकून वरवचन । देती आशीर्वाद सुख मानून ।
मग कृपाळु रामासह जाती मुनिगण । धनुर्यज्ञशाला बघावया ॥ २
उभय बंधु पोचले रंगभूमीवर । नगरजनांस कळला समाचार ।
निघाले सोडून कामकाजघर । बालकयुवकवृद्धनारीनर ॥ ३
जनक बघती जनसमुदायांसी । त्वरित बोलाविती विश्वासु सेवकांसी ।
वदती जा सत्वरी जनतेपाशी । उचित आसन द्यावे सकलांना ॥ ४
सेवक बोलती मृदुवाणी । बैसविती स्त्रीपुरुषांस तयांच्या स्थानी ।
उत्तम मध्यम लघु श्रेणी । यथोचित आसन सकलांना ॥ २४०
ते अवसरी येती राजकुमार । जणु मनोहरता व्यापी तयांचे शरीर ।
गुणसागर चतुर महावीर । तनु सुंदर श्यामलगौर ॥ १
नृपगणात ऐसे ते विराजत । जैसे तारांगणी शशियुगल शोभत ।
जैसा जयाच्या मनी भाव वसत । तैसी दिसे प्रभुमूर्ति तया ॥ २
देखती रामरूप नृपरणधीर । जणु वीररस धरी शरीर ।
निरखिती कुटिल भुप रघुवीर । भयानक मूर्ति मानून भयभीत ॥ ३
असुर कपटे येती नृपवेषात । प्रभू तयांना जणु काळ भासत ।
नगरजनासी उभयबंधु दिसत । नरभूषण नेत्रा सुखदायक ॥ ४
विलोकिती ललना प्रभुरूप । दिसे तयांना निजरुचि अनुरूप ।
जणु शृंगाररस मूर्ति अनूप । धारण करून दिसे शोभिवंत ॥ २४१
प्रभूस विराटमय बघती विद्वान । जया बहुशिरमुखकरपदलोचन ।
जैसे प्रिय वाटती निकट आप्तजन । तैसे जनक परिवारा दिसती प्रभू । १

जनकसमवेत राज्ञी विलोकिती । न वानवे तयांची शिशुसम प्रीति ।
योगिजनांसी तत्त्वमय भासती । प्रकाश शांत शुद्ध सम सहज ।। २
बघती बंधुजोडीस हरिभक्त । इष्ट देवतांसम तया सुखदायक ।
सीतेचे प्रेम सुख वर्णनातीत । जंव स्नेहवशे पाही ती रामास ।। ३
हृदयी अनुभवी न वर्णू शके ती प्रेम । मग कवि कैसे वानतील ते अनुपम ।
यापरि भासती तैसेचि तया श्रीराम । जैसा जयाचा भाव असे ।। ४
सुंदर श्यामलगौर शरीर । विश्वविलोचनांचे जणु चोर ।
दशरथ नृपाचे ते किशोर । विराजती राजसमाजात ।। २४२
सहज मनोहर तयांची मूर्ती । कोटी कामदेवासी लाजविती ।
निस्तेज दिसे शरच्चंद्रद्युती । नयनमना रुचती कमळांसम ।। १
नजर सुंदर करी मदनाचे मनहरण । हृदयासी प्रिय परि न करवे वर्णन ।
सुंदर कपोल चंचल कर्णभूषण । हनुवटी अधर सुंदर मृदु वाणी ।। २
शशिकिरणांस हास्य लाजविते । वक्र भृकुटि नासिका सुंदर दिसते ।
विशाल भाळावर टिळा झळके । पाहून केसभार लाजती भृंगतती ।। ३
चौकोनी टोपी पीत शोभे शिरावर । रेखिल्या मधुनी कुसमकळ्या तयावर ।
कंबुसम ग्रीवा वर त्रिरेखा रुचिर । जणु त्रिभुवन सुंदरतासीमा ।। ४
गजमौक्तिक कंठा सुंदर । तैसी तुळसीमाळ रुळत उरावर ।
बाहुविशाल जणु बलसागर । डौलसिंहाचा वृषभापरि स्कंध ।। २४३
खोवला वर भाता कसून पीतांबर । वामस्कंधी चाप करी शर ।
पीत यज्ञोपवीत विलसे सुंदर । शोभले नखशिखांत लावण्ये ।। १
रूप पाहून सकल सुखावती । नयन स्थिर बुबुळे न हलती ।
पाहून कुमार हर्षित जनक नृपती । मग धरती मुनिपदकमला जाऊन ।। २
करून प्रार्थना कथा कथिती । रंगभूमि मुनींसी दाविती ।
जेथे जेथे कुमारवर जाती । तेथे तेथे चकित बघती तया ।। ३
विलोकिती सकल सन्मुख रामास । मर्म तयाचे न कळे कोणास ।
रचना सुंदर मुनि सांगती नृपास । ऐकून प्रसन्न महा सुख जनकासी ।। ४
एक मंचात सकल । अधिक सुंदर उज्ज्वल विशाल ।
तयावरी बैसविती महीपाल । उभय कुमारा मुनिसहित ।। २४४
सर्व नृप मनी हरले पाहून प्रभूस । जणु निस्तेज तारे उगता राकेश ।
सकल मनी ऐसा विश्वास । राम मोडितील चाप न संदेह ।। १

न भंगताच शिवचाप विशाल । सीता रामासी माला अर्पील ।
गृही जावे म्हणती चिंतून सकल । गमावले बलप्रतापयशतेज ।। २
अपर भूप अविवेके अंध तयात । अभिमाने हसून अन्यास वदत ।
चाप भंगताहि विवाह न होत । कैसा विवाह होई धनुर्भंगाविण ।। ३
आला एक वेळ जरी काळ प्रत्यक्ष । सीतेस्तव रणी जिंकू तयास ।
हसती ऐकून अन्य भूपेश । जे शहाणे धर्मशील हरिभक्त ।। ४
वदती ते राम सीतेसी विवाह करून । करितील नृपतींचे गर्वहरण ।
रणी जिंकू शकेल कोण । रणवीर दशरथपुत्रासी ।। २४५
नका मरू व्यर्थ वल्गना करून । भूक न शमते मनी मांडे खाऊन ।
हा परम पुनीत बोध ऐकून । जीवनी जाणा सीता साक्षात् जगदंबा ।। १
जाणा जगत्पिता रघुवीर । पहा नेत्रभरे लावण्य मनोहर ।
सकला सुखद गुणराशी सुंदर । शिवहृदयवासी हे उभय बंधू ।। २
पाहून समीप सुधासिंधूस । का धावून मरता बघुन मृगजळास ।
जा करा जैसे रुचेल जयास । आज दर्शने पावलो जन्मफळ ।। ३
ऐसे वदून प्रेममग्न गुणवंत भूप । विलोकिती रामाचे रूप अनुप ।
सुर विमानातून देखती रामस्वरूप । वर्षती सुमने मधुर गीत गाती ।। ४
तंव जनक सुसमय जाणून । घेई जानकीसी बोलावून ।
तिच्या सख्या सुंदर प्रसन्न । येती सीतेसह यज्ञशाळेत ।। २४६
न करवे सीता लावण्यवर्णन । ती जगदंबिका रूपगुणखाण ।
जगी सकल उपमा दिसती गौण । ज्या उचित प्राकृत नारीसी ।। १
प्राकृत उपमा देऊन सीतेस । कोण कवि घेईल पदरी अपयश ।
जी स्त्री उचित सीतातुलनेस । कोठे ऐसी युवती कमनीय जगी ।। २
भवानी अर्धतनुधारी शारदा मुखर । पति अनंग रतीसी दुःख अपार ।
विष वारुणी बंधु जरी रमा सुंदर । सांगा कैसी रमासम वैदेही ।। ३
जंव लावण्य सुधासागर होईल । कच्छप परम रूपमय असेल ।
रज्जुशोभा शृंगारमंदराचल । तथा घुसळील करकमळे कामदेव ।। ४
जंव ऐसा सुयोग येईल । लक्ष्मी सौंदर्यसुखमूळ उपजेल ।
तंव अति संकोचे कवी वदतील । सीता लक्ष्मीसमान ।। २४७
घेऊन सीतेसी संगे सख्या चतुर । गाती गीत अति मनोहर ।
वसने सुशोभित सुंदर तनूवर । अतुलित लावण्य जगज्जननीचे ।। १

सकल भूषणे तिची शोभती सुस्थानी । सजविले अंग अंग सख्यांनी ।
नरनारी मोहित सुस्वरूप पाहुनी । जंव सीता प्रवेशे रंगभूमीवरी ।। २
वाजविती दुंदुभी हर्षे सुरगण । वर्षती सुमने अप्सरा गाऊन ।
सीता करकमळी जयमाला सुशोभन । चकित चित्ते विलोकिती भूपाळ ।। ३
रामासी पाही सीता चित्ते स्तिमित । तंव मोहवश जाहले सर्व नरनाथ ।
गुरुसमीप उभयबंधूंस देखत । जाहले लोचन स्थिर निधि पावताच ।। ४
सीता लज्जान्वित बघता गुरुजनांस । मन संकोचे देखता महासमाजास ।
हृदयात साठवून राममूर्तीस । वळवी नेत्र मग सीता सख्यांप्रति ।। २४८
रामरूप सीतालावण्य बघून । नरनारींचे स्थिरावती नयन ।
चिंतिती परि संकोचे न वदवे म्हणून । प्रार्थिती मनी विधात्यासी ।। १
ब्रह्मा दूर करावी जनकमूढता शीघ्र । दे तया आम्हांसम मति सुंदर ।
सोडावा पण कठोर नृपाने सत्वर । करावा सीतेचा विवाह रामासी ।। २
जग म्हणेल भले आवडेल सकलांला । हट्ट अंती जाळील हृदयाला ।
जानकीसी योग्य हाच वर सावळा । सकल जनमनी लालसा हीच ।। ३
तंव जनक बोलावी बंदीजनास । गात येती ते बिरुदावलीस ।
नृप वदे सांगा पण सकलांस । निघाले भाट हृदयी अति हर्षित ।। ४
बोलती बंदी श्रेष्ठ वचन । ऐका हो सर्व महिपाल गण ।
कथितो जाहीर जनकाचा पण । उचलून निजभुजा विशाल ।। २४९
शिवधनु राहु नृपबाहुबळ शशी । चाप गुरु कठोर विदित सकलांसी ।
गेले निघून शांत चित्ते बघून चापासी । बाण रावण महावीर हे ।। १
ते शिवकोदंड कठोर । जो भंगेल सकलांसमोर ।
बळेच वरील तयासी विनाविचार । त्रिभुवनविजयासहित वैदेही ।। २
ऐकून जनकाचा हा पण । अभिलाषे उठले नृपगण ।
क्रोधाने कमर कसून । निघाले इष्ट देवांसी वंदुनिया ।। ३
क्रोधे निरखून शिवधनु धरिती । कोटयवधि बळ लावता ते न उचलती ।
जयांस अल्प विचारशक्ती चित्ती । चापासमीप न जाती ते भूप ।। ४
अति त्वेषे मूढ नृप चाप धरू जाती । परि ते न हलता लज्जित होती ।
जणू पावून वीरांची बाहुशक्ती । चाप गुरु होई अधिकाधिक ।। २५०
मग दशसहस्र नृप होऊन एकत्रित । येऊन उचलती हलविता न हलत ।
जैसे कामी नराच्या वचने सती न चळत । तैसे स्थिर अचल शंभुचाप ।। १

सकल नृप जाहले उपहासा कारण। जैसे संन्यासी वैराग्याविण।
कीर्ति विजय वीरता आदि गुण। हरून हट्टे शिवचाप हस्ते नष्ट ।। २
हरले हृदयी ते निष्प्रभ महीधर। जाऊन बैसती निजस्थानावर।
जनक व्याकुळ बघून नृपवर। बोलती मग क्रोधपूर्ण वचन ।। ३
द्वीपाद्वीपाचे नाना भूपती। ऐकून पण धनुर्भंगा येती।
देव दानव मानवरूपे जमती। तैसे विपुल रणधीर वीर ।। ४
महान विजय कन्या मनोहर। कमनीय कीर्ति हे जया लाभणार।
विधात्याने ऐसा न निर्मिला वीर। जो शिवधनुष्यास भंगील ।। २५१
सांगा न रुचते हा लाभ कोणास। परि कोणी न सज्ज करी चापास।
तिळभरही न सोडे ते भूमीस। बंधूंनो चढवणे भंगणे तर दूर ।। १
न व्हा क्रुद्ध शौर्याचे अभिमानी नृपाळ। मज वीरविहीन भासे पृथ्वीतळ।
जा निजगृही सोडा आशा निष्फळ। वैदेहीचा विवाह न विधिलिखित ।। २
जाईल पुण्य पण सोडावा तरी। काय करू कन्या राहील कुमारी।
जर जाणतो भूमि विना वीरवीरश्री। पण करून न पावतो उपहासा ।। ३
नरनारी ऐकती जनकाचे वचन। पाहून दुःखित जानकीचे वदन।
मग त्वेषे भृकुटि चढवी लक्ष्मण। स्फुरती ओठ नेत्र आरक्त क्रोधे ।। ४
परि श्रीरामभये न वदू शकत। जनकाचे वचन तया शरापरि बोचत।
न राहवे म्हणोनी तो यथार्थ वदत। रामपदकमलांसी वंदून ।। २५२
जेथे राहती रघुवंशीय उपस्थित। तेथे ऐसे कुणी न बोलू शकत।
जनक उद्गार काढती अनुचित। जाणून रघुकुलमणि विद्यमान ।। १
ऐका हो भानुकुलकमलदिनेश। सहज बोलतो न अभिमानाचा लेश।
उडवीन कंदुकासम ब्रह्मांड अशेष। तुम्ही मज आज्ञा द्याल जर ।। २
घट कच्चा ऐसे जाणून तया फोडीन। मुळासह सुमेरु गिरि तोडीन।
तव महिमा प्रतापे हे भगवान। बापुडे शिवचाप क्षुद्र प्राचीन ।। ३
हे नाथ मज जर आज्ञा द्याल। पाहा करून दावीन खेळ।
चढवीन शिवचाप जणु कमलनाल। घेऊन धावीन शतयोजने ।। ४
छत्रदंडवनस्पतीसम समजून। हे नाथ या चापाचे तुकडे करीन।
हे न घडेल तर प्रभुपदाची आण। न धरीन धनुष्यभाता पुन्हा हाती ।। २५३
जंव क्रोधे वदे लक्ष्मण। मही डगमगे दिग्गज कंपायमान।
भयभीत सकल भूप नगरजन। सीता हर्षित ओशाळले जनक ।। १

सकल भूषणे तिची शोभती सुस्थानी । सजविले अंग अंग सख्यांनी ।
नरनारी मोहित सुस्वरूप पाहुनी । जंव सीता प्रवेशे रंगभूमीवरी ।। २
वाजविती दुंदुभी हर्षे सुरगण । वर्षती सुमने अप्सरा गाऊन ।
सीता करकमळी जयमाला सुशोभन । चकित चित्ते विलोकिती भूपाळ ।। ३
रामासी पाही सीता चित्ते स्तिमित । तंव मोहवश जाहले सर्व नरनाथ ।
गुरुसमीप उभयबंधूंस देखत । जाहले लोचन स्थिर निधि पावताच ।। ४
सीता लज्जान्वित बघता गुरुजनांस । मन संकोचे देखता महासमाजास ।
हृदयात साठवून राममूर्तीस । वळवी नेत्र मग सीता सख्यांप्रति ।। २४८
रामरूप सीतालावण्य बघून । नरनारींचे स्थिरावती नयन ।
चिंतिती परि संकोचे न वदवे म्हणून । प्रार्थिती मनी विधात्यासी ।। १
ब्रह्मा दूर करावी जनकमूढता शीघ्र । दे तया आम्हांसम मति सुंदर ।
सोडावा पण कठोर नृपाने सत्वर । करावा सीतेचा विवाह रामासी ।। २
जग म्हणेल भले आवडेल सकलांला । हट्ट अंती जाळील हृदयाला ।
जानकीसी योग्य हाच वर सावळा । सकल जनमनी लालसा हीच ।। ३
तंव जनक बोलावी बंदीजनास । गात येती ते बिरुदावलीस ।
नृप वदे सांगा पण सकलांस । निघाले भाट हृदयी अति हर्षित ।। ४
बोलती बंदी श्रेष्ठ वचन । ऐका हो सर्व महिपाल गण ।
कथितो जाहीर जनकाचा पण । उचलून निजभुजा विशाल ।। २४९
शिवधनु राहु नृपबाहुबळ शशी । चाप गुरु कठोर विदित सकलांसी ।
गेले निघून शांत चित्ते बघून चापासी । बाण रावण महावीर हे ।। १
ते शिवकोदंड कठोर । जो भंगेल सकलांसमोर ।
बळेच वरील तयासी विनाविचार । त्रिभुवनविजयासहित वैदेही ।। २
ऐकून जनकाचा हा पण । अभिलाषे उठले नृपगण ।
क्रोधाने कमर कसून । निघाले इष्ट देवांसी वंदुनिया ।। ३
क्रोधे निरखून शिवधनु धरिती । कोटचवधि बळ लावता ते न उचलती ।
जयांस अल्प विचारशक्ती चित्ती । चापासमीप न जाती ते भूप ।। ४
अति त्वेषे मूढ नृप चाप धरू जाती । परि ते न हलता लज्जित होती ।
जणू पावून वीरांची बाहुशक्ती । चाप गुरु होई अधिकाधिक ।। २५०
मग दशसहस्र नृप होऊन एकत्रित । येऊन उचलती हलविता न हलत ।
जैसे कामी नराच्या वचने सती न चळत । तैसे स्थिर अचल शंभुचाप ।। १

सकल नृप जाहले उपहासा कारण। जैसे संन्यासी वैराग्याविण।
कीर्ति विजय वीरता आदि गुण। हरून हट्टें शिवचाप हस्ते नष्ट ।। २
हरले हृदयी ते निष्प्रभ महीधर। जाऊन बैसती निजस्थानावर।
जनक व्याकुळ बघून नृपवर। बोलती मग क्रोधपूर्ण वचन ।। ३
द्वीपाद्वीपाचे नाना भूपती। ऐकून पण धनुभंगा येती।
देव दानव मानवरूपे जमती। तैसे विपुल रणधीर वीर।। ४
महान विजय कन्या मनोहर। कमनीय कीर्ति हे जया लाभणार।
विधात्याने ऐसा न निर्मिला वीर। जो शिवधनुष्यास भंगील ।। २५१
सांगा न रुचते हा लाभ कोणास। परि कोणी न सज्ज करी चापास।
तिळभरही न सोडे ते भूमीस। बंधूंनो चढवणे भंगणे तर दूर ।। १
न व्हा क्रुद्ध शौर्याचे अभिमानी नृपाळ। मज वीरविहीन भासे पृथ्वीतळ।
जा निजगृही सोडा आशा निष्फळ। वैदेहीचा विवाह न विधिलिखित ।। २
जाईल पुण्य पण सोडावा तरी। काय करू कन्या राहील कुमारी।
जर जाणतो भूमि विना वीरवीरश्री। पण करून न पावतो उपहासा ।। ३
नरनारी ऐकती जनकाचे वचन। पाहून दुःखित जानकीचे वदन।
मग त्वेषे भृकुटि चढवी लक्ष्मण। स्फुरती ओठ नेत्र आरक्त क्रोधे ।। ४
परि श्रीरामभये न वदू शकत। जनकाचे वचन तया शरापरि बोचत।
न राहवे म्हणोनी तो यथार्थ वदत। रामपदकमलांसी वंदून ।। २५२
जेथे राहती रघुवंशीय उपस्थित। तेथे ऐसे कुणी न बोलू शकत।
जनक उद्गार काढती अनुचित। जाणून रघुकुलमणि विद्यमान ।। १
ऐका हो भानुकुलकमलदिनेश। सहज बोलतो न अभिमानाचा लेश।
उडवीन कंदुकासम ब्रह्मांड अशेष। तुम्ही मज आज्ञा द्याल जर ।। २
घट कच्चा ऐसे जाणून तया फोडीन। मुळासह सुमेरु गिरि तोडीन।
तव महिमा प्रतापे हे भगवान। बापुडे शिवचाप क्षुद्र प्राचीन ।। ३
हे नाथ मज जर आज्ञा द्याल। पाहा करून दावीन खेळ।
चढवीन शिवचाप जणु कमलनाल। घेऊन धावीन शतयोजने ।। ४
छत्रदंडवनस्पतीसम समजून। हे नाथ या चापाचे तुकडे करीन।
हे न घडेल तर प्रभुपदाची आण। न धरीन धनुष्यभाता पुन्हा हाती ।। २५३
जंव क्रोधे वदे लक्ष्मण। मही डगमगे दिग्गज कंपायमान।
भयभीत सकल भूप नगरजन। सीता हर्षित ओशाळले जनक ।। १

विश्वामित्र रघुपति मुनिगण । तनुपुलकित होती प्रसन्न ।
लक्ष्मणास खुणे निवारून । प्रभु प्रेमे बैसविती समीप ।। २
विश्वामित्र शुभसमय जाणून । वदले प्रेमभरे वचन ।
तोड भवचाप ऊठ रघुनंदन । हे तात मिटव जनकाचा संताप ।। ३
राम गुरुवचन ऐकून पदा वंदिती । हर्ष वा विषाद मनी न धरिती ।
सहज स्वभावे उभे ठाकती । ती ऐट लाजवी तरुण मृगराजास ।। ४
मंचकरूपी उदयगिरीवर उदित । रघुवीर जणु बालसूर्य भासत ।
सकल संतसरोज विकसत । तयांचे लोचनभृंग हर्षित ।। २५४
नृप आशारूपी निशा होई नष्ट । वचननक्षत्रसमूह जाहले लुप्त ।
अभिमानी महीपकुमुद संकोचित । दडती कपटी भूप उलूकासम ।। १
सुरमुनिरूपी चकोर शोक त्यजती । सुमने वर्षून सेवा करिती ।
राम प्रेमे गुरुचरणा वंदिती । घेती आज्ञा ऋषिमुनींची ।। २
सहज चालती अखिल जगस्वामी । मत्तसुंदरकुंजरगामी ।
नगरनरनारी पुलकित रोमरोमी । पाहून प्रभूस सुखावती ।। ३
निज पुण्य स्मरती वंदून देवपितर । असेल पुण्यप्रभाव आमुचा जर ।
हे गणेश देवा राम भंगो तर । शिवचाप कमलदेठासम ।। ४
सीतेची माता पाहून रामास । बोलावी समीप सखीस ।
स्नेहवशे वदली वचनास । अति व्याकुळ होऊनिया ।। २५५
जे म्हणवती आमुचे हितकर । ते गंमत बघावया तत्पर ।
हे बालक जाणून सोडा हट्ट अविचार । ऐसे का न कुणी समजावी गुरूस ।। १
रावणबाणासुर चापास न स्पर्शती । पराजित गर्वोन्नत अन्य भूपती ।
का देती चाप राजकुमारा हाती । कैसा उचलील बालहंस मंदरगिरी ।। २
नृपाचे चतुरपण सकल समाप्त । सख्यांनो विधिघटना कोणी न जाणत ।
एक सुजाण सखी मृदुवाणी वदत । हे राणी न गणावे लघु तेजवंतासी ।। ३
कोठे अगस्त्य कुंभज कोठे सिंधु अपार । शोषिला सिंधु जाणे यश सकल संसार ।
जयाचा उदय त्रिभुवनतमा सारी दूर । परि लघु रविमंडळ दिसते तयाचे ।। ४
वेदमंत्र परम लघु असती । परि विधिहरिहर सुरा वश करिती ।
अंकुश अस्त्र दिसते लहान अती । आणते मत्त गजराजास शुद्धीत ।। २५६
मदन धरून कुसुमचाप हस्तांत । हे देवी करितो सकल भुवने अंकित ।
भंगील चाप श्रीराम निश्चित । राणी संदेह सोडावा जाणून हे ।। १

उपजे विश्वास वचन ऐकून सखीचे । वाढे रामप्रीति विषाद मिटे ।
तंव विदेही विलोकी रामाते । भये हृदयी ज्या त्या देवा प्रार्थना करी ॥ २
अति व्याकुळ होऊन मनी । म्हणे प्रसन्न व्हा हे महेशभवानी ।
करावे हित चापाचा जडपणा हरूनी । सुफळ करावी मम सेवा ॥ ३
हे गणनायक वरदायक देवा । या दिनाप्रीत्यर्थ केली तव सेवा ।
ऐकून विनंति मम भावा । चापाचा जडपणा करा हलका ॥ ४
पाहून रघुवीरास वारंवार । सीता स्तवी देवास धरून धीर ।
जाहले रोमांचित शरीर । नेत्री दाटले प्रेमाश्रु ॥ २५७
सीता श्रीरामाची शोभा बघे नेत्र भरून । मन प्रक्षुब्ध स्मरताच पित्याचा पण ।
हाय तात पण अति दारुण । न जाणती ते हानि वा लाभ ॥ १
सचिव भ्याड न करिती उपदेश । बुधजन सभेत हे अनुचित विशेष ।
कोठे ते कठोर धनुष्य वज्रासरिस । कोठे हे श्यामल मृदु किशोर ॥ २
बा विधाता कैसा धरू मी धीर । कैसे शिरिषकण छेदील रत्नवर ।
आता हे शंभुचाप तूच मज आधार । जाहली सकल सभा बुद्धिभ्रष्ट ॥ ३
निज जडतापण जनतेवर सोडून । हो तू हलका रघुपतीस पाहून ।
ऐसे अतिव्यथित सीतेचे मन । भासे युगसमान तिज लवनिमिष ॥ ४
प्रभूस पाही मग फेकी दृष्टि महीवर । चमकती सीतेचे चंचल नेत्र ।
जणु शशिमंडळ हिंदोळ्यावर । खेळती दोघे मदनाचे मीन ॥ २५८
मुखकमल वाणीभ्रमरीस कोंडीत । लज्जानिशा पाहून न होई प्रकट ।
नेत्रजळ लपे नेत्रकोन्यात । जैसे महा कृपण दडवी सोन्यास ॥ १
लाजली सीता व्याकुलता जाणून । धीर धरी हृदयी विश्वास आणून ।
कायावाचामने जर सत्य मम पण । रामपदकमली अनुरक्त चित्त ॥ २
तर हे भगवंत सकलउरवासी । करील मज रघुवीराची दासी ।
न संदेह तोच मिळेल तयासी । जयावर जयाचा सत्यस्नेह ॥ ३
रामाप्रति पाहून घेई प्रेमाची शपथ । जाणती हे सर्व कृपानाथ ।
जैसे लघु सर्पास बघे पक्षिराज । तैसे बघती धनूस सीता देखून ॥ ४
रघुवंशमणि आतां ताणती शिवचापास । पाहून सत्वर लक्ष्मण तयास ।
पुलकित गात्रे वदे वचनास । ब्रह्मांडासी दाबून निज चरणें ॥ २५९

हे दिग्गज कच्छपवराहशेष । धीर धरा न डोलवा धरणीस ।
श्रीराम भंगू इच्छिती शंकरधनूस । आज्ञा ऐकून राहा सावधान चित्त ।। १
जंव राम चापासमीप जाती । सुरसुकृतासी नरनारी प्रार्थिती ।
जो अभिमान दाविती मंद महीपती । सकलांचा संशय अज्ञान ।। २
परशुराम गर्वाची गुरुता । सुरमुनिवरांची कातरता ।
सीतेचा शोक पश्चात्ताप जनकाचा । राणीचा दारुण दुःखदावानल ।। ३
हे सकल शंभुचापतारुप्रति येती । एकत्र मिळून तयावर चढती ।
रामभुजबळसागर तरू इच्छिती । परि तेथे कोणी न नावाडी ।। ४
राम सकल जनांस विलोकिती । रेखीव चित्रासम ते भासती ।
जंव राम कृपाधाम सीतेसी बघती । जाणती विशेष व्याकुळ ती ।। २६०
पाहिले अति व्यथित वैदेहीस । कल्पासम भासे तिज निमिष ।
जंव तृषित सोडितो प्राणास । त्या मृतासी अमृताचे तळे व्यर्थ ।। १
काय करील वर्षा शेती सुकता । पश्चात्ताप वृथा समय चुकता ।
हृदयी हे जाणून देखती जनकसुता । विशेष प्रीति पाहून पुलकित प्रभु ।। २
प्रणाम मनी करून गुरुसी । सहज लीलेने उचलती धनुष्यासी ।
करी चमकले दामिनि जैसी । तोंच मंडलाकार दिसले धनु नभी ।। ३
न जाणिले कदा चढविती ओढिती चाप । सकल सभा देखे उभे रामरूप ।
भंगती राम चापमध्य क्षणी अल्प । तंव घोर कठोर ध्वनि भरे त्रैलोक्यी ।। ४
भयाण कठोर । नाद भुवनांत । मार्ग सोडतात । रविअश्व ।
दिग्गज चीत्कार । डोले अहिमही । वराहकूर्महो विव्हळती ।
झाकती श्रवणें । सुरमुनिवर । भूपति असुर । चिंतातुर ।
म्हणत तुलसी । खंडिले धनूस । केला जयघोष । श्रीरामाचा ।। १
रघुवीरांचे बाहुबळसागरात । शंकरचापरूपी जहाजात ।
जे प्रथम मोहवशे चढले तयात । ते बुडले सकल तेथे ।। २६१
चापखंड दोन्ही प्रभु फेकती भूवर । देखता सुखावती नारीनर ।
विश्वामित्र मुनि पावन सागर । जयात प्रेमजळ अथांग ।। १
देखती रामरूप राकेश । रोमावलिलहरी येती प्रेमजळास ।
देवांगना नाचती करिती गानास । दुमदुमे नभ दुंदुभीनादाने ।। २
ब्रह्मादिक सुरसिद्धमुनीश । देती आशीर्वाद स्तविती प्रभूस ।
किन्नर गाती गीत सुरस । वर्षती बहुरंगी सुमनमाळा ।। ३

त्रिभुवनी निनादे जयजय वाणी । लोपला तयात धनुर्भंगध्वनी ।
बोलती नरनारी प्रसन्न होउनी । रामे भंगले भारी शंभुधनु ॥ ४
बंदीभाटसूत मतिधीर । स्तविती रामाची विरुदावलि थोर ।
रामावरी अश्वगजधनरत्नवस्त्र । ओवाळुनी टाकिती सकल जन ॥ २६२
शंखझांजसनईढोल । भेरिमृदुंग दुंदुभी सकल ।
सर्वत्र गर्जती वाद्ये मंगल । गाती ललना मधुर स्वरे ॥ १
सख्यासहित हर्षित सकल राणी । जणु शुष्क पीकावरी पडे पाणी ।
जाहले जनक सुखी शोक सोडुनी । जणु पोहून दमता नरा पावे आधार ॥ २
जैसी निस्तेज दिवसा दीपज्योति । धनुर्भंगे तैसे नृप दिसती ।
कैसी वानावी सीतेची सुखसंतृप्ती । जणु चातकीस मिळे स्वातिजळ ॥ ३
कैसा लक्ष्मण विलोकी रामास । जैसे चकोरपिल्लू देखे शशीस ।
तंव शतानंद आज्ञा देती सीतेस । मग रामासमीप जाई ती ॥ ४
सवे जाती सख्या सुंदर चतुर । गीत गाती मंगल मधुर ।
सीतेच्या अंगी सुषमा अपार । चाले बालहंसगतीने ती ॥ २६३
सख्यांमध्ये सीता शोभे कैसी । छविगणामाजी महाछबि जैसी ।
करकमळीं धरी जयमालेसी । पसरे जयावर विश्वविजय शोभा ॥ १
तनु लज्जित परम उत्साह मनी । परि गूढ प्रेमा न जाणिले कुणी ।
पाही लावण्य रामासमीप जाउनी । उभी ठाके कुमारी जणु चित्रलिखित ॥ २
चतुर सख्या सीतेची दशा पाहती । अर्पावी जयमाला तिज सांगती ।
ऐकून करयुगल उचले ती । परि प्रेमविवशें न घालू शके ॥ ३
हस्त कमलनालासम शोभती । जणु सभीत शशीस जयमाला अर्पिती ।
लावण्य हे विलोकून सख्या गाती । तंव सीता जयमाला रामगळा घाली ॥ ४
पाहती जयमाला रामाच्या गळ्यात । देव तयावर सुमने वर्षतात ।
जैसे रवीस देखता कुमुद म्लान होत । तैसे दिसती सकल भूप ॥ २६४
मंगल वाद्ये वाजती नगरी गगनी । दुष्ट उदास साधु मुदित मुनी ।
आशीर्वाद देऊन नरनागमुनी । जयजयकार करिती रामाचा ॥ १
देवांगना करिती नृत्यगायन । वारंवार अर्पिती पुष्पे करांतून ।
कुळकीर्ति वानिती बंदीजन । ठायी ठायी विप्रांचा वेदघोष ॥ २
मही पाताळी स्वर्गी पसरे सुयश । रामे वरिले सीतेस भंगून धनूस ।
नगरनरनारी करिती आरतीस । ओवाळिती वित्त भान हरपून ॥ ३

शोभे सीताराम जोडी सुंदर। जणु एकत्र आले लावण्यशृंगार।
सख्या म्हणती सीते प्रभुपदा स्पर्श कर। परि न करी ती भयभीत ।। ४
गौतमपत्नीची गति जाणून। सीता न स्पर्शी रामचरण।
तिची अलौकिक प्रीति पाहून। हसले मनी रघुवंशमणि ।। २६५
अभिलाषा मनी सीतेस पाहून। नृप क्रूर कुलांगार मलिन।
अभागी उठती कवचे चढवून। मिरविती गर्वे जाऊन सर्वत्र ।। १
कोणी वदती न्या हिरावून सीतेस। धरा बांधा कुमारयुगलास।
कार्य न संपले भंगून चापास। आम्ही जिवंत असता कोण वरील सीता ।। २
जरी विदेह करील सहाय्य। जिंकू तयासह बंधु उभय।
ऐकून बोले सज्जन भूपसमुदाय। लज्जाही लाजेल या राजसमाजास ।। ३
तुमची प्रतापप्रतिष्ठाप्रभुता। गेली चापासवे ते भंगता।
आली कोठून आता शूरता। ऐसी बुद्धि तरी काळे फासे मुखा विधी ।। ४
नेत्रभरे पाहा तुम्ही श्रीराम। सांडून ईर्षाक्रोधमदकाम।
जाणून लक्ष्मणाचा क्रोध अग्नि परम। न जळावे त्यात पतंगापरी ।। २६६
गरुडाचा भाग काक वांछीत। सिंहाचा विभाग ससा इच्छित।
अकारण क्रोधी वांछितो निजहित। शिवद्रोही याचितो सुखवित्त ।। १
लोभीलोलुप वांछिती कीर्ती। अकलंकता कामीनर वांछती।
हरिपदासी विमुख तो मागे परम गती। नृप हो तैसीच लालसा तुमची ।। २
कोलाहल ऐकून शंका सीतेसी। राणीसमीप नेती सख्या तिजसी।
मग राम जाती गुरूपाशी। मनी सीतेचे प्रेम वानीत ।। ३
राणीसह सीता शोकवश। काय कैसे आता करणार ब्रह्मेश।
बघे चौफेर ऐकून नृपवचनास। परि लक्ष्मण न वदे रामभये ।। ४
भृकुटि कुटिल अरुण नयन। निरखी नृपांसी क्रोधे लक्ष्मण।
जणु सिंहछावा देई आव्हान। पाहून मदोन्मत्त गजगणांस ।। २६७
व्याकुळ नगरस्त्रिया खळबळ पाहून। देती भूपांस शिव्या सर्व मिळून।
ते समयी आले शिवचापभंग ऐकून। परशुराम भृगुकुळकमळसूर्य ।। १
पाहून गर्भगळित सकल नृप। लावी पक्षीवर श्येन जणु घेई झेप।
तनुवरी शुभ्र भस्म गौर रूप। विलसे त्रिपुंड्र रेखलेले विशाल भाळी ।। २
शिरी जटाभार शशिवदन। क्रोधे भासे अल्पसे अरुण।
भृकुटि वक्र क्रोधे आरक्त नयन। दृष्टि सहज परि वाटे कोपिष्ट ।। ३

वृषभस्कंद उरबाहु विशाल। शोभे उपवीत मृगचर्म उरी रुळे माळ।
खोविले भाते कटी कसून वल्कल। चापशर करी परशु स्कंधावर ॥ ४
शांत वेष परि करणी कठोर। न करवे वर्णन रूप भयंकर।
मुनितनु घेऊन जणु रस वीर। आला भूपति सभेत ॥ २६८
पाहून परशुरामाचा वेष विक्राळ। उठती मग भयग्रस्त भूपाळ।
पित्यासह निजनाम कथिती सकल। घालून दंडवत प्रणाम तया ॥ १
कल्याणार्थ जंव मुनि दृष्टि फिरविती। तंव वाटे नृपा आयुर्दिन संपती।
जनक येऊन निज शिर नमविती। करविती प्रणाम आणून सीतेसी ॥ २
आशीर्वाद ऐकून सख्या हर्षित। घेऊन जाती निज समाजात।
विश्वामित्र भार्गवासी भेटत। बंधुद्वयासी घालती चरणावरी ॥ ३
कथिती हे रामलक्ष्मण दशरथसुत। मुनि तयांसी देती आशीर्वाद।
बघती अपार रामरूप नेत्रे स्तिमित। जे कामदेवाचा मद हरण करी ॥ ४
रोखून नजर राजसभेवर। क्रोधे व्याप्त जाहले तयांचे शरीर।
वदती का जमला हा जनसागर। जाणती परि दाविती अज्ञान ॥ २६९
जनक निवेदती समाचार। का जमले तेथे सकल महीधर।
ऐकून वचन फिरविती नजर। तोंच पाहिले चापखंड महीवरी ॥ १
अति क्रोधे बोलती कठोर वचन। सांग मूढ जनका चाप तोडी कोण।
दाखव शीघ्र तो जडबुद्धिजन। न तों उलथीन पृथ्वी जेथवर तव राज्य ॥ २
न देती उत्तर जनक अति भयभीत। कुटिल भूप मनी हर्षित।
मनी भय अति दुःखित। सकल सुरमुनिनागनरनारी ॥ ३
करी सीतेची माता मनी विवंचना। हाय विधि बिघडवी जुळलेली घटना।
भृगूचा स्वभाव येताच सीतेच्या काना। निमिषार्ध भासे तिज कल्पसम ॥ ४
पाहून भयभीत लोकांस। भयाकुल जाणून जानकीस।
मनी न अल्प विषाद वा हर्ष। बोलती श्रीरघुवीर भार्गवास ॥ २७०
हे नाथ तव शंभुधनुभंजक। असेल आपुलाची दास एक।
काय आज्ञा का न मज सांगत। ऐकताच वदती शीघ्रकोपी मुनी ॥ १
करी जो सेवा तो खरा सेवक। शत्रूची करणी करिता युद्ध आवश्यक।
जयाने भंगले चाप रामा ऐका। तो सहस्रबाहुसम मम वैरी ॥ २
विलग व्हावे तयाने समाज सोडून। न तों सकल भूपा वधीन।
लक्ष्मण हसे ऐकून मुनिवचन। भार्गवांचा अपमान करून वदे तो ॥ ३

तोडिले बहुत धनु शिशुवयात। तरी न कधी दिसला संतप्त।
का या चापावरी इतुके अनुरक्त। परशुराम वदती क्रोधे ऐकून ॥ ४
कालवशे हे नृपबालक। शुद्धि नसे तुज म्हणून ऐसे वदत।
शिवचाप सकल जगा विदित। धनुकलीसम ते सामान्य भासते का ॥ २७१
मग हसून बोले लक्ष्मण। प्रभो सकल चाप मानितो समान।
कोणती लाभहानि भंगता धनुष्य जीर्ण। नूतन भासले चुकून रामास ॥ १
स्पर्शता तुटले धनुष्य न रामाचा दोष। कारणाविना मुनि धरता रोष।
वदती परशुराम बघून परशूस। दुष्टा मम स्वभाव न तुज ज्ञात ॥ २
बालक म्हणोनी न वधी तुजसी। तू का मज मूढ मुनि जाणसी।
मी बालब्रह्मचारी क्रोधी विदित जगासी। क्षत्रियकुळाचा विध्वंसक शत्रू ॥ ३
बाहुबळे केली भूमि नृपहीन। बहुवेळा दिली ती विप्रा दान।
सहस्त्रबाहूचे भुज जो काढी तोडून। हे राजकुमारा हा मम परशु पाहा ॥ ४
न लोटी मातापित्यांसी दुःखात। असशी तू कोमल नृपबालक।
जो ठार करितो गर्भातील बालक। ऐसा मम परशु अति घोर ॥ २७२
सस्मित बोले लक्ष्मण मृदु वाणी। मानिता स्वये महावीर हे मुनी।
डोंगर उडवू इच्छिता फुंकोनी। दाविता परशु मज वारंवार ॥ १
कच्चे फळ एथे न कुणी। जे तर्जनी देखता पडेल मरुनी।
परशुशरासनबाण पाहुनी। बोललो अल्पसे स्वाभिमाने ॥ २
भृगुसुत जाणून उपवीत विलोकून। वदला ते साहीन क्रोधा दाबून।
हरिभक्तधेनुदेवब्राह्मण। यांवरी शूरता दावणे न कुळी आमुच्या ॥ ३
हार जाता अपकीर्ति पाप तया वधता। माराल तरी पदी नमवू माथा।
धनुर्बाण कुठार व्यर्थ धरिता। तुमचे वचन तर कोटी वज्रासम ॥ ४
बोललो अनुचित अस्त्रे पाहुनी। क्षमा करा हे धीर महामुनी।
ऐकताच रोषे भृगुवंशमणी। वदले मग गभीर वाणीने ॥ २७३
ऐका विश्वामित्र हे मंदबालक। कुटिल कालवश निजकुलघातक।
भानुवंशपूर्णचंद्रासी कलंक। मूर्ख उद्दाम न भय तया ॥ १
क्षणात होईल हा काळाचे भक्ष्य। बजावतो मी नसे मम दोष।
जगवू इच्छिता तरी थांबवा तयास। मम प्रतापबळरोष सांगून ॥ २
हे मुनीश्वर म्हणे लक्ष्मण। कोण यश तुमचे वानील तुम्हाविण।
स्वमुखे गाता निज महिमागान। वारंवार अनेकपरी ॥ ३

न तृप्ति तरी बोलावे अजून । का गिळता राग दुःखा साहून ।
न शोभे तुम्हा गालिप्रदान । वीरव्रत धीर क्षोभहीन तुम्ही ।। ४
शूरवीर समरी दाविती कृतीते । परि न वानिती निज प्रतापाते ।
रणी सन्मुख देखता रिपुते । भेकड करिती वल्गना ।। २७४
जणु काळासी पुकारून तुम्ही तर । मजस्तव बोलाविले तया वारंवार ।
ऐकून लक्ष्मणाचे वचन कठोर । उगारिती परशु मुनि करी धरून ।। १
न दोषी धरावे मज कुणी । वधायोग्य बालक हे कटुवचनी ।
वाचविले तया अजाण जाणुनी । परि तयाचा मृत्यु समीप निश्चित ।। २
क्षमा करा अपराधाची कौशिक म्हणती । बालगुणदोष संत न मानिती ।
मी क्रोधी निर्दय तीक्ष्ण कुठार हाती । वदती मुनि हा अपराधी गुरुद्रोही ।। ३
सोडितो न वधितो जरी देई उत्तर । कौशिक केवळ तुमच्या प्रेमाखातर ।
न तों यास कापून परशूने कठोर । होतो गुरुऋणातून मुक्त अल्पश्रमे ।। ४
हसून मनी म्हणती विश्वामित्र । मुनीस हरित[1]तृण दिसते सर्वत्र ।
शिवचाप न ऊसखांड ते लोहमय अस्त्र । नुमजे हे मूढ मुनीस अजूनही ।। २७५
लक्ष्मण वदे मुनि तुमचे शील । असे विदित जगास सकल ।
गुरुऋणमोचनी अता तुम्हा तळमळ । जरी तुम्ही मातापिताऋणातून मुक्त ।। १
हे ऋण जणु ठविले मम माथा । व्याज वाढे बहु दिन जाता ।
बोलावून आणा हिशेबनीसास आता । त्वरित फेडतो थैली सोडून ।। २
उगारली कुठार ऐकून कटु वचन । हाय हाय पुकारती सकल सभाजन ।
भृगुवर दाविता परशु म्हणे लक्ष्मण । परि सोडितो विप्र जाणून नृपद्रोही ।। ३
न लाभला कधी रणी वीर महान । हे द्विजदेवा आपुले गृहीच मोठेपण ।
अन्य नृप वदती हे अनुचित भाषण । तंव बंधूस खुणविती श्रीराम ।। ४
लक्ष्मणाचे उत्तर आहुतिसमान । भृगुवरक्रोधाग्नि भडकत पाहून ।
रघुकुलभानुराम बोलती वचन । शांतिदायक जळासम ।। २७६
नाथ कृपा करा बालक अजाण । न कोपावे सरळ दुग्धमुखी तो अजून ।
न जाणत आपुला प्रभाव महान । कैसी बरोबरी करील तो मूढ ।। १
जरी अल्प चपलता दावी बालक । तरी मातापिता होती हर्षभरित ।
कृपा करा जाणून शिशुसेवक । तुम्ही सुशील समदर्शी ज्ञानी मुनी ।। २
मुनि जाहले शांत रामाचे वचन ऐकून । तोच हसे लक्ष्मण काही अल्प वदून ।
मुनि नखशिखांत क्रुद्ध हसता पाहून । वदती हे राम तव भ्राता महापापी ।। ३

तनु गौर परि मनी श्यामल । न हा दुग्धमुखी तया मुखी गरळ ।
न सुशील तुजसम अतिकुटिल । न जाणे हा नीच मज काळासम ।। ४
तंव हसून बोले लक्ष्मण । हे मुनि क्रोध पापाचें कारण ।
क्रोधे अनुचित कर्म करिती जन । अनहित करिति सकलांचे ।। २७७
दास तुमचा मी हे मुनिराया । आवरा क्रोध करा आता दया ।
बसावे न तों वेदना होतील पाया । धनु भंगले न ते क्रोधे जुळे ।। १
यद्यपि धनु प्रिय अति करावा उपाय । आणून कारागिर जोडावे धनुष्य ।
लक्ष्मणवचने जनका वाटे भय । म्हणती थांव अनुचित न वदणे भले ।। २
नगरनरनारी कापती थरथर । म्हणती मोठा खोटा छोटा कुमार ।
होई मुनिशक्ति क्षीण क्रोधे जळे शरीर। निर्भय वाणी लक्ष्मणाची ऐकताच ।। ३
बोलती भार्गव तंव रामासी पाहून । न वधी मी तव बंधु लहान जाणून ।
तनु सुंदर तयाचे मलिन मन । जैसे सुवर्णघट विषाने भरलेले ।। ४
हे ऐकून हसला पुनरपि लक्ष्मण । बघती राम तिरपी नजर करून ।
मग संकोचे थांबवून वक्रवचन । गेला तो निज गुरुप्रति ।। २७८
वदती राम जोडून उभय पाणी । अति विनीत मृदुशीतलवाणी ।
बालकाचे वचन न घ्यावे कानी । ऐका नाथा तुम्ही स्वभावे सुज्ञ ।। १
बालकस्वभाव गांधिलकीटकासमान । संत तया कधी न देती दूषण ।
बिघडवी न काही काज लक्ष्मण । तुमचा अपराधी मीच हे नाथ ।। २
हे स्वामी कृपा क्रोध वध वा बंधन । मजवरी करावे दास जाणून ।
मुनिनायक सांगा उपाय करीन । जेणे कोप आपुला शीघ्र जाईल ।। ३
कैसा जाईल क्रोध मम । जोवरी अनुजाची वक्र नजर हे राम ।
काय साधले मी दावून क्रोधा परम । कंठी कुठार न घातली अजुनी ।। ४
या परशूची घोर करणी । ऐकून स्रवती गर्भ नृपराणी ।
वैरी राजपुत्र जिवंत अजुनी । जरी सज्ज मम परशु करी ।। २७९
क्रोधे छाती दग्ध न चाले हात । हे नृप घातकी कुठारा तू झाला कुंठित ।
मम स्वभाव बदले विधि विपरीत । मम हृदयी दया कैसी या समयी ।। १
मज दयाच साहवी हे दुःख दारुण । मग बोले नमुनी सस्मित लक्ष्मण ।
जणु वर्षती सुमने जंव वदता वचन । मूर्ति अनुकूल आपुली कृपावायूसी ।। २
हे मुनि गात्रे जळती दया दाविता । मग क्रोध होता तनु रक्षील विधाता ।
वदती भार्गव हे हट्टी बालक जनक । वांछीत वास यमपुरीत ।। ३

का न करिसी यास दृष्टिआड शीघ्र । दिसे छोटा परि मोठा खोटा कुमार ।
मग हसून म्हणे मनी सौमित्र । नेत्र झाकता कोणी न कोठे दिसे ॥ ४
परशुरामहृदयी क्रोध अती । बोलती मग ते रामाप्रती ।
सांगतो शठा तू ज्ञानाच्या गोष्टी । भंगून शरासन शंभूचे ॥ २८०
तव संमति बंधूच्या कटू वचनासी । कर जोडून कपटे विनय दाविसी ।
संग्राम करून करावे शांत मजसी । न तों सोडावे निज रामनाम ॥ १
हे शिवद्रोही करावे युद्ध कपट सोडून । न तों बंधूसह तुज वधीन ।
करिती वल्गना भार्गव परशु उगारून । तंव हसती राम शिर नमवून ॥ २
गुन्हा लक्ष्मणाचा परि मजवरी रोष । सरळपणा कधी वाटे महादोष ।
जाणून वक्र कुणासही करिती नमनास । राहूही न ग्रासी वक्र शशी ॥ ३
वदती राम टाकावा क्रोध मुनीश । मम शिर सन्मुख उचला परशूस ।
स्वामी उचित करा जेणे शमेल रोष । मज तुमचा दास मानून ॥ ४
कैसे युद्ध स्वामीसेवकात । हे विप्रवर त्यजावा निज क्रोध ।
वेष पाहून बोले अजाण बालक । न तयाचा त्यांत अल्प दोष ॥ २८१
पाहून परशुबाण धनुर्धारी । वीर जाणून उसळे क्रोधे भारी ।
नाम जाणत ओळखे न परी । देई उत्तर वंशस्वभावास उचित ॥ १
येता जर आपण मुनिवेषात । धरता पदरज शिरी ते बालक ।
क्षमा करा घडली अजाणता चूक । असावी विप्रहृदयी विपुल दया ॥ २
मी आपण कैसे समान हे तात । सांगा कोठे चरण कोठे मस्तक ।
नाम दीर्घ तुमचे परशुसहित । कोठे राम मात्र मम नाम लघू ॥ ३
देवा धनुष्य आमुचा एकच गुण । पुनीत शमदमादि तुमचे नवगुण ।
हे विप्र मानितो हीन मी आपणाहून । मम अपराधाची क्षमा करा ॥ ४
संबोधती हे मुनि हे विप्रवर । राम परशूरामासी वारंवार ।
बंधूसम अससी तूही वक्र । विहसून वदती क्रोधे मुनी ॥ २८२
द्विज केवळ म्हणून मज जाणसी । कैसा विप्र मी ऐकवितो तुजसी ।
घोर अग्निसम जाण मम क्रोधासी । चाप हे यज्ञपात्र शर तयात आहुती ॥ १
उत्तम समिधा चतुरंग दल । यज्ञपशु हे महा महीपाळ ।
याच परशूने कापून दिले बळी सकळ । ऐसे कोटयवधि रणयज्ञ केले मी ॥ २
मम प्रभाव न विदित तुजसी । अनादर दावून मज विप्र म्हणसी ।
तव दर्प वृद्धिगत भंगता चापासी । जणु जगज्जेता उभा ताठ ऐसा अभिमान ॥ ३

राम वदती बोला मुनि करून विचार । दोष मम लघु आपुला कोप अनावर ।
भंगले जीर्ण चाप स्पर्शता सत्वर । कवण हेतूस्तव धरावा अभिमान ।। ४
विप्र म्हणता जर वाटे अनादर । मग ऐका भृगुनाथ सत्य तर ।
जगी ऐसा कोण महावीर । जयासी भयवशे शिर नमवावे आम्ही ।। २८३
देवदनुजभूपवीर सकल । असोत अधिक बलवान वा समबल ।
युद्ध करू जर आव्हान देतील । झुंजु सुखे सन्मुख काळ तरी ।। १
क्षत्रिय तनु धरून जो भितो युद्धास । तो पामर लावी कलंक कुळास ।
वदतो स्वभाव न प्रशंसी वंशास । रणी काळासही न भितो रघुवंशी ।। २
विप्रवंशाचा महिमा अपार । आपुली भीति जया तो निर्भय पामर ।
भृगुनाथाचे बुद्धीवरील पटल दूर । रघुपतीचे मृदू गूढ वचन ऐकून ।। ३
हे राम घे करी रमापतीचे धनुष्यास । मिटव मम संदेह ओढून तयास ।
स्वयेच गेले चाप मुनि देता तयास । तंव परशुराम मनी स्तिमित ।। ४
मुनि जाणती रामाचा प्रभाव । तयांची गात्रे पुलके प्रफुल्लित तंव ।
हृदयी सामावेना प्रेम अतीव । मग वदती वचन कर जोडून ।। २८४
जय रघुकुलकमलवनदिनकर । असुरकुलास दाहक अग्नि घोर ।
जय राम विप्रसुरधेनूस हितकर । मदमोहक्रोध भ्रमहारक जय जय ।। १
हे विनयशील करुणागुणसागर । जय जय वाग्विलासी चतुर ।
सुखद सेवका सर्वांग मनोहर । जय जय कोटि अनंगापरि सुंदरा ।। २
कैसी एक मुखे करू प्रशंसा । जय महेशमनमानसहंसा ।
अज्ञानी मी बोले अनुचित ऐसा । हे क्षमामंदिर उभय बंधो क्षमा करा ।। ३
मुनिवर वनी तपास्तव जाती । जय जय जय रघुकुलकेतु वदती ।
कुटिल भूपा कल्पित भये भीती । ते सकल सैरावैरा धावती भ्याडापरी ।। ४
सुरगण दुंदुभी वाजविती । प्रभुवरी सुमने वर्षती ।
नगरनरनारी प्रसन्न अती । तयांचे मोहमय दुःख मिटे ।। २८५
धडधडा वाजे सर्वत्र वाद्यध्वनी । मंगल साहित्य सज्ज करुनी ।
कोकिळ स्वरे गाती मधुर गाणी । सुमुखी सुनयना स्त्रीवृंद ।। १
जनकाच्या सुखाचे न करवे वर्णन । जणु दरिद्री पावे धननिधान ।
विगतभय सीता मुदितमन । चकोरकन्येसम सुखी चंद्रोदये ।। २
प्रणाम करितो जनक विश्वामित्रासी । वदती प्रभुकृपे राम भंगती धनूसी ।
उभय बंधू करिती कृतकृत्य मजसी । कथावे जे उचित ते स्वामी आता ।। ३

मुनि म्हणती ऐका हे नरेश चतुर। विवाह आधीन शिवचापभंगावर।
तोडता चापास जाहले स्वयंवर। जाणती सुरनरनाग हे सकल।। ४
करावा कुळाउचित व्यवहार। विप्रकुलवृद्धगुरु आदींचा घेऊन विचार।
पाळावा वेदविदित आचार। तुम्ही जाऊन आता लवलाही।। २८६
पाठवावे अयोध्येस दूत। बोलवावे राया दशरथास त्वरित।
बरे होय म्हणती जनक मुदित। तंव शीघ्र धाडती दूतासी।। १
जनक बोलाविती समस्त महाजन। करिती येऊन ते रायासी नमन।
सांगती शृंगारा बाजार पथ भवन। तैसे मंदिर नगर चौफेर।। २
जाती निजगृहासी होऊन प्रसन्न। मग बोलावून। घेती सेवकगण।
म्हणती सजवा मंडप सुंदर घालून। जाती सुखे धरून शिरी आज्ञा।। ३
बोलाविती नृप नाना गुणी जन। मंडप रचनेत कुशल सुजाण।
शुभारंभ जाहला ब्रह्मचासी वंदून। कनककदलीचे स्तंभ रचती।। ४
केली पाचूची पाने केळी हरित। पद्मराग रत्नाची केळफुले आरक्त।
पाहून मंडपाची रचना अतिअद्भुत। ब्रह्मचाच्याही मना भूल पडे।। २८७
पाचूमय हिरवे सकल कळक। गाठीसह सरळ न ओळखू शकत।
सत्याभास निर्मिती पर्णासहित। रचलेल्या सुंदर सुवर्ण नागवेली।। १
सुवर्ण वेलीची बंधनतार। तयांमधून लोंबे शुभ्र मोत्यांची झालर।
माणिक नीळ हिरे पाचू सुंदर। रचती तयांची कमळे चिरून कोरून।। २
भृंग बहुरंग विहंग तेथे रचती। वायु वाहता गुंजन कूजन करिती।
सुरांच्या प्रतिमा स्तंभावर रेखिती। उभ्या मंगल द्रव्यासह।। ३
काढती रंगावलि अनेक। जडवून तयात गजमौक्तिक।। ४
नीलमणि कोरून कोरीव। घडविती शुभद आम्रपल्लव।
सोन्याचा मोहर पाचूचे फळघोस अपूर्व। शोभती गुंफलेले रेशमी धाग्यात।। २८८
तोरणे उत्तम रुचिर विशेष। उभारिली जणु मदनाचे पाश।
शोभती तेथे मंगल कलश। ध्वजपताका पटल चामर।। १
नाना रत्नमय दीप मनोहर। न वानवे तो मंडप चित्रविचित्र।
ज्या मंडपी वधु वैदेही सुंदर। कोणत्या कवीची बुद्धि तो वानील।। २
जेथे वर राम रूपगुणांचा सागर। तो मंडप त्रैलोक्यी प्रसिद्ध सुंदर।
जैसी जनकभवनाची शोभा अपार। तैसी नगरीत दिसे घरोघरी।। ३

देखिली मिथिला नगरी जयाने । तयासी तुच्छ चवदा भुवने ।
होई इंद्रराज मोहित जेणे । शोभे ऐसी संपत्ति गरिबागृही ।। ४
सुंदर कपटे स्त्रीवेषात । साक्षात् लक्ष्मी नांदे नगरीत ।
शारदाशेषही न वर्णू शकत । ऐसी शोभा मिथिलेची ।। २८९
पोचती दूत पावन रामपुरी । हर्षित देखता रम्य नगरी ।
देती निरोप राजद्वारी । पाचारती मग दशरथ तयांसी ।। १
पत्रिका देती प्रणाम करूनी । महीप उठून घेती प्रसन्न मनी ।
रोमांचित तनु अश्रु नयनी । वाचता पत्रिका आले भरून उर ।। २
करी पत्रिका हृदयी रामलक्ष्मण । शुभाशुभ न वदती स्तब्ध हाती धरून ।
पुनरपि वाचती धीर करून । मग हर्षित सभा जाणून सत्य वार्ता ।। ३
भरतशत्रुघ्न मित्रांसह खेळती । तेथे पत्रिकेतील वृत्त ते जाणती ।
येऊन प्रेमे संकोचे पुसती । तात आली पत्रिका कोठून ।। ४
कुशल ना आमुचे प्राणप्रिय भ्राते । कोणत्या देशात वसती ते ।
ऐकून स्नेहपूर्ण वचनाते । पुन्हा वाचती पत्रिका नरेश ।। २९०
वृत्तांत ऐकता बंधु पुलकित । प्रेमाच्या ऊर्मि न मावती हृदयात ।
देखता भरताचे प्रेम पुनीत । सकल सभा विशेष सुखी ।। १
नृप दूतासी समीप बैसवून । बोलती मधुर मनोहर वचन ।
बाबांनो सांगा कुशल ना बाळे दोन । निज नयने तयांना नीट देखिले का ।। २
कौशिकमुनिसंगे वय किशोर । धनुष्यभाता धरती ते श्यामलगौर ।
जाणता तुम्ही सांगा स्वभाव तर । नृप प्रेमविवश पुसती पुन्हा पुन्हा ।। ३
ज्या दिवसापासून मुनि गेले घेऊन । आजच सत्य वृत्त कळले तेव्हापासून ।
सांगा कैसे जनके जाणिले नृपनंदन । प्रिय वचन ऐकून हासले दूत ।। ४
ऐका हे भूपति मुकुटमणी । तुम्हासम धन्य नसे कोणी ।
जयाचे रामलक्ष्मण सुत दोन्ही । उभय विश्वासी जे विभूषण ।। २९१
पुसाल प्रताप तरी न करवे वर्णन । ते नरसिंह त्रिलोका करिती दीप्तिमान ।
जयांचा यशःप्रभाव ऐसा महान । की रवि शीतल शशि मलिन तयांपुढे ।। १
पुसता हे नाथ कैसे जाणले ते । रवि बघण्या का करी घ्यावे दीपाते ।
सीतास्वयंवरी देखिले अनेक भूपाते । एकत्रित वीर एकाहून एक ।। २
न कोणी भंगती शंभुशरासन । हरले सकल वीर बलवान ।
त्रैलोक्यी शूर अभिमानी जे वीरगण । शक्तिहीन करी शिवधनु तया ।। ३

बाणासूर लीलया उचली सुमेरूस । होऊन पराजित घाली प्रदक्षिणा चापास ।
रावण कौतुके उचली कैलासास । तोही पावे पराभव सभेत ।। ४
श्रवण करा हे महा महीपाल । जैसा गजराज उपटी कमलनाल ।
तैसे रघुवंशमणि वीर धवल । विना प्रयास तोडती धनूस ।। २९२
धनुर्भंग ऐकता क्रोधे भार्गव येती । बहुपरि कुमारासी नेत्रे दापिती ।
अंती रामबळ पाहून निजचाप देती । मग स्तवून जाती वनामाजी ।। १
हे राजन् राम जैसे अतुलित बलवान । तैसे लक्ष्मण तेजोनिधान ।
तया पाहता भयकंपित नृपगण । जैसा बघून सिंहछावा गज कापे ।। २
हे महाराज देखता उभय तनय । डोळ्यात न भरती कुणी अन्य ।
दूतांचे वचन सकल लागे प्रिय । होते ते प्रेमप्रतापवीररसपूर्ण ।। ३
अति हर्ष नृपास तैसा सभेस । मग दूतांसी देऊं करिती बक्षिस ।
नीतिबाह्य म्हणोनी झाकती कानांस । दूत धर्मयुक्त पाहून सुख सकला ।। ४
भूप उठून जाती वसिष्ठांपाशी । आदरे पत्रिका देती तयांसी ।
सकल वृत्तांत कथून गुरुसी । बोलाविती दूतांसी मग ।। २९३
मुनि वदती अति सुख पावून । पुण्यपुरुषास मही सुखपूर्ण ।
जैसी सरिता मिळे सागरा जाऊन । जरी कामना नसता तयासी ।। १
जैसी अनाहूत सुखसंपत्ती । जाते धर्मशील पुरुषाप्रती ।
तुम्हास विप्रधेनुसुरसेवेत रती । तैसीच पवित्र कौसल्यादेवी ।। २
तुम्हासम पुण्यात्मा न जगी विद्यमान । न झाला कुणी पुढती होईल न कवण ।
तुम्हांहून कोण अधिक पुण्यवान । हे राजन् जयास रामासम तनय ।। ३
धर्म व्रतधारी विनम्र वीर । असती चारी सुत गुणसागर ।
डंका पिटून सज्ज करा वऱ्हाड सत्वर । सर्वदा तुमचे कल्याण असो ।। ४
करा त्वरा हे गुरुवचन ऐकून । होय नाथ म्हणती भूप शिर नमवून ।
दूतांसी निवासस्थान देववून । नृप गेले तदा निजभवनी ।। २९४
राया बोलाविती सर्व राज्ञींस । पत्रिका वाचून दाविती तयांस ।
आनंदित सकल ऐकता संदेश । मग अन्य वृत्त नृप कथिती ।। १
प्रेमे प्रफुल्लित शोभती राज्ञी । जणु मयुर ऐके वारिदवाणी ।
आशीर्वाद देती मुदित गुरुपत्नी । माता अति आनंदमग्न ।। २
परस्परा प्रिय पत्रिका देती । उरी लावून हृदय शांत करिती ।
रामलक्ष्मणाचा पराक्रम कीर्ती । वारंवार वानिती भूपवर ।। ३

ही मुनींची कृपा वदून नृपद्वारी जाती । मग राज्ञी विप्रश्रेष्ठांसी बोलाविती ।
अति आनंदे दाने देती । जाती आशीर्वाद देऊन विप्रवर ।। ४
मग याचकांसी बोलावून । देती कोटचवधि कुर्वंडी दान ।
चक्रवर्ती दशरथाचे पुत्र महान । होवोत चारी चिरंजीव ।। २९५
ऐसे वदून जाती सुंदर वस्त्रे घालून । हर्षे वाजविती घडघडा निशाण ।
घरोघर दिसे थाट महान । जंव समाचार समजे सकलांस ।। १
चौदाही भुवनी भरे उत्साह । की सीता रघुवीराचा होईल विवाह ।
मग शृंगारती मार्ग पथ गृह । जन ऐकून शुभवार्ता प्रेममग्न ।। २
अयोध्या सुरम्य सदैव जरी । पावन मंगलमय रामपुरी ।
परि दावून प्रीति प्रीतीवरी । सुंदर मंगल रचनेने शृंगारिती ।। ३
ध्वजपताका पटल चामर सुंदर । तयांनी सजविती अद्भुत बाजार ।
कनक कलश तोरण मणिझालर । अक्षता हळद दूध दधि माला ।। ४
निज भवने तयांनी शृंगारती जन । कौशल्ये पथी करिती सिंचन ।
घेऊन केशरकस्तूरीकर्पुरचंदन । द्वारी रेखिती सुंदर रंगावली ।। २९६
शशिवदना विद्युतसम कांती । मृगशावकलोचना भामिनी असती ।
निजरूपे रतीस लाजवती । ठायी ठायी सजून षोडश शृंगारे ।। १
जमून मंजुळ स्वरे गाती गाणी । कोकिळ लाजे मधुर रव येता कानी ।
राजभवनवर्णनासी अपुरी वाणी । जेथे रचिला विश्वविमोहित मंडप ।। १
मनोहर मंगल द्रव्ये शोभती । विपुल नगारे घडघडा वाजती ।
कोठे कोठे बंदीजन बिरुदावली गाती । कोठे वेदघोष करिती विप्रवर ।। ३
सुंदरी गाती मंगल गान । रामसीतेचे नाम घेऊन ।
उत्साह परम परि अपुरे भवन । जणु ओसंडून वाहे चौदिशेस ।। ४
शोभिवंत दशरथाचा महाल । कोण कवि तो वर्णू शकेल ।
अवतरला जेथे रामघननीळ । सकल सुरांचा मुकुटमणी ।। २९७
मग नृप बोलाविती भरतासी । सांगती अश्वगजरथ सजविण्यासी ।
वेगे येऊन मिळा रघुवीरवऱ्हाडासी । प्रेमे पुलाकित भ्राते ऐकून ।। १
भरत मग बोलावी अधिकारीजन । धावती हर्षे ते आज्ञा ऐकून ।
शृंगारिती अश्व यथोचित जीन कसून । ऐसे शोभती वाजी रंगारंगांचे ।। २
अश्वचाल चंचल तेज ऐटदार । पद टाकिती भूवरी जणु तप्त लोहावर ।
नाना जाती अवर्णनीय सुंदर । जणू उडू इच्छिती वायूस लाजवून ।। ३

भरतासम वयाचे राजकुमार। सकल देखणे तरुण होती स्वार।
भूषणधारी सर्वचि सुंदर। करी चापशर भाते भारी कटी ॥ ४
निवडक सकल शोकिन सुंदर शूर। नवयुवक सुजाण अति चतुर।
दोन असिकलेंत कुशल पदचर। असती स्वारासमवेत ॥ २९८
रणधीर वीर शूरतेचे ब्रीद चढवून। उभे ठाकती नगरवेशीत येऊन।
गति नाना देती ते चतुर तुरंग फिरवून। ऐकून हर्षित भेरीदुंदुभीध्वनी ॥ १
सारथी सजविती रथ अति विचित्र। ध्वजपताका रत्नभूषणे तयावर।
चामर चारु किंकिणीचा ध्वनि मधुर। हरण करिती शोभा रविरथाची ॥ २
श्यामवर्ण अगणित अश्वांस। जुंपती सारथी तयां रथांस।
मुनि मोहित पाहून जयांस। ऐसे सालंकृत सुंदर शोभिवंत ॥ ३
धरतीपरी ते जळावरी चालती। अति वेगवान टापा नच बुडती।
शस्त्रेअस्त्रे सर्व साज सजविती। मग सारथी बोलाविती रथियांसी ॥ ४
चढचढून रथी बैसती। मग वऱ्हाडी नगरीबाहेर जमती।
शकुन सुंदर तयांसी होती। जे जाती ज्या ज्या काजासी ॥ २९९
विराजती अंबाऱ्या गजराजांवर। अवर्णनीय तयांचा साजशृंगार।
मत्त गज चालता होई घंटागजर। जणु गर्जत जाती श्रावणमेघपंक्ती ॥ १
नाना वाहने अनेक प्रकार। शिबिका सुखावह अति सुंदर।
बैसती चढून तयांत विप्रवर। जणु मूर्तिमंत वेदातील छंद ॥ २
मागध बंदीसुत गुणगायक। योग्यतेनुसार वाहनी चढत।
ठेविती वस्तु विविध अगणित। उंटखेचरबैलांवरी ॥ ३
कोटयवधी कावडी सेवक घेऊन। विविध वर्णनातीत वस्तू घालून।
निज निज समूहास शृंगारून। निघती समुदाय थाटाने ॥ ४
सकल जन अति हर्षभरित। शरीरगात्रे रोमांचित।
केव्हा बघू रामलक्ष्मण दोन्ही वीर। आम्ही डोळे भरून लालसा तया ॥ ३००
गर्जती गज होई घोर घंटानाद। रथ घडघडती अश्व खिकाळत।
घनगर्जनेस लाजवी दुंदुभीनिनाद। न ऐकू येई आपपरवचन ॥ १
जनसंमर्दे उसळे राजद्वार। पाषाण पदतळी पडता होई चूर।
पाहती नारी चढून माडीवर। मंगलारती तबकी घेऊन ॥ २
गाती मनोहर रसाळ गीत। कैसा वर्णावा तयांचा अति आनंद।
तंव रथ दोन सजवी सुमंत। जुंपी घोडे जे लाजविती रविअश्वास ॥ ३

आणती नृपाप्रति ते रुचिर रथ दोन। शारदा न करू शके तयांचे वर्णन।
एकावरी सज्ज राजवंशीय जन। दुजा तेजस्वी शोभिवंत ॥ ४
त्या सुंदर रथांत वसिष्ठास। हर्षे बैसविती नरेश।
स्मरून शिवगुरुगौरीगणेश। मग स्वयें चढती निजरथीं ॥ ३०१
वसिष्ठासवे नृप कैसे शोभती। इंद्रासमवेत जैसे बृहस्पती।
करून वेदविधि कुलाचार रीती। मग पाहून सज्ज समाजास ॥ १
रामास स्मरून गुरूंची आज्ञा घेती। शंखनिनाद करून निघती महीपती।
पाहून वऱ्हाडी देव हर्षित अती। वर्षती सुमने मंगलप्रद ॥ २
माजे कोलाहल हयगण गर्जती। वरातीसवे तैसे व्योमी वाद्ये वाजती।
मंगलगीत सुरनारी गाती। वाजे सनई सुरेल रागात ॥ ३
न वर्णवे घंटाकिंकिणिनाद। विविध खेळ कसरत करिती सेवक।
नानाचेष्टा करिती विदूषक। जे हास्यकुशल मधुर गायनी निपुण ॥ ४
तुरग नाचविती राजकुमार। मृदंगदुंदुभीच्या नादतालावर।
पाहून स्तिमित चतुर नटवर। नसे दोष तयांच्या लयबद्धतेत ॥ ३०२
शोभिवंत वरातीचे न करावे वर्णन। होती मंगल शुभद शकुन।
नीळकंठ वामबाजूने चारा घेऊन। जणु सुचवी संपूर्ण मंगलता ॥ १
शोभे दक्षिण भागी शेतामाजी काक। नकुल दर्शन सकलांस मिळत।
वाहे वायु शीतमंदसुगंधित। घटासह शिशुसवे सुवासिनी सामोऱ्या ॥ २
कोल्हा वारंवार पडे दृष्टीस। दुग्ध पाजी सुरभि सन्मुख वत्सास।
वळली मृगमाळा दक्षिण बाजूस। जणु दाविती मंगलसमूहास ॥ ३
क्षेमकरी खग सुचवी विशेष क्षेम। दिसे श्यामा सुतरूवर बाजूस वाम।
करी पुस्तक सन्मुख विप्रवरयुग्म। तैसे मंगलसूचक दधिमीन हाती ॥ ४
ऐसे मंगलमय कल्याणकारक। शकुन मनवांछित फळदायक।
येती एकासहित एक। जणु दाविती सत्यता तयांची ॥ ३०३
जयाचा सुत सुंदर ब्रह्मसगुण। तयास सुलभ सकल मंगल शकुन।
जेथे वधु सीता वर रामासमान। व्याही पावन दशरथजनकासम ॥ १
ऐसा विवाह ऐकून नाचती शकुन। म्हणती ब्रह्मा आम्हां दावी सत्य करून।
यापरी वऱ्हाडी करिती प्रयाण। वाजती नगारे गर्जती अश्वगज ॥ २
भानुकुळकेतु दशरथ येती जाणून। नद्यांवरी सेतु बांधविती जनक म्हणून।
पथी उभारिली ठायी ठायी निवासस्थान। जेथे स्वर्गतुल्य संपदा अपार ॥ ३

भोजनशयन वस्त्रे सुंदर । पावती सकल निज इच्छेनुसार ।
वऱ्हाडी विसरती निज सुंदर मंदिर । सुखे नितनवी अनुकूल पाहून ।। ४
दुंदुभीचा गहन निनाद ऐकून । आली वराची वरात ऐसे जाणून ।
गजरथअश्वपायदळ सज्ज करून । जनक जाती वऱ्हाडियांसी सामोरे ।। ३०४

ताटतबकपरातकलश सुवर्ण । अनेकविध असती सुंदर भाजन ।
ठेविती तयात सुधासम पक्वान्न । नाना प्रकारची न वर्णवे ।। १
फळफळावळ तथा वस्तू सुंदर । भूषण रत्न अमूल्य वस्त्र ।
खगमृगगजअश्वयान सत्वर । पाठविती ऐसी भेट जनक हर्षे ।। २
मंगल शकुन द्रव्ये सुगंधित । महीपाल अनेकविध पाठवीत ।
भरून नेती सेवक कावडीत । अपार खाद्यवस्तू दहिपोहे ।। ३
जंव ते पाहती वऱ्हाडास । गात्रे पुलकित अति आनंद तयांस ।
वऱ्हाडी आनंदे बघून साजशृंगारास । वाजविती नगारे घडाघडा ।। ४
काही उभय पक्षीय जन । परस्पर मीलना जाती धावून ।
जणु आनंदसमुद्र दोन । मर्यादा सोडून येती एकत्र ।। ३०५

वर्षून सुमने देवसुंदरी गाती । मुदित मने देव नगारे वाजविती ।
ठेवून वस्तू दशरथापुढती । विनविती प्रेमे जनकाचे जन ।। १
राया प्रेमे भेटी स्वीकारून । तृप्त करी याचका बक्षीस देऊन ।
मग होई पूजा सत्कार मान । नेती तंव वऱ्हाडी जनांस जानवसी ।। २
पायघड्यावसने चित्रविचित्र । सोडी धनाचा अभिमान कुबेर ।
दिला जानवसा अतीव सुंदर । सकल सोयींनी सुखपूर्ण ।। ३
आले वऱ्हाड सीता जाणून । दावी निज अल्प महिमा प्रकट करून ।
सिद्धीस बोलावी हृदयी स्मरून । भूपपाहुणचारास्तव पाठवी तया ।। ४
ऐकून ऋद्धिसिद्धी सीतेची आज्ञा । जाती वऱ्हाडीजनांच्या निवासस्थाना ।
नेती इंद्रपुरीतील भोगविलास नाना । सुखसंपदा स्वर्गीय ।। ३०६

निज निवासस्थान वऱ्हाडी विलोकिती । सकल देवांचे सुख सुलभ पावती ।
जनकास अयोध्याजन प्रशंसिती । न्यूनता काही न भासे वैभवी ।। १
रघुनायक सीतेचा महिमा जाणून । हृदयी हर्षित हेतु ओळखून ।
बंधुद्वय पितृआगमन ऐकून । मनी आनंद तयांच्या सामावेना ।। २

न वदती गुरुसी संकोचून । परि पितादर्शनासी उत्सुक मन ।
विश्वामित्र तयांचा विनय पाहून । उपजे संतोष विशेष हृदयी ।। ३
उभय बंधूस हर्षे हृदयी धरिती । पुलकित तनु नेत्री प्रेमाश्रू भरती ।
निघाले जानवश्यात दशरथाप्रति । जैसा तृषार्त जाई सरोवराकडे ।। ४
दशरथ मुनीस विलोकिती । तयांच्या सवे सुत बघती ।
जणु सुखसागराचा ते ठाव घेती । हर्षे उठून निघताना ।। ३०७
महीश मुनिस दंडवत घालून । ठेविती वारंवार शिरी पदरजकण ।
दशरथासी विश्वामित्र हृदयी धरून । आशीर्वाद देऊन कुशल पुशिती ।। १
दंडवत घालिती कुमारद्वय । आनंदे उचंबळे नृपाचे हृदय ।
दुःख मिटे आलिंगिता सुत उभय । मृत शरीरास जणु प्राण मिळे ।। २
कुमार वसिष्ठाच्या पदी शिर नमविती । प्रेमे मुदितमने मुनि हृदयी धरिती ।
उभय बंधु विप्रांसी वंदिती । पावती इच्छित आशीर्वाद ।। ३
शत्रुघ्नासह भरत करी प्रणाम । आलिंगन देती तया राम ।
पाहून भ्राते हर्षित परम । लक्ष्मण भेटे तया प्रेमाने ।। ४
अयोध्याजन जातीजन आप्तजन । याचक मंत्री मित्रगण ।
सकला भेटती कृपानिधान । यथाविधि विनयशील प्रभुराम ।। ३०८
रामासी पाहून वऱ्हाडी शांत प्रसन्न । त्या प्रीतीच्या रीतीचे न करवे वर्णन ।
नृपासवे शोभती चारी नंदन । जणु धर्मादि तनुधारी चारी अर्थ ।। १
सुतांसह दशरथनरेशा पाहून । नगरनरनारी विशेष प्रसन्न ।
देव वाजविती नगारे सुमने वर्षून । नृत्यगायन करिती नृत्यांगना ।। २
शतानंद विप्र सचिवगण । मागध सुत विदूषक बंदी जन ।
नृपासह करिती वऱ्हाडियांचा सन्मान । जाती जनकाचे जन निरोप घेऊन ।। ३
लग्नापूर्वीच आले वऱ्हाडीजन । भरे अधिक आनंद नगरातून ।
नगरजन सकल ब्रह्मानंदी तल्लीन । ब्रह्मचासी प्रार्थिती कराया दिनवृद्धी ।। ४
लावण्यसीमा श्रीसीताराम असून । उभय नृप परम पुण्यवान ।
ठायी ठायी एकत्र जमून । वदती ऐसे नरनारीसमूह ।। ३०९
जनकपुण्याची मूर्ति वैदेही । दशरथाचे पुण्य अवतरे रामदेही ।
नृपासम शिवआराधना न केली कुणीही । न तयांसम फळप्राप्ति कवणास ।। १
महीवरी न कोठे विद्यमान । न झाले न होणार कधीही तयांसमान ।
आम्ही जनक पुरवासी जगी जन्मून । जाहलो संपूर्ण पुण्यराशी ।। २

देखिले जयांनी रामसीतेचे लावण्य। त्या आम्हांसम मिळवी कोण विशेष पुण्य।
होईल आमुचे पूर्ण नेत्रसाफल्य। बघून आता विवाह रामाचा ।। ३
कोकिळेपरि स्त्रिया वदती मधुर। गे सुनयने या विवाही लाभ अपार।
रचिले सुयोग विधीने भाग्य थोर। होतील नेत्रांचे अतिथि उभय बंधू ।। ४
स्नेहे बोलावतील जनक सीतेसी। येईल वारंवार मग माहेरासी।
येतील बंधुद्वय तिज नेण्यासी। जे कोटि मदनांपरि कमनीय ।। ३१०
होतील पाहुणचार नाना परी। सखे कोणा न प्रिय ऐसे सासुरवाड तरी।
सुखी होतील तंव पुरनरनारी। रामलक्ष्मणांस पाहून ।। १
गे सखे जैसी जोडी रामलक्ष्मण। तैसे नृपासंगे सुत अन्य दोन।
सकल कथिती तयां पाहून। तेही सुंदर गात्रांचे श्यामगौर ।। २
एक म्हणे आज देखिले दोघांसी। जणु निज हस्ते ब्रह्मा घडवी तयांसी।
नरनारी न जाणती रूपभेदांसी। भरत रामाची प्रतिमा एकरूप ।। ३
लक्ष्मण शत्रुघ्न एकरूप। नखशिखांत अंगकांती अनूप।
मना आवडते परि न वर्णवे स्वरूप। त्रैलोक्यी न कुणी उचित उपमा देण्यासी ।। ४

उपमा न जगी। वदत तुलसी। कवि पंडितांसी। तैसे वाटे।
नम्र शोभासिंधु। बलशील विद्या। यात सम त्यांच्या। तेची होत।
ललना पदर। पुढे पसरती। करिती विनंती। विधात्यासी।
चारीही विवाह। घडावे पुरीत। आम्ही गावे गीत। सुमंगल ।। १

परस्परांस वदती नारी। पुलकित तनु आणून प्रेमाश्रु नेत्री।
अगे पूर्ण करील मनोरथ त्रिपुरारी। उभय भूप सागर पुण्याचे ।। ३११
ऐसे मनोरथ करिती कामिनी। आनंद उत्साह हृदयी भरूनी।
सुख पावती भ्राते देखुनी। नृप आलेले सीतास्वयंवरासी ।। १
महान निर्मल रामयश वर्णती। महीपाल निज निज भवनी जाती।
गेले काही दिन ऐशा रीती। आनंदित प्रजा वऱ्हाडी जन सकल ।। २
आला मंगलमूळ लग्नदिन। हेमंत मार्गशीर्ष पावन।
ब्रह्मा कळवी लग्नमुहूर्त काढून। ग्रह तिथि नक्षत्र योग वारवर ।। ३
नारदाहस्ते पाठविती लग्नमुहूर्त। जनकाचे ज्योतिषी तोची वर्तवीत।
जंव सकल लोक ऐकती वृत्तांत। म्हणती ज्योतिषी ब्रह्माच ।। ४

आली गोरज मुहूर्तवेळा विमल । सकल सुमंगलांचे मूळ ।
जाणून शकुन अनुकूल । विप्र निवेदिती जनकासी ।। ३१२
मग भूप विचारिती पुरोहितासी । का करिता आता विलंबासी ।
तंव बोलाविती शतानंद सचिवासी । आणिती ते मंगलद्रव्ये सुसज्ज ।। १
वाजती वाद्ये शंख नगारे ढोल । आणती शुभ द्रव्ये कलश मंगल ।
सुवासिनी गाती गीत रसाळ । पवित्र ब्राह्मण करिती वेदघोष ।। २
आदरे निघाले मूळ वरास । पोचती ते वऱ्हाडी जनवासास ।
पाहून दशरथाच्या वैभवास । तुच्छ भासे तयांना देवेंद्र ।। ३
विनविती समय आला चलावे सत्वर । हे ऐकताच पडला घाव नगाऱ्यावर ।
गुरूस पुसून केला कुळविधि साचार । मुनिसंतसमाजांसह निघती नृप ।। ४
अयोध्यानरेशाचे भाग्यवैभव । पाहून ब्रह्मादि सकल देव ।
निज जन्म व्यर्थ उपजे मनी भाव । तयासी स्तविती सहस्रमुखे ।। ३१३
सुमंगल वेळा जाणून सुरगण । नगारे वाजविती सुमने वर्षून ।
चढती निज विमानी तया सजवून । शिवब्रह्मादि सुरवृंद ।। १
रोमांचित तनु हृदयी उत्साह । निघती विलोकनासी रामविवाह ।
जनकपुरी पाहून उपजला स्नेह । निज निज निवासपुरी तुच्छ भासे ।। २
सुंदर अलौकिक मंडप पाहून । होती स्तिमित सकल जन ।
नगरपुरुषस्त्रिया रूपनिधान । सज्जन सुशील सुधर्मी डौलदार ।। ३
सुर सुरललना तयांसी पाहून । शशिप्रकाशी जणू नक्षत्र प्रभाहीन ।
ब्रह्मदेवासी वाटे आश्चर्य विलक्षण । निज करणी न देखे कोठेही ।। ४
देवगणासी शिव समजाविती । न विसरा तुम्ही स्तिमित होऊन म्हणती ।
विचार करा धीर धरून चित्ती । हा विवाह रघुवरसीतेचा ।। ३१४
जगी जयाच्या नामोच्चारे केवळ । नष्ट होई अमंगलाचे मूळ ।
मुठीत येती धर्मादि अर्थ सकल । तेच हे सीताराम वदती कामारी ।। १
शंभु सुरांसी समजावून ऐशापरी । जाती पुढती आरूढ नंदीवरी ।
दशरथासी प्रसन्न पुलकित गात्री । पाहती देव जाताना ।। २
संगे संत विप्रगण हर्षभरित । जणु तनुधारी सुख तयांची सेवा करीत ।
सवे शोभती सुंदर चारी सुत । जणु मूर्तिमंत मोक्ष चारी ।। ३
कुमार जोडी इंद्रनील कनकवर्णी । सुरांसी वाटे अति प्रीति पाहुनी ।
मग प्रसन्न होती रामास बघुनी । वर्षती पुष्पे नृपास स्तवून ।। ४

रामरूप रमणीय नखशिखांत । वारंवार उमामहेश न्याहाळीत ।
होती तयांची गात्रे रोमांचित । नयनी दाटती प्रेमाश्रू ॥ ३१५
मयूरकंठकांतिसम श्यामल अंग । दामिनीस लाजवी ऐसे वसन सुरंग ।
विवाहभूषणे सजविती तनुभाग । मंगल सुंदर नानाविध ॥ १
सुंदर विमल शरदशशिसम वदन । नव राजीवासी लाजविती नयन ।
लावण्य अमूप दिव्य आनंदघन । मना आकळे परि न वर्णवे ॥ २
संगे शोभती भ्राते मनोहर । जाती चपळ अश्वासी नाचवीत चतुर ।
दाखविती तुरगगतीस राजकुमार । कुळप्रशंसक गाती बिरुदावली ॥ ३
राम विराजती ज्या अश्वावरी । गरुड लाजे बघून गति भरारी ।
जणु मदनची आला अश्ववेषधारी । ऐसा सुंदर न वदवे ॥ ४

जणु वाजिवेषे । हेतु रामकाज । आला मनसिज । सुशोभित ।
निज वयबळे । रूपगतिगुणे । सकल भुवने । विमोहित ।
झगमगे जीन । जडित मोत्यांनी । रत्न माणिकांनी । तेजोमय ।
किंकिणिसहित । ललित लगाम । विलोकिता भ्रम । सुरनरा ॥ १

प्रभुमनी विलीन अश्वमन । प्रभा झळके होतां तो गतिमान ।
जणु तारागण तथा दामिनि भूषित घन । नाचविती सुंदर मयूरासी ॥ ३१६
ज्या सुंदर वाजीवरी जाहले राम स्वार । शारदा वर्णू न शके तो साचार ।
शंकरांचे अति प्रेम रामावर । म्हणून प्रिय तया निज पंचदशनयन ॥ १
विष्णु बघती रामाप्रति प्रेमासहित । रमापति रमेसह होती मोहित ।
बघून रामाचे लावण्य ब्रह्मा हर्षित । परि दुःखित अष्ट नयन जाणून ॥ २
मनी उल्हसित सुरसेनापति षडानन । नेत्रलाभ तयास दीडपट ब्रह्माहून ।
बघून रामासी सुरपति सुजाण । हितकर मानी गौतम शापास ॥ ३
सुर करिती इंद्राचे स्तवन । इंद्रासम आज न अन्य भाग्यवान ।
श्रीरामास बघून मुदित देवगण । उभय नृपसमाज अति हर्षित ॥ ४

नृपति जनांस । झाला हर्ष अती । दुंदुभी गर्जती । दोन्ही दिशी ।
सुमने वर्षून । गर्जतात सुर । जय रघुवीर । अति हर्षे ।
ऐशापरि येती । वऱ्हाडी जाणून । वाद्ये कडाडून । गर्जतात ।
ओवाळण्यास्तव । राणी सुवासिनी । घेती सजवुनी । शुभद्रव्ये ॥ १

सजवून अनेकविध आरती । मंगल द्रव्यांसह सज्ज करिती ।
गजगामिनि सुंदर नारी जाती । ओवाळण्यासी मुदित मने ॥ ३१७
शशिमुखी मृगनयना नारी सकल । रतिमदा हरवी तनुकांति कोमल ।
नेसून वस्त्रे बहुरंगी बहुमोल । शरीर सजविती भूषणांनी ॥ १
तनूस हरिद्रा सेंदूर लावती । गानस्वरे कोकिळेसी लाजविती ।
कंकणकिंकिणिनुपूर रुणझुणती । गति बघून लाजे मदनगज ॥ २
वाद्ये वाजती विविध प्रकार । नभी नगरी होती मंगलाचार ।
देवांगना सहज पावन चतुर । तथा शुचिशारदाउमारमा ॥ ३
कपटे घेती सुंदर स्त्रीचा वेष । करिती राणीवासात प्रवेश ।
गाती मंगल मधुर गानास । परि न कोणी जाणती हर्षवशे ॥ ४

हर्षवश नारी । कोणा न जाणती । ओवाळण्या जाती । ब्रह्मवरा ।
सुरपुष्पवृष्टी । निनादे निशाण । मधुर गायन । शोभा थाट ।
बघून वरास । आनंदाचा कंद । हृदये हर्षित । ललनांची ।
कमलनयनी । वाहे प्रेमजळ । शरीर कोमल । पुलकित ॥ १

पाहून सुंदर रामाचा वेष । सीतेच्या मातेसी सुख विशेष ।
सहस्रावधि शारदाशेष । न वानू शकती शतकल्पी ॥ ३१८
अश्रु आवरी मंगलसमय जाणून । राज्ञी ओवाळी मने प्रसन्न ।
कुळाचार वेदविधि करून । साधला व्यवहार कुळाउचित ॥ १
मंगलगायन पंचवाद्यध्वनी । पायघडचा घालती नाना वस्त्रे घेऊनी ।
करी आरती राज्ञी अर्घ्ये देउनी । मग राम गमन करिती मंडपात ॥ २
दशरथ समाजांसह विराजमान होती । वैभव पाहून लोकपाल लाजती ।
समयी समयी सुर पुष्पे वर्षती । शांतिपाठ करिती विप्रवर ॥ ३
नभी नगरी उसळे कोलाहल । येती न ऐकू निजपर बोल ।
ऐशा थाटांत प्रवेशती घननीळ । बैसविती आसनी अर्घ्य देऊन ॥ ४

करिती आरती । वरा बैसवून । ललना पाहून । सुखावती ।
रत्नवसनादी । अनेक भूषण । वरा ओवाळून । गाती गाणी ।
ब्रह्मासुरवर । विप्रवेष घेती । कौतुक बघती । विवाहाचे ।
रघुकुलकुंज । रविछबी बघून । सुफळ जीवन । मानतात ॥ १

भाटनटतांबोळीनापित । मुदित मने ओवाळणी स्वीकारीत ।
शिर नमवून आशीर्वाद देत । हृदयी हर्ष तयांच्या सामावेना ।। ३१९
जनकदशरथ प्रेमे भेटती । पाळून लौकिक वेदरीती ।
मीलनी उभय नृपवर शोभती । उपमा शोधशोधून लाजती कवी ।। १
उपमा न मिळता पराजय मानिती । त्यांच्यासम तेच उपमा योजिती ।
व्याही बघून सुर प्रेमी दंग होती । सुमने वर्षुनी यश गाती ।। २
जैंहुनी ब्रह्माने निर्मिले विश्वासी । परिसले पाहिले बहुत विवाहांसी ।
तैंहुनी आजचि पाहिले समान व्याह्यांसी । साजशृंगार समान सर्वपरी ।। ३
ऐकून देववाणी सत्य सुंदर । उभयपक्षी दाटले प्रेम अपार ।
आणती मंडपी दशरथासी सादर । जनक पायघड्या घालून अर्घ्य देऊन ।। ४

मुनिमनहारी । मंडप बघून । सुंदर घडण । रुचिरता ।
धरून हस्ताने । सुजाण जनक । सर्वां बैसवीत । सिंहासनी ।
कुळदेवापरी । पुजून वसिष्ठा । घेई आशीर्वादा । प्रार्थूनीया ।
पूजी विश्वामित्रा । प्रीतीने परम । उचंबळे प्रेम । न वानवे ।। १

वामदेवादिक ऋषीस । पूजी मुदित मने महीश ।
दिव्य आसन देऊन तयास । आशीर्वाद तयांचा स्वीकारी ।। ३२०
मग पुजिले दशरथ राजास । न मनी दुजाभाव मानून ईश ।
प्रार्थून कर जोडिले तयास । स्तवून निजभाग्यवैभवास ।। १
पुजती जनक सकल वऱ्हाडीजनांस । आदरे मानून निजव्याह्यासरिस ।
देती उचित आसन सकलांस । कैसा उत्साह वर्णू मी एक मुखे ।। २
मृदुवाणीविनयदानमान । जनक वऱ्हाडीयांचा करिती सन्मान ।
जाणती रघुवीरांचा महिमा महान । विधीहरिहर दिक्पाल दिनराज ।। ३
ते कपटे घेती विप्राचा वेष । प्रभुलीला बघून वाटे सुख विशेष ।
पुजती नृप तयां मानून ईश । न जाणता बैसविती सुआसनी ।। ४

उरली न शुद्धी । मंडपी कवणा । तेथे कोण कोणा । ओळखतो ।
विलोकून वर । आनंदाचा कंद । उभय पक्षात । भरे मोद ।
सर्वज्ञ श्रीराम । सुरांसी पाहून । मानसी पूजन । करितात ।
सुशील स्वभाव । प्रभूचा बघून । देवादिक मन । आनंदित ।। १

रामचंद्र मुखचंद्राची शोभा पाहून । चारु चकोर जणु जनांचे लोचन ।
आदरे तयाचे करिती पान । वसे प्रेम आनंद बहुत तेथे ।। ३२१
समय बघून वसिष्ठ बोलाविती । आदरे शतानंद ऐकून जाती ।
आणा त्वरित वधूस म्हणती । मुनि मोदे जाती आज्ञा घेऊन ।। १
राणी कुलगुरूची वाणी ऐकून । प्रसन्न सख्यांसह ती सुजाण ।
विप्रस्त्रिया कुलवृद्ध नारीस बोलावून । कुलरीती करून गीत गाती ।। २
देवांगना येती नारीवेषात । रमणीय सुंदर तरुणी भासत ।
नारी तयांना पाहून सुख पावत । न ओळखती तरी प्राणप्रिय ।। ३
राज्ञी तया वारंवार सन्मानी । उमारमाशारदेसम जाणुनी ।
सख्या आणती सीतेस शृंगारुनी । आदरे निजसमूही मंडपांत ।। ४

सखी भामिनी त्या । शृंगार करून । सीतेसी घेऊन । प्रवेशती ।
षोडषशृंगार । सुंदरी करिती । मत्तगजगति । मनोहर ।
मुनिध्यानभंग । गानास ऐकून । कोकिळमदन । लाजतात ।
मधुर निनादे । मंजुळ पैंजण । किंकिणिकंकण । तालावरी ।। १

कैसी सहज सुंदर शोभत । सीता त्या वनितावृंदात ।
जणू कमनीय सुषमा स्त्री मूर्तिमंत । लावण्यमय ललनासमूहात ।। ३२२
सीतेचे सौंदर्य वर्णनातीत । कवीची अल्पमति मनोहरता बहुत ।
लावण्यखाण सीता पुनीत । वऱ्हाडी जन बघती येताना ।। १
मनोमनी तिज सकल करिती प्रणाम । रामासी बघून जाहले पूर्णकाम ।
पुत्रासह दशरथ हर्षित परम । न वर्णवे हृदयातील आनंद ।। २
सुर वर्षती फुले प्रणाम करुनी । मंगलमूळ मुनींचा आशीर्वादध्वनी ।
दुंदुभीरव एकच कोलाहल गानी । सकल नरनारी प्रेमानंदी मग्न ।। ३
आली ते समयी सीता मंडपात । हर्षे मुनि गाती शांतिसूक्त ।
करिती विधिव्यवहार समयोचित । कुलगुरु उभय पक्षांचे ।। ४
विप्रगौरी पूजा । तैसी गणेशाची । करविती साची । मोदे गुरू ।
सुर प्रकटती । पूजा स्वीकारिती । आशीर्वाद देती । सुखी होती ।
मधुपर्क द्रव्ये । योग्य वेळी देती । मुनि जे मागती । ते ते सर्व ।
कनक कलशी । सुवर्ण तबकी । सेवक भरिती । शुभ द्रव्ये ।। १

रवि प्रेमासह । कुळाचा पुरुष । सांगतो प्रत्यक्ष । कुळरीती ।
ऐशापरी पूजा । देवांची करिती । सीता बैसविती । सिंहासनी ।
सीताराम यांचे । प्रेम परस्पर । नसे दृग्गोचर । कुणासही ।
वाणीबुद्धिमने । नाकळे तयांसी । कैसे ते कवीसी । वानवेल ।। २

होमसमयीं अग्नि मूर्तिमंत । प्रगटून सुखें आहुति घेत ।
विप्रवेषधारी वेद । आदरे दाविती विवाहविधी ।। ३२३
जगा विदित जनकाची पट्टराणी । न वानू शकती सीतामाता कोणी ।
निर्मी तिज ब्रह्मा मेळवुनी । सुंदरतासुकृतसुयशसुख ।। १
समय जाणून तिज बोलाविती मुनी । आदरे सुवासिनी आणती जाउनी ।
हिमगिरीसवे दिसे मैना शोभुनी । तैसी जनकाचे वामभागी सुनयना ।। २
रत्नतबकी शुभद्रव्ये कलशी सुवर्ण । शुचि सुगंध मंगल जळ भरून ।
नृपराज्ञी मनी प्रसन्न होऊन । श्रीरामासन्मुख ठेविती ।। ३
मंगल वेदपाठ मुनि करिती । गगनी सुर सुमने वर्षती ।
वरा विलोकून प्रेममग्न दंपती । प्रक्षाळिती पुनीत रामपद ।। ४

पदपंकजांसी । प्रेमे प्रक्षाळिती । रोमांच उठती । तनूवरी ।
गायनवादन । जयघोष ध्वनी । नभी पुरीतुनी । चहू दिशी ।
पदसरोज जे । वास करितात । मानससरात । शंकराच्या ।
कलिपापनष्ट जयास स्मरता । मना विमलता । तदा येई ।। १

जया पदस्पर्शे । गौतमाची पत्नी । अहल्या पापिणी । पावे गती ।
पदकमलांचा । गंगामकरंद । देवांस पुनीत । शंभुशिरी ।
मधुपाचे मन । मुनियोगीकृत । सेवुनिया पद । गति प्राप्त ।
भाग्याचे भाजन । जनक ते पद । प्रक्षाळी घोषांत । जय जय ।। २

केले वधुवरे । करांचे ग्रहण । कुळ उच्चारण । गुरुकृत ।
पाणिग्रहणास । सुरनर मुनी । विधाता पाहुनी । आनंदित ।
सुखमूळवर । पाहून दंपती । उल्हसित अती । रोमांचित ।
लोकवेदरीती । करी कन्यादान । नृपांचे भूषण । अति हर्षे ।। ३

हिमवंते दिली । गिरिजा शिवासी । सागर हरीसी । लक्ष्मी देई ।
जनके रामासी । सीता समर्पिली । कीर्ति मिळविली । त्रैलोक्यात ।
विदेहा विदेही । करी श्याम मूर्ती । कैसी तो विनंती । करी आता ।
झाला लाजाहोम । गाठ मारतात । विधी करतात । सप्तपदी ।। ४

जयध्वनि बंदीवेदध्वनी । मंगलगान दुंदुभी नाद ऐकुनी ।
सुरगण वर्षती हर्षित होउनी । सुंदर सुमने सुरतरूची ।। ३२४
वधुवर करिती सप्तपदी । आदरे सकल नयनलाभ लुटती ।
न वर्णवे ती मनोहर दंपती । द्यावी उपमा ती गौण भासे ।। १
रामसीतेचे प्रतिबिंब सुंदर । रत्नस्तंभांतून झळके मनोहर ।
जणु बहुरूपे मदनरति सादर । अनुपम रामविवाह बघती ।। २
दर्शनलालसा परि संकोच बहुत । पुन्हा पुन्हा प्रकटून होती गुप्त ।
पाहून सकल अति आनंदित । हरपती भान जनकासम ।। ३
मुनि करविती सप्तपदी । अहेरादि सकल विधि पूर्ण करिती ।
सीतेच्या भांगात राम सेंदूर भरिती । ती अपूर्व शोभा न वर्णवे ।। ४
अरुणपरागे भरून कमल सरस । जणू अमृतलोभे सर्प भूषवी शशीस ।
मग वसिष्ठ देती आदेश । तंव वधुवर बैसती एकासनी ।। ५

दशरथमन । मुदित बघुनी । दोघे वरासनी । रामसीता ।
पुण्यकल्पवृक्ष । फळला नूतन । पुन्हा विलोकून । रोमांचित ।
रामाचा विवाह । म्हणती जाहला । उत्साह भरला । त्रिभुवनी ।
रसना एकची । मंगल महान । कैसे ते वर्णन । पूर्ण होई ।। १

वसिष्ठांची आज्ञा । जनके घेऊन । द्रव्ये सजवून । विवाहासी ।
मांडवी उर्मिला । तैसी श्रुतकीर्ती । बोलावून घेती । कुमारींसी ।
कुशकेतुकन्या । ज्येष्ठ गुणवंत । सुखशोभायुक्त । कमनीय ।
राजा जनकाने । प्रेमासह पूर्ण । लावियेले लग्न । भरतासी ।। २

धाकुटी सुंदर । जानकीभगिनी । भासे शिरोमणी । सुंदरीत ।
दिली तनया ती । जनके लक्ष्मणा । करून सन्माना । विधिपूर्व ।
नामे श्रुतकीर्ती । सुंदर लोचन । सुरम्य वदन । गुणखाण ।
जिला शीलरूपे । विख्यात मानली । भूपतीने दिली । शत्रुघ्नासी ।। ३

बघून लाजती । वधु आणि वर । जोडी परस्पर । उरी हर्ष ।
सकल मुदित । सौंदर्या स्तविती । पुष्पे वर्षताती । सुर नभी ।
सुंदर वरासी । सुंदरी शोभती । ऐशा विराजती । मंडपात ।
चारीही अवस्था । जणु जीव उरी । स्वामी सहचरी । शोभतात ।। ४

अयोध्यापति बघून मुदित । चारी वधूंसह चारी सुत ।
जणु पावती चारी क्रियांसहित । चारी अर्थफळ भूपमुकुटमणी ।। ३२५
जैसा विवाहविधि रघुवीराचा । तैसा जाहला अन्य कुमारांचा ।
मंडपी खच पडे सुवर्णरत्नांचा । विवाह देणगी अपरिमित ।। १
रेशमी लोकरी सुती वस्त्र अमोल । नानाविध बहुरंगी सकल ।
दासदासी अश्वरथगज विपुल । कामधेनूसम धेनु सालंकृत ।। २
ऐशा अनेक वस्तू न करवे गणन । बघती ते जाणती न करवे वर्णन ।
लोकपाल स्तिमित तया पाहून । स्वीकारिती आनंदे अयोध्यापती ।। ३
जे जयास रुचे ते देती याचकासी । जे उरले ते आले जानोसी ।
मग कर जोडून जनक मृदु वाणीसी । बोलतो वऱ्हाडी जनांचा सन्मान करून ।। ४

आदर गौरवे । दान विनयाने । सकला नृपाने । सन्मानीले ।
प्रमुदित मने । पुजी मुनिवृंदा । वंदूनिया पदा । अति प्रेमे ।
विनवी सकला । शिर नमवुनी । देवा सन्मानुनी । वदे स्नेहे ।
सुरादि वांछिती । भक्तिभाव सदा । जलांजलीने का । तोषे सिंधू ।। १

अयोध्याभूपास । बंधुसमवेत । नृपति जनक । जोडी करा ।
स्नेहसुशीलाने । सुभावे संपूर्ण । वदत वचन । मनोहर ।
भूपति तुम्हांसी । संबंध जोडता । पावलो धन्यता । आज आम्ही ।
राज्य वित्तासह । जाणावे सेवक । निष्काम सतत । आम्ही दोघे ।। २
आमुच्या मुलींना । सेविका मानून । करावे पालन । दयानिधे ।
दाविली धीटता । बोलाविले तुम्हा । अपराधा क्षमा । करा आता ।
दशरथ भूपे । सन्माननिधान । जनका करून । भूषविले ।
वानवत नाही । तयांचा विनय । दोघांचे हृदय । प्रेमपूर्ण ।। ३

राया दशरथ । जाता जानोश्यांत । पुष्पे वर्षतात । सुरगण ।
भरला आनंद । नभी नगरात । जयवाद्यवेद–। ध्वनिघोष ।
मुनिवरआज्ञा । घेती सखीगण । करिताती गान । सुमंगल ।
वधुवरांसह । सुंदरी निघती । गौरीहराप्रती । पूजावया ।। ४

पाही वारंवार सीता रामास । लाजली परि न संकोच मनास ।
लाजविती मनोहर मीनलावण्यास । प्रेमाने तृषित नयन तिचे ।। ३२६
श्यामशरीर सहज शोभिवंत । लावण्य कोटि मदनांसी लाजवीत ।
विलसती पदकमले आळतायुक्त । जेथे मुनिमनमधुप घालती रुंजन ।। १
मनोहर पीतांबर अति पुनीत । बालरवि दामिनिद्युतीस लाजवीत ।
किंकिणी कटिसूत्र मनोहर शोभत । सुंदर विभूषण विशाल बाहूंत ।। २
विलसते पीत यज्ञोपवीत । करमुद्रिका हरण करी चित्त ।
विशाल उरी उरभूषण रुळत । शोभतो ऐसा विवाहशृंगार ।। ३
शोभे उपरणे पिवळे काखेखालून । गुंफिले उभयपदरी मोतीरत्न ।
कर्णकुंडले सुंदर कमलासम नयन । वदन सकल निधान सौंदर्याचे ।। ४
मनोहर नासिका भृकुटि सुंदर । भाळी तिलक रुचिरतेचे आगर ।
शोभे बाशिंग मनोहर माथ्यावर । गुंफिले जयात रत्नमोती ।। ५
सुंदर मुकुटी । जडविली रत्नं । आकर्षती मन । सकलांचे ।
दृष्ट काढतात । वरासी बघून । पुरनारीगण । देवांगना ।
आरती करिती । गाती शुभगान । रत्नआभूषणं । ओवाळिती ।
सूतबंदीजन । सुयश गातात । पुष्पे वर्षतात । सुरगण ।। १
गौरीहराप्रती । सख्या सुवासिनी । येतात घेउनी । वधुवरां ।
प्रेमाने गातात । सुमंगल गीत । रीति शिकवीत । लौकिकाच्या ।
घास देणे रामा । गौरी शिकविते । गिरा कथियते । जानकीसी ।
हास्य विलासात । राणीवासमग्न । घेती मिळवून । जन्मफळ ।। २

रूपनिधि मूर्ती । कंकण रत्नात । जानकी बघत । अति प्रेमे ।
विरहभये ती । स्थिरावे नजर । भुजवल्ली स्थिर । जानकीची ।
सख्या जाणती तो । कौतुकविनोद । सुप्रेम आनंद । न वर्णवे ।
सकल सुंदर । जाती सखीगण । जानोशी घेऊन । वधुवरा ।। ३

नगरी गगनी । आशीर्वाद मोद– । ध्वनि निनादत । समयी त्या ।
वदती सकल । मनी आनंदित । चिरायु होवोत । चारी जोड्या ।
गर्जती नगारे । प्रभु विलोकुनी । देवसिद्धमुनी । योगीश्वर ।
जयघोष नादे । सुमने वर्षती । निजलोकी जाती । हर्षभरे ॥ ४

तंव वधूसहित चारी वर । जाती दशरथासमीप सत्वर ।
जणु शोभा मोदमांगल्यमहापूर । वाहू लागे जानोसी ॥ ३२७

जाहला स्वयंपाक प्रकार बहुत । जनक वऱ्हाडीजनांसी आमंत्रण देत ।
बहुमोल वसनांच्या पायघड्या पडत । तंव दशरथ येती सुतांसवे ॥ १

जनक प्रक्षाळिती सकलांचे चरण । देती मग तया उचीत आसन ।
न करवे ते स्नेहशीलाचे वर्णन । जंव दशरथाचे चरण प्रक्षाळिती ॥ २

मग प्रक्षाळिती रामपदपंकजाते । शंकराच्या हृदयकमळी गुप्तपद ते ।
रामासम जाणून सकल भ्राते । निज हस्ते प्रक्षाळिती तयांचे चरण ॥ ३

नृप सकलां देती उचित आसन । मग वाढप्यासी आणिले बोलावून ।
रत्नजडित पाने लावून चुका सुवर्ण । पात्रे तयार ठेविती आदरे ओळीने ॥ ४

आचारी चतुर विनीत । क्षणात वाढिती स्वादिष्ट वरणभात ।
स्वादयुक्त धेनूचे घृत । पावन रुचकर सुंदर ॥ ३२८

पंचाहुती अर्पून करिती भोजन । उखाणे ऐकून होती प्रेममग्न ।
वाढू लागती सुरस नानाविध पक्वान्न । जी अमृतासम न वानवे ॥ १

चतुर सुजाण वाढपी वाढिती । विविध शाकादि नाम कुणी न जाणती ।
भोजनविधीच्या चार जाती । एकेकाचे प्रकार वर्णनातीत ॥ २

चटण्यालोणची षड्रस रुचिर । अगणित एक एक रसाचे प्रकार ।
जेवताना घालती उखाणे मधुर । घेऊन नाम पुरुषनारींचे ॥ ३

उचित समयी आणउखाणे शोभती । समाजासहित राजा दशरथ हसती ।
भोजनसमारंभ होई ऐशा रीती । मग आदरे आचमनास जल देती ॥ ४

जनक करिती सकला तांबूलदान । दशरथासह पूजिती वऱ्हाडीजन ।
जानोसी जाती होऊन प्रसन्न । दशरथमुकुटमणि सकलांसवे ॥ ३२९

नित्य नवे मंगल घडे नगरीत । निमिषापरी जाती दिनरात ।
उषःकाली दशरथ जागे होताच । याचक तयांचे गुण गाती ॥ १

देखती नृप चारी वर वधूंसहित । न वर्णवे तयांचे मन हर्षित ।
प्रात:क्रिया करून ते गुरुप्रति जात । प्रेमानंदे मन उचंबळे तयांचे ।। २
पूजा प्रमाण करिती जोडून हस्त । वदती वाणि जणु बुडलेली अमृतात ।
हे मुनिराज आज मी कृतार्थ । जाहलो आपल्या कृपेने ।। ३
स्वामी बोलवा आता सकल विप्रांस । द्या सालंकृत धेनु तयांस ।
ऐकून गुरु स्तविती महीपालास । मग मुनिवृंदास पाचारिती ।। ४
वामदेवविश्वामित्रनारद । ऋषिवाल्मीकि मुनिवर जावाली आदिक ।
या तपस्वीश्रेष्ठांचे वृंद । येऊन जमले सकल तेथे ।। ३३०
नृप तया दंडवत प्रणाम करून । पुजिती प्रेमे देऊन वरासन ।
चार लक्ष उत्तम धेनु मागवून । सुंदर सुशील कामधेनूसम ।। १
वस्त्रालंकारे सजवून तयासी । मुदित मने नृप समर्पिती विप्रांसी ।
अजि लाधले जन्मसाफल्य मजसी । वदती प्रार्थून नरनाथ ।। २
विप्रांचे आशीर्वाद पावून नृप प्रसन्न । मग याचकांसी आणती बोलावून ।
अश्वगजरथवस्त्रकनकरत्न । रविकुलनृप देती यथारुची ।। ३
निघाले ते गुणगान करीत । जय जय जय दिनकरकुलनाथ ।
यापरी रामविवाही उत्साह आनंद । सहस्रमुखी शेष न वानू शके ।। ४
राया वारंवार करिती वंदन । धरून विश्वामित्रांचे चरण ।
लाभले मज हे सुखनिधान । आपुल्या कृपाप्रसादे मुनिराज ।। ३३१
जनकाची स्नेहशील कर्तृत्व विभूती । सर्वपरी दशरथ स्तविती ।
प्रतिदिनी निरोप घेण्या जाती नृपती । परि प्रेमे घेती ठेवून जनक तयां ।। १
वृद्धिगत नित्य नवे आदरप्रकार । प्रतिदिनी सहस्रविधि पाहुणचार ।
आनंदोत्सवे भरले नगर । दशरथप्रयाण न रुचे कवणाही ।। २
ऐसे जाती बहुत दिन । जणु स्नेहरज्जूने बद्ध वऱ्हाडीजन ।
तंव विश्वामित्र शतानंद जाऊन । वदती समजावून जनकासी ।। ३
आता निरोप द्यावा दशरथासी । जरी स्नेहवशे न सोडवे तयासी ।
बरे म्हणून बोलाविती सचिवासी । जयजयकार करून नमविती शिर ।। ४
अयोध्यानाथ आता जाऊ इच्छिती । म्हणती नृप कळवा जाऊन राज्ञीप्रती ।
जाहले प्रेमवश सचिव भूपती । तैसे सभासद विप्रजन ।। ३३२
निघाले वऱ्हाडी नगरजन ऐकती । व्याकुळ मने परस्परा पुशिती ।
जणू संध्यासमयी कमळे सुकती । तैसे म्लान सत्य जाणून ।। १

जेथे जेथे उतरले वऱ्हाडीजन । तेथे तेथे पाठविती शिधासामान ।
नानाविध मेवा सुरस अन्न । भोजनसहित्य न वानवे ।। २
भरून अपार बैलांवर कावडीवर । धाडिती अनेक शय्यामंचक नृपवर ।
अश्व लक्ष रथ पंचवीस हजार । सकल अलंकृत नखशिखांत ।। ३
मत्तगज दशसहस्र अलंकृत । जया देखून दिग्गज लज्जित ।
यानांवर भरून रत्नकनकपट । महिषीधेनु नानाविध वस्तू ।। ४
आंदण वस्तू अगणित । न वर्णवे ऐशा देती जनक ।
देखून ती संपत्तिवित्त । निज संपत्ति भासे अल्प लोकपाला ।। ३३३
साहित्य सकल सिद्ध करून । जनक अयोध्येसी देती पाठवून ।
राज्ञी व्यथित ऐकता वऱ्हाडगमन । जणु तळमळती मीन अल्पजळी ।। १
अंकी सीतेस वारंवार बैसवून । करिती बोध आशीर्वाद देऊन ।
तू सतत प्रिय पतीस होऊन । भोगावे अखंड सौभाग्य ।। २
सेवावे सासूश्वशुरगुरुजनांस । पतिआज्ञा पाळावी राखून धोरणास ।
सख्या सुजाण अति स्नेहवश । शिकविती नारीधर्म मृदुवचने ।। ३
स्त्रीधर्म आदरे कन्यांना समजावून । राणी तयांना वारंवार उरी धरून ।
पुन्हा पुन्हा माता वदे भेटून । का निर्मिले नारीस ब्रह्मचाने ।। ४
तंव बंधूंसहवर्तमान । राम भानुकुलकेतु प्रसन्न ।
जनकाच्या मंदिरी करिती गमन । श्वशुरांचा निरोप घेण्यासी ।। ३३४
सहज सुंदर भ्राते चार । बधावया धावती नगरनारीनर ।
कुणी म्हणती वऱ्हाडी जाऊ इच्छिती शीघ्र । तया निरोप देण्या सज्ज जनक ।। १
पाहावे नेत्रभरून सुंदर रूपांना । अगे चारी भूपसुत प्रिय पाहुण्यांना ।
केले नेत्रांचे अतिथि विधीने तयांना । आमुच्या कोणत्या पुण्ये न कळे ।। २
आसन्नमरणासी जैसे लाभावे अमृत । कल्पवृक्ष मिळवी आजन्म क्षुधित ।
वा जो नरका उचित तो पावे हरिपद । दर्शनलाभ तयांचा तैसा आम्हांस ।। ३
धरा हृदयी रामाची शोभा निरखून । निज मन सर्प राममूर्ति मणि करून ।
यापरी सर्वांना नेत्र साफल्य देऊन । कुमार प्रवेशती राजभवनी ।। ४
रूपसिंधू सकल कुमारा पाहून । राज्ञी देती सकल उत्थापन ।
झडकरी तयांची दृष्ट काढून । ओवाळी सासू मुदित मने ।। ३३५
रामरूप पाहून प्रेममग्न अती । प्रेम विवशे वारंवार पडती रामपदी ।
न राही लज्जा हृदयी उसळे प्रीती । कैसा वर्णवेल तो सहज स्नेह ।। १

उटणी लावून कुमारांस घालती स्नान । मग प्रेमे करविती षड्रस भोजन ।
राम वदती सुसमय जाणून । संकोचे शील स्नेहमय ।। २
भूप अयोध्येसी जाऊ इच्छिती । निरोप घेण्यास आम्हां धाडिती ।
बालक जाणून सदा ठेवावी प्रीती । माते निरोप द्यावा मुदित मनें ।। ३
ऐकून वचन राज्ञी उदास । वदू न शके सासू प्रेमे विवश ।
हृदयी धरून सकल कुमारींस । पतीस सोपवून करी विनंती ।। ४

वारंवार कर । जोडून रामास । समर्पी सीतेस । विनवून ।
कुवंडी करिते । तात हे सुजाण । तुम्हां गति ज्ञात । सकलांची ।
प्राणप्रिय सीता । मजसी रायासी । पुरवासीयांसी । आप्तजना ।
तुलसीचे स्वामी । बघा शील प्रीति । निज किंकरी ती । माना तुम्ही ।। १

ज्ञानशिरोमणि पूर्णकाम । भावाचे भुकेले तुम्ही श्रीराम ।
दोषनिर्दालक करुणाधाम । गुणग्राहक भक्तांचे ।। ३३६

ऐसे वदून चरण धरी राणी । जणु प्रेमपंकीं रुतलीं तिची वाणी ।
सुस्नेहपूर्ण वचन ऐकुनी । राम सन्मानिती सासूस बहूपरी ।। १
कर जोडून मग राम निरोप घेती । वारंवार प्रणाम करिती ।
शिर नमविता आशीर्वाद पावती । बंधुसह निघती रघुराज ।। २
हृदयी साठवून मंजु मधुर मूर्ती । सकल राज्ञी प्रेमे व्यथित होती ।
धीर धरून कन्यांस बोलाविती । माता प्रेमे आलिंगिती तया ।। ३
पोचविती पुन्हा येऊन भेटती । तयांची परस्पर बहुत प्रीती ।
करून विलग सख्यास माता पुन्हा भेटती । जणु नव प्रसवित धेनू बिलगे वत्सास ।।४
प्रेमविव्हळ सकल नारीनर । सख्यांसह सकल अंतःपुर ।
जणु जाहले विदेहाचे विदेहपूर । निवासस्थान करुणविरहाचे ।। ३३७
शुकसारिका जानकीने ज्या । कनक पिंजरी ठेवून शिकविल्या ।
जानकी कोठे आक्रोश करिती त्या । कोणाचा धीर न सुटेल ऐकून ।। १
जंव पशुपक्षी होती विरहाकुल । कैसीं वर्णावी मनुज दशा व्याकुळ ।
बंधूसह येती जनक नृपाळ । प्रेम उचंबळून नेत्री भरती प्रेमाश्रू ।। २
धैर्य सुटले बघता सीतेस । परम विरक्त म्हणविती आपणांस ।
मिठी मारिली जनकाने जानकीस । मिटली महामर्यादा ज्ञानाची ।। ३

समजाविती सर्व सचिव सुजाण । विषाद आता नसे उचित ऐसे चिंतून ।
नृप पुत्रीस हृदयी कवटाळून । मागविती पालख्या सुसज्ज सुंदर ॥ ४
सकल परिवार प्रेमवश । मग सुमुहूर्त जाणून नरेश ।
बैसविती पालखीत कन्यांस । सिद्धिगणेशास स्मरून ॥ ३३८
जनक करी कन्यांचे सांत्वन । शिकविती कुलरीति स्त्रीधर्माचरण ।
दिधले बहुत दासदासीगण । विश्वासू सेवक जे सीतेसी प्रिय ॥ १
सीता निघता व्याकुळ नगरजन । मंगलपूर्ण जाहले शुभशकुन ।
संगे घेऊन सचिव ब्राह्मण । जाती पोचविण्यासी नृप जनक ॥ २
उचित समय जाणून वाद्ये वाजती । वऱ्हाडी जनांचे अश्वरथ सजविती ।
मग दशरथ विप्रांस बोलाविती । सन्मानती दान देऊनिया ॥ ३
विप्रचरणांची धूळ शिरी धरून । आशीर्वाद मिळता नृप होती प्रसन्न ।
ठेविती प्रस्थान गजाननास स्मरून । होती मंगल मूळ शकुन नाना ॥ ४
सुर हर्षित सुमने वर्षती । स्वर्गीय अप्सरा गायन करिती ।
निघाले अयोध्येस अयोध्यापती । नगारे वाजवून आनंदभरे ॥ ३३९
नृप थोर जनांस माघारीं फिरविती । मग आदरे याचका बोलाविती ।
भूषण वस्त्र अश्व गज देती । प्रेमे परिपोषून करिती संपन्न ॥ १
वारंवार ते कुलकीर्ति गाती । रामहृदयी ठेवून माघारी वळती ।
दशरथ जनकास वारंवार कथिती । प्रेमवशे न माघारी जाऊ इच्छिती ते ॥ २
वदती पुनरपि प्रेमे नृपवर । राया फिरा मागे आलात दूर ।
दशरथ उतरून येती खाली बाहेर । वाहला तयांचा प्रेमप्रवाह नयनी ॥ ३
तंव बोलती विदेह कर जोडून । स्नेहामृते ओथंबले तयांचे वचन ।
महाराज मज दिधले थोरपण । कैसा उतराई होऊ मी ॥ ४
व्याही सकल स्वजन । तयांचा दशरथ करिती सन्मान ।
परस्पर विनये होई मीलन । हृदयात प्रीति सामावेना ॥ ३४०
मग करिती नमन मुनिवृंदास । देती ते आशीर्वाद रायास ।
प्रेमाने भेटती जामातांस । भ्राते सकल रूपगुणनिधान ॥ १
सुंदर कमलहस्त जोडून । प्रेमातून जन्मले जणु नृपाचे वचन ।
कैसे रामा करू तुमचे स्तवन । मुनिमहेशमनमानसहंस तुम्ही ॥ २

जयास्तव योगी योग करिती । क्रोधमोहमदममता त्यजिती ।
तो व्यापक ब्रह्म अव्यक्त अनादी । चिदानंद निर्गुण गुणराशी ।। ३
नाकळे जयाची वाणी वा मन । न करवे तर्क करिती अनुमान ।
जया वेद वर्णिती नेति म्हणून । जो त्रिकाळी राहे एकरस आनंदमय ।। ४
ते तुम्ही झालात नेत्रा गोचर । समस्त सुखानंदाचे आगर ।
ज्या जीवासी अनुकूल ईश्वर । तयाला जगी सकल लाभ ।। ३४१
सर्वपरी दिधले थोरपण । मानला आपला दास जाणून ।
दशसहस्र शारदा शेष मिळून । करतील गणना जरी कल्पकोटी ।। १
मम भाग्य तुमची गुणगाथा । न होईल समाप्त वर्णून रघुनाथा ।
तुम्ही प्रेमे अल्प प्रसन्न होता । हे वदतो मी याच आधारे ।। २
वारंवार मागणे कर जोडून । मनाने न चुकून सोडावे हे चरण ।
हे प्रेमे परिपोषित वचन ऐकून । संतुष्ट पूर्णकाम राम ।। ३
श्वशुरास सन्मानिले रामांनी विनवून । पिता वसिष्ठ कौशिक समान मानून ।
मग जनक भरतासी विनवून । भेटती प्रेमे आशीर्वाद देऊन ।। ४
जनक भेटती लक्ष्मणशत्रुघ्नांसी । शुभ आशीर्वाद देती तयांसी ।
शिर नमविती कितीदा जनकासी । परस्पर प्रेमाधीन होऊन ।। ३४२
वारंवार करून जनकाची स्तुती । बंधुसंगे चालती रघुपती ।
कौशिकांचे पद धरती जनकनृपती । लावून पदधूळ शिरनयना ।। १
म्हणती जनक आपुल्या दर्शने मुनीश । दुर्लभ मज न काही मनी विश्वास ।
वांछिती लोकपाल जे सुख सुयश । परि मनोरथ करिता लाजती ।। २
स्वामी सुलभ सुख सुयश मज ते । तुमच्या दर्शने प्राप्त सकल सिद्धीते ।
प्रार्थून वारंवार वंदून तयाते । आशीर्वाद पावून जनक वळती ।। ३
डंका वाजे निघे वरात । सानथोर समाज होई मुदित ।
ग्रामनरनारी रामासी निरखीत । नयन फळ पावता होती सुखी ।। ४
सुखसोयीस्तव करिती वास मार्गात । जाती पुढे जना सुखवीत ।
पोचे अयोध्येसमीप वरात । पावन दिनी सुमुहुर्तावरी ।। ३४३
चौघडे नगारे घडघड वाजती । शंखभेरीध्वनि हयगज गर्जती ।
मृदंग डमरू झांझा निनादती । सनई वाजे सुस्वर रागात ।। १
ऐकती पुरजन आली वरात । तनु रोमांचित सकल मने प्रसन्न ।
शृंगारिती सुंदर निज सदने समस्त । राजमार्ग बाजार चौक वेशी ।। २

सकल गल्लींमाजी अर्गज शिंपिती । ठायी ठायी रंगावलि रेखिती ।
पताकाध्वजतोरणांनी शृंगारिती । ऐसा बाजार मंडप अवर्णनीय ।। ३
फळांसह आम्र नारळ कदली । बकुळ कदंब तमाल पोफळी ।
धरणीवरी फळभारे झाडे लवली । तरुतळी पार सुंदर रत्नमय ।। ४
नानाविध मंगलकलश । घरोघरी सजविती विशेष ।
देखती सुरब्रह्मादि रघुवरपुरीस । स्तविती तिज परोपरी ।। ३४४
राजभवन दिसे सुशोभित । रचना देखून मदनाचे मन मोहित ।
ऋद्धिसिद्धि सकलसुखवित्त । मंगल शकुन मनोहरता ।। १
जणू हे सकल उत्साहे तनुधारी । येऊन राहिले दशरथाचे घरी ।
कवणास न लालसा वदा तरी । रामवैदेहीच्या दर्शनाची ।। २
वृंद वृंद मिळून सुवासिनी जाती । निज सौंदर्ये रतीस लाजविती ।
सजवून सुमंगल आरती गाती । जणू बहु वेषधारी सरस्वती ।। ३
राजमंदिरी एकच कोलाहल । न वणवे ते सुख तो समयकाळ ।
राममाता कौसल्यादि सकल । प्रेमविवशे हरपती देहभान ।। ४
करिती त्या शंकरगणेशांचे पूजन । देती विप्रांस विपुल दान ।
जणु अति प्रसन्न परम दरिद्रीजन । पावता धर्मादि चारी अर्थ ।। ३४५
माता मग्न महासुखआनंदात । गात्रे शिथिल पाऊल न उचलत ।
प्रेमे रामदर्शनास अति उत्कंठित । सजविती औक्षणसाहित्य ।। १
नानाविध वाद्ये गर्जती । सुमित्रा सज्ज करी मंगल आरती ।
हळद दधि दुर्वा पत्री फुले आणती । तैसे पानपूगफल आदि मंगळमूळ ।। २
अक्षता अंकुर लाह्या गोरोचन । तुलसीमंजुळ मंजिरीसुशोभन ।
जणु रचती घरटी मदनाचे शकुन । ऐसे नानारंगी चित्रित कनककलश ।। ३
अवर्णनीय सुगंधी द्रव्ये शुभकर । राज्ञी करिती वस्तू मंगल तयार ।
रचिती आरती नानाविध सुंदर । गाती मुदित सुस्वर कंठाने ।। ४
कनकतबकी सुमंगल द्रव्ये भरती । निज करकमली राज्ञी धरिती ।
पुलकित गात्रे चालू लागती । ओवाळण्या राजकुमारांसी ।। ३४६
धूम्र धूप नभी श्यामल सर्वत्र । गगन व्यापी जणु श्रावण मेघांबर ।
कल्पवृक्षसुमनमाला वर्षती सुर । आकर्षती चित्ता हंसावलि परी ।। १
जणूं इंद्रधनुष्य समान भासती । सुशोभितं रत्नजडित तोरणे ती ।
सौधावर भामिनि प्रकटून लपती । जणु चमकती दामिनि चपल चारु ।। २

दुंदुभिनिनाद वाटे घनगर्जनाघोर । याचक जणु चातक दर्दुर मोर ।
शुचि सुगंधरूपी जळ वर्षती सुर । भरघोस पीकासम नरनारी सुखी ।। ३
समय जाणून गुरू आज्ञा देती । रघुकुलमणि नगरीत प्रवेशती ।
समाजासहित मुदित महीपती । स्मरून शंभुगिरिजा गणराजांस ।। ४
दुंदुभी गर्जती होती शकुन । वर्षती सुर सुमने नभातून ।
गाती देवांगना मंजुळ गान । नृत्य करिती मोदभरे ।। ३४७
चतुर नट मागधसूतबंदी । त्रैलौक्यी विदित रामयश गाति ।
विमल वेदवाणी जयध्वनि उमटती । मंगल निनाद दशदिशात । १
वाजू लागती वादने विविध । नभी सुर प्रसन्न जन नगरीत ।
न वर्णवे वऱ्हाडी महान थाट । महामुदित न मावेना आनंद मनी ।। २
नगरजन प्रणाम करिती रायास । सुखी होती बघून रामास ।
ओवाळिती तयावरून वस्त्ररत्नगणांत । प्रेमाश्रु लोचनी तनु रोमांचित ।। ३
मुदित नगरनारी करिती आरती । चारी कुमारांस हर्षे निरखिती ।
सुंदर शिबिकेचा पडदा सारती । वधूंस पाहून सुखावती ।। ४
ऐशापरि सकला सुख देत । राजद्वारी येई वरात ।
ओवाळिती माता अति मुदित । वधूसहित कुमारांसी ।। ३४८
ओवाळिती आरती वारंवार । कोण वर्णील तो प्रेमानंद अपार ।
नाना भूषणरत्नवस्त्र । वस्तु अगणित टाकिती उतरवून ।। १
वधूंसहित सुत चारी पाहून । माता प्रेमानंदी तल्लीन ।
घडी घडी सीतारामलावण्य बघून । जीवन सफलता मानती जगी ।। २
सीतेचे मुख सख्या पुन्हा पुन्हा बघती । निज पुण्याईस स्तवून गीत गाती ।
क्षणाक्षणाला देव सुमने वर्षती । सेविती तया नृत्यगीतांनी ।। ३
चारी मनोहर दंपती बघून । शारदा पाही उपमा शोधून ।
परि न देई उपमा वाटती गौण । प्रेमे टक लावून देखे रामरूप ।। ४
शास्त्रविधि कुलरीति अनुसरती । अर्पुनी अर्ध्य पायघड्या घालिती ।
वधूंसह सुतांस कुर्वंडी करिती । घेऊन जाती तया भवनी ।। ३४९
सिंहासने चार सहजसुंदर । जणु कामदेव हस्ते जाहली तयार ।
कुमारीकुमारांस बैसविती तयांवर । प्रक्षाळिती पाय आदराने ।। १
मंगल धूपदीप नैवेद्य घेऊन । वेदविधियुक्त करिती पूजन ।
वारंवार आरती करून । छत्रचामरे ढाळिती शिरावरी ।। २

ओवाळिती माता वस्तू अनेक। आनंदपूर्ण त्या शोभून दिसत।
जणु योगी परम तत्त्व पावत। वा दीर्घकाळ सदा रोगी पावे अमृत ।। ३
वा जन्मदारिद्र्याचासी लाभे परिस। दिव्यदृष्टी येई अंधळचास।
वा रणी मिळे विजय शूरास। वा मूक जिव्हेवरी नाचे सरस्वती ।। ४
याही सुखाहून अधिक आनंद। वाटे तो शतकोटि द्विगुणित।
विवाह करून बंधूसहित। रघुकुलचंद्र श्रीराम येती घरा ।। ३५०(क)
जननी करिती लौकिक चालोरीती। परि वधुवर मनी संकोचती।
बघून मोह विनोद अती। मनी सस्मित श्रीराम ।। ३५०(ख)
यथाविधि जाहले देवपितरपूजन। सकल वासना जाहल्या पूर्ण जाणून।
वंदून सकल माता मागती वरदान। बंधूसहित होवो रामाचे कल्याण ।। १
अंतरिक्षातून आशीर्वाद देती सुर। मोदे माता घेती पसरून पदर।
वऱ्हाडी जनांस बोलावून महीधर। देती वस्त्रभूषणरत्नयान ।। ३
राममूर्ति हृदयी ठेवून निरोप घेती। आनंदे निज निज गृही जाती।
नृप नरनारीस वस्त्रभूषण देती। घडधडा चौघडा वाजे घरोघरी ।। ३
जे जे वांछिती याचकजन। ते ते देती राया मने प्रसन्न।
केले संतुष्ट दानसन्मान करून। सकल सेवक वाजंत्रीगण ।। ४
देती आशीर्वाद शिर नमवून। करिती गुणसमूहांचे गान।
तंव दशरथ प्रवेशती भवन। गुरुविप्रवृंदासवे ।। ३५१
गुरु वसिष्ठ जी आज्ञा देती। नृप वेदलोकरीति जाणून पाळती।
द्विजवृंदास पाहून उठती। राज्ञी आदरे भाग्योदय जाणून। १
चरण प्रक्षाळून करविती स्नान। देती भोजन आदरे करून पूजन।
दान आदरप्रेमे विप्र संतुष्ट होऊन। आशीर्वाद देऊन जाती तृप्त मने ।। २
करून बहुविध विश्वामित्रांची पूजा। म्हणती मजसम न धन्य दुजा।
प्रशंसती तयांना दशरथ राजा। राज्ञींसहित शिरी धरून पदधूली ।। ३
नृप देती भवनी उत्तम निवास। मनी इच्छा सेवावे राज्ञीसवे गुरूस।
मग पुजून गुरुपदकमलांस। प्रार्थना करिती हृदयी अति प्रीती ।। ४
बंधूसहित राजकुमार। राज्ञीसहित नृपवर।
वंदिती गुरुचरण वारंवार। मुनीश देती आशीर्वाद तदा ।। ३५२
अति प्रेमे दशरथ विनविती। सुतसंपदा ठेवून पुढती।
परि दक्षिणा केवळ मुनिवर मागती। देऊन आशीर्वाद नानाविध ।। १

हृदयी ठेवून सीतेसह राममूर्ती । हर्षे गुरू निज गृही जाती ।
मग विप्रवधूंसी भूषणवसने देती । तयांस बोलावून महीश ॥ २
बोलावून घेती सुवासिनीस । यथारुचि देती वस्त्रालंकारास ।
ग्रामजोशी दाविती उचित हक्कास । रुचि अनुरूप देती भूपति तया ॥ ३
प्रिय पाहुणे पूजनीय जाणून । भूपति करिती उचित सन्मान ।
देवगण रघुवीराचा विवाह बघून । वर्षती सुमने स्तवून उत्सवास ॥ ४
नगारे वाजविती देवगण हर्षित । सुखे जाती निज निज लोकांत ।
रामयशगान परस्परा करीत । प्रेमानंद हृदयी तयांच्या समावेना ॥ ३५३
यथाविधि सकला सन्मानून । दशरथांचे हृदय जाहले उत्साहपूर्ण ।
मग भूप राणीवासात पद ठेवून । निरखिती कुमारांस वधूंसह ॥ १
घेती आनंदाने अंकी सुतांस । ते नृपाचे सुख वर्णवेल कोणास ।
मांडीवरी घेती प्रेमे वधूंस । हर्षे कौतुक करिती वारंवार ॥ २
पाहून सोहळा राणीवास प्रसन्न । सकलांचे हृदय आनंदपूर्ण ।
मग भूप करिती विवाहवर्णन । ऐकताच सर्व हर्षभरित ॥ ३
भाटापरी अतिमोहक रीती । जनकाचे गुणशील भूपति वानिती ।
तैसीच नीतिप्रीति संपत्ती । ऐकून राज्ञींस अति हर्ष ॥ ४
नृप पुत्रांसहित करिती स्नान । बोलाविती गुरुविप्र आप्तजन ।
मग करिती नानाविध भोजन । तोच पंचघटिका सरली रात्र ॥ ३५४
करिती मंगलगान भामिनी । भासली सुखमूळ मनोहर ती यामिनी ।
सकला देती विडे आचमन करवुनी । सुगंधद्रव्यमालांनी छबि विलसे ॥ १
रामास बघून आज्ञा घेऊन । सकल निघाले निज भवना शिर नमवून ।
तेथील प्रेमप्रमोदविनोद महान । तथा समय समाज मनोहरता ॥ २
न वानू शकती शत शारदाशेष । वेदब्रह्मामहेशगणेश ।
कैसे शक्य वर्णन मम पामरास । भूमिनाग कैसा शिरी धरील मही ॥ ३
नृप करिती सकलांचा सन्मान । मग मृदुवचने राज्ञींस संबोधून ।
वधुबालिका परघरी आल्या असून । संभाळावे तयांना नयनपलकापरी ॥ ४
श्रमित कुमार निद्रावश दिसती । घेऊन जा तयांना शयनगृहाप्रती ।
ऐसे वदून नृप विश्रामगृही जाती । निज चित्त ठेवून रामचरणी ॥ ३५५
ऐकून सहज सुंदर नृपाचे वचन । कनकरत्नजडित मंचक घालून ।
सुंदर सुरभीदुग्धफेनसमान । पसरती चादरी शुभ्र मृदुल ॥ १

न वर्णवत गिरद्या अति सुंदर । रत्नमंदिरी सुगंधित माला मनोहर ।
रत्नदीप चांदवे चारु चेतोहर । न वर्णवे जो पाही जाणे ते ।। २
शय्या सजवून रुचिर रामा उठविती । प्रेमे मंचकी तया झोपविती ।
राम पुन्हा पुन्हा बंधूस आज्ञा देती । मग निद्रिस्त होती ते निज शेजी ।। ३
बघून श्याम मृदु मंजुलगात्री राम । माता वदे वचन सप्रेम ।
कैसी वधिली त्राटिका हे घनश्याम । अति भयानक राक्षसीण पथी ।। ४
घेती न कदापि समरी माघार । ऐसे विकट राक्षस घोर ।
मारीच सुबाहुसह खलवीर । मारिले कैसे सेनेसह ।। ३५६
बाळा ओवाळते जीव तुजवरून । सारिली पीडा ईशे मुनिकृपेचे कारण ।
बंधूसह केले मुनियज्ञाचे रक्षण । संपादिली विद्या गुरुकृपेनें ।। १
पदरजस्पर्शे केला अहल्योद्धार । दुमदुमली कीर्ति त्रैलोक्यी अपार ।
कच्छप पृष्ठ वज्रगिरीहून ऐसे कठोर । भंगले शिवधनुष्य जनकसभेत ।। २
विश्वविजययश तथा सीता संपादून । आला बंधूसह भवनी विवाह करुन ।
केवळ कौशिक कृपेने संपन्न । तव अतिमानुष सकल कर्मे ।। ३
बाळा जाहले अजि जन्माचे सार्थक । पाहता तव मुखचंद्र निष्कलंक ।
तंव दर्शनाविण दिन काही एक । जे जाती ते न गणावे ब्रह्माचाने ।। ४
वदून नम्र प्रेमळ वचनास । राम संतुष्ट करिती सकल मातांस ।
मग स्मरून शिवगुरुविप्रपदांस । होती त्वरित निद्रावश ।। ३५७
शोभे निद्रेत मनोहर वदन । संध्यासमयाच्या लाल कमळासमान ।
घरोघर ललना करिती जागरण । करिती विनोद मंगल उखाणे घालून ।। १
अयोध्या विशेष सुंदर रमणीय रजनी । पाहा गे सजणे वदती राणी ।
सुंदर वधूंस सासवा निजती घेउनी । जणू शिरमणि सर्प लपवी उरी ।। २
पुनीत प्रातःकाळी प्रभु उठती । मधुर ध्वनि कुक्कुट करिती ।
बंदीमागध गुण गाती । नगरजन येती वंदनास द्वारी ।। ३
मातापिता सुरगुरूंसी वंदन । करून आशीर्वाद पावती भ्राते प्रसन्न ।
जननी आदरे निरखिती वदन । मग भूपतीसवे जाती राजद्वारी ।। ४
सहज पवित्र चारी भ्राते । पुनीत शरयूत करिती स्नानाते ।
उरकून सकल प्रातःक्रियाते । सत्वरी येती पित्यासमीप ।। ३५८
तया विलोकून भूप हृदयी धरिती । मग राजाज्ञा पाहून हर्षे बैसती ।
नेत्र लाभाची सीमा जाणून ती । रामदर्शने सभाजन प्रसन्न ।। १

मग मुनि वसिष्ठ विश्वमित्र येती । सुंदर आसनी तया बैसविती ।
सुतांसवे पुजून पदा धरती । रामास बघून प्रेममग्न उभय मुनी ।। २
वसिष्ठ कथिती धर्म इतिहास । श्रवण करिती राज्ञींसह महीश ।
विश्वामित्रकर्तृत्व अगम्य मुनिमनास । स्तविती नानापरि हर्षे वसिष्ठ ।। ३
हे सकल सत्य वामदेव वदती । तिन्ही लोकांत पसरली कीर्ती ।
ऐकून सकल आनंदित होती । रामलक्ष्मण हृदयी आनंद अधिक ।। ४
नित्य मोदमंगल उत्साहात । जाती ऐसे दिन त्वरित ।
उसळला आनंदाचा पूर अयोध्येत । जाई अधिक वाढत प्रतिदिनी ।। ३५९
सुदिन पाहून सोडती कंकण । मंगल मोदविनोद राही भरून ।
संतृप्त सुर सुख नित्य नवे बघून । याचती जन्म अयोध्येत विधीपाशी ।। १
प्रतिदिनी विश्वामित्र जाऊ इच्छिती । रामाचे प्रेम विनयवशे राहती ।
महामुनिराज बघून स्तविती । दिन दिन शतगुण प्रेम भूपाचे ।। २
नृपाची आज्ञा जंव घेती अखेर । तंव भूप उभे सुतांसह प्रेमे समोर ।
वदती हे नाथ संपदा तुमची साचार । पत्नी पुत्रांसह सेवक मी ।। ३
लेकरावरी सदा स्नेह ठेवावा । तुमचा दर्शनलाभ मज घडावा ।
नृप सुतराज्ञींसह ठेवून प्रेमभावा । पडती गुरुपदी न बोलवे काही ।। ४
आशीर्वाद देऊन ब्रह्मर्षि निघती । न वर्णवे ती प्रीतीची रीती ।
प्रेमे राम बंधूंसवे जाती । पोचवून मग माघारी वळती ।। ५
गाधिकुळचंद्र विश्वामित्र मुनि जाती । मनामाजी ते आनंदे स्तविती ।
स्मरून रामरूप नृपाची भक्ती । तैसा विवाहउत्साह आनंद ।। ३६०
वामदेव रघुकुल गुरु वसिष्ठ ज्ञानी । रंगती विश्वामित्रांच्या कथावर्णनी ।
मुनींचे सुंदर सुयश ऐकुनी । निज पुण्यप्रभाव वानिती मनी नृप ।। १
राजाज्ञा घेऊन सकल जन जाती । सुतांसवे चालले गृही नृपती ।
होई सर्वत्र रामविवाहस्तुती । पवित्र रामसुयश भरे त्रैलोक्यी ।। २
जैहून विवाह करून येती राम । तैहून अयोध्या संपूर्ण आनंदधाम ।
विवाहात उत्साह आनंद परम । न वानू शकती तो शारदाशेष ।। ३
सीतारामयश मंगलखाण । कविकुलजीवन करी पावन ।
जाणून केले मी अल्प वर्णन । करावया पुनीत मम वाणी ।। ४

म्हणत तुलसी । करी यशगान । कराया पावन । मम वाणी ।
चरित्र रामाचे । वारिधि अपार । कैसा करी पार । कोण कवी ।
मौंजलग्नविधी । उत्सव पुनीत । ऐकून गातात । आदरे जे ।
वैदेहीरामांच्या । प्रसादे करून । सर्वदा ते जन । सुखी होती ।। १

सीता रघुवीराचे लग्न । प्रेमे ऐकती गाती जे जन ।
मिळे तयांना उत्साह आनंद चिरंतन । मंगलायतन श्रीरामयश ।। ३६१

।। कलियुगातील संपूर्ण पापाचा नाश करणारा
श्रीरामचरितमानसाचा पहिला सर्ग समाप्त ।।

(बालकांड समाप्त)

द्वितीय सोपान–अयोध्याकांड

वामांगी शोभते । भूधरदुहिता । सुरांची सरिता । माथ्यावरी ।
कंठी हलाहल । भाळी भालचंद्र । शोभे उरावर । सर्पराज ।
तो हा महेश्वर । विभूतिभूषित । त्रैलोक्यपालक । निरंतर ।
शशिकांति शिव । सर्वांचे अंतरी । सर्व हितकारी । रक्षो मज ।। १

अभिषेक होता । कमलवदन । न दिसे प्रसन्न । श्रीरामाचे ।
वनासी जाताना । नसे वा ते म्लान । दुःखाने मलिन । राघवाचे ।
रघुनंदनाचे । अंबुजआनन । छबी सुशोभन । झळकते ।
शोभा ती सदैव । मंगलदायक । कल्याणकारक । तुलसीसी ।। २

नीलांबुजकांती । शरीरु कोमल । सुंदर श्यामल । श्रीरामाचे ।
जयाच्या वामांगी । शोभे सीतामाता । जनकदुहिता । मनोहारी ।
करी चाप चारू । सायक प्रखर । नाथा नमस्कार । रघुवंशी ।। ३

श्रीगुरुचरण सरोजकण । करिती निर्मल निजमनोदर्पण ।
चारी पुरुषार्थ जे देती साधून । ते रघुवराचे विमल यश वर्णितो ।।
जंव विवाहोत्तर राम गृही येती । तंव नित्य नवे मंगल उत्सव होती ।
सुकृतमेघ सुखजळ वर्षती । चतुर्दशभूवनभूधरावरी ।। १
ऋद्धिसिद्धिसंपत्ति शुभतटिनी । मिळती अयोध्याअंबुधीस उफाळुनी ।
निपजती शुचि अमोल म्हणुनी । सुंदर नरनारीरत्ने नगरीत ।। २
न वर्णवे ते नगरवैभव । जणु इतुके अपार ब्रह्मयाचे कर्तृत्व ।
सकलपरी सुखी नगरजन सर्व । बघून रामचंद्राचा मुखचंद्र ।। ३
सखीसहचरीसह माता सकल । बघून मनोरथरूपी वेलीचे फळ ।
रामरूपगुणसुभावशील । पाहून परिसून प्रमुदित नृप ।। ४

सकलांच्या हृदयी एकचि आस । स्तवून विनविती देव महेश ।
द्यावे युवराज पद रामास । निज नेत्रा देखत नरेशाने ।। १
एके समयी सभाजनांसहित । दशरथ बैसले होते राजसभेत ।
नृप सकल पुण्याची मूर्ति शोभत । आनंदित ऐकून रामाचे सुयश ।। १
जयाची कृपा वांछिती नृप सकल । प्रीती करिती राखून रुचि लोकपाळ ।
कोणीही त्रिभुवनांत तिन्ही काळ । नसे भाग्यवान दशरथासम ।। २
जयाचा मंगलमूल रामसुत । अल्प भासे जरी वानिला बहुत ।
नृप सहज करी दर्पण धरीत । वदन बघुनी करिती मुकुट सरळ ।। ३
पाहून कर्णासमीप शुभ्र केस । वाटे जरठपण ऐसा करी उपदेश ।
नृपा अर्पून यौवराज्य रामास । का न करिसी जीवनसाफल्य ।। ४
येई नृपमनी ऐसा विचार । मग पाहून सुदिन सु-अवसर ।
मुदित मने पुलकित शरीर । जाऊन गुरुप्रति विनविती तया ।। २
भूपाल म्हणती हे मुनिनायक । कार्यक्षम मज वाटे रघुकुलटिळक ।
सकल नगरजन सचिवसेवक । तैसे शत्रुमित्र उदासीन ।। १
सकलांस राम प्रिय जैसा तो मज । जणु तनुधारी गुरूचे आशीर्वाद शोभत ।
स्वामी आपणासम स्नेह दावीत । परिवारासह सकल विप्र ।। २
जे गुरुचरणरजाचे कण शिरी धरिती । ते जणूं संपूर्ण वैभव वश करिती ।
मजसम न अन्य अनुभव घेती । गुरुपदरजपूजनी सकल साध्य ।। ३
अता एकच अभिलाषा मम मनात । तुमच्या कृपे ती पूर्ण होईल नाथ ।
सहज स्नेह पाहून मुनि मुदित । द्यावी आज्ञा म्हणती नरेशास ।। ४
तव नामयश हे राजन । करिती तव मनोकामना पूर्ण ।
हे महीपमणि जे जे आकांक्षी तव मन । ते ते लवलाही लाभेल तुज ।। ३
जाणून गुरूचे चित्त प्रसन्न । हळूच नृप वदती मृदु वचन ।
रामासी करावे यौवराज्य अर्पण । करीन उत्सव द्या आज्ञा करून कृपा ।। १
डोळयांदेखत घडावा हा सोहळा । जेणे नेत्रसाफल्य लाभेल प्रजेला ।
एकच लालसा आतां मनाला । सांभाळिले अन्य आपुल्या प्रसादे शिवाने ।। २
न दुःख मग देह राहो वा जावो । पश्चात्तापदग्ध समय न येवो ।
प्रेमळ मंगल वचन वदे रावो । ते ऐकून मुनि अति प्रसन्न ।। ३
नृपा ज्यास विन्मुख होता अनुताप होत । ज्याच्या भजनाविण ताप न शमत ।
तोच जाहला तुमचा तनय नाथ । श्रीराम जो अनुसरी पवित्र प्रेमास ।। ४

राया न लावावा विलंब आता । करावी शीघ्र उत्सवास्तव सिद्धता ।
होताच राम यौवराज्याभिषेका । जाणावा सुमंगल सुदिन तोच ।। ४
तंव येती मंदिरी मुदित महीपती । सेवकसचिवसुमंत्रा बोलाविती ।
जयजीव वदून ते शिर नमविती । मग नृप निवेदिती शुभवार्ता ।। १
मान्य जर हे पंचासी मत । प्रसन्न मने करावा अभिषेक ।। २
मंत्री मुदित परिसून प्रियवाणी । जणु मनोरथवृक्षास मिळे पाणी ।
सचिव विनविती कर जोडोनी । कोटि वरुषे जगा हो जगतपती ।। ३
जगमंगलकारक काज हे खचित । न लावा विलंब करा ते त्वरित ।
सचिवाची सुभाषा ऐकून नृप मुदित । जणु सुशाखा लाभती वाढत्या वेलीस ।। ४
तयास वदती भूपाळ । जी जी आज्ञा मुनिराज देतील ।
ती ती पूर्ण करा तात्काळ । रामराज्याभिषेकास्तव ।। ५
वदती वाणी मृदु हर्षित मुनिवर । आणावे सकल सुतीर्थनीर ।
औषधीमूळफूलफळपत्र । कथिती नाम नाना वस्तूंचे ।। १
चामरमृगचर्म वसन शुचिष्मंत । लोकरी रेशमी वस्त्रे अगणित ।
रत्ने मंगलवस्तु अनेक । जी भूप–अभिषेकास जगी योग्य ।। २
कथिती सकल वेदविधिविधाना । सांगती रचा विविध विताना ।
करा पथी चौदिशी वृक्षारोपणा । आम्रपूगिफळनारळकेळींचे ।। ३
रचा रत्नमय स्वस्तिक सुंदर । सजवा सकल बाजार सत्वर ।
पूजा गणेश कुलदैवत गुरुवर । करा सर्वपरि विप्रसेवा ।। ४
उभारा ध्वजपताकाकलशतोरण । सजवा अश्वगजरथवाहन ।
शिरी धरून मुनिवरवचन । सकल मग्न निजकार्यात ।। ६
मुनीश जी जया आज्ञा देती । जाणा कथनपूर्वीच ते करिती ।
विप्रसाधुसुरांस नृप पूजिती । सकल मंगल काज रामहिता ।। १
ऐकून शुभवार्ता रामअभिषेकाची । घरोघर मंगल वाद्ये गर्जती ।
रामसीता यांच्या तनूंस शकुन होती । सुंदर शुभांग स्फुरण पावे ।। २
परस्पर कथिती प्रेमे पुलकित । प्रिय भरताचे आगमन शुभसूचक ।
जाहले दिन भेटीस बहुत । प्रिय भेट निश्चित शकुनी विश्वास ।। ३
भरतासम कोण प्रिय जगात । न अन्य शकुनाचे फळ भरतभेट हेच ।
रामासी बंधूची चिंता दिनरात । जैसी कासवीच्या चित्तांत अंड्यांची ।। ४

या समयी मंगल वृत्तांत । परिसून राणीवास परम हर्षित ।
जलधीचा लाटाविलास जणु सुशोभित । देखून वर्धमान चंद्रासी ।। ७
प्रथम दिली वार्ता जयांनी मंगल । मिळाली तया वस्त्रेभूषणे विपुल ।
शुभकलश सजविती राज्ञी सकल । मनी प्रेमभाव पुलकित तनु प्रेमे ।। १
सुंदर स्वस्तिक सुमित्रा रेखीत । भरून नाना सुंदर रत्नें तयात ।
कौसल्या माता मग्न आनंदात । विप्रांस बोलावून देई बहु दान ।। २
ग्रामदेवी देव नाग यांस पुजून । करी प्रार्थना म्हणे बलिभाग देईन ।
जेणे होईल रामाचे कल्याण । द्या हें वरदान दावून दया ।। ३
कोकिळेसम सुस्वरे गाती मंगल गाना । बालमृगनयना चंद्रवदना ।। ४
रामराज्याभिषेक होणार जाणून । अति हर्षित नरनारीचे मन ।
विधाता अनुकूल हे बघून । लागती मंगल उत्सव सज्जतेस ।। ५
तंव नरनाथ वसिष्ठास बोलाविती । रामभवनी उपदेशास्तव पाठविती ।
गुरूचे आगमन ऐकून रघुपती । द्वारी येऊन ठेवती पदी माथा ।। १
आदरे अर्घ्य देती गृही आणून । सन्मानती षोडशोपचारे पुजून ।
सीतेसह धरून गुरुचरण । वदती राम जोडून करकमल ।। २
जरी स्वामीचे आगमन सेवकसदनात । मंगलमूळ अमंगळहारक ।
तरी दासास प्रेमे बोलाविणे हे उचित । आपल्या काजास्तव अशी नीती ।। ३
परि दाविला स्नेह प्रभुता सोडून । जाहले आज मम गृह पावन ।
स्वामी द्याल आज्ञा ती पाळीन । स्वामीच्या सेवेत सेवकास लाभ ।। ४
ऐकून प्रेमळ वचन मुनिवर । वदती प्रशंसून रघुवीर ।
हे रामा ऐसे का न निघतील उद्गार । भूषण तू सूर्यवंशाचे ।। ९
वर्णून रामगुण शीलसुभाव । प्रेमे पुलकित होती मुनिराव ।
वदती भूपे योजिला अभिषेकउत्सव । करू इच्छिती तुज युवराज ।। १
रामा पाळावे आज तू संयम । जेणे निर्विघ्नपूर्ण कार्य करील ब्रह्म ।
ऐकताच हृदयी स्तिमित राम । मग गुरु वसिष्ठ जाती नृपाप्रती ।। २
चारी बंधू सवे जन्मती । भोजनशयनक्रीडा सवे करिती ।
कर्णवेध मौंजीबंधनविवाह सवे होती । संगे संगे जाहले सकल उत्सव ।। २
विमलवंशी अनुचित हे एक । अन्यास सोडून ज्येष्ठासी अभिषेक ।
प्रभूची चिंता भासे प्रेममूलक । भक्तमनाची कुटिलता हरील ती ।। ४

ते समयी येई लक्ष्मण । प्रेमानंदात अति निमग्न ।
सन्मानती तया प्रिय वचन वदून । राम रघुकुलकुमुदचंद्र ।। १०
नानाविध वाद्ये वाजती । नगरांतील आनंद न वानू शकती ।
भरताच्या आगमनाची प्रतीक्षा करिती । वदती येवो शीघ्र नयनसाफल्या ।। १
हाटवाटगृहगल्लीबोळ । तेथे परस्पर वदती सकल ।
शुभमुहूर्त उद्या कोणती वेळ । विधाता इच्छा पुरवील आमुची ।। २
कनक सिंहासनी सीतासहित । राम आरूढ पाहता होईल शांत चित्त ।
ऐशी उद्या केव्हा येईल सकल वदत । परि विघ्न चिंतिती कुटिल देव ।। ३
देवास उत्सव न लागे गोड । चांदण्या रात्रीची चोरास नावड ।
शारदेस बाहून घालिती साकडं । वारंवार तिचे पदांस धरून ।। ४
विपत्ति आमुची ध्यानी धरून । देवकार्यास सफल करून ।
राम जाईल वनी राज्य सोडून । माते आज करावे ऐसेची ।। ११
सुरांची प्रार्थना ऐकून उभी व्यथित । जणु सरोजविपिनी हेमंतरात ।
बघून देवीस सुर पुन्हा विनवीत । माते तुज दोष नसे अणुमात्र ।। १
हर्षविषादरहित रघुराव । तूं जाणसी सकल रामाचा प्रभाव ।
कर्मवशे सुखदुःख भोगी जीव । देव हितास्तव जा अयोध्येसी ।। २
संकोचे जंव वारंवार पद धरती । नीच विबुधांची मति जाणून निघे ती ।
पर–ऐश्वर्य सुर न साहू शकती । उच्च निवास परि नीच कृती ।। ३
मग पुढील काजाचा करून विचार । वानितील मज कवि चतुर ।
हृदयी हर्षित पोचे दशरथपुर । जणु ग्रहदशा आली दुःसह दुःखद ।। ४
कैकेयीची दासी मंथरा नाम । एक कुबडी मंदमति परम ।
शारदा तिचा करून बुद्धिभ्रम । केले अपयशास पात्र जाऊन तिज ।। १२
मंथरा पाही नगरीतील वैभव । ऐके मंजुळ मंगल वाद्यरव ।
पुसे लोकांस कसला हा उत्सव । रामाचा अभिषेक ऐकता उरी दाह ।। १
ती कुबुद्धि कुजाती विचार करी । कैसे बिघडेल कार्य याच रात्री ।
चिंती युक्तीला कुटिल किरातिणी यापरी । कैसे मिळेल मधुपोळे बघून तया ।।
जाई कैकेयीप्रति दुःखित मनी । का गे उदास बोले हंसत राज्ञी ।
न देई उत्तर उसासा टाकुनी । नारी स्वभावापरी अश्रू ढाळी ।। ३
वाचाळ तू बोले हंसून राणी । देई लक्ष्मण शिकवण ऐसे येत मनीं ।
तरी ती न बोले बटिक पापिणी । काळचा सर्पिणीपरि टाकी फत्कार ।। ४

मग राज्ञी सभय पुशीत। कुशल ना रामनृप का न गे वदत।
कुशल ना लक्ष्मणशत्रुघ्नभरत। ऐकताच क्रोधे उसळे ती ।। १३
म्हणे मज कोण का शिकवील। कवणाच्या बळे मी होई वाचाळ।
हे माई रामाविण कोणी न कुशल। जनेश तया करणार युवराज ।। १
दैव अनुकूल कौसल्या भाग्यवान। मावेना गर्व उरी उत्सव बघून।
पाहून शोभा क्षुब्ध मम मन। का न बघसी जाऊन स्वये ।। २
सुत विदेशी तरी न खंत। मानिसी नाथ तव मुठीत!
मृदुल गाद्या शेज प्रिय तुज बहुत। न कळे भूपाची चतुरता कपट तुज ।। ३
मलिन मन जाणे राज्ञी ऐकून वचन। थांब वदे क्रोधे उसळून।
घरभेदे उपटीन जीभ धरून। पुन्हा कधी ऐसे वदशील जर ।। ४
पांगळा कुबडा काणा यास। मानावे दुष्ट दुराचारी विशेष।
तथा तुजसम स्त्रीदासीस। हसून वदे माता भरताची ।। १४
वदले बोधास्तव हे प्रियवादिनी। तुजवरी कधी न कोपे मी स्वप्नी।
तंव बोल होतील सत्य ज्या दिनी। सुदिन सुमंगल मज तोची ।। १
ज्येष्ठ स्वामी लघु बंधु सेवक। हीच दिनकरकुलरीति ज्ञात।
सत्य वार्ता असेल उद्या रामासी अभिषेक। माग रुचेल ते देईन मग ।। २
सकल माता कौसल्यासम। रामास सहज प्रिय परम।
मजवरी तयाचे विशेष प्रेम। प्रेमपरीक्षा करून पाहिले मी ।। ३
विधाता कृपा करून घालील जन्मा जर। होवो रामसीता सुत सून तर।
प्राणाहून अधिक प्रिय मज रघुवीर। तयास अभिषेक का क्षोभ तुज ।। ४
भरताची शपथ तुज सांग सत्य। सोड छलकपट पाहून समय।
मानिसी खंत जरी समय हर्षमय। सांग मज तयाचे कारण ।। १५
बोलले एकदा जाहली आशा पूर्ण। अता वदू का दुजी जीभ करून।
भले सांगूनहि दुःखित तुमचे मन। फोडाया उचित हे अभागी कपाळ ।। १
वृत्त सत्य असत्य जे बनवून वदती। ते तुज प्रिय माई मी वाटे कटु अती।
करीन हांजी हांजी पाळून दासीची रीती। न तो राखीन मौन मी दिनरात्र ।। २
विधीने परवश केले कुरूप करून। देती ते घ्यावे कापावे ठेविले जे पेरून।
होणार का मी राणी दासीपण सोडून। नृप कोणीही होवो न मम हानी ।। ३
स्वभाव मम जाळण्यास उचित। न बघवे मजसी तव अनहित!
म्हणून कथिले काही अल्प वृत्त। देवी क्षमा करा मम अपराध महा ।। ४

गूढ कपटी प्रिय वचन। चंचल मतीची राणी ते ऐकून।
देवमायावश मंथरा वैरिणी असून। मानिले विश्वासे तिने तिज सुहृद ॥ १६
राज्ञी वारंवार तिजसी पुसत। जणु भिल्लीणीच्या गाना मृगी मोहित।
जैसी भवितव्यता तैसी मति फिरत। दासी हर्षित न चुकला घाव जाणून ॥ १
पुसता तुम्ही परि मज भय वदायाते। ठेविता मात्र घरफोडी नामाते।
निर्मून ऐसा विश्वास रचून कुभांडाते। वदली मग साडेसाती अयोध्येची ॥ २
वदला तुम्ही सीताराम प्रिय हे राणी। तुम्ही प्रिय रामास सत्य ही वाणी।
होते प्रथम ते अता कथा पुराणी। समय फिरता प्रिय मित्र होती शत्रू ॥ ३
भानू पोषितो कमलकुळ। परि जाळून भस्म करी विनाजळ।
सवत तुमची वांछी खणाया मूळ। उपायरूपी कुंपणे तयास रक्षावे ॥ ४
तुम्हास न चिंता सौभाग्यबळावर। मानिता निजवश नृपवर।
नृपाचे मन मलिन मुख मधुर। तुम्ही स्वभावे अति सरळ ॥ १७
चतुर गंभीर रामाची माता। स्वार्थ साधे ती समय येता।
मातुलगृही भूप पाठवी भरता। राममाता खेळे डाव ऐसा जाणा हे ॥ १
मम सेवा करिती सवती सकल। गर्विष्ठ एक भरतमाता पाठी पतिबळ।
हे माई कौसल्येच्या मनी बोचे हे सल। न कळे भाव तिचा चतुर कपटी ती ॥ २
नृपाचे प्रेम तुम्हावरी विशेष। सवतीमत्सरे न साहे कौसल्येस।
कपट रचून भूपासी करी वश। ठरवी मुहूर्त रामाच्या अभिषेकाचा ॥ ३
रामासी अभिषेक हे कुलास उचित। सकलांस आनंद मी हर्षित।
परि भावी विपत्तिभये मन थरथरत। फळ उलटे देवो दैव तिज ॥ ४
ऐशा कोटी कुटिल कथा रचून। कपटबोध कैकेयीच्या मनी ठसवून।
सवतीची शत कहाणी निवेदून। वाढवी परस्पर वैरविरोधास ॥ १८
राज्ञी भवितव्यासी वश उपजे विश्वास। शपथ घाली पुसे दासीस।
का पुसता अजून न उमजले तुम्हास। जाणती पशु निज हित-अनहित ॥ १
उत्सवशृंगारा दिन पंधरा होत। मजपासून तुम्हा आज मिळे वृत्त।
खाणेपिणे आश्रय तुमचे राज्यात। सत्य कथणे परि न मम दोष ॥ २
जर मी बोलेन असत्य वचन। विधाता मज करील कडक शासन।
दैव पेरीत हे विपत्तिबीज जाण। जर राम युवराज होईल उद्या ॥ ३

लिहून देते हे प्रतिज्ञेचे बोल । भामिनी जणु माशी तुम्ही दुधातील ।
सुतासहित गुलाम होऊन राहाल । तरच गृही नांदाल न अन्य यत्ने ।। ४
कद्रूने छळिले विनतेसी । तैसी कौसल्या दुखवील तुम्हासी ।
बंदीगृही कारावास मिळेल भरतासी । परि होईल लक्ष्मण सचिव प्रमुख ।। १९
कुब्जेची कटुवाणी ऐकून । राणी बोलू न शके मुख म्लान ।
तनूस घाम कदलीसम कंपायमान । तोच दंती चावली जीभ कुबडीने ।। १
सांगून कोटि कपटकथेसी । म्हणे धीर धरा समजावी राज्ञीसी ।
दैव पालटले रुचे दुराचार तिजसी । हंसी मानून बगळीस स्तवी ।। २
मंथरा ऐक हे सत्य तव वृत्त । मम दक्षिण नयन लवे सतत ।
प्रति दिनी रात्री कुस्वप्ने बघत । न सांगे मी तुज अज्ञानवशे ।। ३
सखे काय करू गे मम सरळ स्वभाव । डावेउजवे मज न काही जाणीव ।। ४
न केले मी कोणाचे अनहित । जोवरी उत्कर्षकाळ होता प्राप्त ।
का दैव दुःसह दुःख देत । कोणत्या मम पापास्तव ।। २०
राहीन जाऊन जन्मभर माहेरास । येवो मृत्यू न स्वीकारीन सवतसेवेस ।
शत्रुवश असून दैव जगवी जयास । जीवन जगण्याहून तया मरण बरे ।। १
बोले राणी ऐसे दीनवचन । करी स्त्रीमायाकरणी कुब्जा ऐकून ।
म्हणे का ऐसे वदता होऊन म्लान । प्रतिदिनी वाढेल तुमचे सौभाग्य ।। २
जो तुमचे अकल्याणास उद्युक्त । तो तयाचे फळ भोगील निश्चित ।
स्वामिनि मी जैंपासून ऐकिले हे कुमत । तैंपासून न भूक ना निद्रा मजसी।। ३
ज्योतिषास पुसता करी गणित । भरत होईल भूपाळ सत्य वृत्त ।
भामिनि कराल तो उपाय सुचवीत । नृप असे तुमच्या सेवेसी वश ।। ४
पडीन कूपात सांगशील तर । वा त्यजीन पतिसुत म्हणशील जर ।
कथिसी तू बघून मम दुःख भयंकर । का न करीन ते हितास्तव ।। २१
कैकेयीपासून घेई कुब्जा कबुली । कपटसुरी उरपाषाणी खुपसली ।
निकट दुःख जाणीव राज्ञीस न आली । जैसे बलिपशु भक्षितो हरिततृण ।। १
दासीचे वचन कानी मृदु अंती कठोर । मधुमिश्रित ऐसे ते विष घोर ।
वदे दासी स्मरते का तुम्हा साचार । स्वामिनि कथिली कथा तुम्ही ती मजसी ।।२
आहेत वर तुमचे दोन रायापाशी । ते घ्यावे मागून शमवावे चित्तासी ।
वनवास रामास राज्यपद भरतासी । घ्या हिरावून सवतीचा आनंद ।। ३

जंव भूपति रामाची शपथ घेतील । तंव वर मागा वचन न भंगतील ।
रात्र सरताच अकाज होईल । जाणा मम वचन प्रिय प्राणाहून ।। ४
पापिणी ऐसा करी महा कुघात । सांगे तिज जा आता कोपभवनात ।
कार्य साधावे प्रयत्नाने निश्चित । न धरावा विश्वास नृपावरी ।। २२
प्राणाहून प्रिय कुबडीस जाणून । राणी वारंवार करी बुद्धीचे वर्णन ।
जगी न कोणी चिंती मम कल्याण । मज वाहत्यासी तूच आधार ।। १
विधाता उद्या मनोरथ पुरवील जर । करीन तुज मम नेत्रपुतळी तर ।
दासीस देऊन मग बहुत आदर । गेली कैकेयी कोपभवनी ।। २
विपत्ति बीज जणु वर्षाऋतु दासी । कैकेयीची कुबुद्धि सुभूमि तयासी ।
कपटजळ मिळता फुटत अंकुरासी । वर दोन द्विदल दुःखफळ ।। ३
पडे भूमीवरी क्रोधाचा साज सजवून । राज्य भोगता दुर्बुद्धि दावी पतन ।
राजमंदिरी नगरी कोलाहल महान । कोणी न जाणे ही कपटवार्ता ।। ४
नरनारी सकल आनंदित । द्रव्ये सुमंगल ठेविती सिद्ध सेवक ।
उसळली जनदाटी राजद्वारात । प्रवेशती कोणी जाती बाहेरी कोणी ।। २३
बालमित्रांसी हर्षवार्ता ऐकून । भेटती रामासी दहापाच मिळून ।
प्रभू आदर करिती प्रेम ओळखून । पुसती क्षेमकुशल मृदु वचने ।। १
प्रिय मित्राची आज्ञा घेऊन जाती । परस्पर करिती रामाची स्तुती ।
कोण असे रघुवीरासम जगी । प्रेमळ सुशील संरक्षक ।। २
कर्मवशे भ्रमत योनीत जेथे । प्रभूने हेचि द्यावे तेथे ।
आम्ही सेवक स्वामी सीतानाथ हे नाते । असावे इच्छितो सतत आम्ही ।। ३
ही एकच अभिलाषा नगरजनांसी । परि हृदयी अति दाह होत कैकेयीसी ।
कोण न नष्ट जोडता कुसंगतीसी । नीच मते चालता न राही चतुराई ।। ४
सांज समयी सानंद दशरथ । जाती कैकेयीच्या महालात ।
जणु प्रेमच ते मूर्तिमंत । जाई निष्ठुरते निकटी ।। २४
कोपगृह ऐकता नृप भयभीत । भयवशे न टाकती पुढती पद ।
अन्य नरपति असती जयाच्या अंकित । निर्भय सुरपति जयाच्या बाहुबळे ।। १
स्त्रीरोष ऐकून सुकती नृप । पहा कामदेवाचा महिमा प्रताप ।
घायाळ मदनाच्या पुष्पबाणे भूप । जे साहती शूळवज्रअसिघाव ।। २
प्रियेसमीप जाती सशय नरेश । बघती तिचा दुःखद दारुण वेष ।
लोळे भूवरी फेकून तनुभूषणास । जाडे जीर्ण वस्त्र वपूवरी ।। ३

कैसा भासे तो कुमतीचा कुवेष। जणु सुचवी भावी वैधव्यास।
जाऊन समीप वदती मृदु वाणीस। हा रुसवा कशास्तव प्राणप्रिये ।। ४

म्हणे मज सांग। प्रिये का हा रोष। होता पतिस्पर्श। झिडकारी।
क्रूर दृष्टि पाहे। सरोष भामिनी। भासत नागिणी। अति क्रूर।
वासना रसना। दात वर दोन। नृपमर्मस्थान। शोधीतसे।
म्हणत तुलसी। भवितव्यवश। बवती नरेश। कामक्रीडा ।। १

राया वदती हे सुमुखी गजगामिनी। हे सुलोचने हे कोकिळभाषिणी।
वारंवार विनविती तिज आळवुनी। निज कोपाचे कारण सांग मज ।। २५
प्रिये कोण करी तव अकल्याण। कोणा नेऊ इच्छित यम द्विशिर कोण।
म्हणशील त्या रंकासी राव करीन। वा कोणा नृपास लावू देशोधडी ।। १
मारीन तव शत्रु जरी अमर। कोठे बिचारे कीटकासम नारीनर।
तव मुखचंद्रासी मम मन चकोर। सुंदरी मम स्वभाव तुज विदित ।। २
प्रिये मम संपत्तिसुतप्राण। प्रजा परिजन सकल तव आधीन।
जर वाटे कपटे करितो कथन। भामिनी शत रामशपथ मजसी ।। ३
माग मना रुचेल ते हासुनी। शृंगारी मनोहर गात्रे भूषणांनी।
समय कुसमय जाणून मनी। प्रिये वेगे टाक हा कुवेष ।। ४
हे ऐकून मनी रामशपथ चिंतून। मतिमंद राणी उठे हासून।
जणु किरातीणी आवळी पाश मृग बघून। तैसी शृंगारी तनु भूषणांनी ।। २६
जाणती नृप तिचे निर्मळ मन। प्रेमे पुलकित वदती मृदु वचन।
भामिनी अता तरी ना तव मन प्रसन्न। आनंदोत्सव नगरात घरोघरी ।। १
करितो उदयीक रामास युवराज। हे सुनयना कर अता मंगल साज।
ऐकून फाटे कठोर हृदय तिचे सहज। जणु धक्का लागे पक्व गळवासी। २
हसून लपवी निज व्यथा भारी। जैसी प्रकट न रडते चोराची नारी।
भूप न जाणती कपट चतुरता परी। कोटि कुटिल गुरूची ती शिष्या ।। ३
जरी नीतिनिपुण नरनाथ। जलनिधिसम अगाध नारीचरित।
नेत्र मुख मुरडून बोलली हासत। कपटयुक्त प्रेम वाढवून ।। ४
प्रियकर माग माग गडे सदा वदता। परि कधीहि न देता वा घेता।
दोन वर देतो वदला होता। ते विषयीही मज संदेह ।। २७

मर्म जाणून नृपति बोलती हासुनी। रुसवा प्रिय अति तुज राणी।
न मागितली कधी ठेव ठेविली म्हणुनी। स्वभावे भोळा विसरलो मी।। १
वृथा न धरावे दोषी मजसी। दोनाऐवजी घे चार वरांसी।
रघुकुलरीति परंपरा जाणसी। देतील प्राण नच भंगतील वचन।। २
असत्यासम नसे पातकपुंज। गिरिसम होतील का कोटिगुंज।
वेदपुराणास विदित गाती मनुराज। सत्य हे सुकृताचे मूळ सुशोभन।। ३
तयात मी घेतली रामाची शपथ। मम सुकृतिस्नेहाची सीमा रघुनाथ।
वचनी गोवून बोले राज्ञी हसत। जणु उघडी कुमतरूपी खग नेत्रपट।। ४
भूपाचे मनोरथ हे कमनीय वन। सुख तेथील सुविहंगगण।
कैकेयी जणु क्रूर भिल्लीण। वचनश्येन सोडू इच्छी तयावरी।। २८
ऐका प्राणप्रिया द्या जो रुचेल वर एक। करा भरतास राज्याभिषेक।
मागते दुजा जोडून हस्तक। पुरवा मम मनोरथ नाथा।। १
तापस वेष भाव विशेष उदास। चौदा वरुषे द्या रामा वनवास।
शोकाकुल भूप ऐकून मृदु वचनास। जणु शशिकिरण स्पर्शे विकल चक्रवाक।। २
शब्द न उमटे राया गर्भगळित। जणु वनी ससाणा लावीस झपाटीत।
संपूर्ण कांतिहीन नृप भासत। जणु तडिताघात ताल वृक्षावरी।। ३
मिटले लोचनद्वय शिरी टेकून हात। जणु शोक करी शोक मूर्तिमंत।
मम मनोरथ कल्पतरु होता फुलत। उपटी हत्तिणी समूळ फुलताच तो।। ४
केली उजाड कैकेयीने अयोध्या। विपत्तीचा रोविला अचल पाया।। ५
वेळ कोणती घडले काय। स्त्रीनादे मी फसलो हाय।
जणु योग सिद्धिफल येता समय। अविद्या नष्ट करी यतीसी।। २९
ऐसा कष्टी नृप मनात। देखून कुमति कैकेयी बोले रोषात।
का पुत्र पोटचा नसे भरत। की घेतली मोले तुम्ही मजसी।। १
मम वचन ऐकता झोंबती बाण। का न वदला विचार करून।
द्या उत्तर हो म्हणा वा मोडा वचन। रघुकुलवंशी तुम्ही सत्यप्रतिज्ञ ना।। २
वर देईन म्हणाला आता न द्याल जर। घ्या अपयश सत्या सोडून तर।
सत्या स्तवून म्हणता देतो वर। की वाटले चणे-चुरमुरे मागेन।। ३
शिबि दधीचि जे वदती। प्राणधन वेचून ते वचन पाळती।
वदे कैकेयी कटु वचन अती। जणु घाली लवण व्रणावरी।। ४

धर्मधुरंधर धरी धीरास । राया उघडती मग नेत्रास ।
शिर बडवून घेती दीर्घ श्वास । म्हणती वर्मी घातला असिघाव ।। ३०
क्रोधे जळत कैकेयी पाहून समोर । वाटे रोषाने उपसली समशेर ।
मूढ कुमति निष्ठुरता धार । परजली मंथरारूपी सहाणेवरी ।। १
जाणती महीप ती दुष्ट कठोर । वाटले निश्चित प्राण घेणार ।
छाती कठिण करून बोलती नृपवर । वाणी सविनय तिज रुचेल अशी ।। २
प्रिये का हे ऐसे अप्रिय वचन । वदते प्रीतिप्रतीतीस अवमानून ।
रामभरत मम दोन नयन । शंकर साक्षी सांगतो सत्य ।। ३
प्रभाती दूतांस मी धाडीन निश्चित । ऐकून उभय भ्राते येतील त्वरित ।
सज्जता करू पाहून शुभमुहूर्त । डंका वाजवून देईन राज्य भरतास ।। ४
रामासी न लोभ राज्यावर । तयाचे भरतावरी प्रेम अपार ।
मी सानथोर करून विचार । पाळीत होतो नृपनीतीस ।। ३१
सांगतो घेऊन शत रामशपथ । राममाता कधी काही न कथीत ।
ढासळलेस तू मम सकल मनोरथ । रचिला बेत न पुसता तुज ।। १
उत्सवसज्जता कर क्रोधा टाकून । अल्प दिनांतच भरता युवराज करीन ।
एकच वार्ता मज करी दुःखाधीन । तव दुजा वर दावितो अविचार ।। २
जळते आचेने मम हृदय अजून । विनोदे रोष हा वा हे सत्य वचन ।
सांग रामाचा अपराध क्रोध सोडून । राम साधु महान सकल वदती ।। ३
स्तवून राम स्नेहास दाविसी । संदेह उपजे आता ऐकून वचनासी ।
स्वभाव जयाचा अनुकूल रिपूसी । तो कैसा होईल प्रतिकूल मातेसी ।। ४
प्रिये चेष्टा वा रोष आता सार दूर । विवेके विचारे मागून घे वर ।
जेणे बघेन मी डोळाभर । भरताचा राज्य–अभिषेक ।। ३२
विना जळ जगतील मीन । विना मणि सर्प जगेल दुःखी दीन ।
न जगेन परी मी रामावाचून । कथितो तुज न कपट मनी ।। १
धर विवेक हृदयी हे प्रिये चतुर । रामदर्शन हाच मम जीवन–आधार ।
जणु घृत-आहुती पडती अग्नीवर । तैसी कुमती जळे ऐकून मृदु वाणी ।। २
वदे ती करा ना का कोटि उपाया । न भुलेन आता मायावचना या ।
वर द्या न तो अपयश पदरी घ्या । न रुचती हे मज वृथा बोल ।। ३
राम साधु तुम्ही साधुशहाणे । राममाता भली मी सकला जाणे ।
चिंतिले मम हित जैसे कौसल्येने । चाखवीन तयाचे फळ तैसे तिज ।। ४

जर राम न जाईल वनात । प्रभात होताच मुनिवेषात ।
अपयश तुम्हास मम मरण निश्चित । राया धरावे हे ध्यानात ।। ३३
वदून ऐसे कुटिला उभी ठाकत । जणु रोषतरंगिणी येई उफाळत ।
पापगिरीतून होऊन प्रकट । न देखवे ती भरलेली क्रोधजळे ।। १
धारा तीव्र हट्ट वर दोन तट । कुब्जेचे बोधवचन भोवरे तयात ।
दशरथरूपीतरूमूळ उपटू बघत । चालली नदी ती विपत्तिवारिधिप्रती ।। २
सत्य वदते ती नरेश जाणत । स्त्रीवेषे शिरी मृत्यु नाचत ।
पद धरून बैसवून विनवीत । नको होऊ कुऱ्हाड सूर्यवंशा तू ।। ३
मस्तक माग ते देतो तुजसी । रामविरहे का मज मारिसी ।
उचित उपाये घे ठेवून रामासी । न तो काळीज तव जळेल जन्मभरी ।। ४
नृप असाध्य व्याधी बघून । कोसळती धरणीवर माथा बडवून ।
वदती परम आर्तवचन । हे रामा हे रामा रघुनाथा ।। ३४
राया व्याकुळ सकल गात्रे शिथिल । जणु हत्तिणी उपटे कल्पतरु समूळ ।
तळमळे मीन जैसा विनाजळ । कंठ शुष्क शब्द न फुटे मुखातून ।। १
कठोर वचन पुन्हा कैकेयी वदत । जखमेमाजी जणु विष घालीत ।
मनी होते जर करणे ऐसा शेवट । कोणत्या बळावर वदला माग माग ।। २
कैसे उभय साध्य एकच वेळी भूपाळ । चेष्टा करून हसणे फुगविणे गाल ।
शूरता साधून कैसे क्षेमकुशल । म्हणविता दाता परि कृति कृपणाची ।। ३
धीर धरा न तो मोडा वचन । का मुळूमुळू अबलेसम हे रोदन ।
राज्यस्त्रीसुततनुधामधन । मानिती तृणसम जया सत्य प्रिय ।। ४
म्हणती नृप मर्मभेदी वचन ऐकून । वद काही तू न देई मी तुज दूषण ।
वदवितो मम काळ तव मुखातून । झपाटी तोच तुज पिशाच्चासम ।। ३५
नृपपदाची न हौस भरतास । दैववशे कुमति करी तव मनी वास ।
मम पापचि अजि आले फळास । अनुचित समयी नाडले दैवाने ।। १
सुंदर अयोध्या फिरूनि सुखी वसेल । सकल गुणी राम प्रभुता पावेल ।
बंधु तिघे सेवा करितील । रामाची महती गाजेल त्रैलोक्यी ।। २
मम पश्चत्ताप तव कलंक । न जातील कधी मृत्यूहि न करील नष्ट ।
कर आता मना जे वाटे उचित । बैस दृष्टिआड तोंड लपवून ।। ३
वदतो कर जोडून मी जोवरी जिवंत । मजसी तोवरी न बोलावे हे उचित ।
करंटे पश्चात्ताप पुन्हा अंती निश्चित । मारिसी गाय तू दावणीस्तव ।। ४

परोपरी राया समजाविती तिजसी । पडती धरणी वदून का नाश करिसी ।
धूर्त चतुर ती न वदे वचनासी । जणु मंत्र सिद्ध करी बैसून स्मशानात ।। ३६
हे राम राम आक्रंदती भूपाळ । पंखविहीन पक्षापरि विव्हळ ।
मनी चिंतिती न उजाडावी सकाळ । न सांगावी वार्ता कोणी रामास ।। १
हे रघुकुलगुरुरवि न करावा उदय । अयोध्या बघून होईल व्यथित हृदय ।
भूपप्रीति कैकेयीची निष्ठुरता उभय । गाठली तयांची सीमा ब्रह्मचाने ।। २
नृप विलाप करिता होई पहाट । वीणावेणुशंखध्वनि राजद्वारात ।
गाती गायक स्तविती भाट । ऐकताच शल्यापरि बोचे ते नृपास ।। ३
न साहवे ती मंगल शोभा नृपास । जैसी भूषणे सहगामिनि सतीस ।
ते निशी न निद्रा कवणास । उत्साहलालसा सर्वा रामदर्शनाची ।। ४
राजद्वारी सचिवसेवक जमती । उदयाचली रवि आला वदती ।
अजुनी न का उठती अयोध्यापती । कारण काय ऐसे विशेष ।। ३७
भूप जागती नित्य प्रहर शेवट । आज आम्ही जाहलो बहु स्तिमित ।
उठवा नृपास जा हो सुमंत । आज्ञा होताच लागू कार्यास ।। १
तंव सुमंत जाती भवनात । पाहून महाल भयाण ते भयभीत ।
न बघवे वाटे तो येई गिळाया धावत । जणु खेदविपत्ति वसती सर्वत्र । २
पुसता कोणी न देई उत्तर । मग प्रवेशती भूपकैकेयी यांचे मंदिर ।
जय जीव वदती नमवून शिर । भूपाची दशा पाहता म्लान वदन ।। ३
बघती महीवर शोके विवर्ण विकल । नृप जणु समूळ उपटलेले कमळ ।
पुसू न शकती सचिव भयाकुल । शुभहीन अशुभपूर्ण वदे राणी ।। ४
रात्रभर निद्रा नसे नृपास । काय कारण जाणे एक जगदीश ।
जाहली प्रभात जपता रामनामास । परि न कथिती महेश ते वर्म ।। ३८
आणा रामासी अतां सत्वर । तंव येऊन पुसा समाचार ।
निघाले राजाज्ञा जाणून सचिववर । जाणिले केली कुचाळी राज्ञीने ।। १
सचिव शोकाकुल न उचले पाऊल । म्हणती काय कथितील रामास भूपाळ ।
जंव धीर धरून जाती द्वाराजवळ । पुसती तया सकल पाहून उदास ।। २
मंत्री करून सकलांचे समाधान । जाती रामाप्रति दिनकरकुलभूषण ।
येताना भवनी राम सुमंतास बघून । सन्मानती मानून पित्यासम तया ।। ३
सांगती राजाज्ञा निरखून वदन । रघुकुलदीपासहित निघती तेथून ।
सचिवासह रामास एकले बघून । जाहले प्रजाजन व्याकुळ सर्वत्र ।। ४

रघुवंशमणि राम देखती नृपतीस । अति अवकळा आली देहास ।
जैसा वृद्ध गजराज पाहून सिंहिणीस । गर्भगळित कोसळे महीवरी ।। ३९
नृपाचे सुकले ओठ अंग धगधगत । मणिहीन दीन जणु भुजंग भासत ।
देखती समीप कैकेयी क्रोधे संतप्त । जणु मृत्यू मोजी घटिका अखेरच्या ।। १
स्वभावे करुणामय मृदु राम । कधी न ऐकिले दुःख ते देखती प्रथम ।
समय पाहून धरून धीर परम । मधुर शब्दे पुसती मातेसी ।। २
माते कथावे पित्याच्या दुःखाचे कारण । यत्ने तयाचे करीन निवारण ।
ऐक हे राम याचे एकचि निदान । राजाचा तुजवरील अतिस्नेह ।। ३
देतो दोन वर मज होते वदले । मागितले मी जैसे मना रुचले ।
ऐकून शोके विव्हळ जाहले । न सोडू शकती तव ममता ।। ४
ओढी सुताचे प्रेम इकडे तिकडे वचन । नरेश ऐसे संकटाच्या आधीन ।
यास्तव नृपाची आज्ञा शिरी धरून । मिटवावे तयांचे क्लेश दुर्धर ।। ४०
न लज्जा तिज बोले बैसून कटुवचन । होईल कठोरताही व्याकुळ ते ऐकून ।
जिव्हाचाप शर नाना वचन । भूपति जणु तयाचे मृदुलक्ष्य ।। १
जणु निष्ठुरता धारण करी शरीर । शिके धनुर्विद्या होऊन वीरवर ।
भासे ती निर्भयता मूर्त अवतार । जंव सांगे सकल वार्ता रघुपतीसी ।। २
भानुकुलभानु आनंदनिधान । राम वदती मनी हसून ।
मृदु मंजुळ निर्दोष वचन । जणू भूषण वाग्देवीचे ।। ३
ऐक माते तोच भाग्यवान सुत । जो मातापित्याची आज्ञा अनुसरीत ।
हे जननी दुर्लभ तनय ब्रह्माण्डात । जो संतोषवी मातापित्यासी ।। ४
होईल मुनींशी मीलन वनात । मम सर्वपरि कल्याण तयात ।
पित्याची आज्ञा पाळणे उचित । माते तव संमतीही तयास ।। ४१
राज्य मिळेल प्राणप्रिय भरतासी । सुदैवे विधाता आज अनुकूल मजसी ।
ऐशा काजा जर न जाईन वनासी । गणावे मज प्रथम मूर्खात ।। १
जे कल्पतरू सोडून एरंडास रक्षती । अमृत टाकून विष मागून घेती ।
तेहि ऐसी संधि न चुकविती । माते पाहा मनी चिंतून ।। २
हे अंब मज एक दुःख विशेष । अति विकल बघून नरेशास ।
अल्पास्तव भारी दुःख पित्यास । माते यावरी मम न विश्वास ।। ३
नृप धीर गुण यांचा सागर अगाध । वाटते मजकडून घडला अपराध ।
तरी तात न वदती राहती स्तब्ध । मम शपथ माते सांग सत्य ।। ४

रघुवराचे वचन सहज सरळ । कुमतीसी ते वाटे कुटिल ।
जरी ठेवी समान सपाटी सलिल । तरी वक्रगति जळूची जळावरी ।। ४२
मनी रामाचा रोख ओळखून । बोले कैकेयी लटका स्नेह दावून ।
शपथ तुझी भरताची आण । दुःखाचा अन्य हेतू न जाणे मी ।। १
हे तात बा तू न उचित अपराधा । मातापिताबंधु यांसी सुखदाता ।
मातृपितृवचनी दाविसी तत्परता । रामा जे वदसी ते सर्व सत्य ।। २
जीव ओवाळते समजावी पित्यास । वृद्धपणी न मिळावे तया अपयश ।
दिधले सुपुण्ये तुजसम पुत्रास । अनादर तयाचा करणे न उचित ।। ३
वाटती कुमुखीं वचन शुभ कैसे । मगधात गयादि तीर्थ जैसे ।
रामासी मातेचे वचन रुचले तैसे । जल जैसे शुभ सुंदर मिळता गंगेस ।। ४
गेली नृपाची मूर्च्छा तंव स्मरती रामास । पालटती मग ते कुशीस ।
सचिव यथा समय करिती विनंतीस । कळवून आगमन रामाचे ।। ४३
रामाचे आगमन भूपति परिसती । मग धरून धीर नेत्र उघडती ।
नृपास सावरून सचिव बैसविती । चरणी पडता रामास नृप बघती ।। १
स्नेहे विकल धरती पोटाशी । जणु हरपलेला मणि लाधे सर्पासी ।
नरनाथ निरखिती रामासी । नयनांतून वाहती अश्रुधारा ।। २
शोक–आवेगे काही न बोलवत । वारंवार रामासी हृदयी लावीत ।
विधात्यासी नृप मनी विनवीत । न जावो काननी रघुनाथ ।। ३
स्मरून महेशास प्रार्थना करिती ।। सदाशिवा ऐका मम विनंती ।
जाणून मज दीन दुःखार्ती । तुम्ही आशुतोष मागताच देणारे दाते ।। ४
प्रेरकरूपे तुम्ही हृदयात सकलांचे । द्या ऐसी बुद्धि रामाते ।
राहील गृही उल्लंघून वचनाते । सारून दूर शालीनतास्नेहास ।। ४४
मिळो अपयश जगी होवो सुयश नष्ट । मिळो स्वर्ग वा पिचेन नरकात ।
ऐसी दुःसह दुःखे द्या अनंत । परि न होवो नेत्राआड राम ।। १
नृप मनी विचार करिती न वदत । पिंपळपानापरि मन डोलत ।
पिता प्रेमवश रघुपति जाणत । माता वदेल पुन्हा अनुमान करून ।। २
बोलती विनयपूर्ण राम वचन । देशकालसमय बघून ।
दावितो धिटाई काही वदून । मानून लेकरू क्षमा करा ।। ३
अति लघुकाजास्तव मानिले दुःखासी । का कोणी प्रथम न वदले मजसी ।
स्वामींची दशा देखून पुसले मातेसी । मम गात्रे प्रसन्न परिसून वृत्तांत ।। ४

या मंगलसमयी स्नेहवश होऊन । तात अता शोक दूर सारून ।
आज्ञा द्या मज चित्ते प्रसन्न । वदताच होई पुलकित अंग प्रभूचे ।। ४५
धन्य तयाचा जन्म जगतात । ऐकता जयाचे चरित्र पिता प्रमुदित ।
तयासी चारी अर्थ करतळी प्राप्त । प्राणाहून प्रिय जयास मातापिता ।। १
आज्ञा मानून जन्मसफलता पावेन । द्या आज्ञा मी शीघ्र येईन ।
येतो माघारी मातेचा निरोप घेऊन । मग जाईन वनी पदांस वंदून ।। २
ऐसे वदून निघती रघुपती । शोकवशे न उत्तर देती भूपती ।
नगर व्यापी वार्ता दुःखद अती । जणु इंगळीदंशे चढे विष तनूत ।। ३
नगरनरनारी व्याकुळ हे ऐकून । जैशा तरुलता दावानल बघून ।
वडवी माथा जेथे जो ऐके कोण । अति विषाद सकला न धैर्य कोणास ।। ४
मुख म्लान नेत्रांतून अश्रु स्रवत । सामावेना हृदयात शोक ।
जणु करुणारसाची सेना नगरात । उतरली रणनौबत पिटून ।। ४६
साधला मेळ परि विधिघटना विचित्र । कैकेयीस शिवीगाळ करिती सर्वत्र ।
का जाहली पापिणीस दुर्बुद्धि कठोर । ठेवी निखारे भवनी शाकारून ते ।। १
पाहू इच्छिते निज करे नयना काढून । विष चाखू इच्छिते अमृत फेकून ।
रघुवंशवेणुवनातें ही अग्निसमान । अभागी कुबुद्धि कठोर कुटिल ।। २
तरुशाखी बैसून तरु कापू इच्छिते । सुखात शोकाचा थाट थाटते ।
सदा प्राणासम मानून रामाते । कवण हेतुस्तव हा कुटिलपणा ।। ३
हा नारीस्वभाव कवि सत्य वदती । सर्वपरि अगम्य अगाध कपटी ।
निज प्रतिबिंब धरवेल हाती । बंधूंनो परि नारीची गति न उमगेल ।। ४
काय जाळू न शकतो पावक । काय न सामावेल सागरात ।
प्रबळ अबला काय न करू शकत । कोणास न खाई काळ जगी ।। ४७
काय ऐकविले दैवे काय ऐकवीत । काय दाविले काय दावू इच्छित ।
एक वदे नृपे केले हे अनुचित । विचाराविण वर दिधला कुमतीस ।। १
स्वये होती दुःखास पात्र हट्ट पुरवून । अबलावशे लोपले ज्ञानगुण ।
जे अन्य जाणती धर्माची मर्यादा ज्ञान । ते सूज्ञ भूपास न दोष देतील ।। २
शिबि दधिचि हरिश्चंद्र यांची कहाणी । एक दुजास सांगे वाखाणुनी ।
भरताची संमति म्हणती कोणी । ते ऐकून कोणी राहती उदास ।। ३
कान करांनी झाकून दंती जिव्हा दाबुनी । ही वार्ता असत्य वदती कोणी ।
पुण्य होईल नष्ट ऐसे वदुनी । राम असे भरतासी प्राणप्रिय ।। ४

चंद्र अग्निकणांचा वर्षाव करील । सुधा विषसमान होईल ।
न स्वप्नीही भरत करील । रामासी प्रतिकूल कधी काही ।। ४८
दूषण देती कोणी विधात्यास । वदती अमृत दावून दिधले विष ।
नगरी खळबळ शोक सकलांस । दुःसह दाह न उत्साह हृदयी ।। १
विप्रस्त्रिया वृद्धकुलीन । जयांचे कैकेयीवर प्रेम महान ।
बोध करिती तिज शीलास स्तवून । बोचती तिज वचन ते बाणासम ।। २
रामासम नसे प्रिय मज भरत । वदसी सदा हे जग जाणत ।
कोणत्या अन्यायास्तव धाडिले वनात । जर रामावरी सहज स्नेह फार ।। ३
केला न कधी तू सवतीमत्सर । प्रीतिप्रतीति जाणत सर्व राष्ट्र ।
का केला वज्राघात नगरीवर । कौसल्येच्या कोणत्या दोषास्तव ।। ४
कैसा पतीचा संग सीता सोडिल । कैसा रामाविण लक्ष्मण गृही राहील ।
कैसा भरत अयोध्येचे राज्य भोगील । नृप ठेवील का प्राण रामाविण ।। ४९
सोड हा क्रोध कर विचार मनी । का व्हावे शोककलंकाचे धनी ।
का धाडते रामास वनी । द्यावे यौवराज्य निश्चित भरतास ।। १
न राज्याची भूक रामास । धर्मधुरीण तया न विषयी रस ।
रामाचा वास गुरुगृही त्यजून गेहास । घे ऐसा दुजा वर नृपापासून ।। २
जरी न मानशील आमुचे बोल । तव हाती काही न येईल ।
विनोदप्रकार जर हा असेल । तर सांग ते प्रकट करून तू ।। ३
रामासम सुत का योग्य वनासी । ऐकून जन काय म्हणतील तुजसी ।
ऊठ वेगें कर उपायासी । जेणे हा शोककलंक जाईल ।। ४

शोकाचा कलंक । जेणे होई दूर । उपाय ते कर । कुळ रक्षी ।
हट्टाने थांबव । रामवनवास । अन्य तू गोष्टीस । वदू नको ।
प्राणाविण तनु । भानुविना दिन । निशा शशिविण । शोभाहीन ।
तुलसी म्हणत । तैसी प्रभुविण । अयोध्या तू जाण । हे भामिनी ।। १

सख्या करिती श्रवणमधुर बोधासी । परिणामी अति हितकर तिजसी ।
परि न देई कान वचनासी । पढवलेली कुटिल कुबडीने ।। ५०
उत्तर न देई ती दुःसह रोषवश । जणू क्षुधित वाघिणी बघे मृगीस ।
व्याधि असाध्य वाटे सख्यांस । जाती त्या मंदमति अभागी तिज जाणून ।। १

राज्य भोगता ते दैव करी नष्ट । केले तिने जैसे कोणी न करीत ।
यापरि नरनारी विलाप करीत । शिवी लाखोली वाहती दुष्ट कैकेयीस ।। २
जळून अति क्रोधे जन उसासे सोडती। कैसी आशा जीवनी रामाविण वदती ।
दु:सह वियोगे जन व्याकुळ होती । जणु हताश जलचर जल सुकता ।। ३
स्त्री पुरुष सकल दु:खवश अती । स्वामी राम जाती कौसल्येप्रती ।
राम प्रसन्न मुख उत्साह चौपट चित्ती । घेतील ठेवून नृप ही मिटे चिंता ।। ४
नवगजेंद्रासम रघुवीराचे मन । राज्य गजशृंखला समान ।
बंधमुक्त वनगमन आज्ञा ऐकून । हृदयी तयाच्या अधिक आनंद ।। ५१
रघुकुळटिळक जोडून उभय हस्त । मुदित मने मातृपदी माथा नमवीत ।
आशीर्वाद देऊन माता उरी लावीत । ओवाळी वसनभूषणे तयावरी ।। १
माता मुख चुंबी वारंवार । नेत्री प्रेमजल पुलकित गात्र ।
आलिंगन देऊन घेई अंकावर । स्तनांतून प्रेमे दुग्ध स्रवे ।। २
वर्णनातीत मातेचा प्रेमप्रमोद । जणु रंकासी मिळे कुबेरपद ।
आदरे सुंदर वदन निरखीत । बोले माता मधुर वचन ।। ३
हे तात कुरवंडी करते वदे माता । सांग मज मोद मंगल घटिका ।
सुख सुकृत शील यांची सीमा आता । पूर्णतम अवधि जन्मलाभाची ।। ४
नरनारी अति आर्ते यापरि वांछिती । व्याकुळ मने उत्कंठित अती ।
जैसे तृषार्त चातकचातकी । वांछिती शरदस्वातिबिंदुवृष्टी ।। ५२
इडापिडा टळो बाळा कर वेगे स्नान । रुचेल मना ते खा मधुर अन्न ।
वत्सा जीव ओवाळते तुजवरून । जा पित्यासमीप तू लवलाही ।। १
ऐकून मातेचे वचन अनुकूल । जणु सुमने स्नेहकल्पतरुवरील ।
भरलेली सुखमकरंदे जणु श्रीमूळ । पाहून तया न भाळे राममनोभृंग ।। २
धर्मधुरंधर धर्मगति जाणून । वदती मातेस अति मृदु वचन ।
सर्वपरी मम कार्य घडावे महान । यास्तव वनराज्य देती पिता । ३
आज्ञा दे माते मने प्रसन्न । वाटेल मोदमंगलमय कानन ।
तव अनुग्रहे आनंद उपभोगीन । न व्हावे भयभीत प्रेमवशे ।। ४
चौदा वरुषे विपिनी राहीन । पितावचन सत्य करून दावीन ।
येईन माघारी पददर्शन घेईन । होऊ नको तू मनी म्लान ।। ५३
मधुर विनीत रघुवीराचे वचन । मातेच्या उरी बोचे शरासमान ।
शीतलवाणी ऐकून गेली सुकुन । जणु वर्षावारी पडे जवसावरी ।। १

न वर्णवे तो हृदयातील विषाद । जणु हरिणी ऐकते सिंहनाद ।
नयनी अश्रु तनु थरथर कापत । वर्षाफेन खाऊन मीन तडफडे जणु ।। २
धीर धरून निरखी सुताचे वदन । वदे जननी मग गद्गद वचन ।
बाळा पिता मानिती तुज निज प्राण । तव चरित्र देखता नित्य मुदित ।। ३
राज्यार्पणास्तव तुज शोधती मुहूर्त । कवण अपराधास्तव वनी जा वदत ।
ऐकव मज कारण हे तात । दिनकरकुलास हा कोण अग्नी ।। ४
सचिवसुत रामाचा रोख निरखून । सांगे तिज कारण समजावून ।
मुक्यापरी स्तब्ध ती वार्ता ऐकून । न वर्णवे ती मातृदशा ।। ५४
थांब वा जा न म्हणवे तिजसी । उरी दारुण दाह उभय बाजूंसी ।
रेखिला राहु काढू इच्छी शशी । ऐसी विधिगति वक्र सर्वांस सदा ।। १
घेरिले मतीस सुतस्नेह वा नारीधर्म । जाहली गति सर्पमूषकासम ।
हट्ट धरून जर राखीन गृही राम । धर्महानि होईल विरोध बंधूंत ।। २
सांगावे जा वनी तरी अति हानी । संकटशोके विवश राणी ।
परि स्त्रीधर्म मानी ती शहाणी । रामभरत सुतसमान जाणून ।। ३
राममाता स्वभावे अति सरळ । धीर धरून मग काढी बोल ।
उचित केले इडापीडा टळो बाळ । पित्राज्ञा पालन हा शिरोमणि धर्म ।। ४
राज्य देतो वदून दिधला वनवास । परि न मजसी दुःख लेश ।
भरतभूपतीसी प्रजेसी क्लेश । होतील तुजवाचून रामा ।। ५५
जर ही पित्राज्ञाच केवळ । माता श्रेष्ठ जाणून जाऊ नको बाळ ।
जर मातापिता उभय वना अनुकुल । तर काननशत अयोध्येसम ।। १
पिता वनदेव माता वनदेवी होतील । खगमृग चरणकमल सेवितील ।
परि हुरहुर पाहून तंव वय कोमल । अंती उचित नृपाज्ञा वनवास ।। २
अयोध्या अभागी भाग्यवान वन । ज्या अयोध्येस सोडती रघुवंशभूषण ।
जर वत्सा मज संगे ने सांगेन । तंव संदेह येईल तव हृदयी ।। ३
बाळा प्राणप्रिय तू सर्वांचा । प्राणांचा प्राण जीव हृदयाचा ।
माते जाऊ वनी पुसतो साचा । मी पस्तावे बसून ऐकून वचन ।। ४
न करी मी हट्ट ऐसा विचार करून । तात आता मिथ्या स्नेह वाढवून ।
इडापीडा टळो मातेचे नाते मानून । मज विसरू नको कदापि तू ।। ५६

वत्सा तुज रक्षोत देवपितर । जैसे पलक रक्षती नेत्र ।
प्रिय आप्तजन मीन वनवासकाल नोर । करुणाकर धर्मधुरीण तू ।। १
ऐसे चिंतून तू कर तीच योजना । जेणे जितेपणी भेटशील सकलांना ।
ओवाळते जीव जा सुखे तू वना । अनाथ करून नगरजन परिवार ।। २
सकलांची पुण्याई आज नष्ट । जाहला क्रूर काळ विपरित ।
बहु विलाप करून धरिले रामपद । आपण परम अभागी जाणून ।। ३
हृदय दग्ध दुःखे दुःसह दारुण । उदंड आक्रोशाचे न करवे वर्णन ।
राम हृदयी धरिती मातेस उठवून । समजाविती तिजसी मृदु वचने ।। ४
ऐकून समाचार ते वेळी । घाबरून सीता त्वरे उठली ।
गेली सासूपाशी वंदून पदकमली । बैसली मग शिर नमवून ।। ५७
आशीर्वाद देई सासूचे कोमल मन । हृदय कळवळे सुकुमारी बघून ।
रूपराशी सीता पतिप्रेमे पावन । बैसली सचिंत घालून मुख खाली ।। १
जीवननाथ वनी जाऊ इच्छिती । करील तयांना साथ कोणती सुकृती ।
केवळ प्राण वा सतनु प्राण वनी जाती । न कळे काही दैवाची करणी ।। २
चारु चरण नखाने धरणीवर रेखीत । मधुर नूपुररव कवि वर्णीत ।
जणु प्रेमवशे चरणांसी विनवीत । न सोडावे नूपुर तयांनी कधी ।। ३
अश्रु ढाळीत सुंदर विलोचनातून । राममाता वदे ते बघून ।
वत्सा ऐक अति सुकुमार सून । प्रिय सासूश्वशुरपरिवार या सकला ।। ४
पिता जनक भूपेश्वर । भानुकुलभानु श्वशुर ।
पति रघुकुलकमलवनासी चंद्र । तथा गुणरूपभांडार ।। ५८
मिळाली प्रिय पुत्रवधू साचार । रूपराशी गुणशील सुंदर ।
नेत्रबाहुलीपरी केले प्रेम तिजवर । ठेविले प्राण जानकीवर लावून ।। १
पुरविले कलपवेलीपरि लाडकोडास । प्रतिपाळिले सिंचून स्नेहजलास ।
जाहले दैव वक्र फूलफळसमयास । न कळे मज याचा परिणाम ।। २
त्यजून अंक मंचक आसन वा हिंदोळा । न ठेविले सीतेने कठोर धरणीं पदाला ।
संजीवनी मुळीपरि जपले तिजला । दीपवात सार न कधी कथिले ।। ३
तीच सीता तुजसंगे वनी येऊ इच्छित । काय आज्ञा बोल रघुनाथ ।
चकोरी चंद्रकिरणअमृत वांछीत । नयन रोखून पाहील कैसे रवीस ।। ४
गजकेसरीनिशाचर वनात । संचरती तैसे जंतु विपुल दुष्ट ।
कैसे शोभेल विषवाटिकेत । संजीवनीमूळ सुंदर ।। ५९

कोळीकिरात यांच्या किशोरी वनाकारणे । अज्ञानी विषयसुखी
रचिल्या विधात्याने ।
पाषाणकृमीपरी कठोर स्वभावाने । तयांसी न क्लेश काननी कधी ।। १
तपस्वी स्त्रिया वनवासा उचित । जयांनी सोडिले सकल भोग तपार्थ ।
बाळा सीता कैसी राहील वनात । जी भभयीत देखता कपिचित्र ।। २
सुंदर सुरसरी कमलवनविहारी । कैसी शोभल डबक्यात ती हंसकुमारी ।
विचार करून दे आज्ञा अखेरी । तैसा बोध करीन मी जानकीस ।। ३
वदे माता सीता राहील भवनी जर । बहुत विसावा मजसी मिळेल तर ।
मातेची प्रिय वाणी ऐकून रघुवीर । ओथंबली जी शीलस्नेहसुधे ।। ४
राम विवेकमय प्रिय वचन वदून । करिती मातेचे समाधान ।
मग वनातील गुणदोष प्रकट करून । समजाविती जानकीसी ।। ६०
मातेच्या सन्मुख वदणे संकोच रामास । परि समय जाणून सांगती सीतेस ।
राजकुमारी ऐक मम उपदेश । न आणावे भलतेच मनी । १
जर वांछिसी उभयतांचे हित । आज्ञा मानून राहा गृहात ।
संपूर्ण कल्याण तव भवनात । मम आज्ञापालन सेवा सासूची । २
आदरे सेवावे सासुश्वशुरचरण । या परता न अन्य धर्म महान ।
जंव जंव माता करील मम स्मरण । प्रेमे व्याकुळ मतिभ्रम होईल ।। ३
तंत तंव तयांना पुरातन कथा सांगून । सुंदरी मृदुवाणीने कर सांत्वन ।
हे सुमुखी सांगतो शपथ घेऊन । ठेवितो गृही केवळ मातृहिता ।। ४
गुरुदेव यांना संमत धर्मफळ । विना क्लेश तुजसी मिळेल ।
गालवमुनि नहुषनरेश सकल । साहती संकटे हट्टवशे ।। ६१
सत्य करून मी पितृवचन । हे सुंदरी शहाणी मी शीघ्र येईन ।
दिवस सत्वरी जातील निघून । हे सुमुखी मम बोध मानावा ।। १
प्रिये प्रेमवशे जर धरिशील हट्ट । अंती पावशील दुःख निश्चित ।
कानन कठिण अति भयानक । उष्माहिमवारा वर्षा घोर जेथे । २
पथी कुशकाटेकंकर विपुल । विना पादत्राण पदचाल ।
तव पदकमल मृदु कोमल । मार्गी महान दुर्गम भूमिधर ।। ३
दुस्तर नदीनाले नदी दरीखोरी । अति अगाध दृष्टि न ठरे तयावरी ।
नाद करिती सिंहव्याघ्रवृकऋक्षकरी । ऐकून तो नाद शूर वीर पळती ।। ४

वल्कलवसन भूमिशयन। कंदफळमूळादि अशन।
तेही न मिळती सदा सर्व दिन। ऋतुमाने असती अनुकूल ॥ ६२
नरभक्षक रजनीचर विचरती। कोटि अधिक कपटवेष करिती।
पर्वत पाणी बाधक अती। ऐसी वनातील विपत्ति न वर्णवे ॥ १
व्यालकराल विहंग वनी घोर। निशाचरसमूह नारीनर चोर।
स्मरण होताच कापती वीर धीर। स्वभावे तू भीरू हे मृगाक्षी ॥ २
न वना योग्य तू हंसगामिनी। अपयश देतील जन ऐकुनी।
वाढे हंसी मानसजळसुधा पिऊनी। कैसी जगेल क्षार जळावर ती ॥ ३
नव आम्रवनी विहारशील। कैसी कोकिळ कराल वनी शोभेल।
काननी क्लेश अति व्याकुळ होशील। चंद्रानने विचार करून रहा गृही ॥ ४
गुरुस्वामी सुहृद हितचिंतक असती। तयांचा बोध न जे शिरी धरती।
ते हृदयी पस्तावती अती। हितहानि होईल निश्चित तयांची ॥ ६३
पतीचे मृदु मनोहर वचन ऐकून। सीतेचे ललित लोचन जलपूर्ण।
दाहक वाटे शीतल शिकवण। जैसी शरत्चंद्रनिशा चक्रवाकीसी ॥ १
वैदेही व्याकुल न देववे उत्तर। सोडू इच्छिती शुचि स्वामी प्रियकर।
मग भूमिकन्या धरून धीर। कष्टे आवरी विलोचनवारीसी ॥ २
वदे सासूचे पदी पडून कर जोडून हे देवी क्षमा करा धिटाई बघून।
जेणे होईल मम परम कल्याण। ते च बोध करिती प्राणपती ॥ ३
परि मी पाहिले मनी चिंतून। नसे जगी दुःख पतिवियोगासमान ॥ ४
तुम्ही प्राणनाथ करुणायतन। सुंदर सुखद सुजाण।
स्वर्ग भासे नरकासम तुम्हाविण। हे रघुकुलकुमुदचंद्रा ॥ ६४
मातापिताबंधुभगिनि प्रिय। प्रिय परिवारसुहृदसमुदाय।
सासूश्वशुरगुरू देती सहाय्य। सुत सुंदर सुशील सुखद ॥ १
नाते प्रेम पतिवाचून हे नाथ। स्त्रीस ते रविहुनी तापद।
पतिविना सर्व शोकमूळ निश्चित। तनुधनधामधरणी नगरराज्य ॥ २
भोग रोगासम भूषणभार। यमयातना जणु हा संसार।
तुम्हाविण जगी हे प्रियकर। नसे सुखद काहीही कोठे ॥ ३
देह प्राणाविण वा नदी जलाविण। नाथा तैसी नारी पुरुषावाचून।
प्रभूचे शरद विमल चंद्रमुख बघुन। प्राप्त समस्त सुख सहवासी तुमच्या ॥ ४

खगमृग हे आप्तजन नगर वन । वल्कल विमल वस्त्रासमान ।
नाथांच्या निकटी जणु सुरसदन । होईल पर्णकुटी स्वर्गासम सुखमूळ ।। ६५
वनदेवी वनदेव उदार । सांभाळतील सासूसासऱ्यांसम साचार ।
शय्येस्तव कोमल कुशसुंदर । प्रभूसंगे मंजु मनोज शेजेसम ।। १
अमृतासम कंदमूळफळ–आहार । शत अयोध्याभवनासम डोंगर ।
विलोकून प्रभुपदकमल वारंवार । होईन आनंदित जणु चक्रवाकी दिनी ।। २
सांगता नाथ वनातील दुःख बहुत । घोर परितापभयविषाद ।
परि सकल मिळून हे कृपानिकेत । नसती प्रभुवियोगाच्या लवलेशसम ।। ३
ऐसे चिंतून हे सुजाणशिरोमणी । न्यावे मज संगे न जावे सोडुनी ।
स्वामी कैसे सांगू अधिक विनवुनी । करुणामय अंतर्ज्ञानी तुम्ही ।। ४
जर चौदा वरुषे अयोध्यी ठेवाल । तर जाणा मम प्राण न राहतील ।
हे दीनबंधु सुखद सुशील । सुंदर स्नेहशीलनिधान ।। ६६
क्षणोक्षणी हे चरणकमल निरखीन । मार्ग चालता मग न येईल शीण ।
सेवा तुमची मनोभावे करीन । पथश्रमपरिहार करीन स्वामींचा ।। १
पद प्रक्षाळून तरुछायी बैसेन । मुदित मने विंझणवारा घालीन ।
घर्मबिंदुसह श्याम तनु निरखीन । प्राणपतीच्या दर्शने न दुःखसमय ।। २
समतल मही तृणपर्ण पसरून । दासी निशी चेपील प्रभूचे चरण ।
मृदु मूर्ति वारंवार न्यहाळीन । उष्ण वारा तव मज न लागेल ।। ३
प्रभुसंगे असता मज कोण न्यहाळील । जैसा सिंहाच्या वधूस ससाशृगाल ।
नाथा तुम्ही वनायोग्य मी कुमारी कोमल । तुम्हा उचित तप मज विषयभोग का ।। ४
ऐकून ऐसे वचन कठोर । न भग्न होत मम हृदय जर ।
प्रभु भीषण वियोगाचे दुःखतर । पामर प्राण हे साहतील ।। ६७
वदून ऐसे सीता अति शोकाकुल । साहू न शके विरह शब्द केवळ ।
हट्टे गृही ठेविता प्राण सोडील । रघुपती जाणती मनी बघून दशा ।। १
वदती मग कृपाळु भानुकुलनाथ । सोडी शोका चल मजसमवेत ।
काळ न आता विषादा उचित । वनगमनसिद्धता कर वेगे ।। २
करिती संतुष्ट प्रिय वचने प्रियेस । वंदून मातृपदा पावती आशीर्वादास ।
बाळा मिटव वेगे येऊन प्रजादुःखास । न विसरो तुज माता निष्ठुर ।। ३
पालटेल का हे दैवा दशा फिरून । नयन मनोहर जोडी कधी पाहीन ।
बाळा केव्हा येईल सुवेळ तो सुदिन । जंव माता पाहील मुखचंद्र जितेपणी ।। ४

हे वत्स लाल रघुपति रघुवर म्हणून । तुज वारंवार आळवून केव्हा बोलावीन ।
तुजसी हृदयी कवटाळून । केव्हा हर्षे निरखीन तनु तव ॥ ६८
माता स्नेहे अधीर बघून । विव्हळ मुखावाटे न येई वचन ।
कैसे स्नेहसमायाचे करावे वर्णन । जंव राम समजाविती परोपरी ॥ १
मग जानकी धरी सासूचे चरण । म्हणे माते मी परम भाग्यहीन ।
सेवासमयी करविते दैव वनगमन । जाहले मम मनोरथ निष्फळ ॥ २
क्षोभ सोडा परि न सोडा कृपेस । कठिण कर्मगति मम न दोष ।
सासू व्याकुळ ऐकून सीतेच्या वचनास । कैसी वर्णू मी ती विकल दशा ॥ ३
हृदयी धरी सीतेसी वारंवार । देई आशीर्वादबोध धरून धीर ।
जोंवरी वाहे गंगायमुनाधार । तोंवरी राहो तव अखंड सौभाग्य ॥ ४
देई आशीर्वाद सासू सीतेसी । तैसा नानापरी बोध करी तिजसी ।
निघे सीता नमवून शिर पदपद्मासी । अति प्रेमाने वारंवार ॥ ६९
जंव समाचार समजे लक्ष्मणास । व्याकुळ उठुनी धावे वदन उदास ।
प्रेमे अधीर धरी रामचरणांस । अश्रु नयनी कंपित पुलकित तनू ॥ १
न वदे काही उभा टक लावून । जणु जळातून काढलेला मीन दीन ।
काय दैवा भवितव्य चिंती त्याचे मन। की सकल सुखसुकृत समाप्त आज॥ २
रघुनाथ मज काय कथितील । ठेवतील भवनी वा संगे नेतील ।
मानून तृणसम देहगेह सकल । बघती राम बंधूस उभा कर जोडून ॥ ३
वचन वदती राम नीतिचतुर । शीलस्नेहसरळतासुखसागर ।
वत्सा प्रेमवशे होऊ नकोस अधीर । परिणामी आनंद जाणून हृदयी ॥ ४
मातापिता गुरु स्वामी यांचे बोल । आदरे शिरी धरून करिती जे सफल ।
ते जन्माचे सार्थक साधतील । न तो निरर्थक तयांचा जन्म जगी ॥ ७०
बंधो हे जाणून ऐक शिकवण । सेवावे मातापित्यांचे चरण ।
नसे भवनी भरतशत्रुघ्न । मजस्तव दुःखी नृप वृद्ध ॥ १
तुजसंगे घेऊन वनी जाईन जर । सर्वपरी अयोध्या अनाथ होईल तर ।
गुरुमातापिताप्रजापरिवार । पडतील सकल दुःसह दुःखात ॥ २
राहून भवनी दे सकला संतोष । न ती पदरी येईल महादोष ।
तो नृप निश्चित भोगील नरकवास । जो करितो दुःखित प्रिय प्रजेसी ॥ ३
तात राहावे गृही ऐसी नीति चिंतून । अति व्याकुळ लक्ष्मण ते ऐकून ।
कोमेजला बंधू परिसून शीतल वचन । जैसे कमल हिमस्पर्शाने ॥ ४

न उत्तर देऊ शके तो प्रेमवश । व्यथित मने धरी चरणांस ।
स्वामी नाथ तुम्ही मी दास । दूर लोटता मजसी कैसे राहावे मी ।। ७१
स्वामी उपदेश तुमचा अति उचित । मी भ्याड मज न काही उमगत ।
ते निगमनीतीचे अधिकारी होत । जे नरवीर धीर धर्मधुरीण ।। १
मी शिशु प्रभुस्नेहे पोषित । मंदार मेरूसी का मराल उचलीत ।
गुरुमातापिता मी कोणी न जाणत । नाथा स्वभावे कथितो विश्वास धरा ।। २
असती स्नेहसंबंध जितुके जगीं । प्रीति प्रतीति आदि जया वेद गाती ।
ते मम सर्वस्व तुम्ही स्वामी रघुपती । हृदय–अंतर्ज्ञानी हे दीनबंधो ।। ३
धर्मनीति उपदेश उचित तयास । कीर्ति विभूति सद्गति प्रिय जयास ।
परि कायावाचामने जो दावी पदी प्रेमास । कृपासिंधु सोडणे तया उचित का ।। ४
राम करुणासिंधु सुबंधूचे वचन । नम्रशील अति कोमल ऐकून ।
प्रभु समजाविती तया हृदयीं धरून । स्नेहे सभय जाणून तो ।। ७२
घे निरोप जननीचा जाऊन । ये वेगे माघारी करावया वनगमन ।
मोद बंधूस रघुवराची वाणी ऐकून । घडे महालाभ टळे महाहानी ।। १
मातेसमीप जाई हृदयी हर्षित । जणु अंधास पुन्हा नेत्र पावत ।
जननीच्या पदी माथा नमवीत । परि मन रामसीतेच्या समीप ।। २
पुसे माता मन उदास पाहून । सकल कथा मग विस्तारे सांगे लक्ष्मण ।
घाबरली कठोर वचन ऐकून । जणु हरिण बघुन चौफेर वणव्यास ।। ३
लक्ष्मणास वाटे आज अनर्थ होत । स्नेहवशे विघ्न आणील कार्यात ।
निरोप घेता सभय संकोचित । माता जा संगे ऐसे वदेल की नाही ।। ४
सुमित्रेने रामसीतेचे रूपस्वभावशील । तथा नृपाचा स्नेह जाणून तयांवरील ।
वदली शिर बडवून तात्काळ । साधिला दुष्ट दावा पापिणीने ।। ७३
धीर धरी सुमित्रा कुसमय जाणुनी । बोले मग सहज सुंदर मृदु वाणी ।
बाळा वैदेही तव जननी । पिता राम प्रेमळ सर्वपरी ।। १
अयोध्या तेथे जेथे रामनिवास । जेथे भानुप्रकाश तेथे दिवस ।
जाती जर निश्चित रामसीता वनास । काही न काज तव अयोध्येत ।। २
गुरु मातापिता बंधुसुरस्वामी यांस । सेवावे प्राणासमान सकलांस ।
राम सखा सकला प्रिय प्राणासरिस । स्वार्थरहित जीवन हृदयाचे ।। ३
जगी जितुके पूजनीय प्रियजन । रामाच्या नात्यासम सकला जाण ।
चिंतून ऐसे करावे वनगमन । जीवनसाफल्य साधावे वत्सा ।। ४

बाळा जीव ओवाळते तुजवरूनी । तू मनातील कपट सोडुनी ।
घेतलास आश्रय रामचरणी । जाह्ला मजसहित महाभाग्यास पात्र ।। ७४
पुत्रवती युवती तीच जगात । जिचा सुत रघुपतिभक्त ।
न तो वांझ भली पशुसम प्रसवे व्यर्थ । रामविमुख सुतास हितकर मानी जी ।। १
तव सुभाग्ये राम जाती वनात । बाळा न दुसरा हेतु तयात ।
सकल पुण्याचे महाफळ हेच । रामसीता यांचे पदी सहज प्रेम ।। २
मोह मद ईर्षा राग रोष । नको होऊ स्वप्नीही तयासी वश ।
सोडून सकल विकारांस । कायावाचामने करावी रामसेवा ।। ३
सर्वपरी आराम वनी तुजसी । मातापिता सीताराम हे पाठीशी ।
जेणे न होतील वनी क्लेश रामासी । पुत्रा करावे तेच उपदेश हा ।। ४

प्रिय मातापिता । जन परिवार पुर । पडावा विसर । सकलांचा ।
तुज बा लक्ष्मणा । हाच उपदेश । रामजानकीस । सुख द्यावे ।।
शुद्ध नित्य नवी । अविरल भक्ति । सीतारामपदी । असो सदा ।
तुलसी म्हणत । लक्ष्मणासी बोध । आज्ञा आशीर्वाद । देई माता ।। १

मातेच्या चरणी मस्तक नमवून । निघाला वेगे लक्ष्मण भयभीत मन ।
जणु कठिण जाळे तुडवून । पळाला मृग भाग्यवशे ।। ७५
जानकीनाथासमीप पोचे लक्ष्मण । प्रिय समागम जाणून मन प्रसन्न ।
सीतारामांसी करून वंदन । जाई तयांच्या संगे नृपमंदिरी ।। १
नगरनरनारी वदती परस्परांस । सुयोग आणून विधाता करी घातास ।
कृश तनु दुःखी मन वदन उदास । जणु व्याकुळ मक्षिका मधु काढून घेता ।। २
हात चोळीती बडविती माथा पस्तावती । जणु पंखाविण विहंग तळमळती ।
माजे राजद्वारी गर्दी कोलाहल अती । न वर्णवे तो विषाद अपार ।। ३
नृपासी सुमंत बैसवी उठवून । आले राम ऐसे प्रिय वचन वदून ।
भूपति बहु व्याकुळ बघून । सीतेसवे उभय तनय ।। ४
निरखून सीतेसह सुत सुंदर । नृपास जाहले दुःख अपार ।
स्नेहवशे नृप वारंवार । कवटाळिती तयांना हृदयासी ।। ७६
न बोलवे नृपासी व्याकुळ फार । शोके दारुण दाह जाळी उर ।
प्रेमे चरणी नमवून शिर । रघुवीर घेती निरोप उठून ।। १

द्या आज्ञा आशीर्वाद हे तात । हर्षसमयी नका मानू विषाद ।
बाबा प्रेमवशे घडता प्रमाद । जगी न यश निंदा होईल ।। २
प्रेमे विव्हळ भूपाळ बैसती उठून । रघुपतीस बैसविती बाहु धरून ।
बाळा ऐक म्हणती तुज मुनिजन । आहे श्रीराम चराचरनायक ।। ३
शुभाशुभ कर्मास अनुसरून । ईश देई फळ हृदयी विचार करून ।
ऐसी वेदनीति कथिती सकल जन । जो करील कर्म फळ भोगील तोच ।। ४
करी कोणी एक अपराध । दुजा तयाचे फळ भोगीत ।
कवणासही न कळे जगात । भगवंताची लीला अति विचित्र ।। ७७
ठेवून घेण्यास्तव रामास । नृप सोडून कपट करिती उपायास ।
राम न राहती जाणून रामरोखास । धीर धर्मधुरंधर सुजाण नृप । १
तंव नृपति धरिती सीतेसी पोटाशी । प्रेमे परोपरी समजाविती तिजसी ।
कथिती दुःसह वनदुःखासी । तैसीच सुखे श्वशुरगृही माहेरी ।। २
रामचरणी अनुरक्त सीतेचे मन । न वाटे गृह शुभद वा दुःखद वन ।
विपिनविपत्तीच्या क्लेशाचे वर्णन । कथून समजाविती अन्य सकल ।। ३
सुजाण नारी सुमंतपत्नी गुरुपत्नी । सांगती प्रेमळ वाणीने समजावुनी।
राहा तू सासूश्वशूरगुरु यांची आज्ञा मानुनी । न देती भूप वनवास तुज ।। ४
शीतल हितकर मधुर शिकवण । सीतेसी न रुचे ती ऐकून ।
जणु चक्रवाकी शरद चांदणे बघून । होई अति व्याकुळ मनी ।। ७८
संकोचे सीता न देई उत्तर । ऐकून कैकेयी क्रोधे उठे सत्वर ।
बोले मृदु वाणी ठेवून समोर । मुनिवस्त्रपात्रआभूषण ।। १
नृपासी प्राणप्रिय तू हे राम । ते भीरु न सोडतील शील प्रेम ।
जरी नष्ट सुयशपुण्यपरमधाम । कदापि न म्हणतील जा वनी ।। २
ऐसे चिंतून मनी करावे जे दिसेल ते उचित। मातृवचन ऐकून राम संतोषित।
परि भूपासी ते शल्यासम बोचत । वदती न त्यजती अभागी हे प्राण ।। ३
लोक व्याकुळ नरनाथ मूर्च्छित । काय करावे कवणा न सुचत ।
राम मुनिवेष घेऊन त्वरित । निघती जनकजननीस वंदून ।। ४
वनसाहित्य सुसज्ज करून । राम बंधुवनिता सवे घेऊन ।
निघती विप्रगुरु चरणांस वंदून । हरती सकलांचे देहभान ।। ७९
राम वसिष्ठद्वारी येऊन उभे ठाकती । जनांसी विरहाग्निदग्ध देखती ।
सकला प्रियवचने संतोषविती । बोलाविती तदा विप्रवृंदासी ।। १

सांगून गुरूस सकला वर्षासन देती । आदर दान विनय यांनी वश करिती ।
दानमाने याचकांसी संतोषविती । करिती मित्रा प्रसन्न प्रेमे पुनीत ॥ २
मग बोलाविती दासदासीजनांना। वंदून गुरुसी सोपविती तयांना ।
हे स्वामी अता संभाळा सकलांना । रक्षण करा जनकजननी परी ॥ ३
वारंवार करयुगल जोडून । बोलती श्रीराम मृदु वचन ।
तोच करील मम कल्याण । जो राखील सुखी भूपाळासी ॥ ४
अहो परम चतुर नगरजन सज्जन । न होतील माता विरहदुःखे दीन ।
करावा ऐसा तुम्ही प्रयत्न । सकलांनी येउनी एकत्र ॥ ८०
राम करिती सकलांचे सांत्वन । हर्षे गुरुपदकमला वंदन करून ।
गौरीगिरीशगजाननांसी प्रार्थून । आशीर्वाद घेऊन निघाले रघुराज ॥ १
राम निघता सकलांस वाटे विषाद । न ऐकवे तो नगरातील आर्त नाद ।
अयोध्या शोकाकुल अपशकुन लंकेत । हर्षविषादवश देवलोक ॥ २
मूर्च्छा जाताच सावध होती भूपती । बोलावून सुमंता ऐसे सांगती ।
गेला राम वनी परि प्राण न जाती । कवण सुखास्तव राहती देही ॥ ३
याहून कोणती व्यथा बलवान । की त्या दुःखे जी सोडील प्राण ।
नृप वदती पुन्हा धीर धरून । सख्या रे घेऊन रथ जा रामासवें ॥ ४
दोन्ही युवराज देखणे सुंदर । तैसी जनकसुता सीता सुकुमार ।
रथामाजी तयांना सुमंत घाल सत्वर । वन दावून ये चार दिनांनी माघारी ॥ ८१
बंधुद्वय जर माघारी न येत । रघुवर सत्य प्रतिज्ञ दृढव्रत ।
कर तयांना विनंती जोडून हस्त । पाठवा हे प्रभु जनकबाळीसी ॥ १
जंव सीता भयभीत वन पाहून । सांग मम संदेश संधि साधून ।
हे पुत्री वनी क्लेश अति दारुण । फिर माघारी निरोप सासूश्वशुरांचा ॥ २
कधी माहेरी वा कधी सासरी । रुचेल तेथे राहा हे सुकुमारी ।
प्राणासी विसावा मिळेल येता माघारी । ऐसे उपाय करावे अनेकविध ॥ ३
न तो निश्चित अखेर मम मरण । दैव उलटता नसते काही स्वाधीन ।
रामलक्ष्मणसीता मज दाखव आणून । ऐसे वदून राया पडती मूर्च्छित ॥ ४
पदांस वंदून राजाज्ञा घेऊन । अति वेगे रथ सज्ज करून ।
जेथे सीतेसह होते भ्राते दोन । पोचे तेथे सुमंत नगराबाहेर ॥ ८२
तंव ऐकवी नृपाचे वचन सुमंत । विनवी तयां बैसावया रथात ।
उभय बंधु चढती सीतेसह रथात । निघाले हृदयी अयोध्येस वंदून ॥ १

राम जाता अयोध्या अनाथ बघून । रथामागे जाती व्यथित प्रजाजन ।
बहुपरी समजाविती कृपानिधान । वळती परि प्रेमवशे फिरती ॥ २
भासे भयानक अवधपुरी भारी । जणु काळरात्र घन अंधारी ।
घोर जंतुसम दिसती नरनारी । परस्परां निरखिता भयभीत ॥ ३
घर स्मशान आप्तजन भूत । सुतसुहृद भासती यमदूत ।
न देखवे सरितासर भयानक । बागेमाजी कोमेजती तरूवेली ॥ ४
कोटचवधि अश्वगजक्रीडामृग । मोरमैनाचातकचक्रवाक ।
सारसहंसचकोरशुक । कोकिळसारिका धेनुनंदी नगरपशू ॥ ८३
सकल रामवियोगे विकल स्थिर । भासती ठायी ठायी जणु रेखित चित्र ॥
सुफलित घनवन जणु अयोध्यानगर । खगमृग तेथील नरनारी ॥ १
विधीने केले कैकेयीस किरातीण । दशदिशेस ती देई अग्नि पेटवून ।
रामविरहानल न होता सहन । सैरावैरा पळती जन व्यथित ॥ २
सकल ऐसा विचार करिती मनात । रामसीतालक्ष्मणाविना न सुख लाभत ।
विना रघुवीर न काज अयोध्येत । जेंथे राम तेथे नगरजन सकल ॥ ३
निघाले सवे ऐसा निश्चय करून । देवांसी दुर्लभ ऐसे सुखसदन सोडून ।
जयासी असती प्रिय रामाचे चरण । तया वश न करिती विषयभोग ॥ ४
बालकवृद्धांसी टाकून घरी । जाती सकल लोक सवे सत्वरी ।
करिती निवास तमसातीरी । प्रथम दिनी रघुनाथ ॥ ८४
रघुपतीस पाहून प्रजा प्रेमवश । सदय हृदय राम दुःखित विशेष ।
करुणामय रघुनाथ सर्वेश । जाणती परदुःख तात्काळ ॥ १
वदून सुंदर प्रेमळ मृदु वचनास । राम बहुपरी समजाविती जनांस ।
करिती बहुविध धर्म-उपदेश । प्रेमवश जन फिरविता न फिरती ॥ २
न सोडवे ब्रीद वा तोडवे जनप्रेम । ऐसे पेचात सापडती श्रीराम ।
निद्रित जनता श्रमवशे परम । मति मोहित तयांची अल्प देवमायेने ॥ ३
उलटली रात्र दोन प्रहर । तंव राम कथिती हे सुमंत ।
खूण न ठेविता रथ हाक सत्वर । अन्य उपाये काज न साधेल ॥ ४
शंभुचरणी शिर नमवून । रथारूढ जाहले सीतारामलक्ष्मण ।
पथी न कोठे ठेवून खूण । सचिव नेई रथ शीघ्र ॥ ८५
सकल लोक उठती प्रभाती । गेले रघुनाथ म्हणून शोक करिती ।
चिन्ह रथाचे कोठे न देखती । हा राम राम वदून धावती चौदिशेसी ॥ १

जहाज बुडता जलधीत । जैसा वैश्यसमाज अति व्यथित ।
राम सोडती जाणून आम्हा तैसे क्लेश होत । ऐसा उपदेश करिती परस्परा ।। २
आपणास निंदून प्रशंसती मीन । रघुवीरविहीन धिग् जीवन ।
का न विधि देई मृत्यु मागता दीनजन । जर तो रचितो प्रियवियोग ।। ३
ऐसा विलाप करून अती । शोकपूर्ण जन जाती अयोध्येप्रती ।
न वर्णवे ती विरहस्थिती । चौदा वरुषे आशेवरी राखिती प्राणास ।। ४
नगरनरनारी करिती नियमादि व्रत । रामदर्शनास्तव अति उत्सुक ।
जणु चक्रवाकचक्रवाकी कमल हे व्यथित । दिनकराविना अति दीन ।। ८६
बंधुद्वय सीतासचिवासहित । पोचती शृंगवेरपुरीत ।
बघून गंगेस राम घालिती दंडवत । हर्षे उतरून रथांतुनी ।। १
सुमंतसीतालक्ष्मण करिती प्रणाम । सर्वांसह सुखी होती राम ।
गंगा दुःखहारी सुखकारी परम । सकलमोद मांगल्याचे मूळ ।। २
राम विलोकती गंगातरंग । निवेदिती नानाविध कथाप्रसंग ।
गंगेचा महिमा अधिकाधिक । कथिती सचिव अनुज जानकी यांसी ।। ३
गंगास्नानें करिती श्रमपरिहार । मन मुदित प्राशून जळ पवित्र ।
जयाच्या स्मरणमात्रे मिटे संसारभार । त्या रामासी श्रम हा व्यवहार लौकिक ।। ४
शुद्ध सच्चिदानंदमयकंद । प्रभु भानुकुलकेतु अनंत ।
दाविती मानवापरि ऐसे चरित । जे संसारसागरासी सेतुसम ।। ८७
जंव ही कळे वार्ता गुह निषादराजास । मोदे बोलावी प्रिय गणगोतास ।
हृदयी हर्षित जाई रामदर्शनास । घेऊन कंदफळमूळभेट ।। १
भेट अर्पुनी घाली दंडवत । अति प्रेमे राम तया न्याहाळीत ।
सहजस्नेहे विवश रघुनाथ । पुसती कुशल निकट बैसवून ।। २
हे नाथ पदपंकजदर्शने मी कुशल । भाग्यवान जनात मज आज गणतील ।
देवा धरणीधनधाम आपुले सकल । मी नीच सेवक परिवारासह ।। ३
कृपा करून लावा पाय नगरीस । महति वाढवा जेणें धन्यता पावेल दास ।
वदती श्रीराम तू कथिसी सत्यास । हे सुजाण सख्या पितृआज्ञा असे अन्य ।।४
मुनीचा आहारव्रतवेष । चौदा वरुषे ऐसा वनवास ।
नसे उचित मज नगरात निवास । ऐकून वचन निषाद दुःखित ।। ८८
बघून सीतारामलक्ष्मण यांच्या मूर्ती । प्रेमे ग्रामनरनारी वदती ।
जे बालकांसी वनी धाडिती । सखे ऐसे कैसे हे मायबाप ।। १

एक वदे नृप करिती आमुचे कुशल । केला विधीने नेत्रलाभ सुफळ ।
करी मग विचार निषादपति तत्काळ । अशोक तरुतळ असे रमणीय ।। २
रघुनाथासी गुह दाखवी ते स्थान । वदती राम हे सर्वपरी सुशोभन ।
जाती नगरजन वंदन करून । मग संध्यावंदनास निघती रघुवीर ।। ३
मृदुल कोवळी कुशपर्णे घेऊन । गुह करी सुसज्ज सुंदर शयन ।
फळमूळ भरभरून द्रोण । मृदु मधुर पुनीत तो आणी ।। ४
सुमंतसीतालक्ष्मणासहित । श्रीराम भक्षिती फळमूळकंद ।
निद्रिस्त रघुवंशमणि निजानंद । चेपितो पाय बंधु लक्ष्मण ।। ८९
प्रभु निद्रिस्त जाणून लक्ष्मण। शयन करावया सचिवास निवेदून ।
काहीसे दूर सज्ज शरासन करून । राही जागृत भ्राता वीरासनी ।। १
गुह बोलावी विश्वासु रक्षकांस । ठायी ठायी प्रेमे ठेवी तयांस ।
कटी भाता खोवून घेऊन शरचापास । बैसे गुह लक्ष्मणासमीप जाऊन ।। २
कुशशय्येवर बघून प्रभूस । गुह मनी विषाद होऊन प्रेमवश ।
मग प्रेमे वदे लक्ष्मणास । पुलकित तनु ढाळून अश्रूंस ।। ३
सहज सुंदर भूपतीचे भवन । नसे इंद्राचे सदनही तया समान ।
रमणीय चंद्रशाळा रत्नखचित सुवर्ण । जणु रची रतिपति निजहस्ते ।। ४
सुंदर सुभोगमय वस्तूसहित । शुचिसुमनसुवासे सुगंधित ।
मोहक मंचक दीप रत्नजडित । देती सुख आराम सर्वपरी ।। ९०
गाद्यागिरद्या विविध वस्त्रे सुंदर । दुग्धफेनापरि मृदुल शुभ्र ।
तेथे शयन करिती निशी सीतारामचंद्र । निज लावण्ये लाजविती रतिमदना ।। १
आता कुशशय्येवरी विनावसन । श्रमित रामसीता करिती शयन ।
मातापिता नगरवासी आप्तजन । सुहृद सुशील दासदासी ।। २
जपती जयास प्राणापरि ते सकल । आता निद्रिस्त भूवरी तेच राम श्यामल ।
पिता जनक जगा विदित यश उज्वल । श्वशुर दशरथ सुरेशसखा रघुश्रेष्ठ ।। ३
वैदेही जिचे पति रामचंद्र । कोणा न ब्रह्मा प्रतिकूल निद्रिस्त ती भूवर ।
कानना न उचित सीतारघुवीर । कर्मभोग प्रधान सत्य वदती जन ।। ४
कैकयनंदिनी कैकेयी मंदमती । अति कुटिलता दावी ती ।
सुखसमयी जानकीरघुपती । लोटी तयांना दुःखात ।। ९१
जाहली ती कुऱ्हाड भानुकुलवृक्षास । कुमति दुःखित करी अखिल जगास ।
होई अति विषाद निषादास । देखता महीशयन रामसीतेचे ।। १

मग मृदु मधुर वाणी बोले लक्ष्मण । ज्ञानवैराग्यभक्तिरसपूर्ण ।
बंधो कृतकर्म आपुले भोगतो आपण । सुखदुःख न देई कुणी कुणा ।। २
संयोगवियोगभोग इष्टानिष्ट । शत्रुमित्र उदासीन हे भ्रममूलक ।
जन्ममृत्यु भवजंजाळ किती एक । संपत्तिविपत्ति कर्मकाळ ।। ३
धरणीधामधनपरिवार । स्वर्गनरकादि जगव्यवहार ।
बघणे ऐकणे करणे मनी विचार । हे मोहाचे मूळ न परमार्थसाधन ।। ४
नृप होई भिकारी स्वप्नात । वा रंक पावे इंद्राचे पद ।
नसे लाभ वा हानि असता जागृत । तैसा हृदयी जाणावा प्रपंच ।। ९२
चिंतून ऐसे सोडावा रोष । फुका कुणा न द्यावा दोष ।
जन निद्रिस्त होऊन मोहरात्रीस वश । देखति स्वप्ने नानाविध ।। १
असती जगरूपी रात्री योगी जागृत । जो संयमी प्रपंचातून विरक्त ।
जो जीव विषयविलासापासून अलिप्त । तोचि जगी जागृत जाणावा ।। २
विवेक उपजता होई नष्ट भ्रम । तंव राघवचरणी जडते प्रेम ।
कायावाचामने रामपदी स्नेह परम । मानावा हे मित्रा हाच परमार्थ श्रेष्ठ ।। ३
राम ब्रह्म परमार्थरूप । अविद्य अलक्ष अनादि अनूप ।
विकाररहित गतभेद स्वरूप । निरुपती जया नेति नेति नित्य वेद ।। ४
भूमि भक्त भूसुर सुरभिसुर । तयांच्या हितास्तव घेती मनुजअवतार ।
राम दाविती लीला विचित्र अपार । भवजंजाळ मिटे श्रवणमात्रे ।। ९३
मोहाचा त्याग करावा मित्रा ऐसे जाणुनी । व्हावे रत सीतारामचरणी ।
ऐशी उजाडली पहाट रामगुणगानी । तंव जागृत जगमंगलसुखदाता ।। १
प्रातर्विधिस्नान उरकून । मागवती वटक्षीर राम शुचि सुजाण ।
सज्ज अनुजासह शिरी जटा वळून । पाहून नयनाश्रु ढाळी सुमंत ।। २
म्लान वदन अति दाह हृदयात । बोले दीन वचन जोडून हस्त ।
अयोध्यानाथाची मज आज्ञा नाथ । जा रथ घेऊन रामासवे ।। ३
दाखवून वन करवून गंगास्नान । उभय बंधूंस ये त्वरित घेऊन ।
लक्ष्मणरामसीतेसी आण फिरवून । निवारून सकल संशयसंकोच ।। ४
स्वामी ऐसी आज्ञा देती नृपती । जैसे वदाल तैसे करीन रघुपती ।
मग पदी पडून करी विनंती । आक्रोश करून बालकासम ।। ९४
कृपा करून ऐसे करावे तात । जेणे अयोध्या अनाथ न होईल ।
उठवून सुमंतास राम बोध करीत । धर्मसिद्धांत सकल ज्ञात तुम्हा ।। १

शिबिदधिचिहरिश्चंद्रनरेश । धर्मास्तव साहती कोटि क्लेश ।
सुजाण बलिरंतिदेवभूपेश । पाळती धर्म संकटे साहून ।। २
सत्यासम न अन्य धर्म । कथिती ऐसे पुराणनिगमागम ।
तो धर्म मजसी सुलभ सुगम । सोडिता तयास अपयश जगात ।। ३
दुष्कीर्ति येता पदरी संभाविताासी । कोटि मृत्यूसम दुःख तयासी ।
हे तात अधिक काय कथावे तुम्हासी । प्रति-उत्तर करिता जोडेन पाप ।। ४
सांगावे पित्यांचे धरून पद । कोटि दंडवतांसह जोडून हस्त ।
कदापि न चिंता करावी हे तात । हीच विनंति तुम्हाप्रती ।। ९५
पित्यासमान तुम्ही हितकर्ते । विनंति तात कर जोडून तुम्हाते ।
आता तुमचे कर्तव्य इतुके । जेणे न होईल पिता शोके दुःखित ।। १
ऐकून रघुनाथसुमन्त संवाद । परिजनांसह अति व्यथित निषाद ।
मग बोले कटुवाणी लक्ष्मण अनुज । निवारिती प्रभु अनुचित जाणून ।। २
राम निजशपथ घालिती संकोचून । लक्ष्मणाचा संदेश न करावा कथन ।
सीता वनक्लेश न करील सहन । हा भूपसंदेश देती मग सुमन्त ।। ३
जेणे सीता येईल अयोध्येत । रघुवीर करावे तैसे यथोचित ।
मी आता आधाराविण निश्चित । न जगेन जैसा जलविण मीन ।। ४
मायघरी सासरी सर्व सुखे अनुकूल । राहावे तेथे तिने जेथे मना रुचेल ।
जोंवरी विपत्ति बाधा असेल । तोंवरी सुखे राहावे तिने तेथे ।। ९६
नृपाची विनंतीची ही रीती । न वर्णवे ती आर्तता प्रीती ।
कृपानिधान राम संदेश ऐकती । बहुपरी समजाविती सीतेसी ।। १
सासूश्वशुरगुरुपरिवार । तयांचे क्लेश तू जाता होतील दूर ।
म्हणे सीता ऐका हो प्रिय प्राणेश्वर । ऐकून वचन पतीचे ।। २
हे करुणामय प्रभु आपण विवेकपूर्ण । कैसी राहील छाया विलग तनु सोडून ।
कोठे जाईल प्रभा भानूस सोडून । वा चांदणें टाकून चंद्रास ।। ३
ऐसे पतीसी प्रेमे विनवून । मग ती करी सचिवासी मृदु भाषण ।
पिताश्वशुरापरी करिता मम कल्याण । तुम्हा प्रति-उत्तर करणे वाटे अनुचित ।। ४
मी आर्त सन्मुख ठाकले तात । न मानावे मम वचन अनुचित ।
व्यर्थ नाते सकल जगात । आर्यपुत्राच्या पदकमलांवाचून ।। ९७
देखिला मी पित्याचा वैभवविलास । जयाच्या पदी ठेविती निज मुकुट भूपेश ।
मानिते सुखनिधान पितृगृहास । परि पतिविण मन न रमे तेथे ।। १

श्वशुर कोसलराज चक्रवर्ती । चतुर्दश भुवनी प्रताप दाविती ।
जयांचे स्वागत करून सुरपती । बैसविती तयास अर्ध सिंहासनी ।। २
अयोध्यी वास ऐसे वैभवशील श्वशुर । मातेसम सासू प्रिय परिवार ।
परि स्वप्नीही नसे मज सुख क्षणभर । रघुपतिपदपद्मपरागावाचून ।। ३
दुर्गम पथ वनभूमिडोंगर । गजसिंहसरितातळी अपार ।
कोळीकिरात मृगविहंगविहार । प्राणपति संगे भासती सुखद सकल ।। ४
सासूश्वशुर यांच्या चरणी पडुनी । सांगावे तयांना विनंति करुनी ।
न करावी मम चिंता कदापि मनी । मी सुखी सहज वनामाजी ।। ९८
प्राणनाथ प्रिय दीर लक्ष्मण । भाताधनुष्य धरिती वीरधुरीण ।
नसे मज श्रमभ्रमदुःख ते देखून । न करावी मम चिंता चुकूनही ।। १
ऐकती सुमंत सीतेची शीतल वाणी । झाले विकल जणु मणिवाचून फणी ।
नयनांना न दिसे न ऐकू येई कानी । न वदवे तयांना अति शोकाकुल ।। २
राम परोपरी करिती उपदेश । तदपि न होई हृदय शीतल लेश ।
केले यत्न अनेक सचिवे संगे नेण्यास । परि उचित उत्तरे देती रघुनंदन ।। ३
रामाची आज्ञा न उल्लंघवे तयास । कर्मगति गहन नसे ती निजवश ।
वंदून रामसीतालक्ष्मणचरणांस । फिरे वाणिज्यापरी मूळ धन गमावून ।। ४
सुमंत हाकी रथ अश्व न्याहाळती । रामाप्रती देखदेखून खिंकाळती ।
निषादाचे जन दुःखे विव्हळ होती । पस्ताविती मस्तक बडवून ।। ९९
जयाच्या वियोगे पशु होती व्याकुळ । प्रजामातापिता मग कैसे जगतील ।
बळेच सुमंता पाठविती राम श्यामल । मग जाती आपण गंगेच्या तीरी ।। १
मागविती नाव परि केवट न आणी । म्हणे मर्म तुमचे आहे मी जाणुनी ।
वदती सकल जन मानुषकरणी । ऐसी मुळी तुमच्या पदकमलधूळीत ।। २
शिला स्पर्शता जाहली सुंदर स्त्री प्रकट । पाषाणाहून नसे कठिण नौकाकाष्ठ ।
होईल मम नौका मुनिपत्नी त्वरीत । कैसे जगावे मी नौका लुप्त होताच ।। ३
पोषितो मम परिवार या नौकेवर । न जाणतो मी काबाडधंदा अपर ।
जर जाऊ इच्छिता प्रभु पैलतीरावर । पदकमल प्रक्षाळण्यास द्या आज्ञा ।। ४

पदकमलांस । नाथा ते धुवून । नावी चढवीन । नको पैका ।
सांगतो मी रामा । शपथ तुमची । आण भूपतीची । सत्य सत्य ।
मारो तीर बंधु । लक्ष्मण मजसी । जोंवरी पदासी । न प्रक्षाळी ।
तुलसीदासाचे । नाथ हे तोंवरी । पैलतीरावरी । न नेईन ।। १

ऐकून केवटाचे वचन । अति लडिवाळ प्रेमपूर्ण ।
हसले मग करुणानिधान । पाहून जानकीअनुजाप्रती ।। १००
हसून वदले कृपासागर । तव नौका न लुप्त होई ऐसेच कर ।
परतीरगमन आता करावे शीघ्र । जळ आणून वेगे प्रक्षाळ पद ।। १
एकदाच जयाच्या स्मरणमात्रे नर । भवसिंधू उतरून करी पार ।
तोच केवटासी कृपा दावी अपार । जयाच्या त्रिपदाहून विश्व अल्प ।। २
प्रभुपद देखता देवगंगा हर्षित । वचन ऐकता जाहली मति मोहित ।
काष्ठ पात्रातून जळ आणी केवट । मिळताच तया राम-आज्ञा ।। ३
अति आनंदे प्रेमे उचंबळून । करी तो चरणसरोजप्रक्षाळण ।
देव स्तविती सुमनवृष्टि करून । न दुजा पुण्यराशी केवटासम ।। ४
जळे चरणप्रक्षाळण करून । परिवारासहित ते तीर्थोदक प्राशून ।
तत्पुण्ये पितरांसी उद्धारून । नेई प्रभूसी पार मुदित मने ।। १०१
सीताराम गुहलक्ष्मणासहित । उभे ठाकले गंगेच्या वाळवंटात ।
केवट उतरून घाली दंडवत । न दिधले काही तया प्रभूस संकोच ।। १
सीता पतीचे हृदय जाणून । मुदित मने रत्नमुद्रिका ठेवी काढून ।
घे काजाचे मोल म्हणती कृपाघन । केवट व्याकूळ होऊन चरण धरी ।। २
काय न आज मिळाले मज नाथ । दोषदुःखदारिद्र्य सकल नष्ट होत ।
केले मी कष्टमजुरी काळ बहुत । विपुल बिदागी विधाता आज देई ।। ३
आता न काही इच्छा नाथा मजला । तुमच्या कृपाप्रसादे दीनदयाळा ।
परतुनी येताना जे द्याल कृपाळा । प्रसाद मानून तो धरीन शिरी ।। ४
प्रभुसीतालक्ष्मण तयास कथिती बहुत । परि नाविक काही न घेऊ इच्छित ।
करुणाघन विमल भक्तिवरदान देत । मग घेती निरोप तयाचा ।। १०२
मग रघुकुलनाथ स्नान करून । पूजिती पार्थिव लिंगास शिर नमवून ।
सीता गंगामातेस प्रार्थी कर जोडून । हे गंगामाते मम मनोरथ पुरवावे ।। १
पतिदीरासवे माघारी येता कुशलपूर्ण ! हे माई तदा तव पूजा करीन ।
प्रेमरसपूरित सीतेची विनंति ऐकून । विमल वारीतून तंव निघे श्रेष्ठ वाणी ।। २
हे रघुवीरप्रिया वैदेही ऐक । तव प्रभाव जगी कुणा न विदित ।
कृपादृष्टीने होतील लोकपाल लोक । कर जोडून सेवितील सकल सिद्धी ।। ३
तू मजसी बहुत विनवून । महत्त्व दिधले कृपा दावून ।
तदपि मी देवी तुज आशीर्वाद देईन । निज वाणी सफल होण्यास्तव ।। ४

प्राणनाथ दीरासहित कुशल । कोसलपुरीस तू येशील ।
तव मन:कामना पूर्ण होतील । सुयश पसरेल जगात ।। १०३
ऐकून मंगलमय गंगेच्या वचनास । अनुकूल पाहून हर्ष सीतेस ।
जा मग प्रभु सांगती गृही गुहास । ऐकता मुख शुष्क उरी दाह तया ।। १
बोले गुह दीन वचन जोडून पाणी । ऐका मम विनंति हे रघुकुलमणी ।
पथ दावीन नाथा सवे राहुनी । करीन चरणाची सेवा चार दिन ।। २
रघुराज राहाल जेथे वनात । पर्णकुटी उभारीन सुंदर तेथे नाथ ।
हे रघुवीर सांगतो घेऊन शपथ । जैसी आज्ञा मिळेल तैसे करीन ।। ३
राम बघून स्नेहास सहज । गुहास नेती संगे तया हृदयी आनंद ।
मग बोलावी ज्ञातीजनास निषाद । संतोषवून तयांना देई निरोप ।। ४
गणपतीशिव यांचे स्मरण करून । गंगामाईसी मस्तक नमवून ।
घेऊन संगे सखासीतालक्ष्मण । रघुनाथ करिती वनगमन ।। १०४
ते दिनी केला तरुतळी वास । लक्ष्मणगुह तत्पर सेवेस ।
प्रभाती उरकून प्रात:कर्मास । तीर्थराजाचे दर्शन घेती प्रभू ।। १
तेथे सत्य सचिव श्रद्धा प्रियनारी । वेणीमाधवासम मित्र हितकारी ।
भांडार जयाचे धर्मादि अर्थ चारी । तो पुण्यवान प्रांत नृपाचा देश चारू ।। २
दृढ दुर्गम गड हे प्रयाग क्षेत्र । स्वप्नीही प्रतिपक्षासी जाई न हार ।
सकल तीर्थ तयाचे श्रेष्ठ वीर । पापसेनानिर्दालनी रणधीर महा ।। ३
त्रिवेणीसंगम सिंहासन शोभिवंत । छत्र अक्षयवट करी मुनीमन मोहित ।
गंगायमुनातरंग चामर विलसत । दर्शने जयाच्या भंगे दु:खदारिद्र्य ।। ४
पुण्यात्मे पवित्र साधु सेवा करिती । तयांच्या मनोकामना सफल होती ।
वेदपुराण विमल गुण गाती । होऊन जयाचे बंदीजन ।। १०५
प्रयागराज वैभव वर्णवे कवणास । ते मृगराजापरी पापपुंजकुंजरास ।
यापरी पाहून सुंदर तीर्थपतीस । सुख पावती सुखसागर रघुवीर ।। १
तीर्थराजमहिमा निज श्रीमुखाने । कथिला सीतालक्ष्मणगुह यांसी रामाने ।
ऐसा प्रभाव वदून अति प्रेमाने । करिती प्रणाम बघून वनबाग ।। २
यापरी मार्गी त्रिवेणीदर्शन घेती । स्मरणमात्रे सुमंगलता देई ती ।
राम हर्षे स्नानशिवपूजन करिती । यथाविधि पूजिती तीर्थदेव ।। ३
मग प्रभु भारद्वाजाप्रति येती । दंडवत घालता मुनि हृदयी धरिती ।
जणू ते ब्रह्मानंदराशी पावती । तो मुनिमनांतील मोद न वर्णवे ।। ४

तंव देती मुनीश आशीर्वाद । हे जाणून भरे हृदयी अत्यानंद ।
की विधाता लोचनासी गोचर करीत । संपूर्ण पुण्याचे सकल फळ ॥ १०६
कुशल प्रश्न करून देती आसन । संतोषविती प्रेमे पुजून ।
मुनि अमृतमय देती आणून । सुंदर अंकुरकंदमूळफळ ॥ १
सीतालक्ष्मणगुहासहित रुचिर । फळमूळ भक्षिती राम अति सुंदर ।
श्रमपरिहार होता रामासी सुख फार । तंव भारद्वाज वदती मृदु वचन ॥ २
आले आज सुफळास तपतीर्थत्याग । आज सुफळ जाहले जपवैराग्ययोग ।
सकल शुभ साधन सुफलित । अवलोकिता आज तुम्हा रामा ॥ ३
लाभसीमा सुखसीमा न उरली । दर्शने तुमच्या आशा पूर्ण जाहली ।
सहज भक्ति राहो निज पदकमली । आता कृपा करून द्यावा वर हाच ॥ ४
कायावाचामने जोंवरी न सोडी कपट । तोवरी मनुज न होई तुमचा भक्त ।
तया न मिळे सुख स्वप्नीही निश्चित । करून कोटि उपायही ॥ १०७
मुनीचे वचन ऐकून श्रीराम संकोचती । परि आनंदे तृप्त बघून भावभक्ती ।
तंव मुनीचे सुयश रघुवीर कथिती । प्रशंसुनी कोटि प्रकारांनी ॥ १
मुनीश तुम्ही जयासी दावाल आदर । तों जाणावा सकल उच्च गुणांचे भांडार ।
ऐसे विनम्र मुनि रघुवीर परस्पर । अनुभवती सुख अवर्णनीय ॥ २
ऐकून वार्ता प्रयागातील निवासी । बटुतापसमुनि सिद्धसंन्यासी ।
सकल दशरथपुत्रांचे दर्शनासी । लोटती भारद्वाज मुनींच्या आश्रमी ॥ ३
राम करिती सकलांना नमन । लोचनांसी लाभ मिळता हर्षित जन ।
आशीर्वाद देती परमसुख पावून । सौंदर्या स्तवून जाती माघारी ॥ ४
निशी विश्राम करिती रघुनंदन । प्रातःसमयी प्रयागस्नान ।
मुदितमने मुनीसी वंदून । निघाले सीतालक्ष्मणगुहासह ॥ १०८
वदती राम मुनीस प्रेमाने । सांगा नाथ जावे कवण मार्गाने ।
कथिले हसून मनी मुनीने । मार्ग सकल सुगम तुम्हासी ॥ १
संगे जाण्यास्तव बोलाविती शिष्यांस मुनी । येती अर्धशत मुदित मने ऐकुनी ।
अपार प्रेम सकलांचे रामचरणी । वदती ते पथ असे आम्हा विदित ॥ २
जन्मजन्मांतरी जोडिले पुण्य जयांनी । ऐसे बटु चार सवे दिले मुनींनी ।
ऋषीस वंदून आज्ञा घेउनी । प्रसन्न मने निघाले रघुराज ॥ ३
जंव ग्रामानिकट येऊन निघती । तंव दर्शनासी नरनारी धावती ।
जन्मसाफल्य पावून सनाथ होती । वळती दुःखे रामासंगे पाठवून मन ॥ ४

विनवून वटूंस राम निरोप देती । बटु जाती पावून अनन्य भक्ती ।
यमुनाजळी उतरून स्नान करिती । जे जळ श्याम रामतनूसम ।। १०९
तीरवासी नरनारी वार्ता ऐकून । धावत येती निज काज विसरून ।
सुंदर सीतारामलक्ष्मण बघून । प्रशंसती निज महाभाग्य ।। १
जाणावे नावगाव ही लालसा मनात । परि पुसण्यासी मनी संकोचित ।
असती सुजाण वयोवृद्ध तयांत । जाणती युक्तीने रामासी ।। २
ऐकविती कथा ते सकलांना । पित्राज्ञा मानून जाती वना ।
ऐकून होई विषाद तयांना । वदती अनुचित कृति नृपराज्ञीची ।। ३
आला ते समयी एक तापस । वय लघु तेजःपुंजाची रास ।
कवि तयाची न जाणे गति-बैरागीवेष । कायावाचामने प्रेम रामी ।। ४
निज इष्ट देवतेस जाणताच । तयाचे सजल नयन तनु रोमांचित ।
धरणीवर पडून घाली दंडवत । दशा तयाची न वर्णवे ।। ११०
हृदयी तया धरिती राम प्रेमे पुलकित । जणु परम रंकासी परीस पावत ।
वदती कोणी हे मूर्तिमंत । तनुधारी प्रेम परमार्थ ।। १
मग धरिले लक्ष्मणाचे चरण । प्रेमे तयाने उठविले धरून ।
सीतेची पदधूळ केली शिरी धारण । शिशु जाणून माता आशीर्वाद देई ।। २
निषाद मग घाली तयास दंडवत । रामस्नेही मानून भेटे प्रेमे मुदित ।
भोजन मिळताच अति आनंदित क्षुधित । तैसा हर्षित सौन्दर्यसुधा पिऊन ।। ३
व्यथित नरनारी स्नेहे साचे । न्याहाळिती रूप रामलक्ष्मणसीतेचे ।
वदती वनी धाडती बालकांते । सखे सांग गडे हे मातापिता कैसे ।। ४
मग रघुवीर करिती सख्या गुहास । अनेकविध बोध विशेष ।
जाई परतोनी गुह गृहास । रामाची आज्ञा शिरी धरून ।। १११
सीतारामलक्ष्मण कर जोडून । वारंवार करिती यमुनेसी नमन ।
रवितनयेचा महिमा गाऊन । जाती भ्राते उभय सीतेसह ।। १
अनेक पथिक भेटती मार्गात । बंधुयुगलांसी प्रेमे कथित ।
सर्वांगी तुमच्या राजचिन्हे विलसत । पाहून हृदयी दुःख आम्हांसी ।। २
आक्रमता मार्ग पायांनी अनवाणी । वाटे ज्योतिषशास्त्र असत्य मनी ।
बिकट वाट अति गिरी काननी । तशात संगे सुकुमारी नारी ।। ३

न बघवे वन करिकेसरीयुक्त । येऊ सवे आज्ञा मिळताच ।
जाऊ माघारी नमवून मस्तक । पोचवू जेथवर जाल तेथे ।। ४
यापरी प्रेमवशे पुसती पथिक । साश्रु नयने गात्रे पुलकित ।
वदून विनययुक्त मृदु वचन । कृपासिंधु फिरविती तयांना माघारी ।। ११२
जे जे गाव नगर असे पथात । तया नागसुरांची नगरी इर्ष्ये स्तवीत ।
वदती कोण पुण्यात्मा वसवीत । ऐसी धन्य पुण्यमय परम नगरी ।। १
जेथे जेथे जाती चालत रामचरण । न भासे इंद्रनगरीही तयासमान ।
निकट वसती जे पथी तेही पुण्यवान । स्वर्गीय देव देवता स्तविती तया ।। २
नयनभरे विलोकिती जे रामास । सीतालक्ष्मणासह त्या घनश्यामास ।
राम ज्या सरितातळी करिती स्नानास । देवसरोवरसरिता प्रशंसती तया ।। ३
ज्या तरुतळाशी प्रभु बैसती । कल्पतरुही गाई तयाची महती ।
राम पदपद्मपरागे भूमि स्पर्शती । अति भाग्यवान भूमि मानी तिज ।। ४
छाया धरिती पथी गगनघन । वर्षती समुने विबुधगण ।
बघती मृगविहंगगिरीकानन । जाताना पथावरून श्रीराम ।। ११३
रघुनाथासह लक्ष्मणसीता । गावासमीप जात असता ।
ऐकून बालवृद्ध नरनारी ती वार्ता। जाती त्वरित बघाया टाकून गृहकाज ।। १
रामलक्ष्मणसीता यांचे रूप बघून । नयनसाफल्य पावून होती प्रसन्न ।
पुलकित तनु साश्रु विलोचन । होती प्रेममग्न बघून दोन्ही वीरांस ।। २
न करवे तयांच्या दशेचे वर्णन । जणु रंकासी मिळे चिंतामणिनिधान ।
परस्परांस बोलावून देती शिकवण । याच क्षणी करून घ्या लोचनलाभ ।। ३
रामासी बघता प्रेमाधीन होती । निरखून तयांच्या संगे जाती ।
कुणी नेत्रमार्गे हृदयी लावण्य आणिती । कायावाचामने शिथील होती ।। ४
कोणी शोधिती वटछाया सुंदर घन । करिती आसन घालून मृदु तृण पर्ण ।
म्हणती क्षणभर करून श्रमहरण । जावे अल्प वेळाने वा प्रभाती रुचल्यास ।। ११४
कुणी आणी कलश भरून पाणी । घ्या नाथा आचमन वदती मृदु वाणी ।
तयांचे प्रिय वचन ऐकून प्रीति पाहुनी । विशेष सुशील कृपाळु रामचंद्र ।। १
क्षण एक विसावा तरूच्या तळी घेती । जाणून मनी सीता श्रमित अती ।
मुदित नरनारी लावण्य शोभा बघती । अनूप रूपावर मननयन लुब्ध ।। २
टक लावून बघता शोभती जन चौफेर । रामचंद्र मुखचंद्रासी जनचकोर ।
सुशोभन तरुण तमाल शरीर । पाहून मोहित कोटि मदनमन ।। ३

अति सुंदर दामिनिवर्ण लक्ष्मण । नखशिखांत लावण्य मन करी प्रसन्न ।
कसलेले कटीं भाते नेसून मुनिवसन । करकमलांत शोभे शरचाप ।। ४
जटा मुकुट शिरी छाती भरदार । आजानु बाहु विशाल नेत्र ।
धर्मबिंदु पटल झळके जयावर । शरदशशिसम मुख मनोहर शोभे ।। ११५
न वर्णवे ती जोडी मनोहर । मम मति अल्प शोभा अपार ।
मनमतिचित्त जन करून एकत्र । बघती रामलक्ष्मण सीता यांचे सौंदर्य ।। १
प्रेम तृषार्त नरनारी ऐसे स्तिमित । जैसी मृगमृगी दीपास बघून स्तंभित ।
सीतासमीप ग्रामस्त्रिया जात । परि प्रेमे संकोचती पुसण्यास ।। २
वारंवार तिचे पद धरती । मृदु सरल वचन वदती ।
हे राजकुमारी तुज करीत विनंती । परि स्त्री स्वभावे पुसण्यास भय वाटे ।। ३
धीटपणा दावितो करावी क्षमा स्वामिनी । रोष न धरावा ग्रामीण जाणुनी ।
उभय कुमार लावण्ये दिसती शोभूनी । तयांची द्युति लाभे सुवर्णनील यांसी ।। ४
श्यामल गौर मनोहर किशोर । असती सुंदरता सुषमेचे आगर ।
शरदसरोजापरी तयांचे नयन सुंदर । शरदचंद्रमापरी आनन ।। ११६
लाजविणारे कोटिमनोजांसी । सुमुखी कोण हे सांग आम्हांसी ।
ऐकून स्नेहमय मंजुळ वाणीसी । संकोचून सीता मनी हासे ।। १
विलोकून कुमारांस विलोकी धरणी । उभय पेचाने संकोचे ती वरवर्णी ।
बालमृगनयना सप्रेम संकोचुनी । कोकिलेसम बोले मधुर वचन ।। २
तनुकांति सहज सुंदर गौर । नामे लक्ष्मण मम लघु दीर ।
मग पदर ओढून झाकी मुखचंद्र । बघे वक्र भृकुटि करून प्रियकरासी ।। ३
खंजन खगापरि नेत्रकटाक्ष मधुर । तो फेकून दावी निज पति सुंदर ।
जणु रंकासी मिळे संपत्तिभांडार । तैशा मुदित सकल ग्रामवधू ।। ४
धरून प्रेमे सीतेच्या पदास । देती तिज नानाविध आशीर्वाद ।
जोवरी शेष शिरी महीस धरीत । तोवरी अखंड सौभाग्य भोगावे ।। ११७
पार्वतीसम व्हावे प्रिय पतीस । न्यूनता प्रेमात नसावी लवलेश ।
विनवितो वारंवार जोडून करांस । देवी यावे माघारी याच मार्गे ।। १
दासी जाणून द्यावे दर्शन । सीता सकलांस प्रेमतृषार्त बघून ।
संतृप्त करी मधुर बोलून । जणु पुष्ट करी कौमुदी कुमुदिनीस ।। २
रघुवीराचा रोख पाहून लक्ष्मण । पुसे मार्ग लोकांस मृदु बोलून ।
नरनारी दुःखित ते ऐकून । गात्रे पुलकित पाणावती नेत्र ।। ३

मावळला मोद जाहले उदास मन । विधाता देई निधी परि नेई हिरावून ।
धीर धरिती कर्मगति मानून । सुगम मार्ग हेरून निवेदिती ।। ४
तंव लक्ष्मण जानकीससहित । गमन करिती रघुनाथ ।
परि सवे घेऊन तयांचे चित्त । प्रिय वचनें सकला परतवती ।। ११८
दु:खित नरनारी माघारी फिरती । मनामाजी दोष दैवास देती ।
परस्पर निषादासह वदती । विधीची लीला विपरीत सर्व परी ।। १
विधि निपट निरंकुश निष्ठुर नि:शंक । केले शशीस क्षयी सकलंक ।
कल्पतरूस वृक्ष सागरास क्षारयुत । तोचि वनी धाडी राजकुमारांस ।। २
जर या कुमारांस दिधला वनवास । का मग विधीने निर्मिले भोगविलास ।
का विधि घडवी नाना वाहनांस । जर हे विचरती पादत्राण विना ।। ३
कुशपर्ण टाकून पडती हे भूमीवर । का विधात्याने निर्मिली शय्या सुंदर ।
विधि देई वास यांस तरुतळी जर । का शिणला रचून स्फटिक महालास ।। ४
हे अति सुंदर सुकुमार । जटा बांधून नेसती मुनिवस्त्र ।
विविध वसन अलंकार । व्यर्थ विधीने निर्मियेले ।। ११९
कंदमूळफळ जर हे भक्षिती । जगी व्यर्थ खाद्यपदार्थ सुधादी ।
हे सहज सुंदर कोणी वदती । विधाता न घडवी प्रकटती स्वये ।। १
विधिसृष्टिवर्णन जितुके आले वेदात । श्रवणें नयनें जे मनास होई प्रतीत ।
तितुके शोधता चतुर्दश भवनांत । ऐसा पुरुष ऐसी नारी आहे कोठे का ।। २
यांसी बघता विधात्याचे मन अनुरक्त । घडवू लागे नरनारी उपमेउचित ।
साधेना जरी केले श्रम वहुत । म्हणून ईर्ष्ये वनी लपवी तया ।। ३
एक म्हणे आम्ही न जाणत विशेष । परी दर्शने धन्य मानितो आम्हास ।
ते दिसले दिसती दिसतील जयांस । लेखितो आम्ही तयास पुण्यवान ।। ४
या परि प्रेमे वारंवार वदून वचन । अश्रु ओघळती तयांच्या नयनांतून ।
कैसा आक्रमतील मार्ग अति कठिण । तनु तयांची कोमल सुकुमार ।। १२०
स्त्रिया स्नेहवशे होती दु:खित । जैसी सांज समयी चकोरी व्यथित ।
दुर्गम मार्ग मृदु कमळासम पद । गहिवरून हृदये वदती वरवाणी ।। १
मृदुल अरूण चरण महीस स्पर्शत । आमुच्या हृदयासम मही संकोचत ।
जर जगदीशे धाडिले तयां वनात । का न केला मार्ग सुमनमय ।। २
गडे सखे मागणे ब्रह्मा पुरवील जर । साठवावे तयांना विधीने नयनी तर ।
या समयी न आले जे नारीनर । ते सीतारामासी न बघतील ।। ३

सुंदररूप ऐकून पुसती ते व्याकुळ। बांधवहो कोठवर ते गेले असतील।
धावून घेती दर्शन समर्थ प्रबळ। फिरती मोदे जन्मसफलता पावून॥ ४
अबलाबालकवृद्धजन। पस्तावा करिती हात चोळून।
जेथे जेथे राम करिती गमन। होती जन तेथे तेथे प्रेमवश॥ १२१
गावोगावी सकल आनंदे प्रसन्न। भानुकुलकमलचंद्र बघून।
जन काही समाचार ऐकून। लाविती दोष नृपराज्ञीस॥ १
नृप अति भले कोणी वदती। आम्हांसी ऐसा नयनलाभ देती।
नरनारी यापरी परस्पर करिती। वार्ता सुंदर सरळ स्नेहमय॥ २
धन्य ते मातापिता जे जन्मा घालिती। धन्य ते नगर जेथून ते येती।
धन्य ते स्थान जेथे ते जाती। धन्य ऐसा देश शैल ग्राम वन॥ ३
जयांचे राम स्नेही असती। तयांना निर्मून विरंची सुख पावती।
कथा पथकानन व्यापिती। रामलक्ष्मण सुंदर पथिकांच्या॥ ४
यापरी जनांसी मार्गी सुखवीत। रघुकुलकमलरवि वन देखत।
सीतासौमित्रासमवेत। विपिन बघून आक्रमती मार्ग॥ १२२
राम पुढती पाठीशी लक्ष्मण। तापस वेषात दिसती प्रसन्न।
उभयांमध्ये सीता दिसते शोभून। जैसी माया ब्रह्मजीवांत॥ १
पुन्हा कथितो जैसे लावण्य वसे मनात। जणु मधुमदनामध्ये रति विलसत।
अन्य उपमा कथितो शोधून हृदयात। जणु विराजे रोहिणी बुधशशींमध्ये॥ २
पथी प्रभूच्या चरणचिन्हांमधून। सीता सभीत चाले पद ठेवून।
सीताराम यांचे पद चिन्ह राखून। उजवी धरून लक्ष्मण आक्रमी मार्ग॥ ३
रामलक्ष्मणसीता यांची प्रीति सुंदर। न करवे वर्णन ती वचनास अगोचर।
खगमृग तल्लीन पाहून रूप अपार। चित्त चोरती तयांचे पथिकरूप राम॥ ४
जयांनी देखिले हे प्रिय पथिक। उभय भ्राते सीतेसमवेत।
विनासायास ते तरून जात। आनंदे दुर्गम भवमार्ग॥ १२३
आजही जयाच्या हृदयी वा स्वप्नात। जर वसतील सीतारामलक्ष्मण पथिक।
तो रामधामाचा पथ पावेल निश्चित। जो पथ पावे कुणी विरळा मुनी॥ १
तंव सीता श्रमित जाणती रघुपती। जळ शीतल वटासमीप देखती।
कंदमूळ फळ खाऊन तेथे राहती। स्नान करून प्रभाती निघती श्रीराम॥ २
पाहून रम्यवनसरोवरशैलांस। प्रभु येती वाल्मीकिआश्रमास।
बघती रमणीय मुनिवास। जेथे सुंदर गिरिकानन पवनजल॥ ३

सरोवरी सरोज वनी वृक्ष फूल। गुंजती मधुमत्त मधुप मंजुळ।
करिती खगमृग कोलाहल विपुल। विचरती मुदित मने वैररहित ।। ४
पवित्र सुंदर आश्रम निरखून। हर्षित अति राम राजीवनयन।
ऐकून रघुवीरांचे आगमन। सरसाविती मुनि पुढे स्वागतासी ।। १२४
राम घालितो मुनीस दंडवत। विप्रवर तदा देती आशीर्वाद।
रामाचे लावण्य बघून नेत्र शांत। मग सन्मानून आणती आश्रमी तया ।। १
पावताच प्राणप्रिय अतिथि मुनिवर। मागविती कंदमूळफळ मधुर।
भक्षिती फळ सीतीरामसौमित्र। तंव देती मुनि सुंदर विश्रामधाम ।। २
आनंदे उचंबळे वाल्मीकींचे मन। मंगल मूर्तीसी विलोकती नयन।
तंव रघुराज करकमल जोडून। बोलती वचन सुखद श्रवणास ।। ३
तुम्ही त्रिकाळज्ञानी हे मुनिनाथ। विश्व करी तुमच्या अमलकवत्।
ऐसे वदून प्रभु कथिती वृत्तांत। ज्या रीतीने दिधला वनवास कैकयीने ।। ४
हे तात पितृवचन तैसेच मातृहित। भरतासम बंधूस राज्याभिषेक।
प्रभो तुमचा दर्शनलाभ भेट। मम पुण्याचा प्रभाव हा सकल ।। १२५
हे मुनिवर बघून आपले पदकमल। जाहले मम सुकृत सकल सुफळ।
आता जैसी मुनींची आज्ञा होईल। न पावतील दुःख कुणी मुनी ।। १
जे देतील दुःख मुनि तापसांस। विना अग्नि होतील भस्म ते नरेश।
मंगलमूळ असे विप्रांचा परितोष। विप्ररोष दाहक कुलांसी कोटी ।। २
चिंतून मनी ऐसे सांगावे स्थान। तेथे सीतासौमित्रासह करू गमन।
पर्णतृणकुटी रूचिर तेथे उभारून। कृपाळा करू वास तेथे काही काळ ।। ३
ऐकून रघुवरवाणी सरळ सहज। धन्य धन्य वदती मुनि ज्ञानवंत।
तुम्ही संतत वेदमर्यादेचे पालक। रघुकुल केतु का न ऐसे वदाल ।। ४

राम जगदीश। वेदांचे रक्षक। स्मृतीची पालक। माया सीता।
पाळून संहारी। निर्मून जगासी। जाणून रोखासी। श्रीरामाच्या।
महीधर शेष। जाणा तो लक्ष्मण। विश्वाचे पालन। करी सदा।
सुरकाजा घेत। नृपती शरीर। खल निशाचर। वधास्तव ।। १

तुमचे स्वरूप वाणीसी अगोचर। रामा ते बुद्धिपर अव्यक्त अपार।
निगमागम तयासी वर्णिती निरंतर। नेति नेति म्हणोनी ।। १२६

विश्व दृश्य रामा तुम्ही द्रष्टे तयाचे । नाचविता ब्रह्माविष्णूशंभूस साचे ।
जंव तेहि न जाणती मर्म तुमचे । तंव अन्य कोण तुम्हासी जाणेल ।। १
तोची जाणेल जयासी जाणवून द्याल । तुम्हांस जाणतांच तुमचे स्वरूप पावेल
हे रघुनंदन भक्त तुम्हांस जाणतील । हे भक्त-उरचंदन तुमच्याच कृपे ।। २
चिदानंदमय देह विगत विकार । जाणती हे जयास परमार्थ अधिकार ।
घेता संतसुरकाजा तुम्ही नरावतार । परि प्राकृत नरापरि कृतिवचन ।। ३
रामा चरित्र तुमचे पाहून ऐकून । जडजीव मोहवश सुखावती बुधजन ।
कृतिवचन सकल तुमचे उचित । सोंगाउचित नटास नाचणे योग्य ।। ४
कोठे राहावे पुसता मजसी । परि वाटे मज संकोच पुसण्यासी ।
न कोठे वसता दाखवा त्या स्थानासी । मग दावीन स्थळ तुम्हा राहावया ।। १२७
प्रेमरसपूर्ण मुनीचे वचन ऐकून । हसती राम मनी संकोचून ।
मग वाल्मीकि वदती हास्य करून । वाणी मधुर अमृतमय ।। १
रामा आता ऐका कथितो निकेत । निवासास्तव सीतासौमित्रासमवेत ।
जयांच्या सागरासमान श्रवणांत । तुमच्या नाना सुभग सरिता कथारूपी ।। २
राहती साठून सदा परि न होती तृप्त । तयांचे हृदय तुम्हांस गृह उचित ।
जयांनी केले निज लोचनासी चातक । जे सदा वांछिती दर्शनरूपी जलधर ।। ३
तथा जे महासरितासरसिंधूस निंदिती । परि तव रूपमेघ बिंदुजळे सुखावती ।
राहावे बंधुसीतासह हे रघुपती । तयांच्या सुखद हृदयसदनी । ४
तुमच्या विमल यशाच्या मानससरात । जयांची जिव्हा हंसिनि होऊन वेचत ।
तुमचे गुण समूहरूपी मौक्तिक । राहावे तयांच्या हृदयात हे रामा ।। १२८
सुंदर सुगंधित पवित्र प्रसाद । आदरे जयांची नासिका ग्रहण करीत ।
जे नैवेद्य अर्पून भोजन सेवीत । प्रसाद जणू वस्त्रभूषण करिती धारण ।। १
देवगुरुद्विजांसी बघून मस्तक । नमविती जे विनय प्रीतिसहित ।
जे करिती निज हस्ते रामपूजा नित । जयांच्या हृदयी रामनिष्ठा न दुजे काही ।। २
जे जाती चालत पदी रामतीर्थास । हे राम तयांच्या मनी करावा वास ।
जे जपती नित्य राम या मंत्रराजास । पूजिती तुम्हा परिवारासह ।। ३
करिती नानाविध तर्पण हवन । विप्रास भोजन घालून देती दान ।
मनी मानिती गुरूस अधिक तुम्हाहून । सन्मानून तयासी भजती सर्वभावे ।। ४
आचरून ही कर्मे सकल । वांछिती रामपदी प्रीति एकच फळ ।
राहा तयांच्या मनोमंदिरी निर्मल । रघुनंदन सीतेसह उभय तुम्ही ।। १२९

जया न काम क्रोध मद मान लोभ । न मोह द्रोह रोष वा क्षोभ ।
जया न माया कपट वा दंभ । तयांच्या वसावे हृदयी रघुराया ।। १
जे सकलांसी प्रिय सकला हितकारक । जे स्तुतिनिंदासुखदु:ख समान लेखत ।
सत्य प्रिय वचन विचारे वदत । जे जागृत स्वप्नी तुम्हां शरण ।। २
तुम्हाविण न अन्य गति जयांस । रामा तयांचे मनी करावा वास ।
जे जननीसम मानिती परनारीस । परधन जयास विषाहून तीव्र विष ।। ३
परसंपत्ती पाहून जे होती हर्षित । पर विपत्तीनें विशेष दु:खित ।
रामा तुम्ही प्राणाहुन प्रिय जयां अधिक । तयांचे मन शुभसदन तुमचे ।। ४
तात जयांचे तुम्ही स्वामीमातापिता । तुम्हीच गुरुसखा सकल रघुनाथा ।
उभय भ्राते तुम्ही सवे सीता । तयांच्या मनोमंदिरी वास करा ।। १३०
अवगुण त्यजून जे गुण स्वीकारिती । विप्रधेनुस्तव संकटे साहती ।
नीतिनिपुणतेत जे श्रेष्ठ जगती । तयांचे सुंदर मन घर तुमचे ।। १
गुण तितुके तुमचे आमुचे ते दोष । मानून ठेविती तुम्हावरी पूर्ण विश्वास ।
वाटती रामभक्त प्रिय जयास । तयांच्या हृदयी वसावे वैदेहीसह ।। २
धन धर्म सन्मान जात पात । प्रिय परिवार सदन सुखद ।
सकल त्यजून ठेविती तुम्हां हृदयांत । करावा तयांचे हृदयी वास रघुराया ।। ३
स्वर्ग नरक मोक्ष समान जयास । जो सर्वत्र देखे धनुर्धारी मूर्तीस ।
जो कायावाचा मने तुमचा दास । हृदयी तयाच्या निवास करा ।। ४
जो कदापि काहीही न वांछीत । परि जयाचा तुम्हावरी स्नेह सतत ।
करा निरंतर वास तयांच्या मनात । मानून तेची निज गेह ।। १३१
या परि भवने मुनिवर वर्णिती । रुचले राममना ते वचन प्रिय अती ।
हे भानुकुलनायक ऐका मुनि वदती । कथितो सुखद आश्रम या समयी ।। १
करावा निवास गिरी चित्रकूट । सुखसोयी असती तेथे समस्त ।
कानन सुंदर शैल सुशोभित । गजकेसरी खगमृग यांचे विहारस्थळ ।। २
नदी तेथे पुनीत पुराणविदित । अनसूया निज तपोबले आणीत ।
गंगाधारा नामे मंदाकिनी ज्ञात । ती पातकरूपी बालकासी डाकीण ।। ३
अत्रि-आदि मुनिवर करिती निवास । योग तपोबले कष्टविती तनूस ।
करावे तयांच्या सफल परिश्रमास । रामा करावा गौरव गिरिवराचा ।। ४
चित्रकूट महिमा अपरिमित । महामुनि वर्णून कथिताता ।
मग येऊन उभय भ्राते सीतेसहित । करिती स्नान मंदाकिनीत पवित्र ।। १३२

वदती राम लक्ष्मणा बघ हा सुंदर घाट । आता करावा एथे वसतीस्तव थाट ।
देखे उत्तरेस लक्ष्मण नदीतट । वाहे निर्झर धनुसम तयाच्या चौदिशी ।। १
नदी दोरी शम दम दान बाण । कलीतील सकल पातक सावज भिन्न ।
चित्रकूट शिकारी जणु करी शरसंधान । मारी समोरून अचल न चुके नेम ।। २
ऐसे वदून लक्ष्मण दावी स्थान । रघुवीर सुखी होती ते विलोकून ।
जाणती सुर एथे रमले रामाचे मन । तंव निघती विश्वकर्म्यासह सुर ।। ३
किरातवेषे आले सुर । रचती तृणपर्ण सदने सुंदर ।
न वर्णवे त्या कुटि दोन रुचिर । एक ललित लघु विशाल दुजी ।। ४
प्रभु लक्ष्मण जानकीसहित । विराजती रूचिर तृणपर्ण कुटीत ।
जणु मदन मुनिवेषे शोभत । रति ऋतुराज वसंतासह ।। १३३
दिक्पाल नाग किन्नर सुर । आले ते समयी चित्रकूटावर ।
सर्वां प्रणाम करिती रामचंद्र । लोचन साफल्य पावून सुर मुदित ।। १
वर्षून सुमने देवगण वदत । नाथ जाहलो आम्ही आज सनाथ ।
विनंति करून दुःसह दुःख निवेदीत । मग हर्षे जाती निजसदनी ।। २
चित्रकूटी आले रघुनंदन । वार्ता ऐकून येती मुनिगण ।
मुदित मुनिवृंद येती ऐसे बघून । रघुकुलचंद्र घालिती दंडवत ।। ३
मुनि रघुरायास आलिंगिती । साफल्यास्तव आशीर्वाद देती ।
सीतासौमित्रराम यांचे लावण्य बघती । मानिती सकल साधने सुफलित ।। ४
यथायोग्य सन्मानून मुनिवृंदास । प्रभू मग निरोप देती तयांस ।
करिती ते योगयाग जपतपांस । निज आश्रमात स्वच्छंदे ।। १३४
कोळी किरात वार्ता ऐकून । हर्षित जणु घरी आले नवनिधान ।
कंदमूळफळ द्रोणात भरून । जणु सोने लुटाया जाती दरिद्री ।। १
जयांना दर्शन घडले उभय बंधूंचे । तयांना पुसती अन्य लोक मार्गीचे ।
परिसत कथीत सौंदर्य रघुवीरांचे । घेती रघुराजाचे दर्शन येऊन ।। २
नमन करून प्रभूस भेट देती । अति प्रेमे तया विलोकिती ।
चित्रापरि जेथल्या तेथे उभे ठाकती । पुलकित तनु वाहती नेत्री प्रेमाश्रू ।। ३
सकल प्रेमे तल्लीन जाणून । राम सन्मानती वदून प्रेमळ वचन ।
प्रभूस वारंवार वंदन करून । करिती विनंति जोडून कर ।। ४
प्रभु आपुले चरणदर्शन होता । जाहलो आम्ही सनाथ आता ।
आमुच्या भाग्योदयाने हे कोसलनाथा । जाहले तुमचे शुभ आगमन ।। १३५

धन्य ती भूमि-पथ-पर्वत-वन । जेथे जेथे नाथ ठेवता तुम्ही चरण ।
सफल जन्म तयांचा जे घेती दर्शन । धन्य ते काननचर विहंगमृग ॥ १
आम्ही धन्य आप्तजनासहित । नयनभरे तुमचे दर्शन घेत ।
शोधिले चिंतून निवासस्थान उचित । सुखी राहाल सर्व ऋतूंत ऐथे ॥ २
आम्ही करू सेवा सकल रीती । सारून दूर व्याघ्र सर्प केसरी हत्ती ।
ज्ञात गहन वन गिरिगुहाकंदर स्थिती । प्रभो पायाखाली घातला कोनकोपरा ॥ ३
नेऊ त्या त्या स्थानी शिकारीस । दाखवू सरोवर निर्झरजलाशयांस ।
नाथा नच संकोचावे आज्ञा देण्यास । आपुले सेवक आम्ही परिवारासह ॥ ४
जयास न जाणती मुनिमन वेदवचन । तो प्रभु करुणायतन ।
ऐके कौतुके किरातांचें वचन । जैसा पिता प्रेमे बालकबोलास ॥ १३६
रामासी प्रिय केवळ भक्ति । जाणणारा जाणेल ही उक्ति ।
मग राम वनचरांस संतुष्ट करिती । वदून प्रेमळ मृदुवचन ॥ १
निरोप घेऊन मस्तक नमविती । प्रभुगुण गाता ऐकता गृही जाती ।
ऐसे उभय बंधु सीतेसह राहती । विपिनी जे सुखदायक सुरमुनींस ॥ २
जैंपासून येऊन राहती रघुनायक । तैंपासून होई वन मंगलदायक ।
फुलती फळती डोलती तरू नानाविध । सुंदर वेली मंडप तयावरी ॥ ३
कल्पतरूसमान ते सहज सुशोभन । जणु आले सोडून नंदनवन ।
करिती मंजुतर मधुकर गुंजन । वाहे वायु शीतल सुखदमंद ॥ ४
नीळकंठ कोकिळ शुक । चातक चकोर चक्रवाक ।
चित्तचोर श्रवणासी सुखद । काढिती नानाविध सुस्वर आलाप ॥ १३७
करिकेसरी कपि वराह हरिण । संचरती संगे वैर विसरून ।
मृगवृंद रामलावण्य बघून प्रसन्न । जंव मृगयेस्तव फिरती राम वनी ॥ १
जितुकी विबुधविपिने जगात । ती रामवनास बघून स्तवीत ।
सरस्वती गंगा यमुना पुनीत । गोदा नर्मदादि पावन नद्या ॥ २
सकल सिंधु सरोवर सरिता नद । मंदाकिनीचा महिमा गात ।
शैल कैलास उदय-अस्त पर्वत । मंदर मेरू सकल सुरनिवास ॥ ३
हिमाचलादिक जितुके शैल । गाती चित्रकुटाचे यश मंगल ।
सुख सामावे न मनी मुदित विंध्याचल । पावे विपुल महत्ता विनाश्रम ॥ ४
चित्रकूट निकटी विहंगमृगगण । वेली वृक्ष पल्लव तृण ।
सकल धन्य पुण्यराशी पावन । ऐसे देव वदती दिनरात्र ॥ १३८

नयनवंत जीव रघुवीरा विलोकती । जन्मफल पावून शोकरहित होती ।
चरणरजस्पर्शे अचर जीव सुखावती । होती ते मोक्षपणाचे अधिकारी ।। १
तो शैल ते वन सहज सुशोभन । मंगलमय अतिपावन पावन ।
जेथे वसती राम सुखनिधान । वर्णावा कैसा महिमा तयांचा ।। २
त्यजून क्षीरसागर अयोध्या सोडून । जेथे येऊन राहती सीतारामलक्ष्मण ।
न करवे त्या सुंदर काननाचे वर्णन । सहस्रानन शतसहस्र शेषास ।। ३
मी वर्णून सांगू ती शोभा कैसी । मंदर उचलणे कैसे शक्य क्षुद्र कूर्मासी ।
कायावाचामने लक्ष्मण करी सेवेसी । न वर्णवे तयाचे शील प्रेम ।। ४
क्षणोक्षणी बघे सीतारामाचे चरण । आपणावरी तयांची ममता जाणून ।
बंधुमातापितागेह याचे स्मरण । न होई स्वप्नी कदापि सौमित्रा ।। १३९
रामासंगे सीता सुखी राहात । नगर आप्तजन गृह यांची स्मृति न येत ।
प्रियकर चंद्रानन क्षणोक्षणी देखत । होई प्रमुदित चकोरकुमारीपरी ।। १
बघून पतिप्रेम वृद्धिगत प्रतिदिन । सीता चक्रवाकीसम दिनी प्रसन्न ।
रामचरणी अनुरक्त सीतेचे मन । तिज प्रिय वन सहस्र अयोध्येसम ।। २
पर्णकुटि प्रिय प्रियकर असता सन्निध । प्रिय परिवार जणु कुरंग विहंग ।
मुनिपत्नी मुनि सासू-श्वशुर भासत । कंदमूळफळ आहार सुधासम ।। ३
नाथासवे भासे तृणशय्या सुंदर । शतमदन शय्येपरि सुखकर ।
होती जीव लोकपाल जिच्या कटाक्षे मात्र । कैसे मोहित करिती भोगविलास तिज ।। ४
भक्तजन स्मरताच केवळ रामनाम । त्यजती विषय विलास तृणसम ।
सीता जगज्जननी रामासी प्रिय परम । प्रिया ती सोडी भोगविलास न आश्चर्य ।। १४०
जेणे लक्ष्मण सीता सुखी होती । रघुनाथ तैसे प्रेमे करिती वदती ।
पुरातन कथा कहाणी निवेदती । ऐकती सीतालक्ष्मण सुख मानून ।। १
जंव रामास होई अयोध्येचे स्मरण । तंव अश्रूंनी पाणावती तयांचे नयन ।
स्मरताच सेवाभाव विनयप्रेम महान । मातापिता आप्तजन तथा भरत यांचा ।।२
होई दुःख कृपासिंधु प्रभूस । अवेळ जाणून दाविती धैर्यास ।
सीतालक्ष्मण पाहून व्यथित रामास । जैसी अनुसरते छाया मनुष्यासी ।। ३
बंधुसीता यांची दशा बघून रघुनंदन । धीर कृपाळू भक्तउरचंदन ।
सांगू लागती कथा पुरातन । ऐकून सीतालक्ष्मणास सुख प्राप्त ।। ४

रामलक्ष्मणसीतासहित । कैसे शोभती पर्णकुटीत ।
जैसा इंद्रइंद्राणीसहित जयंत । शोभून दिसतो अमरपुरी ।। १४१
कैसे राम रक्षती लक्ष्मणसीतेस । जैसे पलक नयनगोलकास ।
लक्ष्मण रामसीतेच्या सेवेस । जैसा शरीरास अविवेकी नर ।। १
वनी सुखे प्रभु वसती ऐशापरी । खग मृग सुर तापस यांसी हितकारी ।
कथिली कथा रामवनगमनाची मनोहारी । ऐका आता सुमंत प्रयाण अयोध्येस ।।२
फिरे माघारी गुह प्रभूस पोचवून । देखे सचिव तंव रथ येताना घेऊन ।
अति व्याकुळ सुमंतास विलोकून । न वर्णवे दुःख निषाद राजाचे ।। ३
वदे हाय रामसीतालक्ष्मण । पडे धरणीवर सुमंत तळमळून ।
खिंकाळती हय दक्षिणेस बघून । जणु विव्हळती पंखाविण पक्षी ।। ४
न भक्षती तृण न जलपान करिती । नयनांवाटे अश्रु ढाळती ।
सकल निषादासह दुःखी होती । निरखून रघुवीरवाजीस ।। १४२
तंव धीर धरून वदे निषाद । सुमंत आता सोडावा विषाद ।
तुम्ही परमार्थी ज्ञानी पंडित । दैव प्रतिकूल जाणून धीर धरा ।। १
विविध कथा मृदु वाणीने कथून । बैसवी रथात गुह बळेच आणून ।
रामविरहे हृदयी वेदना दारुण । न हाकू शके रथ शिथिल शोके ।। २
तडफडती घोडे न मार्गी चालत । रथास वन्य पशु जोडिले ऐसे वाटत ।
ठेचाळून पडती कधी वळून बघत । रामवियोगे व्याकुळ तयां दुःख तीव्र ।। ३
जे दुःखे वदती हे सीताराम लक्ष्मण । खिंकाळती हय प्रेमे तया बघून ।
वाजींची विरह व्यथा न करवे दर्शन । जणु सर्प विव्हळत मणिविना ।। ४
जाहला तंव निषाद विषादवश । बघून सुमंताच्या अश्वांस ।
बोलावून चार उत्तम सेवकांस । धाडी सारथी सवे तदा ।। १४३
गुह वळला माघारी सारथीस पोचवून । विरहदुःखाचे तयाच्या न करवे वर्णन ।
निघाले अयोध्येस सेवक रथ घेऊन । परि अति दुःखी होती क्षणोक्षणी ।। १
चिंती सुमंत दुःखे दीन व्याकुळ । रघुवीराविण धिग् जीवन सकल ।
अधम शरीर हे अंती न राहील । का न यश मिळवी सोडून प्राणास ।। २
पाप अपयशाचे पात्र जाहले प्राण । कवण हेतु न करिती प्रयाण ।
अवसर चुकला हाय हे मूर्ख मन । का अजुनी न फुटे हे हृदय ।। ३
पस्तावे चोळून हात माथा बडवून । जणु गमावून बसे धनराशी कृपण ।
ब्रीद बांधून जणु शूर वीर म्हणवून । समरांगणातून सुभट पळ काढी ।। ४

विवेकी वेदज्ञाता कुलीन । साधुसंमत सच्छील ब्राह्मण ।
पस्तावे चुकून घडता मद्यपान । तैसा जाहला पश्चात्ताप सचिवास ॥ १४४
कुलीन स्त्री साध्वी शहाणी । कायावाचामने पतीस देव मानी ।
परि दैववशे राही पतीस सोडुनी । तिजसम दारुण दाह सचिव हृदयी ॥ १
सजल नयने दृष्टि अंधुक । कानी न ऐकू येई बुद्धि भ्रष्ट होत ।
मुखी जिव्हा ओढे ओठ अति शुष्क । जीव न जाई हृदयी आशा अवधिद्वार ॥ २
न बघवे तयाचे निस्तेज आनन । वाटे घेतले याने मातापित्याचे प्राण ।
हानि ग्लानि विपुल व्यापी तयाचे मन । जणु पापी दुःखित नरकपथी ॥ ३
हृदयी पस्तावा मुखी शब्द न उमटत । बघू काय मी जाऊन अयोध्येत ।
जंव जन बघतील रथ रामविरहित । मज विलोकिता ते संकोचतील ॥ ४
नगरनारी अति दुःखित होऊन । जंव वार्ता पुसतील धावत येऊन ।
तंव वज्रासम हृदय कठोर करून । देईन उत्तर सकलांस ॥ १४५
पुसतील माता दुःखित दीन । दुर्दैवा काय करू तयांना कथन ।
जंव सुमित्रा पुसेल मज पाहून । कोणता सुखद संदेश देऊ तिज ॥ १
धेनु धावे स्मरून वत्सा जैसी । रामजननी येईल धावत तैसी ।
पुसता हेचि उत्तर कथीन मी तिजसी । गेले वनी रामलक्ष्मणवैदेही ॥ २
देईन उत्तर तया हेच जो पुसेल । आता अयोध्यी हेच सुख लाभेल ।
रामाच्या आधीन जयाचे जीवन केवळ । ते नृप दुःखे दीन पुसतील मज ॥ ३
कवण मुखाने देऊ उत्तर । की पोचविले वनी कुशल कुमार ।
ऐकून सीतारामलक्ष्मण यांचा समाचार । त्यजतील नरेश तनु तृणसमान ॥ ४
सोडताच प्रियतम रामरूप नीर । पंकापरी का न भंगत उर ।
वाटे विधात्याने दिधले शरीर । नरकयातना भोगावया ॥ १४६
यापरी पथी करी सुमंत शोक । तोच तमसातीरी आला रथ त्वरित ।
मंत्री प्रेमे निषादास निरोप देत । वंदून मग फिरे तो अति व्यथित ॥ १
प्रवेशता नगर संकोच सचिवास । जणु वधिले तयाने धेनुगुरुविप्रांस ।
तरुतळी बैसून घालविला तो दिवस । संध्यासमयी मग जाई नगरात ॥ २
प्रवेशे अवधपुर होताच अंधकार । भवनी जाऊन रथ सोडी द्वारावर ।
जयांसी समजला हा समाचार । रथ बघावया येती भूपद्वारी ॥ ३
ओळखती रथ व्याकुळ अश्वांस बघती । ग्रीष्मात हिमासम गात्रे गळती ।
होऊन व्यथित नरनारी तडफडती । जैसे नीर घटता मीनगण ॥ ४

आले सचिव एकले ऐकता समाचार। जाहले व्याकुळ सकल अंतःपूर।
भासे राजभवन अति भयंकर। जणु निवासस्थान प्रेतांचे ॥ १४७
अति आर्त मने पुसती राणी। न येई उत्तर न शोके निघे वाणी।
न दिसे काही नयना न ऐकू येई कानी। वदा कोठे नृप पुसती मंत्री ज्यास त्यास ॥ १
सचिवास व्याकुळ पाहुन दासी। नेती कौसल्याभुवनी तयासी।
कैसे बघती सुमंत रायासी। जणु भासे चंद्रमा अमृतरहित ॥ २
आसनशयनविभूषणहीन। पडती भूप भूवरी वदनकांति म्लान।
जणु ययाति शोकाकुल पतित स्वर्गातून। ऐसे उसासे टाकती अति दुःखे ॥ ३
क्षणोक्षणी भरे शोके छाती। पंख जळून जणु पडे संपाती।
हे प्रिय रामा जिवलगा रामा वदती। मग म्हणती हे रामलक्ष्मण वैदेही ॥ ४
बघून जयजयकार करी सुमंत। घाली भूपासी मग दंडवत।
व्याकुळ भूपति उठून वदत। मम प्रिय राम कोठे सुमंता सांग ॥ १४८
भूप हृदयी धरिती सुमंतासी। जणु मिळे अल्प आधार बुडत्यासी।
प्रेमे समीप बैसवून तयासी। नयनाश्रुभरे नृप पुसती ॥ १
राम कुशल ना सांग हे सख्या स्नेही। सांग कोठे रामलक्ष्मण वैदेही।
आले माघारी की परतून गेलेही। ऐकून भरती अश्रु सचिवाच्या नेत्री ॥ २
अति शोके व्याकुळ मग पुसती नरेश। सांग मजसी सीतारामलक्ष्मणसंदेश।
राम-गुण-रूप-शील स्वभाव यांस। स्मरूनी स्मरून नृप करी शोक हृदयी ॥ ३
दिधला वनवास देतो राज्य वदून। नसे मनी तया खेद वा हर्ष ऐकून।
ऐशा सुतविरहे न गेले अजून प्राण। कोण मजसम असेल पापी महीप ॥ ४
हे सख्या आहेत जेथे रामसीतालक्ष्मण। मजसीहि आता तेथे दे पोचवून।
न तो जाऊ पाहात मम प्राण। कथितो मी हे सत्य भावाने ॥ १४९
पुन्हा पुन्हा नृप पुसती सुमंतास। ऐकव मज प्रियतम सुताचा संदेश।
करी सत्वर मित्रा आता उपायास। जेणे सीतारामलक्ष्मण भेटतील ॥ १
धीर धरून वदे सचिव मृदु वाणी। महाराज तुम्ही पंडित ज्ञानी।
देवा वीर सुधीर धुरंधर असुनी। सेविता तुम्ही सदा साधुसमाजासी ॥ २
जन्ममरणसुखदुःखाचे भोग। हानिलाभ प्रियमीलनवियोग।
स्वामी काळकर्मवशे घडती योग। दिनरात्री परी बळेच क्रम चाले ॥ ३

हर्षित सुखे मूर्ख दु:खे व्यथित । उभय समान मानिती धीर मनात ।
धरा धीर तुम्ही करून विवेक । सोडा शोक हितरक्षक सकलांचे ।। ४
जाहला प्रथम वास तमसेच्या तटी । दुसरा मग गंगातीरावरती ।
स्नान करून तेथे जल प्राशन करिती । सीतेसहित उभयवीर ।। १५०
निषाद राजाने केली सेवा वहुत । ती गेली रात्र शृंगवेरपुरीत ।
मागविती वटक्षीर होता प्रभात । बांधिती निजशिरी जटामुकुट ।। १
तंव रामसखा निषाद नौका मागवीत । प्रियेसी चढवून रघुराज चढत ।
लक्ष्मण धनुर्बाण सुसज्ज ठेवीत । चढला मग स्वये प्रभु आज्ञा घेऊन ।। २
मन व्याकुळ बघून रघुवीर । वदती मृदु वचन धरा धीर ।
पित्याचे पदपंकज धरून वारंवार । हे तात कथावे तयांना प्रणाम ।। ३
मग करावी विनंती धरून पदा । न करावी हे तात आमुची चिंता ।
वनी मार्गी आमुचे कुशल आता । आपुल्या कृपा अनुग्रहपुण्ये ।। ४

तव अनुग्रहे । तात काननात । सर्व सुख प्राप्त । मजलागी ।
पाळून आज्ञेसी । चरणदर्शना । आम्ही येऊ पुन्हा । क्षेमरूप ।
सर्व जननींना । परितोषवून । नमन करून । विनवावे ।
तुलसी म्हणत । अयोध्येचे पती । कुशल राहती । तैसे करा ।। १

वारंवार नमून गुरुचरणांस । सांगावा तयांना मम संदेश ।
करा अयोध्यापतीस तोच उपदेश । जेणे मजस्तव न होईल शोक तया ।। १५१
विनवून सर्व पुरजन आप्तजनांस । ऐकवावी तात मम विनंति तयांस ।
जे ठेवतील सुखी नरनाथास । तेच मम हितकर्ते सर्वपरी ।। १
भरत येताच द्यावा संदेश । न सोडावी नीति पावता राज्यपदास ।
जाणून सम सेवावे सर्व मातांस । प्रजापालन करावे कायावाचामने ।। २
हे बंधो राखावे तू बंधुपण । मातापिता सज्जनांस सेवून ।
करावे पित्याचे ऐसे रक्षण । जेणे मजस्तव शोक न करतील ।। ३
लक्ष्मण मग वदे कठोर वचन । थांबविती राम मग विनंति करून ।
निज शपथ वारंवार घालून । न कथावे बालिश लक्ष्मण बोल हे तात ।। ४
प्रणाम करून सीता वदता काही । प्रेमवशे जाहली शिथिल वैदेही ।
तनु पुलके पुलकित लवलाही । शब्द न निघती नेत्री भरती अश्रू ।। १५२
पाहून रघुवीराचा रोख अखेर । चालवी नाव नाविक जावयास पार ।
बघत उभा मी छातीवर ठेवून वज्र । ऐशापरि निघती रघुवंशटिळक ।। १

कैसे कथावे मी निजक्लेश । आलो जिवंत घेऊन रामसंदेश ।
वदून मंत्री विरहदुःखे शोकवश । न बोलवे पुढती सचिवास ।। २
सुमंताचे वचन ऐकून नृपेश्वर । हृदयी दारुण दाह पडती भूमीवर ।
तयांच्या मनी तळमळ मोह अपार । जणु व्यापी मीनास गढूळ जळ ।। ३
विलाप करून राज्ञी रडती । कैसी वर्णावी ती महान विपत्ती ।
ऐकता विलाप दुःखासही दुःख अती । धीरजनांचाही धीर पळे ।। ४
राणीवासातील ऐकून आक्रंत । उडे हाहाकार अयोध्येत ।
जणु रात्री विपुल विहंगांवर वनात । होई कठोर वज्राघात ।। १५३
भूपाळाचे कंठी येती प्राण । जणु व्याकुळ सर्प मणीवाचून ।
इंद्रिये सकल होती विकल क्षीण । जणु कोमेजे कमल जळाविण सरी ।। १
कौसल्या नृपाचे मुख बघून म्लान । जाणे रविकुलरवि होत अस्तमान ।
राममाता मग हृदयी धीर धरून । वदली वचन काळानुकूल ।। २
नाथा मनी समजून करा विचार । रामवियोग-उदधि असे अपार ।
अयोध्या जहाजाचे आपण कर्णधार । प्रियजन हे तयावरी पथिकगण ।। ३
धीर धराल तर जाऊ पार । न तों बुडणार सकल परिवार ।
स्वामी मम विनंति हृदयी धराल जर । रामलक्ष्मणसीता भेटतील पुन्हा ।। ४
ऐकून प्रिय पत्नीचे मृदुवचन । नृप पाहती नेत्र उघडून ।
जणु तडफडत्या मीनावरी दीन । सिंचती कुणी शीतळजळ ।। १५४
धीर धरिती बैसती उठून नृपाळ । म्हणती सुमंता कोठे राम कृपाळ ।
कोठे लक्ष्मण कोठे रामसखा असेल । कोठे प्रिय पुत्रवधु सून वैदेही ।। १
शोकाकुल राया विलाप करिती । न संपे युगासम रजनी ती ।
नृप तापस अंधाचा शाप स्मरती । कौसल्येसी कथिती कथा ।। २
नृप होती व्याकुळ कथिता इतिहास । धिक्कार रामरहित जीवन-आशेस ।
काय करू रक्षून नरतनूस । जी न चालवी मम प्रेमपण ।। ३
हे प्राणप्रिय रघुनंदन । जगलो तुजविण बहुत दिन ।
हे सीते रघुनंदन हे लक्ष्मण । पिताचित्तचातकासी घन सुखद ।। ४
वदती रामा रामा हे राम । जपती पुन्हा हे राम राम राम ।।
नृप पोचती परमधाम । रघुवर विरहे तनु सोडून ।। १५५
जन्ममरणाचे फळ दशरथ पावती । निर्मल यशे ब्रह्मांड व्यापती ।
जिवंत असता रामचंद्रानन बघती । साधिती मरण रामविरहमिषे ।। १

शोकाकुल राज्ञी सकल आक्रोशती । तयांचे रूप-शील-तेज-बळ वानिती ।
अनेकपरी ऐसा विलाप करिती । पडती वारंवार भूमितळी ।। २
विलाप करिती दास–दासी । घरोघरी करिती रोदन नगरवासी ।
आज भानुकुल भानु गेला अस्तासी । गुणरूपनिधान धर्माची परिसीमा ।। ३
करिती कैकेयीस गालिप्रदान । केले जगास तिने नयनहीन ।
रात्र सरली करिता रोदन । मग प्रभाती येती ज्ञानी महामुनी ।। ४
तंव वसिष्ठ करिती समयोचित । इतिहासकथन पुरातन अनेक ।
निवारिती सकलांचा शोक । निज विशेष ज्ञानप्रकाशाने ।। १५६
तेल भरून नौकेत नृपतनु ठेविती । दूतांस बोलावून आज्ञा देती ।
जा वेगे धावत भरताप्रती । न कथावी नृपमृत्युवार्ता कवणास ।। १
कळवा इतुकेच भरतास । गुरू बोलाविती उभय बंधूंस ।
गेले धावत दूत ऐकून आज्ञेस । निज वेगे लाजविती अश्वास श्रेष्ठ ।। २
जैंहून अनर्थ होताच अयोध्येत । तैंहून भरतास अपशकुन होत ।
देखे रात्री स्वप्न भयानक । कुकल्पना कोटि येती जाणताच ।। ३
विप्रांसी भोजन घालून देई दान । शिवास अभिषेक घालून करी चिंतन ।
कुशल राहो बंधु मातापिता आप्तजन । ऐसे प्रार्थी मनी महेशास ।। ४
ऐसे चिंतीत असता भरत मनी । तोंच दूत पोचले धावुनी ।
गुरू आज्ञा श्रवण करूनी । निघे स्मरून गणेशास तो ।। १५७
वायु वेगाने हय हाकीत । उल्लंघिले सरिता शैल वन बिकट ।
चैन न पडे हृदय व्यथित । वाटे जावे उडून अयोध्येस ।। १
वरूषापरि भासे एक पळ । पोचला भरत नगराजवळ ।
नगर प्रवेशता अपशकुन अमंगल । कुस्थळी बैसून करिती काक काँवकाँव ।। २
आक्रंदती खग शृगाल प्रतिकूल । ऐकून भरतमनी उठे शूळ ।
दिसे सरितावन शोभाहीन केवळ । नगर विशेष भासे भयानक ।। ३
न बघवे हयगजखगमृगाप्रती । राम वियोगरोगे दु:खी दीन दिसती ।
नगरनरनारी दु:खित अति । जणु तयांनी गमावली संपत्ती सकल ।। ४
नगरजन भेटती परि न काही वदती । प्रणाम करून तैसेच पुढे जाती ।
भरताचे मनी भय विषाद अती । न पुसे तो कुशल कवणाही ।। १५८

न बघवे नगरातील बाजारवाट । जणु दशदिशा दावाग्नि पुरीत पेटत ।
आला सुत भरत ऐकून हर्षित । रविकुलकमलासी तारका कैकयी ।। १
धावे आनंदे आरती सजवुनी । द्वारी भेटता सुत येई घेऊन भवनी ।
भरत आप्तजनांस दुःखी निरखुनी । भासत कमलवन मृत हिमपतने । २
जैसे अग्नि पेटवून वनी भिल्लीण मुदित । तैसी कैकेयी अति हर्षभरित ।
बघून व्याकुळ शोकवश सुत । पुसे कुशल ना सर्व मायघरी ।। ३
सांगे भरत सकलांचे कुशल । मग पुसे क्षेम ना आपुले भानुकुल ।
सांग कोठे तात कोठे माता सकल । कोठे सीता प्रियबंधु रामलक्ष्मण ।। ४
स्नेहमय पुत्राचे वचन ऐकूनी । खोटे अश्रु ती आणी नयनी ।
बोलली पापिणी शूलसम वाणी । भरताच्या कर्ण मनास झोंबणारी ।। १५९
जुळविला मी सकल योग तात । बिचारी मंथरा मज जाहली सहाय्यक ।
परि विधाता मध्येच काज बिघडवीत । भूपति गेले देवलोकात ।। १
जाहला अति दुःखी ऐकून भरत । केसरीनादे जणु गज गर्भगळित ।
पुकारून तात तात हे तात । पडला व्याकुळ धरणीवरी ।। २
तुम्ही जाताना मी न घेतले पददर्शन । न केलेत तात मज रामा आधीन ।
मग उठे सावरून धीर धरून । माते सांग कारण तातमृत्यूचे ।। ३
वदली कैकेयी ऐकून सुताचे वचन । जणु कालवी विष मर्मस्थान चिरून ।
कथिली मुदित मने आरंभापासून । कथा दुष्ट क्रूर कैकेयीने ।। ४
विसरला भरत पित्याचे मरण । ऐकिले जंव तयाने रामवनगमन ।
आपण वनवासाचे कारण जाणून । स्तिमित होऊन धरी मौन ।। १६०
व्याकुळ विलोकून समजावी सुतास । जणु जळल्या जागी लावी लवणास ।
बाळा तातमृत्यू न उचित शोकास । पुण्याई यश मिळवून भोगिले भोग ।। १
लाधले जन्मफळ जीवन जगून । साधला स्वर्गवास येता मरण ।
सोड शोक ऐसे मनी चिंतून । समाजासह भोगावे आता राज्य ।। २
तळमळे सभय शोके राजकुमार । पिकल्या व्रणावर जणु लागे अंगार ।
सोडी उसासे धरून धीर । वदे हे पापिणी केलास तू कुलनाश ।। ३
जंव होती कुवासना मानसी ऐसी । उपजताच का न मारिले मजसी ।
तरू कापून पर्णावर जल शिंपिसी । जल उपसून जगविसी मीनास ।। ४
जनक दशरथ जन्म दिनकरवंशी । रामलक्ष्मणासम बंधु मजसी ।
हे जननी परि तू जन्मदात्री होसी । काय करू सकल दैवा आधीन ।। १६१

हे कुमति जंव कुविचार हृदयी आले । का न तव हृदय खंड खंड तुटले ।
वर मागताच का न दुःख जाहले । का न गळली जीभ मुखी किडे पडून ।। १
कैसा भूपाने ठेविला तुजवरी विश्वास । मरणसमयी विधि फिरवितो मतीस ।
ब्रह्माही न जाणे स्त्रीच्या हृदयगतीस । नारी पाप कपट अवगुणांची खाण ।। २
सरळ सुशील धर्मरत नरेश । कैसे जाणती ते स्त्रीस्वभावास ।
रघुनाथ प्राणप्रिय न जयास । कोण ऐसा सापडे जगी जीवजंतूंत ।। ३
मानिले रामासही तू वैरी । सांग सत्य मज असशी कोण तू तरी ।
असशील ते अस कर काळी मुखश्री । जा उठून बैस दृष्टिआड ।। ४
श्रीरामासवे धरून वैरभाव । का निर्मिले ब्रम्हयाने मज कुशीत तव ।
न अन्य मजसम पापी वास्तव । वदलो व्यर्थ तुजसी काही तरी ।। १६२
शत्रुघ्न जाणून मातेच्या कुटिल मतीस । जळती गात्रे क्रोधे न बोलवे तयास ।
आली कुबडी मंथरा तेथे त्या समयास । नटून नाना वसनभूषणांनी ।। १
बघून शत्रुघ्न क्रोधाने जळत । जणु पडती घृताच्या आहुती अग्नीत ।
कुबडावरी ताडकन मारी लाथ । आक्रोशत मग आदळे तोंडघशी ।। २
कपाळ फुटले कुबड भंगून । मुखे वाहिले रुधिर दंत पडून ।
हाय दैवा काय मी केले अनिष्ट म्हणून । हित करिता पावले कुफळास । ३
शत्रुघ्न तिज नखशिखांत दुष्ट जाणून । ओढी तिज फरफटत वेणी धरून ।
भरत दयानिधि तिज सोडवून । मग जाती कौसल्याप्रति उभय बंधू ।। ४
व्याकुळ कांतिहीन मलिन वसन । शरीर कृश दुःख भार साहून ।
जणु वनी कल्पलता सुंदर सुवर्ण । हिम आघाताने दिसे शुष्क निस्तेज ।। १६३
पाहून भरतासी कौसल्या धावे उठून । पडे मूर्च्छित भूवरी घेरी येऊन ।
भरत तिज आक्रोशत बघून । तनुभान हरपून पडे चरणावरी ।। १
तात कोठे दाखव मज माते । कोठे सीता रामलक्ष्मण उभय भ्राते ।
का लाधला जगी जन्म कैकयीते । का न जन्मली ती वांझ ।। २
जन्मा येऊन प्रसवली कुलकलंक । प्रियजनांचा द्रोही ऐसा अपयशी सुत ।
मजसम कोण अभागी त्रैलोक्यांत । जेणे माते तव दशा होय ऐसी ।। ३
पिता स्वर्गात वनात रघुवीर । मी केतु अनर्थास हेतु मज धिःकार ।
वेणुवनी मी दाहक अंगार । दुःसह दुःख दूषणास पात्र ।। ४
ऐकून ऐसे भरताचे दीन वचन । उठली कौसल्या मग सावरून ।
हृदयी कवटाळी तया उठवून । नेत्रातून ओघळती दुःखाश्रू ।। १६४

सरळ सुभावे कौसल्या हृदयी धरीत । अति प्रेमे जणु राम माघारी येत ।
मग मायेने शत्रुघ्नासी भेटत । शोक प्रेम तयांच्या हृदयी मावेना ।। १
कौसल्येचा सुभाव पाहून जन वदती । का न असावी ऐसी राममाता ती ।
माता बैसवी भरतासी अंकावरती । पुसून अश्रु बोलली मृदु वचन ।। २
बाळा अजूनही तू न सोडावा धीर । कुसमय जाणून शोक परिहर ।
नको आणू मनी चिंता हुरहुर । काल कर्म गति अघटित जाणून ।। ३
वत्सा देऊ नकोस तू कवणा दोष । सर्वपरि मजवरी कोपे ब्रह्मेश ।
अजूनही नाकळे तयाचा मानस । जो जगवी मज इतुक्या दुःखांत ।। ४
हे तात पित्याची आज्ञा ऐकून । त्यजती रघुवीर भूषण वसन ।
करिती वल्कल वस्त्र परिधान । तया हृदयी हर्ष ना विषाद ।। १६५
मुख प्रसन्न मनी न आसक्ति ना द्वेष । संतोषवुनी विविधपरी सकलांस ।
सीता संगे गेली राम जाता वनास । न राही गृही रामचरणी अनुरक्त ।। १
उठून चालला लक्ष्मण हे ऐकून । न राही तो जरी राम करी यत्न ।
रघुपति सकला शिर नमवून । निघती सीता लघुबंधु सवे ।। २
गेले वनी सीताराम लक्ष्मण । मी न गेले संगे वा त्यजिले प्राण ।
न सोडी तनु हे अभागी जीवन । जरी घडले सकल या नेत्रासमोर ।। ३
न वाटे मज लज्जा मम प्रेम पाहता । रामासम सुताची मी माता ।
साधली भूपतीने जीवन सफलता । मम हृदय कठोर शतवज्रासम ।। ४
ऐकून कौसल्येच्या वचनास । भरतासहित सकल राणीवास ।
व्याकुल होऊन करी विलापास । जणु शोकनिवास भासे राजभवन ।। १६६
उभय भ्राते करिती रोदन । कौसल्या तया पोटाशी धरून ।
परोपरी भरतास समजावून । सांगे विवेकपूर्ण वचन तया ।। १
मग भरत समजावी सकल मातांस । वेदपुराण कथा कथिल्या तयांस ।
कपटरहित सरळ शुद्ध सुवाणीस । बोले भरत मग कर जोडून ।। २
जे पाप लाधे मातापितासुतहत्येने । गोशाळा वा विप्रनगरदहनाने ।
तैसेच पाप बालकस्त्रीवधाने । वा देण्यानें विष नृपमित्रास ।। ३
वा जे अन्य पाप उपपातक । कवि वदती कायिक-वाचिक-मानसिक ।
मज विधाता देवो ती पापे शिरी समस्त । जर माते मम संमति या कामी ।। ४
हरिचरणांस जे सोडिती । घोर भूतगणांस भजती ।
विधाता मज देवो तयांची गती । हे माते जर जननीचे मत मान्य मज ।। १६७

जे वेदाचा विक्रय धर्माचे दोहन करिती । जे पिशुन परपाप अन्या कथिती ।
कलहप्रिय कुटिल क्रोधी कपटी । वेदाचे निंदक विश्वद्रोही ।। १
लोभी लंपट लोलुपचार । परधन परस्त्रीवर ठेविती नजर ।
मिळो मज तयांची गति घोर । जर असेल मम संमती जननीसी ।। २
जयांना सत्संगात नसे प्रीती । जे अभागी परमार्थविमुख होती ।
जे नरतनु पावून हरीस न भजती । हरीहरांची लीला न रुचती जया ।। ३
जे वेद पथ टाकून वाम पथ धरिती । जे ठग वेष घेऊन जगा छळती ।
माते शंकर मज देवो तयांची गती । जर ही जननीची कृती ज्ञात मज ।। ४
सत्य सरळ सहज भरताचे वचन । कौसल्या माता वदे ऐकून ।
काया-वाचा-मने करून । तात तू सदा रामासी प्रिय ।। १६८
तव प्राणांचेही प्राण राम । रामासी तू प्राणाहून प्रिय परम ।
देईल शशि विष अग्नि हिम । जलचर जलासी वैर धरितील ।। १
ज्ञान मिळताही मोह न मिटेल । परि रामासी तू न कधी प्रतिकूल ।
तू मातेसी अनुकूल जो वदेल । तो सुख सद्‌गति न पावेल स्वप्नीही ।। २
मग धरी हृदयी माता भरतास । स्तनी दुग्ध स्रवे प्रेमाश्रु नयनांस ।
यापरी करून बहु विलापास । बैसून घालविती सारी रात्र ।। ३
तंव येती वसिष्ठ वामदेव मुनी । सचिव महाजनांस घेती बोलावुनी ।
उचित परमार्थ वचन कथुनी । बहुत उपदेश मुनि करिती भरतास ।। ४
ऊठ भरता आता धरी धीर । उचित ते करावे जाणून अवसर ।
गुरूचे वचन ऐकून उठे तो सत्वर । सांगे सकल सज्ज करण्यास ।। १६९
घालिती नृपतनूस वेदविहित स्नान । सजविती अतिसुंदर विमान ।
भरत ठेवी मातांचे चरण धरून । राहिल्या राज्ञी रामदर्शनअभिलाषी ।। १
चंदनअगरादि नाना प्रकार । आणिती विपुल सुगंधित द्रव्यभार ।
रचिती चिता शरयुतीरी सुंदर । जणु सुशोभन स्वर्गाचा सोपान ।। २
दहनक्रिया यापरी जाहली । विधियुक्त स्नान करून दिली तिलांजली ।
दशगात्र क्रिया मग भरताने केली । जी वेद श्रुति पुराण विदित असे ।। ३
मुनिवर आज्ञा देती जैसी । क्रिया भरत करी सहस्रपरि तैसी ।
होती विशुद्ध देऊन बहुदानासी । गजवाजीधेनु वाहने नाना ।। ४
वसन भूषण सिंहासन । अन्न धरणी धाम धन ।
देई भरत विप्रां अपार दान । तयांच्या मनकामना पूर्ण करी ।। १७०

पिताहितास्तव भरत करी ऐसी कृती । लाखो मुखासही न वर्णवे ती ।
तंव सुमुहूर्त शोधून मुनि वसिष्ठ येती । बोलविती सचिव थोर जनांसी ।। १
सकल राजसभेत जाऊन बैसती । मग शत्रुघ्न-भरतासी बोलावून घेती ।
वसिष्ठ कथिती तयां नीति धर्मरीती । बैसवून निकट भरतासी ।। २
सकल कथा कथिती प्रथम मुनी । कैकेयीची कुटिल करणी ।
प्रेमास्तव सोडिली तनु जयांनी । वानिती त्या धर्मव्रत सत्य नृपा ।। ३
कथिती रामाचा गुणशीलस्वभाव । सजल नयने पुलकित मुनिराव ।
वानिती सीतालक्ष्मणाचा प्रीतिभाव । जाहले मुनि ज्ञानी प्रेमशोकी मग्न ।। ४
व्यथित मने वदती मुनिनाथ । प्रबळ भवितव्यता ऐक भरत ।
हानिलाभ जीवनमरण दैववशात । तैसेच यशापयश ।। १७१
चिंतून ऐसे का धरावे दोषी कोणास । व्यर्थ कोणावरी का करावा रोष ।
दशरथ नृप न उचित शोकास । तात करावा विचार मनी ऐसा ।। १
शोचनीय विप्र जो वेदविहीन । जो सोडितो निज धर्म जो विषयाधीन ।
शोचनीय नृप जया न नीतिज्ञान । वा जया प्रजा न प्रिय प्राणासम ।। २
शोचनीय वैश्य कृपण धनवान । जया न अतिथि प्रेम वा भवितज्ञान ।
शोचनीय शूद्र जो दावी विप्रा अवमान । जो अभिमानी ज्ञानाचा मानप्रिय मुखर । ३
पतिवंचक शोचनीय ती नारी । जी कुटिल कलहप्रिय स्वेच्छाचारी ।
शोच्य बटु जो निजव्रत परिहारी । वा न मानी गुरु-आज्ञा ।। ४
शोचनीय तो गृहस्थ । सोडतो जो मोहवशे कर्मपथ ।
यति शोचनीय तो जो प्रपंचरत । जया न विवेकवैराग्य ।। १७२
शोचनीय तो वानप्रस्थ । तप त्यजून जो होई भोगासक्त ।
शोचनीय पिशुन जो अकारण दावी क्रोध । विरोधी जनकजननीगुरुबंधु यांचा ।। १
शोचनीय सर्वपरी पर-अपकारी । निजतनु पोषक निर्दय भारी ।
शोचनीय तोच सर्वपरी । कपट सोडून न होई हरिभक्त ।। २
शोचनीय न कोसलराव । जे चारी भुवनी प्रकटती प्रभाव ।
भरता न झाला नृप पित्यासम तव । नसे विद्यमान न होणार पुढे । ३
विधिहरीहरसुरपति दिक्पाळ । वानिती दशरथगुणगाथा सकल ।। ४
हे तात तू सांग करील कोण । कैसे तयांचे महिमावर्णन
रामलक्ष्मणशत्रुघ्नसमान । जयाचे असती पुत्र अति पवित्र ।। १७३

सर्वपरी अति भाग्यवान भूपाळ । तयास्तव दुःख करणे निष्फळ ।
हे जाणून न व्हावे शोकाकुल । राजाज्ञा शिरी धरून करावे तैसे ।। १
रायाने केले तुज राज्यपद अर्पण ।आता सत्य करावे पितृवचन ।
रामासी त्यजून केले वचन पूर्ण । जाळिली निजतनु विरहाग्नीत ।। २
नृपास वचन प्रिय न प्रिय निजप्राण । तात मानावे पितृवचनास प्रमाण ।
करावी नृपाज्ञा शिरी धारण । तयांत तव तैसे सकलांचे कल्याण ।। ३
परशुराम मानून पित्याच्या आज्ञेस । वधिती मातेस विदित हे लोकांस ।
देई यौवन निजतनय ययातीस । पित्राज्ञेने न लाभते अपयश वा पाप ।। ४
सोडून उचित वा अनुचित विचार । जे धरिती पित्राज्ञा निजशिरावर ।
ते सुख सुयशास पात्र । तयांना मिळे स्थान स्वर्गात ।। १७४
अवश्य सत्य करावे नरेशाचे वचन । प्रजापालन करावे शोक सोडून ।
स्वर्गात लाभेल नृपास समाधान । प्राप्त तुज पुण्य यश न दोष ।। १
वेदविदित संमत शास्त्रास । पिता जया देई पावे तो राज्यपदास ।
करावे राज्य आता त्यजून दुःखास । निज कल्याण जाणावे मम वचनी ।। २
ऐकताच हे रामसीता सुखी होतील । पंडित तुज दोषी न धरितील ।
कौसल्यादि माता सुख पावतील । पाहून निज प्रजाजन सुखी ।। ३
रामावर तव प्रेम विदित जयास । तो सर्वपरी करील तव गुणगानास ।
सोपवावे राज्य येताच रामास । मग करावी सेवा रामाची प्रेमभरे ।। ४
सचिव सांगती कर जोडून । अवश्य मानावे गुरूचे वचन ।
परतून येताच रघुनंदन । दिसेल उचित जैसे तैसे करावे ।। १७५
कौसल्या मग वदे धरून धीर । बाळा गुरूंची आज्ञा मानावी हितकर ।
आदरे पाळावी मानून पथ्यकर । त्यजावा शोक मानून काळगती ।। १
वनात रघुपति नरेश स्वर्गात । तू ऐसा भीरु सर्व परी तात ।
आता सकलांसी आधार तूच सुत । आप्तजनप्रजासचिवमातांसी ।। २
दैव विपरीत काळ कठोर । माता ओवाळते जीव आता धरी धीर ।
गुरूची आज्ञा मानून तैसेच अनुसर । प्रजेसी रक्षून निवार आप्तजन दुःख ।। ३
गुरूचे वचन सचिवाचे अभिनंदन । भरतहृदयासी जणु शीतल चंदन ।
ऐकिले तैसेच मातेचे कोमल वचन । ओथंबले जे शीलप्रेमसरळरसात ।। ४

ओथंबले बोल । करुण रसात । ऐकून भरत । शोकाकुल ।
स्रवून सिंचती । सरोरुहनेत्र । विरह-अंकुर । नवे उरी ।
हरपती सर्व । निज देहभान । दशा ती पाहून । समयी त्या ।
सीमा सुस्नेहाची । तुलसी वदत । सकल वानीत । भरताची ।

भरत जोडून कमलासम कर । धीर धरून धैर्यधुरंधर ।
देई सकला उचित उत्तर । ओथंबलेल्या अमृत वचनाने ।। १७६
गुरु उचित उपदेश मज करिती । प्रजा सचिव सकल अनुकूल असती ।
ते शुभद जाणून माता आज्ञा देती । पाळीन मी निश्चित शिरी धरून ।। १
माता पिता गुरू स्वामी यांची हितवाणी । मानावी हितप्रद मुदित मने ऐकूनी ।
परि उचित अनुचित येताच मनी । होई धर्म लोप शिरी पातकभार ।। २
तुम्ही दिला जो उपदेश सरळ । मी तो आचरता मम भले होईल ।
तदपि न हृदया मम संतोष देईल । आहे हितकर जरी मी जाणून ।। ३
मम विनंती आता तुम्ही ऐकावी । तदनुसार मज शिकवण द्यावी ।
प्रति-उत्तर करितो क्षमा असावी । साधु न मानिती दुःखिताचे गुणदोष ।। ४
पिता सुरनगरीत सीताराम वनात । सांगता मज स्वीकार राज्यपद ।
मानिता त्यातच का मम हित । की साधिता महान निजकाज ।। १७७
मम हित सीतापतीच्या सेवेत । निष्ठुर माता ते हिरावून घेत ।
केला बहु विचार मी मम मनात । मम कल्याण अन्य उपाये न दिसे ।। १
लक्ष्मणरामसीता यांचे पददर्शनाविण । न मानीत मी राज्य जे शोकनिधान ।
व्यर्थ भूषणभार वस्त्रावाचून । वैराग्यविहीन ब्रह्मज्ञान असे व्यर्थ ।। २
रोगी तनूसी व्यर्थ नाना विषयभोग । हरीभक्तिविण वृथा जपयोग ।
प्राणाविण सुंदर देह वृथाच । तैसे रामाविण व्यर्थ मम सर्वस्व ।। ३
द्या आज्ञा जातो रामासन्निध । एकच निश्चय मम हित तयात ।
मज नृप करून वांछिता निज हित । वदता तुम्ही हे प्रेममोहवशे ।। ४
मी कुटिलमति कैकेयीचा सुत । रामासी विमुख गतलज्जा निश्चित ।
मजसम अधमाच्या राज्यात । चाहता सुख तुम्ही मोहवशे ।। १७८
ठेवा विश्वास हे मम सत्य बोल । नरनाथ असावा धर्मशील ।
जर बळेच मज राज्य देऊ कराल । तर ही पृथ्वी पाताळी जाईल ।। १

कोण मज समान पापाचे निवास। जयास्तव घडला रामसीतेस वनवास।
रायाने दिधले कानन रामास। परि सोडताच तया गेले स्वर्गात ।। २
मी शठ अनर्थाचे कारण। ऐकतो वार्ता सुखे बैसून।
विलोकून भवन हे रामावाचून। राहिले प्राण जगाचा उपहास साहून।। ३
न रमती जे प्राण रामप्रेमात। ते लोलुप भूमिभोग बुभुक्षित।
कोठवर वानावे हृदय निष्ठुर अमित। जे मिळवी महति लाजवून वज्रास ।। ४
कारणाहून कार्य असते कठोर। तो मम दोष नसे साचार।
अस्थीहून भयानक कठोर वज्र। पाषाणाहून लोह तैसेच ।। १७९
कैकेयीजनित तनुवर अनुरक्त। ते मम पामर प्राण अभागी निश्चित।
प्रियविरहे जर प्राण प्रिय वाटत। तर बघेन ऐकेन बहुत आता पुढे ।। १
रामलक्ष्मणासी धाडिले वनात। पाठवून स्वर्गात केले पतिहित।
वैधव्य अपयश घेतले पदरात। दिला प्रजेसी शोकसंताप ।। २
दिधले मज सुख सुराज्य सुयश। ऐसे केले कैकेयीने सुखी सर्वांस।
याहून मम कल्याण कोणते विशेष। यावरही करू इच्छिता अभिषेक ।। ३
आलो जन्मा जगी कैकेयीच्या कुशीत। मजसी काही नसे ते अनुचित।
मम जीवन सारे दैवरचित। कशास सहाय्य आता प्रजापंचांचे ।। ४
कुग्रहाने ग्रासित वायुरोगवश। तयातही पुन्हा इंगळी दंश।
मदिरा जर पाजिली अशा नरास। तर सांगा उपचार कैसा ते ।। १८०
जगी योग्य जे कैकेयीच्या सुतासी। तेच चतुर ब्रह्माने दिले मजसी।
देऊन रामलक्ष्मण सम बंधूसी। मम महति वाढविली व्यर्थ विधात्याने ।। १
सांगता आपण करून घे अभिषेक। राजाज्ञा सर्वपरी हितकारक।
कैसे कोणा कोणा देऊ उत्तर निश्चित। वदा सुखे जया जे रुचेल ते।
मम कुमातेसह मी सोडून। सांगा हे भले म्हणेल कोण।
सचराचर जगी कोण मजवाचून। जया सीताराम नसती प्राणप्रिय ।। ३
दिसतो लाभ सर्वांस परि मम हानी। मम दुर्दैवी दिन नसे दोषी कोणी।
तुम्ही संशय-प्रेम-शील-वश म्हणुनी। वदता जे काही ते उचित सकल ।। ४
राममाता अति सरळचित्त। दावी प्रेम मजवरी बहुत।
सहज प्रेमवशे ती वदत। मम दीनता बघून ।। १८१
गुरु विवेकसागर जगा विदित। जयाच्या करतळी विश्व अमलकवत।
तेही सज्ज कराया अभिषेक। दैव प्रतिकूल होता सकल विपरीत ।। १

सीतारामाविण या जगात । कोणी न वदती मी मातेसीं न सहमत ।
ऐकून मी साहीन सुख मानीन तयात । जेथे जळ साचेल तेथे अंती चिखल ।।
न भीती मज जर जग म्हणेल नीच । न चिंता मज न मिळता परलोक ।
मम उरी दुःसह दावाग्नि एकच । मजमुळे दुःखित सीताराम ।। ३
जीवनलाभ उत्तम घेई लक्ष्मण । सोडून सर्व लावी रामचरणी मन ।
का करू लटका पस्तावा मी अभागी दीन । रघुवर वनवासास्तव मम जन्म ।। ४
कथितो मम दीनता दारुण । सकला सन्मुख मस्तक नमवून ।
आता रघुनाथांचे पददर्शनाविण । हृदयातील दाह न शमणार ।। १८२
मज न सुचे अन्य उपाय । कोण जाणेल रामाविण मम हृदय ।
आता अखेरचा एकच निश्चय । उदयिक प्रातःकाळी जावे प्रभूपाशी ।। १
जरी मी अति दुष्ट अपराधी । मजमुळे लागल्या सकल उपाधी ।
पाहून सन्मुख शरणागताची गती । राम क्षमा दावून कृपा करितील ।। २
शील सरळभाव संकोचित । कृपास्नेहसदन रघुनाथ ।
रामाने शत्रूचेही न केले अनहित । जरी प्रतिकूल तरी शिशुसेवक मी ।। ३
आपण पंच मम हित जाणून । द्या आज्ञा आशीर्वाद प्रेमे वदून ।
जेणे मज मानून दास विनंति ऐकून । राम माघारी येतील अयोध्येसी ।। ४
जाहला जन्म मम कुमातेपासून । मी शठ सदाच दोषी जाणून ।
राम न त्यजतील आपुला जाणून । मम विश्वास ऐसा रघुवीरावरी ।। १८३
वचन भरताचे सकला रुचले । जणु रामप्रेमसुधेत मुरलेले ।
भीषण विरहविषे जन जळले । जणू जागे होती सबीज मंत्र ऐकून ।। १
माता सचिव गुरु नगर नरनारी । स्नेहे सकल जाहले व्याकुळ भारी ।
मग प्रशंसून भरतास ते अवसरी । वदती तू रामप्रेम मूर्तिमंत ।। २
का न वदशील भरता ऐशा वचनास । तू प्राणासम प्रिय रामास ।
जो नीच अनुसरून निज जडतेस । घेईल संशय माता कुटिल जाणून ।। ३
तो शठ कोटि पूर्वजांसहित । वसेल शतकल्प नरकवासात ।
सर्पाचे पाप अवगुण मणि न स्वीकारीत । हरून विष भस्म करी दुःख दारिद्र्य ।। ४
रामापाशी निश्चित चलावे वनात । भला मंत्र दिलास तू हे भरत ।
बुडत असता जन शोकसागरात । दिला सकलांस तूच आधार ।। १८४
जाहला सकलांचे मनी अति मोद । जैसा चातक मोरास ऐकून घननाद ।
प्रभाती गमन जाणून निर्णय सुखद । भरत जाहला प्राणप्रिय सकलांस ।। १

वंदून मुनीसी भरतासी शिर नमवून। जाती सकल गृही निरोप घेऊन।
म्हणती धन्य जगी भरताचे जीवन। जाताना वानिती तयाचे स्नेहशील ।। २
जाहले महाकार्य वदती परस्परांस। होती सुसज्ज सकल वनगमनास।
गृह रक्षणा ठेविती जयांस। वाटे तया कापला गळा जणू ।। ३
राहा ऐसे कुणा न सांगा कोणी वदती। कुणा न इच्छा जगी जीवनलाभाची ।। ४
तयाची संपत्ति सुख सदन। तैसे मातापिताबंधुमित्र जावो जळून।
जो न करी सहाय्य मने प्रसन्न। होण्यास सन्मुख रामपदी ।। १८५
सजविती नाना वाहने घरोघरी। प्रभाती प्रयाण हर्ष हृदयांतरी।
गृही जाऊन भरत विचार करी। नगरवाजीगज भवनभांडार ।। १
ही सारी रघुपतीची संपति विपुल। जतन न करता जर त्याजिली सकल।
परिणाम न होईल मज अनुकूल। ठरेन मी स्वामीद्रोही महापापी ।। २
सेवक तोच जो साधेल स्वामीहित। कोटि दूषणे कोणीही देवोत।
ऐसे चिंतून बोलावी विश्वासु सेवक। जे स्वप्नीही न सोडती निजधर्म ।। ३
मर्म धर्म सकला समजावून। कामासी उचित तैसेची नेमिले जन।
ठेविले रक्षक कार्य यत्ने साधून। मग गेला भरत राममातेप्रती ।। ४
सकल माता बघून शोकार्त। अति प्रेमळ सुजाण भरत।
सांगे सजविण्यास पालखीयान त्वरित। तैसी अन्य वाहने सुखासने ।। १८६
चक्रवाकचक्रवाकीसम उत्सुक। नरनारी सूर्योदयास्तव हृदयी आर्त।
संपे रात्र जागता जाहली पहाट। मग चतुर सचिवास भरत बोलावी ।। १
वदे ठेवा सज्ज अभिषेकद्रव्यांस। देतील मुनि वनी राज्य रामास।
करा त्वरा मग मंत्री करून नमनास। शृंगारिती वेगे रथ तुरंग हत्ती ।। २
घेऊन अग्निद्रव्ये सवे अरुंधती। मुनिराज वसिष्ठ प्रथम रथी चढती।
नाना वाहनी चढून विप्रवृंद बैसती। निघती मग ते जणू तपतेजनिधी ।। ३
नगरजन वाहनांस सजवून। चित्रकूटाप्रति करिती प्रयाण।
सुंदर नाना शिबिका न करवे वर्णन। चढून तयावर निघाल्या सकल राज्ञी ।। ४
विश्वासु सेवकांवरी नगर सोपवून। आदरे सकला पुढती घालून।
सीतारामचरणांसी स्मरून। चालले मग भरतशत्रुघ्न बंधू ।। १८७
जाती उत्सुक नरनारी रामदर्शनास। जैसे तृषार्त हत्ती-हत्तिणी बघून जलास।
वनी रामसीता मनी करून विचारास। अनुजासवे चालत जाई पदी भरत ।। १

बघून तयांचे प्रेम जन प्रेमे तल्लीन । चालती अश्वरथगजांस त्यजून ।
जाऊन समीप निज शिबिका थांबवून । बोले मृदु वाणी कौसल्या राममाता ।। २
बाळा सांगते ऐक बैस चढून रथात । जाहला प्रिय परिवार कष्टी बहुत ।
तुम्ही चालता सकल जन पदी चालत । सकल शोके कृश चालणे न उचित ।। ३
वंदन करून शिरी आज्ञा धरिती । उभय भ्राते रथी बैसून निघती ।
प्रथम दिनी तमसा तीरी वसती । केला दुसरा निवास गोमतीतीरी ।। ४
दुग्धपान कुणी कुणी फलाहार घेती । कुणी निशी एकदाच भोजन करिती ।
रामहितास्तव कोणी नेमव्रत धरिती । टाकून भूषणे सकल विलासभोग ।। १८८

रात्र काढून शरयुतीरावर । निघती प्रभाती प्रवेशती शृंगवेरपूर ।
निषादासी कळला समाचार । तंव दुःखे हृदयी तो विचार करी ।। १
कवण कारणे भरत येई वनासी । असेल कपटभाव निश्चित मानसी ।
जर मनी न धरी काही कपटासी । तर का संगे आणिले सेनेस ।। २
भरत मानितो मारून रामलक्ष्मणास । भोगीन निष्कंटक सुखे राज्यास ।
भरत मनी न आणी राजनीतीस । आता जीवनहानि प्रथम होता कलंक ।। ३
सुरासुर झुंजार मिळतील जरी । न जिंकितील ते रामासी समरी ।
नसे आश्चर्य ऐसी भरत कृती करी । विषवेल न फळेल कधी अमृतफळ ।। ४
गुह ऐसा मनी विचार करून । ज्ञातीस सांगे राहा सकल सावधान ।
वल्हीसहित नौका बुडवून । धरा रोखून सकल घाटासी ।। १८९

सुसज्ज होऊन रोखा घाट । लढताना व्हा मरणास उद्युक्त ।
भरतासवे सन्मुख लढू रणात । न उतरू देऊ गंगा जिवंत जोंवरी ।। १
समरी मरण तेही गंगातीरावर । श्रीरामाचे काज शरीर क्षणभंगूर ।
रामबंधु भरत नृप मी पामर । महत्‌भाग्ये ऐसा मृत्युयोग ।। २
स्वामीकाजा युद्ध घोर करीन । धवल यशे चतुर्दश भुवने उजळीन ।
रघुनाथास्तव सोडीन प्राण । आनंदाचे मोदक मम उभय हस्तांत ।। ३
जयाची न गणना साधु समाजात । वा न स्थान तैसे रामभक्तात ।
तो महीस भार जगी वृथा जिवंत । तो जननीच्या यौवनतरूस कुठार ।। ४
गेला निषादपतीचा विषाद । सकलांचा उत्साह तो वाढवीत ।
श्रीरामास स्मरून मागवी त्वरित । युद्धास्तव भाते-चाप कवच ।। १९०

वेगे मित्रहो सुसज्ज होऊन । टाका भ्याडपणा आज्ञा ऐकून ।
होय नाथ सहर्षे सकल वदून । परस्पर वाढविती आवेश ।। १
निघाले निषादास वंदन करूनी । शूर सकल लढणे रुचे रणांगणी ।
रामपदपंकजपादुका स्मरूनी । भाते बांधून ठेविती सज्ज धनुष्यास ।। २
चढवून कवच शिरस्त्राण घालिती । भाला बरची परशु गरजती ।
तलवार फेकिती कुणी कुशल अती । जणु गगनी उडती सोडून मही ।। ३
निज निज दल ठेविती सज्ज करून । जाती गुहराजाप्रति करिती नमन ।
गुह जाणे लायक तया सुवीर बघून । नामे पुकारून सन्मानी सकलांसी ।। ४
हे बंधूंनो न द्यावा धोका मजसी । अति महान जाणा आजचे काजासी ।
त्वेषे बोलती सुभट ऐकून वाणीस । हे वीरांनो न व्हावे तुम्ही अधीर ।। १९१
आपुल्या बळे रामप्रतापे हे नाथ । करू रिपुदल विना अश्व विना सुभट ।
न माघारी पाऊल आता जोवरी जिवंत । करू मेदिनी रुंडमुंडमय ।। १
गुहपति पाहून सुसज्ज दलास । वदे वाजवा आता रणढोलास ।
तोच शिंक अनुकूल येई वामदिशेस । शकुनज्ञानी सांगतो युद्ध जिंकाल ।। २
शकुनाचा विचार करून वदे एक वृद्ध । भरताचे मीलन नसे आता युद्ध ।
शकुन सांगे की न आता विरोध । भरत जाईल विनविण्यास रामासी ।। ३
गुह वदे उचित हे जरठाचे बोल । विचाराविण कृति करता मूढ पस्तावेल ।
न जाणताच भरताचे स्वभावशील । युद्ध करता होईल हानि हिताची ।। ४
रोखा घाट वीरहो सकल मिळून । जाणेन भरताचे मर्म तया भेटून ।
समजेल तो अरि मित्र वा उदासीन । ठरवीन धोरण येऊन तैसे तंव ।। १९२
स्नेहस्वभावे भरताचे प्रेम कळेल । वैर प्रीति लपविता न लपेल ।
मागवी मग खगमृगकंदमूळफळ । सजवू लागले साहित्य भेटीस्तव ।। १
आणती पुष्ट पुरातन पीन मीन । कोळी कावडीवर भरभरून ।
निघे भेटीस गुह सिद्धता करून । तंव होती मंगळमूळ शकुन शुभ । २
बघताच दुरून गुह सांगे निज नाम । करी मुनीसी मग दंडवत प्रणाम ।
देती आशीर्वाद जाणून रामप्रिय परम । मुनि भरतासी कथिती समजावून ।। ३
रामसखा जाणून भरत सोडी रथ । चाले उतरून हृदय प्रेमे उचंबळत ।
सांगून निज नाम ग्राम जात । शिर महीवर टेकून प्रणाम करी ।। ४
तयास दंडवत करताना बघून । भरत हृदयाशी लावी उठवून ।
वाटे जणु स्वये भेटला लक्ष्मण । हृदयात प्रेम तयाच्या समावेना ।। १९३

भरताने अति प्रेमे आलिंगले गुहास। वानिती सकल तयाच्या प्रेमरीतीस।
स्तवून सुर वर्षती सुमनास। करून मंगलमूळ घोष धन्य धन्य ।। १
लोकी वेदी मानिती जो सर्वपरि नीच। करिती स्नान जयाच्या छायास्पर्श होताच।
तयासी रामाचा लघु भ्राता भेटत। शरीर पुलकित परिपूर्ण ।। २
जे राम राम वदता जांभई देती। तयांच्या पापराशी सन्मुख न ठाकती।
तयास स्वये राम हृदयी धरिती। करिती जगत्पावन कुलासहित ।। ३
कर्मनाशेचे जळ मिळता गंगेस। वदा कोण न धरील शिरी तयास।
वाल्मिकी उलट जपता रामनामास। जाहले ब्रह्मरूप जगास विदित ।। ४
चांडाळ कसाई यवन शबर। कोळी किरातादि नीच पामर।
करता पुनीत रामनामोच्चार। होती परम पवित्र त्रिभुवनी विख्यात ।। १९४
न विस्मय यात युगे युगे हीच रीती। कवणा न देती रघुवीर महती।
ऐसा रामनाममहिमा सुर कथिती। सुखी होती ते ऐकून अयोध्याजन ।। १
भरत प्रेमे भेटे रामसख्यास। पुसे मंगल क्षेम तयास।
पाहून भरताचे शीलप्रेमास। हरपले देहभान निषादाचे ।। २
मनी वाढला संकोचप्रेममोद। भरताप्रति टक लावून उभा निषाद।
धीर धरून पदांसी वंदीत। मग कर जोडून विनवी प्रेमाने ।। ३
पाहून आपुले पदपंकज कुशलमूळ। मी आता कुशल तिन्ही काळ।
कोटिकुळांसह साधले मम मंगल। प्रभो तुमच्या परम कृपाप्रसादे ।। ४
मम कार्य कुळ समजून। प्रभूचा महिमा मनी ओळखून।
जो न भजेल रघुवीरचरण। तो जाणावा दैवे वंचित दुर्दैवी जगी ।। १९५
कपटी कातर कुमति कुलहीन। लोकवेदबाह्य सर्वपरी मी जाणून।
जाहलो मी आता विश्वभूषण। जंव रामाने म्हटले मज आपुला ।। १
बघून प्रीति शुभ विनंती ऐकून। भेटे तया लघुभ्राता शत्रुघ्न।
तंव निषाद निज नाम कथून। आदरे वंदन करी राज्ञींसी ।। २
लक्ष्मणासम मानून आशीर्वाद देती। शतलक्ष वरुषे चिरायु सुखी हो वदती।
नगर नरनारी निषादास बघती। सुखी होती जणु बघती लक्ष्मणास ।। ३
म्हणती जन्मलाभ लाधला गुहास। बाहूत धरून रामाने आलिंगिले तयास।
ऐकून गुह निजभाग्यस्तुतीस। प्रमुदित मने निघाला सकलांसह ।। ४
खुणविले सकल सेवकांस। निघाले ते पाहून स्वामीहेतूस।
मग रचिती त्वरित निवासस्थानास। गृही तरुतळी सरबागवनी ।। १९६

जंव भरत देखे शृंगवेरपुर। तयाचे प्रेमवशे शिथिल शरीर।
चालता तो गुहस्कंधावरी टाकी भार। शोभती उभय मूर्तिमंत प्रेमविनय। १
सकल सेनेसवे भरत। जगपावन गंगेचे दर्शन घेत।
रामघाटासी प्रणाम करीत। तयाचे मन प्रेममग्न जणु रामभेट॥ २
नगरनरनारी करिती वंदन। प्रसन्न अति ब्रह्ममय जळ निरखून।
स्नान करून प्रार्थिती कर जोडून। वाढो प्रीति रामचंद्रांचे चरणी। ३
भरत वदे हे गंगे तव रेणू। सकला सुखद सेवका सुरधेनू।
जोडुन कर मागे वर पावनू। जडो मम भक्ति सीतारामपदी। ४
प्रार्थून ऐसे भरत करी स्नान। मग गुरूंची आज्ञा घेऊन।
मातांचे स्नान जाहले जाणून। निवासास्तव जाती अन्य स्थळी॥ १९७
ठायी ठायी देती तळ नारीनर। भरत सकलांचा घेई समाचार।
आज्ञा घेऊन पुजून इष्ट सुर। राज्ञींप्रति जाती उभय बंधू॥ १
चरण चेपून वदे कोमल वाणी। भरत सकल जननींना सन्मानुनी।
मातांची सेवा बंधूवर सोपवुनी। आपण बोलावून घेई निषादास॥ २
चालले मित्र घालून हाती हात। जाहले शिथिल शरीर स्नेहे बहुत।
हे सख्या दाखीव ते स्थान पुसे भरत। मन नयनांचा करावा शांत दाह॥ ३
निजले रात्री जेथे सीतारामलक्ष्मण। ऐसे वदताच भरले प्रेमाश्रूंनी नयन।
गुह दुःखित ऐकून भरताचे वचन। नेई तयासी त्वरित तेथे। ४
जेथे पुनीत अशोक तळी रघुवीर। करिती विश्राम जाती त्या स्थळावर।
मग करी भरत दंडवत प्रणाम सादर। अति प्रेमे मनोभावे॥ १९८
सुंदर कुशशय्या भरत निरखून। घाली प्रदक्षिणा करून नमन।
प्रेमाच्या अधिकतेचे न करवे वर्णन। जंव पदधूळिकण लावी तो नेत्रासी॥ १
विलोकून दोनचार कनककण। ठेवी माथा सीतेसम लेखून।
होई हृदय दुःखित सजल विलोचन। गहिवरून वदे गुहमित्रासी॥ २
सीता विरहे सुवर्णकण द्युतिहीन। जैसे अयोध्यानरनारी दुःखे म्लान।
जिचा पिता जनक तयासम नसे कोण। जयाच्या योगभोग मुठीत॥ ३
श्वशुर भानुकुळभानु भूपाळ। जयास स्तवी इंद्र अमरावतीपाळ।
जिचे प्राणनाथ रघुनाथ कृपाळ। तयांच्या महतीने मिळे महति महानास॥ ४
पतिव्रता स्त्रियांत मुकुटमणी। त्या सीतेची शय्या पाहुनी।
जे हृदय न विदीर्ण होत फुटुनी। हे शंकर ते वज्राहून कठोर अधिक॥ १९९

लालनायोग्य लघुलक्ष्मण सुंदर। ऐसा भ्राता न झाला आज न होणार।
पितरांचा लाडका जनांस प्रिय साचार। सीतारघुवीरासी प्राणप्रिय ।। १
सुकुमार स्वभाव मूर्ति नाजुक। न लागली तनूस उष्ण वाऱ्याची झुळूक।
तो सर्वपरी वनविपत्ति साहत। मम छाती लाजवी कोटिकठोरवज्रास ।। २
करी जगा प्रकाशित रामअवतार। रामरूपशील सुखगुणसागर।
गुरुमातापिता आप्तजन नारीनर। रामाचा सुभाव सुखदायक सर्वांस ।। ३
वैरीही श्रीरामासी स्तविती। भाषण-मीलन-विनय मनासी हरती।
प्रभुगुणगणांसी न गणू शकती। कोटि शारदा कोटिशत शेष ।। ४
सुखस्वरूप रघुवंशभूषण। जे मोदमांगल्याचे निधान।
ते कुशशय्येवरी करिती शयन। अति बलवान असे दैवगती ।। २००
दुःख कधी न ऐकिले कानांनी रामांनी। जीवन तरूपरि जपले रायांनी।
जेंवि सर्पानि मणीस नेत्रास पलकांनी। तेंवि जपती जननी तया दिनरात्र ।। १
ते आज विपिनी फिरती पदचारी। कंदमूळफळआहारी।
धिःकार कैकेयीसी मूळ अमंगलकारी। जाहली प्रतिकूल प्राणप्रिय पतीसी ।। २
धिक् धिक् मी पापसिंधु अभागी। जयामुळे सकल अनर्थ कोसळती।
निर्मी मज ब्रह्मा करून कुलकलंकी। कुमातेने केले मज स्वामीद्रोही ।। ३
ऐकून प्रेमे समजावी निषाद। नाथा का करिता वृथा विषाद।
राम तुम्हा प्रिय तुम्ही रामप्रिय हा सिद्धांत। विधि प्रतिकूल दोष दैवाचा ।। ४

करणी कठिण। विधि विपरीत। केली बुद्धि भ्रष्ट। जननीची।
रात्रीच्या समयी। प्रभु प्रशंसती। वारंवार अति। तव प्रेमा।
याचा परिणाम। मंगल जाणोनी। धीर धरी मनी। स्वामीनाथा।
तुलसी म्हणत। नसे तुजसम। रामा प्रियतम। आण तुझी ।। १

अंतर्यामी राम संकोचित। प्रेमळ अति कृपावंत।
हा विचार दृढ धरून मनात। चला आता विश्राम करायासी ।। २०१
ऐकून सख्याचे वचन धरून धीर। निवासाप्रति निघाला स्मरून रघुवीर।
ही वार्ता समजताच नारीनर। निघती बघावया स्थान अतिदुःखे ।। १
प्रदक्षिणा घालून करिती नमन। दोष देती कैकेयीस क्षणोक्षण।
अश्रूंनी भरती तयांचे विलोचन। देती दूषण प्रतिकूल विधात्यासी ।। २

एकस्तवी भरताचे प्रेमास । दुजा म्हणे निभावले नृपाने स्नेहास ।
निंदून आपणा कोणी स्तविती निषादास । विमोह विषाद तो कोण वानील ॥ ३
ऐशापरी जागती रात्री सकल जन । प्रभाती जाती नौकेने उतरून ।
सुंदर नावी गुरूस चढवून । नविन नावी बैसविती मातांसी ॥ ४
गंगा पार करिती सकल चार घडीत । तव सांभाळी सकला उतरवून भरत ॥ ५
प्रातःक्रिया करून वंदून मातांस । करी नमन मग गुरूचरणांस ।
अग्रभागी ठेवून निषादगणांस । चालवी निज सेना तयामागे ॥ २०२
पुढे ठेवून निषादनाथास । चालविले मातांच्या शिबिकांस ।
संगे देई बोलावून लघुबंधूस । मग गुरु गमन करिती विप्रांसह ॥ १
गंगासरितेस करून प्रणाम । स्मरून लक्ष्मणासह सीताराम ।
अलंकृत अश्व संगे बांधून लगाम । चालला भरत अनवाणी पायीच ॥ २
वारंवार सुसेवक कथिती । नाथ अश्वारूढ का न होती ।
वदे भरत राम तर पायींच जाती । मजसाठी मात्र हे गजवाजीरथ ॥ ३
शिरावर चालणे मजसी उचित । सेवकधर्म कष्टतम सर्वात ।
ऐकून कोमल वचन सेवक व्यथित । बघून दुःखित भरताची गती ॥ ४
तिसरे प्रहरी मग भरत । पवित्र प्रयागी प्रवेश करीत ।
मुखे सीताराम सीताराम वदत । अति प्रेमाने उचंबळून ॥ २०३
तयाच्या पायी फोड झळकती कैसे । कमल कोशावर दव बिंदु जैसे ।
आज भरत पायी येत ऐसे । वृत्त ऐकून अति दुःखित सकल ॥ १
कळले भरता जाहले सकलांचे स्नान । केला प्रणाम मग त्रिवेणीवर येऊन ।
सविधि श्वेतश्याम जळात स्नान करून । दिधले दान सन्माने विप्रांस ॥ २
पाहून लहरी श्यामल धवल । होई तनु पुलकित जोडी करकमल ।
वदे भरत हे तीर्थराज कामप्रद सकल । प्रकट प्रभाव हे जगी वेद विदित ॥ ३
मागतो भिक्षा सोडून निज धर्म । दुःखार्त न करी कोणते कुकर्म ।
हे जाणून सुजाण सुदाता परम । याचकाच्या वाणीस सफळ करिती ॥ ४
न वांछी मी धर्म अर्थ वा काम । न रुचे मज निर्वाण वा मोक्षधाम ।
जन्मोजन्मी राहो रामपदी प्रेम । मागतो हेच वरदान न अन्य ॥ २०४

समजोत स्वये राम मज कुटिल । हा गुरुस्वामी द्रोही म्हणोत सकल ।
मम सीताराम पदी प्रेम निर्मळ । अनुदिनी वाढो तव प्रसादाने ।। १
विसरो चातकास मेघ जन्मभर । जळ याचता वर्षो पाषाण वज्र ।
घटता चातक घोष न राही मेघ थोर । भलेपण मिळे होता वृद्धिगत प्रेम ।। २
अग्नीत तप्त होता चमके सुवर्ण । तैसें प्रियतमपदी व्रत घ्यावे निभावून ।
ऐकून भरताचे वचन त्रिवेणीतून । जाहली शुभद मृदु वाणी ।। ३
सर्वपरी साधु तू हे तात भरत । रामचरणी तव प्रेम अगाध ।
वृथा न धरावा मनी खेद । तुजसम न अन्य प्रिय रामास ।। ४
ऐकून अनुकूल त्रिवेणीवचन । भरततनु पुलकित हृदय प्रसन्न ।
धन्य धन्य भरता ऐसे वदून । वर्षती सुमने सुर हर्षे ।। २०५
प्रमुदित तीर्थराजनिवासी । वानप्रस्थ ब्रह्मचारी गृहस्थ संन्यासी ।
दहापाच मिळून कथिती परस्परांशी । पवित्र सत्य भरताचे प्रेमशील ।। १
ऐकून सुंदर रामगुणसमूहास । भरत पोचे भारद्वाजमुनि आश्रमास ।
बघून तयाच्या दंडवत प्रणामास । मानिती मुनि मूर्तिमंत निजभाग्य ।। २
उठविती धावून हृदयी धरिती । देऊन आशीर्वाद कृतार्थ करिती ।
बैसे नमवून शिर जंव आसन देती । जणूं संकोच-गृही शिरू वांछी धावून ।। ३
मुनि पुसतील काही म्हणून दुःखित । वदति ऋषि जाणून भरत संकोचित ।
ऐक भरता कळले मज सकलवृत्त । न चाले मात्रा विधिघटनी ।। ४
जाणून मातेची ही करणी । न धरावा शोकभाव मनी ।
गेली शारदा तिची मति फिरवूनी । हे तात कैकेयी न दोषी जाण साच ।। २०६
न भले म्हणतील कोणी या वचनास । बुधांची संमति लोकवेद उभयांस ।
बा तात गाऊन तव विमल यशास । वेद लोक दोन्ही महति पावतील ।। १
जयास पिता देई राज्य तो राज्यपाल । हे लोकी वेदी मान्य सकल ।
बोलावून अर्पिते राज्य सत्यव्रत नृपाळ । तरः धर्म राखून मिळते सुख मोठेंपण ।। २
रामाचे वनगमन अनर्थाचे मूळ । ऐकून सकल विश्वात उठला शूळ ।
राणी अज्ञानी भवितव्यता प्रबळ । करून कुचाळी अंती पस्तावे ।। ३
जो म्हणेल तव अल्प अपराध तयात । तो जाणावा अज्ञ असाधु नीच ।
राज्य करताही तुज दोष न लागत । ऐकून संतोष होत रामासीही ।। ४

आता अति भले केलेस तू भरत । हेच मत तुजसाठी असे उचित ।
रघुवीराचे चरणी स्नेह सतत । हेच जगी सकल मांगल्याचे मूळ ॥ २०७
रामप्रेम तव धन जीवन प्राण हे तात । कोण तुज सम असे भाग्यवंत ।
नसे यात काही विस्मयजनक । तू दशरथपुत्र रामाचा प्रिय बंधू ॥ १
ऐक भरता रघुवीरांच्या मनी । तुज सम न अन्य प्रेमासी पात्र कुणी ।
घालविती अति प्रेमे तुज स्तवुनी । राम-सीता-लक्ष्मण ती रात्र ॥ २
जाणिले मर्म करिता ते प्रयागी स्नान । तव होते तव प्रेमी तल्लीन ।
तुजवरील रघुवीर स्नेहमहान । सुख जीवनी जैसा मूढ नराचा जगी ॥ ३
न मानावी थोरवी ही रघुवीराची । भक्तपरिवाराचे राम पालन करिती ।
हे भरता ऐसी निश्चित मम मती । तू जणु देहधारी रामप्रेम ॥ ४
भरता वाटे तुजसी हा कलंक । परि आम्हासी तो उपदेश उचित ।
या समयी हा श्रीगणेशा शुभद । रामभक्तिरस सिद्धिस्तव ॥ २०८
तात नव चंद्रमा तव विमल यश । कुमुदचकोर हे रघुवराचे दास ।
हा उदित सदा शशि न अस्त तयास । न क्षय जगरूपी नभी दिन दिन वृद्धीच ॥ १
त्रैलोक्य चक्रवाक करील प्रीती । प्रभूचा प्रतापरवि न हरेल तत्कांती ।
सदा निशिदिनी शशि सर्वा सुखद अती । कैकयी कुकर्मरूपी राहून ग्रासील तया ॥ २
हा चंद्रमा रामप्रेम सुधेने पूर्ण । गुरु अपमान रूपी दोषे न तया दूषण ।
वसुधेवरी सुधा सुलभ करून । केले तू रामभक्त तृप्त अमृताने ॥ ३
भगीरथाने आणिली गंगा पावन । जिचे स्मरण सकल मांगल्याची खाण ।
न करवे दशरथगुणांचे वर्णन । तयासम न अन्य जगी मग श्रेष्ठ कैसे ॥ ४
भक्ताचे प्रेमसंकोचास वश होऊन । प्रकटती श्रीराम भगवान ।
जयास बघता शंकराचे हृदयनयन । न पावती तृप्ति अजूनही ॥ २०९
निर्मिलास तू कीर्तिचंद्र अनूप । वसे जेथे श्रीराम प्रेममृगरूप ।
का ऐसा वृथा मनी दुःख ताप । पारस मिळवून भितोस दारिद्र्यास ॥ १
भरता न वदतो आम्ही असत्य वचन । राहातो वनी तपस्वी उदासीन ।
सकल साधनांचे सुफळ सुशोभन । लाभले दर्शन सीतारामलक्ष्मण यांचे ॥ २
त्या फळाचे परम फळ तव दर्शन । प्रयागराजासह आम्ही भाग्यवान ।
भरता धन्य तू जिंकिले यश महान । ऐसे वदून प्रेममग्न होती मुनी ॥ ३

मुनिवचन ऐकून सभासद हर्षित । साधु साधु वदून सुर सुमने वर्षत ।
धन्य धन्य ध्वनि गगनि प्रयागी उठत । होई तल्लीन प्रेमे भरत ऐकून ।। ४
हृदयी रामसीता पुलकित शरीर । होती तयाचे साश्रुपूर्ण सरोरुहनेत्र ।
मग मुनिगणांस करून नमस्कार । भरत वदे गद्‌गदवाणीने ।। २१०
मुनिसमाज तशात हा तीर्थराज । सत्य शपथ घेताही होईल अकाज ।
वार्ता रचून सांगणे एथे आज । या सम न अधिक अधमता पाप ।। १
आपण सर्वज्ञ मी कथितो सद्‌भावे साच । उर-अंतरज्ञानी रघुनाथ ।
न दुःख जरी जग म्हणेल नीच । मम मातेच्या कृतीस्तव न शोक मज ।। २
न भय जरी न लाभेल परलोक । न मज पितृमरणाचा शोक ।
त्रिभुवनी भरले जयांचे सुयश सुकृत । सुत प्राप्त रामलक्ष्मणासम ।। ३
रामविरहे त्यजिली तनु क्षणभंगुर । शोक त्या भूपास्तव आता न विचार ।
मुनिवेषात करिती वनोवनी संचार । रामलक्ष्मणसीता पायी अनवाणी ।। ४
वल्कल वसने फळ-आहार । कुशपर्णास पसरून शयन महीवर ।
साहती वर्षाशीत उष्णतावात अपार । करिती वास तरुतळाशी ।। २११
जाळितो सदा मम छाती हा दुःखाग्नी । निद्रा न येई रात्री न भूक दिनी ।
सकल विश्व शोधिले मी मम मनी । नसे औषध कोठेही या रोगासी ।। १
पापमूळ मातृकुविचार सुतार । मम हिताचा वाकस केला तयार ।
कलह कुकाष्ठ घेऊन रचिले यंत्र । गाडिले अवघि कुमंत्र अघोर म्हणून ।। २
मजसाठी रचिले या कुथाटा । नष्ट केले जगास करून बारा वाटा ।
हा मिटेल कुयोग राम माघारी येता । अयोध्या वसेल तदा न अन्य उपयाने ।। ३
ऐकून भरतवचन सुख वाटे मुनीस । सकल वानिती वहुपरी भरतास ।
वत्सा न करावा ऐसा शोक विशेष । मिटेल दुःख रामपद दर्शनाने ।। ४
मुनिवर सांत्वन करून वदती । व्हावे आमुचे आता प्रेमप्रिय अतिथी ।
आम्ही कंदमूळफळेफुले जी अर्पू ती । स्वीकारा आपण कृपा करूनिया ।। २१२
ऐकून मुनींचे वचन चिंता भरतास । कुसमय जाणून संकोच मनास ।
कर जोडून मग वंदी चरणास । गुरु-आज्ञा श्रेष्ठतम मानून ।। १
आज्ञा शिरी धरून करणे कर्म । नाथा हा आमुचा महान धर्म ।
भरताचे वचन मुनीस प्रिय परम । बोलाविती समीप शुचि सेवक शिष्य ।। २

केला पाहिजे भरताचा पाहुणचार । कंदमूळफळे आणा सत्वर ।
होय नाथ म्हणून नमविती शिर । जाती निज कार्या प्रसन्न मने ।। ३
चिंता मुनीस थोर अतिथि निमंत्रित । जैसी देवता तैसी पूजा करणे उचित ।
ऐकून येती ऋद्धिसिद्धि अणिमादिक । वदती द्या आज्ञा स्वामी करू तैसे ।। ४
येई समाजासह अनुजासवे भरत । रामविरहाने जाहले सकल व्यथित ।
वदती मुनिराज होऊन मुदित । अतिथि सत्कार करून श्रम मिटवू ।। २१३
ऋद्धिसिद्धि मुनींची आज्ञा शिरी धरिती । महाभाग्य आमुचे मनी मानिती ।
सकल सिद्धि परस्परा वदती । अतुलित अतिथि रामलघुबंधू ।। १
मुनिपदांस वंदून आता ऐसे करणे । होईल राजपरिवार सुखी जेणे ।
वदून ऐसे निर्मिती रुचिर भवने । लज्जित होती विमाने बघून जया ।। २
भोग वैभव निर्मिती नाना । पाहून अभिलाषा होई देवांना ।
रुचि पाहून सांभाळती अतिथींना । दासदासी मनोभावे आणून साहित्य ।। ३
न लाभती सुखे जी स्वप्नीही स्वर्गात । ती ठेविती सिद्ध सिद्धि क्षणात ।
प्रथम देती निवास सर्वांस सुखद । अति सुंदर आवडे जैसा जयास ।। ४
मग देती निवास सपरिवार भरतासी । जैसी मुनिवरांनी आज्ञा दिली तैसी ।
विस्मयदायक भासे वैभव विधात्यासी । जे निर्मिले ऋषींनी तापोबले ।। २१४
जव मुनींचा प्रभाव विलोकी भरत । तंव लोकपालांचे लोक लघु भासत ।
सुख सामुग्री कोणी न वानू शकत । ती बघून विसरती वैराग्य ज्ञानी मुनी । १
वितान आसन वसन शयन । खगमृग नाना वाटिकावन ।
फुले सुगंधित फळे सुधासमान । विमल जलाशय नानाविध ।। २
सुधेचे सुधासम पवित्र अशनपान । साधकासम लोक संकोचती पाहून ।
अभिलाषा वाटे शचिइंद्रास ते देखून । कामधेनु कल्पवृक्ष घरोघरी ।। ३
वाहे त्रिविध वायु काळ ऋतु वसंत । सकलासी सुलभ चारी अर्थ ।
माला चंदन वनितादि भोग अनेक । लोक हर्षविस्मयवश ते बघून ।। ४
चक्रवाकी संपत्ति चक्रवाक भरत । मुनि-आज्ञा जणु गारुडी भासत ।
कोंडले उभय रात्री आश्रमपिंजऱ्यात । राहिले तेथे भानु-उदय होई तो ।। २१५
भरत तीर्थराजी करून स्नान । करी सपरिवार मुनीस वंदन ।
मुनि-आज्ञा आशीर्वाद शिरी धरून । प्रार्थी दंडवत घालून ।। १

सवे कुशल पथदर्शक घेऊन । चालला चित्रकूटाप्रति चित्त देऊन ।
भरत रामसख्याचा कर करी घेऊन । निघाला जणु देहधारी रामभक्ती ।। २
नसे शिरी छाया न पादत्राण पायात । असे परि सत्य प्रेम धर्मव्रत ।
पुसे रामसीता यांचे पथकथा वृत्त । तंव वदे निषाद मृदु वचन ।। ३
विलोकून रामाचे निवासस्थानवृक्ष । अंतरी नावरे प्रेम तयास ।
बघून दशा सुर वर्षती सुमनांस । जाहली मृदुमही मार्ग मंगळमूळ ।। ४
करीत जाती छाया जलद । वायु वाहे अति सुखद ।
जैसा जाताना लाभला भरता मृदु पथ । तैसा न लाभला रामासही ।। २१६
जड चेतन जीव विपुल पथी । प्रभु जया देखे जे प्रभूस बघती ।
ते सकल मोक्षाधिकार पावती । भरत दर्शने होती भवरोगमुक्त ।। १
न काही यात भरताचे थोरपण । स्वये राम जयाचे करिती स्मरण ।
अन्या तारील वा स्वयें तरील तो जन । जो एकदाच उच्चारील रामनाम ।। २
भरत रामाचा प्रिय लघु भ्राता । का न होईल मार्ग तया मंगलदाता ।
वदती ऐसे भरताचे दर्शन घेता । अति हर्षे सिद्धसाधुमुनी ।। ३
भरताचा प्रभाव बघून सुरेश सचिंत । जग भल्यासी भले नीचासी नीच ।
वदे बृहस्पतीस न घडेल रामभेट । करावा ऐसा उपाय हे स्वामी ।। ४
रामचंद्र प्रेमवश संकोचित । प्रेमाचा पयोधि बंधु भरत ।
यत्न करून आता शोधावे कपट । न तो रचलेला व्यूह ढासळेल ।। २१७
हसले देवांचे गुरू ऐकून वचनास । जाणती मूढ सहस्रनयन इंद्रास ।
करिता माया मायापतीच्या सेवकास । हे सुरराया सत्वरी ती उलटेल ।। १
ते समयी आचरिले राम रोख जाणुनी । आता करिता कपट होईल हानी ।
इंद्रा रघुनाथाचा स्वभाव घे जाणुनी । निज अपराध करितां न रुष्ट कधी ।। २
जे भक्ताचा अपराध करिती । ते रामाच्या क्रोधाग्नीत जळती ।
हा महिमा दुर्वास जाणती । विदित वेदी लोकी इतिहास हा ।। ३
भरतासम न अन्य स्नेही रामास । जग जपे रामास जपती राम भरतास ।। ४
हे अमरपति न आणावे मनात । जेणे येईल बाधा रामाच्या भक्तकार्यात ।
परलोकी दुःख अपकीर्ति इहलोकात । प्रतिदिनी होईल वृद्धिंगत शोक ।। २१८
ऐक मम उपदेश सुरेश । सेवक प्रंचप्राण रामास ।
सेवकाच्या सेवेत मानिती सुखास । सेवकासी वैर करिता मानिती वैर ।। १

न मानिती भेदाभेद न राग न रोष । न गणती कुणाचे पापपुण्य गुणदोष ।
राखिले कर्मप्रधान जगास । जो जैसे करील तैसे चाखील फळ ।। २
तदपि करिती समविषम व्यवहार । भक्त अभक्ताचे हृदयानुसार ।
अमान आनंदमय निर्गुण निराकार। प्रेमवशे राम सगुण होती ।। ३
राम सदा पुरविती भक्तांची हौस । वेदपुराण साधुसुर यासी साक्ष ।
ऐसे जाणून सोड कपटास । ठेव भरतचरणी अति प्रीती ।। ४
परहिततत्पर रामाचे भक्त । ते दयाळु परदुःखे होती दुःखित ।
भक्त मुकुटमणि असे भरत । न धरावी तयाची भीति सुरपाला ।। २१९
सत्यव्रत प्रभु देवांचे हितकारी । रामाची आज्ञा भरत अनुसारी ।
तुम्ही स्वार्थी वृथा व्याकुळ विकारी । हा नसें भरताचा दोष मोह तुमचाच ।। १
ऐकून देवांच्या गुरूंची श्रेष्ठवाणी । इंद्र आनंदित मनी मिटली ग्लानी ।
भरताचा सुभाव सुरेश वाखाणी । उधळी फुले हर्षे तयावरी ।। २
ऐशा रीती मार्ग आक्रमी भरत । स्तविती दशा देखून मुनिसाधक ।
राम म्हणून जंव उसासा सोडीत । तंव प्रेमास पूर येई चौबाजू ।। ३
वचन ऐकून द्रवती वज्रपाषाण । न करावे नगरजनांचे प्रेमवर्णन ।
यमुनातटी येती मार्गी निवास करून । नेत्री नीर भरे यमुनेचे जळ बघून ।। ४
भरत परिवारासहित विलोकून । सुंदर जलवर्णास रघुवीरसमान ।
रामविरहवारिधीत ते जाता बुडून । चढती मग विवेकजहाजावरी ।। २२०
यमुनातीरी ते दिनी वास करिती । यथासमय सकल विश्राम करिती ।
घाटाघाटांवरील निशी नौका येती । अगणित न करावे तयांचे वर्णन ।। १
प्रभाती एका खेपी सकल पार जात । रामसखा गुहसेवेने तोषित होत ।
स्नान करून सरितेसी वंदीत । तंव उभय भ्राते गुहराजासवे जाती ।। २
अग्रभागी मुनिवर जाती वाहनी । राजपरिवार निघे तयांमागुनी ।
तयां पाठी उभय भ्राते जाती अनवाणी । चालती साधी वसनभूषणे घालून ।। ३
सवे सेवक सुहृद सचिवसुत । स्मरती सीतालक्ष्मणरघुनाथ ।
करितो प्रणाम तेथे तेथे प्रेमासहित । जेथे जेथे होता रामवास विश्राम ।। ४
मार्गस्थ नरनारी ते परिसून । धावती निजकृत्ये तैसीच सोडून ।
तयांचे सुरूप प्रेम निरखून । जन्मफळ पावून आनंदित होती ।। २२१

वदती स्त्रिया प्रेमे परस्पर । सखे हेच का गे रामलक्ष्मण तर ।
तेच वय देहवर्णरूप साचार । तयांसम शील प्रेम गति तीच ।। १
परि न तो वेष सखे न संगे सीता कोमल । सर्वां पुढती चालले चतुरंग दल ।
गडे न प्रसन्न वदन मनी विकल । सखे हाच भेद निर्मी संदेह मनी ।। २
तिचा तर्क अन्य स्त्रीगण मानिती । तुजसम न अन्य चतुर वदती ।
वाणी सत्य म्हणून तिज सन्मानिती । मग मधुर वचन वदे अन्य स्त्री ।। ३
कथिला प्रेमे कथाप्रसंग । कैसा जाहला राम अभिषेकाचा रसभंग ।
भरताचा स्वभाव शीलप्रेम मग । प्रशंसू लागे ती स्त्री भाग्यवती ।। ४
त्यजून राज्य जे पिता अर्पी ते । पदी चाले खाऊन फळमूळाते ।
जाई विनंति करण्यास रघुवीराते । कोण असे आज भरतासम ।। २२२
भरताचा बंधुभाव भक्ति आचरण । कथिता ऐकता मिटवी दुःख दूषण ।
सखे सांगावे तितुके अल्पचि वर्णन । कां न ऐसा असेल रामबंधू ।। १
आम्ही अनुजासह पाहून भरत । गणतील आम्हा धन्य युवती जनात ।
गुण ऐकून पस्तावती बघून दुःखित । हा न योग्य सुत कैकेयी मातेसी ।। २
म्हणती कोणी न द्यावा राणीस दोष । विधीने जुळविले अनुकूल आम्हांस ।
कोठे लोकवेदमर्यादे आम्ही हिणकस । कुळकर्तृत्वे मलिन क्षुद्रस्त्रिया ।। ३
आमुचा कुदेश कुग्राम नारी कुलहीन । कोठें हे पुण्यकारक परम दर्शन ।
ऐसा विस्मय आनंद भरे प्रति ग्रामातून । जणु कल्पतरू उगवे मरूभूमित ।। ४
मार्गात होता दर्शन भरताचे । भाग्य खुलले तेथील जनांचे ।
जाहले सिंहलद्वीपवासी लोकांचे । दैववशे जणु सुलभ प्रयाग तीर्थ ।। २२३
निजगुणांसह रामगुणगाथा ऐकून । भरत जाई करीत रामस्मरण ।
पंथी तीर्थ मुनिआश्रम सुरभवन । बघून करी स्नान प्रणाम ।। १
मनोमन मागे वर हाच । राहो सीतारामपदी प्रेम साच ।
भेटती वनवासी कोळी किरात । बटुयतिसंन्यासीवानप्रस्थ ।। २
पुसे ज्यास त्यास प्रणाम करून । वनी कोणत्या राहती सीतारामलक्ष्मण ।
ते करिती प्रभूचे वृत्तांत निवेदन । जन्मफल पावती भरतदर्शने ।। ३
तयांचे सांगती कुशल जे जन । ते प्रिय भरतास रामलक्ष्मणासमान ।
ऐसे सकला मृदुवचने पुसून । ऐके तो रामवनवास कथा ।। ४

तो दिन तेथे वास करून निघती । रामाचे स्मरण करून प्रभाती ।
घडावे रामदर्शन मनी लालसा अती । भरतासम सकलांस ।। २२४
होती सकलांस मंगल शकुन । स्फुरती सुखद बाहुनयन ।
भरतासह उल्हसित सकल जन । की मिटेल रामभेटीने दुःखदाह ।। १
करिती मनोरथ जैसे जया रुचती । प्रेममदिरे उन्मत्त होऊन चालती ।
शिथिल अंग पद लटपटती । प्रेमवशे वदती वचन विव्हल ।। २
रामसखा गुह ते समयी दाखवीत । शैलशिरोमणि कामद सुशोभित ।
पयस्विनी तीरी जयाच्या निकट । सीतेसह वास करिती वीर दोन्ही ।। ३
बघताच सर्व करिती दंडवत प्रणाम । वदती जय जानकीजीवन राम ।
ऐसा राजसमाज प्रेमे तल्लीन परम । जणु राम फिरती माघारी अयोध्येसी ।। ४
ते समयी होते भरतप्रेम जैसे । न वानू शके शेषही तैसे ।
कवीसही ते अगम्य कैसे । अहंममत्वे पापी जना जैसे ब्रह्मसुख ।। २२५
रघुवरस्नेहे सकल शिथिल होती । सूर्यास्त होई तो दोन कोस जाती ।
जळस्थळ बघून निशी तेथे राहती । प्रभाती करी गमन भरत रामप्रेमी ।। १
होता पहाट तिकडे श्रीराम उठती । तोच सीता सांगे निजस्वप्नस्थिती ।
राजसमाजासह भरत इकडे येती । रघुनाथाच्या विरहतापे तनु तप्त ।। २
सकल दिन दुःखी उदास मन । भासले भकास सासवाचें आनन ।
राम अश्रु ढाळती सीतेचे स्वप्न ऐकून । शोकविमोचक राम जाहले शोकवश ।। ३
वदती हे लक्ष्मणा स्वप्न अशुभ प्रतिकूल । भीषण समाचार कोणी आणील ।
मग बंधूसह केले स्नान सचैल । त्रिपुरारीस पुजून सन्मानती साधूस ।। ४
सुरांसी पुजून । वंदून मुनीस । उत्तर दिशेस । बघतात ।
नभामाजी धूळ । भिऊन पळत । प्रभु आश्रमांत खगमृग ।।
पाहून स्तिमित । कथिला येऊनी । किरात कोळ्यांनी । समाचार ।
तुलसी वदत । श्रीराम उठती । चिंतितात चिती । हेतु त्याचा ।। १
ऐकून तयांची सुमंगल वाणी । रामतनु पुलकित अति आनंद मनी ।
शरदऋतुकमलासम नयनी । दाटती प्रेमाश्रु तुलसी म्हणे ।। २२६
पुनरपि सचिंत सीतारमण । भरत-आगमनाचे न कळे कारण ।
मग कोणीएक ऐसे सांगे येऊन । चतुरंग सेना महान भरतासवे ।। १

रामासी अति चिंता ते ऐकून । बंधुस्तव संकोच इकडे इकडे पितृवचन ।
भरताचा स्वभाव मनी जाणून । नसे शांतता प्रभूच्या चित्तास ।। २
भरत साधु शहाणा मम वचनात । तंव होई समाधान हे येताच मनांत ।
लक्ष्मण जाणे प्रभूस क्षोभ हृदयात । सांगे तो नीतिविचार यथासमय ।। ३
स्वामीस न पुसता सांगू इच्छितो काही । समयी सेवकधिटाई न गर्वोक्ति ही ।
सर्वज्ञ मुकुटमणि स्वामी तुम्ही । मम मतिअनुसारे सुचवितो मी ।। ४
नाथ आपुले शुद्ध सरळ अंतःकरण । शील स्नेहाचे तुम्ही निधान ।
मानिता सकला आपणासमान । प्रेम विश्वास ठेविता सकलांवरी ।। २२७

मूढ विषयी जीव प्रभुता पावती । होऊन मोहवश ते निजरूपा प्रकटती ।
भरतसाधु सुजाण ज्ञात तया नीती । तयाचे प्रभुपदी प्रेम जगा विदित ।। १
आज रामाचे सिंहासन प्राप्त तयास । निघाला उल्लंघून धर्ममर्यादेस ।
कुटिल भरत देखून कुसमयास । जाणून राम एकाकी वनवासी ।। २
मनी कुहेतु धरून समाजासहित । राज्य निष्कंटक करण्या एथ यता ।
कोटि प्रकारे कुटिलता योजीत । येती सेनेसह दोन्ही बंधू ।। ३
जर न हृदयी दुष्टपणा कपट । कोणा रुचेल या समयी वाजीगजरथ ।
कोण वृथा म्हणेल दोषी भरत । जग होते उन्मत्त पावता राज्यपद ।। ४
शशि जाहला गुरुपत्नीरत । नहुष विप्रांस यानासी जोडीत ।
जयाने न मानिली वेदलोकरीत । त्या वेननृपासम नसे अधम कोणी ।। २२८

सहस्रार्जुन देवेंद्र त्रिशंकु । कवणा न लागे राज्यमदकलंकु ।
भरताने योजिले उपाय उचितु । न राखावे शेषही शत्रुऋणास ।। १
हे सत्य ही भरतकृति नसे उचित । रामासी न सहाय्य जाणून अवमानीत ।
बघून क्रोधपूर्ण राममुख समरात । समजेलच आज विशेष तया ।। २
इतुके वदून विसरे नीतिरस । पुलकरूपे फुलला वीररस वृक्ष ।
वंदी प्रभुपदास ठेवून शिरी रजास । मग वदे सत्य सहज बळ सांगून ।। ३
न मानावे मम वचन अनुचित नाथ । करी आमुची संभावना बहुत भरत ।
असता धनी पाठीशी धनुष्य हातात । कोठवर सोसावे मारून मन ।। ४
रघुकुळी जन्म क्षत्रिय जात । रामाचा सेवक मी जगा विदित ।
कोण असे धुळीसम नीच । लाथ मारता जी शिरी चढे ।। २२९

घेई आज्ञा उठे जोडून कर । जणू जाहला जागा निद्रिस्त रस वीर ।
कसून कटी भाता वांधी जटा शिरावर । करी बाण घेऊन धनुष्य सज्ज करी ॥ १
आज रामसेवक म्हणून यश मिळवीन । समरी भरतास धडा शिकवीन ।
रामाच्या अवमानाचे फळ पावून । समरशय्येवर झोपोत बंधु उभय ॥ २
हा आला सुयोग जमला सकल समाज । प्रकट करितो पूर्वीचा रोष आज ।
जैसा गजगणास निर्दाळी मृगराज । वा ससाणा झपाटी लावीस ॥ ३
तैसा भरत अनुज सेनेसहित । ईर्षेने तुडवून मारीन रणांगणात ।
शंकर जरी येतील साहाय्यास समरात । रामशपथ रणी मारीन मी तया ॥ ४
अति क्रोधे संतप्त लक्ष्मणास बघून । त्याची शपथ पूर्ण प्रतिज्ञा ऐकून ।
करू वांच्छिती लोकपाल पलायन । होती ते सकल भयभीत ॥ २३०
जग भयमग्न तो जाहली गगनवाणी । लक्ष्मणाचे बाहुबल विपुल वाखाणी ।
बा तात तव प्रताप प्रभाव कोणी । न जाणू शकत न वर्णवे कुणा ॥ १
कोणतेही काज उचित वा अनुचित । समजून करता सकल भले वदत ।
परि साहस दावून मग जे पस्तावत । ते न बुद्धिमान ऐसे वेदबुध वदती ॥ २
देववाणी ऐकून संकोचे लक्ष्मण । राम सीता तयाचा करिती सन्मान ।
वदती तात राजमद सर्वांत कठिण । कथिलीस सुंदर नीति तू ॥ ३
साधुसमाजा जे नृप न कदापि सेविती । ते राजपदमदिरा पिऊन उन्मत्त होती ।
ऐक लक्ष्मणा भरतासम भला अती । न देखिला वा ऐकिला विधिप्रपंचांत ॥ ४
न होईल राजमद भरतास । जरी तो पावेल ब्रह्माविष्णुशिवपदास ।
कांजी बिंदु करितील का क्षीरसिंधूचा नाश । जंव पडतील ते क्षीरसागरात ॥ २३१
तरुण भानूस तिमिर ग्रासेल । मेघामाजी गगन सामावेल ।
गोपदजळी अगस्त्य बुडतील । पृथ्वी सोडील आपुला क्षमागुण ॥ १
मशक फुंकराने मेरु उडेल । परि भरता राजमद न होईल ।
भरतासम पवित्र सुबंधु न लाभेल । हे लक्ष्मणा पित्याची आण तुझी शपथ ॥ २
गुणरूपी दूध अवगुणरूपी जळ हे तात । तयां मिसळून विधाता प्रपंच रचित ।
रविवंश तडागी जणु हंस भरत । जन्मून विभागी गुणदोष ॥ ३
गुणदुग्ध घेऊन सोडी जलदोषांस । निज यशे देई प्रकाश जगास ।
कथिता भरताचे गुणशील सुभावास । प्रेमपयोधीत बुडती रघुराज ॥ ४

रघुवराची वाणी ऐकून । तयांचे भरतप्रेम बघून ।
सुर वानिती रघुनंदन । तयासम कृपाधाम प्रभु नसे अन्य ।। २३२
न होता भरताचा जन्म जगी जर । कोण धर्मधुरा धरता धरणीवर ।
कोण जाणेल तुम्हाविण रघुवीर । कविकुलास अगम्य जे भरतगुण ।। १
ऐकून देववाणी सीतारामलक्ष्मण । जाहले अति सुखी न करवे वर्णन ।
मग भरत सकलांसह करी स्नान । पुनीत मंदाकिनी सरितेत ।। २
सरितेसमीप थांबवून जन । मातागुरूसचिव यांचा निरोप घेऊन ।
संगे निषादपती रिपुसूदन । निघाला भरत सीतारामाप्रती ।। ३
होई लज्जित स्मरून मातेची करणी । कोटि कुतर्क मनामाजी करुनी ।
न जाणार ना ते अन्य स्थळी स्थान त्यजुनी । जव सीताराम ऐकतील मम नाम ।।४
मानतील जर मी मातेसी अनुकूल । अल्पचि ते जे काही करितील ।
जव मी रामासी सहमत जाणतील । करितील क्षमा आदरे पापदोषांसी ।। २३३
जर त्यजितील मज मन मलिन मानून । वा सन्मानतील सेवक म्हणून ।
जाईन मी रामपादुकांसी शरण । राम उत्तम स्वामी दास पूर्ण दोषी ।। १
जगी यशासी पात्र चातक मीन । नेम प्रेम तयांचे नित नूतन ।
चाले पथी ऐसे मनी चिंतून । प्रेमे संकोचे तयाची शिथिल गात्रे ।। २
जव मातृकरणी येई मनात । धीर धरून तो भक्तिबळे चालत ।
जव चिंती रघुनाथाचा स्वभाव मनात । तव पथी पडती पद अतिवेगे ।। ३
ते समयी होती भरताची स्थिती कैसी । जल प्रवाहात जळ भ्रमराची जैसी ।
पाहून भरताचे शोकप्रेमासी । विसरला निषादपति देहभान ।। ४
होऊ लागले मंगल शकुन । वदे गुह ऐकून मनी चिंतून ।
मिटेल शोक होतील हर्षे प्रसन्न । परि परिणामी दुःख सकलांना ।। २३४
गुहवचनास सत्य मानी भरत । पोचला मग आश्रमानिकट ।
पाहून वनशैलसमूह सुशोभित । जणु मुदित क्षुधित मिष्टान्न पाहून ।। १
दैवी आपत्तीने प्रजा दुःखित । ग्रह महामारी त्रिविध तापे पीडित ।
परि जाता सुदेशी सुराज्यी सुखी होत । तैसी गति जाहली भरताची ।। २
रामनिवासे वनश्री प्रफुल्लित । सुखी प्रजा जणु सुराजा पावत ।
सचिव वैराग्य नरेश विवेक । विपिन देश सुंदर पावन ।। ३

योद्धे हे यमनियम शैल राजधानी । शांति सुमति या शुचि सुंदर राणी ।
श्रेष्ठ नृप राज्याचे अंग संपन्न असुनी । रामचरणाश्रित चित्त आनंदित ।। ४
जिंकून मोहमहीपालास । दलासहित विवेक नरेश ।
करून सुखसंपदा सुकाळास । विवेक भूपाळ निष्कंटक राज्य करी ।। २३५
वन प्रदेशी बहुत मुनींचे आश्रम । जणु तेच पुरनगरग्राम ।
प्रजासमाज न वर्णवे अनुपम । नाना विपुल विहंगमृगरूप ।। १
वाघवराहसिंहहत्ती । महिषवृषभ पाहून ते स्तवावे किती ।
वैर विसरून संगे सर्वत्र विचरती । हेच विवेक राजाचे चतुरंग दल ।। २
निर्झर झरती गज मत्त गर्जती । हीच रणवाद्ये जणु विविध वाजती ।
मुदित मने हंस सुंदर कूजती । तैसे शुकपिकचातकचकोरगण ।। ३
भृंग करिती गुंजारव नाचती मोर । जणुं सुराज्यी आनंद मंगल अपार ।
वेलिवृक्ष फूलफळसंभार । सकल समाज मोदमांगल्यांचे मूळ ।। ४
श्रीरामाच्या शैलाची शोभा निरखून । भरताचे हृदय जाहले प्रेमपूर्ण ।
जैसे हर्षित तपस्वी तपाचे फळ पावून । व्रतनेमाची समाप्ती करी ।। २३६
तंव धावून उंच चढे केवट । भरतासी वदे उचलून हस्त ।
वृक्ष विशाल पाहावे नाथ । तमालआम्रपाकळजांभूळ ।। १
तरुवरात शोभे वटवृक्ष विशाल । मनासी मोहवी सुंदर शीतळ ।
तयास पल्लव सघन नील लाल फळ । सुखद छाया सर्व काळ ।। २
जणु तिमिरअरुणांच्या राशी । विधाता रची सकल सुषमेसी ।
स्वामी हा तरु सरितातीरापाशी । रघुवीरपर्णकुटी तया निकट ।। ३
तुलसी तरुवर विविध सुशोभित । कोठे सीते कोठे लक्ष्मणे रोपित ।
सीतेने रचित वेदिका वटछायेत । सुंदर निज कमल हस्तांनी ।। ४
जेथे मुनिगणांसह बैसून । नित्य सीताराम सुजाण ।
ऐकती कथाइतिहासपुराण । तैसेच शास्त्रवेदांत ।। २३७
निरखी वृक्ष ऐकून गुहाचे वचन । अश्रु ओघळती भरताचे नयनातून ।
चालती दोघे बंधू वृक्षास नमून । ती प्रीति वानिता लाजे शारदाही ।। १
हर्षित बघून रामपदचिन्हास । जणु लाधले परीस रंकास ।
रज शिरी धरून लाविती उरनयनांस । रामभेटीसम सुख पावती ।। २

अकथ अतीव भरत दुःख बघून । जड जीव खगमृग प्रेममग्न ।
चुकला मार्ग गुह प्रेमवश होऊन । तंव सुपंथ दावून वर्षती फुले सुर ।। ३
सिद्धसाधक ही भक्ति पाहून । करिती प्रेमे भक्ताचे गुणगान ।
जडास चेतन चेतनास जड करी कोण । जर न जन्मता भरत भूतळी ।। ४
प्रेम हे अमृत विरह अचल मंदार । भरत पयोनिधि गंभीर ।
स्वये कृपासिंधु रघुवीर । मंथिती समुद्र सुरसाधुहिता ।। २३८
ही मनोहर जोडी सख्या समवेत । न बघू शके लक्ष्मण घनदाट वनात ।
प्रभूचा आश्रम पावन बघे भरत । सुंदर धाम सकल सुमंगलाचे ।। १
शमला भरताचा दुःखाग्नि करिता प्रवेश । जणु परमार्थ प्राप्ति होई योगीयास ।
प्रभूच्या पुढे पाही भरत लक्ष्मणास । प्रभु पुसता तो प्रेमे वचन वदत ।। २
शिरीजटा कटी कसलेले मुनिपट । तयात भाता स्कंधी चापशर हातात ।
वेदीवरी मुनिसाधुसंतगणात । विराजती रघुराज सीतेसह ।। ३
जटिल तनु श्यामल वल्कल वसन । जणु मुनिवेषात रतिमदन ।
करकमळे फिरविती चापवाण । बघता हसताना हरती भवताप ।। ४
मुनि मंडलामाजी विलसत । सुंदर सीता रघुनाथ ।
जणु तनुधारी ज्ञानसभेत । शोभती भक्तिसच्चिदानंद मूर्ती ।। २३९
गुह अनुजासह प्रेमे तल्लीन भरत । विसरे सुखदुःख हर्षशोक ।
वदून रक्षावे हे स्वामी रक्षावे नाथ । पडे भूतळी भरत काष्ठदंडापरी ।। १
ओळखे लक्ष्मण वचन प्रेमपूर्ण । जाणे मनी भरत करी नमन ।
तिकडे तो प्रवळ स्वामीसेवेआधीन । ओढी इकडे बंधुप्रेम तयास ।। २
न जाववे भेटीस न सोडवे परी । लक्ष्मण मनाची गति कवि वर्णन करी ।
ठेवी भार अखेर सेवेवरी । जणु उंच पतंगास ओढीत खेळाडू ।। ३
वदे लक्ष्मण प्रेमे नमून । हे रघुनाथा करितो भरत वंदन ।
प्रेमे अधीर उठती राम ऐकून । कुठे वस्त्र कुठे पडे भाता धनुष्य तीर ।। ४
भरतासी कृपानिधान । उरी कवटाळिती बळेच उठवून ।
बघून भरतराममीलन । विसरती सकल देहभान ।। २४०
कैसी वानावी ती मीलनप्रीती । कायावाचामने कवीस अगम्य ती ।
प्रेमपूर्ण उभय भ्राते होती । विसरून मन बुद्धि चित्त अहंकार ।। १

सांगा ते श्रेष्ठ प्रेम कोण प्रकट करील । कविमति कोणाच्या छायेस अनुसरील ।
कवींचे बळ अर्थाक्षरावरी राहील । तालगीत-अनुसार नट नाचे ।। २
अगम्य प्रेम भरतरघुवीराचे । न तेथे मन पोचेल विधिहरीहरांचे ।
मंदमति कैसे मी वर्णन करू तयाचे । तृणतंतूने निघेल का सुरेल सुर ।। ३
सुरगण रामभरताचे मीलन बघती । परि भयभीत अति उरी धडकी ।
समजावता सुरगुरू मूढ जागे होती । प्रशंसती मग सुमने वर्षून ।। ४
राम भेटती प्रेमे शत्रुघ्नासी । तैसेच प्रेमे निषादराजासी ।
भरत अति स्नेहे भेटे लक्ष्मणासी । जव तो प्रणाम भरतास करी ।। २४१
लक्ष्मण भेटे लडिवाळे लघु बंधूस । मग आलिंगी हृदयी निषादास ।
भाऊ दोघे वंदिती मुनिगणास । इच्छित आशीर्वाद पावती आनंदे ।। १
प्रेमे उचंबळून अनुजासह भरत । सीतापदकमलधूळ शिरी धरीत ।
वंदिता पुन्हा पुन्हा सीता तया उठवीत । बैसवी करकमळ ठेवून शिरी ।। २
देई मग आशीर्वाद सीता मनी । हरपे तो देहभान प्रेममग्न होऊनी ।
सर्वपरि सीता अनुकूल पाहुनी । गेले कल्पित भय होई शोकरहित ।। ३
न बोले काही कोणी न पुसे कोणी । देहभान हरपून प्रेममग्न मनी ।
ते समयी केवट धीर धरूनी । कर जोडून विनवून वदे ।। ४
हे नाथा मुनिनाथा समवेत । येती सकल मातानगरलोक ।
सर्व सचिव सैनिक सेवक । विरहे अति व्याकूळ होऊन ।। २४२
शीलसिंधु राम गुरु-आगमन ऐकून । सीतेसमीप बैसविती शत्रुघ्न ।
वेगे निघती ते समयी रघुनंदन । धर्मधुरंधर दीनदयाळ ।। १
अनुजासह गुरूचे दर्शन घेऊन । प्रभु करिती तयांना नमन ।
हृदयी धरिती मुनिवर धावून । प्रेमभरे भेटती उभय बंधूंस ।। २
सांगे निज्नाम प्रेमे पुलकित केवट । दुरून घाली मुनीस दंडवत ।
रामसखा मानून ऋषि हृदयी धरीत । जणु महीवर लोळे प्रेम ते सावरती ।। ३
सुमांगल्याचे मूळ रघुपतीची भक्ती । स्तवून देव नभी फुले उधळती ।
कोण वसिष्ठासम श्रेष्ठ उज्वल जगी । न सर्वथा नीच कुणी केवटासम ।। ४
वसिष्ठ मुनिवर निषादास बघती । लक्ष्मणाहून अधिक आनंदे तया भेटती ।
हा प्रकट प्रताप प्रभाव मानिती । सीतापती रामचंद्राच्या भक्तीचा ।। २४३

सकल लोक दुःखार्त जाणून । सुजाण करुणाकर भगवान ।
जैसा जयाचा भाव अभिलाषा पाहून । पुरविती तयाची रुची तैसी । १
पळात अनुजासह सकलांस भेटती । दारुण दुःखदाह दूर करिती ।
न रामासी यांत अति महती । जैसा कोटी घटांत प्रकाशे रवी एक ।। २
प्रेमभरे जन केवटास भेटती । भाग्य तयाचे सकल वानिती ।
मग दुःखित मातांसी राम बघती । जणु निस्तेज सुवेलीपंक्ती हिमपतने ।। ३
राम प्रथम कैकेयीस भेटती । भावभक्तीने तिज खुलविती ।
पायी पडून तिजसी बोध करिती । वदती हा दोष दैवकाळकर्माचा ।। ४
भेटती मातेसी राम दयाघन । संतोषविती तयांना करून सांत्वन ।
हे माते जग ईश-आधीन । न दोष द्यावा कवणासी ।। २४४
गुरुपत्नीच्या पदांस बंधु वंदिती । विप्रस्त्रियांच्या संगें ज्या येती ।
गंगागौरीसम सर्वां सन्मानिती । देती आशीर्वाद त्या मुदित मने ।। १
वंदून सुमित्रेसी समीप बैसती । जणु अति दारिद्रचासी भेटे संपत्ती ।
भ्राते मग कौसल्येच्या चरणी पडती । प्रेमे शिथील तयांची सर्व गात्रे ।। २
माता प्रेमभरे धरी पोटाशी । प्रेमाश्रूंनी न्हाऊ घाली तयासी ।
कवि कैसे वानील त्या हर्षविषादासी । कैसा मूक सांगेल स्वादास ।। ३
राम अनुजासह भेटती मातेस । मग गुरूस वदती यावे आश्रमास ।
नगरजन पावताच मुनीच्या आज्ञेस । जळस्थळ सोय देखून उतरती ।। ४
गुरुविप्रमंत्रीजननी । सवे वेचक जन घेउनी ।
भरतरामलक्ष्मण निघती तेथुनी । जाती निज पावन आश्रमात ।। २४५
सीता येवोनी धरी मुनिवरांचे पद । पावे आशीर्वाद उचित जो इच्छित ।
गुरुपत्नी मुनिस्त्रियांसहित । भेटे सकला प्रेमभरे न वर्णवे ।। १
मग वंदी सीता पृथक् सकलांसी । आशीर्वाद मिळे प्रिय जो तिजसी ।
जंव सीता सुकुमारी बघे सासवांसी । तंव झाकी नयन भीतीने ।। २
जणु राजहंसिनी पारधवश होती । निष्ठुर दैवाने आणिली कैसी आपत्ती ।
सासवा अति शोकाकुल सीतेसी निरखिती । चिंतिती सोसावे दुःख दैव सहवील जे ।। ३
जनकसुता तंव धरूनी धीर । भेटे सकल सासवांना सत्वर ।
नीलनलिनी लोचनी आणून नीर । पसरे तंव करुणरस महीवरी ।। ४

पडून सीता सासवांच्या पदी । भेटे तयांना प्रेमे अती ।
प्रेमवश हृदये तिज आशीर्वाद देती । लाभो तुज अखंड सौभाग्य ।। २४६
स्नेहे विकल पाहून सीता सकलराज्ञी । बैसावे आता कथिती गुरूज्ञानी ।
परमार्थ गाथा सांगती तंव मुनी । असे जगाची गति मायामय ।। १
ऐकविले नृपाचे स्वर्गास गमन । दुःसह दुःख रघुनाथास ते ऐकून ।
निजप्रेम मृत्यूचे कारण जाणून । धैर्यधुरंधर राम अति व्यथित ।। २
ऐकून वज्रकठोर कटू वाणी । विलपती लक्ष्मण सीता सकल राज्ञी ।
जणु आजचि जाहला नृपमृत्यु मानुनी । सकल समाज जाहला शोकाकुल ।। ३
मुनि बहुपरी समजाविती रामास । करिती सकल सरितेत स्नानास ।
प्रभु पाळिती निर्जळ व्रतास । मुनिआज्ञेने न प्राशती जळ कुणी ।। ४
रघुनंदन दुसरे दिनी प्रभाती । जी मुनीवर तया आज्ञा देती ।
प्रभु भक्तिश्रद्धेसह ती पाळिती । करिती आदरे सर्व क्रिया ।। २४७
करिती पितृक्रिया वेदविधियुक्त । राम पापतमनाशक रवि होती पुनीत ।
जयाचे नाम पातकरुईसी पावक । सुमंगलाचे मूळ स्मरणमात्रे ।। १
साधुसंमत शुद्ध रघुनंदन । जैसे तीर्थांच्या आवाहने गंगा पावन ।
जाहले शुद्ध होताच दोन दिन । मग प्रेमे वदती राम मुनिवरांसी ।। २
नाथ सकल लोक अति दुःखित । कंदमूळफळआहार घेत ।
माता सचिव सानुज भरत । पाहून तया भासे पळ मज युगासम ।। ३
सर्वांसह पदार्पण करावे नगरीत । आपण वनी नरेश स्वर्गात ।
ही धिटाई वदलो बहुत । स्वमी करावे उचित तैसे ।। ४
म्हणती मुनि हे धर्मसेतु करुणायतन । का न ऐसे वदाल कृपानिधान ।
लोक दुःखित दर्शन चारदोन दिन । घेऊन पावतील शांतिलाभ ।। २४८
ऐकून रामाचे वचन जन भयभीत । जणु जहाज कंपित जलनिधीत ।
वाटे वाहतो अनुकूल मरुत । जंव गुरुवाणी मंगळमूळ ऐकती ते ।। १
करिती त्रिकाळस्नान पयस्विनीत । जिचे दर्शनाने पापाचा ओघ नष्ट ।
मंगलमूर्ति राम नयनभरे देखत । घालून दंडवत तयांना आनंदे ।। २
कामदगिरि वन बघावया जाती । नसे जेथे दुःख सकल सुखे असती ।
सुधासम जलपूर्ण झरे झुळझुळती । हरिती त्रिविधताप त्रिविध वायू ।। ३

वृक्षवेलीतृण जाती अगणित । फुले फळे पल्लव नानाविध बहुत ।
सुंदर शिला तरु छाया सुखद । कोण वर्णील शोभा वनश्रीची ।। ४
सरी सरोरुह जलविहंग । कूजती गुंजती मधुर भृंग ।
वैररहित विहरती विपिनी मृग । तैसेच विहंग बहुरंगी ।। २४९
वनवासी कोळी भिल्ल किरात । सुधासम मधुर स्वादिष्ट पुनीत ।
भरभरून आणिती रुचिर द्रोणात । कंदमूळ फळ अंकुर गुच्छ ।। १
विनये सकला देती करून प्रणाम । सांगती स्वादभेद गुण नाम ।
न घेती ते जन देता बहु दाम । माघारी देताना रामशपथ घेती ।। २
वदती स्नेहमय मृदु शब्द । प्रेम ओळखून सन्मानती साधुसंत ।
पुण्यवान आपण आम्ही नीच निषाद । लाभले आपुले दर्शन रामकृपे ।। ३
आम्हांसी आपुले दुर्लभ दर्शन । जणु मरुदेशी गंगापावन ।
रामकृपाळु निषादावरी प्रेम महान । जैसा राजा तैसा प्रजापरिवार ।। ४
सोडावा संकोच ऐसे हृदयी जाणून । कृपा करावी भक्ति पाहून ।
फळे तृण अंकुर स्वीकारून । करावे कृतार्थ आम्हांसी ।। २५०
आपण प्रिय पाहुणे आला वनात । सेवेयोग्य न आम्ही भाग्यवंत ।
स्वामी देणार काय आम्ही किरात । मित्रता आमुची केवळ काष्ठपर्णांशी ।। १
हीच आमुची सेवा थोर । न चोरले आपुले वस्त्रपात्र ।
कुलहीन आम्ही आमुचा दुष्ट आचार । जीव हिंसक कुटिल जड जीव ।। २
पाप करिता घालवितो दिनरात्र । न अन्न पुरेसे पोटास नसे कटीस वस्त्र ।
कैसी धर्मबुद्धि स्वप्नी आम्हांस साचार । प्रभाव हा केवळ रामदर्शनाचा ।। ३
जैहूंनी देखिले प्रभुपदपद्मांस । तैहूनी मिटले दुःसह दुःख दोष ।
वानिती सकल किरात भाग्यास । नगरवासी जन प्रेमे ऐकून ।। ४
किरात अभंग भाग्यास । सकल स्तविती । वचन ऐकती । प्रेमभरे ।
रामपदी स्नेह । वचनी मीलनी । जन ते पाहुनी । सुखावती ।
निज सुप्रेमास । धिक्कारिती जन । ऐकून वचन । भिल्लिणींचे ।
रघुवर कृपे । म्हणत तुलसी । घेऊन नौकेसी । तरे लोह ।। १
विहरती चारी दिशेसी वनी । जन प्रमुदित प्रतिदिनी ।
जैसे प्रथम वर्षासरीने पुष्ट होऊनी । संचरती प्रसन्न मयुर दर्दुर ।। २५१
नगरपुरुषललना प्रेमपूर्ण । जाती क्षणासम निघून दिन ।
प्रति सासूस्तव सीता वेष घेऊन । आदरे सेवी सकलांना । १

रामाविण कुणी मर्म न जाणत । सकल माया सामावती सीतामायेत ।
सेवेने सीता सासवांस वश करीत । देती उपदेश अशीर्वाद सुखी होवोनी ॥ २
पाहून सीतेसह सरळ बंधुस्वभावास । पूर्ण पश्चात्ताप होईल कुटिल राणीस ।
विनवी कैकेयी पृथ्वीयमराजास । परि मही न घेई पोटी न देई विधिमृत्यू ॥ ३
कवि वदती हे लोकीवेदी विदित । रामविमुखास न लाभे स्थानही नरकात ।
संशय हाच येई सकलमनात । अयोध्यी येतील राम ना हे विधात्या ४
निशी ना निद्रा ना दिनी भूक । ऐसा पवित्र शोके व्याकुळ भरत ।
जणु तडफडे मीन तळचिखलात । घटता जळ सरोवरी ॥ २५२
मातृमिषे करी अनर्थ काळ । जैसी दैवी अपत्तीची भीति पिकता साळ ।
अभिषेक रामासी कैसा होईल । मजसी न सुचे उपाय भरत चिंती ॥ १
गुर्वाज्ञा मानून माघारी फिरतील । रामरुचि पाहून मुनि वदतील ।
सांगता कौसल्या नगरी येतील । परि कैसा हट्ट धरील रामजननी ॥ २
काय कथा मम मी तर सेवक । कुसमय असून दैव विपरीत ।
घडेल घोर कर्म जर करीन हट्ट । शिवकैलासाहून सेवकधर्म कठिण ॥ ३
एकहि युक्ति मनी न निश्चित । रात्र सरली भरत सचिंत ।
प्रातः स्नान करुन प्रभूस वंदीत । मग बैसताच पाचारती वसिष्ठ ॥ ४
गुरु पदकमलांसी करून वंदन । बैसे भरत आज्ञा घेऊन ।
सकल विप्रसचिवमहाजन । प्रजाजन सभासद येऊन जमती ॥ २५३
बोलती मुनिवर समय पाहून । ऐका सभासद हो हे भरत सुजाण ।
भानुकुल भानु धर्मधुरीण । राजा राम स्ववश भगवान ॥ १
सत्यप्रतिज्ञ श्रुतिमर्यादापालक । रामअवतार जगमंगलकारक ।
खलदलनिर्दालक देवहितकारक । पाळिती आज्ञा गुरुमातापिता यांची ॥ २
नीतिप्रीतिस्वार्थपरमार्थ । रामासम न जाणती कोणी यथार्थ ।
विधिहरीहररविशशिदिक्पालक । मायाजीव सकल कर्मे काळ । ३
शेषमहीप आदींची महती । योगसिद्धि निगमागम गाती ।
तयांना हृदयात चिंतून अंती । श्रेष्ठ श्रीरामांची आज्ञा सकल शिरी ॥ ४
रामाची रुची आज्ञा यांचे पालनात । होईल आपणा सर्वांचे हित ।
आता सकलांस मिळून जे संमत । तुम्ही सुजाण जाणून करा ते ॥ २५४
सुखद सकला रामाचा अभिषेक । मोदमांगल्यमूळमार्ग हा एकच ।
कैसे येतील अयोध्येत रघुनाथ । सांगा चिंतून तोच उपाय करू ॥ १

नीतिस्वार्थपरमार्थपूर्ण । मुनिवरांची वाणी आदरे ऐकून ।
वदे भरत मग कर जोडून । जंव जन स्तिमित न उत्तर ये ।। २
जाहले भानुवंशी बहुत भूपवर । एकाहून एक अधिक थोर ।
मातापिता जन्मास कारण मात्र । देई विधाता शुभाशुभकर्मफळ ।। ३
सकला कल्याणप्रद मिटवून दुःखास । ऐसा आशीर्वाद आपुला विदित जगास ।
हे स्वामी आपण रोखता विधिगतीस । आपण करिता निश्चय टाळू शके कोण ।।४
आता गुरुवर पुसती मज उपाय । जाणतो मी हे मम दुर्भाग्य ।
ऐकून भरताचे वचन प्रेममय । प्रेमपूर उसळे गुरुहृदयी ।। २५५
गुरु वदती रामकृपे हे सत्य तात । मिळे न रामविमुखा सिद्धि स्वप्नात ।
परि मज संकोच्र एक वृत्तकथनात । सोडती अर्ध पंडित जाता सर्वस्व ।। १
जा तुम्ही वनात उभय भ्राते । फिरवा माघारी सीतारामलक्ष्मणाते ।
बंधु हर्षित ऐकता वचनाते । होती गात्रे प्रेमानंदे पूर्ण ।। २
मन प्रसन्न विराजे तेज तनूवर । जणु नृप सजीव राज्यारुढ रघुवीर ।
लघु हानि लोकांस लाभ अतिथोर । रडती राज्ञी सुखदुःख सम जाणून ।। ३
वदे भरत जर मुनिवचन मानाल । तेणे जीवमात्र पावेल ईप्सित फळ ।
घालवीन काननी मम जन्म सकल । नसे मज सुख याहून अधिक ।। ४
रामसीता यांसी असे अंतरज्ञान । आपण सर्वज्ञ अति सुजाण ।
जर कथिता आपण हे सत्यवचन । तर दावावे करून सत्य ते नाथ ।। २५६
भरतभक्ति बघून ऐकून वचन । सभेसहित विसरती मुनि देहभान ।
जणु भरत महिमासागर महान । मुनींची बुद्धि उभी तीरी अबलेपरी ।। १
बुद्धिप्रयत्न करून जाऊ इच्छी पार । परि नौका जहाजतराफ मिळणे दुस्तर ।
कोण अन्य वानील भरताचा महिमा थोर । मावेल का सिंधुजळ सरशुक्तीत ।।२
मुनिमनासी प्रिय झाला भरत । जाति रामाप्रति समाजासहित ।
राम देती आसन घालून दंडवत । बैसती सकल ऐकून मुनिआज्ञा ।। ३
देशकालसमय-अनुसार । बोलती वचन चिंतून मुनिवर ।
ऐका हे सर्वज्ञ सुजाण रघुवीर । धर्मगुणनितिज्ञानाचे निधान । ४
सर्वांतरयामी आपुला वास । जाणता सर्वांचे भाव कुभाव विशेष ।
सांगा उपाय साधावे कैसे हितास । नगरजन जननी भरत यांचे ।। २५७
न कधी विचार करून वदती आर्त । जुगारी निज खेळात सुचित ।
हे नाथ उपाय आपुल्या हातात । मग राम वदती ऐकून मुनिवचन ।। १

हितकर सकला सांभाळणे आपुले मन । आज्ञा पाळणे प्रसन्न मनें सत्य मानून ।
प्रथम मज आज्ञा द्याल ती पाळीन । चढवून ती मम मस्तकावरी ॥ २
स्वामी जैसी आज्ञा जयास कराल । सेवक ती सर्वपरी मानतील ।
मुनि म्हणती राम सत्य हे बोल । परि न सुचे विचार भरताच्या प्रेमे ३
कथितो म्हणून वारंवार । मम मति भरतभक्तीस वश साचार ।
शिवसाक्ष होईल सकल श्रेयस्कर । भरताची रुचि राखून मज वाटे । ४
आदरे ऐकून भरताच्या विनंतीते । करावे मग तयावरी विचाराते ।
मनी चिंतून साधुमतलोकमताते । तैसेच निगमसार नृपनीतीस ॥ २५८
पाहून गुरुंचे भरतावरील प्रेमास । जाहला रामहृदयास आनंद विशेष ।
धर्मधुरंधर जाणून भरतास । निज सेवक कायावाचामने ॥ १
वदती राम गुरु आज्ञेसी अनुकूल । वचन मंजु मृदु मंगलमूळ ।
नसे भरतासम बंधु भुवनी अखिल ।नाथ आपुली शपथ पितृचरण आण ॥ २
जे जन गुरुपदकमली रत । ते भाग्यवान लोकी वेदी विदित ।
गुरु जयावरीं प्रेमे अनुरक्त । त्या भरताच्या भाग्यास वानील कोण ॥ ३
संकोच बुद्धीस बंधु लहान जाणून । करताना भरत मुखावर स्तुतिमहान ।
करावे सांगेल भरत ते शुभ मानून । ऐसे वदून जाहलें राम स्तब्ध ॥ ४
तंव मुनि वदती भरतास । हे तात सोडून सकल संकोचास ।
तव कृपासिंधु प्रिय बंधूस। सांगावे जे असेल हृदयात ॥ २५९
ऐकून मुनिवाणी रामांचा रोख बघून । गुरु स्वामी राम अनुकूल जाणून ।
सकल भार निज शिरावर ओळखून । भरत न वदू शके विचार करी ॥ १
पुलकित गात्रे भरत उभा सभेत । प्रेमाश्रु तरळतीं कमल नयनात ।
मज सांगावे वाटते ते कथिती मुनिनाथ । अधिक याहून मी काय वदू ॥ २
जाणतो मी प्रभूच्या स्वभावास । अपराध्यावरी कदापि न करिती रोष ।
मजवरी तयांचे कृपाप्रेम विशेष । न देखिला क्रोध क्रीडेतहि कधी ॥ ३
शिशुपणापासून न सोडिला मी संग । न केला तयांनी मम मनोभंग ।
हृदयी अनुभविला मी प्रभूचा कृपायोग । हार खाता खेळात पुकारती जित ॥४
मी होऊन प्रेमसंकोचास वश । न उघडिले कधी तया सन्मुख मुखास ।
दर्शने अजून न तृप्त मम मानस । नयन प्रेमतृषार्त अजुनीही ॥ २६०
प्रभूचे लाड प्रेम न बघवे विधीस । उपजलें मध्येच नीच जननीमिष ।
न शोभती मज बोल या सदृश । निज मते मानावे कोणास साधु शुची ॥ १

मी साधु सदाचारी माता नीच । दुराचारासमान ऐसे आणणे मनात ।
फळेल का उत्तम धान्य कोदवतुऱ्यात । की मिळेल मोती शिंपलीत तळचाच्या ।। २
न स्वप्नी कधी लाविले अन्यास बोल । मम अभाग्याचा उदधि अति खोल ।
न जाणता निज पापाचे फळ । कटु वचने जाळिले व्यर्थ जननीसी ।। ३
हरलो सर्वपरी शोधून हृदय । एकच साधन निश्चित कल्याणमय ।
मम स्वामी सीताराम समर्थ गुरुराय । वाटे त्यायोगे परिणामी होईल हित ।। ४
प्रभु गुरु यांच्या निकट साधुसभेत । बोलतो सद्भावे या पवित्र क्षेत्रात ।
हे प्रेम वा कपट सत्य वा अनृत । रघुराज वसिष्ठमुनि जाणती ते ।। २६१
महाराजांचा मृत्यु पाळून प्रेमपणास । जननी कुमति विदित जगास ।
माता व्याकुळ न वघवे तयांस । दुःसह तापे दग्ध आयोध्याजन ।। १
मीच सकल अनर्थाचे मूळ । हे ऐकून जाणून साहिले सर्व शूळ ।
ऐकिले वनगमन नेसून वल्कल । मुनिवेषे रामलक्ष्मणसीता यांचे ।। २
पायीं चालती पादत्राणाविण । शंकर साक्ष न मज सोडती मम प्राण ।
निषादाचे प्रेम निरखून । न भंगले हे वज्रकठोर हृदय ।। ३
आज समक्ष पाहिले नयने येऊन । हा जडजीव करितो सकल सहन ।
पर्थो सर्पिणी विंचू जयास बघून । सोडती क्रोध भयानक विष ।। ४
तेच लक्ष्मणसीतारघुकुलटिळक । वाटले कैकेयीला करितील अनहित ।
साहवील कोणा दैव दुःख अमित । सोडून त्या कैकेयीपुत्रासी ।। २६२
ऐकून भरताचे व्याकुळ वचन । आर्तताप्रीति विनयनीतीपूर्ण ।
सभासद क्षोभित जन शोकमग्न । जणु कमलवनावरी हिमस्राव ।। १
अनेकविध कथा पुरातन कथुनी । भरतास प्रबोधती ज्ञानी मुनी ।
मग बोलती रघुनंदन उचित वाणी । दिनकरकुलकमलवनास शशी ।। २
तात का करिसी खंत उरी कारणाविण । जाण जीवाची गति ईशाच्या आधीन ।
त्रिकाळी त्रिभुवनातील पुण्यजन । मम मते नसती थोर तुझ्यासम ।। ३
जे तुज हृदयी कुटिल म्हणती । ते इहलोक परलोक न साधती ।
तेच मूढ जननीस दोष देती । जे न सेविती गुरुसाधुसभा ।। ४
मिटेल प्रपंचपातक सकल । अमंगल भार नामशेष होईल ।
परलोकी सुख लोकी सुयश पाळतील । लोक तव नामस्मरण मात्रे ।। २६३
सहज सत्य कथितो शिव साक्षी । भरता ही तव भूमि राखावे तिजसी ।
न करावे हे तात व्यर्थ कुतर्कासी । वैर प्रेम लपविता न लपे । १

विहंगमृग जाती मुनिगणानिकट । परि हिंसक व्याधा पाहून पळतात ।
पशुपक्षीही जाणती निज हिताहित । नरतनु तर गुण ज्ञानांचे भांडार । २
तात जाणतो नीट मी तुजसी । परि काय करू न उमजे जीवासी ।
त्यजून मज नृपे पाळिले सत्यासी । सोडिली तनु प्रेमपणासाठी ॥ ३
तयांचे वचन भंगता मनास शोक । तयाहूनही तंव संकोच अधिक ।
गुरू-आज्ञाही तैसीच देत । करू इच्छितो निश्चित सांगशील ते ॥ ४
ठेव मन प्रसन्न संकोच टाकून । सांगशील तू तेच आज करीन ।
सत्य प्रतिज्ञ रघुवरांचे वचन । परिसून जाहला समाज सुखी ॥ २६४
सुरगणासह सुरराज भयभीत । बिघडेल काज म्हणून व्यथित ।
सकल रामाला मनी शरण जात । उपाय काही न करवे तया ॥ १
मग विचार करून वदती परस्परांस । राम असती वश भक्ताच्या भक्तीस ।
जाहले सुर सुरपति अति निराश । स्मरून नृप अंबरीष दुर्वास ऋषी ॥ २
देवांनी साहिला बहु काळ विषाद । तंव नरहरीस प्रकट करी प्रल्हाद ।
सुर शिर बडवून परस्पर कानी लागत । भरताहाती आता देवांचे काज ॥ ३
न अन्य उपाय दिसतो देवांनो मज । श्रेष्ठ भक्ताची सेवा राम मानितात ।
आता स्मरावा प्रेमे हृदयी भरत । जो निज गुणशीले करी रामासी वश ॥ ४
बोलती बृहस्पति देवांचे मत ऐकून । केला विचार उत्तम तुम्ही भाग्यवान ।
सकल मांगल्याचे मूळस्थान । जगी प्रेम भरताच्या चरणी ॥ २६५
सीतापति भक्ताची भक्ती । शत काम धेनुसम सुंदर अती ।
उपजली तुमच्या मनी भरताची प्रीती । विधी अनुकूल सोडावा शोक तुम्ही ॥ १
पाहा भरताचा प्रभाव सुरेश । रघुराज सहज स्वभावे तयास वश ।
करा मन स्थिर न भय तुम्हांस । जाणा भरत पडछाया रामाची ॥ २
ऐकून सुरगुरूंची संमति सुरांचा शोक । अंतरयामी वाटे प्रभूस संकोच ।
जाणून निजशिरीं भार साच । कोटि अनुमान हृदयी भरत करी ॥ ३
विचार करिता केले मनीं निश्चित । श्रीरामाच्या आज्ञेतच आपुले हित ।
निज पण त्यजून मम पणासी मानीत । तयांची मजवरी अति प्रेमकृपा ॥ ४
करिती अनुग्रह अपार । सर्वपरी सीतानाथ मजवर ।
मग वदे भरत जोडून कर । प्रणाम करून रामासी ॥ २६६
काय आतां अधिक वदू वदवू स्वामी । तुम्ही कृपासागर अंतरयामीं ।
गुरु प्रसन्न धनी अनुकूल तुम्ही । मिटले पापी मनाचे कल्पित दुःख ॥ १

मिथ्या भये मी भयभीत न चिंतेचे मूळ। न दोष रवीसी होता दिशाभूल।
मी अभागी मम माता कुटिल। काळ क्रूर दैवाची गति वक्र ॥ २
घातला घाला सकलांनी पण करून। परि प्रणतपाळ पाळिती निज पण।
ही प्रभूची रीति नसे नविन। लोकी वेदी विदित नसे गुप्त ॥ ३
जग न भले भले तुम्ही स्वामी एकच। सांगा कोणाच्या भलेपणाने होईल हित।
देवा तुमचा स्वभाव कल्पतरूसम साच। न कोणासी अनुकूल वा प्रतिकूल। ४
ओळखून कल्पतरूस जाता निकट। छाया तयाची निवारी सकल शोक
जाती समीप जगी उच्चनीच राव रंक।मागताच प्राप्त इच्छित वस्तु तया ॥२६७
पाहून गुरुस्वामीचे अपार प्रेम। मिटला क्षोभ नुरे संदेह मनात मम।
ऐसे करा आता करुणाधाम। जेणे साधेल भक्तहित न प्रभूस क्षोभ ॥
जो सेवक घालतो संकोची स्वामीस। वांछी निज हितास तो नीच दास।
स्वामींची भक्ति हेच हित सेवकास। सकल सुखलोभास लाथाडुनी ॥ २
माघारी फिरताना सकलांचा स्वार्थ। आज्ञापालनी कोटिविधि हित नाथ।
स्वार्थ परमार्थाचें सार हेच। सकल पुण्याचे फळ सुगतीचा शृंगार ॥ ३
परिसावी मम एक विनंति भगवान। मग उचित तैसे करावे आपण।
आणिले अभिषेक साहित्य सिद्ध करून। प्रभु मानतील तर सुफल होईल ॥ ४
अनुजासह मज पाठवावे वनात। करावे मग सकलांस सनाथ।
न तो धाडावे उभय बंधूस परत। नाथ आपुल्या संगे येईन मी ॥ २६८
अथवा बंधु तिघे आम्ही जाऊ वनी। परतावे सीतेसह रघुराजांनी।
जेणे राहील प्रसन्नता प्रभूच्या मनी। हे करुणासागर करा तैसेची ॥ १
देवा टाकिला मम शिरी सर्व भार। मजसी नाकळे नीति वा धर्मविचार।
स्वार्थास्तव वदतो वचन साचार। न राहतो विवेक दुःखित चित्तात ॥ २
ऐकून स्वामींची आज्ञा जो उत्तर देईल। ऐसा सेवक पाहून लज्जा लाजेल।
मी अवगुणांचा उदधि अति खोल। परि प्रभु वानिती प्रेमे मज साधु ॥ ३
आता कृपाळु मज मान्य तेच मत। जेणे न होईल स्वामींच्या मनास संकोच।
एकच उपाये जगाचे मंगलहित। प्रभुपदाची शपथ सांगतो सद्भावे ॥ ४
प्रभो प्रसन्न मने संकोच सोडून। देवा जी आज्ञा द्याल ती मानून।
करू तैसे आम्ही ती शिरी धरून। विघ्ने विपरीत नष्ट होतील ॥ २६९
सुर हर्षित परिसून भरतवचनास। साधु म्हणून उधळती सुमनांस।
न कळे काही अयोध्यावासी जनांस। वनवासी तपस्वी आनंदित मनी ॥ १

रघुनाथ मनी संकोचून स्तब्ध होती । सभा जाहली शोकमय पाहून प्रभुगती ।
तोच तेथे जनकाचे दूत येती । बोलाविती वसिष्ठ तयांना शीघ्र ।। २
निरखून रामास प्रणाम करिती । तापस वेष बघून दुःखी होती ।
मुनिवर दूतांसी वार्ता पुसती । सांगा कुशल विदेह भूपाचे । ३
संकोचे मस्तक महीवर नमवून । वदती श्रेष्ठ दूत कर जोडून ।
स्वामी आदरे पुसता कुशल प्रश्न । नाथा तेच जाहले कुशलाचे कारण । ४
न तो संगे अयोध्यानाथ । गेले सकल कुशल हे नाथ ।
जाहले सकल जग अनाथ । परि विशेष अनाथ मिथिला अयोध्या ।। २७०
अयोध्यापतीची निधन वार्ता ऐकून । जनकपुरीजन दुःखे गेले वेडावून ।
जयांनी देखिले विदेह शोकमग्न । तयां न वाटे ते नाम सत्य ।। १
ऐकती राज्ञीची दुष्कृति नृपाळ । तयां न सुचे काही जणुं मणिविण व्याळ ।
जनक होई दुःखे अति व्याकुळ । ऐकून रामासी वनवास राज्य भरता ।। २
नृप पुसती सचिवपंडितांसी । उचित काय ते वदा आज निश्चयेसी ।
वार्ता समजताच पेच उभयांसी । जावे वा रहावे न वदे कोणी ।। ३
धीर धरून नृप करिती विचार । मग पाठविले अयोध्यीं चार गुप्तचर ।
भरताचा सद्भाव–कुभाव हेरून शीघ्र । यावे माघारी गुप्तता राखून ।। ४
मग गेले गुप्तचर अयोध्येस । जाणून भरताची स्थिती बघून कृतीस ।
जंव निघाला भरत चित्रकूटास । तंव परतले मिथिलेस दूत ।। २७१
भरताची कृति वानिती दूत । येऊन यथामति जनकसभेत ।
शोकप्रेमे अति व्याकुळ होत । ऐकून नगरजनगुरूसचिवनृप ।। १
धीर धरून नृप भरताची महीत गाती । शूर वीरांस सूज्ञांस बोलावून घेती।
गृही नगरी देशी रक्षक ठेविती । सज्ज करून अश्वगजरथांसी ।। २
दो घटिका साधून निघती तात्काळ । न करिती विश्राम मार्गी महीपाळ ।
करती प्रयागी स्नान प्रातःकाळ । मग उतरती लोक यमुना नदी ।। ३
तंव समाचार घेण्यास पाठविती हे नाथा । ऐसे वदून दूत नमविती माथा ।
देऊन सवे सहा सात किराता । त्वरे मुनिवर धाडिती दूतांस ।। ४
ऐकून जनकाचे आगमन । हर्षित झाले अयोध्यावासीजन ।
अति संकोचती रघुनंदन । सुरराज इंद्र जाहला सचिंत ।। २७२
गळली दुःखाने कैकेयी कुटिल । सांगेल कोणास दोष कोणा देईल ।
मनी आनंदित नरनारी सकल । वदतीं बरे अता राहू चार दिन ।। १

यापरी घालविला तो दिन । प्रभाती करिती सकल स्नान ।
पूजा करिती नरनारी स्नान करून । गणेशगौरीशिव यांची २
मग रमारमण विष्णुपदासी वंदुनी । प्रार्थिती कर जोडून पदर पसरूनी ।
होवो राम राजा सीता राणी । आनंदसीमा होवो नगरी आयोध्या ।।
राहावे तेथे सुखे सहसमाज । राम भरतास करितील युवराज ।
जगी जीवनलाभ मिळो सहज । सुखाची सुधा सिंचून सकलांवरी ।। ४
गुरुसमाज भ्राते समवेत । असावे रामराज्य अयोध्येत ।
रामराजा असता नगरीत । मागतो मरण यावे आम्हास ।। २७३
ऐकून प्रेममय अयोध्याजनांची वाणी । निंदिती निज योग विरक्तीस मुनि ज्ञानी।
जन यापरी नित्य कर्म करूनी । तनु पुलकितपूर्ण वंदिती रामास ।। १
उच्चनींच मध्यम श्रेणींचे जन । जैसा निज भाव तैसे घेती रामदर्शन ।
सन्मानिती राम सर्वांवर दृष्टि ठेवून । वानिती कृपानिधीस सकल ।। २
रघुवर बाणा बाळपणापासून । प्रीति ओळखून करणे नीतीचे पालन ।
रघुराज संकोचशीलनिधान । सुमुख सुलोचन स्वाभावे सरळ ।। ३
रामांचे गुण गाता प्रेमे तल्लीन । वानिती निज भाग्यास सकल जन ।
जगी अल्प आम्हांसम पुण्यवान । आपुला म्हणून रामास जाणती जे ।। ४
प्रेमे मग्न ते समयी सकल जन । तोच ऐकिले मिथिलेशाचे आगमन ।
उठती संभ्रमे सत्वर सभाजन । रविकुलकमलदिनेशरामासह ।। २७४
बंधुसचिवगुरुनगरजनासहित । जाती सामोरे रघुनाथ ।
गिरिवर चित्रकूट बघती जंव जनक । करिती प्रणाम तंव त्यजून रथा ।। १
लालसा उत्साह अति रामदर्शनासी । न भासती पथी श्रम कवणासी ।
मन रघुवरवैदेहीपाशी । तनुमनाविण न शुद्धि सुखदुःखाची ।। २
यापरी जनक चालत येती । समाजासह तयांची प्रेमोन्मत्त मती ।
येऊन निकट प्रेमे बघती । आदरे भेटती परस्परा ।। ३
करिती जनक मुनीपदांसी वंदन । ऋषीस प्रणाम करिती रघुनंदन ।
बंधुसह जाहले रामजनकांचे मीलन । समाजासह जाती घेऊन आश्रमात ।। ४
शांतरसजलाने पूर्ण । आश्रमरूपी सागर अति पावन ।
रघुनाथ सवे जाती घेऊन । जणु करुणासरितासेना जनकाची ।। २७५
करुणा नदी बुडवी ज्ञानवैराग्यतट । मिळती तिज शोकआक्रोशनालेनद ।
समीरे येती तरंग ते उच्छ्वास शोक । तोडिती तटी धैर्यतरुवरास ।। १

फोंफावे भयानक दु:खाची धार । भयभ्रमरूपी भोवरे तयात अपार ।
विद्या नौका नाविक पंडित थोर । न लोटू शकती नौका न कुणा अटकळ ।। २
थकले बिचारे वनचर कोळी किरात । हृदयी हरले बघून नदीस हे पाथिक ।
जंव सरिता आश्रमउदधीसी मिळत । तंव वाटे क्षोभून उठे जलधी ।। ३
शोकविव्हळ होती उभय राजसमाज । न राही कुणा ज्ञान धैर्य वा लाज ।
वानिती दशरथाचे गुणशील सहज । रडती बुडती शोकसिंधूत ।। ४

शोक समुद्रात । जन बुडतात । सचिंत मनात । अति दु:खीं ।
दैव प्रतिकुळ । बहू दोष देती । सरोष वदती । केले काय ।
सुरसिद्धयोगी । तापसमुनीश । पाहून गतीस । विदेहाच्या ।
कोणी न समर्थ । म्हणत तुलसी । प्रेमाच्या नदीसी । तरू शके ।। १

करिती अमित उपदेश । मुनिवर सर्वत्र लोकांस ।
वसिष्ठ कथिती विदेहास । धरावा धीर नरेशा तुम्ही ।। २७६
जयाचा ज्ञानरवि भवरात्र करी नष्ट । वचनकिरणांनी मुनिकमलां विकसित
कैसी मोह ममता तया येई निकट । महिमा हा सीतारामप्रेमाचा ।। १
विषयी ज्ञानी सिद्ध हे साधक । त्रिविध जीव लोकीवेदी विदित ।
रामस्नेहे रसाळ जयाचे चित्त । संतसभेत सन्मानिती तया ।। २
रामप्रेमाविण न शोभे ज्ञान । जैसे कर्णधार विनानौकायान ।
करिती मुनि विदेहाचे सांत्वन । मग जाती जन स्नाना रामघाटी ।। ३
नरनारी सकल शोकाकुल । घालविला तो वासर विना जळ ।
न घेती आहार पशुखगमृग सकल । काय विचार करावा प्रिय परिवाराचा ।।४
जनक रघुराज सकल प्रजाजन । करिती प्रात: समयी स्नान ।
कृश गात्रे अति दु:खित मन । बैसती वटतरूतळी छायेत ।। २७७
जे विप्र दशरथपुरवासी । जे मिथिलापतिनगरनिवासी ।
तैसे जयांनीं शोधिलें प्रपंच परमार्थासी । ते गुरू दशरथजनक यांचे ।। १
ते सकल करिती उपदेश अनेक । धर्मनितिविरक्तिविवेकयुक्त ।
कथिती कथा पुरातन कौशिक । समजाविती सभेसी सुंदर वाणीने ।। २
तंव रघुनाथ सांगती कौशिकास । नाथ घडला काल सकलां उपवास ।
मुनि वदती टळला अडीच प्रहर दिवस । उचित तेचि कथिती रघुराज ।। ३
ऋषींचा कल पाहून वदती जनक । अन्न घेणे ऐथें न उचित ।
भूपाचे वचन सकलांस रूचत । आज्ञा घेऊन मग स्नानासी जाती ।। ४

ते समयी अनेक प्रकार। फळ फूल दल मूळ अंकुर।
आले घेऊन कोळी किरात वनचर। भर भरून भार कावडीवरी ।। २७८
रामप्रसादे गिरि चित्रकूट कामद। अवलोकने मात्र दूर करी विषाद।
जणु उचंबळे प्रेम आनंद। तळीसरितावनभूमिभागात ।। १
वेली तरु सफलित सफुलित सकल। बोलती खगमृग भृंग अनुकूल।
वाहे सुखद समीर त्रिकाळ। वनी अधिक उत्साह ते समयी ।। २
न करवे वनमनोहरतेचे वर्णन। जणु मही करी जनकास अतिथीपण।
मग सकल जन स्नान करून। पावून आज्ञा राम मुनि जनक यांची ।। ३
अतिप्रेमे तरुवरास बघती। मग जन जेथे तेथे उतरू लागती।
सुधासम मधुर पावन अती। दळमूळ फळकंद विपुल ।। ४
रामाचे गुरुवसिष्ठ पाठविती। भर भरून भार आदरे सर्वांप्रती।
पुजून सुरगुरु पितर अतिथी। करू लागती मग फलाहार ।। २७९
दिन चार यापरी जाती। रामदर्शने नरनारी सुखी होती।
उभय नृप समाज ऐसे वांछिती। रामसीतेविण गमन न भले ।। १
सीतारामासंगे वनवास। सुखद कोटि देवलोकसरिस।
सोडून रामलक्ष्मण वैदेहीस। जया गृह रुचे तया दैव विपरीत ।। २
जर दैव असेल अनुकुल। रामासमीप वनी वास होईल।
मंदाकिनीत स्नान तिन्ही त्रिकाळ। मोद मंगलमय रूपदर्शन रामाचे ।। ३
रामगिरी वनी तपस्वीस्थळी संचार। अमृतासम कंदमूळफळाहार।
होतील चवदा वरुषे सुखकर। पळसम जातील न कळेल कैसी ती ।। ४
वदती सकल आम्ही न या सुखायोग्य। नसे आमुचे इतुके भाग्य।
सहज स्वभावे उभय समाजात। श्रीराम चरणी परम प्रेम ।। २८०
यापरी सकल मनोरथ करिती। वचन प्रेमपूर्ण ऐकून मने हरती।
ते सुसमयी दासी येती। धाडिल्या ज्या सीतामाता सुनयनें ।। १
ऐकतां आहे अवसर सीतेच्या सासवांस। भेटीस येई जनकाचा राणीवास।
कौसल्या सन्मानी आदरे तयांस। समयोचित आसने देती आणून ।। २
परस्पर उभय स्नेहशील पूर्ण। द्रवेल ऐकून बघून वज्र कठीण।
शिथिल पुलकित तनु अश्रुपूर्ण नयन। कुरतडती पदनखे भूमि शोकाकुल ।। ३
जणू सकल सीताराम प्रीतीची मूर्ती। वाटे करुणरसाचे बहुवेष आक्रंदती।
वदे सुनयना अति वक्र विधीची मती। फोडी वज्रघणाने दुग्धफेनास ।। ४

सुधा श्रवणी पडते केवळ । विधि विपरीत सर्वत्र दिसते गरळ ।
दिसतो मानस सरोवरी मात्र मराळ । परि काकवकघुवड असती सर्वत्र ।। २८१
वदे सुमित्रा देवी दुःखित । दैवगति विचित्र विपरीत ।
विधि सृजी पाळी संहारीन । बुद्धि तयाची भोळी बाळक्रीडेसम ।। १
कौसल्या म्हणे न कोणाचा हा दोष । सुखदुःख हानिलाभ असे कर्मवश ।
कर्मगति गहन हे ज्ञात विधीस । जो दाता शुभाशुभ फलांचा ।। २
ईश्वरी-आज्ञा सकल शिरावर । तैसे सुधा विष उत्पत्तिस्थीति संहार ।
अटळ अनादि विधीचा संसार । हे देवी शोक मोहवश असे व्यर्थ ।। ३
भूपतिजन्ममरण आणून मनी । सखे हा शोक करितो निज हानी ।
सुनयना वदे सत्य आपुली सुवाणी । अयोध्यापती राणी आपण पुण्याचीसीमा ।। ४
जावो वनी लक्ष्मणसीताराम । न अशुभ परि शुभ तयाचा परिणाम ।
असे मज भरताची चिंता परम । हृदयीं गहिवरून वदे कौसल्या ।। २८२
आशीर्वाद आपुला ईश्वराचा प्रसाद । गंगाजळापरी पावन मम सुनासुत ।
कधी न घेतली मी रामाची शपथ । आज घेऊन सांगते सत्य सखे ।। १
भरताचे शील गुण विनय महती । सुजनता बंधुप्रेम श्रद्धाभक्ती ।
वानिता कुंठित होई शारदेची मती । कैसी शिंपली उपसेल सागरास ।। २
जाणतें मी सदा भरतास कुलदीप । वारंवार ऐसे कथीत मज महीप ।
समय पारखी पुरुषस्वभावाचे रूप । जैसे सोने कसाने मिळता पारखी रत्न ।।३
परि मी ऐसे वदणे आज अनुचित । राही अल्प विवेक प्रेमशोकात ।
ऐकून गंगेसम वाणी पुनीत । होती प्रेमे विकल सकल राणी ।। ४
कौसल्या मग धीर धरी । वदे ऐका देवी मिथिलेश्वरी ।
विवेकनिधि जनकाची प्राणेश्वरी । कोण देऊ शकेल तुम्हा उपदेश ।। २८३
हे राज्ञी समय पाहून सांगा रायास । आपुल्यापरी समजावून तयास ।
लक्ष्मणास ठेवून पाठवा भरत वनास । जर हे रूचेल मत नृपास । १
पाहा मग यत्न करा करुन विचार । मज वाटे भरताची चिंता फार ।
भरतमनी प्रेम गूढ अपार । तो गृही रहाणे न वाटे मज उचित ।। २
बघून स्वभाव ऐकून सरळ वाणी । जाहल्या करुणरसी मग्न राज्ञी ।
नभी सुमनवृष्टि निघे धन्य धन्य ध्वनी । प्रेमे शिथिल योगी सिद्ध मुनि ।। ३
सकळ राणीवास निस्तब्ध देखून । सुमित्रा वदे धीर धरून ।
देवी उलटली रात्रप्रहर दोन । तंव प्रेमे उठली राममाता ।। ४

वदे जावे आता स्थळी सत्वर। प्रेमे सद्‌भावे काढी ती उद्‌गार।
आमुचा वाली आता परमेश्वर। जनक मिथिलेश्वर सहाय्यक ॥ २८४ ॥
देखून स्नेह परिसून वचन विनीत। धरी जनकप्रिया पाय पुनीत।
वदे देवी तुमचा हा विनय उचित। दशरथगृहिणि राममाता तुम्ही ॥ १
प्रभु निज नीच जनासही सन्मानती। अग्नि धूमास गिरि तृणास शिरी धरिती।
कायावाचामने नृपति सेवक असती। महेश भवानी पाठीशी सदा ॥ २
कोण जगी सहाय्यक अपणा उचित। दिनकर सहाय्यी शोभतो का दीपक ।
करितील राम राज्य अयोध्येत। वनी जाऊन देवकार्य करून ॥ ३
निजस्थानी सुरनरनाग सकल। रामबाहुबले सुखे वसतील।
पूर्वीच याज्ञवल्क्ये केले भाकित सकल। न होईल कदापि असत्य मुनिवाणी ॥ ४
ऐसे वदून प्रेमे धरी चरण। मग सीतेस्तव विनंति करून।
सीतामाता आज्ञा घेऊन। निघाली सितेसमवेत ॥ २८५
भेटे वैदेही प्रिय आप्तजनास। जैसे जया योग्य तैसे तयास।
बघून जानकीचा तपस्विनीचा वेष। विशेष व्याकुळ दुःखे जाहले सकल ॥ १
जनक रामवसिष्ठांची आज्ञा घेऊन। येताच स्थळी सीतेसी बघून।
पावन प्रेमप्राणांची पाहुणी जाणून। धरली हृदयी जानकी जनकाने ॥ २
वात्सल्यसागर हृदयी उचंबळे। प्रयागक्षेत्र जणु भूपतिमन झाले।
सीता स्नेहवटास वृद्धिंगत देखले। तयावरी शोभत रामप्रेमशिशु ॥ ३
जणु जनकाचे ज्ञानमार्कंडेय व्यथित। लाधला प्रेमशिशुआधार जंव ते बुडत।
विदेहाची मति न मग्न मोहात। हा महिमा सीतारघुवीरप्रेमाचा ॥ ४
सीतेचे मातापिता प्रेमवश। शोके व्याकुळ हरपती देहभानास।
परि धरणिसुता धरून धीरास। करी विचार समय सुधर्माचा ॥ २८६
पाहून सीतेचा तापस्विनीचा वेष। वाटे प्रेमसंतोष विशेष जनकास।
हे पुत्री केले तू पवित्र उभयकुलांस। धवल यश उज्ज्वल जग सकळ वदती ॥ १
तव कीर्तिसरिता जिंकून गंगेस। व्यापून टाकी कोटि ब्रह्मांडांस।
गंगा करी पावन महिवरी त्रिस्थळास। परि अनेक साधुसमाजास तू ॥ २
पिता प्रेमे सत्यवाणी वदती। परि सीता मनी संकोचित अती।
मग मातापिता तिज हृदयी धरिती। देती उपदेश शुभ आशीर्वाद ॥ ३
न बोले सीता मनी संकोचित। रात्री एथे रहाणे मज न उचित।
जाणून ते माता नृपासी कथीत। तंव उभय स्तविती स्वभावशीलास ॥ ४

वारंवार नृपराज्ञी सीतेसी भेटून। निरोप देती तिज सन्मानून।
नृपासी भरतस्थिति समय जाणून। सांगे मग चतुर राणी सुवाणीने ।। २८७
जनक ऐकून भरताचा व्यवहार। जणु कनकी सुगंध सुधेत शशिसार।
पुलकित तनु मिटून साश्रु नेत्र। स्तविती भरताचे सुयश आनंदे ।। १
ऐक हे सुमुखी सुलोचने सावधान। भरतकथा भवबंधविमोचन।
धर्म राजनीति ब्रह्मवचन। हे जाणतो मी यथामती ।। २
ती मम बुद्धि भरताच्या महिमेस। वर्णील कैसी कपटे न स्पर्शेल छायेस।
ब्रह्मागणेशशिवशारदा शेष। कविज्ञानी पंडितबुद्धिवान ।। ३
हे सकल भरतचरित्र कृति कीर्ती। धर्म शील गुण विमलविभूती।
श्रवण मननासी सुखद अति। धिक्कारिती सुधास्वाद गंगेची शुचिता ।। ४
निरवधि निरुपम गुणनिधान। जाणवा भरत भरतासमान।
मानावे का सुमेरुचे शेर वजन। कविगणांची बुद्धि संकोचित एथे ।। २८८
न वर्णू शकती महिमा हे वरवर्णी। जैसा न चालत मीन निर्जल धरणी।
भरताचा अमित महिमा ऐक हे राणी। जाणती एक राम न स्तवू शकती। १
प्रेमे भरताचा महिमा वर्णून। नृप वदती पत्नीची रुची जाणून।
लक्ष्मण परतणे भरताचे वनगमन। सकला रुचेल सकला हितकारी ।। २
भरतरघुवराची प्रीति प्रतीती। हे देवी गमते तर्कातीत ती।
भरतममता प्रेमाची अवधी। समतेची सीमा श्रीराम ।। ३
स्वार्थ परमार्थ सुख समस्त। भरत न आणी मनी वा स्वप्नात।
जाणतो मी हा एकच भरताचा सिद्धांत। रामपदी प्रेम तेच साधन तीच सिद्धी ।। ४
भरत न टाळेल चुकूनही। रामाची आज्ञा मनाणे कदाही।
तंव न करावा शोक स्नेहवशे कुणीही। वदती भूप प्रेमे गहिवरून ।। २८९
प्रेमपूर्वक गणता रामभरतांचे गुण। दंपतीसी भासे रात्र एकक्षण।
राजसमाज उभय प्रभाती उठून। करून स्नान लागती देवपूजेस ।। १
स्नान करून रघुराज गुरुप्रति जाती। चरणा वंदून रोख बघून वदती।
शोके व्याकुळ वनवासे दुःखित अती। नगरजन माता भरत हे नाथ ।। २
समाजासहित मिथिलेश जनक। साहती क्लेश वनी दिन बहुत।
जे दिसेल उचित ते करावे नाथ। आपुल्याच हाती हित सकलांचे ।। ३
ऐसे बोलून रघुराज संकोचित। शील स्वभाव जाणून मुनि रोमांचित।
वदती हे राम तुम्हाविण जे सुख प्राप्त। नरकसम ते परि उभया समाजास ।।४

तुम्ही जीवांचे जीव प्राणांचे प्राण । सुखाचे सुख हे रघुनंदन ।
गृह वाटे जया प्रिय तुम्हा सोडून । तात तयाचे दैव विपरीत ।। २९०
जळो ते सुख कर्म धर्म । जया न रामपदपंकजी प्रेम परम ।
जेथे नसे प्रधान रामप्रेम । तो योग कुयोग ते ज्ञान अज्ञान ।। १
सुखी तुम्हासह दुःखी तुम्हाविरहित । जाणता तुम्ही सकलांचे हृद्‌गत ।
कृपाळा तुम्हास सकल स्थिति विदित । आज्ञा तुमची सकल शिरावर असे ।। २
करावे आश्रमी पदार्पण आपण । स्नेहशिथील मुनि ऐसे वदून ।
राम निघाले तव वंदन करून । धीर धरून जाती ऋषि जनकाप्रती ।। ३
गुरु नृपासी कथिती रामवचन । सुंदर सहज स्नेहशीलपूर्ण ।
जेणे धर्मासह सकलांचे कल्याण । साधेल करा आता तेच महाराज ।। ४
हे नरपाळ तुम्ही ज्ञाननिधान । धर्मधीर शुचि सुजाण ।
हे संकट तुम्हाविण करील शमन । न समर्थ कोणी या समयी ।। २९१
ऐकून मुनीचे वचन नृप प्रेममग्न । सुटे ज्ञानवैराग्याचे वैराग्य ते बघून ।
प्रेमे शिथिल करिती मनी चिंतन । आलो मी एथे न केले उचित ।। १
नृपे धाडिले वनी रामास । प्रियविरह योगे त्यजिले प्राणास ।
आम्ही या वनातून घन वनात तयास । धाडून परतू मोदे ज्ञान गर्वाने ।। २
परिसून बघून विप्र मुनि तापस । जाहले प्रेमवशे व्याकुळ विशेष ।
समय जाणून धीर धरिती नरेश । मग निघाले समाजासह भरताप्रती ।। ३
सामोरे येऊन भरत करी स्वागत । देई सुआसन समयास उचित ।
वदती नृप जनक हे तात भरत । विदित तुज रघुवीराचा स्वभाव ।। ४
राम सत्यव्रत सुशील । धर्मरत स्नेहाळ कृपाळ ।
साहती संकोचे संकटे सकल । आज्ञा द्याल ती कळवू तया ।। २९२
परिसता नयनी जल तनु पुलकित । अति धीर करून बोले भरत ।
नसती वसिष्ठासम मायबाप हितप्रद । आपण तर पूज्य प्रिय पितृसमान ।। १
कौशिकादि मुनि सचिवांचा समाज । आपण ज्ञानाचे सागर उपस्थित आज ।
शिशुसेवक मी आज्ञांकित मज । जाणून बोध करा आपण स्वामी ।। २
या समाजी पुण्यस्थळी पुसता आपण । मानतील मज पापी राखिता मौन ।
वदतो लहान तोंडी घास मोठा घेऊन । क्षमा करा तात जाणून दैव प्रतिकूल ।। ३
आगमनिगम प्रसिद्ध पुराण । जाणते जग सेवाधर्म कठिण ।
स्वामीधर्म निजस्वार्थ विरोधी असून । वैर आंधळे प्रेमासी ज्ञान नसे ।। ४

सत्यव्रत रामाची रुचिधर्म जाणून । ध्यानी धरावे मी पराधीन ।
प्रेम सकलांचे ओळखून । करावे जे हितकर संमत सर्वांस ॥ २९३
ऐकून भारताचे वचन बघून स्वभाव । वानिती तया समाजासह नृपराव ।
वचनी अल्प अक्षरे अपार अर्तभाव । सुगम अगम कोमल कठोर ॥ १
जैसे मुख आरश्यात आरसा निज हातात । ऐसी अद्‌भुत वाणी प्रतिबिंब न धरवत ।
समाजांसह मुनि जनक भरत । जाती रामाप्रति देव कुमुदचंद्र ॥ २
ऐकून वार्ता जन शोके व्यथित । जणु मीन व्याकुळ नव वर्षाजळात ।
देव प्रथम कुलगुरूची स्थिति बघत । मग निरखिती विशेष प्रेम विदेहाचे ॥ ३
मग रामभक्तिमय भरतास बघती । सुर स्वार्थी सभय निराश होती ।
तंव सर्वांसची रामप्रेममय पाहती । होती शोकवश सुर न वर्णवे ॥ ४
प्रेमसंकोचवश रघुराज । वदे अति दुःखे सुरराज ।
रचा माया तुम्ही सकल मिळून पंच । भय वाटे न तो काज बिघडेल ॥ २९४
सुर स्तविती स्मरून शारदेसी । हे देवी देव शरणागत तुजसी ।
निज मायें फिरवून भरतबुद्धीसी । माया करून रक्षावे देवकूळ ॥ १
देवांची विनंति देवीने सुजाण ऐकून । वदे सुर स्वार्थी मूढ जाणून ।
भरतमति फिरव सांगसी मज म्हणून । सहस्र नयनांनी न बघसी सुमेरूस ॥ २
बलवत्तर ब्रह्माविष्णुमहेश यांची माया । ती न समर्थ भरतमतिप्रति बघाया ।
ती मति फिरव म्हणसी देवराया । चांदणी प्रचंड दिनकरास चोरील का ॥ ३
भरताच्या हृदयी सीतारामनिवास । कैसा तेथे अंधार जेथे भानुप्रकाश ।
मग शारदा गेली ब्रह्मलोकास । देव व्याकुळ जणु निशी चक्रवाक ॥ ४
सुर स्वार्थी व्यथित मने मलीन । रचती माया कुमंत्र देऊन ।
पसरे भयभ्रमअप्रीति उच्चाटन । रचती ऐसे प्रपंचमायाजाळ प्रबळ ॥ २९५
कपट करून चिंतित इंद्रराज । भरताहाती आता सकल काज अकाज ।
इकडे जाती रामसमीप जनकराज । तंव सन्मानती रविकुलदीप सर्वांसी ॥ १
समयसमाजधर्म यांस अनुसरून । रघुवंशपुरोहित करिती भाषण ।
मग भरतजनकसंवाद निवेदून । वानिती भरताच्या सुवचनास ॥ २
हे राम जैसी तुमची आज्ञा होईल । मम मते सकल तैसे वर्ततील ।
परिसुन राम वदती सत्य सरळ । मृदु वचन जोडून करास ॥ ३

आपण मिथिलेश्वर असता विद्यमान । सर्वपरी अनुचित मम निवेदन ।
जी आज्ञा कराल महाराज आपण । आण आपुली शिरी धरितील सर्व ।। ४
रामशपथ परिसतांच । मुनिजनक सभेसह संकोचित ।
विलोकिती सकल भरताचे मुख साच । न देऊ शकती कोणी उत्तर ।। २९६
देखून सभा संकोचवश । रामबंधु धरी अति धैर्यास ।
सांभाळी प्रेम पाहून कुसमयास । जणु थोपविती विंध्यवृद्धीस अगस्त्य ।। १
हरण करी मतिपृथ्वीस हिरण्याक्ष शोक । विमलगुणयुत भरतब्रह्मानिर्मित ।
वराह विशाल जणु विवेक । तात्काळ लीलया तयाचा उद्धार करी ।। २
करी प्रणाम कर जोडून सकलांस । भरत विनवी राम गुरुनृपसंतांस ।
क्षमा करा आज मम अनुचित वाणीस । वदतो वचन कठोर मृदु वदने ।। ३
हृदयी शारदेचे स्मरण करी । मानसातून येई ती मुखकमलावरी ।
भरताची भारती मंजु हंसिनी परी । विमलविवेकधर्मनीतीपूर्ण ।। ४
विवेकरूप नेत्रांनी भरत । स्नेहशिथिल समाजासीं निरखीत ।
मग स्मरून सीतारघुनाथ । बोले वंदन करून सकलांस ।। २९७
प्रभो तुम्ही मातापिता गुरुसुहृद । पूज्य परमहितैषी अंतरज्ञानी नाथ ।
श्रेष्ठ सरळ धनी कृपानिकेत । सर्वज्ञ सुजाण प्रणतपाळ ।। १
शरणागत हितकारी समर्थ । अवगुणपापहारी गुणग्राहक ।
हे स्वामी आपणासम स्वामी आपणच । स्वामीद्रोही मीच समजसमान ।। २
प्रभो मोहवशे पितृवचन उल्लंघून । आलो एथे समाजास घेऊन ।
जगी उच्चनीच सज्जनदुर्जन । अमृत अमरपद विष मृत्यू ।। ३
जो उल्लंघी रामाज्ञेसी मनी । न देखिला वा ऐकिला ऐसा कुणी ।
मी दाविली धिटाई परि प्रभूंनी । मानिली ती सेवा प्रेमाने ।। ४
आपुली कृपा आपुलेच भलेपण । नाथा करिती मम कल्याण ।
दूषणास मानिले भूषणासमान । दिगंत सुकीर्ति पसरविली ।। २९८
नाथा आपुली सुवाणी रीति महती । जगा विदित निगमागम गाती ।
मी क्रूर कुटिल खल कलंकी कुमती । नीच नास्तिक शीलहीन ।। १
ऐकून आला ऐसा सन्मुख शरण । मानिला आपुलाच करिता एकदा वंदन ।
न आणिले मनी दोषास देखून । ऐकून गुण वानिले साधुसमाजात ।। २
कोण स्वामी ऐसा कृपाळु सेवकास । जो सांभाळी संपूर्ण तयास ।
न स्वप्नी आणी निज उपकृतीस । सेवकास संकोच चिंता उरी आपुल्या ।। ३

नसे आपुल्यासम स्वामी दुजा कोणी । पैज मारतो मी भुजा उचलोनी ।
शुक पाठात प्रवीण पशु कुशल नर्तनी । गुणांची प्रगति नटपाठकहाती ।। ४

ऐसे सुधारून गौरवून भक्तास । संत मुकुटमणि केले तयास ।
कोण ऐसा निश्चये पाळील ब्रीदावलीस । मम कृपाळू स्वामी वाचून ।। २९९

मम शोकप्रेम शिशूचे अजाणपण । आणीत मज एथे आज्ञा उल्लंघून ।
तरी कृपाळु आपण निज ब्रीद राखून । मानिले मज भले सर्वपरी ।। १

देखिले चरण सुमंगल मूळ । जाणिले स्वामी मज अनुकूल ।
महा समाजी देखिले मम भाग्य उज्ज्वल । महा प्रमाद परि प्रेमळ मम स्वामी ।। २

केली क्षमा अनुग्रह सांगोपांग पूर्ण । कृपानिधि वाटते ते अति महान ।
स्वामी आपुला सुभाव शील भलेपण । पुरविले यांनी मम लाडकोड ।। ३
सर्वथा धीटपणा मी दावुनी । स्वामीसमाजास सकला सोडूनी ।
वदलो यथारुचि विनयअविनयवाणी । मम आर्तभाव मानून देवा क्षमा करा ।।

सुहृद सुजाण सुस्वामी आपण । बोलिलो अधिक अपराध महान ।
देवा अता आज्ञा देऊन । सांभाळावे मज सर्वपरी ।। ३००

प्रभो शपथ आपुल्या पदकमलधुळीची । जी सुखसीमा सत्यसुकृताची ।
ती शपथ घेऊन वदतो हृदयींची रुची । जी जागृती निद्रेत स्वप्नी सदा ।। १
करावी स्वामीची सेवा प्रेमे निर्मळ । टाकून स्वार्थकपटअर्थादि फळ ।
आज्ञाप्रसाद द्यावा देवा तात्काळ । आज्ञापालनासमान न अन्य स्वामीसेवा ।। २
बोले भरत अति प्रेमे विवश । पुलकित शरीर प्रेमाश्रु नयनांस ।
व्याकुळ होऊन धरी प्रभुचरणांस । तो समय ते प्रेम न वर्णवे ।। ३
कृपासिंधु सुवाणीने सन्मानती । धरून हातास समीप बैसविती ।
बघून भरताचा स्वभाव ऐकून विनंती । स्नेहे शिथिल रघुराज सभा ।। ४

सुस्नेहे शिथिल । सज्जनसमाज । मुनि रघुराज । मिथिलेश ।
बंधुता महिमा । भरताची भक्ती । चित्तात वानिती । अति प्रेमे ।
भरता स्तविती । पुष्पे वर्षतात । मलिन मनात । देवगण ।
म्हणत तुलसी । जनता व्यथित । निस्तेज भासत । निशी पद्म ।। १

अति दुःखित दीन । नरनारी सकल समाज बघून ।
वांछी इंद्रराज मने महा मलिन । निज कल्याण मारून मृतासी ।। ३०१

कपटी निष्ठुर देवराज । परहानि प्रिय साधावया निज काज ।
काकसमान सुरपतीची रीति सहज । कपटी दुष्ट न विश्वास कोठे ।। १
प्रथम कुविचार मग कपट संकलित । हे मायाजाल सकला शिरी टाकीत ।
सुरमायेने सकल लोक विमोहित । परि रामप्रेम बहुत होई न अल्प ।। २
भय इंद्रजाल वशे अस्थिर मन । क्षण वनाची रुचि सदनाचे प्रेम क्षण ।
ऐसी द्विधा मनोगति दुःखी प्रजाजन । जणु सिंधुसरिता संगमी जल क्षुब्ध ।। ३
द्विधा मानस नसे संतोष । न कथिती मर्म परस्परांस ।
जाणून श्वानयुवामघवा एक सदृश । कृपानिधान हसती मनात ।। ४
भरत जनक मुनिजन । सचिव ज्ञानी साधु यांना वगळून ।
यथायोग्य जन पाहून । भोवली देवमाया सकलांस ।। ३०२
बघती कृपासिंधु जन व्यथित । निज स्नेहाने सुरपतिकपटे बहुत ।
सकल मति होई भरतभक्तीच्या अंकित । सभागुरूनृपमंत्रीविप्र यांची ।। १
रामास चित्रलिखितसम लोक बघती । संकोचित शिक्षितसम वचन वदती ।
भरताची नम्रताविनयप्रीतिमहती । श्रवणी सुखद वर्णनी असे कठिण ।। २
पाहून जयाच्या भक्तीचा लवलेश । प्रेममग्न मुनिगण मिथिलेश ।
कैसा भरतमहिमा वर्णवेल तुलसीस । भक्तिसुभावे कवीची मति उल्हसित।। ३
अपार महिमा भरताचा क्षुद्र आपण । कविकुल संकोचित सीमा मानून ।
गुणात रूचि परि न करवे वर्णन । बुद्धीची गति जाहली बालवचनासम ।। ४
भरताचे विमल यश शुद्ध शशिसमान । कवीची सुमति ही चकोर पक्षीण ।
उदित चंद्र भक्तहृदयनभी बघून । एकटक लावून ती निरखी तया ।। ३०३
भरताचा स्वभाव नसे सुगम वेदास । कवि करावी क्षमा मम चंचल क्षुद्रबुद्धीस।।
परिसता कथिता भरत सद्भावास । कोण न होईल रत सीतारामपदी ।। १
भरताच्या स्मरणमात्रे रामभक्ती । जया न सुलभ तो दुर्दैवी अती ।
राम सुजाण दयाळु दशा देखती । सकलांची तैसी भरतभक्तहृदयाची ।। २
धर्मधुरीण धीर नीतिचतुर । सत्यस्नेहशील सुखसागर ।
बघती देशकाल समाज अवसर । रघुराज पालक नीतिप्रीतीचे ।। ३
वाणीसर्वस्व वदती मग वचन । मधुर अमृतासम परिणामी हितपूर्ण ।
बा भरता तू धर्मधुरीण । प्रेमप्रवीण वेदव्यवहारज्ञानी ।। ४
कायावाचा मने निर्मल पुनीत । तुजसमान तूच हे तात ।
कैसे कुसमयी गुरु समाजात । वर्णावे गुण लघुबंधु भरताचे ।। ३०४

वत्सा जाणसी भानुकुल रीती । सत्यप्रतिज्ञ पित्याची कीर्ति प्रीती ।
समय समाज मर्यादा गुरुजनांची । तैसे मनोगत उदासीन शत्रुमित्रांचे ।। १
तुज विदित सकलांचे कर्म । तुझा माझा परम हितकारी धर्म ।
मजसी तंव भरवसा परम । तदपि समयानुसार कथितो मी ।। २
पित्याविण गति आपुली हे तात । सांभाळी केवळ गुरूकुलांचा प्रसाद ।
न तो प्रजा परिजन परिवार नष्ट । होत आम्हा सकलांसह ।। ३
जंव अकाली होई दिनेश अस्तंगत । सांग जगी कोणा न क्लेश होत
दुर्दैवे प्राप्त तैसाच उत्पात । परि वाचविती मिथिलेश्वर मुनी ।। ४
प्रतिष्ठा सकल राज्यकाज । धरणी धनधर्म धाम लाज ।
करील रक्षण तयांचे गुरूप्रभाव आज । अंती होईल कल्याण सकलांचे ।। ३०५
गृही वनी समाजासहित । गुरूचा प्रसाद तुमचा आमुचा रक्षक ।
शेषासम धर्म धरणीस धारण करीत । मातापितागुरुस्वामी यांचा आदेश ।। १
ते तू करावे घे मजकडून करवून । भानुकुलाचे वत्सा तू कर रक्षण ।
साधकास सिद्धि एकच आज्ञापालन । त्रिवेणी कीर्ति सद्गति ऐश्वर्य यांची ।। २
ऐसे चिंतून साहणे संकटास । करावे सुखी प्रजापरिवारांस ।
बंधो विभागली विपत्ति मम सकलांस । परि अवधि चौदा वरुषे तुज कठिण ।। ३
वदतो कठोर मी मृदु जाणून तुज । जरी हा कुअवसर नसे मज अनुचित ।
ज्येष्ठ बंधु होत संकटी सहाय्यक । निवारिती हात वज्राघातासीही ।। ४
सेवकासम असती कर पद नयन । असावे स्वामींनी मुखासमान ।
तुलसी म्हणे ही प्रीतीची रीति परिसून । सुकवि स्तविती तिजसी ।। ३०६
सकल सभा रघुवराची वाणी ऐकून । जी प्रेमपयोधि अमृताने परिपूर्ण ।
शिथिल समाज प्रेम समाधीत मग्न । बघून दशा शारदा मौन धरी ।। १
जाहला भरतास परम संतोष । असता सन्मुख स्वामी पळती दुःखदोष ।
होई प्रसन्न मुख मिटती क्लेश । जणु लाभे सरस्वतीप्रसाद मूकासी ।। २
मग प्रेमे प्रणाम करून । बोले भरत करकमलांस जोडून ।
नाथ लाभले सुख जणु केले संगे गमन । जन्माचा लाभ मिळविला जगात ।। ३
आता जैसी आज्ञा देतील कृपासागर । तैसी ती धरीन सादर मम शिरावर ।
द्यावा देवा तोच मज आधार । जेणे जाईल सेवेत सकल अवधी ।। ४
देवा मम देवाच्या अभिषेकास । पावून गुरूंच्या आज्ञेस ।
घेऊन आलो सकल तीर्थजलास । जैसी आज्ञा असेल तैसे करीन ।। ३०७

मम मनी एक महा मनोरथ । परि सभय संकोचे न वदू शकत ।
प्रभु करिती आज्ञा सांग हे तात । तंव बोले भरत सुंदर प्रेमळवाणीने ।। १
चित्रकूट पवित्र स्थळ तीर्थवन । खगमृगनिर्झरसरिता गिरिगण ।
प्रभुचरणचिन्हांकित धरणी बघेन । पाहून येईन जर आज्ञा मिळेल ।। २
अत्रिमुनींची आज्ञा धरून शिरावर । हे तात करावा निर्भये संचार ।
मुनिप्रसादे वन मंगलमय सुंदर । जाहले परम पुनीत हे बंधो ।। ३
ऋषिनायक जैसी आज्ञा देतील । तैसे त्या स्थळी स्थापावे ते तीर्थजळ ।
भरत सुखी ऐकून प्रभुवाणी प्रेमळ । मुनिपदकमला मग वंदी आनंदे ।। ४
भरतराम संवाद परिसून । सकल सुमंगल मूळाचे स्थान ।
स्वार्थी सुर रघुकुलासीं स्तवून । उधळती फुले कल्पतरूची ।। ३०८
धन्य भरत श्रीराम स्वामी जयजय । देव घोषणा करिती होऊन हर्षमय ।
मुनिमिथिलेश सकल समुदाय । भरताचे वचन ऐकून उल्हसित ।। १
भरतरामांचे प्रेमगुणसमूह । पुलकित होऊन प्रशंसती नृप विदेह ।
पावनासी करिती अतिपावन नेम स्नेह । ऐसा स्वामी सेवकांचा स्वभाव सुंदर ।। २
यथामति करिती गुणानुवाद । अति प्रेमे सचिवसभासद ।
ऐकून रामभरतांचा संवाद । उभय समाजांसी हृदयी खेदहर्ष ।। ३
राममातेसी सुखदुःख समान । उपदेशी राणींसी रामगुण स्तवून ।
कोणी म्हणती रघुवीर महान । थोरवी भरताची वानिती कोणी ।। ४
मग भरतासी अत्रि वदती एक कूप । आहे अति सुंदर शैलासमीप ।
स्थापावे पावन अनूप । तीर्थांचें जल अमृतासम तेथे ।। ३०९
भरत अत्रिमुनींची आज्ञा घेऊन । पुढे देई पाठवून जलभाजन ।
मग अत्रिमुनि अनुजासह आपण । निघाला अगाध कूपाकडे ।। १
ठेवून पुण्यस्थळी जळ पावन । अति प्रेमाने अत्रि वदती वचन ।
तात हे अनादि सिद्धिस्थान । लुप्त कालमाने न विदित कुणा ।। २
तंव सेवक बघती जळयुक्त स्थळास । केला तयार जलास्तव कूप विशेष ।
दैववशे जाहला उपकार जगास । अगम धर्मविचार जाहला सुगम ।। ३
अता भरतकूप तया जन म्हणतील । तीर्थजळ संयोगे अतिपावन हे स्थळ ।
कायावाचामने प्राणी होतील विमल । प्रेमे नेमे करिता स्नान एथे ।। ४
कूपमहिम्याचे करून वर्णन । रामापाशी येती सकल जन ।
अत्रि रघुवरासी करिती कथन । पुण्यप्रभाव भरतकूपाचा ।। ३१०

निवेदिती धर्मइतिहास प्रेमपूर्वक । सुखे घालविली रात्र जाहली प्रभात ।
नित्य कर्म उरकून शत्रुघ्नभरत । घेती राम गुरु अत्रि यांची आज्ञा ।। १
समाजांसहित सकल साधा साज । राम वनी भ्रमणास्तव पदी चालत ।
कोमल चरण अनवाणी जात । तंव होई भूमी मृदु संकोचून मनी ।। २
कुशकंटककंकरलघुपाषाण । या कटु कठोर कुवस्तु सारून ।
करी पृथ्वी मृदु मंजुल मार्गस्थान । वाहे समीर सुखद शीतळमंद ।। ३
घन निज छायेने सुर सुमने वर्षून । फूलफळतरु तृण मृदु होऊन ।
खग मधुर रवे मृगास निरखून । राम प्रिय जाणून सेविती सकल ।। ४
सुलभ सर्व सिद्धि प्राकृत नरास । जंव जांभई देई वदता रामनामास ।
भरत प्राणप्रिय रामास । नसे यात विस्मयजनक काही ।। ३११
ऐशा रीती फिरे भरत वनात । प्रेम नियम पाहुन मुनि संकोचित ।
पुण्य जळस्थान भूमिविभाग खगमृग । तैसे गिरितरु तृणबागवन ।। १
सुंदर विचित्र विशेष पुनीत । सकल दिव्य बघून पुसे भरत ।
कथिती ऋषिराज होऊन आनंदित । तयांचे नाम गुण पुण्यप्रभावहेतूस ।। २
कुठे प्रणाम कुठे करी भरत स्नान । कुठे विलोकी रमणीय स्थान ।
बैसे कुठे मुनिआज्ञा घेऊन । स्मरून रामलक्ष्मण सीतेसह ।। ३
भरताचा स्वभाव सुसेवास्नेह बघून । देती आशीर्वाद वनदेव मनी प्रसन्न ।
फिरती पुन्हा होताच अडीच प्रहर दिन । घेती दर्शन मग प्रभुपदकमलांचे ।। ४
देखे भरत तीर्थस्थळ । पाच दिनांतची सकल ।
श्रवणकीर्तनी हरिहराचे यश विमल । गेला तो दिन यापरी जाहली सांज ।। ३१२
प्रातःस्नान करून जमे जनसमाज । भरत विप्रवृंद जनकराज ।
जाणती मनी दिन शुभ निरोपा आज । न वदती संकोचे कृपाळु राम ।। १
गुरुनृपभरत सभेसी अवलोकिती । परि संकोचे पुन्हा पृथ्वी निरखिती ।
सकल सभा शीला स्तवून चिंतिती । स्वामी रामासम न संकोची कोठे ।। २
रामाचा रोख पाहून भरत सुजाण । उठे प्रेमाने विशेष धीर धरून ।
घाली दंडवत वदे कर जोडून । नाथा पुरविले तुम्ही मम लाडकोड ।। ३
मजस्तव साहलात अति त्रास । भोगिले आपण अति दुःखास ।
आता स्वामी करा आज्ञेस । जाऊन सेवीन अयोध्या वरुषे चौदा ।। ४
ज्या उपायाने हें दीन दयाळ । पुन्हा आपुले पाय दिसतील ।
तैसा बोध करावा मज कृपाळ । अवधीस्तव हे अयोध्यानाथ ।। ३१३

आपुल्या प्रेमे प्रजाजन आप्तजन । हे स्वामी पुनीत प्रेमानंदात मग्न ।
व्यर्थ परमपद लाभ प्रभुविण । आपणास्तव भवदु:खी जळणे सुखद ।। १
सकलांचे हृदय स्वामी सुजाण जाणती । रुचिलालसाराहणी या भक्ताची ।
सकलांचे प्रणतपाळ रक्षण करिती । सांभाळती उभय समाजास ।। २
सर्वपरी मज संपूर्ण भरवसा हाच । विचार करिता न लेश चिंता साच ।
मम दीनता स्वामींचा स्नेह कृपा हीच । बळेच मज करिती धीट उभय ।। ३
स्वामी करा दूर हा दोष महान । द्यावी शिकवण संकोच त्यजून ।
प्रशंसती सर्व भरताची विनंति ऐकून । जी करी विवरण हंसक्षीर न्यायाने ।। ४
दीनबंधु श्रवण करून । दीन कपटहीन बंधु भरताचे वचन ।
जाणून देश काळ वर्तमान । वदती परम चतुर प्रभुराम ।। ३१४
तात चिंता तव मम गृहपरिजनांची । वसिष्ठास जनकनृपास साची ।
आपुल्या स्वप्नीही भीति दु:खाची । गुरुमुनिनृप यांचे मस्तकी छत्र ।। १
तव मम परम पुरुषार्थ । सुयश धर्म परमार्थ स्वार्थ ।
उभयांनी पितृ-आज्ञा पालनात । नृपास भलेपण लोकीवेदी कल्याण ।। २
गुरुमातापितास्वामी यांचे आज्ञापालनी । चालता कुमार्गी न पडती घसरुनी ।
सोड शोक तू ऐसे चिंतुनी । रक्षावे अयोध्येस राहुनी अवधीभर ।। ३
देशकोशकुटुंबपरिवार । यांचा गुरुपदरजावरी सकळ भार ।
पाळावे प्रजाजन पृथ्वी अयोध्यानगर । मुनिमातासचिव यांची आज्ञा मानून ।। ४
मुख्य असावा मुखासमान । जो एकलेच करी अशनपान ।
परि सकल अंगाचे करी पालनपोषण । विवेकपूर्ण तुलसीदास म्हणे ।। ३१५
राजधर्माचे सार हे इतुकेच । जैसे मनी मनोरथ राहती गुप्त ।
राम भरतास करिती उपदेश बहुत । परि विना आधार न संतोष शांति मना ।। १
बघुन भरताचे शील गुरुमंत्री समाज । होती संकोचस्नेहपूर्ण रघुराज ।
मग देती पादुका कृपा करून प्रभुराज । आदरे भरत धरी त्या शिरावरी ।। २
चरणपीठ हे करुणानिधीचे । जणु दोन जीवरक्षक प्रजाप्राणांचे ।
संपुष्ट भरताच्या भक्तिरत्नाचे । जीव साधनासी अक्षरे दोन राम ।। ३
कुशल कर्मासी हस्त कुलरक्षाद्वार । जणु सेवा सुधर्मी विमल नेत्र ।
भरत अति आनंदित मिळता आधार । सुख ऐसे वाटे जणु अयोध्यी सीताराम ।। ४
निरोप घेऊन भरत प्रणाम करी । मग भरतासी राम उरी कवटाळिती ।
कुटिल अमरपति इंद्र ते अवसरी । पसरी मायाजाल जनतेवरी ।। ३१६

ते झाले मायाजाल हितकर सकलांस । चौदा वरुषे आशासंजीवनी जीवनास ।
न तो घाबरून जन सोडते प्राणास । लक्ष्मण सीताराम यांच्या विरहरोगाने ।।१
रामकृपेने टळले संकट । देवांची धाड झाली गुणकारक रक्षक ।
आलिंगिती राम निजभुजे बंधु भरत । न वर्णवे रामाचा प्रेमानंद ।। २
कायावाचामने येई प्रेमास भरती । धैर्य धुरंधर राम धैर्य सोडती ।
कमल लोचनांतून अश्रु गळती । स्थिती बघून जाहली सुरसभा दुःखी ।। ३
गुरु मुनि जनकांसम धीरधुरीण । कनकासम कसती जे ज्ञानअग्नीत मन ।
ब्रह्मा जयांचे करी निर्लेप सृजन । जे जगरूपीं जळांत कमलपत्रे ।। ४
ते सकल रघुवीरभरताची प्रीती । उपमारहित अपार विलोकिती ।
कायावाचामने प्रेमी तल्लीन होती । निज विवेकवैराग्यासहित ।। ३१७
जेथे जनकवसिष्ठमतिगति कुंठित । ती दिव्य प्रीति प्राकृत वदणे अनुचित ।
रामभरतविरह वर्णता निश्चित । ऐकून म्हणतील जन कवि कठोर ।। १
न वर्णवे तो संकोचरस कवीस । ते समयी संकोचे वाणी स्मरता प्रेमास ।
रघुवर समजाविती भेटून भरतास । मग धरिती शत्रुघ्नास हृदयी हर्षाने ।। २
सेवकसचिव भरताचा रोख पाहून । निज कार्यास लागती मग जाऊन ।
ऐकता उभय समाजास दुःख दारुण । होती सुसज्ज गमनास्तव ।। ३
प्रभुपदकमलांसी उभय भ्राते वंदिती । रामाज्ञा शिरी धरून निघती ।
तपस्वी मुनि वनदेव यांसी सन्मानिती । वारंवार प्रार्थिती सकलांस ।। ४
मग लक्ष्मणास भेटून प्रणाम करिती । सीतापदधूलिकण शिरी ठेविती ।
ऐकून आशीर्वाद प्रेमाने निघती । जो समस्त मंगळाचे मूळ ।। ३१८
अनुजासह राम वंदिती जनकास । आदरे बहूपरी प्रार्थिती तयांस ।
देवा दयावश बहु दुःख आपणांस । आला समाजासह काननात ।। १
जावे निजपुरी द्यावे आशीर्वादासी । धीर धरून नृप निघती मिथिलेसी ।
सन्मानून मुनिमहीदेवसंतांसी । बोळविले शिवविष्णुसम जाणून ।। २
सासूसमीप मग बंधुद्वय जाती । पदां वंदून पावून आशीर्वाद निघती ।
प्रजा परिजन सचिव सुजाण अती । तैसे कौशिक वामदेव जाबाली ।। ३
यथायोग्य विनये प्रणाम करून । निरोप देती सकलां रामलक्ष्मण ।
नारीनर लघु मध्य महान । सकलांसी सन्मानिती कृपानिधी ।। ४
प्रभु भरताचे मातेसी करून वंदन । पवित्र प्रेमे तिजसी भेटून ।
तिचा शोकसंकोच मिटवून । शिबिकी बैसवून देती निरोप ।। ३१९

सीता आप्तजनमातापिता यांसी भेटून । परतली जिचे पतिवरी प्रेम पावन ।
भेटे मग सासवांस प्रणाम करून । त्या प्रेमवर्णनी नसे कवीस उल्हास ।। १
उपदेश ऐकून इच्छित आशीर्वाद पावून । सीता उभय समाजांचे प्रेमात मग्न ।
रघुपति सुंदर पालखी मागवून । बैसविती सांत्वन करून मातांना ।। २
बंधु भेटती वारंवार एकत्र येऊन । पोचविती मातांसी प्रेमे समान ।
वाजीगजवाहने सजवून । करिती प्रयाण भरतजनकांचे दल ।। ३
ठेवून हृदयी रामसीता लक्ष्मणासहित । चालती लोक जणु चेतनारहित ।
वृषभअश्वहत्ती पशु मनी दुःखित । चालती जणू परवश मारून मन ।। ४
गुरुगुरुपत्नी यांच्या पदांस वंदून । सीतालक्ष्मणासह रघुनंदन ।
जाती पर्णकुटींत माघारी वळून । हर्षविषादयुक्त मनाने ।। ३२०
मग सन्मानून देती निरोप निषादास । निघाला हृदयी धरून विषादास ।
निरोप देती भिल्लकिरातकोळीवनचरास । वंदन पुन्हा पुन्हा करून जाती ते।। १
वटछायी सीतारालक्ष्मण बैसती । प्रिय आप्तजन वियोगे विलाप करिती ।
भरताचे प्रेम सुभाव सुवाणी स्तविती । मग वदती प्रियेस अनुजास ।। २
कायावाचामने भरताची प्रीतिप्रतीती । रामप्रेमवशे निजमुखे वानिती ।
ते समयी चित्रकुटी म्लान होती । खगमृग जलमीन चराचर ।। ३
रघुवरांची स्थिती देवगणे बघून । गृहातील दुःख कथिती सुमने वर्षून ।
प्रभु प्रणाम करून देती आश्वासन । मग जाती देव निर्भय प्रसन्न मने ।। ४
सानुजराम सीतासमवेत । विराजती ऐसे पर्णकुटीत ।
जणु ज्ञान वैराग्य भक्ति सुशोभित । तनुधारी मूर्तिमंत ।। ३२१
मुनि विप्र गुरु भरत भूपाल । रामविरहे होती व्याकुळ ।
मनी चिंतून प्रभूचे गुणशील । सकल निःस्तब्ध चालती मार्गात ।। १
जाती सकल यमुना पार करून । तो वासर गेला भोजनावाचून ।
केला दुसरा निवास सुरसरिता उतरून । सर्व सुखसोय निषाद करी जेथे ।। २
उतरून शरयु गोमतीत स्नान करिती । अयोध्येत चार दिनांनी पोचती ।
तेथे चार दिन जनक राहती । राजकाज सकल सांभाळून ।। ३
सचिवगुरुभरत यांस राज्य सोपवून । जाती मिथिलेश निज समाज घेऊन ।
नगरनारीनर गुरूंची आज्ञा मानून । सुखे वसती रामाच्या राजधानीत ।। ४
रामदर्शनास्तव सकल लोक । करिती उपवास नेम व्रत ।
भूषण भोग सुख यांस सोडून । चौदा वरुषे काळ ही आशा जगवी तया ।। ३२२

समजावी सचिव सुसेवक यांना भरत। आज्ञा पाळून ते निजनिज कार्यी लागत।
शत्रुघ्नास बोलावून आज्ञा देत। सोपवून मातृसेवा तयावरी ।। १
मग बोलावी भरत विप्रांस। कर जोडून विनवी तयांस।
न करावा संकोच द्यावा आदेश। शुभाशुभ उच्चनीच कार्यासी ।। २
बोलावी आप्तजन नागरिक प्रजा यांस। समाधान करून सुखे वसवी तयांस।
मग जाई अनुजासह गुरुगृहास। वदे दंडवत घालून जोडून कर ।। ३
पाळीन नेमव्रत आज्ञा द्याल जर। पुलकित तनु वदती प्रेमे मुनिवर।
भरता जगी तेच होईल धर्माचे सार। वदून समजून तू करशील ते ।। ४
आशीर्वाद पावून गुरुबोध ऐकुनी। सुदिन शोधिती ज्योतिषास बोलावुनी।
प्रभूच्या चरणपादुकांस सिंहासनी। ठेविती शांतिपूर्वक मनोभावे ।। ३२३
राममातेस गुरुपदांस वंदून। प्रभूच्या चरणपादुकांची आज्ञा घेऊन।
नंदिग्रामी पर्णकुटि उभारून। भरत धर्मधुरंधर तेथे वास करी ।। १
जटाजूट शिरी कटी मुनिवसन। मही खणून घाली दर्भासन।
नेमव्रत पात्र वसन अशन। ऋषिधर्म कठिण पाळी प्रेमाने ।। २
भूषणवसन नाना भोगविलास। सोडी कायावाचामने करून प्रतिज्ञेस।
इंद्र स्तवी ज्या अयोध्याराजास। दशरथसंपत्ति ऐकून लज्जित कुबेर ।। ३
त्या अयोध्येत वसे भरत अनासक्त। जैसा भ्रमर चंपकवनात।
रामप्रेमी रत जन भाग्यवंत। लक्ष्मी विलास सोडिती वमनापरी ।। ४
रामप्रेमासी पात्र भरत। भोगविलास टाकून तो न महान् होत।
चातकहंसांसी सकळ स्तवीत। चातकप्रतिज्ञा विवेकशक्ति हंसाची ३२४।।
प्रतिदिनी होई भरताचा देह दुर्बळ। घटे मेद परि तेच मुखलावण्यबळ।
मन न उदास वाढे धर्मदल। रामप्रेमपण पुष्ट नित नवीन ।। १
शरदऋतु प्रकाशे जल घटत। परि विकसित वेत कमले फुलत।
भरताच्या विमल हृदयआकाशात। शमदमसंयमउपवास ही नक्षत्रे ।। २
वनवासकाल पौर्णिमा ध्रुव विश्वास। रामस्मरण जणु आकाशगंगा प्रकाश।
रामप्रेमरूपी शशी अचल निर्दोष। निज तारागणांसह सुशोभित सुंदर ।। ३
भरताची राहणी मति भक्ति। विमल गुण कर्तृत्व वैराग्य विभूती।
वानिता सकल कवि संकोचती। अगम्य ते शेषगणेशशारदेस ।। ४
नित्य करी तो पादुकांचे पूजन। तंव हृदयातील प्रेम येई उचंबळून।
वारंवार पादुकांची आज्ञा घेऊन। राज्यकर्म करी नानापरी।। ३२५

हृदयी सीतारघुवीर गात्रे पुलकित । जपे जिव्हा रामनाम नीर नयनात ।
वसती सीता लक्ष्मण रघुवीर काननात । परि तपे तनुक्षीण भवनी भरताची ।। १
वदती जन जाणून उभयांच्या स्थितीस । भरत सर्वपरी पात्र स्तुतीस ।
संकोचती साधुसंत ऐकून नेम व्रतास । स्थिती पाहता लज्जित मुनिराज ।। २
भरताचे आचरण परम पुनीत । मंजु मधुर मोदमंगलकारक
घोर कलियुग पापक्लेशहारक । जणु दिनेश महामोह रात्रीस ।। ३
पापपुंजगजासी मृगराज । शमन करी संतापरूपी समाज ।
भवभारभंजक जनरंजक सहज । जणु श्रीराम प्रेम सुधाकराचे अमृत ।। ४

सीताराम प्रेम । पीयुषाने पूर्ण । न होत जनन । भरताचे ।
कोण व्रत करी । मुनींसी अगम । यमदमशम । नियमादी ।
दुःखाग्नि दारिद्रय । दंभादि दूषण । वारिती ते कोण । यशमिषे ।
रामाच्या सन्मुख । ठेवी शठ कोण । तुलसीसमान । कलिकाळी ।। १

तुलसी म्हणे नेमे ऐकील । आदरे भरतचरित्र विमल ।
तो सीतारामचरणी प्रेम करील । पावेल भवरसविरक्ती ।। ३२६

।। कलियुगातील संपूर्ण पापांचा नाश करणारा
श्रीरामचरित मानसाचा दुसरा सोपान समाप्त ।।

(अयोध्याकांड समाप्त)

तृतीय सोपान–अरण्यकांड

धर्मतरुमूळ । विवेकसागरा । आनंद देणारा । पूर्ण इंदू ।
वैराग्य अंबुजा । भास्कर अससी । अघतम नाशी । पापहारी ।
मोहपटलासी । भंजक पवन । गगनी उत्पन्न । होसी स्वयें ।
ब्रह्मवंशी शिवा । रामप्रेमी रत । कलंकनाशक । वंदितो मी ।। १
पीतांबराधारी । सांद्र मेघकांती । आनंदी जलधी । शौभिवंत ।
वाणशरासन । हातांत शोभतो । भाता विलसतो । कटीवरी ।
जटाजूट शिरी । राजीवासमान । विशाल लोचन । सुशोभन ।
जानकीलक्ष्मण । पथी सहगत । त्या रामा भजत । अभिरामा ।। २

हे उमे रामगुण गूढ अती । ते जाणून मुनिपंडित विरक्त होती ।
जे हरीसी विन्मुख जया न धर्मरती । होती ते महामूर्ख मोहवश ।।
गायिली मी नगरनर भरत यांची प्रीती । सुंदर अनुपम यथामती ।
जे सुरनरमुनि यांच्या मना रुचे अती । ते ऐक आता पावन प्रभुचरित्र ।। १
एकदा सुंदर कुसुमे वेचून । राम निजकरे गुंफिती भूषण ।
स्फटिक रुचिर शिळेवर बैसून । प्रभु घालिती आदरे सीतेसी ।। २
वायसवेषे इंद्राचा पुत्र जयंत । रघुपतीचें बळ बघू इच्छित ।
जैसी महा मंद मति वांछीत । मुंगी सागराचा ठाव ।। ३
पळे सीतेच्या चरणी चोच मारून । काक मूर्ख मंदगति म्हणून ।
वाहिले रुधिर रघुनायक हे जाणून । लाविती धनुष्यासी बाणकुश ।। ४
अति कृपाळु रघुवीर । जे करिती सदा प्रेम दीनावर ।
तो मूर्ख अवगुणांचे आगर । तयासी कपट करी तेथे येवोनी ।। १
धावे ब्रह्मशर मंत्राने प्रेरित । पळत सुटला काक भयभीत ।
निजरूप घेऊन जाई इंद्रानिकट । न रक्षिले रामविमुख पाहून ।। १

उपजे मनी निराशा खेद । जैसे चक्राचे भय दुर्वासासी वाटत ।
फिरे भयशोके व्याकुळ श्रमित । ब्रह्मधामी शिवपुरी आदि लोकी ॥ २
एथे बैस तया कोणी सांगेना । कोण रक्षील रामद्रोही जनांना ।
तया सुधा विषसम ऐक हे हरियाना । माता मृत्युसम पिता यमराजसमान ॥ ३
करिती मित्र शत शत्रुसम करणी । तयांसी देवगंगा होत जणू वैतरणी ।
समस्त जग तया भासे तप्त अग्नीहुनी । हे बंधो जो वैर धरी श्रीरामासी । ।४
नारद बघती व्याकुळ जयंतासी । आली करुणा कोमल संत चित्तासी ।
पाठविले तया त्वरित रामापाशी । पुकारून म्हणे रक्ष हे प्रणतवत्सला ॥ ५
आतुर अति भये धरी तो रामपद । वदे त्राहि त्राहि हे दयाळु रघुनाथ ।
आपुले बळ अतुलित प्रभुता अतुलित । न जाणिले ते मी मंदमती ॥ ६
निज कर्म केल्याचे फळ पावून । आलो शरण मी प्रभो करा रक्षण ।
कृपाळु राम अति दीन वाणी ऐकून । हे भवानी एकाक्ष करून सोडले तया ॥ ७
केला द्रोह होऊन मोहवश । जरी तो होता उचित वधास ।
तरी कृपा करून प्रभु सोडिती तयास । कोण कृपाळु ऐसा रघुवीरासम ॥ २
श्रीराम चित्रकूटी करून वास । करिती चरित्र जे सुधासम कर्णास ।
राम मनी करिती अनुमानास । जाणती सकल मज जमेल समुदाय ॥ १
मग सकल मुनींचा निरोप घेती । सीतेसह दोघे बंधु निघती ।
जंव प्रभु अत्रींच्या आश्रमी येती । ऐकून तंव महामुनि प्रसन्न ॥ २
पुलकित गात्रे ऋषि उठती धावुनी । राम चालती वेगे तया पाहुनी ।
प्रणाम करता हृदयी धरिती मुनी । प्रेमाश्रुंनी न्हाऊ घालती उभयांस ॥ ३
नयन तृप्त बघून रामाचे लावण्यास । आदरे आणिती आश्रमी तयास ।
पूजा करून वदती सुवाणीस । देती फळमूळे रुचली प्रभूस जी ॥ ४
प्रभु जाहले आसनी विराजमान । शोभा निरखिती डोळे भरून ।
मुनिवर परम प्रवीण । कर जोडून करिती स्तुती ॥ ३

नमीत भक्तवत्सला । कृपाळुशीलकोमला ।
स्तवीत मी पदांबुजा । अकामिनासी मोक्षदा ॥ १
निकाम श्याम सुंदरा । भवांबुनाथमंदरा ।
प्रफुल्ल पद्मलोचना । मदादि दोषमोचना ॥ २

विशाल बाहु विक्रमा । प्रभो विभूति ना सीमा ।
धनुष्यचापधारका । विभो त्रिलोकनायका ।। ३
दिनेशवंशमंडना । महेशचाप खंडना ।
मुनीशसंतरंजना । सुरारिवृंदभंजना ।। ४
शिवाकडून वंदिता । अजादि देवसेविता ।
विशुद्धज्ञान-विग्रह । समस्त पापनाशक ।। ५
नमामि इंदिरापती । सुखागरा सतांगती ।
भजे सशक्ति सानुजा । शचीपतिप्रियानुजा ।। ६
त्वदंघ्रि लीन जे नर । स्तवीत हीन मत्सर ।
न डुंबती भवार्णवी । वितर्कवीचिक्षोभित ।। ७
निरिच्छ एकले सदा । स्तवीत मुक्तिमीलना ।
मनोविकार सांडिती । निजस्वरूप पावती ।। ८
प्रभो तु एक अद्‌भुत । निरीह ईश व्यापक ।
जगद्‌गुरु सनातन । तुरीय ब्रह्म केवळ ।। ९
नमीत भाववल्लभ । कुयोगिनासी दुर्लभ ।
स्वभक्तकल्पपादप । सुसेव्य सौख्यपूर्वक ।। १०
अनूपरूप भूपती । नमीत उर्विजापती ।
प्रसन्न हो स्तवी तुला । पदाब्जभक्ति दे मला ।। ११
प्रभुस्तुती ही गाति जे । मिळे तयासी त्वत्पद ।
नसे तयांत संशय । त्वदीय भक्तिसंयुत ।। १२

शिर नमवून मुनि करिती विनंती । कर जोडून पुन्हा वदती ।
न सोडो कदापि मम मती । नाथा आपुले चरणकमल ।। ४
अनसूयेचे पद धरी सीता । भेटली तिज ती सुशील विनीता ।
बहु सुख वाटे ऋषिपत्नीच्या चित्ता । आशीर्वाद देई समीप बैसवून ।। १
लेववी तिजसी दिव्य वसनभूषण । जी विमल सुशोभन नित नूतन ।
ऋषिपत्नी वदे मृदु सरस वचन । करी अल्पसे वर्णन स्त्रीधर्माचे ।। २
मातापिताभ्राता हितकारी । परि त्या सुखास सीमा हे राजकुमारी ।
जी न सेवी पतीस अधम ती नारी । वैदेही अमित सुख देणारा पतीच ।। ३

धैर्य धर्म नारी सुहृद । होते परीक्षा यांची विपत्तिकाळात ।
जड वृद्ध रोगविकारी धनविरहित । अंध बधिर क्रोधी अति दीन ।। ४
ऐशा पतीचा अपमान जी करील । ती स्त्री यमपुरी नाना दुःखे भोगील ।
हा एकच व्रतनेम एकच धर्म उज्ज्वल । असावे कायावाचामने प्रेम पतिपदी ।। ५
पतिव्रतेचे प्रकार चार जगात । वेदपुराणसंत हेच वदतात ।
भाव ऐसा वसे उत्तम स्त्रीमनांत । जगी पतीविण न अन्य पुरुष स्वप्नीही ।। ६
कैसे देखे मध्यम स्त्री परपुरुषास । भ्रातापितापुत्र मानी ती तयास ।
राखील जी धर्मविचारे कुलमर्यादेस । ती नारी निकृष्ट वदती वेद ।। ७
संधि न लाभता वा भाववशे जी । राहील पतिव्रता मानावी अधम जगी ती ।
पडते कल्पशत रौरव नरकी । जी परपतीत रत पतिवंचक ।। ८
क्षणैक सुखास्तव जन्म शतकोटी । दुःख न जाणेल तिजसम कोण खोटी ।
श्रमाविण नारीस मिळते परम गती । पाळिता पातिव्रत्य कपट सोडून ।। ९
पतीसी विरोध करून जी जन्मा येईल । तरुणपणींच ती विधवा होईल ।। १०
जन्मताच अपवित्र असे जी नारी । पतिसेवा करून ती सुगति प्राप्त करी ।
जिचे यश गाती वेद चारी । ती तुलसी आजही प्रिय हरीस ।। ५ क
ऐक सीते तव नाम स्मरून । करिती नारी पतिव्रताधर्माचे पालन ।
राम प्रिय तुज प्राणासमान । कथा कथिली मी संसारहिता ।। ५ ख
हे ऐकताच परम सुख सीतेसी । आदरे नमन करी गुरुपत्नीसी ।
मग कृपानिधान वदती मुनीसी । आज्ञा असेल तर जाऊं अन्य वना ।। १
कृपा करावी मजवरी चिरंतन । न सोडावा स्नेह सेवक जाणून ।
धर्मधुरंधर प्रभूची वाणी ऐकून । वदती सप्रेम ज्ञानी मुनी ।। २
वांछिती अजशिवसनकादी । जयाची कृपा सकल परमार्थवादी ।
ते तुम्ही राम निष्काम नरा प्रिय अती । दीनांचे बंधु वदता मृदु वचन ।। ३
आतां मी जाणिले लक्ष्मीचे चतुरपण । जी भजते तुम्हा अन्य देवा त्यजून ।
जयाच्या समान न कोणी अति महान । का नसेल तयांचे ऐसे भले शील ।। ४
जा स्वामी ऐसे कैसे वदू आपणासी । अंतर्ज्ञानी नाथ सांगावे मजसी ।
मग धीर मुनी विलोकिती प्रभूसी । तनु पुलकित तयांची प्रेमाश्रू नयनी ।। ५

तनु पुलकित । मुनि प्रेमपूर्ण । देखती नयन । राममुख ।
बघे मी कोणत्या । जपतपें कृत । ज्ञानगुणातीत । ऐसा प्रभू ।

जप योग धर्म । त्यायोगे पावती । अनुपम भक्ती । भवी नर ।
तुलसीचा दास । गातो निशिदिन । चरित्र पावन । श्रीरामाचे ॥ १

कलिमलशमन मनदमन । ऐसे रामसुयश सुखमूळ जाणून ।
जे आदरे ऐकती तयावरी प्रसन्न । असती श्रीराम सदोदित ॥ ६ क
पापांचे आगर हा कलिकाल कठिण । न साधे योग तप धर्म वा ज्ञान ।
जे नर या सकलांचा आधार सोडून । भजती रामासी ते चतुर नर ॥ ६ ख
वंदून मुनींच्या पदकमलांस । निघाले राम सुरमुनींचे ईश ।
अति सुंदर सुशोभित मुनिवेष । चालती राम पुढे लक्ष्मण पाठीशी ॥ १
उभयांमध्ये सीता शोभे कैसी । ब्रह्मजीवांमध्ये माया जैसी ।
वाट उत्तम देती ओळखून प्रभूसी । गिरि सरिता वन घाट अवघड ॥ २
जेथे जेथे जाती देव रघुराया । तेथे तेथे धरी मेघ नभछाया ।
मार्गी भेटता विराध राक्षस तयां । तो येताच वधिती तात्काळ रघुवीर । ३
त्वरित दिव्यरूप मिळाले तयास । दुःखी पाहून धाडिती निजधामास ।
मग येती शरभंग मुनींच्या आश्रमास । सुंदर अनुजजानकीसह ॥ ४
रामाचे मुखकमल पाहून । लुब्ध भृंगापरी मुनीचे लोचन ।
आदरे करिती मकरंदरसपान । धन्य धन्य जन्म शरभंगाचा ॥ ७
मुनि म्हणती हे रघुवीर कृपाळ । शंकरमानसातील तुम्ही राज मराल ।
जात होतो ब्रह्मलोकी दयाळ । तव ऐकिले राम येती वनी ॥ १
पाहत होतो दिनरात्र वाट । प्रभो आता जाहले मम चित्त शांत ।
सकल साधनहीन मी नाथ । मानून दीन भक्त कृपा करा ॥ २
देवा हे न मजवरी उपकार । राखिले निज ब्रीद हे भक्तमन चोर ।
राहावे दीनाच्या कल्याणास्तव तोवर । तनु सोडून जोवर न मिळे निजधाम॥ ३
योगयज्ञ जप तप व्रत हे अर्पून । मुनि मागती भक्तीचा वर प्रभूपासून ।
यापरी शरभंग चिता रचून । बैसती वरी हृदयासक्ति सोडून ॥ ४
सीताअनुजासह हे प्रभो अभिराम । नीलजलदसम तनु श्याम ।
हे सगुणरूपी श्रीराम । वास करावा निरंतर मम हृदयी ॥ ८
ऐसे वदून तनु जाळिती योगअग्नीत । रामकृपेने तया वैकुंठ प्राप्त ।
मुनि न लीन होती हरिरूपात । घेतला प्रथम वर द्वैत भक्तीचा ॥ १

ऋषिसमूह पाहून मुनींची स्थिती। निजहृदयी विशेष सुखी होती।
मुनिवृंद करिती प्रभूची स्तुती। जय करुणानंद भक्त हितकारी॥ २
मग रघुनायक चालले पुढील वनी। संगे जाती श्रेष्ठ विपुल मुनी।
रघुराया अस्थिसमूह पाहुनी। येई दया तया पुशिती मुनिवरासी॥ ३
मुनि वदती स्वामी पुसता कैसे जाणून। सर्वदर्शी आपणास अंतर्ज्ञान।
राक्षस समूहाने भक्षिले मुनिगण। ऐकून अश्रूंनी भरती रामांचे नेत्र॥ ४
करीन मही मी निशाचरहीन। केला पण रामांनी भुजा उचलून।
मग सकल मुनींच्या आश्रमात जाऊन। सकलां सुखी करिती रघुराज॥ ९
अगस्त्य मुनींचा शिष्य सुतीक्ष्ण। प्रभुठायी रति अति सुजाण।
कायावाचामने रामभक्तीत लीन। स्वप्नीहि न भजे अन्य देवांस॥ १
येताच कानी प्रभूचे आगमन। येई त्वरे धावत मनोरथ करून।
हे विधाता दीनबंधु रघुनंदन। करितील का दया मजसम दुष्टावरी॥ २
स्वामी राम अनुजासह मजला। भेटतील का जैसे निजभक्ताला।
मम हृदयी न दृढ विश्वास असला। नसे मनी मम ज्ञानभक्तिवैराग्य॥ ३
न केला मी सत्संग जप योग याग। न धरिला प्रभुचरणी दृढ अनुराग।
करुणानिधान प्रभूचा बाणा हा एक। जया न अन्य गति तो प्रिय प्रभूस॥ ४
जाहले आज कृतार्थ मम लोचन। देखिले मी कमलवदन भवमोचन।
मुनि ज्ञानी प्रेमात पूर्ण मग्न। हे भवानी न वर्णवे तयांची स्थिती॥ ५
न दिसे दिशा उपदिशा वा पंथ। कोण मी जातो कोठे न उमगत।
माघारी वळती केव्हा पुन्हा पुढती जात। केव्हा प्रभुगुण गाऊन करिती नृत्य॥ ६
प्रगाढ प्रेमा भक्ति प्राप्त मुनीस। तरू आड लपून प्रभु बघती तयास।
देखून प्रभुवरील परम प्रीतीस। भवभयहारक हृदयी प्रगटती॥ ७
मुनि मार्गी बैसती होऊन अचल। शरीर पुलकित जणु फणसाचे फळ।
तंव रघुनाथ निकट येती तात्काळ। मनी प्रसन्न पाहून गति भक्ताची॥ ८
बहुपरी राम जागविती मुनीस। न जागे होती पावून ध्यानसुखास।
तंव लपविती राम भूपरूपास। चतुर्भुज रूप हृदयी दाखविती॥ ९
मुनि उठती कैसे घाबरून। जैसा सर्पराज मणिविहीन।
देखती सन्मुख श्यामल सुखनिधान। सीतालक्ष्मणासमवेत॥ १०
पडती चरणी दंडकाष्ठापरी होऊन। प्रेमपूर्ण मुनि महा भाग्यवान।
राम विशाल भुजे तया उठवून। परम प्रीतीने धरिती हृदयासी॥ ११

कृपाळु ऐसे शोभती भेटता मुनीस । जणु कनक तरु भेटे तमाल वृक्षास ।
मुनि निश्चल बघती रामवदनास । भासती जणू रेखाटिले चित्री ।। १२

तंव हृदयी धीर धरून मुनी । वारंवार पडती प्रभुचरणी ।
प्रभूस निज आश्रमी आणुनी । करिती पूजा विविधपरी ।। १०
मुनि म्हणती ऐका प्रभो मम विनंती । कैसी करावी मी आपुली स्तुती ।
महिमा अपार आपुला मम अल्प मती । जैसा प्रकाश रविसन्मुख काजव्याचा ।। १
नीलकमलमाळेसम श्याम शरीर । जटामुकुट शिरी नेसती मुनिवस्त्र ।
करी चापशर कटी तुणीर । श्रीरघुवीरं नमामि निरंतरम् ।। २
जो दावाग्नि मोहघन विपिनासी । जणु भानु संतकमलकाननासी ।
मृगराज निशाचरगजगणासी । भवखग वधाया श्येन रक्ष सदा आम्हा ।। ३
अरुणराजीव नयन सुवेष । सीतानयनचकोरासी राकेश ।
शिवहृदयमानसातील बालराजहंस । हे विशाल उरबाहो रामा नमामी ।। ४
संशयसर्पासी ग्रासणारा खगेश । शमन करी कर्कशतर्कविषादास ।
भवभंजक रंजक सुरगणास । हे कृपासागरा त्रातु सदा आम्हा ।। ५
निर्गुणसगुण विषम सम रूप । ज्ञानगिरागोतीत अनूप ।
विमल अखिल अपार स्वरूप । राम महीभारभंजक नमामी ।। ६
भक्तास्तव कल्पतरु उपवन । क्रोधलोभमदकामशमन ।
भवसागरासी सेतु अति सुजाण । हे दिनकरकुलकेतु सदा त्रातु ।। ७
अतुलित भुजप्रताप बलधाम । कलिमल विपुल विभंजक नाम ।
धर्मरक्षक सुखद गुणग्राम । मम राम संतत शं तनोतु ।। ८
जरी विमल व्यापक अविनाशी । सकल हृदयी निरंतर वासी ।
हे खरारि अनुजश्रीसह मम मानसी । वसावे तापसवनचर रूपाने ।। ९
हे स्वामी जाणोत जाणती जे कोण । आपण अंतर्ज्ञानी निर्गुण सगुण ।
जे कोशलपति राजीवनयन । ते राम मम हृदयी वास करो ।। १०
चुकूनहि न ढळावा ऐसा अभिमान । मी सेवक मम स्वामी रघुनंदन ।
ऐकून मुनीचे वचन राम मनी प्रसन्न । अति हर्षे मुनीस धरिती हृदयी ।। ११
हे मुनि जाणावे मी परम प्रसन्न । मागाल जो वर तो देईन ।
मुनि वदती सत्य असत्याचे मज न ज्ञान । न वर याचिला मी कधीही ।। १२
जे तुम्हाला वाटेल उचित हे रघुराज । दासासी सुखदायक ते द्यावे मज ।
मिळो तुम्हा ज्ञानभक्तिवैराग्य प्रगाढ । हे मुनि ज्ञानगुणनिधान व्हाल तुम्ही ।। १३

जो वर दिला प्रभूने तो पावलो मी । आता मज रुचेल तो द्या स्वामी ।। १४
हे प्रभो अनुजजानकीसहित । चापबाणधर होऊन नाथ ।
श्रीरामा इंदुसम मम गगनहृदयांत । वसावे सदैव होऊन स्थिर ।। ११
वदती तथास्तु रमानिवास । राम अगस्तिप्रति जाती सहर्ष ।
गुरु दर्शनासी जाहले बहुत दिवस । तैसेच या आश्रमी येऊन सुतीक्षण वदे ।। १
प्रभुसंगे जाईन गुरुपाशी आता । तुम्हावरी नसती हे उपकार नाथा ।
पाहून कृपानिधी मुनीची चतुरता । संगे घेऊन हंसती उभय भ्राते ।। २
पथी कथिती निज अनूप भक्ती । मुनिआश्रमी मग सुरभूप पोचती ।
जाई सुतीक्ष्ण त्वरित गुरुप्रती । वदे तयासी दंडवत घालून ।। ३
हे नाथ कोशलाधीश कुमार । येती मीलना आपणा जगदाधार ।
रामलक्ष्मण सीतेसह सुंदर । देवा जयास जपता तुम्ही रात्रंदिन ।। ४
ऐकताच त्वरित धावती अगस्ती । हरीस बघता नेत्री प्रेमाश्रु भरती ।
मुनिपदकमली बंधुयुगल पडती । लाविती ऋषि हृदयी प्रेमाने ।। ५
आदरे मुनि ज्ञानी कुशल पुसती । मग आणून तया आसनी बैसविती ।
बहु प्रकारे प्रभूची पूजा करिती । म्हणती मजसम न भाग्यवंत दुजा ।। ६
जितुके होते तेथे अपर मुनिवृंद । तितुके प्रेमभरे विलोकिती सुखकंद ।। ७
मुनि समाजामध्ये बैसती । सकलांच्या सन्मुख रघुपती ।
जणू चकोर समूह विलोकिती । शरद पौर्णिमेच्या शशीप्रती ।। १२
तंव रघुवीर वदती मुनीस । प्रभो नसे काही जगी जे न ज्ञात तुम्हास ।
जाणता मम आगमनाचे कारण विशेष । तात न कथिले ते म्हणून मी ।। १
प्रभो आता तोच मंत्र द्यावा मजला । जेणे मी मारूं शकेन मुनिद्रोह्याला ।
मुनि हासून वदती श्रीरामाला । काय समजून नाथा मज पुसता ।। २
हे अघारी आपुल्या भजनाचा प्रताप । म्हणून जाणतो महिमा काहीसा अल्प ।
उंबरतरुसमान विशाल मायाव्याप । फळे तयाची अनेक ब्रह्मांडे ।। ३
सकल चराचर जीवजंतु समान । फळात वसती न तया अन्य ज्ञान ।
फळभक्षक काळ दुष्ट तीक्ष्ण । तोच काळ आपुल्या भये भयभीत सदा । ४
ते आपण सकल देवांचेहि देव । पुसता मज जणू आपण मानव ।
ह्याच वर मागतो हे दयार्णव । वसावे मम हृदयी श्रीअनुजासह ।। ५
अविरल भक्ति विरक्ति सत्संग । लाभो सदा चरणकमली प्रीतियोग ।
जरी ब्रह्म अखंड अनंत अभंग । जयास जाणून अनुभवे भजती संत ।। ६

हे ऐसे रूप जाणून करितो वर्णन । माझे सगुण ब्रह्मावर प्रेम क्षणोक्षण ।
देता दासास मोठेपण चिरंतन । म्हणून पुसले तुम्ही मज रघुराज ।। ७
हे प्रभो परम मनोहर एक स्थान । नाथा पंचवटी नामे पावन ।
प्रभो करावे पवित्र दंडकवन । दूर करावा गौतम मुनीचा उग्र शाप ।। ८
करावा वास तेथे रघुराया । करावी सकल मुनींवर दया ।
निघाले राम घेऊन मुनींची आज्ञा । लवलाही पंचवटी निकट ।। ९
तेथे गृधराज जटायूस भेटून । बहुपरी तयावर प्रीति दावून ।
करिती गोदावरी समीप गमन । राहती तेथे पर्णकुटि उभारूनी ।। १३
जेंहुनी राम तेथे करिती वास । तेंहुनी मुनि जाहले सुखी शमला त्रास ।
गिरी सरी वनी लावण्य पसरे विशेष । प्रतिदिनी दिसे अधिक मनोहारी ।। १
खगमृगवृंद आनंदित राहती । मधुप मधुर गुंजती सुंदर दिसती ।
जेथे रघुवीर प्रत्यक्ष विराजती । ते वन शेषराज न वर्णू शके ।। २
एकदा प्रभु होते सुखासीन । तंव लक्ष्मण वदे वचन कपटहीन ।
सुरनरमुनिचराचर स्वामी आपण । निज प्रभु जाणून पुसतो मी ।। ३
सांगावे देवा मज समजावून । जेणे व्हावी चरणरजसेवा सर्वा सोडून ।
ज्ञान वैराग्य माया यांचे करावे वर्णन । तैसे भक्तीचे जेणे आपण करिता दया ।।४
सांगावा भेद जीवईश्वरामधील । सांगावे सकल मज समजावून ।
जेणे आपुल्या चरणी मम प्रीति जडेल । मिटेल शोकमोहभ्रम ।। १४
सांगतो समजावून अति अल्प शब्दात । ऐक लावून निज मन मति चित्त ।
मी माझे हे तू तुझे ते हीच माया तात । करी जी वश जीवमात्रास ।। १
इंद्रियांसी गोचर वा जेथे पोचे मन । ही सकल माया हे तात जाण ।
ऐक आता तू उभयातील भेद भिन्न । विद्या एक दुसरी अविद्या हे बंधो ।। २
अविद्या अति दुष्ट दुःखदायक । जिच्या वशे जीव पडे भवकूपात ।
विद्येसी नसे बळ ती प्रभुप्रेरित । तिज वश गुण ती रचिते जगास ।। ३
ज्ञान तेच नसे जेथे अहंता आदि दोष । जो पाही ब्रह्मा समान सकलांस ।
जो तृणासम सोडतो त्रिगुणसिद्धि यांस । हे तात परम विरक्त तोच जाणावा ।।४
निजस्वरूप माया वा ईश । हे न कळे जया म्हणावे जीव तयास ।
जो देई कर्मानुसार बंधनमोक्ष । तोच ईश मायाप्रेरक सर्वपर ।। १५
धर्माने वैराग्य योगाने ज्ञान प्राप्त । ज्ञान हे मोक्षप्रद वेदविदित ।
जेणे मी प्रसन्न होई शीघ्र हे तात । तीच मम भक्ति सुखद भक्तास ।। १

तीच भक्ति स्वतंत्र तिज न लागे साधन । ज्ञानविज्ञान भक्तीच्या आधीन ।
मिळते भक्ति तंव जंव होती संत प्रसन्न । तीच भक्ति अनुपम सुखमूळ तात ।।२
आता भक्तीचे साधन सांगतो वर्णुनी । ह्या सुगम पथ जेणे मज पावे प्राणी ।
असावी प्रीति प्रथम विप्रचरणी । निजकर्मी दक्ष जैसे कथिले वेदाने ।। ३
फळ तयाचे विषयभोगात विरक्ति । मग उपजते मम ठायी प्रीती ।
दृढ होतील श्रवणादि नवभक्ती । मनी उपजेल प्रेम मम लीलेत ।। ४
जो संतचरणी करी प्रेम । कायावाचामने भजनी जयाचा दृढ नेम ।
तो मज मातापितागुरुबंधुसम । जाणून मम दृढ सेवा करील ।। ५
मम गुण गाता जयाचे पुलकित शरीर । गद्‌गद वाणी वाहे नेत्री प्रेमनीर ।
काममददंभादि नष्ट कुविकार । हे तात निरंतर मी वश तया ।। ६
कायावाचामने प्राप्त जयास मम गती । मम निष्काम भावे भजन करिती ।
तयांच्या हृदयकमलात वसती । करून राही सदा मी ।। १६
अति सुखी भक्तियोग ऐकून । लक्ष्मण प्रभुपदांसी करी नमन ।
ऐसे काही एक जाती दिन । वैराग्यज्ञाननीतिकथनात ।। १
शूर्पणखा रावणाची भगिनी । दुष्ट हृदय जैसी भयानक नागिणी ।
पंचवटीत असता एके दिनी । उभय कुमारांसी बघून कामविकल ।। २
असो तो भ्रातापितापुत्र हे सर्पारी । पुरुषास मनोहर निरखिता नारी ।
होई कामे व्याकुळ मना न आवरी । जैसा सूर्यकांत मणि द्रवे बघून सूर्यास ।।३
आली प्रभूपाशी सुंदर रूप घेऊन । बोलली तयासी हसून वचन ।
नसे पुरुष तुम्हासम स्त्री मजसमान । विधात्यानेच रचला हा सुयोग ।।
मजसी अनुरूप पुरुष नसे जगात । शोधूनहि न मिळे त्रैलोक्यात ।
म्हणून अजुनी राहिले अविवाहित । जाहला काहीसा संतोष तुम्हा बघून ।। ५
प्रभु वदती सीतेप्रति पाहून । आहे मम भ्राता कुमार लहान ।
गेली लक्ष्मणापाशी तिज शत्रुभगिनी जाणून। बोले लक्ष्मण मृदुवाणी पाहून प्रभूस ।।
ऐक हे सुंदरी दास मी रामाचा । पराधीन मी न तुज उचित साचा ।
प्रभू समर्थ राजा अयोध्येचा । जे काही करेल तो साजेल तया ।। ७
वांछी सुख सेवक मान भिकारी । इच्छि व्यसनी धन शुभगति व्यभिचारी ।
लोभी इच्छितो यश अभिमानी फळचारी । काढू पाहती दूध नभातून हे प्राणी।।८
फिरूनी पुन्हा आली ती रामापाशी । प्रभु लक्ष्मणाप्रती पाठविती तिजसी ।
वदे लक्ष्मण तोच वरील तुजसी । जो प्रतिज्ञा करून लज्जा सोडील ।। ९

तंव अति क्रुद्ध होऊन येई रामापाशी । करून प्रगट भयंकर रूपासी ।
रघुराज पाहती भयभीत सीतेसी । तंव खूण करून सांगती अनुजास ॥ १०
अति कौशल्ये मग लक्ष्मण । छेदी तिचे नाककान ।
तिज कुरूप करून जणू आव्हान । दिधले तयाने रावणास ॥ १७
नाककानविरहित ती दिसे विक्राळ । जणू लाल गेरूच्या धारा स्रवे शैल ।
वदे ती हे बंधो धिक् तुमचे पौरुषबळ । जाऊन खरदूषणाप्रती विलाप करी ॥१
पुसता तयांनी सांगे वृत्त सकल । ऐकताच केले सुसज्ज राक्षस दल ।
धावती निशाचरनिकर विपुल । जणु पंखासहित कज्जल गिरिवृंद ॥ २
नाना आकाराची वाहने घेऊन । नाना शस्त्रास्त्रधर घोर महान ।
अशुभ रूप नासिकाकर्णविहीन । शूर्पणखेसी ठेविती अग्रभागी ॥ ३
होती भयंकर अगणित अपशकुन । न मानिती तया असुर मृत्युआधीन ।
उडती गगनी ललकारून गर्जून । सेना देखून योद्धे महान हर्षित ॥ ४
कोणी म्हणती धरा बंधु जिवंत दोन । धरून मारा करा स्त्रीचे हरण ।
तंव नभोमंडळ दिसे धूळीपूर्ण । मग राम अनुजास बोलावून वदती ॥ ५
जा गिरिकंदरी जानकीस घेऊन । अपार निशाचर सेना येत चालून ।
प्रभूचे वचन ऐकून होई सावधान । निघाला सीतेसह शरधनुष्य हातात ॥ ६
राम शत्रूची सेना येता बघून । चढविती भयंकर कोदंड हसून ॥ ७

सावरून जटा । कोदंड कठिण । शोभती धरून । प्रभु कैसे ।
नीलमणि शैली । विद्युल्लता कोटी । सवे लढताती । सर्पद्वय ।
शोभे कटी तूण । चापबाण धृत । विशाल भुजात । सांभाळुनी ।
प्रभु मृगराज । जणु निरखीत । निशाचरवृंद । गजगण ॥ १

आले अति वेगे सुभट । धरा धरा पुकारून धावत ।
जणू असुर मंदेह बालरवीस घेरीत । एकला विलोकून तया ॥ १८
पाहून प्रभूस सुंदर न सोडिती शर । सकल स्तिमित निशाचर वीर ।
सचिवा बोलावून वदती दूषण खर । हा नृपबालक कुणी नररत्न ॥ १
नागसुरासुर मुनिनर जितुके । पाहिले जिंकिले वधिले आम्ही तितुके ।
तयात न देखिले ऐशा सौंदर्याते । जन्मभरात आम्ही ऐका बांधव हो ॥ २
जरी भगिनीस केली कुरूप । न वधा उचित हे पुरुष अनूप ।
द्या निज स्त्री जी लपविली क्षणात अल्प । जा निज भवनी जिवंत बंधुद्वय ॥३

तुम्ही ऐकवा आमुचा संदेश। यावे त्वरित घेऊन निरोपास।
दूत जाऊन देती समाचार रामास। वदती सस्मित राम ऐकून ।। ४
आम्ही क्षत्रिय करितो मृगया वनांत। तुम्हासम खगमृग फिरतो शोधीत।
न आम्ही भितो रिपूस बलवंत। झुंजु काळासवे एक वेळ ।। ५
जरी मानव आम्ही दैत्यकुलघातक। खलनाशक मुनिरक्षक बालक।
बळ नसेल तर घरी जा तुम्ही दुष्ट। न वधी कधी मी समरी विन्मुखास ।। ६
रणी चढून दाविता कपटचतुरता। शत्रूवरील कृपा ही परम कातरता।
दूत येऊन हे त्वरित कथिता। जळू लागे हृदय दूषणखर यांचे ।। ७

धरा हो वदले। उर दग्ध अती। राक्षस धावती। अति क्रूर।
घेती शरचाप। कृपाण तोमर। शूळ गदाधर। शस्त्रे हाती।
श्रीराम करिती। धनु टणत्कार। घोर भयंकर। प्रथमची।
भये निशाचर। व्याकुळ बधिर। नसे तिळभर। देहभान ।। १

धावती होऊन सावधान। जाणून शत्रु अतिबलवान।
करिती रामावरी वर्षण। नानाविध शस्त्रअस्त्रांचे ।। १९ क
निशाचरांच्या अयुधांचे करिती। तुकडे तुकडे तिळासम रघुपती।
मग आकर्ण चापासी ओढिती। सोडिती बाण दैत्यांवरी ।। १९ ख

तंव सुटती बाण कराल। फुत्कारती जणु बहु व्याल।
कोपती समरि श्रीराम। शर सुटती खडतर परम ।। १
देखून अगणित तीर। पळतात निशाचर वीर।
क्रुद्ध तदा भाऊ तीन। जो पळेल समरातून ।। २
वधु आम्ही तया निजहस्ते। मरणास सज्ज फिरले ते।
अयुधाचे बहुत प्रकार। सन्मुख ते करिती प्रहार ।। ३
रिपुकोप अति जाणून। प्रभु करिती शरसंधान।
सोडिती असंख्य नाराच। मरतात कराल पिशाच्च ।। ४
उर शीर्ष भुज कर चरण। धरणीवर पडती तुटुन।
चिक्कारत लागता बाण। पडती धड शैल समान ।। ५
होत वीर तनु शतखंड। उठत पुन्हा करून पाखंड।
नभि उडती बहु भुज मुंड। माथ्याविण धावती रुंड ।। ६
खग काक क्रौंच शृगाल। कटकट ध्वनि करीत कराल ।। ७

कोल्हे कुई कुई । पिशाच्च नी भूत । भरतात रक्त । खापरात ।
वेताळ कवटी । तालास धरिती । योगिनि करिती । नर्तनास ।
भटभुजउर– । शिरांचे खंडन । रघुवीर बाण । करितात ।
सर्वत्र पडती । उठती लढती । धरा वदताती । घोर शब्दे ।। १

आतडी धरून । गिधाड उडती । पिशाच्च पळती । करी हात ।
संग्राम निवासी । विपुल बालक । जणू उडवीत । पतंगासी ।
उर फाटुनिया । मरून पडत । विपुल सुभट । विव्हळती ।
पाहून दलास । धावती तात्काळ । वीर ते विक्राळ । त्रिशिरादी ।। २

परशु कृपाण । शूळ शक्ति शर । अनेक तोमर । एके वेळी ।
क्रोधाने चिडून । रघुवीरावर । बहु निशाचर । फेकतात ।
प्रभु निमिषांत । खंडी रिपुशर । टाकी बाण वर । पाचारुनी ।
दैत्य सेनानींच्या । उरी अति घोर । दश दश शर । फेकियेले ।। ३

धरणी पडती । उठती लढती । कपट करिती । नसे मृत्यू ।
अयोध्येश एक । सहस्र चवदा । पाहुनीया प्रेता । सुरा भय ।
सूरमुनिभीति । श्रीराम बघती । कौतुक करिती । मायानाथ ।
रिपु परस्परा । राम समजून । मारिती लढून । रणांगणी ।। ४

हे राम राम वदून सोडिती प्राण । पावती ते पद निर्वाण ।
क्षणभरात वधिती कृपानिधान । ऐसा उपाय करून सकल शत्रू ।। २०(क)
वर्षती सुमने सुर होऊन हर्षित । दुंदुभी निनादत गगनांत ।
प्रभूची स्तुति करून देव जात । सुंदर विविध विमानी बैसून ।। २०(ख)
जंव जिंकिती समरी अरीस रघुवीर । होती निर्भय सुरमुनिनर ।
सीतेसी घेऊन येई लक्ष्मण सत्वर । पडता तो प्रभुपदी हर्षे उरी धरिती ।। १
बघून प्रेमे मृदु श्याम मूर्ती । सीतेच्या लोचनासी न होई तृप्ती ।
सीतेसह रघुनाथ पंचवटी राहाती । करिती लीला सुखद सुरमुनींस ।। २
खरदूषण यांचा विध्वंस देखून । रावणास भडकवी शूर्पणखा जाऊन ।
अति क्रोधे ती वदे वचन । विसरलास तू देशकोशास ।। ३
निशिदिनी निद्रा मदिरासेवन । शिरावर शत्रु तुज नसे देहभान ।
राज्य नीतिविण धन धर्माविण । हरीस विना समर्पण उत्तम कर्म ।। ४

विद्येची प्राप्ति विवेकावाचून । श्रम हेचि फळ अंती विद्या शिकन ।
लज्जा मदिरापाने अभिमाने ज्ञान । कुमंत्रे नृपति यति कुसंगाने ।। ५
मदाने गुणवान नम्रतेविण प्रीती । नष्ट हे शीघ्र ऐकते अशी नीती । ६
रिपु रोग पावक पाप प्रभु अही । न गणावे तयांना लघु कधीही ।
ऐसे वदून ती लवलाही । विलाप करून रोदन करी ।। २१(क)
धाय मोकलून करी रोदन । सभेमाजी पडे व्याकुळ होऊन ।
म्हणे दशकंधरा तू जिवंत असून । का व्हावी दशा मम ऐसी ।। २१(ख)
उठले सभासद व्याकुळ हे ऐकून । समजाविती बाहु धरून उठवून ।
सांग सकल वृत्त म्हणे रावण । कापिले कोणी तव कानानाक ।। १
अयोध्यानृपति दशरथाचे सुत । पुरुषसिंह मृगयेस्तव वनी येत ।
करितील धरणी निशाचररहित । जाणते ऐसी तयांची करणी मी ।। २
हे दशानना जयांचे भुजबळे निश्चिंत । विचरती मुनि काननात ।
काळासमान जरी दिसती बालक । परम धीर धनुर्धर गुणवान ।। ३
भ्राते उभय बळप्रतापे अतुलित । सुरमुनीस सुखदाते खलवधी रत ।
शोभाधाम राम नामे एक । तरुण सुंदर स्त्री एक तयासंगे ।। ४
विधात्याने निर्मिले तिज रूपराशी । ओवाळावे तिजवरून कोटि रतीसी ।
तयाच्या अनुजाने कापिले नाककानासी । तव भगिनी जाणून करिती उपहास ।। ५
मम पुकार ऐकता खरदूषण येती । परि क्षणात ते असुरसेनेस वधिती ।
खरदूषणत्रिशिर यांचा वध करिती । दशाननाची गात्रे जळती ऐकून हे ।। ६
समजावी मग रावण शूर्पणखेस । बहुप्रकारे वानी निजबळास ।
अति चिंतातुर होऊन जाई भवनास । ते निशीं न निद्रा येई तया ।। २२
सुरअसुरनरनागखग यांत । न कोणी मम सेवकासम दिसत ।
खरदूषण मज समान बलवंत । भगवंतावाचून तयांस कोण वधी ।। १
महीभारभंजक सुररंजक । जर घेई अवतार तयास्तव भगवंत ।
तयाशी वैर धरीन जाऊन वळेच । सोडून प्राण प्रभुशरे तरीन भवसिंधू ।। २
न घडे भजन हे तामस शरीर । कायावाचामने आता हाच दृढ मंत्र ।
तो असेल जर नररूप भूपपुत्र । दोघा जिंकून रणी स्त्री हरण करीन ।। ३
निघे मग एकला चढून यानी । गेला सिंधुतटी मारीचनिवासस्थानी ।
इकडे कोणती युक्ति रचिली रामांनी । उमे ऐक ती शुभद कथा ।। ४

जंव जाई लक्ष्मण वनात । आणायास्तव फळमूळकंद ।
तंव वदती राम कृपासुखकंद । जनकसुतेसी स्मित करून ।। २३
पतिव्रता धर्मपालक सुशीले ऐक । प्रिये करीन काही नरलीला मी ललित ।
जोंवरी मी निशाचरनाश करीत । कर अग्नीत निवास तोंवरी तू ।। १
जंव राम सांगती समजावून । प्रवेशे अग्नि प्रभुपद हृदयी धरून ।
माघारी निज प्रतिबिंब राखून । तैसेच विनयशील रूप ।। २
जे काही चरित्र रचिले भगवानाने । तयाचे मर्म लक्ष्मण नच जाणे ।
केले प्रयाण मारीचाप्रती रावणाने । स्वार्थरत नीच माथा नमवी तया ।। ३
नम्रता दुष्टाची अति दुःखद । मार्जारधनुअंकुशसर्पापरी भासत ।
खलाची मधुर वाणी भयदायक । भवानी जैसे अकाली कुसुम विनाऋतु ।। ४
मारीच करी तयाची पूजा उचित । आदरे पुसे रावणासी वृत्त ।
कवण हेतु मन चिंतातुर हे तात । का आलात अकस्मात एकटे ।। २४
भाग्यहीन रावण करी कथन । सन्मुख साभिमान सकल वर्तमान ।
जेणे नृपनारी मी हरून आणीन । ऐसा हो तू मृग मायावी ।। १
मारीच म्हणे ऐक हे दशशीर्ष । तो नररूपे चराचराचा ईश ।
जगविता जीवन मारितां मरण नरास । तयासी न वैर करावे कदापी ।। ३
मुनियज्ञांच्या रक्षणा गेले कुमार । रघुपती मारिती मज विनाफळ शर ।
क्षणात पडलो शतयोजन दूर । वैर धरणे न भले तयासी ।। ३
जाहली कीटकभृंगासम मम गति । जेथे तेथे उभय भ्राते मज दिसती ।
हे तात ते मानव तरी शूर असती । तयां विरोध करिता कल्याण नसे ।। ४
जे ताटकासुबाहूस वधिती । शिवकोदंडाचे खंड उडविती ।
खरदूषणत्रिशिर यांसी मारिती । ऐसा प्रचंड बलवान मनुज कैसा ।। २५
कुळाचे कुशल जाणून जा तू भवनी । करी शिविगाळ रावण जळे ऐकोनी ।
हे मूर्खा करिसी मज बोध गुरु मानोनी । सांग मजसम कोण योद्धा जगी ।। १
तंव मारीच करी हृदयी अनुमान । व्यक्ति नव विरोधी असता नसे कल्याण ।
मर्मी स्वामी मूर्ख धनवान । कवि वैद्य बंदी बल्लव शस्त्रधारी हे ।। २
उभयपक्षी देखे निजमरण । तंव जाई मनी रघुनाथा शरण ।
नकार देता दुष्ट घेईल प्राण । का न मरावे शराने रघुपतीच्या ।। ३
जाई दशाननासंगे ऐसे चिंतून । तयाचे रामपदी प्रेम महान ।
आज घडेल परम प्रेमी रामाचे दर्शन । परि न दावी हर्ष मनीचा रावणासी ।। ४

निज प्रियतमा । नयने बघता । नेत्र सफळता । पावे सुख ।
सहअनुजश्री । कृपेचे निधान । तया पदी मन । लावीन मी ।
क्रोधहि जयाचा । दावी भक्ता मोक्ष । होती भक्तिवश । रामप्रभू ।
वधील सोडून । निज करे शर । आनंदसागर । भगवंत ।।

माझ्यामागे येतील धावून । प्रभु हाती शरासन बाण घेऊन ।
वारंवार प्रभूस पाहीन वळून । मजसम धन्य नसे अन्य ।। २६
जंव जाई वनासमीप दशानन । तंव मारीच होई मायावी हरिण ।
अति सुंदर न करवे वर्णन । तयाच्या रत्नजडित कनक देहाचे ।। १
सीता देखे मृग अति रुचिर । अंगअंग कांति सुमनोहर ।
वदे देवा हे कृपाळु रघुवीर । बघा मृगचर्म तयाचे मोहक अती ।। २
म्हणे वैदेही आणावे मृगचर्म । तया बघून हे सत्यप्रतिज्ञ राम ।
तंव रघुपति जाणती सकल वर्म । सुरकाजास्तव उठती हर्षाने ।। ३
मृग पाहता कटी बांधती परिकरास । करी रुचिर चाप घेऊन लाविती शरास ।
बा वत्सा समजाविती प्रभु लक्ष्मणास । वहु निशाचर फिरती वनी ।। ४
करावे आता सीतेचे रक्षण । बुद्धिबळ विवेक समय चिंतून ।
चालला मृग धावत प्रभूस पाहून । तंव राम धावती तयामागे ।। ५
वेद वदती नेति जे शिवा न ध्यानी पावत । ते मायामृगापाठी जाती धावत ।
जाई दूर मृग कधी येई निकट । कधी लपे कधी प्रगट होई ।। ६
प्रगटे क्षणी लपे कपट करी फार । यापरी प्रभूस नेई अति दूर ।
तंव सोडिती राम कठीण शर । पडे धरणीवर करी घोर आक्रोश ।। ७
प्रथम घेई लक्ष्मणाचे नाम । मग स्मरे मनी प्रभु राम ।
प्राण सोडून प्रगटे निज देह अधम । अति प्रेमे करून रामाचे स्मरण ।। ८
तयाचे हृदयातील ओळखून प्रेम । मुनिदुर्लभ गति तया देती राम ।। ९
वर्षती सुमने देवांचे गण । करून प्रभूचे गुणगान ।
ऐसे दीनबंधु रघुनंदन । असुरासहि अर्पिती मोक्षपद ।। २७
खळासी वधून निघती त्वरे रघुवीर । शोभे चाप करी कटी तुणीर ।
जंव सीता ऐके आर्त स्वर । अति भये वदे लक्ष्मणास ।। १
जा वेगे तुम्ही भ्राता संकटात । हसून वदे लक्ष्मण हे माते ऐक ।
जयाचे भृकुटिविलासे सृष्टिलय होत । तो न पडे स्वप्नीहि संकटामाजी ।। २

जंव सीता बोले मर्मभेदक वचन । तव हरिप्रेमे ढळले लक्ष्मणाचे मन ।
वनदिशादेवतांसी सीता सोपवून । निघाला रावणशशिराहु रामाप्रती ।। ३
इकडे रावण शून्य आश्रम पाहून । जाई निकट यतीचा वेष घेऊन ।
निशि ना निद्रा दिनी न भक्षती अन्न । जयाच्या भये सुरासुर भीतीने ।। ४
तो दशानन श्वानापरी जात । चोरापरी सकल दिशेस बघत ।
हे खगेशा ऐसे कुपंथी देताच पद । न राही तनूचे तेज बुद्धिबळ लेश ।। ५
नानापरी सुंदर कथा कथून । दावी राजनीति प्रीति भीति प्रलोभन ।
म्हणे सीता हे यति स्वामी करा श्रवण । बोलता वचन दुष्टापरी तुम्ही ।। ६
रावण दावी निजरूप जंव । घाबरली सीता ऐकताच नाव ।
मग वदे ती धरून धीर भाव । दुष्टा उभा राहा आलेच प्रभू ।। ७
वांछितो क्षुद्र ससा जैसा सिंहिणीस । निशाचरनाथा तैसा झाला तू काळवश ।
वचन ऐकून कोपला दशशीर्ष । परि मनी सीतापद वंदून सुख मानी ।। ८
मग रावण होऊन क्रोधवंत । सीतेसी बैसवी निज रथात ।
निघाला गगनपंथी वेगात । परि मनी भये न रथ हाकवे ।। २८
जगी अद्वितीय वीर तुम्ही रघुराया । कोणता अपराध म्हणून विसरला दया ।
हे दुःखकारक रघुकुलकमलसूर्या । सुखदायक तुम्ही शरणागता ।। १
लक्ष्मणा हा न तुमचा दोष । मजसी फळ देई मम रोष ।
वैदेही ऐसा करी विविध आक्रोश । बहु प्रभुकृपा परि प्रेमळ प्रभु दूर ।। २
मम विपत्ति कोण सांगेल प्रभूस । गर्दभ वांछी पुरोडाश यज्ञभागास ।
अति दुःख होई चराचर जीवास । ऐकून घोर विलाप सीतेचा ।। ३
गृध्रराज जटायु ऐकता आर्त वाणी । जाणली तयानें ही रघुकुळटिळक पत्नी ।
अधम निशाचर तिज जाई घेवोनी । जैसा नेई म्लेंछ कपिला गाईस ।। ४
हे सीते पुत्री न धरावे भयास । करितो मी या असुराचा नाश ।
कैसा धावे खग होऊन क्रोधवश । जैसे सुटते वज्र पर्वताप्रती ।। ५
रे रे दुष्टा का न थांबसी । जातो निर्भये न जाणत मजसी ।
मग वळून रावण करी अनुमानासी । कृतांतासम खग पाहून येताना ।। ६
हा मैनाक गिरी वा खगपती । तयाचा पती विष्णु जाणतो मम शक्ती ।
हा सोडील देह निज मम करतीर्थी । वदे ओळखून वृद्ध जटायूस ।। ७
ऐकता गृध्र क्रोधातुर येई धावत । म्हणे रावणा बोध करितो तो ऐक ।
सोड जानकीस जा गृही कुशल जिवंत । न तो घडेल बहुवाहो यापरी ।। ८

अति घोर रामाचा क्रोधाग्नी । शलभासम तव कुळ जाईल जळुनी ।
मग धावे जटायु क्रुद्ध होवोनी । जंव न देई योद्धा दशानन उत्तर ।। ९
धरी केस विरथ करिता मही पडत । सीतेस बैसवून जटायु माघारी वळत ।
चोच मारून देहास विदारीत । मग जाहला मूर्च्छित रावण क्षण एक ।। १०
अति क्रोधे चवताळून रावण । काढी अति तीक्ष्ण कृपाण ।
पंख कापता गृध्र पडे महीवर म्लान । स्मरून अद्‌भुत लीला रामाची।। ११
चढवी सीतेस पुन्हा यानात । निघे निशाचर उतावीळ अति भयभीत ।
नभी सीता जाई विलाप करीत । जणु व्याधास वश हरिणि कंपित भये ।। १२
गिरिवरी कपींस बैसलेले पाहून । टाकी वस्त्र सीता रामनाम घेऊन ।
यापरी सीतेसी घेऊन गेला रावण । ठेविली तिजसी अशोक वनी ।। १३
बहुपरी निज भय प्रीति दावून । हरला अखेर तो दुष्ट रावण ।
तंव रक्षणार्थ उपाय करून । अशोक तरुतळी ठेवी तिज ।। २९ (क)
जंव कपटमृगसंगे धावत । गेले श्रीराम अति त्वरित ।
तेच लावण्य सीता साठवून हृदयात । जपत राहिली रामनाम ।। २९ (ख)
रघुपति बघती येता अनुजास । वदती दावून बाह्य चिंता विशेष ।
एकली सोडली जनकसुतेस । तात आला मम वचन भंगून ।। १
निशाचर निकट हिंडती वनात । मम मन सांगे सीता न आश्रमात ।
पदकमलांस धरून जोडी लक्ष्मण हात । म्हणे नाथ मम न काही दोष ।। २
अनुजासह प्रभु जाती तेथे । गोदावरी तटी आश्रम होता जेथे ।
जानकीविहीन देखती आश्रमाते । होती व्याकुळ राम प्राकृत दीनासम ।। ३
हे जानकी सीता गुणखाण । रूपशीलव्रतनेम यात पावन ।
बहुपरी समजावी रामास लक्ष्मण । जाती ते पुशीत तरुलतापल्लवास ।। ४
हे खगमृग हे मधुकरनिकर । पाहिली का सीता मृगनयना सुकुमार ।
शुककपोतकोकिळा गायनी चतुर । खंजनमीनहरिणीमधुपवृंद हो ।। ५
कुंदकळी दाडिंब दामिनी । कमलशरदशशि सर्पभामिनी ।
वरुणपाश मदन चाप हंस परिसुनी । निज स्तुति हर्षित तैसे गजसिंह ।। ६
श्रीफळ कनककदली सकल हर्षित । तयांच्या मनी न भीति न संकोच ।
ऐक जानकी तुजवाचून जाहले मुदित । आज हे सकल जणु पावती राज्य ।।७
कैसी साहवे ही स्पर्धा तुजसी । प्रिये का न वेगे प्रकट होसी ।
शोधिता स्वामी यापरी करिती विलापासी । जणु महा विरही विषयभोगी।।८

पूर्णकाम राम सुखराशी। करिती मनुजासम चरित्र अविनाशी।
तोच देखती सन्मुख गरुडपतीसी। स्मरत ध्वजादि चिन्हांकित रामचरण ॥ ९
करसरोजे स्पर्शून जटायुशिरास। कृपासिंधु रघुवीर ईश।
निरखिता रामाच्या लावण्यधाम मुखास। होई निरसन सकल पीडांचे ॥ ३०
तंव गरुडजटायु वदे धीर धरून। ऐकावे हे राम भवभयभंजक पावन।
ऐसी करी मम दशा दशानन। जनकसुता हरली याच दुष्टाने ॥ १
हे स्वामी नेले तिज दक्षिण दिशेसी। ती विलाप करी टिटवी जैसी।
प्रभो आपल्या दर्शनास्तव ठेविले प्राणासी। ते जाऊ इच्छिती दयानिधे आता ॥ २
राम वदती रक्षावी तनु हे तात। खग बोले करून वंदन सस्मित।
मरणसमयी रामनाम जयाचे मुखात। ऐसा पापीही होई मुक्त वेद गाती ॥ ३
तें श्रीराम मम नयनासमोर। का आता हे नाथ ठेवावे शरीर।
वदती राम आणून नयनी अश्रुनीर। निजकर्मे पावशील श्रेष्ठ गति तात ॥ ४
जे मनी मानिती परहितास। दुर्लभ नच जगी काही तयांस।
हे तात तनु सोडून जा मम धामास। काय देऊ तुज तू पूर्णकाम ॥ ५
हे तात न कथावे सीतेचे हरण। पित्यास निजधामास जाऊन।
जर मी राम सत्य असेन। कुलासह जाऊन रावण तेथे सांगेल ॥ ३१
सोडून निज देहास गृध्र धरी हरिरूप। बहु भूषणासह पीतवस्त्र अनूप।
विशाल चार भुज श्यामलगात्र स्वरूप। प्रेमाश्रुपूर्ण नयने करी स्तुती ॥ १

सगुण निर्गुण। जय रामरूप। मायेचे स्वरूप। सत्य करी।
दशशीर्षबाहु। प्रचंड खंडन। महीस मंडन। धनुर्धारी।
गात्र मेघश्याम। सरोज आनन। राजीव लोचन। विशाल ते।
सदैव नमामी। श्रीराम कृपाळ। सुबाहु विशाल। दुःखहारी ॥ १

बळ अप्रमेय। अज निराकार। एक अगोचर। अनादि तू।
गोविंद गोपर। सारी द्वंद्व दूर। महीस आधार। ज्ञान मूर्ती।
श्रीरामाचे मंत्र। जपती जे संत। भक्ता त्या सुखद। अनंता तू।
सदैव नमामी। निष्काम रामासी। कामादि दुष्टासीं। नष्ट करी ॥ २

निरंजन ब्रह्म । विमल व्यापक । जन्मविरहित । श्रुति गाती ।
पावती जयास । करून साधन । वैराग्य विज्ञान । मुनिवर ।
करुणेचा कंद । शोभेचा सागर । जगा चराचर । मोहवीत ।
हृदयपंकजी । भृंग देखे कांती । बहु रम्य अती । कामासम ॥ ३

दुर्लभ सुलभ । सुभाव निर्मल । विषम शीतल । सम सदा ।
करूनिया यत्ने । मन गात्र वश । पावती योगीश । सदा जय ।
त्रिभुवन धनी । सदा दासा वश । रमेचे निवास । तोचि राम ।
वसो हृदयात । संसारशामक । सुकीर्ति पुनीत । असे ज्याची ॥ ४

अढळ अविरल भक्ति मागून । जटायु करी वैकुंठगमन ।
तयाची अंत्य क्रिया करिती रघुनंदन । स्वकरे यथोचित श्रीराम ॥ ३२
अतिं कोमलचित्त दीनदयाळ । कारणावाचून रघुवीर कृपाळ ।
योगी वांछी गति ती देती भक्तवत्सल । जटायूस मांसाहारी अधम खग ॥ १
ऐक उमे ते भाग्यहीन लोक । हरीस सोडून होती विषयी भोगासक्त ।
मग उभय भ्राते सीतेसी शोधीत । जाती बघत घनदाट वनी ॥ २
लता तरूने व्याप्त कानन घन । वसति बहु खगमृगगजपंचानन ।
कबंध असुर करी शापवृत्त कथन । पथी तया वधतांच श्रीराम ॥ ३
मज शाप देती ऋषि दुर्वास । प्रभुदर्शनाने आता जाहला पापनाश ।
प्रभु म्हणती न साहे मी ब्रह्मकुलद्वेष । हे गंधर्वा ऐक कथितो मी ॥ ४
कायावाचामने सोडून कपटास । जो नित्य सेवी भूसुरांस ।
मज समवेत तयासी वश । ब्रह्मशिवादि सकल देव ॥ ३३
शापिती ताडिती वदती कठोर वचन । ऐसे विप्र पूज्य वदती संतजन ।
पूजनीय विप्र शीलगुणहीन । गुणज्ञान प्रवीण शूद्र न पूजनीय ॥ १
कथिती निज भागवतधर्म तयास । निजपदप्रीति बघून सुख रामास ।
मग करून वंदन रामपदकमलास । निजगंधर्वरूप पावुन जाई स्वर्गी ॥ २
राम उदार गति देऊन तयास । शबरीच्या आश्रमात करिती प्रवेश ।
शबरी देखे गृही येता रामास । मातंग मुनि वचन स्मरून आनंदित ॥ ३
राजीवलोचन बाहु विशाल । जटामुकुट शिरी उरी वनमाळ ।
उभय भ्राते सुंदर गौरवश्यामल । पदी पडे शबरी मनोभावे ॥ ४
प्रेमात मग्न मुखी न येई वचन । पडे वारंवार पदकमली वंदून ।
आणून जळ आदरे प्रक्षाळी चरण । मग बैसवी आसनावरी सुंदर ॥ ५

कंदमूळफळ अति सुरम । शबरी अर्पण करी रामास ।
स्तुति करून वारंवार विशेष । प्रभु भक्षती अति प्रेमे ती ॥ ३४
सन्मुख उभी मग कर जोडून । प्रीति वाढे प्रभूस विलोकून ।
कैसे करू मी आपुले स्तवन । अधम जातीची मी मूढ मती ॥ १
नारी अति अधमाधम अधमाहून । तयांत मी पापी बुद्धिहीन ।
म्हणती राम हे भामिनी करी तू श्रवण । केवळ भक्ताचे नाते जाणतो मी ॥ २
जात पात धर्म ऐश्वर्य कुळ । चतुरता आप्तजन गुण धन बळ ।
ऐसा हा भक्तिविहीन नर कैसा शोभेल । जैसा जलरहित मेघ शोभाहीन ॥ ३
नव विद्या भक्ति कथितो तुजसी । ऐक सावधान चित्ते उरी धरून तिजसी ।
जाणावे संतसंग प्रथम भक्तीसी । मम कथाप्रसंगी प्रेमभक्ति दुजी ॥ ४
तिसरी भक्ति सांडावे अभिमानास । सेवावे गुरुपदकमलास ।
मम गुणगान करून सोडावे कपटास । लक्षण हे चतुर्थ भक्तीचे ॥ ३५
मंत्रजप करून मम ठायी विश्वास दृढ । ही पंचम भक्ति वेदविहित ।
सहावी शील दमन विरक्ति बहु कर्मात । रत सज्जनधर्मात निरंतर ॥ १
सातवी समभावे मत्स्वरूप जग पाहून । संतांसी मानावे अधिक मजहून ।
आठवी यथालाभ संतोषित मन । न पाहावे परदोषा स्वप्नीही ॥ २
नवम भक्ति सरलता नसावे कपट । मम ठायी विश्वास मनी न हर्ष ना खेद ।
या नवामधील एक जयाच्या हृदयात । असो स्त्री वा पुरुष या चराचरी ॥ ३
हे भामिनी ते अति प्रिय मजसी । ती सकल दृढ भक्ति तुजपाशी ।
जी दुर्लभ गति योगीवृंदासी । तीच आज तुज सुलभ असे ॥ ४
मम दर्शनाचे फळ परम अनूप । जीवा प्राप्त होई निज सहज स्वरूप ।
सांग जाणते का समाचार अल्प । गजगामिनी जनकतनयेचा ॥ ५
वदे ती रघुराजा जा पंपासरोवरासी । तेथे होईल मैत्री सुग्रीवाशी ।
देवा रघुवीरा तो कथेल आपणासी । मतिधीरा पुसता जाणत असून तुम्ही ॥ ६
वारंवार प्रभूच्या चरणास वंदून । अति प्रेमे करी सकल कथाकथन ॥ ७

बघे हरिमुखा । कथिले कथेसी । पदपंकजांसी । उरी धरी ।
सोडून देहास । प्रभुपदी लीन । माघारी तेथून । न ये कधी ।
अति शोकप्रद । नरा नाना कर्म । कुमत अधर्म । टाकावे तू ।
तुलसी म्हणत । विश्वास ठेवूनी । श्रीरामचरणी । करा प्रेम ॥ १

जी पापाची जन्मभूमि जातिहीन । ऐसी उद्धरली स्त्री भिल्लीण ।
ऐशा प्रभूस तू विसरून । रे महा मूर्ख मना सुख वांछिसी ।। ३६
चालले राम सोडून तेहि वन । अतुलित बल नरकेसरीसम बंधु दोन ।
विरही जनापरी प्रभु म्लान । कथिती कथा अनेक संवाद ।। १
पाहा ही वनाची शोभा हे लक्ष्मण । पाहून न होई क्षुब्ध कोणाचे मन ।
निज नारीसहित सकल खगमृगगण । वाटे मज करिती निंदा मम ।। २
पळती मृगगण पाहून मजला । मृगी सांगती न भय तुम्हाला ।
सामान्य मृग तुम्ही लुटा आनंदाला । हे आले कांचनमृग शोधार्थ ।। ३
हत्ती हत्तीणीस संगे घेती । वाटे ते मज बोध करिती ।
चिंतून वारंवार बघावी शास्त्रनीती । सेविताहि भूपास तो न मानावा वश ।। ४
राखिले हृदयी जरी नारीस । युवतीशास्त्रनृपति न होती कोणास वश ।
हे तात बघ सुंदर वसंत ऋतूस । मज भय दावी मी प्रियाहीन ।। ५
विरहे व्याकुळ बळहीन । एकला असहाय मज जाणून ।
खगमधुकरासह मदन । करी स्वारी विपिनी मजवरी ।। ३७ (क)
पाहून बंधुसहित मजसी । कामदूत सांगती मदनासी ।
तंव ते ऐकून थोपवी निज सेनेसी । जणुं तळ देई तेथे कामदेव ।। ३७ (ख)
विशाल वृक्षावरी लता पसरती । जणू मदने वितान ताणले दिसती ।
कदलीताड ध्वजपताका भासती । पाहून जया न मोह तो धीर नर ।। १
नानाविध तरु पुष्पयुक्त । जणू धनुर्धारी बाणासहित ।
ठायी ठायी वृक्ष सुंदर शोभत । जणू राहती वीर विलग विलग ।। २
भासे मत्तगजापरी कोकिळकूजन । सारसमहोरव उंटखेचरापरी जाण ।
मोर चकोर शुक हे वाजी समान । पारवा मराल सुंदर अश्वअरबी ।। ३
पायदळ हे पक्षी लावी तित्तर । न वर्णवे मदनसेनेचा विस्तार ।
गिरिशिला रथ दुंदुभी निर्झर । चातक भाट करिती गुणगान ।। ४
भेरी शहनाई मधुकराचे गुंजन । त्रिविधवायु भासे दूतासमान ।
चतुरंग सेना सवे घेऊन मदन । फिरे आव्हान देऊन सकलास ।। ५
हे लक्ष्मणा पाहून मदनाचे दल । जगी तोच महान जो धीर धरील ।
एका कामदेवाच्या स्त्रीचे अति भारी बळ । वाचेल तयांतून तो श्रेष्ठ वीर ।। ६
कामक्रोधलोभ हे तात । अति दुष्ट हे तीन बळवंत ।
ज्ञाननिधान मुनींच्या मनात । निर्मिती क्षोभ निमिषात ।। ३८ (क)

लोभास इच्छा दंभ यांचे बळ । कामदेवास स्त्रीचे बळ केवळ ।
क्रोधास कठोर वचनाचे बळ विपुल । ऐसे चिंतून वदती महामुनी ।। ३८ (ख)
चराचराचे स्वामी गुणातीत । उमे राम सर्वांतर व्यापक ।
दीनता कामी जनांची दावीत । करिती धीर पुरुष मनी दृढ विरक्ती ।। १
काम क्रोध लोभ मद माया । सुटती हे सकल जंव राम दाविती दया ।
धरिती जयावरी नटराज कृपाछाया । तो नर न भुले मोहजालास ।। २
उमे कथितो हा अनुभव मम । सत्य हरिभक्ति जगी स्वप्नासम ।
सुंदर गभीर पंपा नाम । त्या सरोवरतीरी मग जाती प्रभू ।। ३
संतहृदय जणू निर्मल वारी । सभोवरी घाट मनोहर चारी ।
विविधमृग जलपाना येती तीरी । जणू दानशूराच्या घरी याचकगण ।। ४
घनदाट कमलदलाने आच्छादित । जल खालील भासे जणू लुप्त ।
तैसे निर्गुणब्रह्मासी न जाणू शकत । झाकाळले ते मायेने ।। ३९ (क)
अति अगाध सरोवरजळात । वसती मीनासमान सुखे समस्त ।
जैसे पुरुष धर्म शीलवंत । घालविती सुखाने सकल दिन ।। ३९ (ख)
विकसिती कमलिनीचे विविध रंग । गुंजारव करिती मधुर स्वरे भृंग ।
बोलती जळकुक्कुट कलहंस विहंग । जणू स्तविती विलोकून प्रभूस ।। १
चक्रवाकबकखग यांचे निकर । वर्णावया कठिण परि बघावया सुंदर ।
खगगणांचा कलरव भासे मधुर । जणू बोलावती पथी पथिकासी ।। २
विराजती मुनिसदने सरानिकट । चारी बाजूस सुंदर वन दिसत ।
चंपक बकुल कदंब तमाल घनदाट । तैसेचि पळस पाटल फणस आम्र ।। ३
नव पल्लवित कुसुमित तरु रुचिर । करिती गान मधुकर तयांवर ।
सहज सुगंध मंद मनोहर । वाहे वायु संतत शीतल ।। ४
कुहु कुहु निनादे कोकिळ ध्वनी । सुटे मुनिध्यान रव रसाळ ऐकुनी ।। ५
फळभारे विटप विनम्र होती । लोंबून जणु भूमीसी भेटती ।
जैसे पावताच संपत्ती । होई विनम्र नर परोपकारी ।। ४०
राम अति सुंदर सरोवर पाहून । पावती सुखी स्नान करून ।
मग रुचिर तरुवराची छाया बघून । बैसती रघुनाथ अनुजासह ।। १
तेथे तंव सकल सुरमुनि जमती । स्तुति करून निजगृही जाती ।
कृपाळू प्रभु प्रसन्न मने बैसती । कथिती कथा सुरस अनुजास ।। २

पाहून विरहवंत भगवंतास। विशेष दुःख जाहले नारदाच्या मनास।
स्वीकारून मम शापास। साहती राम विविध दुःखभार ।। ३
घेतो ऐशा प्रभूचे दर्शन। पुन्हा न येईल समय हा जुळून।
घेती करी वीणा ऐसें चिंतून। जाती जेथे प्रभु बैसती सुखाने ।। ४
रामचरित्र ते कोमलवाणीने गाती। नानापरी प्रभूस प्रेमे स्तविती।
दंडवत घालता राम तया प्रेमे उठविती। धरिती हृदयी बहुकाळ ।। ५
समीप बैसविती कुशल पुसून। चरण प्रक्षाळी आदरे लक्ष्मण ।। ६
मुनि बहुपरी करिती रामाची स्तुती। प्रभु प्रसन्न मुनि जाणती।
तंव नारद वचन वदती। जोडून निज कमलहस्त ।। ४१
ऐका सहज उदार रघुनायक। अगम सुगम सुंदर वरदायक।
द्या स्वामी मागतो वर एक। आपण अंतर्ज्ञानी जरी ।। १
मुनि मम स्वभाव तुम्हास विदित। भक्तापासून न ठेंवी मी काही गुप्त।
कोणती मज प्रिय वस्तु अशी सर्वांत। जी न मागू शकता मुनिवर तुम्ही ।। २
नसे मजपाशी काही अदेय भक्तास। चुकूनही न सोडा ऐसा विश्वास।
धीर धरून मागतो ऐशा वरास। तंव बोलती नारद अति हर्षे ।। ३
जरी असती प्रभूची नामे अनेक। वेद सांगे सरस एकाहून एक।
सकल नामात रामनाम श्रेष्ठ अधिक। पापीखगगणासी व्याधासम ।। ४
पौर्णिमेची रजनी आपुली भक्ति। तेथे रामनाम पूर्ण निशापती।
तैसी अन्य नामे तारागण विमल अती।
निर्मल भक्तहृदयगगनी ती वास करो ।। ४२(क)
एवमस्तु म्हणती मुनिवरास। कृपासिंधु रघुनाथ ईश।
तंव अति हर्ष होई नारदमनास। नमविती माथा प्रभुचरणी ।। ४२(ख)
जाणून रघुनाथ अति प्रसन्न। नारद बोलती मृदुवचन।
मोहित केले मज ऐका हे रघुनंदन। निजमाया प्रेरणेने ।। १
तंव मी करू इच्छित होतो लग्न। प्रभु कवण कारणे न दिले करून।
ऐका हे मुनीश सांगतो हर्षित होऊन। जे आशा सोडून भजती मज ।। २
करितो सदा तयांचे ऐसे रक्षण। जैसी माता रक्षी बालकास निरंतन।
शिशु सर्पअग्नीपाशी जाता धावून। माता तया निवारी करून विलग ।। ३
माता करी प्रीति जंव होई प्रौढ सुजाण। परि नसे प्रेम ते पूर्वसमान।
मानितो ज्ञानी मम प्रौढ नंदन। निरभिमानी दास बालकासम ।। ४

भक्तास मम बळ निज बळ ज्ञानियासी । असती कामक्रोध हे रिपु उभयांसी ।
ऐसे चिंतून पंडित भजती मजसी । ज्ञानप्राप्त होताही न सोडिती भक्ती ॥ ५
काम क्रोध मोह लोभ यांचे दल । मदमायादि तैसे अति प्रबळ ।
तयांत मायारूपी स्त्री केवळ । दुःखदायक अति दारुण ॥ ४३
ऐका मुनि सांगती पुराणश्रुतिसंत । मोहकाननी नारी जणु ऋतु वसंत ।
जलाशय जणु जपतप नेमव्रत । शुष्क करी ती होऊन ऋतु ग्रीष्म ॥ १
कामक्रोधमदादि भेक । स्त्री वर्षाऋतु तयांस ती सुखदायक ।
दुष्ट वासनारूपी कमलवृंद । तया स्त्री शरदासम सुखद सदा ॥ २
सकल धर्मरूप कमलवृंद । नीच सुखद स्त्री हेमंत तया करी दग्ध ।
ममतायवास करी पल्लवित । शिशिर ऋतु होऊन ही युवती ॥ ३
अघघुबडसमूहास सुखकारी । ही नारी निबिड रजनीसम अंधारी ।
पंडित वदती गळासम ही स्त्री । बुद्धिबळशील सत्यरूपी मीनास ॥
युवती शूळप्रद अवगुणांचे मूळ । खाण ती दुःखाची सकल ।
म्हणून तव विवाहा मी नव्हतो अनुकूल । यापरी जाणून मनी ॥ ४४
रघुपतीचे सुंदर वचन ऐकून । मुनीची तनु पुलकित प्रेमाश्रुपूर्ण नयन ।
सांगा ही रीति दावी ऐसा प्रभु कोण । जयाची प्रीति ममता दासावरी ॥ १
जे न भजती ऐसा प्रभु भ्रम सोडून । तो नर मंद अभागी ज्ञानहीन ।
मग आदरे वदती नारद वचन । हे विज्ञानविशारद रामा ऐका ॥ २
स्वामी सांगावे मज संतांचे लक्षण । हे भवभयभंजक रघुनंदन ।
ऐका हे मुनि कथितो संतांचें गुण । जेणे मी होई तयासी वश ॥ ३
जिंकिती षड्रिपु निष्पाप कामनारहित । निर्धन अचल सुखधाम शुचिष्मंत ।
मितभोगी निष्काम ज्ञानवंत । सत्यनिष्ठ योगी विद्वान कवी ॥ ४
सावधान मानद मदहीन । धीर धर्म भक्ति यांत प्रवीण ॥ ५
ते संसारदुःखरहित । गुणांचे आगर संदेह विगत ।
मम चरणकमलास सोडून हे तात । नसे तया प्रिय देह वा गेह ॥ ४५
निजगुण ऐकता संकोचती । परगुण परिसता हर्षित अती ।
समशीतल न सोडिती नीती । प्रीति सर्वांवरी सरळ स्वभावाने ॥ १
पाळिती जपतप श्रद्धा नियम । गुरू गोविंद विप्र यांच्या पदी प्रेम ।
गुण हे श्रद्धा दया क्षमा मैत्री संयम । प्रसन्नता मम पदी कपटहीन प्रीती ॥ २

विरक्तिविवेकविनयविज्ञान । वेदपुराणांचे यथार्थ ज्ञान ।
नसे तया दंभ मद मान । चुकूनही न पडे कुमार्गी पाऊल ।। ३
मम लीला सदा गाती ऐकती । हेतुरहित तत्पर परहिती ।
न वानू शकती शारदाश्रुती । मुनि सकल गुण संतांचे हे ।। ४

वानू न शकती । शेष सरस्वती । चरणा धरिती । ऋषिवर ।
ऐसे दीनबंधु । कृपाळु वानिती । निजमुखे अती । भक्तगुण ।
शिर नमवून । वारंवार पदी । नारद निघती । ब्रह्मपुरी ।
हरिरंगी रत । सोडून आशेसी । म्हणत तुलसी । तेचि धन्य ।। १

रावणारि रामाचे यश पावन । जे नर गाती वा करिती श्रवण ।
ते वैराग्यजपयोगाविण । पावती अढळ रामभक्ती ।। ४६ (क)
युवतीची तनु दीपज्योति सदृश । बा मना पतंगासम होऊ नकोस ।
सोडून मदअभिमानास । करावा सदा सत्संग रामभक्ती ।। ४६ (ख)

।। कलियुगातील संपूर्ण पापांचा नाश करणारा
श्रीरामचरितमानसाचा तिसरा सोपान समाप्त ।।

(अरण्यकांड समाप्त)

चतुर्थ सोपान–किष्किंधाकांड

कुंद नीलांबुज । समान सुंदर । ज्ञानाचे सागर । बलवान ।
धेनुविप्रप्रेमी । श्रेष्ठ धनुर्धर । सुषमा रुचिर । श्रुति गाती ।
मायानररूप । रघुवर दोन । धर्मपरायण । हितकारी ।
सीताशोधसिद्ध । उभय पथिक । होवो भक्तिप्रद । सकलांस ।। १
वेदाब्धि निर्मित । सदा अविनाशी । कलीच्या पापासी । विध्वंसती ।
शंकरवदनी । कांति शशिसम । शोभत परम । तेथे सदा ।
रामनामरूप । जानकीजीवन । सुखाचे निधान । भवौषध ।
नाम अमृताचे । निरंतर पान । करिती जे जन । धन्य सदा ।। २

मुक्तीची जन्मभूमि जाणून । पापहारी ज्ञानखाण ।
जेथे शंभुभवानीचे निवासस्थान । का न सेवावे त्या काशीस ।।
जेणे होत सकल सुरगण दग्ध । ते गरळ भीषण शिव प्राशन करीत ।
त्या शंकरास मूढमना का न भजत । कोण असे कृपाळु तयासम ।।
तेथून पुढे जाती रघुनाथ । येती ऋष्यमूक पर्वतानिकट ।
सुग्रीव वसे तेथे सचिवासहित । बघे अतुलबलसीमा बंधु येताना ।। १
सभीत बोले सुग्रीव ऐक हे हनुमान । हे पुरुषयुगल बळरूपनिधान ।
जा भेट तया बटूचे रूप घेऊन । हेतु जाणून मज संकेते सांग ।। २
वाली जर दुष्ट मने तया पाठवीत । पळेन मी त्वरित सोडून पर्वत ।
मग विप्ररूप घेऊन कपि तेथे जात । नमवुनी मस्तक तयासी पुसे ।। ३
कोण तुम्ही श्यामल गौर शरीर । फिरता क्षत्रिय रूपाने वीर ।
कोमल पदे चालता कठिण भूमीवर । कवण हेतु वनसंचार हे स्वामी ।। ४
सुंदर गात्रे मृदुल मनोहर । साहता उष्णशीतवात वनी दुर्धर ।
तीन देवांतील तुम्ही कोणते सुर । वा नरनारायण तुम्ही दोघे ।। ५

तुम्ही विश्वाचे कारण भवतारक । की आहात अखिल भुवनाचे नायक ।
जयांनी धरणीभार कराया नष्ट । केला धारण मनुज-अवतार ।। १
कोशलेश दशरथसुत आम्ही दोन । आलो वनी पितृवचन मानून ।
उभय बंधु नामे रामलक्ष्मण । संगे नारी सुंदर सुकुमार ।। १
वनी वैदेहीसी हरती निशाचर । तिच्या शोधार्थ फिरतो वनी हे विप्र ।
कथिले आम्ही आमुचे चरित्र । विप्रा निजकथा सांग आता ।। २
प्रभूस ओळखून मारुती धरी चरण । उमे न करवे त्या सुखाचे वर्णन ।
पुलकित तनु न निघे मुखी वचन । पाहून प्रभूची रचना रुचिर वेषाची ।। ३
मग धीर करून करी स्तुतीस । जाणिले निज नाथ म्हणून हर्ष ।
स्वामी पुसले मी ते धरून न्यायास । परि पुसता नरासम कैसे तुम्ही ।। ४
भटकतो भ्रमिष्ट तव माये वश । यास्तव न जाणिले मी प्रभूस ।। ५
मी तर मूढमति मोहाधीन । मम हृदय कुटिल मी ज्ञानहीन ।
हे दीनबंधो भगवान । आणिली घडवून विस्मृति प्रभूंनी ।। २
जरी नाथा मम ठायी दोष । स्वामीची विस्मृति न घडावी सेवकास ।
नाथा जीव मोहित आपुल्या मायेस । आपुल्याचि कृपेने तो भव तरील ।। १
तदपि रघुवीर मी घेतो शपथ । भजनसाधन मी काही न जाणत ।
सेवकसुत स्वामीमातेवरी निश्चिंत । भक्तास पोषणे प्रभूचे कर्तव्य ।। २
ऐसे वदून व्याकुळ पडे चरणावरी । प्रीति व्यापी उर निज तनु प्रकट करी ।
तंव उठवून रघुपति धरिती उरी । निज नेत्रजळ सिंचवून शांतविती ।। ३
कपि ऐक न धरावे क्षुद्रपण मनात । तू प्रिय लक्ष्मणाहून मज अधिक ।
मी समदर्शी ऐसे सकल वदत । परि भक्त प्रिय मजसी तो अनन्यगती ।। ४
तो जाणावा अनन्य भक्त । जयाची ऐसी मति न ढळे हनुमंत ।
की अखिल चराचररूप भगवंत । तो स्वामी तयाचा सेवक मी ।। ३
पाहून अनुकूल स्वामीस । मिटले दुःख जाहला हर्ष हनुमंतास ।
म्हणे तो सुग्रीव कपिपति आपुला दास । नाथ राहतो या शैलावरी ।। १
हे स्वामी करावी मैत्री सुग्रीवासी । दीन जाणून अभय द्यावे तयासी ।
तो करील सहाय्य सीताशोधासी । पाठवून कोटि मर्कट सर्वत्र ।। २
ऐसी कथून सकल वृत्तांत । बैसवी पाठीवरी उभयांस हनुमंत ।
जंव रामासी सुग्रीव देखत । मानी निज जन्म अति धन्य ।। ३

आदरे भेटे नमवून पदी माथा । अनुज लक्ष्मणासह रघुनाथा ।
सुग्रीव करी ऐसी मनी चिंता । हे करितील प्रीति का मजवरी विधात्या ।। ४
तंव उभय बाजूचा वृत्तांत । समजावून सांगे पवनसुत ।
मग ठेवून साक्षी पावक । जोडिली परस्पर दृढ प्रीती ।। ४
प्रीति जमली न अंतर उरले । लक्ष्मणाने मग रामचरित्र कथिले ।
साश्रु नयने सुग्रीव बोले । नाथा मिळेल मिथिलेशकुमारी माघारी ।। १
बैसलो असता एकदा मंत्रिसमवेत । मी मनी विचार होतो करीत ।
तंव देखिली मी गगन पथी जात । शत्रुवशें सीता करीत विलाप ।। २
राम राम हाय राम करी आक्रोश । टाकी वस्त्र पाहून आम्हांस ।
राम मागता देई त्वरित तयास । वस्त्र हृदयी धरून करिती शोक प्रभू ।। ३
सुग्रीव वदे ऐका हे रघुवीर । शोक सोडून धरा मनी धीर ।
सर्वपरी मी सेवा करीन साचार । जेणे जानकी मिळेल आपणास ।। ४
हर्षे ऐकून सखयाचे वचन । बळाची सीमा स्वामी कृपानिधान ।
वदती सुग्रीवास कवण कारण । वनी निवास करिसी या ।। ५
हे नाथा मी वाली बंधु दोन । परस्पर अति प्रीति न करवे वर्णन ।
एकदा मायावी नामे मयनंदन । प्रभो आला आमुच्या गावात ।। १
पुकारी पुरद्वारात मध्यरात्रीस । वाली न साहूं शके शत्रूच्या बळास ।
पळे मायावी पाहून धावता वालीस । मीहि मग गेलो बंधु संगे ।। २
घुसला मायावी गिरिवर गुहेत । तंव वाली मज समजावून सांगत ।
पंधरा दिवस पाहा माझी वाट । तोवरी न आलो जर जाणा मेलो मी ।। ३
राहिलो तेथे एक मास हे खरारी । प्रचंड रुधिरधारा तंव आल्या बाहेरी ।
वालीस मारिले मज आता मारील अरी । जाणून पळालो ठेवून द्वारी शिळा ।। ४
मंत्री पाहती स्वामीविण नगरीसी । बळेच राज्यी बैसविती मजसी ।
मायावीस वधून आला वाली गृहासी । मज पाहून राज्यपदी वैर धरी ।। ५
रिपुसमान मारिले मज अति भारी । हिरावून घेतले सर्वस्व नारी ।
तयाचे भये हे कृपाळू खरारी । हिंडतो व्याकुळ सकल भुवनी ।। ६
शापभयास्तव तो एथे न येत । परि मी राहे मनी भयभीत ।
दीनदयाळू प्रभूचे भुज विशाल स्फुरत । ऐकून दुःख दासाचे ।। ७
ऐक सुग्रीवा मी निश्चित मारीन । वालीस एकाच बाणे करून ।
जरी जाईल ब्रह्माशिवासी तो शरण । प्राण न वाचतील तयाचे ।। ८

मित्र दुःखाने दुःख न होत जयास । महापातक लाभे अवलोकिता तयास ।
गिरिसम निजदुःख जाणावे धूळीसरिस । रजासम मित्रदुःख गिरिसम मानावे ।। १
जयास न ऐसी सहज बुद्धि प्राप्त । तो मूर्ख हट्टे न कधी मैत्री साधत ।
गुणा प्रकटवून अवगुणा लपवीत । निवारून कुमार्ग सुमार्गा लावी मित्रधर्म ।। २
देता घेता मनी न शंका धरिती । यथाशक्ति सदा हित करिती ।
विपत्काळी शतपट प्रेम दाविती । संतमित्राचे हे लक्षण सांगती वेद ।। ३
मुखासन्मुख वदती मधुर वचन । मनी दुष्टता मागे अनहितचिंतन ।
बंधो जयाचे चित्त सर्पगतिसमान । हितप्रद त्याग ऐशा मित्रांचा ।। ४
मूर्ख सेवक कृपण नृप कुनारी । कपटी मित्र हे दुःखद शूळासम चारी ।
मित्रा आता सोड शोक मम बळावरी । सर्वपरी मी तव सहाय्यक होईन ।। ५
ऐका रघुवीर सुग्रीव वदत । वाली रणधीर महा बलवंत ।
मग दुदुंभीच्या आस्थि तालतरू दावीत । रघुनाथ पाडिती तया विनासायास ।। ६
अमित बळ पाहून वाढे सुग्रीवाची प्रीती । आता वालिवध निश्चित येत प्रचीती ।
वारंवार तो शिर नमवी पदी । जाणून प्रभूस हर्षित कपीश ।। ७
जंव उपजे ज्ञान तंव बोले वचन । नाथा तव कृपे जाहले स्थिर मन ।
सुख संपत्ती परिवार महती सोडून । करीन सेवा प्रभूची मी ।। ८
हे वैभव रामभक्तीसी बाधक । वदती संत तव आराधक ।
शत्रुमित्र सुखदुःख जगी मायाकृत । नसे तयात काही सार ।। ९
वालि परम हितकारी जयाचा प्रसाद । भेटवी आपणास रामा दुःखशामक ।
तयासी स्वप्नीहि करिता युद्ध । जाग येताच संकोचेल मन ।। १०
आता प्रभुकृपा करावी ऐसी । सकल सोडून मी भजावे दिननिशी ।
ऐकून विरक्तिपूर्ण सुग्रीवाचे वाणीसी । धनुर्धारी राम वदती हसून ।। ११
जे तू वदला सकल सत्य ते । न मानावे सखया मृषा मम वचनाते ।
नटमर्कट इव नाचविती सकलाते । श्रीराम हे खगेशा ऐसे वेद गाती ।। १२
रघुनाथ सुग्रीवास संगे घेऊन । निघाले हाती धरून चापबाण ।
मग रघुपति सुग्रीवा देती पाठवून । रामाचे बळ पावून जाई वालीप्रती ।। १३
ऐकून वालि धावे क्रोधातुर । पत्नी समजावी धरून चरणकर ।
सुग्रीवासी सहाय्य ऐका प्राणेश्वर । तेजबळसीमा उभय बंधू ।। १४
कोशलेशसुत लक्ष्मणराम । जिंकितील काळासीही करिता संग्राम ।। १५

म्हणे वालि हे भित्रे प्रिये ऐक । असती समदर्शी रघुनाथ ।
मजसी मारतील ते कदाचित । सनाथ होऊन मी परम पद पावेन ।। ७
बोलून ऐसे निघे महा अभिमानी । सुग्रीवासी तृणसमान मानी ।
भिडले दोघे वालि अति क्रुद्ध होऊनी । गर्जून महाध्वनि मुष्टिप्रहार करी ।। १
वज्रासम लागे मुष्टिप्रहार । सुग्रीव व्याकुळ होऊन पळे अनिवार ।
म्हणे कथिले तुम्हा हे कृपाळु रघुवीर । वालि नसे मम बंधु तो काळ ।। २
एकरूप उभय भ्राते तुम्ही । भ्रम होई मज म्हणून न मारिले मी ।
सुग्रीवतनूस करे स्पर्शती स्वामी । तंव झाले शरीर वज्रासम नष्ट पीडा ।। ३
घालिती सुग्रीवकंठी मग सुमनमाळ । धाडिती देऊन विशाल बळ ।
तरु आडून बघती राम घननीळ । उभयांतील नानाविध युद्ध ।। ४
बळ दावून सुग्रीव करी कपट । परि हृदय खचले भीति मनात ।
मग शर मारिती वालीच्या हृदयात । ताणून चापास श्रीराम ।। ८
पडे महीवर व्याकुळ लागताच शर । बैसे उठून देखे प्रभूस समोर ।
शिरी जटाजूट श्यामल शरीर । अरुण नयन सुसज्ज शरचाप ।। १
वारंवार लावून चित्त प्रभुचरणी । सुफळ जन्म मानी प्रभूस विलोकुनी ।
हृदयी प्रीती परि कठोर वचनी । रामाप्रती बघून मग बोले ।। २
धर्महेतुस्तव अवतरला स्वामी । व्याधासम लपून मारिले मज तुम्ही ।
तुम्हा नाथा प्रिय सुग्रीव वैरी मी । कवण अवगुणास्तव वधिले मज ।। ३
अनुजवधु भगिनी सुतनारी । कन्या ऐक मूर्खा या समान चारी ।
जो टाकी कुदृष्टि याजवरी । तया वधता न काही पाप वदती राम ।। ४
हे मूर्खा तुज अतिशय अभिमान । न घेसी कानी पत्नीची शिकवण ।
सुग्रीव मम भुजबळाचा आश्रित जाणून । मारू इच्छिसी तया अधमा अभिमानी ।।५
वदे वालि ऐका हे श्रीराम । स्वामीसवे न चाले चतुरता मम ।
प्रभो अजूनहि मी पापी परम । जरी पावलो गति आपुली अंतकाळी ।। ९
राम परिसून कोमल वचनास । निज करे स्पर्शिती वालिशिरास ।
प्राण राखून करितो अमर तनूस । तंव ऐका कृपानिधी वदे वाली ।। १
करिती मुनि यत्न जन्मोजन्म । परि अंती न ये मुखी राम ।
देती सकला अविनाशी समाधान । शंकर जयाच्या नामबळे काशीत ।। २
आला तेच तुम्ही मम लोचनासमोर । प्रभो ऐसा योग का पुन्हा कधी येणार ।।३

नयना गोचर । वेद गुण गाती । ज्याचे नेति नेती । निरंतर ।
इंद्रियनिग्रह । जिंकी मम प्राण । ध्याती मुनिजन । पावे कधी ।
प्रभु सांगतात । राख तू देहासी । पाहून मजसी । अभिमानी ।
कोण ऐसा मूर्ख । तोडी कल्पवृक्ष । बाभळी तरूस । लावील जो ।। १
आता स्वामीनाथा । कृपाळु होऊन । द्यावा तो मागीन मज वर ।
मम कर्मवशे । जन्म मी घेईन । रामपदी लीन । असावे मी ।
नम्र बलवान । मम सम सुत । प्रभो हितप्रद । स्वीकारावा ।
सुरनरनाथा । नामे तो अंगद । धरा त्याचा हात । दास करा ।। २

दावून रामचरणी दृढ प्रीतीस । करी वालि तनुत्यागास ।
जैसा गज न जाणे सुमनमालेस । निज कंठातून गळताना ।। १०
राम वालीस निजधामी धाडिती । सकल लोक व्यथित मने धावती ।
पत्नी तारा करी शोक अती । विखुरलेले केस न देहशुद्धी ।। १
देखती तारेस व्याकुळ रघुराया । देऊन ज्ञान तिज हरती माया ।
पंचभूतरचित अति अधम काया । पृथ्वी तेज जल वायु गगन यांची ।। २
ती तनु प्रत्यक्ष तव सन्मुख निद्रिस्त । जीव नित्य मग कोणास्तव शोक ।
उपजता ज्ञान पडे चरणी त्वरित । वर मागे परम भक्तीचा ।। ३
हे उमे काष्ठपुतळीसम । नाचविती सकला श्रीराम ।
मग विधियुक्त मृतकर्म । करी सुग्रीव रामआज्ञा होताच ।। ४
कथिती राम समजावून अनुजास । करावा राज्याभिषेक सुग्रीवास ।
रघुपतिपदी नमवून मस्तकास । निघाले सकल प्रभूआज्ञा घेऊन ।। ५
तंव लक्ष्मण बोलावी त्वरित । सकल नगरजन विप्रवृंद ।
दिधले सुग्रीवास राज्यपद । युवराजपद अंगदासी ।। ११
उमे रामासम जगी न अन्य हितकर्ता । स्वामी गुरुबंधू पितामाता ।
जगी प्रेम केवळ स्वार्थाकरिता । हीच रीति सुरनरमुनि या सकलांची ।। १
वालिभये व्याकुळ दिनंनिशी । तनूवरी घाव चिंता जाळी छातीसी ।
करिती कपीचा पति त्याच सुग्रीवासी । अति कृपाळू स्वभाव रघुवीरांचा ।। २
जाणून ऐशा प्रभूस जे सोडिती नर । ते विपत्तीजाळ्यात का न पडणार ।
मग सुग्रीवास बोलाविती रघुवीर । करिती राजनीतीचा बोध बहू ।। ३

प्रभु वदती ऐक सुग्रीवा कपीश । मी न जाई चौदा वरुषे नगरीस ।
करीन शैलानिकटी निवास । आला वर्षाऋतू संपला ग्रीष्म ॥ ४
करावे राज्य अंगदासहित । धरावे मम कार्या हृदयी सतत ।
जंव सुग्रीव जाई माघारी भवनात । वसती प्रवर्षणगिरीत श्रीराम ॥ ५
प्रथमचि ठेविती शृंगारून सुर । गिरिगुहेस परम रुचिर ।
जाणून करितील येथे वास रघुवीर । कृपानिधी काही दिन ॥ १२
शोभिवंत अति कुसुमित सुंदर वन । मधुलोभास्तव गुंजती मधुकरगण ।
कंदमूळफळपर्ण सुशोभन । प्रभूआगमनी येती विपुल ॥ १
पाहून शैल मनोहर अनुप । वसती तेथे अनुजासह सुरभूप ।
देवसिद्धमुनि घेऊन खगमृगरूप । करिती सेवा प्रभु रामाची ॥ २
मंगलरूप होई ते सकल वन । जंव रमापति करिती ते निवासस्थान ।
स्फटिक शिलामणीचे शुभ्र सुआसन । तयावरी विराजमान बंधु दोघे ॥ ३
कथिती अनुजासी कथा अनेक । भक्तिनीतिविरक्तिविवेकयुक्त ।
वर्षाकाळी नभ मेघांनी व्याप्त । गर्जना मनोहर तयांची ॥ ४
लक्ष्मण बघ हा मोरगण । नाचतो जलदासी देखून ।
जैसा हर्षित वैराग्ययुक्त जन । निजगृही विष्णुभक्त बघताच ॥ १३
घन गडगडाट नभी गर्जे घोर । प्रियाहीन माझे मनी भय फार ।
दामिनी चमके न राही मेघात स्थिर । जैसी चंचळ अस्थिर दुष्टाची प्रीती ॥ १
जलद वर्षती भूमिप्रतो लोंबून । जणू पंडित विनम्र विद्या पावून ।
संत जैसे साहती खलांचे वचन । तैसे गिरी साहती बिंदु-आघात ॥ २
क्षुद्र नदी दुथडी फोफावत । जैसा अल्प धने खल उन्मत्त ।
शुद्ध जीव जैसे मायावेष्टित । तैसे होई गढूळ जळ येता भूमीवरी ॥ ३
जलाशय भरती जल सांचून । तैसे सज्जनाप्रती जाती सद्‌गुण ।
सरिताजळ होते स्थिर सिंधूस मिळून । जणु हरिपद पावता जीव अचल ॥ ४
सकल भूमि हरित तृण-आच्छादित । न उमजती पथ तयात ।
जैसे सद्‌ग्रंथ होती लुप्त । नास्तिकाच्या मतप्रचाराने ॥ १४
दर्दुरध्वनि सुखद चहु दिशेस । जणु बटुसमुदाय करी वेदघोष ।
नव पल्लव अंकुरती वृक्षास । जणु साधकाचे मनास ज्ञानप्राप्त ॥ १
पर्णहीन होती अर्क जवास । जैसे सुराज्यी खलाचे वैभव नामशेष ।
जैसे न होई धर्मज्ञान होता क्रोधवश । तैसे शोधताहि न मिळे धूळ कोठे ॥ २

धान्याने संपन्न शोभे मही कैसी । दानशूराची संपत्ति जैसी ।
चमकती काजवे घनतम निशी । जणु मेळावा भरला दांभिकांचा ।। ३
महावृष्टि होऊन बांध फुटती । जैशा स्वातंत्र्ये नारी विघडती ।
चतुर शेतकरी शेते खुरपती । जैसे बुध टाकितीं मोहमदमानास ।। ४
चक्रवाक खग शोधून न मिळती । जैसे कलि येता धर्म पळती ।
जैसे भक्तहृदयी कामभोग न उपजती । उखरी जल वर्षता न तृण उगवे ।। ५
शोभे मही विविध जीवजंतुव्याप्त । दिसे प्रजावृद्धि जैसी सुराज्यात ।
जेथे तेथे थबकती पथिक अनेक । जैसे ज्ञान उपजता इंद्रिये शिथिल ।। ६
कधी वाहता प्रबळ मरुत । विखुरती सर्वत्र जलद ।
जैसे कुळात उपजता दुर्गुणी सुत । होई कुळ सद्धर्म यांचा विनाश ।। १५ (क)
कधी पसरे दिवसा अंधार घन । कधी प्रगटे भानुप्रसन्न ।
जैसे कुसंगाने जाई विलयास ज्ञान । उपजे ते सुसंग पावताच ।। १५ (ख)
संपला वर्षा आला सुंदर शरद । पाहा लक्ष्मणा हा परम शोभिवंत ।
सकल मही कासपुष्पे आच्छादित । जणु वर्षा प्रकटे आपुले वृद्धपण ।। १
उदित अगस्ति तारा शोषे पथजलास । जैसा लोभ शोषतो संतोषास ।
येई शोभा निर्मल सरितासरनीरास । जैसी मोहमदरहित संत हृदया ।। २
हळूहळू सुकले सरितातळ्यांतील पाणी । जैसा ममतेचा त्याग करी ज्ञानी ।
येती खंजन खग शरदऋतु जाणुनी । जैसे समय येता होई प्रकट पुण्य ।। ३
नसे पंक न रेणु ऐसी सुंदर धरणी । जैसी नीतिनिपुण नृपाची करणी ।
व्यथित मीन आटता पाणी । जैसा धनाविण व्याकुळ कुटुंबी मूर्ख ।। ४
शोभे निर्मळ गगन मेघहीन । जैसा हरिभक्त सकल आशा सोडून ।
शारदी अल्प वृष्टि कोठे कोठे मधून । जैसा कोणी विरळा पावे मम भक्ती ।। ५
वाणी भिकारी तापस नृपती । हे सोडून नगरास हर्षे जाती ।
जैसे पावता हरीची भक्ती । त्यजती साधनश्रम आश्रमी चारी ।। १६
सुखी मीन राहती अगाध जलात । जैसे हरीस शरण जाता न बाधा उरत ।
कमले फुलता कैसे सर शोभत । जैसे निर्गुण ब्रह्म सगुण होताच ।। १
गुंजती मधुर मधुप अनूप । सुंदर खगरव नाना रूप ।
पर वित्त देखता दुष्टासी दुःखताप । तैसे चक्रवाकमन दुःखी पाहून निशा ।। २
आक्रंदती चातक अति तृषार्त । जैसे शंकरद्रोह्यासी सुख न लाभत ।
शरदताप शशि निशी हरत । जैसे संतदर्शने मिटे पाप ।। ३

चकोरसमुदाय देखे इंदूस । जणु भक्त निरखी पावता हरीस ।
जैसा विप्रद्रोहे होई कुळनाश । हिमभये मशककीटक नष्ट ।। ४
वर्षासमयी येती भूवरी जीव अनेक । जाती माघारी शरदऋतूत ।
जैसे सद्‌गुरू होताच प्राप्त । संशयभ्रमसमूह नष्ट होती ।। १७
वर्षा जाऊन आला निर्मल ऋतुशरद । अजून न मिळे सीतेचा समाचार तात ।
कैसेहि मिळता एकदा सीतेचे वृत्त । निमिषात जिंकून आणीन काळासी ।। १
कोठेहि असो जर सीता असेल जिवंत । यत्न करून आणीन मी तिज हे तात
राज्य कोश नगरी होताच प्राप्त । सुग्रीवहि न करी स्मरण माझे ।। २
वधिले वालीस मी ज्या बाणाने । उद्या मूढासी मारीन तयाने ।
मदमोहाचा नाश होई जयाच्या कृपेने । हे उमे स्वप्नी कधी तो कोपेल का ।। ३
जाणती चरित्र हे ज्ञानी मुनी । मानिली जयांनी प्रीति रामचरणी ।
प्रभु क्रोधवंत लक्ष्मण जाणोनी । चाप चढवून घेई बाण करी ।। ४
मग करुणासीमा रघुपती । अनुजासी समजाविती ।
सख्या सुग्रीवासी दावून भीती । लक्ष्मणा तयासी घेऊन ये ।। १८
इकडे हनुमंत हृदयी करी विचार । रामकार्याचा आता सुग्रीवास विसर ।
जाई तयापाशी नमवून चरणी शिर । समजावी नीति चारी प्रकार सांगून ।।१
सुग्रीव हे ऐकून भयभीत । म्हणे विषयवासनेने ज्ञान नष्ट होत ।
आता पाठव दूतसमूहास हे पवनसुत । वानरवृंदाप्रती सर्वत्र ।। २
सांग जर न येतील पंधरा दिवसात । मम करे वधीन तयास निश्चित ।
मग बोलावी दूतांसी हनुमंत । करी बहु सन्मान सकलांचा ।। ३
दाखवी तयांसी भयप्रीतिनीति । ते मारुतिपदास वंदून जाती ।
ते समयी कपि सैरावैरा धावती । बघून क्रुद्ध लक्ष्मण येताना ।। ४
तंव धनुष्य चढवून बोले लक्ष्मण । करीन भस्म नगराला जाळून ।
नगरजनांस व्याकुळ पाहून । अंगद वालिकुमार येई तेथे ।। १९
करी विनंति पदी शिर ठेवून । अभय हस्त तयावरी ठेवी लक्ष्मण ।
क्रोधवंत अनुज निज कानांनी ऐकून । वदे सुग्रीव तदा व्याकुळ भये ।। १
हनुमंता ऐक घे संगे तारेस । विनवून शांत करावे कुमारास ।
हनुमंत तारेसह करी गमनास । वंदून लक्ष्मणास करी प्रभूची स्तुती ।। २
मंदिरी आणिती तया विनवून । बैसविती मंचकी चरण प्रक्षाळून ।
सुग्रीव तंव चरणांसी करून वंदन । आलिंगी लक्ष्मणास धरून भुजा ।। ३

नाथ विषयभोगासम नसे अन्य मद। उपजवी मुनिमनी मोह क्षणात।
ऐकून सुग्रीवाचे वचन विनययुक्त। लक्ष्मण सुख पावून समजावी तया ।। ४
पवनतनय सांगे सकल वृत्तांत। पाठविले कैसे सर्वत्र दूत ।। ५
निघे सुग्रीव अति हर्षित। अंगदादि कपि सवे घेत।
आले ते होते जेथे रघुनाथ। रामानुज लक्ष्मणास घालून पुढे ।। २०
पदी मस्तक ठेवून जोडी हात। न दोष काही मजवरी नाथ।
देवा तुमची माया अतिबलवंत। रामा मिटेल ती जर दावाल दया ।। १
हे स्वामी विषयाधीन मुनिनरसुर। मी अति कामी कपि पशु पामर।
जयास न लागला स्त्रीचा नेत्रशर। जो जागा घनअंधारी क्रोधरात्री ।। २
जयाने न बांधिला गळयास लोभपाश। तो नर हे रघुराया तुम्हा सदृश।
साधनाने हे गुण न मिळती तयास। होती ते प्राप्त प्रभुकृपेने ।। ३
तंव हसून बोलती श्रीराम। बंधो तू प्रिय मज भरतासम।
आता मन लावून करावा यत्न परम। सीतेचा शोध जेणे लागेल ।। ४
करिती वार्ता ऐशा रीती। तोच वानरांच्या झुंडी येती।
चहूं दिशेस कपिगणांच्या रांगा दिसती। नानाविध अनेक रंगांच्या ।। २१
हे उमे देखिले मी त्या वानरसेनेस। मूर्ख तोच जो वांछी गणनेस।
येऊन सकल नमिती रामपदास। राममुखदर्शने होती कृतार्थ ।। १
ऐसा एकहि कपि न सेनेत। जयाचे कुशल राम न पुशीत।
प्रभूस न अधिक महती तयांत। विश्वरूप व्यापक रघुराया ।। २
आज्ञा पावता उभी ठायी ठायी कपिसेना। तंव सुग्रीव समजावी तयांना।
जा वानरवृंद तुम्ही चहूं दिशांना। हे रामाचे कार्य विनंती ही ।। ३
जा आता करा जनकसुतेचा शोध। बंधूंनो परतुनी या एक मासदिवसात।
शोधाविण जे येतील अवधीत। मजकडून वध तयांचा होईल ।। ४
सकल वानर हे वचन ऐकून। भिन्न भिन्न दिशी करिती प्रयाण।
तंव सुग्रीव घेई बोलावून। नल अंगद हनुमंत यासी ।। २२
ऐका हे अंगद नील हनुमान। जांबुवंत मतिधीर सुजाण।
जा दक्षिण दिशेस सकल वीर महान। पुसा सीतेचे वृत सकलांस ।। १
कायावाचामने करा यत्नास। साधावे रामचंद्राच्या काजास।
सेवावे पाठी रवीस पोटी अग्नीस। सर्वभावे स्वामीस सांडून कपट ।। २

टाकून माया साधावा परलोक। जेणे मिटेल भवसंभव शोक।
बांधव हो देहधारणेचे सार्थक। कामवासना सोडून भजावे रामास ॥ ३
तोच गुणज्ञ तोच भाग्यवंत। जो रघुवीर चरणी अनुरक्त।
आज्ञा घेउन नमवून मस्तक। चालले हर्षे रघुनाथा स्मरून ॥ ४
हनुमान सर्वांअखेर करी वंदन। प्रभुनिकट बोलाविती कार्य जाणून।
निज करकमले मस्तक स्पर्शून। मानून भक्त करमुद्रिका देती प्रभू ॥ ५
बहु प्रकारे करून सीतेचे सांत्वन। ये त्वरित मम बळ विरहव्यथा कथून।
जन्माची सफलता मानी हनुमान। स्मरून हृदयी कृपानिधान निघे तो ॥ ६
जरी जाणती सकल वृत्ताते। रक्षिती राजनीति राम सुरत्राते ॥ ७
शोधीत जाती सकल वानर। गिरिदरीसरितासर।
रामकार्यी मन लीन पडे विसर। देहमायाममतेचा ॥ २३
केव्हा कोठे होई निशाचराशी भेट। घेती तयाचा प्राण देऊन चपराक एक।
शोधिती नानापरी काननपर्वत। मुनि भेटता घेरिती तया ॥ १
लागता तृषा अति व्याकुळ होती। जल न मिळे वनी पथ विसरती।
मग हनुमान मनी ऐसे चिंती। मरू पाहती सकल जलपानाविण ॥ २
बघे तो चौदिशी चढून गिरिशिखर। एक कौतुक दिसे तेथे भूमीत विवर।
चक्रवाकबकहंस उडती तयावर। प्रवेशती गुफा बहुत खग ॥ ३
येई पवनसुत गिरि उतरून। दावी विवर सकलांना नेऊन।
सर्वांपुढे हनुमानास करून। शिरती शीघ्र विवरात ॥ ४
देखती उपवनी सुंदर सरोवर। विकसती बहु कमले तयावर।
तेथे एक मंदिर रुचिर। बैसली तयांत तपोमूर्ति स्त्री एक ॥ २४
दुरून करिती तिजसी नमन। पुसता तंव कथी निज वर्तमान।
मग वदे ती करा जलपान। खा ही सुंदर रसाळ फळे ॥ १
स्नान करून मधुर फळे भक्षिती। मग तिज समीप येऊन बैसती।
निज वृत्तांत कथून वदे ती। आता रघुनाथाप्रती जाते मी ॥
नयन मिटता विवराबाहेरी याल। न करा चिंता सीता मिळेल।
नयन झाकून मग उघडती सकल। तो जाणती उभे ते सिंधुतीरी ॥ ३
नारी स्वये गेली जेथें होते रघुनाथ। ठेवी ती रामपदकमली मस्तक।
मग नानापरी प्रभूची स्तुति करीत। अर्पिती तिज प्रभू अढळ भक्ती ॥ ४

गेली ती निघून बदरिका वनी । प्रभूची आज्ञा शिरी धारण करुनी ।
रामचरणयुगल हृदयी ठेवुनी । वंदिती जया ब्रह्मामहेश ।। २५
इकडे कपि चिंतिती मनांत । अवधि संपला कार्य न साधत ।
सकल मिळून परस्परा कथीत । बंधुहो शोधावाचून कैसे परतावे ।। १
साश्रुनयने वदे अंगद । उभयप्रकारे आम्हा मृत्यु निश्चित ।
इकडे सीतेचा शोध न लागत । तिकडे जाताच वधील कपिराज ।। २
मज मारीत होते पितृवधानंतर । परि रामे रक्षिले न सुग्रीवाचे उपकार ।
सांगे सकला अंगद वारंवार । मरण निश्चित आता न संदेह ।। ३
अंगदाचे वचन ऐकून कपिवीर । बोलू न शकती नेत्रांतून ढाळिती नीर ।
मग चिंतातुर जाहले एक क्षणभर । वदती पुन्हा ऐसे सकल वचन ।। ४
आम्ही सीताशोधावांचून । नाही माघारी जाणार युवराज प्रवीण ।
लवण सागराच्या तटी ऐसे वदून । पसरून दर्भ बैसती कपी ।। ५
जांबुवंत पाहून अंगदाचे दुःखास । करी उपदेश सांगून कथा विशेष ।
हे तात न मानावे मानव रामास । अज अजित निर्गुण ब्रह्म जाणावे ।। ६
आम्ही सकल सेवक भाग्यवंत । सगुण ब्रह्मी संतत अनुरक्त ।। ७
निज इच्छेने प्रभु घेई अवतारास । महीगोद्विजसुर उद्धरण्यास ।
सगुण उपासक भक्त सोडून मोक्षास । करिती प्रभूची सेवा संगे राहून ।। २६
यापरी अनेकविध कथा कथिती । गिरीकंदरांतून ऐके संपाती ।
वदे जगदीश मज आहार पाठविती । बघून बहू कपि बाहेरी येताना ।। १
आज सकलांचे करीन भक्षण । बहु दिन जाहले मरतो आहाराविण ।
न मिळाले कधी पोटभर भोजन । आज विधीने दिले एकच वेळी विपुल ।। २
कपि भयभीत ऐकता गृध्रवचन । म्हणती सत्य आता आमुचे मरण ।
उठती ते संपातीस पाहून । विशेष चिंतातुर जांबुवंत ।। ३
बोले अंगद मनी चिंतून । नसे धन्य कोणी जटायुसमान ।
रामकार्यास्तव देह वेचून । गेला स्वर्गी तो भाग्यवंत ।। ४
खग ऐकून वाणी हर्षशोकयुक्त । गेला कपींच्या सन्निध कपि भयभीत ।
अभय देऊन तयास पुसे वृत्तांत । तंव तयांनी निवेदिली कथा सकल ।।
संपाति ऐके जटायूची करणी । महिमा रामाचा तो बहुपरी वानी ।। ६
घेऊन जा सिंधुतटी मजसी । देईन तिलांजलि मी बंधूसी ।
करीन सहाय्य मी तुम्हांसी । जेणे मिळेल उपाय सीताशोधार्थ २७

सागरतीरी जटायूची क्रिया करून । सांगे निजकथा हे कपिवीर ऐका म्हणून ।
आम्ही उभय बंधु असता तरुण । गेलो गगनी उडत रविसमीप ॥ १
जटायु तेज न साहू शके वळला परत । मी अभिमानी गेलो रविनिकट ।
जळले मम पंख रवितेज अमित । पडलो भूमिवरी चीत्कारत घोर ॥ २
चंद्रमा नामे तेथे होते एक मुनी । उपजली तया दया मज पाहुनी ।
सांगती बहुविध ज्ञान समजावुनी । घालविला मम देहजनित अभिमान ॥ ३
त्रेतायुगी परब्रह्म मनुज तनु घेईल । तयाच्या पत्नीस निशाचरपति हरील ।
शोधार्थ प्रभु दूतास पाठवितील । तया भेटता होशील पुनीत तू ॥ ४
पंख फुटतील तुज नको करू चिंता । तयांना दाखवून दे तू सीता ।
मुनिवाणी सत्य आला प्रत्यय मम चित्ता । मम वचन ऐकून करावे प्रभुकार्य ॥ ५
त्रिकूट पर्वतावर लंका असून । स्वभावे निर्भय तेथे वसे रावण ।
अशोक नामे तेथे एक उपवन । शोकमग्न होऊन सीता वसे तेथे ॥ ६
मी तिज पाहे ती न दिसे तुम्हांस । दृष्टि अपार असते गृध्रास ।
काय करू पावलो वृद्धावस्थेस । न तो करतो तुम्हा निश्चित सहाय्य ॥ २८
जो उल्लंघील शतयोजन सागर । तो रामकाज करील होऊन बुद्धिआगर ।
पाहून मजसी मनी धरा धीर । बघा जाहले कैसे शरीर रामकृपे ॥ १
पापी जयाच्या नामस्मरणे मात्र । तरिती अपार भवसागर ।
तयाचे दूत तुम्ही करा निर्धार । सोडा भीरुता धरा हृदयी राम ॥ २
हे गरुडा ऐसे वदून गेला संपाती । तंव उपजे कपिमनी विस्मय अती ।
निज निज बल सकल कथिती । परि सागर पार कराया संदेह मनी ॥ ३
मी आता जाहलो वृद्ध वदे जांबुवंत । पूर्वबळाचा लेश न राहिला तनूत ।
जंव वामनावतार घेती खरारि अनंत । तंव होतो मी तरुण बलवान ॥ ४
प्रभुतनु इतुकी वृद्धिगत बांधता बळीस । कैसे वर्णू मी त्या तनूस ।
घातल्या मी सप्त प्रदक्षिणा तयास । धावून दोन घटिकेत ॥ २९
जाईन मी पार म्हणे अंगद । परतून येतासमयी संदेह मनात ।
तू सर्वपरी लायक वदे जांबुवंत । परि पाठवावे कैसे नायक सर्वांचा तू ॥ १
म्हणे ऋक्षपति ऐक हे हनुमान । का मौन धरिसी तू बलवान ।
पवनसुताचे बळ पवनासमान । बुद्धिविवेकविज्ञान यांचे निधान तू ॥ २
कोणते काज ऐसे कठिण जगात । जे तुज न करवे हे तात ।
रामकार्यास्तव तव अवतार निश्चित । ऐकताच झाला पर्वताकार हनुमान ॥ ३

तेज झळके कनकवर्णी तनूवर। वाटे जणु मेरू गिरिराज अपर।
करी सिंहनाद वारंवार। म्हणे लीलया उल्लंघीन लवण जलनिधी ।। ४
मारीन सेनेसह रावणासी। उपटून आणीन येथे त्रिकुटगिरीसी।
हे जांबुवंता मी पुसतो तुजसी। उपदेश करावा मज उचित ।। ५
जाऊन करावे तू इतुकेच हे तात। भेटून सीतेस आणावे तिचे वृत्त।
राजीवनयन राम भुजे बळवंत। केवळ लीलेस्तव नेतील कपिसेना ।। ६

कपिसेना संगे। वधून राक्षस। श्रीराम सीतेस। आणतील।
त्रैलोक्यी पावन। प्रभूचे सुयश। नारद मुनीश। वानतात।
ऐकती गाती जे। जाणून वानिती। ते नर पावती। मोक्षपद।
गातसे तुलसी। मधुप होऊन। श्रीराम चरण। पंकजांसी ।। १

भवासी भेषज रघुनाथाचे यश। श्रवण करितील जे स्त्री-पुरुष।
तयांचे सकल मनोरथास। पूर्ण करितील राम त्रिशिरारी ।। ३० (क)
नीलकमलापरी तनु श्याम। कोटि मदनाहून सुंदर राम।
श्रवण करावे तयांचे गुणग्राम। जणूं अघ खगासी व्याध नाम ज्याचे ।। ३० (ख)

।। कलियुगातील संपूर्ण पापाचा नाश करणारा
श्रीरामचरितमानसाचा चतुर्थ-सोपान समाप्त ।।

(किष्किंधाकांड समाप्त)

पंचम सोपान – सुंदरकांड

मोक्षशांतीप्रद । अप्रमेय शांत । अनघ शाश्वत । एक राम ।
ब्रह्माशंभुशेषे । सदैव सेवित । वेदांत विदित । सर्वव्यापी ।
मायानररूप । जगाचा ईश्वर । करुणासागर । सुरगुरु ।
नृपचुडामणी । श्रीरघुवरास । रामाख्य हरीस । वंदितो मी ।। १
नसे अन्य आशा । रघुपतिनाथ । मम हृदयांत । कदापीही ।
सांगतो मी सत्य । सर्व अंतरात्मा । अनंता श्रीरामा । दयानिधे ।
रघुपुंगवा रे । निर्भरा भक्तीसी । द्यावी तूं मजसी । रामराया ।
मोहादिरहित । करावे मनासी । म्हणत तुलसी । भगवंता ।। २
अतुलित बल । हेच ज्याचे धाम । हेमशैलासम । तनुकांती ।
दनुजवनासी । भासतसे अग्नी । अग्रगण्य ज्ञानी । हनुमंता ।
सकल गुणांचा । निधि तू आहेस । वानरांचा ईश । रामदूता ।
रघुपतिप्रिय । परम सुभक्त । अंजनीचा सुत । नमामि ते ।। ३

जांबुवंतांचे सुंदर वचन । ऐकून हनुमंत हृदयी प्रसन्न ।
वदे तोवरी वाट पाहावी दुःख साहून । खाऊन कंदमूळफळ बांधव हो ।। १
जोवरी न येईनआतांमी सीताशोध करून । काज निश्चित होत हर्षित मम मन ।
ऐसे वदून रघुनाथासी हृदयी स्मरून । निघाला मारुति वंदून सकलांना ।। २
सिंधुतीरी एक भूधर सुंदर । उडून लीलया मारुति चढे तयावर ।
रघुवीरांचे स्मरण करून वारंवार । बलवान पवनसुत उडे वेगे ।। ३
ज्या गिरीवरी पद ठेवी हनुमंत । पाताळी पर्वत तो जाई त्वरित ।
जैसा रघुपतीचा अमोघ बाण जात । चालला तैसा वेगे हनुमान ।। ४
जलनिधि तयास रामदूत जाणून । वदे मैनाका करावे त्याचे श्रमहरण ।। ५
करे स्पर्शी हनुमान मैनाकासी । मग प्रणाम करी त्या गिरीसी ।
म्हणे हे बंधो न मिळेल विश्राम मजसी । केल्याविना प्रथम काज रामाचे ।। १

पवनसुत जाता देव बघती । तयाची बलबुद्धि जाणू इच्छिती ।
सुरसा नामे सर्पमाता पाठविती । येऊन वदे ती तयासी ।। १
सुर देती आज मज आहार । परिसून ते म्हणे पवनकुमार ।
रामकाज करून येतो शीघ्र । सीतेचे वृत्त प्रभूसी सांगेन ।। २
तंव येऊन प्रवेशीन तव वदन । माते मज जाऊं दे करितो सत्यकथन ।
ती न जाऊं देई कवण्या यत्ने करून । कां न मज गिळसी वदे पवनसुत ।। ३
योजनभर ती पसरे वदन । कपि निज तनु विस्तारी द्विगुण ।
ती विस्तारी मुख षोडष योजन । बत्तीस योजन जाहला मारुति त्वरित ।। ४
जैसे जैसे सुरसा वाढवी वदन । तैसे तैसे दाखवी कपि रूप द्विगुण ।
पसरवी ती आनन शत योजन । तंव अति लघुरूप धरी पवनसुत ।। ५
येई बाहेरी वदनी शिरून । निरोप घेई तिजसी वंदून ।
वदे ती पाठविती ज्या काजास्तव सुरगण । ते तव बुद्धिबळाचे मर्म जाणिले मी ।। ६
रामाचे सर्व कार्य तू साधशील पूर्ण । आहेस तू बळबुद्धीचे निधान ।
गेली ती कपीस आशीर्वाद देऊन । तंव हर्षे चालला हनुमंत ।। २
वसे सिंधुमाजी राक्षसी एक । माया करून धरी खगास नभात ।
उडत असता जीवजंतु गगनात । पडछाया विलोकून तयांची जळी ।। १
पडछाया धरता न उडती पक्षी । गगनचर खगासी सदा ऐसे भक्षी ।
दावी तैसीच माया हनुमानासी । कपि कपट तिचे त्वरित जाणे ।। २
मारून तिज पवनसुत वीर । जाई सागरापार तो मतिधीर ।
विलोकी वनशोभा पैलतीरावर । गुंजती मधुकर मधुलोभे ।। ३
नाना तरु फळपुष्पे सुशोभित । खगमृगवृंद देखता मन मोहित ।
पुढे देखे शैल विशाल एक । निर्भये चढे तयावरी धावून ।। ४
हे उमे कपीचे न काही थोरपण यात । हा प्रभुप्रताप काळासहि खात ।
गिरि चढून कपि लंका देखत । न वर्णवे तो अति विशाल दुर्ग ।। ५
अति उत्तुंग जलनिधि चौबाजूस । कनककोट दावी परम प्रकाश ।। ६
कनक कोटात । सदने सुंदर । रत्ने तयांवर । जडविली ।
पथ आडमार्ग । चौवाटा बाजार । नगर रुचिर । शोभिवंत ।
गजवाजीरथ । खेचरनिकर । पथी पदचर । कोण गणी ।
नानाविधरूप । निशाचरगण । सेना बलवान । न वानवे ।। १

सरकूपवापी । बाग उपवन । वाटिका विपिन । शोभतात ।
मुनिसी मोहिती । दुहिता सुंदर । नरनागसुर । गंधर्वांच्या ।
पर्वतासमान । शरीर विशाल । बलवान मल्ल । गर्जतात ।
करितात कुस्ती । नाना आखाड्यात । आव्हान करीत । एकमेका ।। २

कोट्यवधि योद्धे । विक्राळ शरीर । रक्षिती नगर । यत्नपूर्व ।
खल निशाचर । अजगोखरांस । नरमहिषास । भक्षितात ।
रामशरतीर्थी । त्यजून तनूस । परम गतीस । पावतील ।
याच हेतुस्तव । म्हणत तुलसी । कथिले कथेसी । संक्षेपाने ।। ३

बहु नगररक्षक पाहुनी । हनुमान करी विचार मनी ।
अति लघुरूप धरुनी । प्रवेशीन नगर निशासमयी ।। ३

कपि मशकासमान लघु रूप धरी । निघे लंकेसी स्मरून नरहरी ।
वदे लंकिनि नामे एक निशाचरी द्वारी । मज अवमानुनी जासी कोठे तू ।। १

रे शठा न जाणसी मम मर्माते । जितुके चोर तितुके मी भक्षिते ।
कपि मारी एक महा मुष्टिते । तव रक्त ओकून कोसळे महीवरी ।। २

उठे लंकिनि देहास सावरून । सभय बोले कर जोडून ।
ब्रह्मा रावणासी वर देऊन । वदे दावून खूण मज जात असता ।। ३

कपिप्रहारे जंव तू होशील विकल । तंव जाणावा निशाचरसंहार अटळ ।
हे तात मम पुण्य असे विपुल । जेणे या नयने देखिले रामदूतास ।। ४

स्वर्ग मोक्ष सकल सुख हे तात । घालितां एका तुळेचे अंगात ।
न ती सकल मिळून समान होत । क्षणमात्र सुखाच्या जे मिळे सत्संगी ।। ४

करावे सकल काज जाऊन नगरास । हृदयी धरून अयोध्यानृप रामास ।
विष रिपु सुधा मित्रासम होती तयास । सिंधु गोपदासम अग्नि शीतल ।। १

हे गरुडा सुमेरु तया रजकणापरी । असे रामकृपा जयावरी ।
भगवंतास स्मरून प्रवेशे नगरी । कपि अति लघु रूप घेऊन ।। २

करूं लागे प्रति मंदिरी शोध । देखे जेथे तेथे योद्धे अगणित ।
मग दशाननाचे मंदिर प्रवेशत । बघे तेथील सुंदरता न वानवे जी ।। ३

कपि पाही निद्रिस्त रावणास । परि न देखे मंदिरी वैदेहीस ।
मग देखे एका रम्य भवनास । होते तेथे देवाचे मंदिर विलग ।। ४

मंदिर रामाच्या आयुधे रेखांकित । शोभा तेथील वर्णनातीत ।
बघून कपिराज होई हर्षित । नव नवीन सुंदर तुलसीबन ।। ५
लंकेत निशाचरनिकरांचा वास । मग कैसा तेथे सज्जनांचा निवास ।
ऐसा मनी विचार करी कपीश । तोच जागृत होई बिभीषण ।। १
राम राम ऐसे करी नामस्मरण । कपि हृदयी हर्षित जाणून तो सज्जन ।
परिचय मी निश्चित घेईन करून । न करिती कार्याची हानि साधू ।। २
तया पुकारी कपि विप्ररूप घेऊन । ऐकता बिभीषण येई उठून ।
पुसे तया कुशल प्रणाम करून । सांग निजकथा समजावून हे विप्रा ।। ३
का तुम्ही कोणी हरिभक्तांतील एक । पाहून उपजे प्रीति मम हृदयात ।
की तुम्ही स्वये राम दीनावरी अनुरक्त । आला मज कृतार्थ करावया ।। ४
तंव सकल रामचरित्र सांगून । निज नाम कथी हनुमान ।
उभयांची तनु पुलकित ते ऐकून । मन तल्लीन स्मरून रामगुणा ।। ६
ऐक मम जीवनराहणी पवनसुत । जैसी जिव्हा बिचारी दंतामाजी राहात ।
हे तात मज जाणून अनाथ । करतील कृपा कां भानुकुलरवी ।। १
ही तामस तनु नसे काही साधन प्राप्त । नसे रामपदकमली प्रीति मनात ।
आता भरवसा हाच मज हनुमंत । हरिकृपेविण न घडते संतदर्शन ।। २
केले रघुवीरे कृपावलोकन । म्हणून तुम्ही दिधले मज दर्शन ।
वदे कपि ऐक प्रभुरीति हे बिभीषण । प्रभू करिती प्रीति सदा सेवकावरी ।।३
सांग बरे मी ऐसा कोण कुलीन । चंचल कपि तर सर्वपरी हीन ।
प्रभाती जे करिती आमुचे नामोच्चारण । ते दिनी न मिळे भोजन तया ।। ४
मित्रा ऐसा मी महान अधम । परि रघुवीराची मजवरी कृपा परम ।
तंव स्मरतातच राम गुणधाम । कपीच्या नयनी भरती प्रेमाश्रू ।। ७
हे जाणून जे विसरती प्रभूस । फिरती भोगामागे का न होणार दुःखवश ।
यापरी स्तवून रामगुणांस । पावती ते परम शांति न वर्णवे ।। १
मग बिभीषणे कथिला सकल वृत्तांत । राहिली सीता तेथे ज्या स्थितीत ।
तंव मित्रा ऐक म्हणे हनुमंत । पाहू इच्छितो मी जानकी मातेसी ।। २
सुचवी सकल युक्ति बिभीषण । निघे मारुती मग निरोप घेऊन ।
जाई तेच पूर्व मशक रूप धरून । अशोक वनांत सीतेप्रती ।। ३
देखतांच सीता कपि करी प्रणाम मनी । संपे चार प्रहर रात्र तेथे बैसुनी ।
तनु कृश शिरावरी एक जटावेणी । जपे हृदयी गुण रघुपतीचे ।। ४

निज चरणावर दृष्टि ठेवून । मन तिचे रामपदकमली लीन ।
पाहून जानकीस अति दीन । होई पवनसुतासी अति दुःख ।। ८
तरुपल्लवी बैसे कपि लपून । आता काय करू बरे करी चिंतन ।
ते समयी तेथे येई रावण । बहु नारीसंगे सजून नटून ।। १
बहुपरी तो दुष्ट समजावी सीतेस । दावी सामदामभयभेदांस ।
ऐक हे सुमुखी शहाणे म्हणे लंकेश । मंदोदरी आदि सकल राणी ।।
पण माझ्या तव दासी तयां करीन । पाहा मजप्रती एकच वेळ पण ।
वदे वैदेहि आड तृण धरून । स्मरून परम प्रिय अयोध्यापतीस ।। ३
ऐक दशमुखा काजव्याचा प्रकाश । करेल का कधी कमलाचा विकास ।
समजून घे हे मनी दशशीर्ष । दुष्टा तू न जाणतोस रामाचे बाण ।। ४
रे पाप्या एकांती केले हरण मम । निर्लज्जा न वाटे का लज्जा तुज अधम ।। ५
ऐकून काजव्यासम आपणास । सूर्यासमान रामास ।
जाहला क्रुद्ध ऐकून कठोर वचनास । बोले रावण क्रोधे खड्ग उपसून ।। ९
हे सीते केलास तू मम अपमान । तीक्ष्ण तलवारे तव शिर उडवीन ।
तात्काळ ऐक तू मम वचन । सुमुखी न तो मुकशील जीवास ।। १
श्याम कमळमाळेसम सुंदर । रामभुज गजशुंडासम रे दशकंधर ।
ते भुज मम कंठात वा तव खड्ग घोर । ऐक दुष्टा पाप्या हा मम सत्य पण ।।२
हे चंद्रहासा कर मम दुःख दूर क्षणात । रघुपति विरहाग्नीत मी जळत ।
तव शीतल तीक्ष्ण धारा चमकत । मिटव मम दुःखभार वदे सीता ।। ३
माराया धावला ऐकताच वचन । शांत करी मंदोदरी नीति सांगून ।
रावण आज्ञा करी राक्षसीणीस बोलावून । बहुपरी भय दावा सीतेस ।। ४
न मानील मम वचन मासभरात जर । ठार मारीन तिज उपसून तलवार ।।५
गेला निजभवनात रावण । इकडे मग राक्षसीणी गण ।
विक्राळ रूपे धारण करून । भीति दावू लागती सीतेसी ।। १०
त्रिजटा नामे राक्षसीणी एक । निपुण विवेकी रामचरणी रत ।
वदे सीतेची सेवा करून साधा सार्थक । कथून निज स्वप्न सकलांना ।। १
लंका जाळिती वानर स्वप्नात । सकल राक्षससेनेस ठार करीत ।
दशानन नग्न शिर मुंडित । वीस भुजाहीन आरूढ रासभावरी ।। २
ऐसा तो जाई दक्षिण दिशेस । जणू लंका मिळाली बिभीषणास
नगरी फिरविती रघुवीरद्वाहीस । तंव प्रभु बोलाविती सीतेसी ।। ३

मी कथिते हे स्वप्न निश्चित । होईल सत्य चार दिवसात ।
वचन ऐकून सकल भयभीत । पडती जानकीच्या चरणांवरी ।। ४
जंव जाती सकल निज गृहासी । तंव मनी चिंती सीता ऐसी ।
नीच निशाचर मारील मजसी । एक मास दिवस संपताच ।। ११
मग वदे त्रिजटेसी जोडून कर । माते विपत्तीत तूच मज आधार ।
कर उपाय वेगे सोडीन हे शरीर । न सोसवे दुःसह विरह मज आता ।। १
काष्ठे आणून रचून सजव तू चितेस । माते मग पेटवून दे अग्नीस ।
तू शहाणी करून दावी सत्य मम प्रेमास । कोण ऐकेल वाणी रावणाची शूळासम ।। २
धरी चरण त्रिजटा ऐकून वचनासी । समजावी प्रभुप्रताप सुयश तिजसी ।
ऐक हे सुकुमारी न मिळे अग्नि निशी । ऐसे वदून जाई ती निज सदनी ।। ३
वदे सीता आहे दैव प्रतिकूल । न मिळेल अग्नि न मिटेल शूळ ।
दिसती गगनी अंगारे विपुल । परी एकहि तारा न येई भूमीवरी ।। ४
पावकासम शशि न स्रवे अग्नी । वाटते मज मी हतभागी जाणुनी ।
अशोक वृक्षा मम विनंति ऐकुनी । हरण करून शोक कर तू नाम सत्य ।। ५
तव नूतन पल्लव अग्निसदृश । दे अग्नि परि जळू विरहरोगास ।
पाहून परम विरहाकुल सीतेस । क्षण भासे कपीस तो युगासम ।। ६
हनुमंत तंव हृदयी विचार करून । मुद्रिका तिजप्रती देई फेकून ।
घेई सीता हाती हर्षे उचलून । जणू दिधला अशोकाने अंगार ।। १२
तंव देखे ती मुद्रिका मनोहर । रामनाम चिन्हांकित अति सुंदर ।
स्तिमित सीता पाही मुद्रिका रुचिर । हर्ष दुःखे हृदयी व्याकुळ ओळखून ।। १
कोण जिंकील अजय रघुरायास । माया न रची ऐशा मुद्रिकेस ।
करी सीता मनी नाना विचारास । तंव बोले हनुमान मृदु वचन ।। २
लागे वर्णाया रामचंद्राचे गुण । पळाले सीतेचे दुःख ते ऐकून ।
ऐके ते कानमन लावून । कपि सांगे मग आदिपासून कथा ।। ३
कथिली कथा जयाने सुंदर श्रवणामृत । वदे ती बंधु तो का न होई प्रकट ।
तंव हनुमंत जाता निकट । फिरवून मुख बैसे ती स्तिमित मनी ।। ४
हे जानकी माते मी रामदूत । हे सत्य घेतो मी करुणाघनाची शपथ ।
ही मुद्रिका माते मीच आणिली निश्चित । रामाने दिधली ती खूण म्हणून ।। ५
पुसे सीता नरवानरांत ही मैत्री कैसी । तंव कथिली तयाने ती घडली तैसी ।। ६

ऐकून प्रेमळ कपिवचनास । उपजे सीतेच्या मनी विश्वास ।
जाणिले हा कृपासिंधु रामाचा दास । कायावाचा मने करोनी ।। १३
वाढली प्रीति गाढ जाणता हरिभक्त । भरती प्रेमाश्रु नयनी तनु पुलकित ।
बुडत असता मी विरहजलधीत । हे हनुमंता जाहला मज तूं जलयान ।। १
इडापिडा टळो आता सांगावे कुशल । कैसे अनुजासह सुखधामश्यामल ।
रघुराया कृपाळु चित्ताने कोमल । हे कपि दाविती निष्ठुरता कशास्तव ।। २
भक्ताला सुख देणे जयाचे ब्रीद । करितात का ते स्मरण कधी रघुनायक ।
कधी निवतील मम नेत्र हे तात । निरखून ती श्याम मृदु मूर्ती ।। ३
शब्द न फुटे भरती अश्रु नयनांत । म्हणे विसरला तुम्ही हाय हाय हे नाथ ।
बघून सीता परम विरहे व्यथित । नम्र मृदु वचन वदे हनुमान ।। ४
माते प्रभु कुशल अनुजासहित । तव दुःखाने दुःखित कृपानिकेत ।
हे जननी न मानावे दुःख मनात । राम हृदयी द्विगुणित प्रेम तुझ्याहुनी ।। ५
ऐक आता रघुपतीचा संदेश । हे माते तू धरून धीरास ।
कपि गद्‌गदित वदून ऐशा वचनास । प्रेमाश्रु तरळती तयाच्या नेत्रात ।। १४
हे सीते वदती राम होता तव वियोग । मजसी येती प्रतिकूल योग ।
नव तरूंचे पल्लव भासती पावक । काळ रात्रीसम निशाशशि हा भानु जणू ।। १
भाल्याच्या वनासम भासे कमलवन । तप्त तेल जणू वर्षती घन ।
त्रिविध समीर सर्पाच्या श्वासासमान । पीडा देती हितकर्ते आमुचे ।। २
दुःखभार होतो हलका कथिता अन्यास । कोणी न जाणे दुःख सांगू कवणास ।
प्रेमाचे तत्त्व कळे मम मनास । परस्पर आपुल्या उभयातील प्रिये ।। ३
सदा राहे तुजपाशी ते मन । मम प्रेमाचे सार यातच तू जाण ।
वैदेही प्रभूचा संदेश ऐकून । जाहली प्रेमे तल्लीन न शुद्धि देहास ।। ४
कपि म्हणे माते तू धीर धरी । स्मरावे सेवक सुखदाता खरारी ।
रघुपतीची प्रभुता ठेवून उरी । सोडावी भीरुता मम वचन मानून ।। ५
कीटक पतंगासम निशाचरगण । तयांस अग्नि रघुपतीचा बाण ।
निशाचर जाहले दग्ध हे मनी जाणून । जननी आता हृदयी धीर धरी ।। १५
कळता जर समाचार रघुवीरास । रघुराज न करते विलंबास ।
जानकी रामबाणरवि येता उदयास । कैसा राहील असुरसेनेचा अंधार ।। १
माते घेऊन जाईन मी आजहि तुज । परि रामशपथ प्रभुआज्ञा नसे मज ।
कपींसह येतील स्वये रघुराज । हे जननी दिन काही धरी धीर ।। २

निशाचरास मारून तुजसी नेतील । नारदादि त्रिलोकी सुयश गातील ।
हे सुता तुजसम कपि लघु सकल । राक्षसवीर अति बलवान वदे सीता ।। ३
वाटतो संदेह मम हृदयात । ऐकून कपि करी निज देह प्रगट ।
कनक पर्वतासम शरीर भासत । समरांगणी भयंकर बलवंत वीर ।। ४
उपजे विश्वास सीतेच्या मनात । पुनरपि लघु रूप घेई पवनसुत ।। ५
ऐक माते मर्कटांत । नसे बळबुद्धि बहुत ।
परि प्रभुप्रतापे गरुडास भक्षीत । अति निर्बळ लघु सर्प ।। १६
मनी संतोषित कपिवाणी ऐकून । जी भक्ति प्रताप तेज बळ यांनी पूर्ण ।
देई सीता आशीर्वाद रामप्रिय जाणून । होवो तू बलशीलनिधान हे तात ।। १
हे पुत्रा हो तू अजर अमर गुणवान । बहु कृपा करो तुजवरी रघुनंदन ।
प्रभु कृपा करो हे करताच श्रवण । जाहला हनुमान तल्लीन प्रेमात ।। २
सीतापदी शिर ठेवून वारंवार । वदे कपि वचन जोडून कर ।
आतां कृतकृत्य माते मी साचार । तव आशीर्वाद अमोघ हे विख्यात ।। ३
अति क्षुधित मी ऐक हे जननी । तरूवरील ही सुंदर फळे पाहूनी ।
ऐक सुता तयांस रक्षितात वनी । परम वीर रजनीचर वदे सीता ।। ४
जर प्रसन्न मने देशील आज्ञेसी । माते तयांचे भय न मजसी ।। ५
पाहून कपि बुद्धिबलात निपुण । म्हणे जानकी हे हनुमान ।
हृदयी धरून रघुपतीचे चरण । हे वत्सा जा भक्ष तू मधुर फळे ।। १७
शिरला बागेत वंदून सीतेस । फळे भक्षून तोडी वृक्षास ।
बहु वीर रक्षिती तेंथे वनास । कपि वधी काही जाती रावणाप्रती काही।। १
वदती हे नाथ एक कपि आला भारी । अशोक वन तो उद्वस्त करी ।
रक्षकांस मर्दून फेकी महीवरी । फळे खाऊन उपटी विटपांसी ।। २
ऐकून पाठवी नाना वीरांसी रावण । तयांसी पाहून गर्जे हनुमान ।
सर्व रजनीचरांसी वधी पवननंदन । जाती ते आक्रोशत अर्धमृत ।। ३
पाठवी रावण अक्षयकुमार सुतास । निघे तो संगे घेऊन अपार वीरांस ।
येता देखून फेकी विशाल तरूंस । महाध्वनि गर्जना करी तया वधून ।। ४
काही मारिले मर्दिले काहीसी । किती एक मिळविले धुळीसी ।
काही पुकारती जाऊन रावणापाशी । हे प्रभो मर्कट अति बलवान ।। १८
लंकेश संतप्त सुताचा वध ऐकून । मग पाठवी मेघनादास बलवान ।
हे सुता वधू नकोस तया आण बांधून । कपि आला कोठून पाहू या ।। १

निघाला योद्धा अतुलित इंद्रजित। उपजे क्रोध ऐकून बंधुमृत्यूचे वृत्त।
पाहे कपि येताना भयानक भट। तव धावे तो कटकटा गर्जून ।। २
उपटी अति विशाल एका तरूस। विरथ करी लंकेशकुमारास।
संगे होते महावीर तयांस। कपि धर धरून मर्दी निज अंगे ।। ३
करून निःपात वीरांचा लढे सुतासी। जणूं जुंपले गजराजयुगल युद्धासी।
चढे तरूवर करून मुष्टिप्रहारासी। तंव मूर्च्छा येई सुतासी एक क्षण।। ४
पुनरपि उठून रची मायेसी। परि न जिंकू शके पवनसुतासी।। ५
मेघनाद तंव फेंकी ब्रह्मास्त्र। कपि करी मग मनात विचार।
मी न मानीन ब्रह्मास्त्रास जर। महिमा अपार तयाचा लोपेल ।। १९
मारिले तयाने कपीस ब्रह्मशर। पडता समयी कपि करी सेनासंहार।
देखताच मूर्छित कपिवर। नेती तयास बांधून नागपाशाने ।। १
जयाचे नाम जपता हे भवानी। भवबंधन तोडतो नर ज्ञानी।
कैसा पडेल तयाचा दूत बंधनी। प्रभुकाजास्तव घेई बांधून कपी ।। २
निशाचर कपीचे बंधन ऐकून। कौतुकालागी आले सभेस धावून।
पाही दशमुखाची सभा हनुमान। वैभव तेथील न वर्णवे ।। ३
सुर दिक्पाल विनये जोडती हस्त। रावणभ्रुकुटीस विलोकती सभीत।
ऐसा प्रताप देखून कपि न भयभीत। जैसा सर्पगणांत गरुड निर्भय।। ४
कपीसी विलोकून दशानन। हसला वदून दुर्वचन।
परि होतांच सुतवधाचे स्मरण। उपजले दुःख तयाच्या हृदयात ।। २०
वानरा तू कोण वदे लंकेश। कोणाच्या बळावर करिसी वननाश।
न ऐकिले का कधी मम नामयशास। हे पाप्या अति उर्मट दिसतोसी मज ।।
कोणत्या अपराधास्तव असुरा मारिसी। रे शठा सांग का न प्राणाचे भय तुजसी
ऐक रावणा रची कोटि ब्रह्मांडासी। माया पावून जयाचे बळ वदे कपी ।। २
जयाच्या बळे ब्रह्माविष्णुमहेश। करिती उत्पत्तिस्थितिलय हे लंकेश।
जयाच्या प्रतापे धरी सहस्रानन शेष। गिरिकाननासह सकल ब्रह्मांडे ।। ३
जो देवरक्षक धरी विविध देहांस। जो करी उपदेश तुम्हांसम शठास।
भंगिले जयाने कठिण शिवचापास। केले चूर्ण नृपगणगर्वाचे ।। ४
खरदूषणत्रिशिरवाली। वधी सकल अतुलीत बलशाली ।। ५
जयाच्या बललवलेशाने लंकेश। जिंकिले तू सकल चराचरास।
चोरून नेले जयाच्या प्रिय पत्नीस। हे रावणा तयाचाच मी दूत।। २१

तव महान पराक्रम विदित मजसी । युद्ध केले तू सहस्रबाहूसी ।
जय मिळविला युद्ध करून वालीसी । टाळिले कपिवचन रावणाने हसून ।। १
क्षुधा लागता भक्षिले मी फळांसी । कपि स्वभावे तोडीले तरूसी ।
स्वामी परम प्रिय देह सकलांसी । जंव मारू लागती दुष्ट असुर मज ।। २
जे मारिती मजसी वधितो मी तयासी । तव तनये बांधून नेले मजसी ।
बंधनात न मानितो लज्जेसी । करू इच्छितो मी प्रभूचे काज ।। ३
रावणा तुज विनंति कर जोडून । ऐक उपदेश टाकून अभिमान ।
निज कुलाचा विचार करून भ्रम सोडून । भजावे भक्तभयभंजक प्रभूसी ।। ४
जयाच्या भये थरकांप काळासी । जो खाई सुरासुरचराचरांसी ।
तयासंगे न धरावे वैरासी । मी कथितो द्यावे जानकीस माघारी ।। ५
रघुनायकप्रणतपाळ । करुणासिंधु खरारि कृपाळ ।
शरण जाता तुज प्रभु रक्षितील । विसरून तव अपराध ।। २२
धरावे हृदयी रामचरणकमल । करावे लंकेवरी राज्य अचल ।
पुलस्त्य ऋषीचा यशशशि विमल । होऊ नको कलंक त्या शशीस ।। १
न शोभते वाणी रामनामाविण । करी विचार मोहमद सांडून ।
हे सुरारि न शोभे सुंदरी वस्त्रहीन । जरी विभूषित ती भूषणांनी ।। २
रामविन्मुख होता पराक्रम वित्त । असतां नसल्यापरी जरी करिसी प्राप्त ।
जंव झरे न स्रवती सरितेच्या मूळांत । ती सुकते सरिता संपतांच वर्षाऋतू ।।३
ऐक रावणा कथितो प्रतिज्ञा करून । रामविन्मुखासी असे त्राता कोण ।
न करू शकती रामाच्या वैऱ्याचे रक्षण । सहस्र शंकरब्रह्माविष्णुही ।। ४
अति दुःखप्रद मोह जयाचे कारण । सोड तू तो तमरूपी अभिमान ।
भजावे तू श्रीराम भगवान । रघुनायक कृपासिंधू ।। २३
जरी कपीची वाणी अति हितप्रद । भक्तिज्ञानवैराग्ययुक्त ।
महा अभिमानी रावण हसून वदत । मिळाला मज कपि गुरु महाज्ञानी ।। १
हे दुष्टा सन्निध आता तव मरण । हे अधमा करितोस उपदेश म्हणून ।
होईल उलटे म्हणे हनुमान । तव मति भ्रष्ट प्रकट जाणिले मी ।। २
कपिवचने रावण क्रुद्ध बहुत । म्हणे का न घेता मूढाचे प्राण त्वरित ।
हे ऐकून निशाचर मारावया धावत । तोच सचिवासह येई बिभीषण ।। ३
करी बहु विनंति जोडून करास । राजनीतीस विरोध न मारावे दूतास ।
स्वामी करावे अन्य दंडास । वदती सकल हा उपदेश भला ।। ४

मग हास्य करून बोले दशशीर्ष । अंगभंग करून पाठवा वानरास ॥ ५
कपीची अति ममता पुच्छावर । समजावून सांगे सकला दशकंधर ।
तेलयुक्त वस्त्र बांधा सत्वर । मग द्या लावून अग्नि पुच्छास ॥ २४
जंव जाईल वानर पुच्छहीन । तंव मूर्ख निज स्वामीस येईल घेऊन ।
केले जयाचे याने महिमागान । तयाचा प्रताप पाहीन मी ॥ १
कपि हसे मनी ऐकून वचनास । जाणिले सरस्वती सहाय्य तयास ।
ऐकून वचन रावणाचे राक्षस । मूर्ख लागती कार्यास त्वरित ॥ २
संपले नगरांतील घृतवस्त्रतेल । वाढवून पुच्छ कपि करी खेळ ।
हे कौतुक पहाती नगरवासी सकल । लाथा मारून तया करिती उपहास ॥ ३
ढोल वाजविती टाळ्या पिटती । नगरात धिंड काढून पुच्छ पेटविती ।
कपि घेई त्वरित लघुरूप अती । पाहून अग्नि भडकताच ॥ ४
बंधन तोडून चढे तो सुवर्णसौधावरी । तंव भयभीत होती निशाचरनारी ॥ ५
ते अवसरी हरिप्रेरित । नाना विध वाहे मरुत ।
हास्य करून कपिवर गर्जत । वाढता वाढता स्पर्शे गगनास मग ॥ २५
देह विशाल हलका परम परी । धावून चढे प्रति मंदिरी ।
जन विव्हळती जळता नगरी । भयंकर भडकती कोटि ज्वाळा ॥ १
हाय बाप रे आई ग करिती आक्रोश । कोण रक्षील या समयी आम्हास ।
हा आला सुर घेऊन वानरवेष । कपि नसे हा कथिले प्रथम आम्ही ॥ २
साधूंचा अपमान करिता फळ हेच । नगरी अनाथापरी जळे साच ।
जाळिले नगर एकाच निमिषांत । राखिले बिभीषणाचे भवन एक ॥ ३
निर्मिला जयाने अग्नि तयाचा हा दूत । या कारणे न जळाला तो अग्नीत ।
वळून उलट सुलट लंका जाळिली समस्त । घेतली समुद्रात उडी मग तयाने ॥ ४
पुच्छ विझवून घालवी शीण । पुनरपि करी लघुरूप धारण ।
उभा राहिला मग कर जोडून । जनकसुतेच्या सन्मुख ॥ २६
कपि वदे माते दे मज काही खूण । जैसी देती मज रघुनंदन ।
तंव ती देई चूडामणि उतरून । अति हर्षे स्वीकारी पवनसुत ॥ १
हे वत्सा कर निवेदन मम प्रणाम । जरी प्रभु असती संपूर्ण पूर्णकाम ।
दीनदयाळा सांभाळून निज ब्रीद धर्म । नाथा करा दूर मम महान संकट ॥ २
हे तात कर तू जयंतकथाकथन । प्रभूस बाणाचा महिमा सांग समजावून ।
जर नाथ न येतील होताच मास दिन । न मी मिळेन जिवंत तया ॥ ३

सांग कपि आता कैसे राखू प्राण। तूहि कथितो जातो म्हणून।
जाहली छाती शीतल तुज बघून। पुनरपि मज तोच दिन तीच रात्र॥ ४
परोपरी जनकसुतेचे सांत्वन करी। देई तिजसी बहु धीर परी।
शिर ठेवून पदकमलांवरी। कपि करी गमन रामाप्रती॥ २७
करी महा घोर गर्जना जाता। स्रवती गर्भास राक्षसनारी ऐकता।
उल्लंघून सिंधु पार करिता। ऐकवी कपीस किलकिल हर्ष ध्वनी॥ १
हर्षित सकल पाहून हनुमंतास। जणू नवा जन्म लाभला वाटे सकलांस।
बघून मुख प्रसन्न तनुतेजास। जाणती साधले रामकार्य॥ २
अति सुखी होती जंव भेटती सकल। तडफडत्या मीनास जणू मिळे जळ।
निघती पाहण्यास राम घननीळ। हर्षे पुसता कथिता नवल घटना॥ ३
मग जाती सकल मधुवनांत। खाती फळे मधुर देता संमती अंगद।
न स्पर्शावे फळ सांगती रक्षक। पळती तंव होताच मुष्टिप्रहार॥ ४
रक्षक पुकारती जाऊन। युवराज अंगद करी उजाड वन।
हर्षित सुग्रीव ते ऐकून। की साधले कपीने प्रभुकाज॥ २८
जर न पावते सीतेचा समाचार। न करू शकते मधुवनफळआहार।
कपिराज ऐसा करी मनी विचार। तोच कपिवृंदासह येई हनुमंत॥ १
सकल येऊन वंदिती सुग्रीवास। प्रेमे भेटे तयांना कपीश।
पुसता वदतो कुशल देखता पदांस। साधले रामकृपे विशेष कार्य॥ २
नाथा काज साधून हनुमान। वांचवी सकल कपींचे प्राण।
मग भेटे तया सुग्रीव हे परिसून। कपींसह जाती रघुपतिप्रती॥ ३
येताना कपीस राम जंव बघती। कृतकार्ये जाणून मनी हर्ष अती।
उभय भ्राते स्फटिक शिळेवर बैसती। तंव कपि सकल पडती चरणी॥ ४
अति प्रेमे सकलां आलिंगिती। तदा करुणाराशी रघुपती।
प्रभु तयांसी कुशल पुसती। वदती पदकमलदर्शने कुशल नाथा॥ २९
वदे जांबुवंत ऐका रघुराया। जयावरी नाथा तुम्ही दावितां दया।
सुर नर मुनि प्रसन्न तया। तयाचे सदा शुभ कुशल॥ १
तोच विनम्र विजयी गुणसागर। त्रैलोक्यी जयाचे यश प्रकाशे सुंदर।
प्रभुकृपेने जाहली कार्यसिद्धि सुकर। लाभले आज जन्मसाफल्य॥ २
नाथा कार्य करी जे हनुमान। सहस्रमुखेहि न करवे ते वर्णन।
मग पवनतनयाचे चरित्र सुशोभन। निवेदी जांबुवंत रघुपतीसी॥ ३

ऐकतां रुचले कृपानिधींच्या मनास। राम हर्षे धरिती हृदयी हनुमंतास।
सांग कैसी सीता रक्षी निज प्राणास। तात कैसी तेथे राही ती ॥ ४
नामस्मरण आपुले हे रक्षक रात्रंदिन। द्वार हेच आपुले ध्यान।
कुलुपापरी आपुल्या चरणी लोचन। वाट कोणती मग प्राण जाण्यासी ॥ ३०
निघताना दिधला मज हा चूडामणी। लाविला हृदयी घेऊन रघुपतींनी।
हे नाथ मग आणून पाणी दोन्ही नयनी। बोलली जनककुमारी अल्पसे। १
सांगा अनुजासह धरून प्रभुचरण। दीनबंधु शरणागत दुःखहरण।
चरणी रत कायावाचामने करून। कवण दोषास्तव मज त्यजिले ॥ २
मानिते हा मी मम अवगुण। प्रिय पतिविरहाने न गेले प्राण।
नाथा हा अपराध करिती मम नयन। अडविती प्राणास निघू पाहता ॥ ३
विरह हा अग्नि श्वास समीर। जाळतील तनुकापसासी सत्वर।
निज हितास्तव जल स्रवती नेत्र। विरहाग्नीने न जळे देह म्हणून ॥ ४
सीतेचे संकट अति विशाल। न वदणे भले हे दीनदयाळ ॥ ५
हे करुणानिधि सीतेचा क्षणक्षण। भासे तिजसी कल्पासमान।
भुजबळे दुष्टांच्या दलास जिंकून। प्रभो आणावे त्वरित जानकीसी ॥ ३१
सीतेचे दुःख ऐकून दुःखित सुखनिधान। अश्रूंनी पाणावती राजीवनयन।
जी कायावाचामने मजसी शरण। विपत्ति तिज स्वप्नीहि कैसी ग्रासील ॥ १
विपत्ति तीच म्हणावी वदे हनुमान। जंव न घडेल तुमचे भजन स्मरण।
काय कथा निशाचरांची हे दयाघन। आणाल जानकीस जिंकून रिपू ॥ २
ऐक हे कपि तुजसम उपकारी। नसे कोणी सुरमुनीत तनुधारी।
कैसा फेडू आता तव उपकार परी। विचार करूनहि न कळे मज ॥ ३
ऐक हे वत्सा न होई मी ऋणमुक्त। पाहिले बहु विचार करून मनात।
सुरत्राता कपीस वारंवार विलोकीत। पुलकित गात्रे तयांची प्रेमाश्रु नयनी ॥ ४
प्रभूचे ऐकून वचन। तयांचे प्रसन्न मुख हर्षित पाहून।
पडे पाया प्रेमाकुल हनुमंत वदून। रक्ष रक्ष मजसी भगवंता ॥ ३२
वारंवार प्रभु तया उठवू पाहत। परि प्रेमे तल्लीन न उठू इच्छित।
कपिमस्तकावरी प्रभूचा कमलहस्त। स्मरताच ती स्थिति शंकर प्रेममग्न ॥ १
मन सावधान करून मग शंकर। सांगू लागती कथा अति सुंदर।
हृदयी धरिती कपीस रघुवीर। बैसविती समीप करास धरून ॥ २

सांग हे कपि रावणरक्षित लंका । दुर्गम दुर्ग जाळलेस कैसे हनुमंता ।
बघून प्रभूच्या प्रसन्न चित्ता । वदला कपि सोडून अभिमान ।। ३
वानराचा पुरुषार्थ हाच महान । उड्या मारणे फांदीफांदीवरून ।
कनकपूर जाळिले सिंधु उल्लंघून । वधून निशाचरा वन केले उद्ध्वस्त ।। ४
हा सकल प्रताप तुमचा श्रीराम । नाथ नसे यात काही मम पराक्रम ।। ५
जयासी हे प्रभो तुम्ही अनुकूल । काज तयाचे सदा सफल ।
तुमच्या प्रतापे कापूस जाळील । निश्चित वडवानलासही ।। ३३
नाथा द्या भक्ति अति सुखदायिनी । कृपा करून निश्चल अनपायनी ।
परम सरळ ऐकून कपीची वाणी । हे भवानी एवमस्तु प्रभु वदती ।। १
उमे जयाने जाणिला रामाचा स्वभाव । भजनाविण तया मनी न अन्य भाव ।
जया मनी या संवादाची जाणीव । तो रघुपतिचरणी भक्ति पावेल ।। २
प्रभुवचन ऐकून वदती कपिवृंद । जय जय जय हे कृपाळु सुखकंद ।
गमनसिद्धता आता करा त्वरित । कपिपतीस बोलावून कथिती श्रीराम ।। ३
आता काय कारण विलंबासी । द्यावी आज्ञा शीघ्र कपीसी ।
सुर कौतुक पाहून वर्षती सुमनांसी । नभातून भवनी जाती अति हर्षे ।। ४
बोलावी कपीस कपिपति सत्वर । येती तंव सेनानायकनिकर ।
अतुलित बलवान ऋक्ष वानर । दल तयांचे नाना वर्णांचे ।। ३४
प्रभुपदकमली मस्तक नमवून । गर्जती कपिअस्वल बलवान ।
राम राजीवनयन कपिसेना पाहून । फेकिती कृपादृष्टि सकलांवरी ।। १
रामकृपेचे बळ मिळविती कपींद्र । जणु पंखयुक्त दिसती गिरींद्र ।
होती नाना शकुन शुभ सुंदर । जंव आनंदे प्रयाण करिती श्रीराम ।। २
सकल मंगलाने पूर्ण जयाची कीर्ती । तयाच्या प्रयाणकाळी शकुन ही नीती ।
जाणिले वैदेहीने प्रभु प्रयाण करिती । वाम अंगे स्फुरून कथिती जणू ।। ३
जे जे शुभ शकुन होती जानकीस । ते ते अपशकुन रावणास ।
चालली सेना न करवे वर्णनास । गर्जती अस्वल वानर अपार ।। ४
नखे जयांची शस्त्रे जे गिरितरु धरिती । ते इच्छाचारी मही गगनी जाती ।
सिंहापरी ऋक्ष वानर नाद करिती । तंव दिग्गज थरथरती करिती चीत्कार ।। ५
कंप पर्वतास । खवळे सागर । दिग्गज चीत्कार । डोले मही ।
मनात हर्षित । मुनिनागसुर । गंधर्व किन्नर । दुःख टळे ।
बहु कोटि कोटी । विकट मर्कट । नादे कटकट । धावतात ।
प्रबळ प्रताप । कोशलनाथाचा । श्रीराम गुणांचा । जयघोष ।। १

साहवेना भार । सेनेचा शेषास । घाबरे विशेष । घडीघडी ।
तीक्ष्ण दर्शनाने । धरी वारंवार । पाठ ती कठोर । कच्छपाची ।
श्रीराम सुंदर । प्रयाण स्थितीची । सुशोभन साची । जाणूनीया ।।
कासवाच्या पाठी । निश्चल पवित्र । शेष तो उदार । नोंद करी ।। २

यापरी करिती प्रयाण । सागरतीरी येती कृपानिधान ।
फळे भक्षिती सर्वत्र जाऊन । विपुल रीस वीर कपी ।। ३५
तिकडे लंकेत भयभीत निशाचरगण । जंव गेला कपि लंका जाळून ।
कैसे करावे असुरकुळाचे रक्षण । करिती विचार निज निज गृही ।। १
जयाच्या दूताचे बळ वर्णनातीत । काय दशा होईल तो स्वये येता लंकेत ।
ऐकून मंदोदरी अधिक व्यथित । दूतमुखे वचन नगरजनांचे ।। २
एकांती पतिपदी पडे कर जोडून । बोले वचन राजनीतिरसपूर्ण ।
हे कांत श्रीहरिसंगे वैर सोडून । धरावे हृदयी मम हितवचन ।। ३
समजताच जयाच्या दूताची करणी । स्रवती गर्भ निशाचरगृहिणी ।
रामाची पत्नी निज सचिवास बोलावुनी । पाठवा प्रियकरा जर इच्छिता हित ।।४
दुःखद आपुल्या कुळकमलवनास । आली सीता शीत निशासदृश ।
प्रियकरा जर सीता न द्याल रामास । शंभुब्रह्माहि न करिती हित आपुले ।।५
असती सर्पगणासम रामाचे बाण । दिसती निशाचरनिकर भेकासमान ।
सोडून हट्टास करावा यत्न । जोवरी न ग्रासती ते निशाचरा ।। ३६
तो दुष्ट विदित जगा जयाचा अभिमान । हसून श्रवण करी ते वचन ।
मग वदे भित्रा नारीस्वभाव सत्य जाण । तव भित्रे मन कल्याणात भय वाटे।। १
जंव येईल वानरांचे दल । बिचारे राक्षस तयां खाऊन जगतील ।
जयाचे भये थरथरती लोकपाल । तयाची पत्नी पाहता भ्याड होईल हसे ।।२
तिज हृदयी धरी ऐसे वदून हसत । मग जाई सभेस दावून प्रेम अधिक ।
मंदोदरी करी चिंता चित्तात । दैव दिसते पतीसी प्रतिकूल ।। ३
सभेत बसता पावे समाचार । जाहली रिपूची सेना सिंधुपार ।
पुसे सचिवा सांगा उचित मतविचार । हसून बोलती सकल राहावे निश्चित ।।४
न जाहले श्रम जिंकिता सुरासुरांस । हे तर नरवानर मानिता कशास ।। ५
सचिव वैद्य गुरू हे तीन । भयलोभे वदता प्रिय वचन ।
शीघ्र नाश होईल जाण । राज्यतनुधर्म या तिहींचा ।। ३७

तीच गति लाधली रावणास । वारंवार ऐकविती स्तुती तयास ।
बिभीषण येई त्या समयास । मस्तक नमवी बंधुचरणी ।। १
बैसे निज आसनी पुन्हा वंदून । बोले वचन आज्ञा घेऊन ।
हे कृपाळु तू पुसले म्हणून । तात सांगतो तव हित यथामती ।। २
जो इच्छी निज कल्याणा । सुयश सुमति शुभगति सुख नाना ।
स्वामी तो न देखे परस्त्रीचे आनना । जैसे जन चुकविती चतुर्थीचा चंद्र ।। ३
चतुर्दश भुवनांचा एक स्वामी असून । होई नष्ट तो भूतद्रोह करून ।
असता नर चतुर गुणसंपन्न । अल्प लोभेहि भला न म्हणे कुणी तया ।। ४
कामक्रोधमद हे नाथ । असती सकल नरकाचे पंथ ।
सकलांस सोडून भज तू रघुनाथ । जयासी संत भजतात ।। ३८
राम नसे नर भूपाळ हे तात । भुवनांचा ईश्वर तो काळाचा काळ अनंत ।
ब्रह्म निरामय अजन्म भगवंत । व्यापक अनादि अजेय ।। १
गोद्विजधेनुहितकारी । कृपासिंधु मानवतनुधारी ।
भक्तरंजक खलसमूह नाश करी । वेदधर्मरक्षक ऐक हे बंधो ।। २
वैर सोडून नमवावे मस्तकास । शरणागत दुःखभंजक रघुनाथास ।
द्यावी वैदेही हे नाथ प्रभूस । भजावे त्या रामा स्वामी प्रेमळ निर्हेतुक ।। ३
शरण जाता प्रभु न सोडी तयास । विश्ववैराचे पातक जरी जयास ।
जयाचे नाम घेता होतो तापत्रय नाश । रावण तोच तनुरूपे प्रकट जाण ।।
करितो विनंति हे दशशीर्ष । वारंवार धरून चरणास ।
सोड आता मोहमदमानास । भज कोशलाधीश राम ।। ३९ क
मुनि पुलस्त्य पाठविती निज शिष्यास । कथून हीच वार्ता तयास ।
तीच आता निवेदितो प्रभूस । हा सुअवसर जाणून तात ।। ३९ ख
माल्यवंत सजिव सुजाण । अति सुख मानी तयाचे वचन ऐकून ।
म्हणे तात तव अनुज नीतिनिपुण । बिभीषणे कथिले ते हृदयी धरी ।। १
रिपु महिमा सांगती हे शठ दोन्ही । वदे रावण दूर करा का येथे न कोणी ।
मग बोले बिभीषण कर जोडूनी । निज गृहासी जाई माल्यवंत ।। २
सुमति कुमति वसे सकल हृदयात । सांगती वेदपुराण हेच नाथ ।।
जेथे सुमति तेथे नाना संपति वसत । जेथे कुमति विपत्ति अंती तेथे ।। ३
तव हृदयी दुर्बुद्धि वसे विपरीत । मानिसी मित्रास शत्रु हितास अनहित ।
जी निशाचर कुळासी काळरात्र भासत । त्या सीतेवरी तव अति प्रीती ।। ४

करितो विनंती धरून तव चरण । पुरवावे मम लाड रावणा आपण ।
करावी सीता रामासी अर्पण । तयांतच मानावे निज हित ।। ४०
पंडितपुराणश्रुतिसंमत हे वचन । ऐसी नीति वर्णून सांगें बिभीषण ।
ऐकून क्रोधे उठला दशानन । म्हणे हे दुष्टा जाण तव मृत्यू निकट ।। १
मूर्खा जगविले मी म्हणून जगसी । रे मूढा रुचतो रिपुपक्ष तुजसी ।
दुष्टा कोण जगी ऐसा सांग मजसी । भुजबळे जया न जिंकिले मी ।। २
त्या तपस्व्यावर प्रीति मम नगरीत राहून । शठा सांग नीति तयाप्रती जाऊन।
मग लत्ताप्रहार करी ऐसे वदून । परि पद धरी बिभीषण पुन्हा पुन्हा ।। ३
हे उमे असते यातच संताचे थोरपण । अहितकर्त्याचे करिती ते कल्याण ।
मारिले मज भले पित्यासमान आपण । नाथा रामभजनीच हित आपुले ।। ४
सचिवासंगे गगनपथी जाऊन । ऐकवी सकला बिभीषण ऐसे वदून ।। ५
सत्यसंकल्प प्रभु रघुनंदन । कालवश तव सभेतील जन ।
रावण आता मी रघुवीरास शरण । न द्यावे दूषण मज कदापी ।। ४१
जंव निघाला बिभीषण ऐसे वदुनी । असुर जाहले आयुष्यहीन तेच क्षणी ।
होता साधूंचा अवमान हे भवानी । होई कल्याणनाश शीघ्र संपूर्ण ।। १
जंव त्यजी रावणास बिभीषण । तंव अभागी रावण जाहला वैभवहीन ।
मग रघुपतिपाशी जाई हर्षित होऊन । करी अनेक मनोरथ मनी ।। २
पाहीन जाऊन चरणकमलास । जे अरुण मृदु सुखद सेवकास ।
निज पदस्पर्शे उद्धरती ऋषिपत्नीस । करिती पावन दंडक वन ।। ३
जे पद जनकसुता हृदयाशी धरी । धावती कपटमृगासंगे महीवरी ।
जे पदसरोज शोभती हरहृदयसरी । ते पाहीन धन्य भाग्यवान मी ।। ४
ज्या चरणपादुकांमाजी भरत । मन लावून होई अनुरक्त ।
आज जाऊन विलोकीन ते पद । प्रत्यक्ष मम नयनांनी ह्या ।। ४२
ऐसा प्रेमळ मने करी विचार । तोच पोचे तो शीघ्र सिंधुपार ।
बिभीषण येता बघती वानर । वाटे तया शत्रूचा दूत विशेष कोणी ।। १
तया थांबवून सुग्रीवाप्रति येती । सकल वार्ता तयासी कथिती ।
वदे सुग्रीव ऐका हो रघुपती । आला दशाननाचा बंधु मीलनासी ।। २
काय वाटते मित्रा प्रभु वदती । म्हणे कपीश ऐका हो नृपती ।
नाकळे निशाचरमाया ती । न जाणे का आला हा कामरूप ।। ३

ह्या मूर्ख गुप्त वार्ता घेऊ इच्छित । ठेवावे बांधून ऐसे मम मत ।
वदती राम हे मित्रा तव नीति उचित । शरणागतासी अभय पण मम हा ।। ४
ऐकून प्रभूचे वचन हर्षित हनुमान । म्हणे शरणागतवत्सल भगवान ।। ५
जे दूर करिती शरणांगतास । जाणून आपुले अनहितास ।
होई पापबाधा वधता त्या नरास । तो पामर पापमय निश्चित ।। ४३
कोटि विप्रवधाचे पाप जयास । तो येता शरण न दूर सारावे तयास ।
होई जन्मकोटि पातकांचा नाश । जंव जीव येई मज शरण ।। १
पापवंताचा मूळ स्वभाव हाच । मम भजन न रुचे तया कधीच ।
जर असता तो हृदयाचा दुष्ट साच । येईल का मम सन्मुख तो ।। २
जयाचे मन निर्मळ पावे मी तयासी । कपटछलछिद्र न रुचे मजसी ।
जरी रावण पाठवी जाणाया गुप्त वार्तेसी । नसे भय वा हानि आपणा हे सुग्रीवा ।। ३
मित्रा जितुके असुर असती जगतात । करील निःपात तयाचा लक्ष्मण क्षणात ।
परि येई शरण जो होऊन भयभीत । रक्षीन मी मम प्राणासम तया ।। ४
आणावे तया असता उभय स्थितीत । हसून वदले कृपानिकेत ।
मग कपिवृंद अंगद मारुतिसहित । चालले वदून जय कृपाळु श्रीराम ।। ४४
आदरे बिभीषणास पुढे घालून वानर । आले जेथे होते रघुपति करुणाकर ।
दिसले उभय भ्राते उभे दूर । देणारे आनंददान नेत्रांस ।। १
मग विलोकी तो रामाचे लावण्यनिधान । न हाले पापणी तयाची बघे रोखून ।
भुज विशाल अरुणकमलासम लोचन । श्यामल शरीर प्रणत भयमोचक ।। २
सिंहापरी स्कंध विशाल उर सुशोभन । अमित मदनमनास मोहवी आनन ।
पुलकित गात्रे प्रेमाश्रुपूर्ण नयन । धीर धरून मग मृदु वचन वदे ।। ३
नाथा दशाननाचा मी भ्राता । निशाचरवंशी मम जन्म हे सुरत्राता ।
तामस देह प्रिय पाप मज सदा । जैसे अंधारावरी घुबडाचे प्रेम ।। ४
आलो तुमची सुकीर्ति ऐकून । की प्रभु करिती भवभयहरण ।
दुःखित दुःखभंजक करा मम रक्षण । शरणागतासी सुखद हे रघुवीर ।। ४५
ऐसे वदून घाली तो दंडवत । बघून प्रभु हर्षे उठती त्वरित ।
ऐकून दीन वचन प्रभु संतोषित । विशाल भुजे धरिती हृदयी तया ।। १
बैसवती समीप अनुजासह भेटून । भक्तभयभंजक मग वदती वचन ।
कुस्थळी तव निवास हे बिभीषण । सांग सपरिवार कुशल ना लंकेश ।। २

निशिदिनी दुष्टसमूहात तव वास । मित्रा कैसा सांभाळितो निज धर्मास ।
जाणतो मी तव रीतिव्यवहारास । तू नीतिनिपुण तुज न रुचे अनीती ।। ३
भला नरकवास हे ताता । न देवो दुष्टांची संगत मज विधाता ।
हे रघुराया पददर्शने कुशल आता । दया दाविली निज दास जाणून ।। ४
नसे तोवरी कुशल जीवास । न स्वप्नीहि शांति मनास ।
जोवरी न भजे जीव रामास । सांडून विषयवासना शोकमूळ ।। ४६
हृदयी वसती नाना दुष्ट कुविकार । लोभ मोह मद मान मत्सर ।।
जोवरी चित्तीं न वसती रघुवीर । चापसायकधारीकटी भाता ।।
ममतारात्र असे घन अंधारी । रागद्वेषरूपी घुबडास सुखकारी । १
ती रात्र वसे जीवाच्या मनात तोवरी । जोवरी न उगवे प्रभुप्रतापरवी २
मम भवभय नष्ट मी आता कुशल । श्रीरामा पाहून आपुले पदकमल ।
तुम्ही कृपाळु जयासी असता अनुकूल । न बाधे तया त्रिविध ताप ।। ३
अति अधम मी स्वभावे राक्षस । न केले कधी मी शुभ आचरणास ।
मुनि न आणिती ध्यानी ज्या रूपास । धरती मज हृदयी हर्षे ते प्रभु स्वये ।।४
जाणतो मी अमित सुभाग्य निज । हे रामा कृपा सुखपुंज ।
देखिले नयनी हे युगुल पदपंकज । सेवनीय जे ब्रह्माशिव यांस ।। ४७
ऐक सखया कथितो निज स्वभावाते । वदती राम जो ज्ञात भुशुंडिशंभुउमेते ।
जंव नर दावी चराचर द्रोहाते । परि सभय मज शरण येताच ।। १
जर तो सोडील मद मोह कपटछल । साधुसमान करीन मी तया तात्काळ ।
मातापिताबंधुदारासुत सकल । तनुधनभवनमित्रपरिवार ।। २
सकल ममतारूपी धागे जमवुनी । वळून दोरी जो बांधी मम चरणी ।
समदर्शी जया काही इच्छा न मनी । नसे हर्ष वा शोभकय ।। ३
वसे कैसा मम हृदयात असा सज्जन । जैसे लोभी हृदयात वसे धन ।
प्रिय मजसी संत तुज समान । अन्य प्रार्थिता न धरी कृपावश देह ।। ४
जो सगुण भगवंताचा उपासक । जयाचे नीतिनेम दृढ जो परहिती रत ।
जो द्विजचरणी प्रेम करीत । तो नर प्राणासमान मज ।। ४८
ऐक लंकेशा तव ठायी हे सर्वगुण । अति प्रिय मजसी तू म्हणून ।
रामाचे वचन परिसती वानरगण । वदती जय जय कृपानिधान राम ।। १
ऐके बिभीषण प्रभूच्या वाणीस । श्रवणामृत जाणून न तृप्ति तयास ।
वारंवार धरी रामाच्या पदांबुजास । अपार प्रेम ते हृदयी समावेना ।। २

हे चराचर स्वामी प्रणतपालरक्षक । देवा ऐका सर्वांतर ज्ञानी व्यापक ।
होत्या वासना प्रथम काही एक । गेल्या वाहून प्रभुपदप्रीतिसरितेत ।। ३
आता हे कृपाळु निज पावनी भक्ती । द्यावी शिवमनास सदा रुचे जी ।
एवमस्तु प्रभु रणधीर वदती । वेगे मग मागविती सिंधुतीर । ४
मित्रा जरी ऐसी न इच्छा तव मनात । मम दर्शन न निष्फळ होई जगात ।
ऐसे वदून लाविती राम तया तिलक । तो झाली अपारवृष्टि नभातुनी ।। ५
अग्निसमान रावणाचा क्रोध । अनुजश्वाससमीरे होई तो प्रक्षुब्ध ।
जळत असता बिभीषण प्रभु रक्षीत । दिधले अखंड राज्य तया ।। ४९ (क)
रावण बळी देताच निज दशशीर्ष । शिवे जी संपत्ति दिधली तयास ।
तीच संपत्ति बिभीषणास । अर्पिती अति संकोचे रघुनाथ ।। ४९ (ख)
जे भजती अन्यायास ऐशा प्रभूस सोडून । ते नर पशु पुच्छविषाणहीन ।
केला आपुला जाणून भक्तजन । कपिमनास रुचला प्रभूचा स्वभाव ।। १
मग सर्वज्ञ सर्वांतरवासी । सर्वरूप सर्वरहित उदासी ।
मनुज होऊन घातक दैत्यकुळासी । वदती नीतीचे पालक श्रीराम ।। २
ऐका हे कपीश लंकापति वीर । कैसा पार करावा जलधी गभीर ।
असती तयात अनेक सर्पमीनमकर । अति अगाध दुस्तर सर्वपरी ।। ३
वदे बिभीषण परिसा हो रघुनायक । आपुले बाण असती कोटिसिंधु शोषक ।
तदपि नीति ऐसी सांगे निश्चित । करावी प्रार्थना प्रथम सागराची ।। ४
प्रभो आपुला कुलगुरु सागर । उपाय कथील तो करून विचार ।
विना प्रयास करितील सिंधु पार । सकल अस्वलकपिसेना ।। ५०
मित्रा कथिले उत्तम उपायास । करावे तैसे जर दैव येईल सहाय्यास ।
उपदेश न रुचला लक्ष्मणाचे मनास । जाहला दुःखी ऐकून रामवचन ।। १
वदे लक्ष्मण काय नाथा दैवाचा भरंवसा । शोषावा सिंधु आता दावून रोषा ।
वाटे दैव आधार भ्याड मानसा । पुकारती आळशी दैव दैव ।। २
ऐकता हसून वदती रघुवीर । करीन ऐसे मी मनी धीर धर ।
मग जाती प्रभु सिंधुतीरावर । ऐसे समजावून अनुजास ।। ३
प्रथम प्रणाम करिती शिर नमवून । मग बैसती तटी दर्भासन घालून ।
आला जंव प्रभूपाशी बिभीषण । पाठवी रावण दूतास तेच समयी ।। ४
घेती ते कपटे कपिदेहास । देखती तेथील सकल चरितास ।
स्तविती हृदयी प्रभूच्या गुणास । शरणागतावरील प्रभुप्रेमास तैसे ।। ५१

रामस्वभावास प्रेमे प्रकट वानिती । निज कपट वेषास विसरती ।
तंव कपि शत्रूच्या दूतास ओळखती । आणती सुग्रीवापाशी बांधून तया ॥ १
मग वदे सुग्रीव ऐका हो वानर । विद्रूप करून पाठवा निशाचर ।
धावती कपि ऐकून कपीशाचे उद्‌गार । बांधून काढती धिंड सेनेत ॥ २
बहु प्रकारे मारिती कपि दूतास । विनविती ते दीन परि न सोडिती तयास ।
जे कापतील आमुच्या नासिकाकानास । शपथ तया कोशलपती रामाची ॥ ३
आक्रोश ऐकून निकट बोलावी लक्ष्मण । सोडवी सदय त्वरित तया हसून ।
म्हणे सांगा रावणाहाती पत्रिका देऊन । कुलघातका वाच संदेश लक्ष्मणाचा ॥४
मग सांगावे त्या मूर्खास । तुज हितप्रद मम संदेश ।
सीतेस माघारी देऊन भेटावे रामास । न तो जाण तव काळ आला समीप।५२
त्वरित ठेवून लक्ष्मणपदी माथा । चालले दूत वर्णन करीत गुण गाथा ।
जाती लंकेसी रामाचे यश कथिता । नमविती शिर रावणचरणी ॥ १
विहसून दशानन पुसे वृत्त । कां न कथिसी तव कुशल हे शुक ।
सांग बिभीषणाचा संदेश त्वरित । जयाच्या अति निकट आला असे मृत्यू ॥२
मूर्ख करिता राज्य लंकेसी सोडीत । जाहला अभागी जणू यवकीटक ।
कैसे आहे ते अस्वलकपिकटक । कठिण काळे प्रेरित येई चालून ॥ ३
होई जयांचा जीवनरक्षक । सिंधु बिचारा मृदुल चित्त ।
निवेदी आता मज तपस्व्यांचे वृत्त । जयाच्या हृदयी मम भय ॥ ४
जाहली का तयांची भेट । वा मम सुयश ऐकून गेले परत ।
दिसे मज भयभीत तव चित्त । का न सांगसी रिपुदलबलतेज ॥ ५३
नाथा जैसे पुसले कृपाकरून । आता ऐकावे वचन क्रोध टाकून ।
भेटता रामास अनुज बिभीषण । राज्यतिलक तयास करिती ते ॥ १
आम्ही रावणदूत पडताच कानी । नाना दुःखे कपि देती आम्हा बांधुनी ।
रामशपथ घालता देती सोडुनी । जंव कापू लागती आमुचे नाककान ॥ २
पुसता नाथा रामसेनेचें वृत्त । न वर्ण शकती तया मुखे कोटिशत ।
नाना वर्णाचे अस्वल कपिसेनेत । भयानक आनन विशाल शरीर ॥ ३
जो जाळी लंका वधी तव सुत । बळ अल्प तया सकल कपिवीरांत ।
नामे असंख्य असती अतिविक्राळ भट । महाविशाल जया अमित हत्तीचे बळ ४
नील द्विविद मयंद । विकटास्य नल अंगद ।
दधिमुख केसरी जांबुवंत । शठ निशठ गद सकल बलराशी ॥ ५४

हे सकल कपि शूर सुग्रीवासमान । ऐसे कोटचवधि कोण करील गणन ।
श्रीराम कृपेने अतुलित बलवान । त्रैलौक्यास मानिती तुच्छ तृणासम ।। १
ऐसे ऐकिले मी हे दशकंधर । अठरा पद्म सेनापतिवानर ।
नसे सेनेत एकहि कपिवीर । जो न तुम्हा रणी जिंकील ।। २
परम क्रोधे सकल चोळती हात । परि आज्ञा न देती रघुनाथ ।
करू शुष्क सिंधु सर्पमीनासहित । भरून काढू तो विशाल पर्वतांनी ।। ३
धुळीत मिळवू रावणास रगडून । बोलती सकल कपि ऐसे वचन ।
निर्भये इशारा देती गर्जून । जणू गिळू इच्छिती लंकेसी ।। ४
कपि अस्वल सहज परम शूर । तयांच्या शिरावर राम सर्वेश्वर ।
हे रावणा ते समरांगणावर । जिंकू शकतील कोटचवधि काळासी ।। ५५
रामाचे तेजबल बुद्धी अमित । सहस्रशत शेष न गाऊ शकत ।
एक रामशर शोषील सागरशत । परि नीतिनिपुण राम पुसती बंधूस ।। १
ऐकून बंधूचे वचन सिंधूपाशी । मागती राम अति कृपाळू मने पंथासी ।
दशानन विहसे ऐकून वचनासी । म्हणे ऐसी नीति यास्तव कपि सहाय्य ।। २
स्वभावे भीरू बिभीषणाचे मानिले वचन । सागरापाशी मांडिले ठाण ।
शत्रूची वल बुद्धिसीमा मी आहे जाणून । मूर्खा वृथा महिमा का गासी ।। ३
बिभीषणासम भ्याड सचिव जयास । कैसे लाभे विजय वैभव तयास ।
ऐकून खलाचे वचन वाढे दूतांचा रोष । काढिती पत्रिका समय साधून ।। ४
ही पत्रिका देई रामानुज लक्ष्मण । करावे शांत चित्त ते वाचून ।
हसून वामकरी घेई ती रावण । सचिवाकरवी मूर्ख घेई वाचवून ।। ५
रे मूर्खा का रमविसी मन वल्गनेत । नको घेऊ करून कुळाचा घात ।
रामासी विरोध करता न राहसी जिवंत । जरी जासी शरण विष्णुअजा शिवास
न तो त्यजून अभिमान अनुजासम । भृंगापरी प्रभुपदपंकजी धरी प्रेम ।
वा पतंगापरी रामशरअग्नीत हे अधम । हो तू नष्ट निज परिवारासह ।। ५६ ख
ऐकता सभय मनी परि सस्मित वदन । ऐकवी सकलां वदून दशानन ।
जैसा पडणारा महीवर धरू पाही गगन । ऐसा वाग्विलास लघु तापसाचा ।।
म्हणे शुक नाथा हे सत्य वचन । जाणून सोडा सहज अभिमान ।
ऐका मम वचन क्रोध टाकून । नाथा नका करू विरोध रामाला ।। २
स्वभाव रघुवीराचा अति कोमल । जरी असती ते अखिल लोकपाल ।
भेटता प्रभूस कृपा करितील । न राखतील हृदयी अपराध तव ।। ३

द्यावी जनक सुता रघुनाथास । मानावे या मम विनंतीस ।
जंव शुक म्हणे द्यावी वैदेहीस । तंव लत्ताप्रहार करी तो दुष्ट दूतास ।। ४
चरणी शिर ठेवून तो जाई जेथे । होते कृपासिंधु रघुनायक तेथे ।
प्रणाम करून निवेदी निज वृत्ताते । मग पावला निजस्वरूप रामकृपे ।। ५
ऋषि अगस्तीच्या शापे हे भवानी । जाहला तो राक्षस ज्ञानी मुनी ।
रामपदास वारंवार वंदुनी । गेला शुकमुनी निज-आश्रमी ।। ६
जड जलधि न मानी विनंती । ऐसे दिन तीन निघून जाती ।
तंव राम अति क्रोधे वदती । भीतीवाचून प्रीति न जडे ।। ५७
ये घेऊन लक्ष्मणा धनुष्य बाणास । शोषतो सागर आता सोडून बाणाग्नीस ।
कुटिलावर प्रीति विनय शठासी । सहज कृपणास नीती उपदेश सुंदर ।। १
ममतेठायी प्रेम ज्ञानकथन तयास । विरक्तीचे वर्णन अति लोभ्यास ।
शांति क्रोध्यासी हरिकथा कामीजनास । हे निष्फळ जैसे पेरून बीज उखरी ।।२
ऐसे वदून राघव चाप चढविती । लक्ष्मणमनास हे रुचले अती ।
मग तीक्ष्ण बाणसंधान प्रभु करिती । उठती ज्वाला उदधीच्या उदरी ।। ३
मीनमगरउरगगण अति व्यथित । जंव जंतु जळती तंव जलनिधि जाणत
अभिमान सोडून विप्ररूपे येत । नानारत्ने भरून कनक तबकी ।। ४
करा कोटि उपाय घाला जल कदलीस । परि कापताच ती येई फळास ।
विनये न वळे नीच हे खगेश । नमतो नीच धाकानेच ।। ५८
सभय सिंधु धरी प्रभूचे चरण । म्हणे नाथा क्षमस्व मम अवगुण ।
पृथ्वी आप तेज वायु गगन । स्वामी कृति तयांची सहज मंद ।। १
आपुल्या मायाप्रेरित निर्मित पंचभूत । सृष्टि हेतुस्तव सकल ग्रंथ गात ।
प्रभु जैसे जया आज्ञापित । वागून तैसे ते होती सुखी २
प्रभु केले मम भले देऊन शासनास । दिधली मर्यादा आपण जीवास ।
हे सकल अधिकारी उचित ताडनास । ढोल गांवढळ पशु शुद्र नारी ।। ३
प्रभूच्या प्रतापाने मी होईन शुष्क । न ही मम महती उतरेल पार कटक ।
प्रभूची आज्ञा अभंग ऐसें गाती वेद । करीन मी सत्वर आपणा रुचेल ते ।। ४
ऐकून सिंधूचे दीन वचन । बोलती कृपाळु प्रभु हसून ।
तात ऐसा उपाय करी कथन । जेणें कपिदल उतरेल पैल तीरी ।। ५९
नाथ नीलनल दोन कपिबंधूस । ऋषि बालपणी देति आशीर्वादास ।

स्पर्श करिताच ते प्रचंड गिरीस । तव प्रतापे गिरि तरतील जलावरी ।। १
हृदयी धरून प्रभुची प्रभूता । यथाबल करीन मी सहाय्यता ।
बांधावे उदधीस ऐसे नाथा । जेणे त्रैलोक्य हे यश गाईल ।। २
याच शरे मम उत्तरतटवासी । वधावे नाथा ते खल पापराशी ।
निवारिती कृपाळुसिंधूचे मनोव्यथेसी । त्वरित राम रणधीर हरी ।। ३
पाहून रामाचे बळ पौरुष । उदधीस वाटे अति सुख हर्ष ।
निवेदून सकल दुष्टांचे चरित्र प्रभूस । निघाला पयोनिधि चरणा वंदून ।। ४

गेला जलनिधी । निज भवनास । रुचला रामास । मंत्र त्याचा ।
रामगुणगण । संशयशामक । विषादभंजक । सुखनिधी ।
आशा भरंवसा । सोडून गा ऐक । सद्‌गुण संतत । मूढ मना ।
तुलसीचा दास । गाई हे चरित्र । कलिमलहर । यथामती ।। १

सकल सुमंगलप्रदान । असे रघुनायकाचे गुणगान ।
आदरे तयाचे जे करितील श्रवण । भवसिंधु तरतील ते विना नौका ।। ६०

।। कलियुगातील संपूर्ण पापांचा नाश करणारा
श्रीरामचरितमानसाचा पाचवा सोपान समाप्त ।।

(सुंदरकांड समाप्त)

षष्ठ सोपान-लंकाकांड

काळगजा सिंह । भवभय हारी । सेवित कामारी । प्रभुरामा ।
योगींद्र ज्ञानगम्य । अजित निर्गुण । गुणांचे निधान । निर्विकार ।
देवांचाहि देव । विप्रांचे दैवत । खलवधी रत । मायातीत ।
तनुमेघश्याम । सरसिजनेत्र । भूपरूपी सुर । वंदितो मी ।। १

शंखइंदुकांती । सुंदर शरीर । व्याघ्र चर्मांबर । तनूवरी ।
गंगाशशिप्रिय । करीत धारण । भयाण भूषण । काळ सर्प ।
हितकल्पवृक्ष । काशीपति ईश । कलीचे कल्मष । दूर सारी ।
जाळी मदनासी । गुणांचे निधान । गिरिजारमण । वंदितो मी ।। २

देई मोक्ष धाम । दुर्लभ संतासी । शासन खलासी । करीतसे ।
तोच हा शंकर । सदा हितकर । कल्याणविस्तार । करो माझ्या ।। ३

लव निमेष परमाणु युग वर्ष । कल्पासह जयाचे हे बाण तीक्ष्ण विशेष ।
रे मना कां न भजसी त्या रामास । काळ जयाचे धनुष्य ।। ४
श्रीराम सागराचे वचन ऐकून । वदती सचिवांसी बोलावून ।
विलंबाचे आता काय कारण । सेना पार जाण्यास सेतु रचा ।।
कर जोडून वदे जांबुवंत । हे भानुकुल केतुनाथ ।
नर भवसागर पार करतात । चढून तव नामसेतूवरी ।।
तरून जाऊ हा लघु जलधि त्वरित । ऐसे परिसून वदे हनुमंत ।
पयोनिधीचे जळ प्रथम करावे शुष्क । प्रभुप्रतापरूपी प्रचंड वडवानले ।। १

तंव रिपुपत्नींच्या रोदनजलधारा । पुनरपि सागरी भरून होत तो खारा ।
हर्षे कपि बघती रघुवीरा । ऐकून हनुमंताची अतिशयोक्ती ।। २
बोलावी जांबुवंत नलनीलास । कथिले वर्तमान त्या उभय बंधूंस ।
बांधा सेतु न होतील प्रयास । करता मनी स्मरण रामप्रतापाचे ।। ३

मग बोलावी वानरगणास । वदे ऐका हो मम विनंतीस ।
धरून हृदयी रामपदपंकजास । दाखवा एकच लीला ऋक्षकपि मिळून ॥ ४
धावा हो विक्राळ मर्कटगण । आणा अनेक गिरि तरू उपटून ।
निघाले कपि अस्वल हां हूं हुंकार देऊन । रघुवीरप्रतापाचा करितो जयघोष ॥ ५
शैलवृक्षउत्तुंग अती । लीलया तयासी उचलून घेती ।
आणून नलनीलासी देती । रचती सेतु सिंधुवरी नलनील ॥ १
कपि आणती शैल विशाल । कंदुकापरी झेलती नलनील ।
हसून बोलती तंव राम कृपाळ । बघून सुंदर सेतुरचना ॥ १
परम रम्य उत्तम ही धरणी । महिमा अमित हिचा कोण वानी ।
करावी शंभूची स्थापना येत मनी । हा महा संकल्प करितो मी ॥ २
हे परिसून पाठवी कपीश दूतास । घेऊन येती सकल मुनिवरांस ।
लिंग स्थापून करिती विधियुक्त पूजेस । वदती मज दुजा न प्रिय शिवासम ॥ ३
जो शिवद्रोही म्हणतो मी रामभक्त । तो नर मज न पावे स्वप्नात ।
शिवविन्मुख असून मम भक्ति इच्छित । तो मूर्ख मंदमति नरकगामी ॥ ४
शंकरप्रिय असून मम द्रोह करती । शिवद्रोह करून मम दास म्हणविती ।
ते नर कल्पपर्यंत करिती । वास घोर नरकात ॥ २
जे रामेश्वराचे दर्शन घेतील । तनु टाकून ते मम लोकी जातील ।
जे एथे आणून गंगाजळ घालतील । पावतील ते नर सायुज्यमुक्ती ॥ १
निष्काम निर्मल मने जे भजतील । शंकर मम भक्ति तयां देतील ।
जे ममकृत सेतुदर्शन करतील । ते विनाश्रम तरतील भवसिंधू ॥ २
रुचले सकला रामाचे वचन । निज निज आश्रमी गेले मुनिवरगण ।
प्रीति करणे शरणागतावर चिरंतन । गिरिजे ही रीति रघुपतीची ३
बांधिती सेतु नलनील चतुर । रामकृपे पसरे तयाचे यश सर्वत्र ।
जे स्वये बुडती बुडवती अन्या साचार । ते पाषाण तरती जहाजासम ॥ ४
महिमा हा न वर्णिला जलधीचा । पाषाणगुणाचा वा कपिकरणीचा ॥ ५
श्रीरघुवीर प्रतापे करून । सिंधूवरी तरती पाषाण ।
जे भजती अन्यास प्रभु रामा सोडून । ते मूर्ख मतिमंद जाणावे ॥ ३
बांधलेला सेतु अति दृढ पाहून । कृपानिधीचे मन जाहले प्रसन्न ।
निघाली सेना न करवे वर्णन । गर्जती मर्कटभटसमूह ॥ १

सेतुबंधाच्या तटी चढती रघुवीर । कृपाळु देखती सिंधूचा विस्तार ।
प्रकटती सकल जलचर जलावर । प्रभु करुणाकराचे दर्शनास्तव ।। २
व्याल नक्र नाना मकर मीन । तनु अति विशाल शतयोजन ।
अन्य जलचर तयांचे करिती भक्षण । परि तेहि भयभीत अन्य भये ।। ३
पाहती प्रभूस दूर सारता न सरती । मनी हर्षित सकल सुखी अती ।
प्रेममग्न होऊन हरिरूप निरखिती । न दिसे सिंधुजल जलचराआड ।। ४
निघाली सेना प्रभूची आज्ञा पावून । कपिदल विपुल ते वर्णील कोण ।। ५
जाहली सेतुबंधनावर गर्दी अती । काही कपि नभपथी उडती ।
काही अन्य जलचरांवर चढती । मग जाती सागरापार ।। ४
उभय बंधु हे बघती कौतुक । रघुराज चालले हास्य करीत ।
पार जाती रघुवीर सेनेसहित । सेनापतिकपि यांची दाटी न वर्णवे ।। १
सिंधु पार करून प्रभु देती तळ । मग करिती आज्ञा कपीस सकल ।
जाऊन भक्षा तुम्ही सुंदर फळमूळ । ऐकून कपिअस्वल धावती सर्वत्र ।। २
रामहितास्तव सकल तरू फळती । काळ अकाळ ऋतु अऋतु न बघती ।
वृक्षांस हलवून मधुर फळे भक्षिती । लंकेप्रती फेकती गिरिशिखरे ।। ३
फिरताना कोठे निशाचर भेटती । तयांना घेरून नाच नाचविती ।
दंतांनी नासिककान कापती । देती सोडून प्रभूचे यश वर्णून ।। ४
जयांचे कापिले नासिकाकान । ते कथिती रावणास येऊन ।
श्रवणी येता सागराचे बंधन । घाबरून वदे दशमुख ।। ५
वारीश जलधि तोयनिधी । नदीश वननिधि नीरनिधी ।
सिंधु कंपति उदधि पयोधी । बांधिला तयासी सत्य का हे ।। ५
रावण निज व्याकुळता समजून । हसत जाई गृही भय विसरून ।
मंदोदरी ऐके आले स्वामी रघुनंदन । लीलया बांधून सेतु सिंधूवरी ।। १
पतीचा कर धरून आली भवनी । बोले परम मनोहर वाणी ।
पदर पसरे पदी माथा नमवुनी । प्रियकरा सोडा कोप ऐका वचन मम ।। २
नाथा करावे तयासंगे वैर । बुद्धिबळे जयास जिंकाल हे प्रियकर ।
तुम्ही रघुपति यात कैसे अंतर । जैसे दिनकर काजव्यात साच ।। ३
अति बळे जयाने मारिले मधुकैटभास । वधिले महावीर दितिसुतास ।
सहस्रभुजास मारून बांधिले बळीस । अवतरला तोच प्रभु भूमिभारहरणा ।। ४
तयासी विरोध न करावा नाथा । काळ कर्म जीव जयाच्या हाता ।। ५

सोपवून जानकी प्रभुरामास । तयाच्या पदकमली नमवून मस्तकास ।
वनी जाऊन भजावे रघुनाथास । समर्पून सुतास निज राज्य ।। ६
नाथा रघुनाथ अति दयाळ । वाघास शरण जाता तोहि न भक्षील ।
वांछिले ते कर्तव्य केले सकल । जिंकिले तुम्ही सुरासुर चराचर ।। १
संत ऐसी निति कथिती हे दशानन । वृद्धपणी नृपास उचित वनगमन ।
स्वामी तेथे करावे प्रभूचे भजन । जो जगाचा कर्ता पालक संहारक ।। २
तोच प्रणतवत्सल रघुवीर । भजावे तयास सांडून ममता अपार ।
जयास्तव यत्न करिती मुनिवर । नृप होती विरक्त सोडून राज्यास ।। ३
तोच अयोध्याधीश रघुराया । आला तुम्हावर दाखवाया दया ।
जर प्रियकरा मान्य कराल बोधा या । त्रैलोक्यी पावन सुयश पावाल ।। ४
ऐसे वदता भरती तिचे नेत्र अश्रूंनी । कंपित गात्रे पडे नाथचरणी ।
मम सौभाग्य अखंड राहावे म्हणुनी । भजावे हे नाथा रघुरायास ।। ७
तंव मयसुतेसी उठवून रावण । दुष्ट निज वैभवाचे करी वर्णन ।
सांग मजसम जगती योद्धा कोण । प्रिये ऐक धरते तू भीति वृथा ।। १
वरूण कुबेर पवन यम काळ । या सकला जिंकिले तैसेच दिक्पाळ ।
देव दानव नर मज वश सकल । कवण हेतुस्तव तुज भय उपजे ।। २
नानापरि तिची करी समजूत । मग जाऊन बैसे तो सभेत ।
मंदोदरी ऐसे मनी चिंतीत । कालवश म्हणून उपजला अभिमान ।। ३
सभेत जाऊन पुसे सचिवासी । कवणविधि झुंजावे रिपूसी ।
ऐका सचिव वदती निशाचरनाथासी । का स्वामी पुसता ऐसे घडोघडी ।। ४
सांगा कोणता भीतिदायक विचार । नरकपिअस्वल तर आमुचा आहार ।। ५
परिसुनी कानी सकल वचनास । वदे प्रहस्त जोडून करास ।
हे स्वामी न करावा विरोध नीतीस । मंत्र्यास बुद्धि असे अल्प ।। ८
तोंडपुजे हे मूर्ख सचिव वदती । नाथा न निभाव लागेल या रीती ।
एकच कपि आला लंघून वारिधी । गातो तयाचे चरित्र अजून सर्व मनी ।। १
का नव्हती क्षुधा तंव असुरांस । नगर जाळिता का न भक्षिले तयास ।
ऐसी मसलत देती मंत्री स्वामीस । जी श्रवणी मधुर दुःखद अंती परी ।। २
जो सहज लीलया बांधी जलधीस । जो सुवेल शैलावर उतरवी सेनेस ।
तो मनुज आम्ही भक्षू तयास । वल्गना करिती हे सर्व मूर्खापरी ।। ३

तात आदरे ऐकावे मम वचनासी । न मानावे मनी भ्याड मजसी ।
जे वदती ऐकती प्रिय वाणीसी । ऐसे असती जगी नर विपुल ॥ ४
वचन श्रवणी कठोर परि हितमय अंती । नर अति अल्प ऐसे जे वदती ऐकती ।
पाठवा दूतास प्रथम पाळा ही नीती । द्यावी सीता मग जोडावी प्रीती ॥ ५
स्त्री पावताच माघारी फिरती जर । न वृथा वाढवावे तयासी वैर ।
न तो सन्मुख झुंजावे समरांगणावर । लढून वळेच मारावे ॥ ९
प्रभो हे मम मत जर मानाल । उभयपरी जगी सुयश मिळवाल ।
चिडला रावण ऐकून सुताचे बोल । म्हणे मूर्खा कोण तुज शिकवी ऐसे ॥ १
इतुक्यातच भीति उपजे तव मनात । सुता फुसके गवत तू वेणुमुळात ।
पित्याचे घोर वचन ऐकून प्रहस्त । गेला निज भवनी वदून कटु वचन ॥ २
जैसे औषध न रुचे आसन्नमरणासी । तैसे न रुचे हितवचन रावणासी ।
दशानन जाणून संध्यासमयासी । गेला भवनी निरखिता वीस भुजा ॥ ३
लंका शिखरावर अति सुंदरभवन । नृत्यगायनाचे रम्य विलासस्थान ।
बैसला त्या मंदिरी जाऊन रावण । गुणगान तयाचे करिती किन्नर तंव ॥ ४
वाजे पखवाजटाळ वीणा । नृत्य करिती अप्सरा प्रवीणा ॥ ५
शत इंद्रासम विलास । करी संतत लंकेश ।
नसे चिंता वा भीति तयास । प्रबळ शत्रु शिरी असताही ॥ १०
इकडे सुवेल शैलावर । उतरती दलसमूहासह रघुवीर ।
देखती एक अति उत्तुंग शिखर । समतळ परम रम्य शुभ्र ॥ १
तेथे तरूंची मृदुपर्णे सुमने घेऊन । निज हस्ते रची लक्ष्मण ।
पसरी रुचिर मृदुल मृगचर्मासन । बैसती कृपाळु प्रभु तयावरी ॥ २
प्रभूचे मस्तक सुग्रीवअंकावर । डाव्या उजव्या अंगी भाता शर ।
सावरती करकमले बाण रघुवीर । सांगे मसलत कानी बिभीषण ॥ ३
अंगदहनुमान भाग्यवान । नानापरी चेपिती प्रभु कमलमचरण ।
कटी निषंग करी घेऊन चापबाण । बैसे लक्ष्मण वीरासनी प्रभुपाठी ॥ ४
ऐसे विराजमान कृपानिधान । श्रीराम रूपगुणखाण ।
नर जे या रामध्यानी सदा तल्लीन । मानावे तयांना धन्य धन्य ॥ ११ (क)

प्रभु विलोकती पूर्व दिशेस। बघती सुंदर उदित इंदूस।
वदती सकलां पहा शशीस। कैसा निर्भय मृगराजासम ॥ ११ (ख)
पूर्व दिशी गिरीगुहानिवासी। परम प्रताप तेज बळराशी।
विदारून मत्तगजतममस्तकासी। निर्भये नभवनी विचरे शशिकेसरी ॥ १
विखरती नभी मौक्तिकसम तारा। जणु निशा सुंदरी करी शृंगारा।
प्रभु वदती का हा कलंक सुधाकरा। सांगा मज ते यथामती ॥ २
बोले सुग्रीव ऐका रघुराया। पडे शशीवर भूमीची छाया।
वदे अन्य राहु मारिता तया। पडला काळा कलंक शशीच्या उरी ॥ ३
म्हणे कोणी ब्रह्मा रचिता रतीचे आनन। काढी सुंदर भाग शशीमधून।
इंदूच्या हृदयात आली ती प्रकट खूण। दिसे नभपडछाया तयामाजी ॥ ४
वदती प्रभु शशीचा बंधु विष। अति प्रिय म्हणून ठेवी हृदयी तयास।
पसरवी गरळयुक्त किरणास। विरहवंत नरनारीस जाळितो ॥ ५
परिसा म्हणे हनुमंत प्रभूस। इंदु तुमचा अति प्रिय दास।
तव मूर्ति इंदूच्या हृदयी करी वास। तीच श्यामल चमक शशीत ॥ १२ (क)
ऐकून पवनतनयाचे वचन। विहंसती श्रीराम सुजाण।
मग दक्षिण दिशेस अवलोकून। बोलती कृपानिधान प्रभू ॥ १२ (ख)
बघ बिभीषणा दक्षिण बाजूस। घनघोर गर्जती करी दामिनी विलास।
गर्जना घोर परि मधुर श्रवणास। न होवो वृष्टि कठोर हिमपात ॥ १
वदे विभीषण ऐका हो कृपाळ। न ही विद्युल्लता वा मेघपटल।
लंका शिखरावर रंगमहाल। नृत्यगानजलसा देखे दशानन तेथे ॥ २
मेघडंबरासम छत्र रावणशिरावरी। दिसे अति श्यामल घनघटापरी।
मंदोदरीकर्णी कर्णफुले या अवसरी। तीच जणू दामिनी चमके प्रभो ॥ ३
वाजती टाळमृदुंग अनूप। तोच हा मधुर रव हे सुरभूप।
तंव ओढती प्रभु शर चढवून चाप। हसती जाणून अभिमान रावणाचा ॥ ४
कर्णकुंडले मुकुटछत्र। मारता तयावर एकच शर।
संकलांदेखत पडती महीवर। परि मर्म न कळे कवणाही ॥ १३ (क)
ऐसे दावून कौतुक। रामाचा शर येई माघारी भात्यात।
तंव रावणसभा होई भयभीत। महा आनंदाचा रसभंग होताच ॥ १३ (ख)
नसें भूकंप न वाहे विषेश मरुत। अस्त्रशस्त्र काही नयना न दिसत।
चिंता उपजें सकल हृदयात। वाटे हा महाभयंकर अपशकुन ॥ १

सभा भयभीत बघून रावण । हसत बोले युक्तीस योजून ।
मस्तक पडताहि जयास सदा शकुन । कैसा अपशकुन मुकुट पडताच ।। २
आता शयन करा निजगृही जाऊन । जाती सकल भवनी तया वंदून ।
जैंपासून पडली मही कर्णफुले गळून । तैंपासून वाटे चिंता मंदोदरीस ।। ३
सजल नयने जोडून युगलहस्त । म्हणे ऐका विनंति हे प्राणनाथ ।
सोडावे रामाचे वैर हे कांत । न धरावा हट्ट मनुज समजून ।। ४
धरावा विश्वास मम वचनी । राम विश्वरूप रघुवंशमणी ।
प्रत्यंग जयाचे स्वर्ग कल्पुनी । वेद स्तविती जयास ।। १४
जयाचे पद पाताळ ब्रह्मलोक शिर । अन्य लोकवास प्रत्यंगावर ।
केश घनमाला नयन दिनकर । भयानक काल हा भ्रुकुटिविलास ।। १
जयाची नासिका अश्विनीकुमार । निशा दिवस निमिष अपार ।
दशदिशा श्रवण ऐसे स्तविती वेदशास्त्र । मरुत श्वास वेद निजवाणी ।। २
अधर लोभ यमदंत कराल । माया हास्य बाहु दिक्पाळ ।
जिव्हा वरुण आनन अनल । उत्पत्तिस्थितिलय जयाची क्रिया ।। ३
रोमावलि अष्टदश वनस्पती । सरिता नसजाळे पर्वत अस्थी ।
अधोगात्र नरक उदर उदधी । प्रभु विश्वमय अधिक कल्पना कशास ।। ४
अहंकार शिव शशांक मन । बुद्धि ब्रह्मा चित्त विष्णु महान ।
तोच राम चराचर भगवान । निवास करी मनुष्य रूपाने ।। १५ (क)
ऐका प्राणपति करा असा विचार । सोडा आता प्रभूसी वैर ।
करा प्रीति रघुवीरपदांवर । जेणे मम सौभाग्य नाश न पावेल ।। १५ (क)
विहंसे रावण ऐकून पत्नीचे वचन । म्हणे मोहमहिमा अति बलवान ।
स्त्रीहृदयात सदा आठ अवगुण । हा स्त्रीस्वभाव सकल सत्य वदती ।। १
चंचलता साहस माया अनृत । भय निर्दयता अपावित्र्य अविवेक ।
करसी मज अति भयभीत । गाऊन विराट शत्रूचे रूप ।। २
प्रिये विश्ववैभव मम सहज आधीन । तव प्रसादे मज आता आले कळून ।
जाणिले मी प्रिये तव कुशलपण । कथिलीस मम प्रभुता अशा रीती ।। ३
हे मृगनयने रहस्यमय तव वचन । समजता सुखद भययुक्त ऐकून ।
तंव पतीची मतिभ्रष्ट काळाच्या आधीन । जाणिले मंदोदरीने निश्चित मनी ।।४
यापरी करिता बहु विनोद । संपली रात्र उजाडली प्रभात ।
मग जाई लंकापति सभेत । मदांध सहज निर्भये ।। १६ (ख)

न फळते वा फुलते वेत । जरी जलद वर्षती अमृत ।
तैसे ज्ञान न उपजे मूर्खहृदयात । जरी लाभे तया गुरु ब्रह्मासम ।। १६ ख
इकडे प्रातःकाळी उठले राघव । घेती विचार बोलावून सकल सचिव ।
सांग आता कोणता उपाय वास्तव । पदी शिर ठेवून वदे जांबुवंत ।। १
ऐका हे सर्वज्ञ सर्वांतरवासी । बुद्धिबळतेजधर्मगुणराशी ।
दूत म्हणून धाडावे अंगदासी । निज मतिअनुसारे मंत्र कथितो ।। २
मंत्र वाटला उचित सकल मनासी । तंव कृपानिधान कथिती अंगदासी ।
वत्सा मम काजास्तव जा लंकेसी । बुद्धिबळगुणधाम वालिसुता ।। ३
बहुत काय सांगावे तुजसी । परम चतुर तू ठावे मजसी ।
करावे भाषण ऐसे शत्रूसी । जेणे मम काज शत्रुहित साधेल ।। ४
उठे प्रभूची आज्ञा शिरी धरून । वदे अंगद चरणा वंदून ।
तोच गुणसागर हे राम भगवान । कृपा तुमची असे जयावरी ।। १७ (क)
स्वयंसिद्ध सकल प्रभूचे काज । थोरपण दिले तयांनी मज ।
चिंतून ऐसे अंगद युवराज । होई हर्षित तनू पुलकित तनू ।। १७ (ख)
चरणां वंदून हृदयी प्रभुता धरून । चालला अंगद सकला वंदून ।
प्रभूचा प्रताप हृदयी निर्भय मन । रणी धुरंधर वालिसुत वीर ।। १
नगर प्रवेशता रावणसुत । खेळत असता तया भेटे अंगद ।
चढला आवेश उभय करिता वाद । दोघे अतुलबल तशात तरुणपण ।। २
तो अंगदावरी उगारी लाथ । पद धरून घुमवी मारी आपटून अंगद ।
निशाचरगण बघून हा भारी भट । पळती सैरावैरा भये न पुकारती ।। ३
परस्परासी हे मर्म न कथिती । सुताचा वध जाणून निस्तब्ध राहती ।
तंव माजे नगरात कोलाहल अती । आला कपि जाळिले जयाने लंकेसी ।। ४
न जाणे आता विधाता काय करणार । अति भये सर्व करिती विचार ।
विना पुसता मार्ग दाविती असुर । सुकून जाती विलोकून तया ।। ५
तंव अंगद जाई सभेच्या द्वारी । रामपदकमलांचे स्मरण करी ।
पाही सभोवार दावून ऐट सिंहापरी । तो धीर वीर बलपुंज कपी ।। १८
पाठवी तो शीघ्र एका निशाचरास । देई समाचार रावणास ।
ऐकून हंसे मग वदे दशशीर्ष । कोठला वानर पाहू आणा बोलावुनी ।। १

आज्ञा पावताच बहु दूत धावती । कपिकुंजरास बोलावून नेती ।
देखे अंगद सिंहासनी लंकापती । जैसा प्राणयुक्त सजीव कज्जल गिरी ॥ २
भुजा वृक्षापरी शिर शिखरासमान । मुखनयननासिकाकर्ण ।
गिरिकंदरगुहासम भासमान । तनु रोमावलि जणु नाना लता ॥ ३
अति बलवान वीर वालिसुत । न भीति तया मनी जाई सभेत ।
कपि येता पाहून उठती सभासद । परि रावण हृदयी क्रोध विशेष ॥ ४
यथा मत्त गजवृंदात । सिंह निःशंक शिरे जाऊन तयात ।
मग वंदून बैसे सभेत । रामाचा प्रताप मनी स्मरून ॥ १९
म्हणे दशकंठ कोण रे तू वानर । मी रघुवीराचा दूत हे दशकंधर ।
मम जनकाशी तव मैत्री होती थोर । हे बंधो आलो तव हितास्तव म्हणून ॥ १
तू पुलस्त्यपौत्र उत्तम कुळी जनन । बहुपरी पुजलेस ब्रह्मा उमारमण ।
साधिली कार्यसिद्धि सकल वर पावून । जिंकिले तू सर्व नृप लोकपाल ॥ २
राज्यमदे वा मोहवश होऊन । केले जगदंबा सीतेचे हरण ।
आता ऐक मम बोधवचन । क्षमा करतील प्रभु तव दोषास्तव ॥ ३
कंठी कुठार दंती तृण धरून । संगे निजपत्नी परिवार घेऊन ।
जनकसुता अग्रभागी आदरे ठेवून । चलावे ऐसे सोडून सकल भय ॥ ४
हे प्रणतपाळ रघुवंशमणी । रक्ष रक्ष मज ऐसी करावी विनवणी ।
मग ऐकून तव आर्त वाणी । प्रभु तुज अभय देतील ॥ २०
रे कपि नीचा का न सांभाळून वदसी । मूर्खा मी सुरारि तू नच जाणिलेसी ।
बंधो सांग तव नाम तैसे जनकाचे मजसी । कोणतया नाते मानितो मैत्री ॥ १
नामे अंगद मी वालीचा सुत । जाहली का कधी तव वालीची भेट ।
अंगदाचे वचन ऐकून रावण लज्जित । वदे तो जाणतो मी वालि कपी ॥ २
अरे अंगदा तू वालीचा बालक । उपजला वंशासी अग्नि रे कुलघातक ।
का न गळला गर्भातून तव जन्म वृथाच । निज मुखे कथितो तापस दूत मी ॥ ३
कोठे आता वालि करी कुशलकथन । तंव विहंसून बोले अंगद वचन ।
वालीसी स्वये भेट संपताच दश दिन । विचार मित्रासी कुशल धरून उरी ॥ ४
रामासी विरोध साधता जैसे कुशल । तो तैसे तुज सकल ऐकवील ।
ज़याच्या हृदयी नसे राम कृपाळ । ऐक मूर्खा तयाच्या मनी भेदभाव ॥ ५

सत्य मानितो आहे मी कुलघातक। तू दशशीर्ष आहेस कुलपालक।
अंधबधिरहि न वदती ऐसे अनुचित। नयनकान तर तुज वीस वीस ।। २१
सुरमुनिगण ब्रह्मामहेश। करू इच्छिती जयाच्या पदसेवेस।
दूत तयाचा मी बुडवी कुलास। ऐसी बुद्धि तरी का न फुटे तव ऊर ।। १
ऐकून कपीचे कठोर वचन। वदे दशानन नेत्र वटारून।
दुष्टा साहिली तव वाणी कठिण। मी जाणून पाळितो नीतिधर्म ।। २
वदे कपि ऐकिले तव धर्मशीलतेस। चोरिले तू परक्याच्या पत्नीस।
देखिली नीति नेत्रे रक्षणारी दूतास। हे धर्मव्रतधारी का न मरसी बुडून ।। ३
पाहून भगिनीस नाककानविहीन। केलीस क्षमा तू धर्म ओळखून।
भाग्यवान मी घडले तव दर्शन। तव धर्मशीलता जगप्रसिद्ध ।। ४
रे क्षुद्र कीटका का वृथा वल्गना करिसी। हे कपि मूर्खा विलोकी मम बाहूसी।
लोकपाल विपुलबलशशीसी। हे राहुसम ग्रासण्यास तया ।। २२(क)
नभसरोवरी मम करकमलांवर। करीत असता तेथे वास शंकर।
शोभे हंसापरी अति सुंदर। शंभुसहित कैलास ।। २२(ख)
तव सेनेत ऐक हे अंगद। मजसी लढणारा योद्धा कोण वद।
तव स्वामी पत्नीविरहे निर्बल निश्चित। तयाच्या दुःखे अनुज दुःखी दीन ।। १
तू सुग्रीव नदीतटावरील तरु दोन। अनुज आमुचा भ्याड बिभीषण।
जांबुवंत मंत्री बलहीन। कैसा समरी लढेल तो ।। २
नलनील उभय शिल्पप्रवीण। होय हे सत्य एक कपि महाबलवान।
जाळिली तयाने लंका प्रथम येऊन। ऐकून वचन मग अंगद वदे ।। ३
सांग हे वृत्त सत्य का दशकंधर। खरेच जाळिले का कपीने नगर।
एक क्षुद्र कपि जाळी तव लंकापुर। ऐकून कोण हे सत्य मानील ।। ४
रावणा वर्णिसी जो हा महा सुभट। तो सुग्रीवाचा केवळ लघुदूत।
पाठविला आम्ही तया घेण्यासी वृत्त। जो चाले बहु तो न होत वीर ।। ५
सत्य का हे कपीने जाळिले नगरासी। घेतल्याविना प्रभुआज्ञेसी।
म्हणून न गेला सुग्रीवापाशी। राहिला भये लपून ।। २३ (क)
दशकंठा तू हे सत्य वदसी। ऐकून ते न रोष मजसी।
जो शोभेल समरी लढता तुजसी। ऐसा न कोणी आमुच्या सेनेत ।। २३(ख)
प्रीति वा वैर धरावे समानाशी। जगा विदित नीति ही ऐसी।
जर मृगराज वधील भेकासी। कोण म्हणेल तयासी भला ।। २३(ग)

जरी तुज वधता लघुता रामास। तैसाच तया महा दोष।
परि ऐक अति भयंकर हे दशशीर्ष। रोष क्षत्रिय जातीचा ॥ २३ (घ)

वक्रोक्ति चापाने मारून वचनशर। अंगद जाळी रावणशत्रूचे ऊर।
धरून सांडसी जणु प्रत्युत्तर। काढी बाण तयाने वीर दशशीर्ष ॥ २३ (ङ)

मग हसून वदे दशमौळी। एक महान गुण कपिजवळी।
जो तयास प्रतिपाळी। अनेक उपाये तो तयाचे करी हित ॥ २३ (च)

धन्य कपि करी जो निज स्वामीकाज। जेथे तेथे नाचे सोडून लाज।
रिझवी लोकांसी दावून उडी नाच। करितो स्वामीहित तो धर्मनिपुण ॥ १

हे अंगदा स्वामी भक्ताची तव जाती। का न करशील तू प्रभुगुणांची स्तुती।
मी गुणग्राहक सुजाण अती। न घेई कानी तव कटु वचन ॥ २

तव गुणग्राहकता हे सत्य वदे अंगद। मज निवेदी तैसे हनुमंत।
वन विध्वंसून नगर जाळी वधी तव सुत। तदपि न मानिला तू अपकार ॥ ३

तव सुंदर स्वभाव ध्यानी धरून। केले मी धाडस दशानन।
जे कपीने कथिले ते देखिले येऊन। की नसे तुज लज्जा रोष त्वेष ॥ ४

तव बुद्धि ऐसी म्हणून भक्षिले पित्यास। ऐसे वदून हसला दशशीर्ष।
आता गिळतो तुज मी गिळले जनकास। म्हणे कपि आत्ताच सुचले मज काही॥५

वालीच्या विमलयशाचे तू कारण। नीचा उन्मत्ता न वधिले तुज हे जाणून।
रावणा सांग किती जगी रावण। सांगतो निज कानी किती ऐकिले ते ॥ ६

बळीस जिंकाया पाताळी गेला एक। शिशु बांधून ठेविती तया अश्वशाळेत।
खेळ म्हणून तया मारिती बालक। बळि करी मुक्त मग दया येऊन ॥ ७

सहस्रभुज देखे एका रावणास। धरिले धावून तया जाणून जंतु विशेष।
कौतुकास्तव आणिले भवनास। तंव सोडविती तया पुलस्त्य मुनी ॥ ८

संकोचे एकाचे न करवे वर्णन। वालि काखेत ठेवी तया बहुत दिन।
यामधील तू कोणता रावण। लज्जा त्यजून सत्य वद ॥ २४

मूर्खा ऐक तोच मी रावण बलशील। जयाची भुजलीला जाणे शिवशैल।
शूरता जयाची जाणे उमापति कृपाळ। पुजिले जया मी शिरसुमनें ॥ १

स्वकरे उतरून शिरकमलास। पूजिले मी अमित वेळा त्रिपुरारीस।
दिक्पाल जाणती मम भुजविक्रमास। रे मूढा अजून ते शल्य तया हृदयी ॥ २

जाणती दिग्गज माझी छाती कठिण । जंव जंव बळेच भिडलो मी जाऊन ।
तंव तंव न उरी रुतले कराल दशन । लागताच उरी मुळीसम तुटती ते ॥ ३
जो चालत असता डळमळे धरणी । जैसा मत्त गज चढता लघुतरणी ।
तोच प्रतापी रावण विदित त्रिभुवनी । हे असत्यवादी न कधी ऐकिले कानी तू४
तो रावण कस्पटापरी मानून । करितोस तूं त्या नराचे वर्णन ।
आता कळले तव ज्ञान । दुष्टा नीचा तुच्छ मर्कटा रे ॥ २५
ऐकून अंगद सक्रोध वदे वाणी । बोल सांभाळून अधमा अभिमानी ।
जयाचा परशु जणु अग्नी । जाळण्या सहस्रबाहुभुज-अपारवन ॥ १
जयाच्या परशुरूपी सागरतीक्ष्णधारेत । बुडती अनेकवार नृप अगणित ।
पळाला परशुरामाचा गर्व एका क्षणात । देखता ज्या नरास तो अभागी का २
रे उन्मत्ता मूर्खा कैसा मनुज राम । गंगा सामान्य नदी की धनुर्धारी काम ।
पशु का सुरधेनु कल्पवृक्ष तरु अधम । सामान्य का अन्नदान अमृत रस ॥ ३
वैनतेय आहे का खग सर्प सहस्रानन । चिंतामणि का पाषाण हे दशानन ।
ऐक मूढा वैकुंठ का भवन साधारण । अखंड रघुनाथ भक्ति का अन्य लाभासम ४
सेनेसहित तव अभिमान खंडून । वन विध्वंसून नगर जाळून ।
गेला माघारी सुतास वधून । रे दुष्टा तो हनुमान सामान्य मर्कट का ॥ २६
कपट सोडून ऐक हे रावण । का न भजसी राम कृपाघन ।
ब्रह्माशिवही न करितील रक्षण । खला जर होशील रामाचा वैरी ॥ १
रे मूर्खा का बरळतोस आता वृथा । होतील तव हाल रामाशी वैर धरता ।
पडतील धरणीवर रामशर लागता । तव दश शिरे कपिसमोर ॥ २
चेंडुसम तव शिरे घेऊनी । खेळतील वानर अस्वल मैदानी ।
जंव कोपतील राम रणांगणी । अति तीक्ष्ण बहु बाण सोडतील ॥ ३
यापरी वल्गना का मग चालतील । चिंतून भजावे उदार रामास श्यामल ।
भडकला रावण परिसून हे बोल । जणु घृत पडे जळत्या महाअग्नीवरी ॥ ४
वदे तो मूर्खा मम बंधु कुंभकर्णासम । सुत इंद्रजित प्रसिद्ध परम ।
न ऐकलास का तू मम पराक्रम । की मी जिंकले चराचर जग ॥ २७
रे दुष्टा घेऊन कपींची सहाय्यता । बांधिला सेतु हीच का प्रभुता ।
खग अनेक सिंधु उल्लंघून जाता । न होती ते शूर ऐक कपि मूर्खा ॥ १
बळरूपी जळाने पूर्ण मम भुजसागर । जयात बुडले बहु सुरनर शूर ।
हे वीस भुज पयोधि अगाध अपार । कोण ऐसा वीर जो पार करील ॥ २

भरविले पाणी मी दिक्पालाकडून । दुष्टा ऐकविसी मज भूपाचे सुयशवर्णन ।
वारंवार करिसी जयाचे गुणगान । तव स्वामी असे जर समरी वीर ॥ ३
का पाठवतो तो दूतास कोणते काज । शत्रूस संधि करिता न वाटे लाज ।
मूर्ख वानरा वानितोस प्रभूसी निज । वघ हे कैलासमंथन करणारे बाहू ॥ ४
कोण आहे शूर रावणासरिस । जो स्वकरे कापून निज शीर्ष ।
अर्पी अति हर्षे अग्नीस । स्वये गौरीश तया साक्षी ॥२८॥
जंव जळता विलोकिले कपाळा । विधिलिखित अक्षरे देखिली भाळा ।
तेथे वाचून नरकरे वध मजला । हसलो मी ब्रह्मावाणी असत्य जाणून ॥ १
न वाटे भय मम मना जाणता मरण । लिही ब्रह्मा वृद्ध बुद्धिभ्रम म्हणून ।
वारंवार वानितोस लाज मर्यादा सोडून । मूर्खा मम सन्मुख बळ अन्य वीरांचे ॥२
वदे अंगद लज्जावंत जगी हे रावण । नसे अन्य कोणी तुजसमान ।
न वानिसी निज मुखे निज गुण । तव स्वभाव सहज लज्जाशील ॥ ३
चित्तात गर्वे राखिले शिरशैलवृत्ताने । वीस वेळा मज कथिले तयाते ।
हृदयी लपविले त्या भुजबळाते । जे भुज जिंकी सहस्रबाहुबलिवालीस ॥ ४
ऐक रे मतिमंदा दे आता उत्तर । शिर छेदून होतो का वीर ।
इंद्रजाल रचून न होतो शूर । जरी स्वकरे छेदी निज शरीर ॥ ५
मोहवशे जळती पतंग अग्नीत । वाहती भार गर्दभवृंद ।
तया शूर ऐसे कोणी न वदतात । रे मंदबुद्धि मनी चिंतून पहा ॥ २९
दुष्टा वाढवू नको आता शब्दाला शब्द । एक मम वचन सोडून मानमद ।
दशशीर्षा मी दूत म्हणून न येत । धाडती मज रघुवीर ऐसे चिंतून ॥ १
वारंवार कथिती हेच कृपाळ । सिंहास न मिळे यश वधता शृगाल ।
मनी स्मरून हे प्रभूचे बोल । साहतो मी तव वचन कठोर ॥ २
न तो फाडून तव आनन । बळेच सीतेसी जातो घेऊन ।
जाणले तव बल अधमा दशानन । चोरली परपत्नी असता एकाकी ॥ ३
तू निशाचरपति तुज गर्व बहुत । मी रघुपतिसेवकाचा दूत ।
करून दावितो तुज ऐसे कौतुक । जर न भितो रामाचे अपमानास ॥ ४
महीवरी तुजसी आपटून । सेना संहारून नगरी उद्ध्वस्त करून ।
तव युवतीसह जातो घेऊन । जनकसुता सीता रे मूर्खा ॥ ३०
ऐसे करता तयात न थोरपण । मृतास वधता नसे शूरपण ।
वाममार्गी कामी विमूढ कृपण । अति दरिद्री अपयशी अति वृद्ध ॥ १

संतत क्रोधी सदा रोगवश । विष्णुद्रोही विरोधी श्रुतिसंतास ।
पापी निंदक पोषक निज तनूस । हे चौदा प्राणी जिवंत असून शवासम ।। २
दुष्टा हे समजून न वधी तुजसी । आता नको करू रुष्ट मजसी ।
अधर दंती चावून चोळून हस्तासी । वदे अति कोपे निशाचरनाथ ।। ३
रे कपि अधमा आता तू मरण वांछिसी । छोटया वदनी मोठा घास घेऊ पहासी ।
मूर्खा जयाच्या बळावर वल्गना करसी । तया न बळ बुद्धि वा प्रतापतेज ।। ४
नसे तया स्वाभिमान तो गुणहीन । देई पिता वनवास हे जाणून ।
हे दुःख तयात मम भीति रात्रंदिन । आणखी स्त्रीविरहाचे दुःखअती ।।३१ (क)
धरिसी गर्व जयाच्या बळावर । ऐसे अनेक मनुज अहोरात्र ।
हे मूर्खा भक्षिती तयास मम निशाचर । सोड तव हट्ट जाणून हे ।। ३१ (ख)
जंव रामाची निंदा करी दशकंधर । अति क्रोधवंत जाहला कपींद्र ।
जो हरिहरनिंदा ऐके कानी साचार । गोवधसमान पाप तया ।। १
कर्णकठोर ध्वनि करी कपिकुंजर । आपटी भुजदंड द्वय महीवर ।
डोले धरणी पडती सभासद असुर । पळू लागती भयपवने त्रस्त होऊन ।। २
पडता सावरून उठे दशकंधर । भूतळी पडती मुकुट अतिसुंदर ।
उचलून काही ठेवी शिरावर । फेकी काही अंगद प्रभुपाशी ।। ३
धावती कपि येताना पाहून मुकुट । म्हणती हे विधाता दिनी उल्कापात ।
वा रावण क्रोधे वज्रासी फेकीत । येती धावत त्वरे चारी ती ।। ४
न धरा भय प्रभु हसून वदती । हे न राहुकेतु न वज्र उल्का असती ।
फेकले जे वालिसुते ते येती । किरीट दशकंधराचे हे ।। ५
करी धरी उडी मारून मारुति तयासी । आणी त्वरित ते प्रभुपाशी ।
कपि रीस देखती कौतुकासी । प्रकाश तयाचा दिनकरासम ।। ३२ (क)
अति क्रुद्ध तिकडे सभेत लंकेश । वदे अति क्रोधे सकलास ।
कपीस धरून मारा तयास । परिसुनी ते विहसे अंगद ।। ३२ ख
वीरहो वधून यास पळा सत्वर । मिळतील जेथे खा ते अस्वल वानर ।
करा मर्कटहीन मही शीघ्र । पकडा जिवंत तपस्वी बंधुद्वय ।। १
मग वदे क्रुद्ध अंगद युवराज । वल्गना करितो तू का न लाज तुज ।
जा मर गळा कापून कुलनाशक निर्लज्ज । मम बळ बघून का न फुटे तव छाती २
रे स्त्रीचोरा कुमार्गगामी दुष्ट । पापराशी मंदमति कामलंपट ।
दुर्वचने करिसी का तू सन्निपातात । नरभक्षका खला आता तू मृत्युवश ।। ३

याचे फळ तुज पुढे मिळेल । जंव कपि रीस चापटचा देतील ।
राम हा मनुज काढिसी ऐसे बोल । का न गळे तव जीभ रे अभिमान्या ।। ४
गळतील रसना संशय नाही । शिरासह पडेल त्या समरमही ।। ५
तो का नर रे दशकंधर । जो करी वालिवध सोडून एक शर ।
तू अंध तुज असून वीस नेत्र । रे जड कुजाति धिक् जन्म तव ।। ३३ (क)
तव रुधिराच्या तृषेने तृषित । असती रामाचे बाण बहुत ।
या भयास्तव तुज मी सोडीत । रे राक्षसा अधमा कटुवल्गनावादी ।। ३३ (ख)
मी तव दशन उपटण्यास समर्थ । परि आज्ञा न देती रघुनाथ ।
दशमुख तोडावे ऐसा क्रोध येई मनात । धरून लंका सिंधूत बुडवावी ।। १
तव लंका औदुंबरफळासमान । तुम्ही जंतु तुमचे ते निर्भय वसतिस्थान ।
मी वानर वेगे फळ खाईन । परि आज्ञा न देती उदार श्रीराम ।। २
युक्ति ऐकून हसला रावण । वदे कोठे शिकला ऐसे अनृत वचन ।
वालि नव्हता तुजसम वल्गनाप्रवीण । मूर्खा तापससंगतीने होसी लबाड ।। ३
मी लबाड हे सत्य हे वीसबाहो लंकेश । जर न उपटीन मी तव जिव्हा दश ।
कपि कोपे स्मरून रामप्रतापास । करी पण तो पद रोपून सभेत ।। ४
हे मूर्खा जर हलवशील मम चरण । माघारी जातील राम मी सीता हरेन ।
ऐका सुभट हो वदे दशानन । पद धरून आपटा कपीस महीवरी ।। ५
इंद्रजित आदिक बलवान । उठती सर्वत्र हर्षे वीर नाना महान ।
विपुल बळे करिती उपाय झटपटून । पद न हाले बैसती नमवून शिर ।। ६
उठून पुन्हा झोंबती सुरांचे वैरी । कपीचे चरण न ढळे ऐशापरी ।
भ्रष्टयोगी पुरुष जैसा हे उरगारी । मोहतरूस न उपटू शके ।। ७
वीर कोटि मेघनादासमान । उठती झडकरी हर्षित होऊन ।
झटपटती परी न ढळे कपिचरण । तंव शिर नमवून बैसती लज्जेनें ।। ३४ (क)
भूमीसी न सोडती कपि चरण । पळाला रिपुमद ते देखून ।
येता कोटि विघ्ने जैसे संतमन । न चळे नीतीपासूनी ।। ३४ (ख)
हरले असुर कपीचे बळ पाहून । स्वये उठे रावण देता कपि आव्हान ।
वदे अंगद जंव रावण धरी चरण । मम पदास धरून न तव उद्धार ।। १
मूर्खा का न धरिसी जाऊन रामचरण । मनी लज्जित होऊन फिरला रावण ।
श्री सकल जाता जाहला तेजोहीन । जणु कांतिहीन माध्यान्ह शशी ।। २

मग बैसे सिंहासनी शिर नमवून। बैसला जणु सकल संपत्ति गमावून।
रामविमुखास कैसी शांति समाधान। श्रीराम जगाचा आत्मा प्राणपती ।। ३
उमे श्रीरामाचा भृकुटिविलास। करी विश्वाची उत्पत्ति पुनरपि नाश।
जे करिती वज्रास तृण वज्र तृणास। तयांच्या दूताचा पण कैसा मोडेल ।। ४
कपि नानाविध नीति सांगे रावणास। तयाचा काळ समीप तो न मानी नीतीस
रिपुमद भंगुनी ऐकवी प्रभुचे सुयश। निघाला मग वालिसुत ऐसे कथून ।। ५
जोवरी न वधीन रणी खेळ खेळवून। तोवरी का गाऊ वृथा प्रभुता महान।
कपीने मारिले सुतासी प्रथम हे ऐकून। जाहला रावण दुःखी अती ।। ६
अंगदाचा पण सफळ पाहून राक्षस। भये होती व्याकुळ विशेष ।। ७
रिपुबलाचे करून मर्दन। अंगद वालितनयाने बलवान।
पुलकित तनु सजल नयने येऊन। धरिले तयाने रामपदकमल ।। ३५(क)
दशकंधर संध्यासमय जाणून। उदास होऊन प्रवेशे भवन।
मग रावणासी समजावून। सांगे पुनरपि मंदोदरी ।। ३५(ख)
हे कांत मनी चिंतून त्यजावे कुमतीसी। न शोभे तुम्हा संग्राम रघुपतीसी।
रामानुज लक्ष्मण काढी लघु रेखेसी। न उल्लंघिली तुम्ही हाच का पुरुषार्थ ।।१
हे प्रियकरा जिंकाल का तो संग्राम। जयाच्या दूताचा इतुका पराक्रम।
जयासी सिंधु उल्लंघणे लीलया सुगम। तो निर्भय कपिकेसरी आला लंकेत ।। २
करी रक्षकाचा वध विपिननाश। तव सन्मुख मारिले अक्षय कुमारास।
जाळून भस्म करी संपूर्ण नगरीस। कोठे होता तुमचा बलगर्व तंव ।। ३
आता नाथा वृथा न करा वल्गना। हृदयी धरून मम वचना।
राम चराचरस्वामी अतुलबळ जाणा। हे पति न माना नृपति रघुपतीस ।। ४
बाणाचा प्रताप जाणे मारीच। न मानिले तयाचे वचन जाणून नीच।
जनकसभेत असती भूप अगणित। तयात तुमचे बळ अतुल विपुल ।। ५
रामे वरिली जानकी भंगून धनुष्यास। का न संग्रामी जिंकिले तयास।
राम बल अल्प ऐसे विदित इंद्रसुतास। राखी राम जिवंत तया नयन फोडून ।।६
देखिले तुम्ही शूर्पणखेच्या दशेस। तदपि न शिवली लाज हृदयास ।। ७
वधून खरविरोधास। लीलेने मारिले दूषणकबंधास।
हे दशकंध वधिले एकच शरे वालीस। तयाची प्रभुता जाणा अजून तरी ।। ३६
बांधिले लीलेने सागरास सत्वर। सेनेसह उतरले सुवेलावर।
दिनकरकुलकेतु करुणाकर। धाडिती तव हितास्तव दूता ।। १

तव बळाचा मद उतरवी दूतसभेत । जैसा मृगपति गजसमूहात ।
जयाचे अनुचर अंगदहनुमंत । अति बलवान रणशूर वीर ।। २
नाथा पुन्हा पुन्हा नर वदता तयासी । व्यर्थ वाहता मानममतामदांसी ।
हाय प्रियकरा का केला विरोध रामासी । कालवश तुम्ही न उपजे बोध मनी ।। ३
न मारी काळ कवणा दंड घेऊन । धर्मबळ बुद्धिविचार करी तो हरण ।
जयाच्या येई निकट मरण । तयासी होई भ्रम तुम्हासम ।। ४
मारिले गेले तुमचे दोन सुत । नगरी जाळली आता करा वैर समाप्त ।
भजा कृपासिंधु रघुनाथ । घ्या पदरी नाथा विमल यश ।। ३७
पत्नीचे वचन शरसमान ऐकून । पहाट होताच गेला सभेस उठून ।
मग बैसला सिंहासनी जाऊन । फुलून अभिमाने विसरून भया ।। १
इकडे राम बोलाविती अंगदासी । येऊन वंदी पदपंकजासी ।
अति आदरे बैसविती समीप तयासी । मग खरारि कृपाळू वदती हसून ।। २
हे वालितनया अति कुतूहल मजसी । सत्य सांग पुसतो तुजसी ।
अतुल बळाचा धाक ज्याचा विश्वासी । जो रावण असुरकुलतिलक ।। ३
फेकिले तयाचे चार मुकुट । सांग कैसे मिळविले हे तात ।
ऐका सर्वज्ञ प्रणत सुखकारी नाथ । ते न राजमुकुट भूपाचे चार गुण ।। ४
सामदामदंड भेद । नृपाच्या हृदयी वसती सांगती वेद ।
नीतिधर्माचे हे चार सुंदर पद । ऐसे समजून येती ते प्रभूपाशी ।। ५
धर्महीन विन्मुख प्रभुपदास । मृत्यु आधीन आता दशशीर्ष ।
ते गुण सोडून रावणास । आले अयोध्याधीपाप्रती ।। ३८(क)
परम चतुरता अंगदाची कानी ऐकून । हसती उदार रघुनंदन ।
मग अंगद करी निवेदन । लंकेतील सकल समाचार ।। ३८(ख)
जंव कळला शत्रूचा समाचार । राम बोलाविती सचिवास निकट शीघ्र ।
लंकेत अभेद्य वेशी चार । कैसी आक्रमावी विचार करा ।। १
तंव सुग्रीवजांबुवंतबिभीषण । स्मरून हृदयी रघुकुलभूषण ।
काज निश्चित करिती विचार ठरवून । कपिकटकाचे करिती चार दल ।। २
यथायोग्य सेनापति नियुक्त करिती । बोलाविती सकल पथकपती ।
प्रभूचा प्रताप तया समजाविती । सिंहनाद करून मग धावती कपी ।। ३
हर्षित होऊन नमविती रामपदी शिर । घेऊन धावती गिरिशिखर ।
गर्जती पुकारती रीस वानर । जय रघुवीर जय कोशलाधीश ।। ४

लंका अजय परम दुर्ग जाणती । प्रभुप्रतापे कपि निःशंक निघती ।
मेघपटलासम चहु दिशा वेढिती । वाजविती भेरी डंका मुखाने ।। ५
जय श्रीराम जय लक्ष्मण । जय जय कपीश सुग्रीव बलवान ।
करिती ऐसा सिंहनाद गर्जून । महाबलसीमा रीसकपी ।। ३९
लंकेत माजला कोलाहल भारी । ऐकून वदे रावण अहंकारी ।
बघा वानरांची धिटाई तरीं । हसून बोलावी निशाचरसेनेस । १
काळप्रेरणेने आले वानर । क्षुधावंत मम सर्व निशाचर ।
घर बैसल्या दैव देई आहार । वदून विकट हास्य करी दुष्ट ।। २
सकल सुभट हो जा चारी दिशेस । गिळा धरधरून कपिरीस ।
उमे ऐसा अभिमानी लंकेश । जणु उताणी निद्रिस्त खग टिटवी ।। ३
निघती निशाचर आज्ञा घेऊन । करी धरून बरछी कृपाण ।
तोमर मुद्गल परशु महान । भाला शूळ गिरिखंड ।। ४
जैसे अरुणपाषाणनिकर बघुनी । मांसाहारी खग पडती तुटुनी ।
चोचभंगाचे दुःख न येई ध्यानी । तैसे धावती अज्ञानी नरभक्षक ।। ५
नाना आयुधे शरचाप धरून । निशाचर बलवीर महान ।
ऐसे कोटि कोटि रणधीर राक्षसगण । चढती दुर्गकोटबुरुजावरी ।। ४०
शोभती कैसे बुरुजतटावरी । जैसे घन मेरुशिखरावरी ।
गर्जती ढोल डंका रणभेरी । ऐकून ध्वनि वीरास वीरश्री चढे ।। १
वाजती तुतारी भेरी अपार । ऐकून भ्याडास भय वाटे फार ।
राक्षस जाऊन बघती कपिनिकर । अति विशाल तनूचे सुभट रीस ।। २
धावती न मानती अवघड घाट । पर्वत फोडून करिती वाट ।
गर्जती कटकटती कोटी कपि भट । दंती ओठ चावून पुकारती ।। ३
इकडे रावणाची तिकडे रामाची शपथ । घोष जय जय पुकारून युद्ध जुंपत ।
गिरिशिखरसमूहास राक्षस फेकीत । उडी मारून धरती कपि फेकती तेच ।। ४

धरून टाकती । महागिरी खंड । कपिरीस प्रचंड । दुर्गावरी ।
पळती गर्जती । चरणा झोंबुनी । फेकती धरूनी । निशाचरा ।
त्वेषाने चढती । तरल तरुण । प्रतापी उडून । गडावरी ।
कपिरिसगण । भवनी चढती । रामयश गाती । भक्तिभावे ।। १

मग एका एका निशाचरास धरून । ते वानर जाती पळून ।
निज देहाखाली राक्षसवीर घालून । घसरून येती धरणीवरी ।। ४१
रामप्रतापे प्रबळ कपिवृंद । मर्दून निशाचर वीर अगणित ।
पुन्हा सर्वत्र दुर्गावर वानर चढत । गर्जून जय रघुवीर प्रतापरवी ।। १
निशाचरसमूह पळती चहु बाजूस । जैसा प्रबळ पवन विखुरे मेघपटलास ।
बालकनारीरोगी करिती आक्रोश । भारी हाहाकार उडाला लंकेत ।। २
सकल मिळून देती शिव्या रावणास । राज्य करीत असता बोलाविले मृत्यूस ।
निज दल विचलित जंव ऐके लंकेश । परतवुनी सुभटा वदे क्रोधे ।। ३
जो होई विमुख रणी ऐसे कानी ऐकेन । तीक्ष्ण कृपाणे मी तया वधीन ।
भोग भोगिले मम सर्वस्व खाऊन । आता रणांगणी प्राण प्रिय तुम्हा ।। ४
सकल भयभीत ऐसे उग्र वचन ऐकून । त्वेषे फिरती राक्षस मनी लाजून ।
वीरास शोभा रणी जंव सन्मुख मरण । चिंतून तंव सोडती प्राणलोभ ।। ५
बहुशस्त्रधारी वीरगण । भिडले युद्धास ललकारून ।
परिघ त्रिशूळ अस्त्रे मारून । करिती व्याकुळ रीसकपीस ।। ४२
भयातुर कपि पळू लागती । उमे अखेर जरी ते जिंकिती ।
कोठे अंगद कोठे हनुमंत काही वदती । कोठे नलनीलद्विविद वीर ।। १
निजदल व्याकुळ ऐके हनुमान । पश्चिम द्वारीं होता तो बलवान ।
तेथे मेघनाद युद्ध करी भयाण । परि तेथील द्वार अभेद्य भंगेना ।। २
मनी अति कोपे पवनकुमार । गर्जे प्रबळ काळासम तो वीर ।
मग उड्डाण करून लंका दुर्गावर । मेघनादावरी धावे धरून गिरी ।। ३
वधिले सारथ्यास भंगून रथा । मेघनादाच्या छातीवर मारी लाथा ।
अन्य सूत वधून, विकल दशाननसुता । रथी घालून त्वरे नेई गृही ।। ४
जंव कळले अंगदास की पवनकुमार । एकलाच चढला गडावर ।
तंव वालिसुत समरवीर । चढला दुर्ग त्वरित जणु मर्कटखेळ ।। ४३
युद्धात क्रुद्ध शत्रुविरुद्ध दोन वानर । रामप्रताप स्मरती हृदयी ते वीर ।
चढती धावून रावणभवनावर । करिती घोषणा कोशलाधीशाची ।। १
ढकलती कळसासह भवन । निशाचरपति भयभीत बघून ।
करे वडविती उर नारीगण । वदती आले आता दोन उत्पाती कपी ।। २
कपिलीला करून भिवविती नारीस । ऐकविती रामचंद्राचे सुयश ।
मग करी धरून कांचन स्तंभास । वदती करू आता विध्वंसनआरंभ ।। ३

ऐसे गर्जून रिपुसेनेत उडी घेती । भुजबळे भारी अरीचे मर्दन करिती ।
कोणा लाथा कोणा थप्पड देऊन वदती । न भजत रामास घ्या तयाचे फळ ।।४
एकास दुजावर मर्दिती रगडून । फेकती मुंड धडापासून तोडून ।
रावणासन्मुख शिरे पडती येऊन । दहिहंडीसम फुटती ती ।। ४४
धरती प्रमुख सेनापतीसी । पद धरून फेकिती तया प्रभुपाशी ।
भीषण घोषित करी नामासी । मग निज धाम राम देती तया ।। १
द्विजमांसभोगी नरभक्षक । मिळविती गति जी योगी पावत ।
उमे राम करुणाकर कोमलचित्त । म्हणती राक्षस वैरभावे स्मरती मज ।। २
प्रभु परम गति देती ऐसे जाणून मनी । कोण दयाळु तयासम सांग भवानी ।
ऐशा प्रभुस जे न भजती श्रम सोडुनी । ते नर परम मंदमति भाग्यहीन ।। ३
करिती अंगदहनुमंत प्रवेश । लंका दुर्गात कथिती अयोध्येश ।
जणु मंथिती मंदरद्वय सिंधूस । यापरी कपि उभय शोभती लंकेत ।। ४
भुजबळे रिपुदल मर्दून । संध्यासमय होत ऐसे बघून ।
श्रमपरिहार होता जातो उड्डाण करून । होते भगवंत जेथे त्या स्थानी ।। ४५
नमविती शिर प्रभूच्या पदकमलांस । प्रभु प्रसन्न होती देखून वीरास ।
कृपाकटाक्षे राम बघती उभयतांस । तंव होती ते विगतश्रम परम सुखी ।। १
अंगद हनुमान निघाले जंव जाणती । तंव नाना मर्कटभट माघारी फिरती ।
जय दशानन घोष करून धावती । राक्षस संध्यासमयी पावून बळ ।। २
वळले कपि पुन्हा बघून निशाचर । कटकटून भट झुंजती सर्वत्र ।
उभय प्रबळ दल करून ललकार । हार न खाती भट लढती ।। ३
काळे सर्व निशाचर महावीर । नानावर्णी महा प्रचंड वानर ।
सबळ उभय दल समबळ झुंजार । लढती क्रोधे वीरता दावून ।। ४
वर्षा शरद ऋतूंतील अनेक पयोद । जणु लढती पवने प्रेरित ।
करिती माया बघून सेना विचलित । सेनापति अकंपन अतिकाय ।। ५
जाहला निमिषात घन अंधकार । वर्षू लागती पाषाण रक्तारुधिर ।। ६
देखता निबिड तम दशदिशात । माजली खळबळ कपिदलात ।
कुणी कुणा न देखू शकत । करिती पुकार चहुंबाजूस सकल ।। ४६
या सकलांचे मर्म रघुनायक जाणती । अंगदहनुमानासी बोलावून घेती ।
सकलांस वृत्तांत समजाविती । एकून धावती कपिकुंजर कोपे ।। १

मग हसून चढविती चाप कृपासागर । पावक सायक लाविती सत्वर ।
जाहला सर्वत्र प्रकाश नष्ट तिमिर । जैसे ज्ञान उदय होता संशय फिटे ।। २
रीसकपि देखून प्रकाश । श्रमभयरहित धावती मनी हर्ष ।
हनुमानअंगद करिती गर्जनेस । गर्जना ऐकून रजनीचर पळती ।। ३
राक्षस पळता फेकिती भूमीवर धरूनी । करिती रीसकपि अद्‌भुत करणी ।
फेकिती सिंधूत राक्षसपदां धरुनी । भक्षती तयास सर्पमकरमीन ।। ४
मारिले काही काही केले घायाळ । काही पळून चढले गडावर तात्काळ ।
गर्जती वीर वानररीस दलातील । शत्रूची सेना करून भयभीत ।। ४७
चारी कपिसेना निशा जाहली जाणुनी। येती होते जेथे कोशल धनी ।
पाहती राम तया कृपा करूनी । तंव जाहले वानर श्रमहीन तात्काळ ।। १
इकडे दशानन बोलावी सचिवास । किती वीर वधिले गेले कथिले तयास ।
संहारिले कपींनी अर्ध सेनेस । वदा शीघ्र काय उपाय आता ।। २
माल्यवंत अति वृद्ध निशाचर । रावणाचा मातामह मंत्रिवर ।
वदे वचन तो नीतिमय पवित्र । हे तात ध्यानी धरावा मम बोध ।। ३
जैपासून तू केले सीताहरण । तैपासून होती वर्णनातीत अपशकून ।
जयाचे यश गाती वेदपुराण । त्या रामासी विमुख जो तया न सुख ।। ४
बंधूसह हिरण्याक्षास । तैसे बलवान मधुकैटभास ।
जयाने वधिले तोच ईश । कृपासिंधु भगवान ।। ४८ क
जो अग्निखलवनास करी दग्ध । काळरूप गुणागार घनबोध ।
का करावा तयासी विरोध । जयास सेविती शिवब्रह्म ।। ४८ ख
वैर सोडून द्यावी वैदेहीस । भजावे परम प्रेमळ कृपानिधीस ।
झोंबती तयाचे शब्द बाणासम रावणास । वदे कर काळे मुख जा अभाग्या ।। १
वृद्ध झालासी न तो मारितो तुजसी । न दावी तव मुख मम नेत्रांसी ।
माल्यवंत करी मनी अनुमानासी । वधू इच्छिती रावणास कृपानिधी ।। २
गेला उठून वदून रावणास दुःशब्द । तंव संकोचे म्हणे मेघनाद ।
पाहा प्रभाती मम कौतुक निश्चित । करीन बहुत कशास वदू अधिक ।। ३
सुतवचन ऐकता आला विश्वास । सप्रेम बैसवी अंकी तयास ।
जाहला सूर्योदय करिता विचारास । तंव कपि धडकती चारी द्वारांवरी ।। ४

कपि कोपे घेरिती दुर्ग दुर्घट । नगरी उडाला कोलाहल बहुत ।
विविध आयुधे घेऊन राक्षस धावत । लोटिती ते शैलशिखरे गडावरून ।। ५

राक्षस लोटती । पर्वतशिखर । केला गोळीबार । नानाविध ।
कडा कडा होई । जणु वज्रपात । प्रळय जलद । गर्जतात ।
जर्जर शरीरे । मर्कट विकट । भिडून लढत । निर्भयाने ।
वधिती राक्षसा । घेऊन पर्वत । कपि फेकतात । गडावरी ।। १

पुन्हा शत्रु वेढती गडास । ही वार्ता कळे मेघनादास ।
आला सन्मुख वाजवून रणभेरीस । उतरून गडावरूनी तो ।। ४९
कोठे अयोध्यापति भ्राते दोन । लोकी विदित धनुर्धारी म्हणून ।
कोठे नलनील सुग्रीव हनुमान । द्विविद अंगद बळसीमा ।। १
कोठे बंधुद्रोही बिभीषण । आज सकला तया निश्चित मारीन ।
बोलून करी प्रखर शरसंधान । अति क्रोधे ताणी आकर्ण ।। २
शरसमूह तो सोडू लागत । जणु पंखासह बहु नाग धावत ।
वानर सर्वत्र पडताना दिसत । न येई सन्मुख ते समयी कोणी ।। ३
पळाले रीसकपि चौदिशेस । विसरले सर्व युद्धाच्या इच्छेस ।
रणी न देखती एकाहि रीसकपीस । जो न जाहला मृतप्राय ।। ४
मारी सकला दश दश शर । पडती मग भूमीवर कपिवीर ।
मेघनाद बलवान धीर । गर्जे सिंहनाद करून ।। ५०
पाही पवनसुत सेनेस व्याकुळ । मग धावे जणु क्रोधवंत काळ ।
त्वरित उपटून एक महाशैल । अति त्वेषे फेकी मेघनादावरी ।। १
येता पर्वत बघून जाई नभांत । नष्ट जाहले सर्व अश्वसारथीरथ ।
वारंवार हनुमान पाचारीत । परि बलवर्म जाणून न येई निकट ।। २
रघुपति निकट जाई मग घननाद । वदे नानाविध कुशब्द ।
शस्त्रअस्त्र आयुधे फेकीत । प्रभु कौतुके कापून निवारिती ।। ३
प्रभु प्रताप पाहून मूर्ख चिडला । करू लागला नानाविध मायालीला ।
जणु कोणी करून गरुडखेळा । भिववी धरून सर्पपिल्लास ।। ४
जयाच्या बलवत्तर माये वश । लहान थोर ब्रह्मादि महेश ।
मतिभ्रष्ट निशाचर तयास । निजमाया दाखविती ।। ५१

नभी चढून वर्षी विपुल अंगारा । महीतून होती प्रकट जलधारा ।
नाचती बोलून कापा मारा । नानाविध पिशाच्च पिशाच्चिणी ।। १
विष्ठापूरक्तकेसहाड । वर्षी केंव्हा तो केंव्हा अनेक दगड ।
होई अंधार ऐसी वर्षता धूळ अखंड । पसरता ती न दिसे निज हातही ।। २
व्याकुळ कपि अति माया पाहून । चिंतिती ओढवले सकलांचे मरण ।
राम हसती कौतुक बघून । जाणिले तयांनी भयभीत सकल कपी ।। ३
एकच बाणे करिती मायेचा निरास । जैसा सारतो रवि दूर वनतिमिरास ।
कृपादृष्टीने विलोकिती रीसकपीस । होती ते प्रबळ रणी न थांबती रोखताना ।।४
रामापाशी आज्ञा मागून । अंगदादि कपि सवे घेऊन ।
निघाला अति क्रोधे लक्ष्मण । शरासन बाण घेऊन हातात ।। ५२
रक्तासम नयन उर बाहु विशाळ । हिमगिरीपरी कांति गौर काहीशी लाल ।
इकडे वीरास पाठवी निशाचरपाळ । धावती नाना अस्त्रशस्त्र घेऊन ते ।। १
कपि भूधरतरुनखआयुधधर । धावती वदून जय जय रघुवीर ।
उभयपक्षी जयाची इच्छा अति थोर । भिडती लढण्यास जोडी जोडीने ।। २
लत्तामुष्टि देती दंतांनी चावुनी । विजयी कपि धमकी देती पुन्हा मारूनी ।
मारा मारा धरा धरा मारा धरूनी । शिर तोडा पकडून भुजा उपटा ।। ३
ऐसा ध्वनि निनादे नव खंडात । प्रचंड रुंड सर्वत्र धावत ।
नभी पाहाती कौतुक सुरवृंद । विस्मये कधी कधी आनंदे ।। ४
भरभरून साचे खड्डयांत रुधिर । उडून पडे धूळ तयावर ।
भासे जणु अग्निराशीवर । रक्षा जमून तया झाकी ।। ५३
घायाळ वीर शोभती कैसे । कुसुमित पळस तरु जैसे ।
लक्ष्मण मेघनाद दोन वीर ऐसे । लढती अति क्रोधे परस्पर ।। १
न जिंकू शके एक दुजास । असुर दाविती मायाबल अनीतीस ।
तंव अति क्रोध चढे अनंतास । भग्न करी सारथीरथास त्वरित ।। २
शस्त्रास्त्राने प्रहार करी लक्ष्मण शेष । मृतप्राय केले अनेक राक्षस ।
प्राणसंकट हे हरतील मम प्राणास । रावणसुत मनी अनुमान करी ।। ३
मग वीरघातिनि शक्ति तो सोडीत । तेजःपुंज लक्ष्मणाच्या हृदयी लागत ।
आली मूर्च्छा तेथे शक्ति शिरताच । तंव गेला निकट सोडून भय ।। ४
मेघनादासम योद्धे कोटिशत । न उचलू शकती तया ते सुभट ।
कैसा उचलतील तें जगदाधार अनंत । तंव निघाले तेथून लज्जित होऊन ।। ५४

ऐक गिरिजे जयाचा क्रोधानल। जाळितो चतुर्दश भुवने सकल।
कोण संग्रामी तया जिंकेल। सुरनर चराचर सेविती जया॥ १
हे कुतूहल जाणील तोच। जयावरी असे रामकृपा साच।
दले उभय फिरती माघारी संध्या होताच। सांभाळती सेनापती निज निज सेनेस २
व्यापक ब्रह्म राम अजित भुवनेश्वर। कोठे लक्ष्मण पुसती करुणाकर।
तोच आला घेऊन तया मारुति सत्वर। प्रभु दुःखित पाहून अनुजास॥ ३
म्हणे जांबुवंत वैद्य सुषेण। राहातो लंकेत तया आणा जाऊन।
जाई लघु रूप घेऊन हनुमान। आणी त्वरित तया भवनासह॥ ४
राम पदारविंदी शिर नमवून। येताच तेथे वैद्य सुषेण।
गिरी औषधीचे नाम सांगून। म्हणे घेऊन ये ती पवनसुता॥ ५५
रामपदकमल हृदयी धरून। निघाला पवनसुत निज बल वानून।
तिकडे कालनेमिगृही जाई रावण। दूतांकरवी गुप्त वृत्त जाणताच॥ १
दशमुख निवेदी गुप्त समाचार। कालनेमि बडवी निज शिर वारंवार।
तुम्हा देखत जयाने जाळिले नगर। तयाचा पथ कोण अडवील॥ २
भजावे रघुपतीस साधावे कल्याण। वृथा वल्गना द्या नाथा सोडून।
तनु सुंदर श्याम नीलकंजसमान। नयनाभिराम तो हृदयी राखावा॥ ३
सोडा मी तू भेदभाव ममता मूढता। व्हा जागे महामोहनिशीं गाढ झोपता।
भक्षितो जो काळ सर्पास तत्त्वतां। तो स्वप्नी कधी रणी जिंकाल का॥ ४
ऐकून कोपला अति दशकंधर। मग कालनेमि करी विचार।
हितकर राम दूताच्या हस्ते मरण। हा दुष्ट रत पापसमूहात॥ ५६
रची मार्गी माया ऐसे चिंतून। निर्मिले सुंदर सर मंदिर उपवन।
देखता शुभ्र आश्रम तेथे चिंती हनुमान। मुनीस पुसून जल पिता जातील श्रम॥ १
राक्षस कपटे बैसे तेथे मुनिवेषांत। मायापति दूतास तो मोहू वांछित।
नमवी माथा जाऊन पवनसुत। रामगुणगाथा तंव सांगे मुनी॥ २
घोर हा रामरावणसंग्राम। नसे संदेह जिंकतील राम।
असे ज्ञान दृष्टीचे बहु बल मम। पाहतो मी सकल येथे राहून॥ ३
देई तो कमंडलु मागता जल। कपि वदे जल अल्प न पुरेल।
मुनि वदे करून ये वेगे स्नान निर्मल। मी दीक्षा देता तुज लाभो ज्ञान॥ ४
कपि प्रवेश करताच सरोवरात। मकरी धरी पद तयाचे त्वरित।
कपि वधी तिज तंव दिव्य तनु प्राप्त। चालली ती गगनी यानी चढून॥ ५७

जाहले निष्पाप हे कपि तव दर्शन घेता । मिटला मुनिवराचा शाप तात आता ।
कपि मम वचनी जाणावी सत्यता । नसे मुनि हा निशाचर घोर ।। १
ऐसे वदून गेली अप्सरा ती । तंव कपि येई निशाचराप्रती ।
घ्या गुरुदक्षिणा हे मुनि वदे मारुती । द्या मज मागाहून मंत्र ।। २
आपटी गुंडाळून पुच्छ मुनिशिरास । तंव मरताना प्रकटे निज तनूस ।
वदे हे राम राम सोडता प्राणास । चालला हर्षे ऐकून हनुमान ।। ३
न ओळखले औषध बघून गिरीसी । तंव कपि उपटी अकस्मात शैलासी ।
धावे धरून गिरी गगनी निशी । मग जाई कपि अयोध्येवरून ।। ४
भरत अति विशाल रूप पाहून । हा निशाचर ऐसे करी अनुमान ।
मारिला तयाने विनाफळ बाण । ताणून आकर्ण चापासी ।। ५८
पडला महीवर मूर्च्छित लागता सायक । स्मरून राम राम रघुनायक ।
प्रिय वचन परिसून धावे भरत । आला अति आतुर कपिसमीप ।। १
व्याकुळ बघून धरी हृदयी कपीस । न होई जागा जरी करी उपायास ।
भरत मनी दुःखी मुख उदास । बोले अश्रु आणून नयनी ।। २
जो विधाता करी रामविमुख मज । तोचि देत मज दारुण दुःख आज ।
जर असेल रामपदी मम प्रेम सहज । निष्कपट कायावाचामने ।। ३
जर रघुपति असतील मज अनुकूल । तर कपीचा जाईल श्रमशूळ ।
उठला कपीश ऐकून वचन सकल । वदून जय जय राम अयोध्याधीश ।। ४
धरिले तयाने हृदयी कपीस । तनु पुलकित येती अश्रु नयनास ।
तंव स्मरता रघुकुलटिलक रामास । तयाचे प्रेम हृदयी मावेना ।। ५९
सांग कुशल सुखनिधान रामाचे तात । कैसी माता जानकी अनुजासहित ।
निवेदी संक्षेपे सकल चरित । भरत पस्तावे मनी दुःखित होऊन ।। १
हाय दैवा का जन्मलो मी जगात । नसे उपयोग माझा प्रभूच्या काजात ।
कुसमय जाणून धरी धीर मनात । मग कपिसंगे बोले भरत बलवीर ।। २
हे तात होईल उशीर जाता जाता । कार्यासी विघातक प्रभात होता ।
चढावे मम बाणावर शैलासह आता । धाडितो तुज कृपाधाम रामाप्रती ।। ३
ऐकून कपिमनी उपजे अभिमान । मम भारासह कैसा जाईल बाण ।
मग रामाचा प्रभाव मनी चिंतून । कपि कर जोडून वंदन करी ।। ४
हे प्रभो तव प्रताप हृदयी ठेवून । नाथा बाणगतीने त्वरित जाईन ।
वदे ऐसे निरोप घेऊन । पदांसी वंदून निघे हनुमान ।। ६० (क)

भरताचे बाहुबल गुणागर। शील प्रभुपदी प्रीति अपार।
जाई प्रशंसा करीत पवनकुमार। वारंवार मानसात ॥ ६०(ख)
इकडे राम लक्ष्मणास निरखिती। ते मनुजासरिसवचन वदती ॥
राम अनुजास उठवून उरी धरिती। जंव येईना कपि उलटता अर्ध रात्र ॥ १
मी दुःखी कदापि न बघवे तुज। तव स्वभाव सदा मृदुल सहज।
मम हितास्तव सोडिले मातापिता निज। साहिले विपिनी आतपवातहिम ॥ २
कोठे ते प्रेम आता बाळा। न उठसी ऐकून मम आर्त वाणीला।
जर जाणतो वनी बंधुवियोगाला। न मानिले असते मी पितृवचन ॥ ३
सुतवित्तनारीभवन परिवार। मिळती जाती जगी वारंवार।
वत्सा जागा हो करून हा विचार। सहोदर भ्राता जगी पुन्हा न मिळे ॥ ४
जैसा पंखाविण खग अति दीन। मणिवाचून फणि वा गज सोंडविहीन।
भाऊराया मम जीवन तैसे तुजविण। जर जड दैव मज जगवील ॥ ५
कोणत्या मुखे जाऊ आता अयोध्येस। पत्नीस्तव गमावून प्रिय बंधूस।
साहीन कोणतेही जगी अपयश। स्त्रीहानीची मज न खंत ॥ ६
आता पुत्रा हा अपयश शोक अनिवार। साहील मम हृदय निष्ठूर कठोर।
निज जननीचा तू एकची कुमार। बाळा तिचा तू आधार प्राणाचा ॥ ७
सोपविले मजवरी तव करासी धरून। मी सुखद परम हितकारी जाणून।
काय देऊ उत्तर अयोध्येत जाऊन। बा तात का न सांगसी उठून तू ॥ ८
करिती बहु शोक शोकविमोचक भगवान। ढाळिती करुणाश्रु कमललोचनातून।
मनुजाची गति दाविती भक्तकृपाघन। उमे रघुराज एक अद्वितीय अखंड ॥ ९
प्रभूचा आक्रोश कानी ऐकून। होती व्याकुळ वानरगण।
तोच तेथे येई हनुमान। जणु करुणरसात मिसळे वीररस ॥ ६१
राम हनुमानासी हर्षे भेटती। प्रभु कृतज्ञ सुजाण अती।
तंव वैद्य त्वरित उपाय करिती। तोच उठून बैसे हर्षे लक्ष्मण ॥ १
प्रभु भेटती प्रेमे बंधूस। हर्ष होई सकला कपिरीसवृंदास।
मग पोचवी कपि सुषेण वैद्यास। आणिले जैसे जेथून तेथे तैसे ॥ २
ऐके दशानन हा वृत्तांत। पुन्हा पुन्हा बडवी शिर तया विषाद।
जाई कुंभकर्णापाशी शोकग्रस्त। करी जागृत तया विविध यत्ने ॥ ३
कैसे दिसे जागताच निशाचर। जैसा देहधारी काळ अपर।
कुंभकर्ण वदे सांग रे दशकंधर। हे बंधो का सुकले ऐसे मुख तव ॥ ४

सकल कथा कथी रावण अभिमानी । कैसी सीता आणिली हरण करुनी ।
वदे हे तात वधिले सकल राक्षस कपींनी । संहारिले अति महान योद्धेही ।। ५
दुर्मुख देवशत्रु मनुज-आहारी । सुभट अतिकाय अकंपन भारी ।
अपर महोदर-आदि राक्षस समरी । पडती सकल रणधीर वीर ।। ६
ऐकून दशाननाचे वचन । दुःखे अति विकल कुंभकर्ण ।
वदे आणलीस जगदंबा चोरून । आता दुष्टा इच्छिसी कल्याण ।। ६२
भले न केले तू निशाचरनाथा । आता का जागविले मज वृथा ।
सोडून अजून अभिमान असूरपालका । भजावे रामास साधेल कल्याण ।। १
हे दशशीर्षा आहे का मनुज रघुनायक । जयाचे हनुमानासम पाईक ।
हाय हे बंधो तव करणी घातक । मज प्रथम का न कथिलेसी ।। २
हे स्वामी केला विरोध तू देवास । जयाचे सेवक सुरब्रह्मामहेश ।
नारदे दिधले मज ज्ञान विशेष । कथिले असते मी परि न आता समय ।। ३
आता अखेरचे भेट मज कडकडून । भाऊराया करीन लोचनसाफल्य जाऊन ।
राम श्यामगात्र कमललोचन । बघेन जाऊन तो तापत्रयमोचक ।। ४
स्मरताच रामाचे रूपगुण । जाहला क्षण एक तो तल्लीन ।
मग मागवी कोटि घट मदिरा रावण । अनेक महिष कुंभकर्णास्तव ।। ६३
खाऊन महिषास करि मद्य सेवन । गर्जे विद्युल्लता आघातासमान ।
मदोन्मत्त रणमदधुंद कुंभकर्ण । नसे संगे सेना निघाला गड सोडून ।। १
आला बिभीषण सन्मुख तया पाहून । पडला चरणी निज नाम सांगून ।
लावी हृदयी अनुजासी उठवून । वाटे प्रिय तो जाणून रामभक्त ।। २
हे तात रावण मज करी लत्ताप्रहार । कथिता मी परम हितकार्यविचार ।
त्या दुःखे आलो रघुपतीप्रती अखेर । आवडलो प्रभूस दीन बघून ।। ३
बंधुराया ऐक रावण आता काळवश । तो न मानीत परम बोधास ।
वत्सा तू भूषण निशाचरकुळास । हे बिभीषणा तू धन्य धन्य ।।
बाळा उजळलेस तू वंशास । भजून शोभासुखसागर रामास ।। ५
कपट सोडून भज तू राम रणधीर । निजकर्ममतवचनअनुसार ।
जा वत्सा मी न जाणतो निज पर । जाहलो मीहि काळवश ।। ६४
निघाला बिभीषण बंधूचे वचन ऐकून । आला जेथे होते त्रैलोक्यविभूषण ।
वदे नाथा पर्वताकार शरीर घेऊन । येत आहे कुंभकर्ण रणधीर ।। १

इतुके जंव कपि ऐकती कानी । धावती हर्षे बलवान किलबिलुनी ।
पर्वततरूस घेती उचलुनी । फेकिती तयावरी दंत कटकटा चावून ।। २
कोटि कोटि गिरिशिखरप्रहारा । करिती रीसकपि एकच मारा ।
डगमगे न मन हलवी न शरीरा । जैसा गज न चळे रुईफळभाराने ।। ३
तंव मारी पवनसुत मुष्टीते । पडे धरणी व्याकुळ बडवी मस्तकाते ।
मग मारी उठून हनुमंताते । पडे त्वरित मूर्छित भूतळी हनुमान ।। ४
नलनीलासी आदळी महीवर । फेकिले अन्य भटां आपटून सर्वत्र ।
चालली वानरसेना पळुनी शीघ्र । न कोणी उभे सन्मुख भये त्रस्त ।। ५
केले अंगदादि कपि मूर्च्छित । सकल सुग्रीवासमवेत ।
दाबून कपिराजासी काखेत । चालला अमित बलसीमा असुर।। ६५
हे उमे दाविती रघुपति मनुजलीलेस । जैसा सर्पमेळावी खेळे खगेश ।
जो केवळ भृकुटिभंगे खाई काळास । ऐसे समर तया शोभा देते का ।। १
जगत्पावन प्रभुयशाचा विस्तार । जे यश गाता भवनिधि तरेल नर ।
जागा होऊन वायुसुत येई शुद्धीवर । तंव सुग्रीवाचा शोध करी ।। २
इकडे सुग्रीवाची मूर्च्छा गेली तोच । गळून पडे काखेतून भासवून मृत ।
कपीने कापले तयाचे नाक कान दंत । गेला गर्जत गगनी तदा तया कळले ।। ३
भूमी आदळे सुग्रीवास धरून चरण । मारी कपि कुंभकर्णा चापल्ये उठून ।
मग जाई रामाप्रती तो बलवान । वदे जय जय जय कृपानिधी ।। ४
नासिका कान कापले मनी जाणून । असुर फिरे म्लान मनी क्रुद्ध होऊन ।
सहज भीम परि कानानाकाविण । पाहून तया कपिदल भयभीत ।। ५
उद्घोषून जय जय रघुवंश मणी । धावती कपि हूप हूप करूनी ।
केली एकदाच मिळून तयांनी । गिरितरुवृष्टि कुंभकर्णावरी ।। ६६
रणरंगे कुंभकर्ण होऊन मत्त । चालला सन्मुख जणु काळ क्रुद्ध ।
धरधरून खाई कोटि कोटि कपिवृंद । जणु शिरती गिरिगुहेत टोळ ।। १
चिरडले कोटचवधि मर्दून देहास । मिसळले धुळीत तिंबून कोटीस ।
उदरातून निसटून पळाले कपिरीस । झुंड झुंड काननासिकामुखावाटे ।। २
गर्वित निशाचर रणमदमत्ते । ग्रासी विश्व जणु विधीने दिले तयाते ।
पळती न फिरती फिरविता सुभटाते । नेत्रांना न दिसे न परिसती पुकारता ।।३
उधळी कपिलदास कुंभकर्ण । आली रजनीचर धाड ते ऐकून ।
पाहती निज सेना व्याकुळ रघुनंदन । तैसे नानाविध दल शत्रूचे येताना ।। ४

ऐका सांभाळावी सेना हे लक्ष्मण। हे सुग्रीवा हे बिभीषण।
मी त्या दुष्टाचे दलबल बघेन। वदती राजीवनयन श्रीराम।। ६७
शोभे सारंग करी कटी तुणीर। रिपुदलनिर्दालना चालले रघुवीर।
करिती प्रथम प्रभु धनूचा टणत्कार। अरिदल होई बधिर ऐकून ध्वनी।। १
सत्यप्रतिज्ञ राम सोडती लक्ष शर। जणुं काळसर्प सपक्ष करिती फूत्कार।
चहुं बाजू जाती बाण शीघ्र। छेदिती ते भट पिशाच्च विक्राळ।। २
तुटून पडती पदउरशिर भुजदंड। किती एक वीर होती शतखंड।
मही मूर्च्छित पडती घायाळ उदंड। सावरून भट उठती पुन्हा लढती।। ३
लागता शर जलदापरी गर्जती। किती एक तीक्ष्ण शर बघून पळती।
विना मुंड प्रचंड रुंड धावती। उठे घोर ध्वनि धरा धरा मारा मारा।। ४
प्रभूच्या बाणांनी क्षणांत। कापिले निशाचर भयानक।
मग माघारी आले भात्यात। रघुवीरांचे सकल बाण।।६८।।
कुंभकर्ण करी मनी विचार। जाहला क्षणात राक्षससंहार।
होई अति क्रुद्ध बळवान वीर। करी मग तो गंभीर सिंहनाद।। १
त्वेषे उपटून महीधर। फेकी होते जेथे भारी भट वानर।
जंव देखती शैल रघुवीर। रजसम चूर करिती शरे फोडून।। २
मग धनुष्य ओढती कोपे रघुनायक। सोडती बहुतीक्ष्ण सायक।
तनु प्रवेशून शर कैसे निसटत। जैशा विजा चमकून शिरती घनी।। ३
तयाची तनु काळी शोभे स्रवता रुधिर। जणु वाहे गेरूचा पाट कज्जलगिरिवर।
व्यथित तया पाहून धावती रीसवानर। कपि निकट येताच विहसे कुंभकर्ण।।४
करी घोर महानाद गर्जून। कोटि कोटि कपींना पकडून।
दशशीर्षाची शपथ घेऊन। आपटी महीवरी गजराजापरी।।६९।।
धावू लागती रीसकपिगण। जणु मेषसमूह व्याघ्रास बघून।
हे भवानी चालले रीसकपि पळून। व्याकुळ पुकारत आर्तवाणीने।। १
दुष्काळासम हा निशाचर। येईल आता कपिकुल देशावर।
हे राम खरारि कृपासागर। शरणागत दुःखहारी रक्ष रक्ष।। २
ऐकून करुणपूर्ण वचन भगवान। चालले सज्ज करून धनुष्य बाण।
मग राम सेनेसी पाठीशी घालून। निघती कोपे बलशाली महा।। ३
धनुष्य ओढून सोडती शर शत। बाण सुटून घुसती तनूत।
लागता शर कुंभकर्ण क्रोधे धावत। तंव डगमगती भूधर धरा डोले।। ४

उपटला एक शैल तयाने। छाटला तोच भुज रघुकुलटिळकाने।
मग धावे धरून गिरी वामबाहुने। प्रभु भुज तोहि तोडून फेकती मही ।। ५
भुजाहीन तो दुष्ट शोभे कैसा। पंखहीन मंदर गिरि जैसा।
उग्र दृष्टीने प्रभूस विलोकी ऐसा। जणु गिळू पाही त्रैलोक्यासी ।। ६
करून चित्कार अति घोर। वदन पसरून धावे असुर।
होती गगनी त्रस्त सिद्धसुर। हाय हाय दुःखे पुकारती ।।७०।।
सुर सभय करुणानिधि जाणून। श्रवणापर्यंत ताणती शरासन।
बाणसमूहे भरती कुंभकर्णाचे आनन। तदापि न पडे भूमीवरी महाबळी ।। १
धावे सन्मुख मुख शरे पूरित। जणु काळभाताच सजीव धावत।
तंव तीक्ष्ण शर घेती प्रभु होऊन क्रुद्ध। धडापासून करिती शिर भिन्न ।। २
रावणासन्मुख पडले मस्तक। मणिविना फणीसम व्याकुळ होत।
प्रचंड धड धावता धरणी कंपित। तंव प्रभु छेदून द्विखंड करिती ।। ३
खंड पडती भूमी जणु नभातून भूधर। तयाखाली चिरडून कपिरीस निशाचर।
स्तिमित होती सकल मुनिसुर। जंव तयाचे शिरले तेज प्रभुवदनी ।। ४
सुर दुंदुभी हर्षे वाजविती। सुमनवृष्टि करून प्रभूस स्तविती।
प्रार्थना करून सुर सकल जाती। तोच येती नारद देवर्षी ।। ५
हरि गुणगण गगनी गाती मुनिवर। रुचले प्रभूस वीररसपूर्ण सुंदर।
मुनि गेले वदून वधा दुष्टास सत्वर। तंव राम रणांगणी शोभती येऊन ।। ६

रणभूमि माजी। श्रीराम शोभती। बलवान अती। कोशलेश।
मुखी श्रमबिंदु। राजीव लोचन। शरीर अरुण। रक्तकणे।
भुज युगलात। शरशरासन। रीसकपि गण। चहु दिशी।
प्रभूचे सौंदर्य। तुलसी म्हणत। न वानू शकत। शेषानन ।। १

निशाचर पापखाण अधम। तयासहि प्रभु देती निजधाम।
गिरिजे जो न भजे श्रीराम। तो नर मूढ मंदमती ।। ७१
अस्तमान होताच उभय दले फिरती। रणधुमाळीत सुभट श्रमती।
रामकृपे कपिदल बल वाढे अती। जणु प्रज्वलित अग्नितृण मिळता ।। १
घटती निशाचर संख्येने रात्रंदिन। जैसे निजमुखे सुकृत वर्णून।
वारंवार बंधूंचे मस्तक उरी धरून। बहु विलाप करी दशकंधर ।। २

रडती नारी करे छाती बडवून। तयांचे तेजबल विपुल वानून।
समजावी पित्यासी बहुकथा कथून। मेघनाद येताच ते अवसरी ।। ३
उद्याच पाहाल मम पुरुषार्थास। आत्ताच वृथा वल्गना कशास।
इष्ट देवतेने दिले ज्या बळरथास। तात न दाविला तो बलरथ तुम्हा ।। ४
यापरी वल्गना करता सरली रात्र। कपि रोधिती द्वारे चार।
इकडे काळासम रीसकपि महावीर। निशाचर रणधीर अति तिकडे ।। ५
झुंजती सुभट निज निज जयहेतू। न वर्णवे ते समर हे खगकेतू ।। ६
मेघनाद मायामय रथात। चढून गेला वर गगनात।
विकट हास्य करून गर्जत। कपिकटक भयभीत ऐकून ते ।।७२।।
शक्तिशूळतलवार कृपाणा। अस्त्रशस्त्रकुलिश आयुधे नाना।
फेकी तैसे परिघपाषाणा। मग बहु बाणांची वृष्टि करी ।। १
दशदिशा बाणांनी नभ व्याप्त। जणु नक्षत्र मघा मेघाची झड लागत।
धरा धरा मारा ध्वनि शिरे कानात। परि जो मारी तो न कळे कोणास ।। २
कपि धावले नभी गिरितरु घेऊनी। दुःखित फिरले जंव न दिसे कोणी।
अवघड घाट वाटा गिरिकंदरांतुनी। आच्छादिल्या मायाबळें शरपंजरे ।। ३
जावे कोठे म्हणून व्यथित वानर। जणू इंद्राच्या बंदीत गिरि मंदर।
पवनसुत अंगदनलनील वीर। सकला व्याकुळ करी बलशील मेघनाद ।। ४
मग सुग्रीवलक्ष्मणबिभीषण। तयांची करी तनु जर्जर शर मारून।
रामासवे झुंजता फेकी बाण। सुटताच लागती होऊन नाग ते ।। ५
जाहले सर्पपाशे बद्ध राम खरारी। स्ववश अनंत अद्वितीय अधिकारी।
करिता नाना कपट चरित्र नटापरी। स्वतंत्र सदा एक भगवान ।। ६
रणशोभेस्तव प्रभु घेती बांधून। भयभीत देव नागपाश पाहून ।। ७
गिरिजे जयाचे नाम जपुनी। सुटती भवबंधनातून मुनी।
कैसा राहू शके तो बंधनी। सर्वव्यापक विश्वाचा आधार प्रभू ।। ७३
हे भवानी या सगुण रामचरित्रात। बलबुद्धिवाणीने न करवे तर्क।
ऐसे चिंतून तत्त्वज्ञानी जन विरक्त। संशय सांडून भजती रामास ।। १
करी कपिसेनेस व्याकुळ घननाद। पुन्हा प्रकटून बोले कुशब्द।
अरे दुष्टा राहा उभा वदे जांबुवंत। ऐकून वाढला तयाचा अति क्रोध ।। २
रे मूर्खा वृद्ध जाणून वगळले तुजसी। अधमा आता पाचारितो मजसी।
ऐसे वदून चालवी तरळ त्रिशुळासी। तोच करी पकडून धावे जांबुवंत ।। ३

मारी मेघनादाचे छातीवरी। पडे मूर्च्छित सुरारि महीवरी।
बळ दावाया घुमवी आपटी भूवरी। अति क्रोधे तयाचे पद धरून ।। ४
न मरे मारता तो वरप्रसादाने। तंव पद धरून फेकला लंकेत तयाने।
इकडे धाडिले गरुडास नारदाने। त्वरित आला रामासमीप तो ।। ५
मग खगपति धरून भक्षीत। सर्पसमूह मायानिर्मित।
तंव सकल होती मायामुक्त। हर्षित जाहले कपिवृंद ।। ७४ (क)
गिरितरुनखपाषाण। कपि धावती क्रोधे घेऊन।
निशाचर भयभीत होऊन। पळती चढती गडावरी ।। ७४ (ख)
जाहला सावध मेघनाद मूर्च्छेतून। अति लज्जित होई पित्यास विलोकून।
करीन अजययज्ञ ऐसे मनी योजून। जाई शीघ्र गिरिवरकंदरी ।। १
बिभीषण वदे मनी करून विचार। ऐका प्रभो अतुलबल उदार।
करी मेघनाद यज्ञ अपवित्र। मायावी दुष्ट देवपीडक ।। २
स्वामी जर तो यज्ञसिद्धि पावेल। नाथ तो न वेगे जिंकिला जाईल।
ऐकून राम मानिती सुख तात्काळ। बोलावती अंगदादि कपिनाना ।। ३
बांधव हो तुम्ही लक्ष्मणासवे जाऊन। करा यज्ञाचे विध्वंसन।
मार तयासी रणी हे लक्ष्मण। सुर भयभीत पाहून मज दुःख ।। ४
बुद्धिबळउपाये मारा तयास। जेणे होईल निशाचरांचा नाश।
हे बिभीषण जांबुवंत कपीश। राहा तुम्ही तिघे सेनेसवे ।। ५
जंव अनुशासन देती रघुवीर। भाता कटी कसून चढवी चापशर।
प्रभूचा प्रताप हृदयी धरून रणधीर। लक्ष्मण बोले घनापरी गंभीर गिरा ।। ६
जर आज तया न वधताच येईन। रघुपतिसेवक मज न म्हणवीन।
घेता रामशपथ तया वधीन। जरी शत शंकर तया सहाय्य देतील ।। ७
रघुपतिचरणास वंदून अनंत। लक्ष्मण निघाला अति त्वरित।
घेऊन संगेत सुभट हनुमंत। अंगदमयंदनलनील ।। ७५
बघती कपि बैसलेल्या मेघनादास। देत रुधिर महिषी यांच्या आहुतीस।
कपि विध्वंसती सकल यज्ञास। जंव न उठे तो स्तविती तया ।। १
तदपि न उठे तंव केस उपटती। लाथा मारमारून पळून जाती।
हाती त्रिशूळ घेऊन धावता कपि पळती। येती मग लक्ष्मणासमीप ।। २
आला परम संतप्त अति क्रोधाने। गर्जे वारंवार घोर रवाने।
अंगद मरुतसुत धावती वेगाने। मारी त्रिशूळ तंव पडती ते महीवरी ।। ३

फेकी शूळ प्रचंड लक्ष्मणावर। अनंत द्विखंड करी तया मारून शर।
उठती पुन्हा अंगद पवनकुमार। मारिती कोपे तया परि न लागे घाव ॥ ४
रिपु मारता न मरे तंव फिरती वीर। धावे असुर करून घोर चित्कार।
पाहती जणु येई काळ क्रुद्ध शीघ्र। मग सोडी लक्ष्मण बाण तीक्ष्ण ॥ ५
बघे येताना वज्रासम बाण। दुष्ट त्वरित पावला अंतर्धान।
करी झुंज विविध वेष धरून। होई प्रकट केव्हा केव्हा गुप्त ॥ ६
रिपु अजिक्य बघून कपि भयभीत। परम क्रुद्ध होई तेव्हा अनंत।
खेळविले मी या पाप्यासी बहुत। लक्ष्मण मनी करी निश्चय दृढ ॥ ७
करी श्रीरामाच्या प्रतापाचे स्मरण। वीरोचित दर्पे करी शरसंधान।
शिरला हृदयी सुटताच तो बाण। केला मृत्युसमयी कपटाचा त्याग ॥ ८
कोठे रामानुज कोठे राम रघुनंदन। वदला यापरी सोडता प्राण।
वदती तया अंगदहनुमान। बा धन्य धन्य माता तव ॥ ७६
विना प्रयास उचली तया हनुमान। येई माघारी लंकेद्वारी ठेवून।
सुरगंधर्व मृत्यूची वार्ता ऐकून। चढून विमानी येती नभी ॥ १
वाजवून दुंदुभी सुमने वर्षती। श्रीरघुनाथाचे विमल यश गाती।
जय अनंत जय जगदाधार गर्जती। उद्धरिले देवास तुम्ही प्रभो ॥ २
सुरसिद्ध निघाले स्तुति करून। मग जाई रामाप्रती लक्ष्मण।
सुतवधाची वार्ता ऐकून दशानन। पडे मूर्च्छित धरणीवरी ॥ ३
मंदोदरी करी भारी रोदन। स्मरून पुत्रासी करी उरी ताडन।
शोके अति व्याकुळ नगरजन। रावण अति नीच सकल वदती ॥ ४
तंव नानापरी दशानन। करी सकल स्त्रियांचे सांत्वन।
म्हणे पाहा हृदयी विचार करून। नश्वररूप सकल जग ॥ ७७
तयांना करी ज्ञानाचा उपदेश रावण। आपण मंद नीच परि कथा पावन।
परोपदेशी कुशल बहु पंडित जन। परि आचरती तैसे नर अतिअल्प ॥ १
होई प्रभात संपून रात्र। रीसकपि व्यापिती द्वारे चार।
बोलावून सुभटा वदे दशकंधर। जयांचे मन आंदोलित रणी सन्मुख ॥ २
पळणे बरे आत्ताच तयाने। न मिळविली भलाई रणविन्मुखाने।
वाढविले वैर मी निजबाहुबळाने। रिपु चढाई करित। उत्तर देईना स्वये ॥ ३
वदून ऐसे पवनवेगी रथसज्ज करी। वाजती रणवाद्ये सर्वत्र समरी ॥ ४

चालले जणू कज्जलवावटळापरी । अतुलित बलवान सकल वीर ।
होती ते समयी अपशकुन अमित । परि विशाल भुजबळगर्वे तो न मानीत ।। ५

गळती आयुधे । न मानी शकुन । तैसा अशकुन । अति गर्वे ।
वाजीगजनाद । करून पळती । भट पडताती । रथातून ।
लांडगे गिधाड । खर तैसे श्वान । करिती रोदन । मुक्त कंठे ।
उलुक भासती । जणु काळदूत । ध्वनि भयानक । करितात ।। १

न लाभे तयास स्वप्नात । शुभ शकुन संपत्ति शांतचित्त ।
जो मोहवश भूतद्रोहीरत । कामासक्त विन्मुख रामास ।। ७८
निघाले अपार निशाचर कटक । चतुरंगी सेना बहु पथक ।
रथयानवाहन अनेक । पताकाध्वज नानावर्णी विपुल ।। १
चालले मत्त गजसमूह बहुत । जणु वर्षाऋतु मेघ पवने प्रेरित ।
समरी शूर बहु माया जाणत । बहुरंगी ब्रीदधारक वीरगण ।। २
शोभे सेना अति विचित्र । जणु सजवी तिज वसंत वीर ।
डगमगती पर्वत क्षोभती सागर । डोलती दिग्गज चालता कटक ।। ३
धूळ पसरता रवि आच्छादित । वसुधा व्याकुळ मरुत स्थगित ।
ढोलनगारे घोर रवे वाजत । जणु गर्जती प्रळयसमय मेघ ।। ४
भेरीतुतारी शहनाई वाजती । सुखद मारुरागे सुभटा सुखविती ।
केसरीनाद सकल वीर करिती । स्तविती निज निज पौरुष बळ ।। ५
ऐका वीरश्रेष्ठ हो वदे दशानन । मर्दुन टाका रीसकपिगण ।
उभय भूपसुतास मी वधीन । चालवी सेना सन्मुख वदून यापरी ।। ६
जंव कपीस समजे वार्ता ती । रघुवीराची शपथ घेऊन धावती ।। ७

काळासरिस ते । विक्राळ विशाल । कपिरीस दल । धावतात ।
जणु उडतात । सपंख भूधर । तयांचे निकट । नानावर्णी ।
नसे शंका मनी । घेती हाती वीर । दंतनखअस्त्र । तरु शैल ।
राममृगराज । दशाननगज । जय रघुराज । गर्जतात ।। १

उभय बाजू करून जयजयकार । निज निज जोडी बघती वीर ।
इकडे रामास तिकडे स्तवून दशकंधर । योद्धे परस्पर भिडती ।। ७९

रावण रथी विरथ रघुवीर। पाहून बिभीषण होई अधीर।
यापरी मनी संदेह प्रीति रामावर। चरण रामाचे वंदून वदे प्रेमे ।। १
नाथा न रथ ना कवच न पादत्राण। कैसा जिंकाल तो वीर बलवान।
ऐक हे सखया वदती कृपानिधान। विजयदायक रथ असे अन्य ।। २
शौर्यधैर्य ही रथचाके। सत्यशील दृढध्वजपताका तयाते।
बलविवेकदमपरोपकार अश्वांते। जोडिले क्षमासमताकृपारज्जूने ।। ३
ईशभजन सारथी सुजाण। ढालवैराग्य संतोषकृपाण।
बुद्धि शक्ति प्रचंड परशु दान। श्रेष्ठ विज्ञान कठिण कोदंड ।। ४
भाता जणु अचल निर्मल मन। शम यम नियमन नानाविध बाण।
कवच अभेद्य विप्रगुरुपूजन। यासम विजयासी न उपाय दुजा ।। ५
मित्रा ऐसा धर्मरथ असे जयापाशी। रिपु कोठेहि नसे जिंकण्या तयासी ।। ६
ऐक हे मित्रा मतिधीर। जयापाशी ऐसा दृढ रथ साचार।
जिंकू शकेल तो वीर। महा अजय संसाररिपू ।। ८०(क)
इकडे ललकारी दशकंधर। तिकडे अंगदपवनकुमार।
लढती रीसकपि निशाचर। आण निज निज स्वामींची घेऊन ।। ८०(ख)
सुर ब्रह्मादि नाना सिद्ध मुनी। नभातून पाहती रण चढून विमानी।
उमे तेथे तयासंगे राहून। बघत होतो मी रणरंग रामलीला ।। १
दोही दिशी वीररसाने धुंद वीर। कपि जयशील तयां रामबळ आधार।
करून आव्हान लढती परस्पर। एक दुजास पाडी मर्दून महीवरी ।। २
मारती छेदती धरती आपटती। शिर तोडून त्याच शिरे अन्या ताडती।
फोडून पोट भुजा उपटती। पद धरून धरणी फेकती वीरास ।। ३
रीसवीर निशाचरास पुरती भूमीत। घालती तयावर वाळु बहुत।
जणु अति क्रुद्ध काळ ऐसा दिसत। वानरवीर शत्रुविरुद्ध युद्धी ।। ४

कृतांता समान। क्रुद्ध कपिभट। गळताना रक्त। शोभे तनू।
मर्दती राक्षसा। वीर बलवान। जलदासमान। गर्जतात।
चापट्या मारती। दंतांनी चावती। पदे चुरडिती। अति क्रोधे।
चीत्कारती कपि। रीस छळबळा। दावूनिया खला। विनाशती ।। १
विदारती उर। गालांना फाडती। आंतडी घालती। कंठामाजी।
प्रल्हादाचा पती। विविध रूपांनी। समरअंगणी। खेळ खेळे।
त्वेषाने आपटा। धरा कापा मारा। मही नभी गिरा। गर्जे घोर ।। २

पाहून निज दल विचलित। घेऊन दशचाप वीस भुजांत।
निघाला दशानन चढून रथात। वदे गर्वे राक्षसा माघारी फिरा।। ८१
धावला परम क्रुद्ध दशकंधर। सन्मुख आले हुंकारत वानर।
प्रहार करिती एकाच समयी तयावर। तरुगिरीपाषाण घेऊन करी ।। १
शैल तयाच्या वज्रतनूस लागती। खंड खंड होऊन शैल फुटती।
रणोन्मत्त रावण कोपे अती। रथा थोपवून अचल उभा।। २
पडे तुटून चिरडून सर्वत्र कपिवीर। मर्दून काढी क्रोधाने रावण अनावर।
चालले पळून नाना अस्वलवानर। वदती वाचवा प्राण हे अंगदहनुमान।। ३
धावा सोडवा हो रघुवीर सुरपाल। हा दुष्ट आम्हा काळापरी खाईल।
पाही रावण कपि पळती सकल। सोडी दश चापांवरी रावण बाण ।। ४

बाण समुदाय। सोडी लंकापती। सर्पापरी जाती। गगनात।
धरणी आकाश। दिशा शरे व्याप्त। वानर पळत। दशदिशा।
उडे हाहाःकार। कपिरीसदल। वदती विकल। धावा रक्षा।
करुणासागर। रक्षक जनांचे। बंधु दुःखितांचे। रघुवीर।। १

निज दल विकल बघून। घेई धनुष्य हाती भाता कटी कसून।
चालला क्रोधित होऊन लक्ष्मण। रामपदी मस्तक नमवून।। ८२
का मारसी रीसकपीस रे खला। मी तव काळ विलोकी मजला।
सुत घातक्या लक्ष्मणा शोधीत होतो तुजला। आज तुज वधून छाती निववीन।। १
ऐसे वदून रावण सोडी प्रचंड बाण। लक्ष्मण तयांचे करी शत खंड।
फेकी कोटि आयुधे रावण। दूर करी लक्ष्मण तिळ तिळ कापून।। २
पुन्हा निज बाणे प्रहार करून। भंगे रावणाचा रथ सारथीस मारून।
फेकिले दश भाळी शत शत बाण। जणु सर्प प्रवेशती गिरीशिखरी ।। ३
शर शत मारी पुन्हा छातीत। पडे धरणीतळी होऊन मूर्च्छित।
उठे रावण प्रबळ जाता मूर्च्छा त्वरित। चालवी शक्ति दिलेली ब्रह्माने।। ४

प्रचंड असे ती। ब्रह्मदत्तशक्ति। लक्ष्मण छातीत। लागे साची।
पडे तो मूर्च्छित। उचली रावण। बळ अभिमान। जाई वृथा।
जया शिरी शोभे। ब्रह्मांड भुवन। जणु रजःकण। विराजत।
त्रिभुवनधनी। तया न जाणून। मूढ दशानन। उचलीत।। १

लक्ष्मणा न उचलू शकत पाही हनुमंत। धावे रावणाप्रती कठोर वचन वदत।
जंव येताना रावण पाही पवनसुत। करी घोर मुष्टिप्रहार दशानन ।। ८३
टेकी गुडघे कपि न पडे भूमीवर। उठे संभाळून मनी रोष अपार।
मारी मुष्टिका एक रावणास वानर। तंव पडे जणु शैल वज्राघाताने ।। १
मूर्च्छा जाताच उठे रावण। करी कपिबलाचे विपुल वर्णन।
वदे कपि धिग् धिग् मम पौरुष जीवन। हे देवद्रोह्या तू अजून जिवंत ।। २
ऐसे वदून कपि आणी लक्ष्मणासी। विस्मय वाटे पाहून दशाननासी।
वदती राम बंधो जाण निश्चयेसी। तू काळाचा भक्षक रक्षक देवांचा ।। ३
ऐकताच वचन लक्ष्मण बैसे उठुनी। ब्रह्माशक्ति ती दारुण गेली गगनी।
मग धावे कोदंड बाण घेऊनी। येई शत्रुसन्निध अति शीघ्र ।। ४

रथास भंगून। मारी सारथ्यास। व्यथित तयास। केले शीघ्र।
पडला विकल। मही दशानन। उरी शत बाण। विंधताच।
दुसरा सारथी। घालून रथात। त्वरित लंकेत। नेई तया।
रघुवीरबंधु। प्रताप महान। प्रभूसी नमन। करी तदा ।। १

तिकडे मूर्च्छा जाताच लंकेश। करू लागे काही यज्ञ कार्यास।
रामाचा वैरी वांच्छी विजयास। मूर्ख हट्टवशे अति अज्ञानी ।। ८४
हा समाचार समजे बिभीषणास। त्वरित जाऊन सांगे रघुपतीस।
नाथा करी एक यज्ञ लंकेश। सिद्धि पावता अभाग्यास नसे मरण ।। १
हे प्रभो पाठवावे वेगे कपिवीरास। करितील विध्वंस रणी येईल लंकेश।
प्रभाती प्रभु धाडती प्रबळ सुभटांस। तंव धावती अंगदहनुमानादी ।। २
कपि उड्डाण करून लीलया लंकी चढती। निर्भय मने रावणभवनी शिरती।
यज्ञ करीत असता तया पाहती। तंव विशेष क्रोध येई कपीस ।। ३
निर्लज्जा आला पळून रणातून गृहास। बैसला येथे लावून बकध्यानास।
वदून अंगद लाथा मारी तयास। मूर्ख न बघे मग्न स्वार्थात ।। ४

जंव न बघे तो। क्रुद्ध कपिगण। दातांनी चावून। लाथा देती।
काढती बाहेर। तयाच्या स्त्रियांस। ओढता केसास। आक्रंदती।
काळासम क्रुद्ध। रावण उठत। धरी कपिपद। फेकी वेगे।
केलेले कपींनी। यज्ञविध्वंसन। पाहून रावण। मनी कष्टी। १

त्वरित विध्वंसून यज्ञासी । येती कुशल कपि रघुपतिपाशी ।
क्रुद्ध निशाचरपति निघे जाण्यासी । सोडून आशा जीवनाची ।। ८५

निघतांना होती अपशकुन भयंकर । गिधाडे बसती उडून शिरावर ।
वदे रावण वाजवा युद्धाचा डंका शीघ्र । जाहला कालवश न मानी अपशकुन ।। १

चालली निशाचरसेना अपार । गजरथ पददल अश्ववीर ।
जैसा शलभसमूह धावे अग्नीवर । प्रभूसमोर धावती खल तैसे ।। २

इकडे देव स्तविती रामास । दुष्टाने दिले आम्हा दारुण दुःखास ।
हे प्रभो न खेळवा अधिक तयास । अति दुःखित होत जानकी ।। ३

देवांचे वचन ऐकून प्रभु हसती । उठून रघुपति शर सज्ज करिती ।
जटाजूट दृढ शिरी बांधती । शोभती गुंफित पुष्पे तयामधुनी ।। ४

अरुण नयन तनु घनश्याम । अखिल लोकलोचनअभिराम ।।
कसती कटी परिकर तुणीर श्रीराम । धरिती करी कठोर कोदंड शारंग । ५

बाणाचे आगर । कटीसी निषंग । हातात शारंग । शोभतसे ।
भुजदंड पुष्ट । भरदार रुंद । उरी भृगुपद । विलसते ।
ब्रह्मांड दिग्गज । शैलकूर्ममही । महासिंधू अही । कापतात ।
म्हणत तुलसी । जंव रघुवीर । करी चापशर । फिरविती ।। १

प्रभूची सुषमा बघून हर्षित सूर । सुमने वर्षती तयांवर अपार
वदून जय जय जय करुणाकर । बळलावण्यगुणागार ।। ८६

त्या अवधीत निशाचरकटक । येई परस्परा आपटत घनदाट ।
बघून सन्मुख चालले कपिभट । जणु प्रलयकाळी मेघपटल ।। १

बहु कृपाण तलवारी लखलखती । जणु दशदिशास दामिनी चमकती ।
गजरथअश्व यांचा रव कठोर अती । जणु गर्जे घोर घनसमूह ।। २

विपुल कपिपुच्छाने नभ व्याप्त । जणु सुंदर इंद्रधनुष्याचा उदय होत ।
उडता धूळ विपुल जलधारा भासत । अपार वृष्टि जणु बाणबिंदूंची ।। ३

उभय पक्ष करिती शैलप्रहार । वाटे येई वज्रपात वारंवार ।
बाणांची झोड लावती कोपे रघुवीर । तंव जाहले घायाळ निशाचरदल ।।४

लागता बाण चीत्कारती वीर । घुमघुमून मही मूर्च्छित पडती सर्वत्र ।
जणु वाहती शैलातून रुधिरनिर्झर । रुधिसरिता भीतिप्रद भ्याडास ।। ५

भ्याडासी भिववी । सरिता रक्ताची । अपवित्र साची । वाहे पुढे ।
दल दोन तट । रेती रथचूर । आवर्त हे चक्र । भयानक ।
विविध वाहने । गजपदचर । तुरगादि खर । जलजंतू ।
ढाल ते कासव । शरशक्ति सर्प । तरंग ते चाप । रक्त सरी ।। १

तीरी तरुपरी पडती महीवर वीर । तरंगे मज्जा फेनापरी तयावर ।
बघून थरथरती भ्याड कातर । परि सुख वाटे सुभटांना ।। ८७
भूतपिशाच्च वेताळ शिवगण । विक्राळ महा झोटिंग करिती स्नान ।
उडती काककंक भुजा घेऊन । हिसकून दुजापासून गिळती ।। १
वदे कोणी एक येथे इतुकी सुबत्ता । मूर्खंहो न जाई तरी तुमची दरिद्रता ।
वीर पडती अर्धजळी मृत्यु समीप येतां । तैसे ते घायाळ पडती कण्हत तटी ।। २
गिधाडे खेचती आंतडी तटी बसून । जणु धरती कोळी गळी मीन मन लावून ।
प्रेते वाहता वर बैसती खग चढून । जणु नौकाक्रीडा करिती सरितेत ।। ३
रक्त कवटीत योगिनि सांचविती । नभी भूतपिशाच्च यांच्या वधु नाचती ।
चामुंडा कपाल डफावर ताल धरिती । गाती गीते नानाविध ।। ४
गृध्रनिकर कटकटत प्रेता फाडती । भक्षिती हू हू करून अन्या दापिती ।
मुंडविना कोटि रुंड गरगर फिरती । धडाविना वदती शिर जय जय ।। ५

जयजयकार । करतात मुंड । शिराविण रुंड । धावतात ।
खग खापरीत । झुंजून मरती । भट ढकलती । अन्य भटा ।
निशाचरगण । वानर मर्दिती । दर्पयुक्त होती । रामबळे ।
संग्रामअंगणी । सुभटा शयन । झाले गतप्राण । रामबाणे ।। १

रावणहृदयी करी विचार । जाहला सकल निशाचरांचा संहार ।
कपिरीस विपुल मी एकला वीर । आता रचितो माया मी ।। ८८
देव बघती पदचर प्रभूस । उपजे उरी तंव तयांच्या क्षोभ विशेष ।
सुरपति पाठवी त्वरित निज रथास । सारथी मातलि आणी हर्षे रणी ।। १
तेजःपुंज रथ दिव्य अनूप । हर्षे चढती राम कोशलपुर भूप ।
अश्व चंचल चारी मनोहर रूप । गति शीघ्र मनासम अजर अमर ।। २
पाहून रथारूढ रघुनाथास । कपि धावती पावून बळ विशेष ।
कपींचा मार न साहवे रावणास । तंव तो निज माया विस्तारी ।। ३

न बाधली ती माया रघुवीरास । लक्ष्मण कपि मानती सत्य मायेस ।
जंव कपि देखती निशाचरसेनेस । तंव तेथे बघती अनुजासह बहु राम ।। ४

श्रीराम लक्ष्मण । विपुल पाहून । कपिरीसमन । भयभीत ।
लक्ष्मणासहित । रामास पाहत । चित्रांत लिखित । उभे स्थानी ।
दलास चकित । हंसती पाहून । राम चापबाण । लावतात ।
माया हरि हरी । निमिष मात्रांत । सकल मुदित । कपि दल ।। १

मग राम सकलांप्रती पाहून । बोलती अति गंभीर वचन ।
अति श्रमित तुम्ही कपिगण । वीरहो पाहा आतां युद्ध द्वंद्व ।। ८९
वदून ऐसे राम चालविती रथास । वंदून विप्रचरणकमलास ।
तंव अति क्रोधित होऊन लंकेश । आला सन्मुख ललकारत गर्जत ।। १
रणी तुम्ही जिंकिले ज्या वीरांस । तयासम नसे मी ऐक हे तापस ।
मी नामे रावण जाणत जग मम यश । ठेविले जयाने बंदीत लोकपाल ।। २
वधिले तू खरदूषणकबंधास । व्याधापरी वधिले बिचाऱ्या वालीस ।
संहारिले निशाचरवीरनिकरास । तैसेच कुंभकर्ण घननाद ।। ३
त्या वैराचा आज सूड घेईन । भूपा न जाशील जर रणातून पळून ।
रे दुष्टा करितो आज तुज काळाआधीन । बरा सापडला या क्रूर रावणास ।।४
ऐकून दुर्वचन जाणती तया कालवश । हसून वदती कृपाळू राम वचनास ।
नको वल्गना दाखव पुरुषार्थास । सत्य सत्य सर्व तू कथिले ते ।। ५

नकोत वल्गना । मिळव सुयश । ऐक तू नीतीस । क्षमा करी ।
संसारी असती । त्रिविध पुरुष । गुलाब फणस । आम्रासम ।
एकासी सुमन । एका पुष्पफळ । फळच केवळ । लागे एका ।
वदतात कोणी । वदती करिती । अन्य न वदती । करितात ।। १

रामाचे वचन ऐकून विहसे रावण । म्हणे मज शिकवितो ज्ञान ।
आता वाटती तुज प्रिय प्राण । तंव वैर धरता न भय तुज ।। ९०
दुर्वचन वदून क्रुद्ध झाला दशकंधर । सोडू लागे मग वज्रासम शर ।
धावती बाण नानाकार । व्यापिती दिशा उपदिशा गगन मही ।। १
अग्निबाण सोडती रघुवीर । क्षणात जळले निशाचराचे शर ।
चिडून मग रावण फेकी शक्ति तीव्र । परतविती तिज प्रभु शरासंगे ।। २

चालवी कोटी चक्र त्रिशूळ । विनाप्रयास प्रभु तोडिती सकल ।
होती कैसे रावणाचे बाण निष्फळ । जैसे सकल मनोरथ खलाचे ।। ३
मातलीस मारिले तयाने शत शर । जय जय राम वदून पडे भूमीवर ।
रामकृपे सूत मातलि उठे सत्वर । तंव येई प्रभूस परम कोप ।। ४

युद्धी रिपूवरी । क्रुद्ध रघुवीर । भात्यामाजी शर । उतावीळ ।
ऐकून प्रचंड । कोदंडाचा ध्वनी । निशाचरगणी । वात भरे ।
मंदोदरी उर । जाहले कंपित । कुर्म भू पर्वत । होती त्रस्त ।
दिग्गज चित्कार । धृत मही दंती । कौतुक पाहती । सुर हर्षे ।। १

चापास ताणून आकर्ण । सोडती प्रभु कराल बाण ।
निसटती रामाचे शरगण । जणु जाती चमकून सळसळत सर्प ।। ९१
सुटती बाण जणु पंखासहित उरग । प्रथम मारिती ते सारथी तुरग ।
केतुपताका पाडिती करितो रथभंग । गर्जे रावण परि अंतरी थके बळ ।। १
चवताळून चढे अन्य रथावर । सोडी शस्त्रअस्त्र नाना प्रकार ।
होती तयाचे प्रयत्न विफल सत्वर । जैसे परद्रोही रत नराचे ।। २
तंव दश शूळ भिरकावी रावण । अश्व चारीहि रामाचे पडती मरून ।
क्रुद्ध रघुनायक अश्वांस उठवून । सोडती बाण ताणून धनुष्यासी ।। ३
रावणाच्या शिरकमलवनात । रामशरभृंगावलि विचरत ।
राम दश भाळी दश दश शर मारीत । निघता ते पार वाहती पाट रक्ताचे ।। ४
रक्तप्रवाह वाहे परि धावे बलवान । पुन्हा प्रभू करिती चापशरसंधान ।
सोडती रघुवीर तीस बाण । तंव पडती शिर मही भुजासह ।। ५
कापतांच होती शिर नवीन सत्वर । तोडती राम तयाचे पुन्हा भुज शिर ।
प्रभु छेदिती भुजशिर वारंवार । परि छाटता होती त्वरित नूतन ती ।। ६
पुन्हा पुन्हा प्रभु छाटती भुज शीर्ष । सहज लीला करिती कोशलाधीश ।
यापरी व्याप्त शिरबाहूने आकाश । जणु जमले अमित केतुराहू ।। ७

जणु राहु केतु । गगनी बहुत । स्रवतात रक्त । धावतात ।
रघुवीर तीर । प्रचंड सोडती । परि न पडती । महीवरी ।
एक एक शरे । छेदिता शिरासी । अगणित कैसी । शोभतात ।
जणु क्रुद्ध भानु । करनिकरात । राहूसी ओवीत । चहू दिशी ।। १

जो जो प्रभु उडविती शिर । तो तो ती होती अपार ।
जैसे विषयभोग सेवता होती अनावर । कामवासना नित नूतन प्रतिदिनी ॥९२
शरांची वाढ पाहून रावण । होई क्रोधित विसरे मरण ।
गर्जे कर्कश मूर्ख अभिमानी महान । धावे ताणून दश धनुष्यास ॥ १

संतप्त समरभूमीवर दशकंधर । तोडला रघुपतीचा रथ वर्षून शर ।
रथ तेथे न दिसे घटिकाभर । जणु लोपे दिनकर धुक्यामाजी ॥ २

जंव सुर हाहाकार करिती । प्रभु अति क्रोधे तंव धनुष्य उचलती ।
शरास सारून शत्रूचे शिर कापिती । व्यापिती ती दिशा उपदिशा मही ॥ ३

भग्न शिरे नभमार्गी धावती । करून जय जय भय निर्मिती ।
वदती कोठे रघुवीर कोशलपती । कोठे कपीश सुग्रीव लक्ष्मण ॥ ४

सांगा कोठे राम । वदे शिरगण । कपि ते ऐकून । पळतात ।
रघुवंश मणी । धनुष्य ताणून । वेधती हसून । मस्तकास ।
शिरमाळा घेती । कालिका हातांत । बहु वृंद वृंद । मिळुनीया ।
नाहून निघती । नदीत रक्ताच्या । समरवटाच्या । पूजनासी ॥ १

मग क्रोधित होई दशकंठ । सोडी शक्ति अति प्रचंड ।
भासे जणु काळाचा दंड । बिभीषणा समीप येताना ॥ ९३
येताना पाहून अति घोर शक्ती । दीनवत्सल निज पण सांभाळिती ।
त्वरित बिभीषणासी पाठी घालिती । साहून निज सन्मुख स्वये राम ॥ १

शक्ति लागता क्षण मूर्च्छा येई प्रभूस । हा खेळ प्रभूचा परि दुःख देवास ।
बिभीषण बघून श्रमित रघुवरास । धावे क्रोधे करी घेऊन गदा ॥ २
वैर तव सुरमुनिनाग यासी । आदरे अर्पिली तू शिरे शिवासी ।
मिळविली कोटी शिरे एक एका शिरासी । रे कुभागी कुबुद्धि नीच मूर्खा ॥ ३
त्या कारणे दुष्ट तू अजून जिवंत । आता काळ तव शिरी नाचत ।
रामासी द्रोह करून संपदा वांछीत । ऐसे वदून छातीत मारी गदा ॥ ४

छातीत लागता । गदेचा प्रहार । भीषण कठोर । पडे मही ।
दश मुखांतून । रक्तासी ओकित । त्वेषे तो धावत । सांभाळून ।
अति शूर मल्ल । उभय भिडती । प्रहार करिती । एकमेका ।
रघुवीरबळे । गर्व बिभीषणा । न गणी रावणा । निजसम ॥

उभे रावणासन्मुख राहून बिभीषण । बघे का कधी तयाप्रती नेत्र भिडवून ।
परि आता करी युद्ध काळासमान । हा प्रभाव श्रीरघुवीराचा ।। ९४
अति श्रमित बिभीषणास बघून । धावे धरून गिरि हनुमान ।
रथतुरगसारथीस संहारून । मारी लाथा वक्ष:स्थळी रावणाच्या ।। १
गात्रे कंपित उभा राही रावण । भक्तरक्षकाप्रती जाई बिभीषण ।
मारी रावण मारुतीस पाचारून । कपि पुच्छ पसरून गेला गगनात ।। २
कपीसह उडे रावण पुच्छ धरूनी । झुंजे हनुमान माघारी वळुनी ।
करती सम योद्धे द्वंद्व गगनी । क्रोधित होऊन ताडिती परस्परा ।। ३
कपटबळ करिता नभी कैसे शोभती । जणू कज्जलगिरि सुमेरु लढती ।
बुद्धिबळे पाडिता न पडे लंकापती । तंव हनुमंत करी प्रभूचे स्मरण ।। ४

स्मरून राघवा । वीर हनुमान । मारी पाचारून । दशानना ।
उठती लढती । पडून धरणी । सुर जयध्वनी । करितात ।
पडला संकटी । पाहून मारुती । कपिरीस होती । क्रोधातुर ।
रणमदोन्मत्त । रावण मर्दीत । सुभटा समस्त । भुजबळे ।। १

जंव पाचारती रघुवीर । तंव धावती प्रचंड वानर ।
प्रबळ कपिदळ पाहून दशकंधर । निज माया प्रकट करी ।। ९५
अंतर्धान पावला रावण क्षण एक । पुन्हा प्रकटे दुष्ट रूपे अनेक ।
जितुके कपिरीस रघुपति सेनेत । तितुके प्रकटती रावण सर्वत्र ।। १
कपि देखती दशकंधर अगणित । रीसकपि पळती होऊन भयभीत ।
वानर धावती धीर न धरीत । पुकारती रक्ष रक्ष लक्ष्मणा रघुवीरा ।। २
दशदिशा धावती कोटि रावण । गर्जती ध्वनि घोर कठोर भीषण ।
वदून पळती भयानें सकल सुरगण । सोडा आता आशा विजयाची बंधु हो ।।३
सकल सुरास जिंकी एक दशकंधर । जाहले बहु आता प्रवेशावे गिरिकंदर ।
उरले ज्ञानी मुनि ब्रह्मा शंकर । जे जाणती अल्पसा महिमा प्रभूचा ।। ४

जाणती प्रताप । निर्भय राहती । कपि मानताती । रिपु सत्य ।
सभय पळती । कपिरीस दळ । रक्ष हे कृपाळ । प्रार्थितात ।
मारुति अंगद । नल नील वीर । रणधुरंधर । झुंजतात ।
मायेनें निर्मित । दशानन कोटी । मर्दून काढती । कपिरीस ।। १

पाहून व्यथित सुरवानरास । करिती हास्य कोशलाधीश ।
वधिती सकल कोटी दशाननास । राम एक शर ताणून धनुष्य सारंगा ।। ९६
प्रभु नष्ट करिती माया एका क्षणात । जैसा रवि उगवता तम नष्ट ।
रावण एकच पाहून सुर हर्षित । वर्षती पुष्पे प्रभुवरी येऊन माघारी ।। १
उचलून भुजा प्रभु कपीस वळविती । परस्परा पुकारून माघारी जाती ।
प्रभूचे बळ पावता कपिरीस धावती । आले त्वेषे ते चंचल रणी शीघ्र ।। २
सुर प्रभुस्तुति करिताना देखे रावण । चित्ती जाणिले यांनी मी एकच दशानन ।
तुम्ही सदा मारखाऊ मूर्खांनो सुरगण । ऐसे कोपे वदून पळे गगनी ।। ३
सुर धावती करीत हाहाकार । दुष्टांनो मम पुढती कोठे जाणार ।
धावे अंगद बघून व्यथित सुर । रावणाचा पद धरून आपटी मही ।। ४

पाडून मारीत । लाथा वालिसुत । प्रभुपाशी जात । झडकरी ।
उठे दशानन । करी रव घोर । गर्जत कठोर । कर्ण कटू ।
दश शर लावी । दर्पे धनुष्यास । वर्षित शरास । अनिवार
सकल वीरांस । करून घायाळ । होता भयाकुल । देखे हर्षे ।। १

तंव तोडिती रावणाचे भुजशिर । शरचापासह रघुवीर ।
कापिता पुनरपि वाढती अपार । जैसे पाप वाढे तीर्थक्षेत्री केलेले ।। ९७
पाहून शत्रूचे शिरभुज वर्धित । होती कपिरीस रुष्ट बहुत ।
न मरत मूर्ख छेदून भुज मस्तक । तंव क्रोधे धावती वानर ऋक्ष भट ।। १
नल नील मारुति वालिकुमार । वानरराज द्विविद बलशील वीर ।
वृक्षभूधरे करिती प्रहार । तेच गिरि तरू मारी कपीस लंकेश ।। २
पळे कोणी रिपुवपूस नखे विदारून । दुजा निसटे लाथा मारून ।
तंव नलनील शिरावर चढून । विदारिती ललाट नखाने ।। ३
पाहता रक्त विषाद रावणाचे उरी । तया धराया भुजास पसरी ।
न सापडती जरी फिरती करावरी । जणु कमलवनी संचरे भ्रमर युगल ।। ४
मग मारून उडी धरी क्रोधे उभयांस । पाडती दोघे तया भूमी मुरडून भुजांस ।
कोपे घेई हाती रावण दश धनुष्यांस । करी कपीस घायाळ मारून शरे ।। ५
केले मूर्च्छित हनुमंतादि वानर । संध्या समय होता हर्षित दशकंधर ।
पाहून मूर्च्छित कपिवीर । धावे रणधीर जांबुवंत ।। ६

होते सवे रीस भूधरतरूधारी । पाचारून रावणा ते ताडिती भारी ।
जाहला अति क्रुद्ध बलवान सुरारी । पद धरून आपटी भट नाना धरणी ।। ७
देखून जांबुवंत निज दलघात । क्रुद्ध होऊन मारी छातीवरी लाथ ।। ८

लागता प्रचंड । उरी लाथाघात । व्याकुळ विरथ । पडे मही ।
निज वीस हस्ती । धरी वीस वीर । कमली भ्रमर । भासतात ।
मूर्च्छित पाहून । लाथांनी मारून । जाई जांबुवान । प्रभूपाशी ।
जाणे निशाकाल । रावण सारथी । ठेवी तया रथी । करी यत्न ।। १

रीसकपींची मूर्च्छा होताच दुरी । आले प्रभुपाशी सर्व सत्वरी ।
निशाचर होऊन भयभीत भारी । घेरिती सुरारि रावणासी ।। ९८
तेचि रात्री सीतेप्रती जाऊन । त्रिजटा करी कथा निवेदन ।
शत्रूची शिरभुजा वाढती ऐकून । सीतेच्या हृदयी भय उपजे ।। १
वदन म्लान वाटे मनी चिंता । तंव वदे त्रिजटेस सीता ।
माते घडेल काय का न सांगसी आता । हा विश्वदुःखदाता कैसा मरेल ।। २
रघुपतीच्या शरे शिर तुटून न मरत । विधाता दावी सकल चरित्र विपरीत ।
मम दुर्भाग्य ठेविते मज जिवंत । करी दूर प्रभुपदकमलापासून ।। ३
जे करी कपट कनकमृग प्रकट । तेच दैव आज जाहले मजवरी रुष्ट ।
तोच विधाता दुःसह दुःख साहवीत । वदवी कटुवचन लक्ष्मणास ।। ४
रघुपतीचे विरहविषबाण । तेच मारती मज बहु वार रोख रोखून ।
ऐशा दुःखात जे राखी मम प्राण । तेच दैव रक्षी रिपूस न अन्य ।। ५
करी विलाप जानकी बहु यापरी । वारंवार कृपानिधीचे स्मरण करी ।
वदे त्रिजटा ऐक हे राजकुमारी । लागता शर उरी रावण मरेल । ६
परि न मारती प्रभु शर छातीत । चिंतिती वैदेही वसे तयाच्या हृदयात ।। ७

रावणहृदयी । जानकी वसत । जानकी उरात । मम वास ।
मम उदरात । ब्रह्मांडे अनेक । बाण लागताच । सर्व नाश ।
हर्ष खेद मनी । ऐकून वचन । त्रिजटा पाहून । वदे तदा ।
सोड हा संदेह । ऐक गे सुंदरी । रिपु ऐशापरी । मरेल गे ।। १

पुन्हा पुन्हा शिर तुटता होईल विव्हळ । मग तयाचे तव ध्यान सुटेल ।
तंव सुजाण श्रीराम करितील । रावण हृदयी शरमार ।। ९९

ऐसे तिज नानापरी समजावुनी । त्रिजटा गेली निज भवनी ।
उपजे विरहव्यथा वैदेहीमनी । रामशीलाचे स्मरण होता ।। १
बहुपरी निंदी निशाशशीसी । न संपे निशा भासे युगसम तिजसी ।
ऐसा अति विलाप करी मानसी । जानकी दुःखित रामविरहे ।। २
जव विरहे हृदयी दाह होत । तंव वामबाहु नयन स्फुरत ।
शकुन जाणून धीर धरी मनात । आता रघुवीर कृपाळु भेटतील ।। ३
इकडे होई जागा मध्य रात्री रावण । वदे निज सारथ्यावरी रुष्ट होऊन ।
रे मूर्खा का आणले मज रणभूमीतून । धिक्कार धिक्कार अधमा मूढमती ।।४
समजावी सारथी पदा धरून । मग जाई वेगे प्रभाती रथी चढून ।
ऐकून दशाननाचे आगमन । बहु खळबळ माजे कपिदली ।। ५
चहुं बाजूने भूधर तरू उपटून । धावती भारी भट क्रोधे दंत खाऊन ।। ६

धावतात रीस । विक्राळ वानर । कठिण भूधर । करी घेती ।
होती अति क्रुद्ध । प्रहार करिती । असुर धावती । अति वेगे ।
उधळून दल । कपि बळवंत । रावणा घेरीत । रणांगणी ।
मारती चापटचा । जर्जर करिती । नखे विदारीती । शरीरास ।। १

पाहून महा प्रबळ मर्कट । रावण करी विचार मनात ।
होऊन अंतर्धान निमिषांत । करी निजमायेचा विस्तार ।। १००
जंव रचीत तो पाखंड । प्रकट होत जंतू प्रचंड ।
वेताळ भूतपिशाच्च । करि धरिती धनुनाराच ।। १
तलवार योगिनि धरिती । अन्य करी नरकरवंटी ।
करितात शौणित पान । नाचून करिति गायन ।। २
धरा मारा ध्वनि भीषण । चहुं बाजू राही भरून ।
जंव धावती मुख वासून । तंव वानर जाती पळून ।। ३
कपि जाती धावून जेथे । आग बघती तेथे तेथे ।
कपि अस्वल अति व्याकुळ । वर्षी तो वाळू विपुल ।।
चकित कपिऋक्ष सर्वत्र । गर्जे तंव दशकंधर ।
सौमित्र कपिशसमवेत । सकल वीर होती अचेत ।। ५
हा राम हा रघुनाथ । भट वदून चोळती हात ।
एकवटून ऐसे बळ तो । मग अन्यचि माया रचितो ।। ६

प्रकट करी बहु हनुमान । धावती धरून पाषाण ।
घेरिती ते श्रीरामास । योजून दल चहु बाजूस ।। ७
नच सोडा मारा धरून । वदती हुप पुच्छ उचलून ।
दशदिशी पुच्छ शोभत । त्यांमध्ये कोशलनाथ ।। ८

वानरांच्यामध्ये । श्यामल सुंदर । श्रीराम शरीर । शोभे ऐसे ।
बहु इंद्रधनू । वृक्षासी घेरीत । तमाल उत्तुंग । जणू भासे ।
हर्ष खेद सुरां । पाहून प्रभूस । जय जय घोष । करितात ।
रघुवीर क्रुद्ध । एकाच बाणात । निमिषमात्रात । माया हरी ।। १

गत माया हर्षे । वानर अस्वल । घेती तरु शैल । धावतात ।
शरसमूहास । श्रीराम सोडती । धरणी पडती । शिर भुजा ।
श्रीरामरावण । समर चरित । कल्पांती अनेक । गातील जे ।
सुकवि शारदा । शत शेष श्रुती । गाता न पावती । अंत कदा ।। २

वानीत त्या काही प्रभुगुणांस । मी जडमति तुलसीदास ।
जैसे जाणून निजबल पौरुष । उडे मक्षिका आकाशी ।। १०१ क
प्रभु तोडती भुज शिर वारंवार । परि न मरे वीर दशकंधर ।
क्लेश बघून व्याकुळ मुनिसिद्धसुर । जरी प्रभु दाविती निज लीला ।।१०१ ख
वाढे शिरसमूह शिरे छेदता । जैसा वाढे लोभ प्रतिलोभ पावता ।
मरे न रिपु श्रम विशेष होता । तंव बघती बिभीषणाप्रती राम ।। १
उमे जयाच्या इच्छामात्रे सरतो काळ । भक्तपरीक्षा करी तो कृपाळ ।
ऐका हो चराचरनायक प्रणतपाळ । सुरमुनींसी सुखद सर्वज्ञ ।। २
नाभीस्थानी रावणाच्या वसे अमृत । नाथा ते बळ ठेवी रावणास जिवंत ।
बिभीषणाचे वचन ऐकून कृपानिकेत । हर्षे करी घेती तीक्ष्ण बाण ।। ३
तंव नाना अपशकुन होती । खग शृगाल श्वान रोदन करिती ।
खगांचा रव विश्वपीडा सुचविती । प्रगटे केतु नभी सर्वत्र ।। ४
होऊ लागे दाह दशदिशी । पर्वकाळाविण ग्रहण सूर्यासी ।
नेत्रद्वारे मूर्ति ढाळिती अश्रूंसी । तंव मंदोदरहृदयी सुटे कंप ।। ५

प्रतिमा रडती । नभी विद्युत्पात । सुटे घोर वात । मही डोले ।
जलद वर्षती । केशधूलरक्त । अशुभदायक । न वानवे ।
जय जय घोष । सुर करतात । पाहून उत्पात । नभामाजी ।
चापावरी बाण । लावती कृपाळ । सुर भयाकुल । पाहूनीया ।। १

ओढून शरासन आकर्ण। राम सोडती एकतीस बाण
सुटता ते रघुनायकचापातून। भासती जणु काळ सर्प ।। १०२
एक शर शोषी नाभीतील अमृत। अपर त्वेषे छेदती भुजमस्तक।
शिरबाहु घेऊन निघाले नाराच। तंव शिरभुजहीन रुंड नाचे महीवरी ।। १
ढासळे धरा धावता वेगे प्रचंड रुंड। प्रभु शर मारून करिता दोन खंड।
मरताना गर्जे काढी घोर रव प्रचंड। कोठे राम वधीन रणी तया ।। २
डळमळे भूमी पडता दशकंधर। क्षुब्ध सिंधु सरिता दिग्गजभूधर।
उभय खंड पडताच धरणीवर। चिरडती समूह वानररीस याचे ।। ३
मंदोदरीसन्मुख ठेवून भुज शीर्ष। निघाले शर माघारी होते जेथे ईश।
करिती मग भात्यामाजी प्रवेश। सुर दुंदुभी वाजविती बघून ।। ४

प्रभुमुखी प्रवेशे रावणाची प्राणज्योत। पाहून शिवचतुरानन हर्षित।
जय जय जय निनाद भरे ब्रह्मांडात। जय रघुवीर प्रबळ भुजदंड ।। ५
सुमने वर्षती देवमुनिवृंद। गर्जती जय कृपाळ जय जय मुकुंद ।। ६

करी द्वंद्व दूर। जय कृपाकंद। भक्त सुखप्रद। मुकुंदा तू।
परम कारण। प्रभो कारुणिक। खल निर्दालक। सदा विभो।
वर्षती सुमने। अति हर्षे सुर। दुंदुभीगजर। करितात।
संग्रामअंगणी। श्रीरामअंगात। अनंग बहुत। विलसती ।। १

जटा मुकुटात। प्रभु शिरावर। पुष्पे मनोहर। शोभतात।
जणू निलगिरी। दामिनीसमेत। नक्षत्र भासत। शोभिवंत।
फिरविती चाप। भुजदंडे बाण। तनु रक्त कण। मनोहर।
जणु रायमुनी। तमालावरती। सुखाने बैसती। भासे तैसे ।। २

कृपादृष्टीची वृष्टि करून। प्रभु निर्भय करिती सुरगण।
रीसकपि हर्षित होऊन। गर्जती जय मुकुंद सुखधाम ।। १०३
मंदोदरी पाहून पतीचे शिर। पडे व्याकुळ मूर्च्छित महीवर।
युवतिवृंद रडताना उठती सत्वर। रावणा समीप आणिती उठवून तिज ।। १
करी रोदन पतीची दशा पाहून। सुटती केश हरपे भान।
नानापरी करी उरताडन। करून प्रतापवर्णन रडताना ।। २
नाथा तव प्रतापे डोले नित्य धरणी। तव सन्मुख तेजहीन भानु शशि अग्नी।
न साहिला जो तनुभार शेषकूर्मांनी। लोळे ती तनु मातीत माखून ।। ३

वरुण कुबेर समीर सुरेश। रणसन्मुख न धरिती धीरास।
भुजबळे जिंकिले काळ यमास। आज पडली येथे ती अनाथासम ॥
जगा विदित तुमची प्रभुता उज्ज्वल। न वर्णवे सुत आप्तजनांचे बळ।
रामासी विन्मुख होतां जाहले ऐसे हाल। न राहिला कुळी कुणी रडावया ॥५
विधात्यांचा प्रपंच होता तव वश नाथा। सभय लोकपाल नमविती माथा।
भक्षिती तव शिरभुज गिधाड आता। रामवैऱ्यासी नसे अनुचित हे॥ ६
हे पति कालवशे न मानिले वचन। जगन्नाथासी जाणिले मनुज म्हणून॥ ७

मानिला मनुज। दनुज कानना। पावक दहना। स्वये हरी।
नाथा न भजले। कृपाळु प्रभूस। नमिती जयास। शिव ब्रह्मा।
पापी परद्रोही। आजन्म शरीर। राहिले तत्पर। सदा नाथा।
रामाने दिधले। तुम्हा निजधाम। निरामय ब्रह्म। वंदिते मी॥ १

हाय हे नाथा रघुनाथासमान। नसे अन्य कृपानिधान।
देई गति तो तुम्हा भगवान। जी दुर्लभ योगीवृंदास॥ १०४
मंदोदरीचे वचन ऐकून कानी। मानिती सुख सुर सिद्धमुनी।
जे मुनिवर परमार्थवादी ज्ञानी। अज महेशनारद सनकादिक॥ १
डोळे भरून निरखिती रघुपतीस। झाले सकल सुखी होऊन प्रेमवश।
आकांत करिता पाहून सकल नारीस। दुःखित मने जाई बिभीषण तेथे॥ २
होई दुःखित बघता बंधुदशेस। मग प्रभु आज्ञा देती अनुजास।
लक्ष्मण बहुपरी समजावी तयास। तंव येई बिभीषण प्रभुपाशी॥ ३
कृपादृष्टीने प्रभू बघती तयास। वदती करावी क्रिया सोडून शोकास।
करी क्रिया मानून प्रभूच्या आज्ञेस। विधिपूर्वक बिभीषण जाणून देशकाल॥४
सकल स्त्रिया मंदोदरीशआदी। रावणास तिलांजलि अर्पिती।
तेथून मग निज भवनी जाती। वानिती मनी रामगुणगणास॥ १०५
मग बिभीषण येऊन करी नमन। अनुजास पाचारती कृपानिधान।
तुम्ही जांबुवंत हनुमंत नीतिनिपुण। तैसे कपीश अंगद नलनील॥ १
जा बिभीषणासह सकल मिळून। करी अभिषेक तया वदती रघुनंदन।
मी न येत नगरीत पित्राज्ञा म्हणून। पाठवितो ममसरिस कपिअनुज॥ २
प्रभूचे वचन ऐकून चालले कपि शीघ्र। करिती अभिषेकरचना सज्ज सत्वर।
बैसविती आदरे सिंहासनावर। स्तविती तया करून अभिषेक॥ ३

जोडून कर शिर नमविती । मग बिभीषणासह प्रभुप्रती येती ।
तंव कपीस बोलाविती रघुपती । सुखी करिती वदून प्रियवचन ।। ४

तुमच्या बळाने । शत्रूस वधिले । रामे सुखी केले । सुधाशब्दे ।
बिभीषणा राज्य । मिळाले ही किर्ती । गाजेल तुमची । त्रिलोकात ।
ममसमवेत । तुमची सुकीर्ती । मानव जे गाती । अति प्रेमे ।
संसारसागर । भासतो अपार । करितील पार । विनाश्रम ।। १

ऐकून प्रभूच्या वचनास । न मिळे तृप्ति कपिपुंजास ।
धरून रामपदपंकजास । नमविती शिर वारंवार ।। १०६
मग पाचारून हनुमानास । वदती भगवान जा लंकेस ।
कथून समाचार जानकीस । कुशल विचारून परतावे ।। १
तंव नगरात प्रवेश करी हनुमान । धावती निशाचर निशाचरी ऐकून ।
यथाविधि तयाचे करून पूजन । मग दाविती तया जनकसुता ।। २
दुरून प्रणाम करी हनुमंत । जाणले जानकीने हा रघुपतिदूत ।
सांग वत्सा कैसे कृपानिकेत । कुशल ना अनुजकपिदलासह ।। ३
सर्वपरी कुशल कोशलाधीश । माते समरी जिंकिले दशाननास ।
दिधले राज्यपद अढळ बिभीषणास । कपीचे वचन ऐकून हर्षित सीता ।। ४

हर्षित मानसी । तनु पुलकित । जल लोचनात । वदे सीता ।
काय देऊ कपी । नसे त्रैलोक्यात । जे मज भासत । वाणी सम ।
आता न संशय । सीतामाते ऐक । मज सर्व प्राप्त । जगराज्य ।
जित रणी रिपू । राम अनामय । बंधूंस उभय । बघतो मी ।। १

सकल सद्गुण ऐक हे सुत । वसोत तव हृदयी हनुमंत ।
कोशलपति अनंतासमवेत । राहो तुजवरी प्रसन्न ।। १०७
आता वत्सा करी ऐसे यत्न । जेणे श्याम मृदुलगात्रे बघतील हे नयन ।
तंव रामाप्रती जाई हनुमान । निवेदी कुशल जानकीचे ।। १
ऐकून भानुकुलभूषण तो संदेश । बोलाविती अंगदबिभीषणास ।
वदती जा संगे घेऊन हनुमानास । आणा आदरे जनकसुता ।। २
जाती सीतासमीप सकल त्वरित । जेथे निशाचरी विनम्र तिज सेवीत ।
वेगे बिभीषण तया समजावीत । मग घालिती तिज स्नान नानाविध ।। ३

घातली तिज भूषणे नाना प्रकार । आणली शिबिका सजवून सुंदर ।
स्मरून रामास सुखधाम प्रियकर । चढली वैदेही हर्षे तयात ।। ४
चहू बाजूसी वेत्रधर रक्षक । चालती मनी सकल उल्हसित ।
येती कपिरीस दर्शनानिमित्त । कोपे धावून रक्षक निवारती ।। ५
माना मम वचन वदती कोशलेश । मित्र हो आणा पायीच सीतेस ।
देखतील कपि तिज जननीसदृश । हसून बोलती स्वामी रघुनाथ ।। ६
कपिरीस हर्षित ऐकून प्रभूचे वचन । गगनी वर्षती सुमने सुरगण ।
प्रकटवू इच्छिती अंतरसाक्षी भगवान । सीतेसी होती जी गुप्त प्रथम अग्नीत।।७
या कारणे करुणानिधान । तदा वदती कटुवचन ।
सकल निशाचरी ते ऐकून । करू लागती अति दुःख ।। १०८
सीता प्रभूचे वचन शिरीधरून । बोले कायावाचा मने पावन ।
व्हा धर्माचरणी सहाय्यक तुम्ही लक्ष्मण । वेगे अग्नि प्रकट करा ।। १
लक्ष्मण ऐकून सीतेचे वचन । जे विरहविवेकधर्मनीति यांनी पूर्ण ।
सजल लोचने करद्वय जोडून । उभा परि न वदू शके प्रभूस ।। २
रामाचा कल पाहून धावे लक्ष्मण । पेटवी अग्नि काष्ठे आणून ।
वैदेही पावक प्रदीप्त पाहून । हर्षित मनी न भय लेश ।। ३
जर मम मनी कायावाचामने करून । न अन्य गति रघुवीरास सोडून ।
हे अग्निदेवा तुज सर्व गतीचे ज्ञान । हो मजस्तव शीतल चंदनासम ।। ४

पावकी प्रवेश । चंदनासमान । प्रभूस स्मरून । करी सीता ।
महेशवंदित । चरण पुनीत । नमून ते पद । जय बोले ।
तिचे प्रतिबिंब । लौकिक कलंक । प्रचंड अग्नीत । भस्म होई ।
प्रभुचरित्र हे । जाणत न कोणी । सुरसिद्धमुनि । बघतात ।। १

घेई रूप अग्नी । धरी सीता हस्त । जी श्रुति विदित । जगा ज्ञात ।
जैसा पयोनिधी । विष्णूस इंदिरा । तैसी रामचंद्रा । सीता अर्पी ।
राम वामभागी । विराजे रुचिर । अतीव सुंदर । दिसतसे ।
नीलकमलाच्या । समीप कोमल । कनककमल । कळी जणूं ।। २

सुमने सुर हर्षे वर्षती । गगनी डंका वाजविती ।
गायन मधुर किन्नर करिती । नाचती अप्सरा विमानी चढून ।। १०९ (क)

प्रभु जनकसुतेसमवेत । पावती अपार शोभा अमित ।
देखून कपिअस्वल हर्षित । गर्जती जय जय रघुपति सुखसार ।। १०९ (ख)
तंव रघुपतीची आज्ञा घेऊन । मातली निघाला करून वंदन ।
मग सदा स्वार्थी येती सुरगण । वदती वचन जणु महा परमार्थी ।। १
हे दीनबंधु दयाळा रघुराया । देवा दाविली तुम्ही सुरांवर दया ।
विश्वद्रोही कामी कुमार्गगामी या । दुष्टा रावणा येई मृत्यु निजपापे ।। २
तुम्ही समदर्शी ब्रह्म अविनाशी । नित्य आनंदमय उदासी ।
अगुण अनघ अखंड करुणाराशी । अमोघशक्ति अज अजेय ।। ३
मीन कूर्म सूकर नरहरी । वामन परशुराम वपुधारी ।
नाथ जंव जंव सुरा दुःख होई भारी । नाना तनु धरून निवारले तुम्ही ।। ४
हा दुष्ट सुरद्रोही सदा मलिन । कामक्रोधलोभमदपूर्ण ।
पावे निजपद अधमाधम रावण । हा वाटे विस्मय मना आमुच्या ।। ५
आम्ही असून देव परम पदावर । स्वार्थरत होऊन पडतो भक्तीचा विसर ।
आता प्रभो तुम्हासी शरण करा उद्धार । बुडतो संतत भवसागरी आम्ही ।।६
करिती प्रार्थना यापरी सिद्धसुर । जेथे तेथे ठाकले उभे जोडून कर ।
अति प्रेमे पुलकित शरीर । करु लागे स्तुति ब्रह्मा ।। ११०

जय राम सदा सुखधाम हरे । रघुनायक सायकचापधरे ।
भववारण दारणसिंह प्रभो । गुणसागर नागर नाथ विभो ।। १
तनुकाम अनेक अमूपछबी । गुण गात मुनीश्वर सिद्ध कवी ।
यश पावन रावण नाग जसा । खगनाथ तया धरी क्रुद्ध तसा ।।
जनरंजन भंजन शोकभयं । गत क्रोध सदा प्रभु बोधमयं ।
अवतार अपार उदार गुणं । महिभार विभंजन ज्ञानघनं ।। ३
अज व्यापक एक अनादि सदा । करुणाकर राम नमामि तदा ।
रघुवंश विभूषण दोष हरी । कृत भूप बिभीषण दीन हरी ।। ४
गुणज्ञान निधान अमान अजं । नित राम नमामि विभु विरजं ।
भुजदंड प्रचंड प्रतापबलं । खलवृंदनिकंद महा कुशलं ।। ५
नच हेतु मनी करि दीनहितं । छबिधाम नमामि रमासहितं ।
भवतारण कारणकाजपरं । मनसंभव दारुण दोषहरं ।। ६
शरचाप मनोहर तूण धरं । कमलारुण लोचन भूपवरं ।।
सुखमंदिर सुंदर श्रीरमणं । मदकाम मुधा ममताशमनं ।। ७

अनवद्य अखंड न गोचर गो। नितरूप परि न दिसे जगी जो।
इति वेद वदंती न दंतकथा। रवि आतप भिन्नअभिन्न तथा ॥ ८
कृतकृत्य विभो कपि सर्वहि हे। निरखीत तवानन सादर हे।
धिग् जीवन देव शरीर हरे। तव भक्तिविना भवप्रीति भरे ॥ ९
तंव दीनदयाळ दया करि रे। मति माझी विभेद करो हरी रे।
जरि मी विपरित क्रिया करित। दुःख ते सुख मानी सुखे चरत ॥ १०
खलखंडन मंडन रम्य क्षमा। पदपंकज सेवित शंभु उमा।
नृपनायक दे वरदानमिदं। चरणांबुजप्रेम सदा शुभदम् ॥ ११

यापरी करी ब्रह्मा चतुरानन। प्रेमे पुलकित गात्रे स्तवन।
निरखिता ते सौंदर्यनिधान। न वाटे तृप्ति नेत्रासी ॥ १११
दशरथ ते समयी तेथे येती। सुतास पाहून नयनी अश्रु भरती।
अनुजासह प्रभु वंदन करिती। तंव आशीर्वाद देती पिता ॥ १
हे तात हा सकल तव पुण्यप्रभाव। जिंकिला अजय निशाचर राव।
तनयाचे वचन ऐकून वाटे प्रीतिभाव। नयनी सलिल शरीरी रोमांच उभे ॥ २
रघुपति पित्याचे पूर्वप्रेम जाणून। तया विलोकून देती दृढ ज्ञान।
लागले भेदभक्तीत दशरथाचे मन। उमे न पावले ते मोक्षधाम ॥ ३
न लाभे मोक्ष सगुण उपासकास। अर्पिती निज भक्ति श्रीराम तयास।
वारंवार करून प्रणाम प्रभूस। हर्षे जाती दशरथ देवलोका ॥ ४
कुशल कोशलाधीश कृपानिकेत। अनुजजानकीसमवेत।
शोभा तयाची पाहून सुरेंद्र हर्षित। करी प्रेमे प्रार्थना प्रभूची ॥ ११२
जयराम शोभाधाम। दाता प्रणतविश्राम।
धृततूण वर शरचाप। भुजदंड बलप्रताप ॥ १
जय दूषणारि खरारी। मर्दिले निशाचर भारी।
हा दुष्ट मारिला। नाथ सुर झाले सकल सनाथ ॥ २
जय हरण धरणीभार। महिमा उदार अपार।
जय रावणारि रणधीर। कृत रजनीचरसंहार ॥ ३
लंकेशा अति बलगर्व। केले वश सुरगंधर्व।
मुनिनाग खरनरसिद्ध। हट्टे करी सर्वा त्रस्त ॥ ४

परद्रोहरत अति दुष्ट । पावे तो फल पापिष्ट ।
ऐका हो दीनदयाळा । राजीव नयन विशाळा ।। ५
मज होई अति अभिमान । नसे अन्य मजसमान ।
देखताच प्रभुपदच्चरण । दुःखप्रत गत मम मान ।। ६
कुणी ब्रह्म निर्गुणा ध्याती । अव्यक्त जया श्रुति गाती ।
मज प्रिय कोशलभूप । श्रीराम सगुण स्वरूप ।। ७
वैदेहि अनुजसमेत । वास करा मम हृदयात ।
जाणून मज निज दास । द्या भक्ति रमानिवास ।। ८

भवभय हारी । सुखद भक्तास । हे रमानिवास । द्यावी भक्ती ।
बहुकामछबी । सुखधाम राम । तुजसी प्रणाम । रघुराया ।
अतुलित बल । सुरांचे रंजन । द्वैताचे भंजन । नरतनु ।
ब्रह्मादि शंकर । सेविती श्यामल । करुणा कोमल । रामा वंदी ।। १

आता कृपाकटाक्षे करावे अवलोकन । मज आज्ञा व्हावी कृपानिधान ।
इंद्राचे प्रिय वचन स्मरून । वदती दीनदयाळ प्रभू ।। ११३
आमुचे कपिरीस हे सुरपती । वधिले रणी निशाचरे मरून पडती ।
मम हितालागी प्राणा त्यजती । करावे जिवंत तया सुरेशा सुजाण ।। १
ऐक ही प्रभूची वाणी हे खगपती । मानती मुनिज्ञानी अगाध अती ।
प्रभु त्रिभुवनांसी मारिती तारिती । परि महति देती केवळ इंद्रासी ।। २
सुधा वर्षता कपिरीस उठती । हर्षे सकल प्रभूपाशी येती ।
उभय दलांवर होई सुधावृष्टी । परि होती जिवंत कपिरीस न राक्षस ।। ३
राममय जाहले निशाचरांचे मन । होती मुक्त सुटे भवबंधन ।
देवाचे अंश असती कपिरीसगण । प्रभूच्या इच्छेने उठले जिवंत ते ।। ४
कोण दीनांचा वाली रामासरिस । केले मुक्त तयांनी सकल निशाचरांस ।
खल अघराशी कामरत लंकेश । पावे गति न मिळे मुनिवरा जी ।। ५
सकल सुर सुमनवृष्टि करून । जाती सुंदर विमानी चढून ।
तंव प्रभुपाशी सुसमय जाणून । येती सुजाण महेश ।। ११४(क)
परम प्रीतीने कर जोडून । प्रेमाश्रुपूर्ण कमलनयन ।
पुलकित तनु गद्गद वचन । स्तवन करिती त्रिपुरारी ।। ११४(ख)

करी मम रक्षण रघुकुलनायक। धृत वरचाप रुचिर करी सायक।
मोह महा घनपटल प्रभंजक। संशयवना अनल सुररंजक ॥ १
अगुणसगुण गुणमंदिर सुंदर। भ्रमतमा बलप्रताप दिवाकर।
कामक्रोधमदगज पंचानन। वसा निरंतर भक्तमनकानन ॥ २
विषयमनोरथ कंजवनास। प्रबळ हिमपात उदार गुणरास।
भव वारिधि मंदर परमं भय। वारय दुस्तर संसृति तारय ॥ ३
श्यामल गात्र राजीव विलोचन। दीनबंधु प्रणतार्थी मोचन।
अनुजजानकीसहित निरंतर। वसो राम नृप मम उर–अंतर ॥ ४
मुनिरंजन महीमंडलमंडन। तुलसीदास प्रभु भयविभंजन ॥ ५

जंव हे नाथा कोशलपुरांत। होईल तुम्हा राज्याभिषेक।
तंव येईन पहावया उदार चरित। कृपासागरा मी अपुले॥ ११५
गौरीश निघाले स्तुति करून। मग येई प्रभुप्रती बिभीषण।
बोले मृदु वाणी चरणी नमून। ऐका विनंति शारंगपाणि प्रभो ॥ १
हे स्वामी सकुल सदल वधिला रावण। विस्तरिले त्रिभुवनी यश पावन।
मी दीन मलिन मति जातिहीन। केली मजवरी कृपा बहू ॥ २
प्रभो आता करा दासाचे गृह पावन। समरश्रम दूर करा करून स्नान।
देखून कोश संपदा सदन। हे कृपाळु द्या मोदभरे कपीस ॥ ३
नाथा मानावे मज आपुला सर्वपरी। संगे न्यावे मजसी अवधपुरी।
ऐकून मृदू वचन दयाळु खरारी। वदती प्रेमाश्रुपूर्ण नयनांनी ॥ ४
मम सर्वस्व तव कोशभवन। हे बंधो जाण हे सत्य वचन।
परि होताच भरतदशेचे स्मरण। निमिष भासे मज कल्पसम ॥ ११६ (क)
कृश गात्रे तापस वेष घेऊन। करी निरंतर भरत मम ध्यान।
करा ऐसे यत्न जेणे मी तया बघेन। सत्वरी मित्रा तुज विनंती ही॥ ११६ (ख)
न पोचेन जर कालावधीत। मम बंधु वीर न भेटेल जिवंत।
वारंवार प्रभूची तनु पुलकित। स्मरताच प्रेम भरताचे ॥ ११६ (ग)
बिभीषणा करावे राज्य तू कल्पापर्यंत। करावे मनी मम स्मरण सतत।
जेथे सकल संत अखेर जातात। तेच मम धाम मग पावशील तू ॥ ११६ (घ)
रामाचे वचन ऐकून बिभीषण। हर्षे धरी कृपानिधीचे चरण।
हर्षित सर्व रीसकपिगण। स्तविती प्रभुगुण विमल धरून पदा ॥ १

मग गेला निज भवनी बिभीषण । बहु रत्नवसन पुष्पकयानी भरून ।
ठेवी प्रभूच्या सन्मुख ते विमान । तंव सस्मित वदती कृपासिंधू ॥ २
हे सख्या बिभीषणा चढून विमानात । फेक तू वस्त्रभूषणे जाऊन नभात ।
तंव बिभीषण जाई गगनात । करी वर्षाव तेथून रत्नवस्त्रांचा ॥ ३
जे जे मना रुचे जया ते ते उचलती । रत्ने मुखांत घालून मग कपि फेकिती ।
सीता अनुजासह प्रभु राम हसती । परम विनोदी कृपानिधी ॥ ४
जो वाटे दुर्लभ मुनि ध्यानास । नेति नेति वेद वदती जयास ।
तो करी अनेक विनोदास । कपीसह कृपासिंधु श्रीराम ॥ ११७ (क)
हे उमे योगजपतपज्ञानाने । नाना व्रतनियमयज्ञाने ।
न लाभे रामकृपा या साधनाने । साधेल अनन्य प्रेमाने जी ॥ ११७(ख)
पावती कपिरीस वस्त्रभूषण । जाती रघुपतिपाशी अंगावर घालून ।
नाना जाति वर्णी कपीस बघून । पुन्हा पुन्हा हसती कोशलपती ॥ १
फेकिती कृपादृष्टि सकलांवर । बोलती वचन मृदु रघुवीर ।
वधिला रावण तुमच्या बळावर । केला अभिषेक विभीषणासी ॥ २
आता जा तुम्ही निज निजभवनी । स्मरा मजसी भीति सोडुनी ।
प्रेमाकुल वानर वचन ऐकुनी । वदती आदरे जोडून कर ॥ ३
प्रभु वदता जे शोभे तुम्हास । वचन ऐकून होई मोह आम्हास ।
दीन जाणून सनाथ केले कपीस । रघुनाथा त्रैलोक्याचे स्वामी तुम्ही ॥ ४
लज्जे मरतो आम्ही प्रभुवचन ऐकून । मक्षिका करी का खगपतीचे कल्याण ।
वानररीस पाहून रामास प्रसन्न । प्रेमे मग्न न इच्छा गमनाची गृही ॥ ५
कपिरीस प्रभूची आज्ञा मानून । रामरूप हृदयी साठवून ।
विविध विधि विनंती करून । निघती हर्षविषादासह ॥ ११८(क)
कपिपति सुग्रीव रीसपति जांबुवंत । अंगद नील हनुमंत ।
अन्य वीर विभीषणासहित । तैसे कपि सेनापति बलवान ॥ ११८ख
सकल प्रेमवशे न वदू शकती । लोचन भरून अश्रु वाहती ।
सन्मुख राममुखास निरखिती । नयनपलक स्थिर ठेवून ॥ ११८(ग)
रघुराया सकलांचे अति प्रेम बघून । घेती तयांसी विमानी बैसवून ।
विप्रचरणांस मनी वंदून । निघती विमानी उत्तर दिशेप्रती ॥ १
विमान निघताच होई कोलाहल । जय जय रघुवीर वदती सकल ।
सिंहासन उच्च मनोहर उज्ज्वल । बैसती तयावर सीतेसह प्रभू ॥ २

कैसे विलसती राम भामिनीसहित । जैसा मेघ मेरुशृंगी दामिनीसह शोभत ।
सुर सुमनवृष्टि करिती होऊन हर्षित । जंव जाई सुंदर विमान वेगाने ।। ३
वाहे वायु मंद सुगंधित शीतल । होई निर्मल सागरसरसरिताजळ ।
मन प्रसन्न दिशा नभ निर्मल । होती सुंदर शकुन चहू बाजूंस ।। ४
वदती रघुवीर सीते पाहा रणभूमीस । वधिले लक्ष्मणाने येथे इंद्रजितास ।
हनुमानअंगद मारता रिपूस । पडती निशाचर महान रणांगणी ।। ५
कुंभकर्णरावण उभय भ्राते । सुरमुनिपीडक वधिले येथे ।। ६
बघ बांधविला सेतु जेथे । सुखधाम शिव स्थापिले मी तेथे ।
मग करिती प्रणाम महेश्वराते । श्रीराम कृपानिधी सीतेसह ।। ११९(क)
कृपासिंधूने वनात जेथे जेथे । केला निवास विश्राम तेथे तेथे ।
सकल स्थाने दाखविती जानकीते । तयांची नामें सांगून ।। ११९(ख)
विमान आले निघून सत्वर । दंडक वनी परम मनोहर ।
वसती अगस्त्य आदि मुनिवर । जाती तयांच्या स्थानी श्रीराम ।। १
देती आशीर्वाद सकल मुनिवर । चित्रकूटी येती मग जगदीश्वर ।
निघाले राम विमानी तेथून शीघ्र । संतोषवुनी ऋषिमुनीस ।। २
दाविती पुढे जानकीस रघुनंदन । यमुना कलिमलहरणि सुशोभन ।
मग देखिली सुरसरिता गंगा पावन । सीते कर प्रणाम म्हणती राम ।। ३
हा बघ प्रयाग तीर्थपती । निरखिता होई पाप दूर जन्मांचे कोटी ।
पाहा आता त्रिवेणी पावन अती । शोकहरणी हरीपदास सोपान ।। ४
घे दर्शन आता अयोध्येचे अति पवित्र । त्रिविध ताप भवरोग करी दूर ।। ५
अयोध्येस सीतेसहित । करिती प्रणाम कृपानिकेत ।
सजल नयने तनु पुलकित । होई रामासी हर्ष पुन्हा पुन्हा ।। १२०(क)
मग त्रिवेणी संगमी येऊन । प्रभु हर्षित होऊन करिती स्नान ।
कपींसह करिती दान । विविध प्रकारचे विप्रांस ।। १२० (ख)
समजावून सांगती प्रभु हनुमंतास । घेऊन बटुरूप जा अयोध्येस ।
निवेदून आमुचे कुशल भरतास । घेऊन ये तयाचा समाचार ।। १
मग त्वरित गेला हनुमंत । तंव प्रभु भारद्वाजासमीप जात ।
मुनि नानाविध पूजन करीत । देती आशीर्वाद करून स्तुती ।। २
मुनिपदांस वंदून करयुगुल जोडून । प्रभु चालले पुन्हा विमानी बैसून ।
इकडे निषाद ऐकून प्रभु-आगमन । नौका कोठे नौका वदून लोका पाचारी ।। ३

जंव विमान उल्लंघून गंगा करी पार। तंव प्रभु आज्ञा पावून उतरे तीरावर।
सीता गंगाचरणी पडे वारंवार। नानाविध गंगापूजन करून ।। ४
मनी हर्षित गंगा देई आशीर्वाद। हे सुंदरी हो तू अखंड सौभाग्यवंत।
गुह धावे प्रेमाकुल ऐकून वृत्त। जाई प्रभुपाशी परम सुखपूर्ण ।। ५
वैदेहीसह प्रभूस विलोकून। पडे धरणीवर हरपे देहभान।
रघुराया तयाचे परम प्रेम पाहून। उठवून हर्षे धरिती हृदयासी ।। ६

प्रभु कृपाधाम। हृदयी धरिती। सुजाणांचे पती। रमानाथ।
बैसती समीप। कुशल पुसती। करीत विनंती। गुहराज।
ब्रह्माशिवसेव्य। चरणकमल। पाहून कुशल। दयाघन।
सुखाचे निधान। पूर्णकाम राम। नमामि हे राम। नमामि ते ।। १

उरी धरतात। नीच निषादास। भरतासरिस। मानुनीया।
तुलसीदास मी। विसरे प्रभूस। झालो मोहवश। मतिमंद।
रावणारीचे हे। चरित्र पावन। रामपदी लीन। ठेवी सदा।
कामादि हरण। विज्ञानदायक। मुनि सिद्ध सुर। गाती मोदे ।। २

समरी विजयाचे रघुवीर चरित्र। श्रवण करितात जे जन चतुर।
विजयविवेक विभूति निरंतर। अर्पिती तया भगवान ।। १२१ (क)
हा कलिकाल पापांचे आगर। रे मना पहा करून विचार।
नसे तुज अन्य आधार। रघुनाथ नामावाचून ।। १२१ (ख)

।। कलियुगातील संपूर्ण पापाचा नाश करणारा
श्रीरामचरितमानसाचा सहावा-सोपान समाप्त ।।

(लंकाकांड समाप्त)

सप्तम सोपान – उत्तरकांड

मंगल चरण

मोरकंठासम। नील सुरवर। शोभे छातीवर। भृगुपद।
अति शोभापूर्ण। सरसिज नेत्र। कटी पीतवस्त्र। सुप्रसन्न।
शरचापपाणी। कपींनी वेष्टित। लक्ष्मणे सेवित। सुशोभन।
जानकीचे ईश। रघुवीर श्रेष्ठ। पुष्पकी आरूढ। नमामि ते ।। १

श्रीरामाचे पद। मंजुल पंकज। जया शिव-अज। वंदितात।
भक्तमनभृंग। पदासवें सदा। संवाहित सीता। करकंजे ।। २
कुंदइंदुदर–। सम रूप गौर। अंबिका भ्रतार। महेश्वर।
मदनाचा अरी। कमल लोचन। करुणानिधान। नमामि ते ।। ३

राही वनवास अवधीस एक दिन। अतिआतुर होती नगरजन।
ठायी ठायी दुःखित नरनारी गण। तनु कृश श्रीराम वियोगाने ।।
होती सुंदर शुभ शकुन। नगरजनांची मने अतिप्रसन्न।
जाणताच प्रभूचे आगमन। दिसे नगर रम्य चौदिशेस ।।
कौसल्यादि मातांच्या चित्तात। अति हर्ष सकल ऐशा मुदित।
जणु आले प्रभु श्रीअनुजासहित। ऐसे सांगु इच्छिती कोणी आताच ।।
भरताचे दक्षिण भुजनेत्र। स्फुरती ते वारंवार।
करी तो मग मनी विचार। शकुन ओळखून हर्षितमने ।।
राही एक दिन प्राण-आधार-अवधीस। हे जाणताच मनी दुःख भरतास।
कारण कवण नाथ न येण्यास। विसरले का प्रभु मज मानून कुटिल ।। १
अहाहा लक्ष्मणा धन्य तू भाग्यवान परम। रामपदारविंदी तव अति प्रेम।
मी कपटी दुष्ट जाणती श्रीराम। तरीच संगे न नेले नाथांनी ।। २
प्रभु जर मानतील मम ऐसी करणी। न मी मुक्त कल्पशते तयातुनी।
परि भक्त-अवगुण प्रभु न ठेविती मनी। दीनबंधु स्वभावे अति मृदुल ।। ३

म्हणोनी दृढ विश्वास मम हृदयात । भेटतील राम शुभशकुन होतात ।
अवधी संपता जर राहिलो जिवंत । मजसमान जगी अधम कोण ।। ४

रामविरहसागरात । जणु भरताचे मन होते बुडत ।
तोच विप्ररूप घेऊन पवनसुत । आला तेथे जणु नौकाच ।। १ (क)

देखे बैसलेला कुशासनावर । शिरी जटामुकुट कृश शरीर ।
जपत राम राम रघुवीर । वाहती कमलनयनातून प्रेमाश्रू ।। १ (ख)

पाहून तया हनुमान अति हर्षित । ओघळती प्रेमाश्रु तनु पुलकित ।
मनी मानून सुख बहुत । बोले वाणी सुधासम श्रवणास ।। १
जयाच्या विरहे दिनरात्र तू दुःखित । जयाची गुणावलि तू निरंतर गात ।
तो सुजन सुखदाता रघुकुलटिळक । आला सुरमुनित्राता सुखरूप ।। २
जिंकिले रणी रिपूस सुर गाती यशाते । सीताअनुजासह प्रभु येती नगरीते ।
विसरे सकल दुःख ऐकून वचनाते । जैसे अमृत पावून तृषार्त ।। ३
कोण तुम्ही हे तात आला कोठून । ऐकविले मज परम प्रिय वचन ।
मी मरुतसुत कपि हनुमान । कृपानिधान ऐका मम नाम ।। ४
दीनबंधु रघुपतीचा मी दास । उठून आदरे भरत भेटे तयास ।
रोमांचित तनु ढाळीत अश्रूस । भेटता भरत हृदयी प्रेम समावेना ।। ५
कपि तव दर्शनाने दुःख दूर । भेटला तव रूपे आज राम प्रियकर ।
पुसे तो कुशल वारंवार । हे बंधो काय देऊ शुभ वृत्तास्तव ।। ६
या संदेशासमान जगात । विचार करिता न दिसे अन्य तात ।
तव ऋण मी न फेडू शकत । आता सांग मज प्रभुचरित्र ।। ७
तंव हनुमंत पदी ठेवून माथा । निवेदी सकल रघुपतिगुणगाथा ।
प्रभु कृपाळु सांग हे कपिनाथा । दास म्हणून मज स्मरती का ।। ८

करिती का प्रभु । वंशाचे भूषण । दासाचे स्मरण । कधी काळी ।
भरतवचन । ऐके हनुमंत । तनु पुलकित । पडे पदी ।
निज मुखे गाती । स्वामी चराचर । राम रघुवीर । ज्याचे गुण ।
भरत पुनीत । सद्‌गुणसागर । का न तो होणार नम्रशील ।। १

हे नाथा रामासी तू प्रिय प्राणासमान । सांगतो मी हे सत्य वचन ।
वारंवार भेटे भरत हे ऐकून । हर्ष हृदयी समावेना ।। २ (क)

मग भरतचरणी शिर नमवून। रामापाशी त्वरित जाई हनुमान।
कळवी कुशल तयासी येऊन। प्रभु हर्षे निघती चढून यानात ।। २(ख)

इकडे येई भरत हर्षे अयोध्येस। निवेदी समाचार सकल गुरूस।
मग राजभवनात दिधला संदेश। येती नगरी कुशल रघुराज ।। १

लगवगे उठती माता सकल। भरत सांगे तया प्रभूचे कुशल।
वार्ता समजे नगरजनांस तात्काळ। तंव धावती हर्षे नरनारी ।। २

दधि दुर्वा गोरोचन फळ फूल। मंगलमूळ नव तुलसीदळ।
सुवर्णपात्री भरभरून भामिनि सकल। गजगामिनि निघती गात ।। ३

जे जैसे होते तैसे उठून धावती। बालवृद्धांस संगे कोणी न घेती।
हे बंधो एकमेकांस पुसती। दयाळु रघुराया तुम्ही देखिले का ।। ४

प्रभु येती अयोध्येस जाणून। जाहली नगरी अपूर्व शोभाखाण।
वाहे सुंदर त्रिविध पवन। जाहले निर्मल शरयुजल ।। ५

गुरु आप्तजन हर्षित। शत्रुघ्न विप्रवृंदासहित।
प्रेमे अति निघे भरत। कृपानिकेत रामाच्या स्वागतास्तव ।। ३ (क)

सौधी स्त्रिया बहुसंख्ये चढती। गगनी विमानास निरखिती।
बघून मधुर स्वरे करिती। सुमंगल गान हर्षित होऊन ।। ३(ख)

पाहून पौर्णिमाशशिरघुपतीस। येई आनंदभरती अयोध्यासिंधूस।
युवती फिरता दिसती तरंगासरिस। कोलाहल येता अधिक वाढे तो ।। ३(ग)

इकडे भानुकुलकमल दिवाकर। राम दाविती कपीस नगरी मनोहर।
ऐका कपीश अंगद लंकेश्वर। ही पावन नगरी हा रुचिर देश ।। १

करिती वैकुंठाच्या महतीचे वर्णन। विदित वेद पुराणास जाणती जन।
परि ते नसे प्रिय मज अयोध्येसमान। कोणी विरळा जाणे हे रहस्य ।। २

मम जन्मभूमि नगरी अति सुंदर। उत्तर दिशेस वाहे शरयू पवित्र।
जयात करिता स्नान नर। विनाश्रम पावती वास मम समीप ।। ३

अति प्रिय मज एथील नगरवासी। मम अयोध्या मोक्षदात्री सुखराशी।
कपि हर्षित ऐकून प्रभुवाणीसी। वदती धन्य अयोध्या जी वानिती राम ।। ४

सामोरे येता जनांस पाहून। कृपासिंधू राम भगवान।
नगरी निकट भूमीवरी उतरे विमान। जंव आज्ञा करिती प्रभू ।। ४(क)

उतरून यानाखाली प्रभु वदती । जा पुष्पका आता कुबेराप्रती ।
जाई हर्षे परि तया विरहदुःख अति । जंव आज्ञा देती श्रीराम ।। ४(ख)
सकलजन येती भरतासंगे । दिसती कृशतनु श्रीरघुवीरवियोगे ।
प्रभु ठेविती महीवरी चापबाणाते । पाहून वसिष्ठ वामदेव मुनिवरांस ।। १
धावून गुरुपदकमला प्रभु धरती । अनुजासह तनु पुलकित अती ।
मुनिराज भेटून कुशल पुसती । वदती राम तुमच्या दये कुशल आमुचे ।। २
भेटून द्विजांस नमविती मस्तक । धर्मधुरंधर रघुकुलनाथ ।
मग प्रभुपदपंकजास धरी भरत । अज शिव सुरमुनिवंदिती जया ।। ३
उठवता न उठे पडे भूमीवरी । उचलून कृपासिंधु धरिती उरी ।
उभे रोमांच श्यामल शरीरी । नव राजीव नयनी जल वाढे ।। ४

राजीव नयनी । प्रेमाश्रु दाटती । रोमांच शोभती । तनूवरी ।
सप्रेम अनुजा । हृदयी धरूनी । त्रिभुवन धनी । भेटतात ।
प्रभुबंधुभेटी । ऐसे शोभतात । न देऊ शकत । उपमा मी ।
प्रेम नी सुषमा । जणू मूर्तिमंत । शोभा अलौकिक । प्राप्त तया ।। १

भरता कुशल । कृपाळु पुसती । शब्द न निघती । मुखातुनी ।
ऐक उमे सुख । वाणीमनपर । तोच जाणणार । जया मिळे ।
आता मी कुशल । दीन आर्त जन । दिधले दर्शन । कोशलेशा ।
बुडत असता । विरहवारीत । वर काढिलेत कृपानिधे ।। २

हृदयी धरिती शत्रुघ्नास । अति प्रेमे प्रभु सर्वेश ।
भरत मग भेटे लक्ष्मणास । परस्पर भ्राते परम प्रेमे ।। ५
लक्ष्मण आलिंगन देई भरतानुजासी । दूर करी विरहजनित दुःखासी ।
सीताचरणी भरत नमवी शिरासी । अनुजासह पावे परम सुख ।। १
नगरवासी हर्षे प्रभूस विलोकिती । जाहली नष्ट विरहजनित विपत्ती ।
कृपाळु श्रीराम कौतुक करिती । निरखून प्रेमातुर जनांसी ।। २
ते समयी अमित रूपे प्रभु प्रकटती । यथायोग्य कृपाळु सकला भेटती ।
कृपादृष्टीने मग प्रभु विलोकिती । करिती नरनारी शोकरहित ।। ३
क्षणात भेटती भगवान सकलांस । उमे न कळले हे रहस्य कुणास ।
ऐसे सुखी करून राम सर्वांस । चालती पुढे शीलगुणनिधान ।। ४
धावती कौसल्यादि सर्व माता । जणु वत्सा बघून धावे धेनू नवनीता ।। ५

जणु टाकी धेनु । नूतन वत्सास । जाई चरण्यास । परवश ।
दिन ढळताच । पाझरे दुग्धास । देत हुंकारास । धावे वेगे ।
अति प्रेमे प्रभू । भेटती मातांस । मृदु वचनास । वदतात ।
वियोगनिर्मित । गत ती विपत्ती । सुख हर्ष अती । लाभे सर्वां ।। १

निज तनयास सुमित्रा माता भेटत । जाणून तो रामचरणी रत ।
हृदयी अति संकोचित । जंव कैकेयी भेटे रामास ।। ६ (क)
लक्ष्मण भेटे सकल मातांस । होई हर्षित पावून आशीर्वादास ।
भेटे वारंवार कैकेयीस । परि मनीचा क्षोभ जाईना ।। ६ (ख)
सीता भेटे सकल सासवांस । चरणी पडता तिज मोद मनास ।
कुशल पुसून देती तिज आशीर्वादास । राहो सौभाग्य तव अचल ।। १
सकल विलोकिती प्रभूचे मुखकमल । अश्रु थोपविती जाणून समय मंगल ।
वारंवार निरखिती प्रभुगात्रे मृदुल । ओवाळिता आरती कनक तबकी ।। २
करिती ओवाळणी नानापरी । परमानंद हर्ष भरून राही उरी ।
कौसल्या पुन्हा पुन्हा निरखी श्रीहरी । रणधीर रघुवीर कृपासिंधू ।। ३
हृदयी विचार करी वारंवार । कैसा वधिला यांनी दशकंधर ।
ही दोन्ही बाळे अति सुकुमार । निशाचर महावीर बलवंत ।। ४
लक्ष्मण वैदेहीसहित कृपानिकेत । प्रभूस माता विलोकीत ।
होती गात्रे वारंवार रोमांचित । परमानंदात निमग्न मन ।। ७
लंकापति कपीश नलनील । जांबुवंत अंगद शुभशील ।
हनुमानादि वानर वीर सकल । घेती मनोहर मनुजरूपे ।। १
भरताचे प्रेम शील व्रत नेम । स्तविती आदरे प्रेमे परम ।
पाहून नगरवासियांचा रीतिधर्म । स्तविती तयाचे प्रेम प्रभुचरणी ।। २
मग रघुपति बोलविती मित्रगणांसी । मुनिपदा वंदा सांगती सकलांसी ।
जयांच्या कृपे वधिले रणी दनुजांसी । हे आमुचे कुलपूजनीय गुरु वसिष्ठ ।। ३
हे मम सकल सखे ऐका मुनिवर । जाहले जणु जहाज समरसागरावर ।
भरताहून मज ते प्रिय साचार । मम हितास्तव अर्पिती निज प्राण ।। ४
सकल प्रेममग्न प्रभूचे वचन ऐकून । निमिषा निमिषाला उपजे सुख नवीन ।। ५
मग सकल कौसल्या मातेचे चरणी । नमविती मस्तक पुन्हा येउनी ।
देई आशीर्वाद तया हर्षुनी । वदे प्रिय तुम्ही मज रामासम ।। ८ (क)

सुमनवृष्टीने नभ आच्छादित । भवनी चालले राम सुखकंद ।
दर्शन घेती नरनारीवृंद । चढून सकल सौधावरी ।। ८(ख)
अति सुंदर रत्नजडित सुवर्णकलश । ठेविती जन निज निज द्वारी सजवून ।
रुचिर ध्वज पताका तोरण । लाविती मंगल उत्सवास्तव ।। १
पथी सुगंधी द्रव्ये शिंपिती । गजमौक्तिक रंगावली रचिती ।
नानापरी सुमंगल साज सजविती । हर्षे वाजविती डंका नगरात ।। २
ठायी ठायी नारी ओवाळिती । हृदयी हर्षित आशीर्वाद देती ।
कांचन तबकी सजवून आरती । युवती करिती शुभ गान ।। ३
करिती आरती राम आर्तहराची । रघुकुलकमलकानन दिनकराची ।
नगर शोभा संपत्ति कल्याण यांची । श्रुति शेष शारदा करिती स्तुती ।। ४
स्तिमित तेहि हे चरित्र पाहून । उमे कैसे वर्णतील ते पामर गुण ।। ५
जणु नारी कुमुदिनी अयोध्या सरोवर । श्रीरघुवीर विरह दिनकर ।।
अस्तास जाताच तो भास्कर । विकसती रामराकेश बघून ।। ९(क)
होती शुभशकुन नानाविध । वाजती नगारे गगनात ।
नगर नरनारींस करून सनाथ । जाती भवनी भगवान ।। ९(ख)
कैकेयी लज्जित प्रभु जाणती । हे भवानी प्रथम तिचे गृही जाती ।
समजावून तिज बहुत सुखी करिती । मग हरि जाती निज भवनी ।। १
कृपासिंधु जंव मंदिरी जाती । नगरनरनारी सर्व सुखी होती ।
मग गुरु वसिष्ठ विप्रांस बोलाविती । वदती आज सुवेळ सुदिन शुभयोग ।। २
द्विज हो द्या हर्षे अनुशासन । जेणे रामचंद्र भूषवितील सिंहासन ।
ऐकून मुनि वसिष्ठाचे शुभ वचन । प्रसन्न होती सकल विप्र ।। ३
बोलती मृदु वचन विप्र अनेक । जगास आनंदप्रद रामास अभिषेक ।
करावा महाराजांसी शीघ्र अभिषेक । मुनिवरा न करावा विलंब आता ।। ४
तंव सुमंतास कथिती मुनी । चालला हर्षित ते ऐकुनी ।
सजविले तयाने शीघ्र जाउनी । गज वाजी बहु अनेक रथ ।। १०(क)
ठायी ठायी पाठविती दूतांस । आणविती मंगल द्रव्यास ।
वसिष्ठाचे पदी ठेवी शीर्ष । मग हर्षे सुमंत येऊन ।। १०(ख)
अति सुंदर अयोध्यापुरी सजविती । देव सुमनवृष्टीची झड लाविती ।
बोलावून सेवकांस राम वदती । प्रथम घालावे स्नान मित्रांसी ।। १

ऐकता वचन जन सर्वत्र धावती। सुग्रीवादीस शीघ्र स्नान घालिती।
मग बोलावती भरतास करुणानिधी। उकलती जटा निजकरे राम ॥ २
बंधूंस तिन्ही स्नान घालती। भक्तवत्सल कृपाळू रघुपती।
कोटि शत शेष वानू न शकती। भरताचे भाग्य कोमलता प्रभूची ॥ ३
मग निज जटा उकलती करुणाघन। करिती स्नान गुर्वाज्ञा घेऊन।
स्नान होताच चढविती भूषण। लाजती शत अनंग बघून अंगास ॥ ४
घालिती सासवा स्नान सादर। जानकीस मग सत्वर।
दिव्य वसन श्रेष्ठ अलंकार। सजविती अंग अंगावरी ॥ ११(क)
रामाचे वामभागी शोभे सुशोभन। रमा रूपगुणाची खाण।
सकल माता हर्षित तिज पाहून। सुफल मानिती जन्म निज ॥ ११(ख)
ते अवसरी हे खगेशा ऐक। ब्रह्मा शिव मुनिवृंद।
येती बघावया राम सुखकंद। सुर येती विमानी बैसोनी ॥ ११(ग)
मुनी मनी प्रेममग्न प्रभूस विलोकिती। दिव्य सिंहासन सत्वर आणविती।
रविसम तयांचे तेज न वानू शकती। द्विजांस वंदून बैसती श्रीराम ॥ १
जनकसुतेस रघुराजास बघून। विशेष हर्षित सकल मुनिगण।
करिती विप्र वेद मंत्रोच्चारण। गर्जती जय जय सुरमुनि नभी ॥ २
मुनि वसिष्ठ प्रथम टिळा लाविती। मग सकल विप्रांस अनुज्ञा देती।
विलोकून सुतांस माता हर्षित होती। ओवाळती आरती वारंवार ॥ ३
विप्रांसी देती नानाविध दान। याचकांसी मुक्त करिती दारिद्र्यातून।
सिंहासनी त्रिभुवन स्वामी पाहून। सुर वाजविती दुंदुभी आनंदे ॥ ४

गंधर्व किन्नर। गायन करिती। दुंदुभी वाजती। गगनात।
अप्सरांचे वृंद। प्रमोदे नाचती। आनंद पावती। सुरमुनी।
भरत लक्ष्मण। बिभीषणांगद। मारुतिसमेत। सुशोभित।
घेऊन व्यजन। असि चर्म छत्र। धनुष्य चामर। शक्तीसह। १

श्रीसवे भूषण। भानुवंश राम। कामछबीसम। शोभतात।
जलदासमान। श्यामल सुंदर। पीतांबर वस्त्र। सुरा मोही।
बाजुबंदादिक। सुंदर भूषण। अंग अंगावर। सजविली।
रुंद उर बाहू। जलज नयन। घेती जे दर्शन। नर धन्य ॥ २

ती शोभा तो समाज ते सुखविशेष । न वर्णवे मज हे खगेश ।
वानिती सदा श्रुतिशारदाशेष । जाणे महेश तो आनंद रस ।। १२(क)
भिन्न भिन्न स्तुति करून । जाती निज धामा सुरगण ।
चारी वेद बंदीवेष घेऊन । आले श्रीरामा समीप ।। १२(ख)
प्रभु सर्वज्ञ कृपासागर । करिती तयांचा अति आदर ।
न कळे कोणा मर्म तयाचे साचार । करू लागले गुणगान मग वेद ।। १२(ग)

भूप शिरोमणी । सगुण निर्गुण । लावण्यनिधान । जय जय ।
दशकंधरादी । प्रचंड राक्षस । वधिले दुष्टांस । भुजबळे ।
नर अवतारे । संसारभाराचे । दारुण दुःखाचे । केले भस्म ।
जय शक्तिमान । शक्तिसमवेत । भक्तांचे रक्षक । नमामि ते ।। १

तव मायावशे । नाग सुरासुर । नर चराचर । हे श्रीहरे ।
कालकर्मगुणे । अनंत भवांत । काळ दिनरात । भ्रमताते ।
कृपादृष्टि फेकी । नाथ जयावरी । तयाचे निवारी । तापत्रय ।
भवदुःखमुक्ती । कुशल सर्वेश । रक्षावे आम्हांस। नमामि ते ।। २

ज्ञानमानमदे । जे न आदरिती । भवहारी भक्ती । तव हरे ।
सुरांसी दुर्लभ । पदांसी पावून । पडती तेथून । देखियेले ।
भवतापमुक्त । विनाहि सायास । जपून नामास । स्मरतात ।
वासना सांडून। धरिती विश्वास । खरे तव दास । रघुराया ।। ३

पूजनीय पद । महेशब्रह्मासी । तारी अहिल्येसी । रजस्पर्शे ।
मुनि वंदितात । त्रैलोक्य पावन । निघे नखातून । सुरगंगा ।
ध्वज वज्र कंज । अंकुशासहित । फिरता वनात । काटे व्रण ।
दोन्ही पदकंज । मुकुंदा रमेशा । राम करुणेशा । भजामहे ।। ४

अव्यक्त ते मूळ । वृक्ष तो अनादी । वेद श्रुति गाती । त्वचा चार ।
बहु पर्ण पुष्प । सहा स्कंध त्यास । शाखा पंचवीस । घनदाट ।
कडु आणि गोड । येती फळे ज्यास । वेल आश्रयास । एकटीच ।
संसार वृक्ष तू । नवीन सतत । पर्णपुष्पयुक्त । नमामि ते ।। ५

मनाहून पर। अद्वैत अजन्म। अनुभवगम्य। ब्रह्मा ध्याती।
जाणो ते म्हणोत। परि आम्ही नाथ। यश गातो नित। सगुणाचे।
करुणायतन। सद्‌गुणाची खाण। देवा वरदान। हेचि द्यावे।
काया वाचा मने। सोडून विषया। पदी देवराया। जडो प्रेम॥ ६

सकला समोर वेद करिती। अति उदार प्रभूची स्तुती।
मग ते अंतर्धान पावती। जाती ब्रह्मलोकासी॥ १३(क)
ऐक वैनतेया खगा तेथे शंभु येती। जेथे बैसले होते रघुपती।
गद्‌गद गिरा स्तवन करिती। शरीर पुलकावलीने पूर्ण॥ १३(ख)

जय राम रमारमणं शमनं। भवताप भयाकुल पाहि जनं।
अवधेश सुरेश रमेश विभो। शरणांगत मागत रक्ष प्रभो॥ १
दशशीर्ष विनाशून वीस भुजा। कृत दूर महा महि भारि रुजा।
रजनीचर वृंद पतंग महा। शर पावकि दग्ध प्रचंड पहा॥ २
महिमंडल मंडन चारुतरं। धृत सायक चाप निषंग वरं।
मदमोह महा भमता रजनी। तमपुंज दिवाकर तेज अनी॥ ३
मनजात किरात निपात कृत। मृग कलो कुभोग शरेच हत।
वध नाथ अनाथही रक्ष हरे। विषयाटवी पामर भ्रांत झुरे॥ ४
बहूरोग वियोग तनु जळते। भवदंघ्रि अनादरचे फळ ते।
भव सिंधु अगाध तपा पडती। पदपंकजी प्रेम न जे करिती॥ ५
अति दीन मलिन दुःखी नितही। पदपंकजि प्रीति जया नाही।
अवलंब जयास सुरेश कथा। प्रिय संत तयास अनंत तथा॥ ६
नच राग न लोभ न मान मदा। सम मानिति वैभवा विपदा।
मग ते तव सेवक होत मुदा। मुनि साधन योग त्यजून सदा॥ ७
करि प्रेम निरंतर नित नेमे। पद पंकज सेवत शुद्ध मने।
सम मानि अनादर आदरही। तव संत सुखी विचरंती मही॥ ८
मुनिमानस पंकज भृंग भजे। रघुवीर महा रणधीर अजे।
तव नाम नमामि जपामि हरी। भवरोग महौषध मान अरी॥ ९
गुणशील कृपा परमायतनं। प्रणमामि निरंतर श्रीरमणं।
रघुनंद निकंदय द्वंद्व घनं। महिपाल विलोकय दीन जनम्॥ १०

वारंवार वर मागतो हाच । हर्षे दे श्रीरंगा साच ।
भक्ताचा सत्संग सदा दे मज । तव अनन्य भक्ती पदकमली ।। १४(क)
रामाचे गुण स्तवून उमापती । कैलासाला हर्षे जाती ।
मग प्रभु कपीस देती । निवासस्थान सुखद सर्वपरी ।। १४ (ख)
ऐक खगपति ही कथा पावन । त्रिविध ताप भवभयहरण ।
महाराजांचा शुभ अभिषेक ऐकून । पावती नर ज्ञान वैराग्य ।। १
जे नर सकाम भावे परिसती जे गाती । ते नानाविध सुख संपत्ती पावती ।
सुरांस दुर्लभ सुख भोगून जगती । अंतकाळी मिळविती परम धाम ।। २
परिसती जे विरक्त सकाम । पावती ते भक्ती गति संपत्ती परम ।
गरुडा वानिली मी रामकथा अनुपम । भयदुःखहरणी यथामती ।। ३
कथा विरक्तिभक्तिज्ञान दृढ करिते । ही सुंदर नौका मोहनदी तरते ।
होती नगरी नित नव मंगलोत्सवाते । हर्षित सकल वर्णीय जन तेणे ।। ४
जयासी शिव ब्रह्मा मुनि नमिती । त्या रामपदपंकजी जडे नवी प्रीती ।
वस्त्रे भूषणे बहू याचकांसी देती । नानाविध दाने द्विजांसी ।। ५
प्रभुपदी सकलांची प्रीती । कपी ब्रह्मानंदी मग्न होती ।
नाकळे कैसे दिन जाती । जरी निघून जाती सहामास ।। १५
विस्मरती गृहास न ये शुद्धि स्वप्नांत । जैसा परद्रोह न येई संतमनात ।
जंव सखयांसी बोलाविती रघुनाथ । येऊन आदरे ते नमविती शिर ।। १
प्रेमे समीप भक्तांसी बैसविती । मृदु सुखद वचन तदा वदती ।
केली तुम्ही मम सेवा अती । केवि वानू मी मुखावरी ।। २
वाटता तुम्ही अति प्रिय मजसी । मम हितास्तव सोडिले भवनसुखासी ।
अनुज राज्य संपत्ती वैदेही तैसी । देह गेह स्नेही परिवार प्रिय मज ।। ३
परि तुम्हांसम न ते मज प्रिय । नसे मम बाणा वदणे असत्य ।
दासांवरी अधिक प्रेम मदीय । जरी सेवक प्रिय सकला नीति ही ।। ४
हे मित्रांनो जा आता स्वगृहासी । तेथे दृढ नेमे भजा मजसी ।
सदा सर्वव्यापक सर्वहित अविनाशी । जाणून करा प्रेम मजवरी ।। १६
प्रभुच्या वचनी होती सकल तल्लीन । मी कोण कोठे हरपती देहभान ।
टक लावून पाहती कर जोडून । अति प्रेम यास्तव न बोलवे तया ।। १
प्रभु परम प्रेम तयांचे पाहून । देती तयांसी विविधविध ज्ञान ।
निरखिती ते वारंवार प्रभुचरण । प्रभुसन्मुख काही न वदू शकती ।। २

मग मागविती प्रभु वस्त्रालंकार । नानारंगी अनुपम सुंदर ।
चढवी प्रथम सुग्रीवतनूवर । वसने भरत निज हस्ताने ॥ ३
प्रभु-आज्ञेने अर्पी लंकापतीस । आहेर लक्ष्मण रुचे जो रघुपतीस ।
अंगद बैसे निश्चल न हाले लेश । न बोलाविती प्रभु उत्कट प्रीति पाहून ॥ ४
जांबुवंत नीलादि सकलांस । देती वसने अलंकार स्वये जगदीश ।
सकल हृदयी धरून रामरूपास । निघाले पदी माथा नमवून १७(क)
तंव उठे अंगद शिर नमवून । सजल नयने कर जोडून ।
बोले अति विनम्र वचन । जणु ओथंबले प्रेमरसाने ॥ १७(ख)
ऐका हे सर्वज्ञ कृपासागर । आर्तबंधो दीन दयाकर ।
नाथा येताच वालीमृत्यूचा अवसर । मज पदरी घाली तुमच्या तो ॥ १
स्मरून भक्तरक्षणब्रीदासी । हे भक्त हितकारी न सोडावे मजसी ।
कोठे जाऊ सोडून पदकमलांसी । मम स्वामी गुरु पिता माता तुम्ही ॥ २
हे नरनाथा सांगा विचार करून । कोणते काज मम गृही प्रभूस सोडून ।
बालक ज्ञानबुद्धिबलहीन । जाणून नाथा रक्षावे दीन दासास ॥ ३
नीच सेवा सकल मी गृही करीन । तरीन भव पदपंकज विलोकून ।
पडे प्रभुच्या चरणी ऐसे वदून । गृही जा नका सांगू नाथा आता ॥ ४
ऐकून अंगदाचे वचन अति विनम्र । करुणापारावर श्रीराम ।
उठून धरती हृदयी प्रभु प्रेमे परम । जल भरले राजीव नयनांत ॥ १८(क)
निज उरमाला वसन रत्न भूषण । वाली तनयासी घालून ।
करिती बोळवण भगवान । तयास समजावून नानापरी ॥ १८(ख)
भरत शत्रुघ्न लक्ष्मणासहित । भक्तकाज स्मरून पोचवाया जात ।
अंगद हृदयी न अल्प प्रेम निश्चित । बघे वळून प्रभूकडे तो घडी घडी ॥ १
वारंवार करी दंडप्रणाम । मनी आशा राहा म्हणतील मज राम ।
हास्य मीलन स्मरता दुःख परम । तैसे प्रभूचे बघणें चाल बोल रीती ॥ २
विनये वदून प्रभूचा रोख पाहून । चालला हृदयी पदकमल सांठवून ।
अति आदरे कपिगणांस पोचवून । आला माघारी बंधूसह भरत ॥ ३
मग सुग्रीवाचे चरण धरून । नानापरी विनंति करी हनुमान ।
रघुपतिपदसेवा करून चार दिन । देवा घेईन चरणदर्शन आपुले ॥ ४

पुण्यपुंज तू पवनकुमार । सेवीत जा तू कृपा-आगर ।
ऐसे वदून निघाला सुग्रीव सत्वर । ऐक हे हनुमंता अंगद वदे ॥ ५
सांग माझे दंडवत प्रणाम प्रभूस । करितो विनंती जोडून करांस ।
वारंवार रघुवीरास । द्यावी माझी आठवण ॥ १९ (क)
वदून ऐसे निघे अंगद । माघारी फिरला मग हनुमंत ।
तयाची प्रीति सांगे प्रभूस पवनसुत । ऐकून ते भगवंत प्रेममग्न ॥ १९(ख)
श्रीरामाचे मन कठोर वज्राहून । अति कोमल कुसुमाहून ।
ऐसे रामाचे चित्त जाणेल कवण । सांग मज तू हे खगेश ॥ १९ (ग)
मग कृपाळु बोलाविती निषादासी । देती प्रसाद वस्त्रभूषणांसी ।
म्हणती जा भवनी स्मरावे सदा मजसी । कायावाचामने आचरावा निजधर्म ॥ १
तू मम सखा भरतासम भ्राता । यावे जावे राहावे अयोध्येत सदा ।
महा सुख उपजे प्रभुवचन ऐकता । नेत्री प्रेमाश्रु चरणी पडे ॥ २
गृही गेला हृदयी ठेवून पदकमल । आप्तजनांस कथिले प्रभूचे शील ।
रघुपतीचरित्र बघून प्रजाजन सकल । धन्य राम सुखराशी वदती पुन्हा पुन्हा ॥ ३
राम राज्यावर बैसता त्रिलोक । जाहले हर्षित गत सर्व शोक ।
वैर न राहे परस्परांत । रामप्रतापे नष्ट भेदभाव ॥ ४
प्रजाजन पाळती निजवर्णाश्रम । अनुसरती वेदपथ आचरून धर्म ।
पावती तदा सुख परम । न तया भय न शोक वा रोग ॥ २०
ताप दैहिक दैविक वा भौतिक । रामराज्यात कवणाहि न व्यापीत ।
नर ठेविती प्रीति परस्परात । पाळिती स्वधर्म मानिती वेदनीती ॥ १
सत्य दया दान पवित्र आचार । पाळिती हे धर्माचे चार आधार ।
स्वप्नीही न करिती पाप नारीनर । रामभक्तिरत मोक्षाचे अधिकारी ॥ २
नसे कोणा पीडा न अल्पवयी मरण । सर्व सुंदर सर्व रोगविहीन ।
न कोणी दरिद्री दुःखी वा दीन । न कोणी शुभलक्षणहीन वा अज्ञानी ॥ ३
सर्व निरभिमानी धर्मरत पुनीत । नरनारी सर्व चतुर गुणवंत ।
सकल गुणज्ञ ज्ञानी पंडित । सकल कृतज्ञ न कोणी कपटी धूर्त ॥ ४
ऐक हे खगेशा रामराज्यात । जड चेतन चराचर विश्वात ।
कालकर्म स्वभाव गुणकृत । दुःख न बाधे कवणास ॥ २१
सप्तसागर वलयांकित भूमिपती । रघुपति कोसलेश एक चक्रवर्ती ।
जयाच्या प्रति रोमी अनेक ब्रह्मांडे वसती । ही सप्तद्वीप प्रभुता न विशेष तयां ॥ १

खगेशा हा प्रभूचा महिमा महान । वर्णन करिता दिसे वहुत हीन ।
परि जयांस या महिम्याचे ज्ञान । तयांस वाटे प्रेम या लीलेत ।। २
ही प्रभुलीला तो महिमा जाणण्याचे फळ । कथिती संयमी महामुनि सकल ।
रामराज्यात सुख संपदा विपुल । न वानवे ती शारदाशेषास ।। ३
सर्व उदार सर्व पर-उपकारी । विप्रचरणाचे सेवक नरनारी ।
कायावाचामने स्त्री पतिहितकारी । एक पत्नीव्रत पाळती पुरुष ।। ४
दंड केवळ यतीच्या हातात । भेद दिसे नर्तकनृत्यसमाजात ।
श्रवणी पडे रामाच्या राज्यात । जिंका मनासी हे शब्द ।। २२
तरु काननी सदा फुलती फळती । गज केसरी एकत्र नांदती ।
खगमृग सहज वैर विसरती । वाढविती प्रीति परस्पर ।। १
कूजन करिती खगमृग नानावृंद । निर्भये विहरती वनी लुटती आनंद ।
शीतल सुगंधित पवन वाहे मंद । गुंजती भ्रमर आणिता मकरंद ।। २
मागता तरुलता मधु स्रवती । धेनु विपुल दुग्ध देती ।
सस्यसंपन्न सदा धरती । सत्य युगाची करणी त्रेतायुगी ।। ३
विविध रत्नखाणी गिरि प्रकटती । जाणून जगदात्मा जगभूपती ।
जळमय सकल सरिता वाहती । शीतल निर्मल सुखकर स्वादिष्ट ।। ४
सागर राही निज मर्यादेत । फेकी रत्ने तटी नर ती पावत ।
सरसिजपूर्ण जलाशय दिसत । दशदिशा विभाग अति प्रसन्न ।। ५
अमृतकिरणे करी मही व्याप्त सुधाकर । आवश्यक तितुके तप देई दिवाकर ।
वर्षती नीरद मागता नीर । ऐसी सुवत्ता रामराज्यात ।। २३
कोटि अश्वमेध प्रभु करिती । अनेक द्विजांसी दाने देती ।
धर्मधुरंधर राम वेदपथ पाळिती । गुणातीत परि इंद्रासम ऐश्वर्यभोग ।। १
पतीसी अनुकूल सदा सीता । शोभाखाण सुशील विनीता ।
जाणे ती कृपासिंधूची प्रभुता । मनोभावे सेवी चरणकमल ।। २
यद्यपि गृही सेवकसेवकिणी । विपुल सदा सेवारत गुणी ।
निजकरे गृहकाज सेवा करुनी । पाळी आज्ञा रामचंद्राची ।। ३
ज्यापरी कृपासिंधु सुख मानिती । त्यापरी जाणून सेवा करी लक्ष्मी ती ।
गृही सेवी सासवा कौसल्यादी । मदअभिमान सोडून ।। ४
हे उमे सीतेसी ब्रह्मादि वंदिती । जगदंबा सर्वगुण संपन्न मानिती ।। ५

जिचा कृपाकटाक्ष सुर वांछिती । परि न विलोकी ती तयांप्रती ।
राम पदारविंदी सदैव करी प्रीती । निज महा महिमा सोडून ।। २४
बंधु अनुकूल सकल सेविती । तयांचे रामचरणी प्रेम अती ।
प्रभुमुखकमलास ते विलोकिती । की करितील कृपाळु आज्ञा काही कधी ।। १
राम करिती बंधूवर प्रीती । नानापरी शिकविती तया नीती ।
सकल प्रजाजन हर्षे राहती । भोग भोगती दुर्लभ सुरांस ।। २
प्रार्थिती अहर्निश विधात्यासी । इच्छितो रघुवीरचरणी प्रीतीसी ।
प्रसवे सीता सुंदर दोन सुतांसी । लवकुश वेदपुराण वर्णिती जया ।। ३
दोन विजयी विनयशील गुणमंदिर । जणु हरीचे प्रतिबिंब अति सुंदर ।
प्रति बंधूस जाहले दोन पुत्र । अति रूपवान गुणी शीलवंत ।। ४
जो वाणी ज्ञान इंद्रियासी अगोचर । अज मायामनगुणपार ।
तोचि सच्चिदानंदघन ईश्वर । उदार नरचरित्र करी ।। २५
प्रातःकाळी करिती शरयूत स्नान । बैसती सभेत संगे द्विज सज्जन ।
वसिष्ठ वानिती वेदपुराण । ऐकती राम जरी जाणती सकल ।। १
अनुजासवे करिती भोजन । सकल जननी सुखी तयां बघून ।
दोन भ्राते भरत शत्रुघ्न । पवनसुतासवे जाती उपवनी ।। २
पुसती रामगुणगाथा तेथे बैसोनी । सुमती हनुमान निवेदी चिंतुनी ।
अति सुख पावती विमल गुण ऐकुनी । प्रार्थिती कथावया वारंवार ।। ३
घरोघरी कथिती पुराण । नानाविध रामचरित्र पावन ।
नरनारी करिती रामगुणगान । नाकळे जाती कैसे दिवस रात्र ।। ४
जेथे राम नृप स्वये विराजमान । तेथील अयोध्यावासी जन ।
तयांच्या विपुल सुखसंपदेचे वर्णन । न करू शकती सहस्र शेष ।। २६
नारदादि सनकादि मुनीश । कोसलाधीशाच्या दर्शनास ।
प्रतिदिनी येती अयोध्येस । बघून दिव्य नगरी विसरती वैराग्य ।। १
चंद्रशाला सौध सुवर्णमय रत्नखचित । नानारंगी पाषाणजडित ।
नगराच्या चौबाजूस सुंदर कोट । रचिले वर रंगी बेरंगी बुरुज ।। २
जणु नवग्रह निज सेना रचून । वेढिती अमरावतीस येऊन ।
पथी जडविली बहुरंगी रत्न । जया बघता मुनिवरमन नाचे ।। ३
धवल धाम गगनास चुंबिती । कलश रविशशिद्युतीस लाजविती ।
बहु रत्नखचित गवाक्षे झळकती । घरोघरी विराजती रत्नदीप ।। ४

रत्नदीप तेजे । शोभती मंदिरी । नक्षी द्वारावरी । पोवळ्याची ।
ब्रह्मा विरचित । सुवर्णाच्या भिंती । वर जडविती । नीलरत्नें ।
सुरम्य विशाल । महाल सुंदर । अंगण रुचिर । स्फटिकाचे ।
प्रति द्वारद्वारे । सुवर्णखचित । रत्नांनी जडित । शोभिवंत ।। १

चारु चित्रशाळा घरोघर । रेखिली तयांत चित्रे विचित्र ।
निरखिती मुनि रामलीलेचे चित्र । तयांची मने घेती चोरून ते ।। २७
सुमनवाटिका जन यत्ने लावती । उत्साहे नानापरी सजविती ।
नाना जातीच्या ललित लता शोभती । फुलती वसंतापरी सदा ।। १
मधुकर गुंजन अति मधुर । त्रिविध समीर सदा वाहे सुखकर ।
पाळिती बालक खग नानाविध सुंदर । बोलती जे मधुर शोभती उडताना ।।२
हंस सारस पारावत मोर । दिसती अति सुंदर भवनावर ।
करून कूजन दाविती नृत्य प्रकार । निज पडछाया सर्वत्र पाहून ।। ३
शुक सारिकांस शिकविती बालक । म्हणा राम रघुपति जनपालक ।
राजद्वार सुंदर सुशोभित । मनोहर पथ चौक बाजार ।। ४

विनामूल्य वस्तू । बाजारी मिळती । सुंदर दिसती । केवी वानू ।
जेथे रमाकांत । प्रत्यक्ष भूपती । तेथील संपत्ती । कोण वर्णी ।
भासती कुबेर । सराफव्यापारी । वाणी तयापरी । नगरीत ।
सर्व सुखी अती । शीलाने सुंदर । शिशु नारी नर । वृद्ध तैसे ।। १

वाहे शरयु दिशेम उत्तर । जळ तिचे निर्मल गंभीर ।
बांधिले घाट तटी मनोहर । नसे अल्प पंकहि तेथे ।। २८
दूर सुंदर अन्य घाट । जल पिती तेथे अश्व गज यांचे गट ।
मनोहर परम पाणीघाट दिसत । पुरुष न करिती स्नान तेथे ।। १
सर्वपरी राजघाट श्रेष्ठ सुंदर । स्नान करिती तेथे चारी वर्णीय नर ।
तीरातीरावरी देव मंदिर । तयांच्या चौबाजूस सुंदर उपवन ।। २
वसती कोठे कोठे सरितातीरी उदासी । कोठे ज्ञानप्रेमी मुनि संन्यासी ।
तीरी तीरी सुशोभन तुलसी । वृंद वृंद मुनींनी लावियली ।। ३
ती नगरशोभा वर्णावी कैसी । उपनगरीत रुचिर शोभा तैसी
अखिल पाप पळे देखता अयोध्येसी । वन उपवन वापी तडाग शोभिवंत ।। ४

तळी पुष्करणी । तैसे वापी कूप । विशाल अनूप । मनोहर ।
नीर सुनिर्मल । सुंदर सोपान । मोहती बघून । सुरमुनी ।
बहुरंगी कंज । खगांचे कूजन । मधुप गुंजन । मनोहारी ।
पिकखग रवे । रम्य उद्यानात । जणु बाहतात । पथिकासी ।। १

जेथे राज्य करिती रमारमण । कैसे करावे त्या नगरीचे वर्णन ।
अयोध्येत करिती वसतीस्थान । अणिमादिक सिद्धि सुख संपदा ।। २९
ठायी ठायी नर रामाचे गुण गाती । बैसून परस्परास शिकविती ।
भजा तुम्ही प्रणतपालक रघुपती । शोभा शीलरूपगुण यांचे धाम ।। १
भजा कमलनयन श्यामलगात्र रामास । भक्तरक्षक जेवि पलक नेत्रास ।
जो धरी रुचिर चाप तुणीरबाणास । भजा तो संतकंजवनरवि रणधीर ।।२
भजा काळकराल व्याल भक्षक हे खगेश । निष्काम भावे वंदिता विनाशी ममतेस
भजा किरात लोभमोहमृगसमूहास । कामरूप गजासी सिंह सुखद भक्ता ।। ३
भजा त्या संशयशोकघनतमभानूस । दैत्यगहनवन दहन अग्नीस ।
जनकसुतेसह रघुवीरास । का न भजता भवभयभंजक तो ।। ४
भजा बहुवासनामशका हिमराशी । नित्य आनंदमय अज अविनाशी ।
मुनिरंजक महिभारभंजकासी । भजा तुम्ही उदार तुलसीदासप्रभू ।। ५
यापरी नगरनरनारीगण । करिती रामाचे गुणगान ।
राहती संतत कृपानिधान । सुप्रसन्न सकलांवरी ।। ३०
जंव रामप्रतापरूपी दिनेश । उगवला अति प्रबळ हे खगेश ।
तंव भरून राहिला त्रिलोकी प्रकाश । तेणे सुख बहुता दुःख अनेकांसी ।। १
करितो वर्णन जया अति शोक । प्रकाश येता अविद्यानिशा नष्ट होत ।
पाप उलुके ठायी ठायी लपत । कोमेजती कामक्रोधकमळे ।। २
कर्मगुणकालस्वभाव विविध । या चकोरांसी न कधी सुख लाभत ।
जणू चोर मत्सरमान मोहमद । नसे वाव तयांच्या कलेस ।। ३
धर्म तडागी ज्ञानविज्ञान पंकज । नानाविध तेथे विकसत ।
सुख संतोष वैराग्य विवेक । हे अनेक चातक शोकमुक्त । ४
हा प्रताप रवि जयाच्या हृदयी उदित । तयासी तो प्रकाश देत ।
मागाहून गुण कथिले होत वृद्धिगत । प्रथम अवगुण कथिले ते नष्ट होती ।।३१

एकदा राम बंधुसहित । संगे परम प्रिय हनुमंत ।
सुंदर उपवन बघावया जात । नव पल्लव कुसुमित तेथील तरू ।। १
समय जाणून सनकादिक मुनि येती । तेजःपुंज गुणशील शोभती ।
ब्रह्मानंदी सदा निमग्न असती । वयोवृद्ध परि दिसती बालकासम ।। २
बालकरूपधारी जणु चारी वेद । समदर्शी विगत सकल भेद ।
दिशा वस्त्र व्यसन रघुपतिचरित । असेल तेथे परिसती जाऊन ।। ३
राहिले तेथे सनकादिक हे भवानी । जेथे होते अगस्त्य मुनिवर ज्ञानी ।
विस्तारे वर्णिती रामकथा अगस्त्य मुनी । जणु अरणी ज्ञानजनित अग्नीसी ।।४
येताना मुनि श्रीराम पाहती । हर्षे तयांना दंडवत घालिती ।
बसावया निज पीत वसन देती । पुसून कुशल तयांचे ।। ३२
भ्राते तिन्ही घालती दंडवत । पवनसुतासह सुखी अधिक ।
अतुल रामलावण्य मुनि विलोकत । मन तल्लीन न आवरू शकती ।। १
श्यामल गात्र सरोरुह लोचन । सुंदरतामंदिर भवविमोचन ।
पलक न हाले बघती टक लावून । प्रभु कर जोडून शिर नमविती ।। २
तयांची दशा व्याकुळ पाहून रघुवीर । ढाळिती प्रेमाश्रु पुलकित शरीर ।
प्रभु मुनीस बैसविती धरून कर । मग मनोहर वचन वदती ते ।। ३
धन्य आज मी ऐका मुनीश । दर्शने तुमच्या होत पापनाश ।
महा भाग्ये जन पावती सत्संगास । जेणे विनाप्रयास होई भवभंग ।। ४
संतसंग नेई मोक्षधामास । कामी जनांचा संग नेई भवपथास ।
हेच सांगती संत कवि पंडित सकलांस । तैसेच वेदपुराण सद्ग्रंथ ।। ३३
मुनि चारी हर्षित ऐकून प्रभुवचन । पुलकित तनु करिती स्तवन ।
जय अनंत अनामय भगवान । एक अनेक अनघ करुणामय ।। १
जय निर्गुण जय जय गुणसागर । अति चतुर सुखमंदिर सुंदर ।
जय इंदिरारमण जय भूधर । अज अनादि अनुपम शोभाकर ।। २
ज्ञाननिधान अमान मानप्रद । पावन सुयश गाती पुराण वेद ।
तज्ञ कृतज्ञ अज्ञताभंजक । अनेक नाम अनाम निरंजन ।। ३
सर्वां हृदयी वास सर्वरूप सर्व व्याप्त । रक्ष सदा आम्हांस हे परिपालक ।
विपत्तिद्वंद्वभवपाशभंजक । राहावे हृदयी रामा काममद मिटवून ।। ४
हे परमानंद कृपाधाम । करिता सकलांचे पूर्ण मनकाम ।
द्यावी आम्हांसी हे श्रीराम । प्रेमाभक्ति तुमची अविचल ।। ३४

हे रघुपति द्यावी भक्ति अतिपावन । त्रिविधताप भवपाशभंजन ।
तुम्ही सुरधेनु कल्पतरु भक्तकामपूर्ण । प्रभो प्रसन्न होऊन द्यावा हाचि वर ।। १
भववारिधीस अगस्त्य हे रघुनायक । सेवकसुलभ सकला सुखदायक ।
निवारावे दुःख दारुण मनजनित । दीनबंधो करा विस्तार सम दृष्टीचा ।। २
तुम्ही निवारिता आशाईर्ष्याभयास । विस्तारिता विनयविवेकविरक्तीस ।
हे भूपशिरोमणि भूषण धरणीस । द्या भक्तिनौका भवसरिता तरायास ।। ३
हे मुनिमानस हंसा सतत । अजशिव तव चरणकमलां वंदित ।
रघुकुलकेतु श्रुतिमर्यादारक्षक । विनाशक कालकर्म स्वभाव गुण यांचे ।। ४
तुम्ही तरणतारण दूषणहरण । तुलसीदासाचे प्रभु त्रिभुवन भूषण ।। ५
वारंवार ऐसे स्तवन करिती । प्रेमे प्रभूस शिर नमविती ।
सनकादिक मुनि ब्रह्मलोकी जाती । मनवांछित वर मिळवून ।। ३५
सनकादिक जाताच ब्रह्मलोका । भ्राते रामपदी नमविती माथा ।
मग सकल विलोकिती मरुतसुता । जंव संकोचती पुसाया प्रभूसी ।। १
ऐकू इच्छिती प्रभुची मुखवाणी । जी परिसता जाईल भ्रम निरसुनी ।
जाणती प्रभु अंतर्ज्ञानी । पुसती हनुमाना काय ते मज सांग ।। २
तंव जोडून कर वदे हनुमंत । ऐका हे दीनदयाळ भगवंत ।
नाथा पुसू इच्छितो काही भरत । परि संकोचित मन पुसायासी ।। ३
हे कपि मम स्वभाव तुज ज्ञात । नसे भेद भरत मी यात ।
प्रभूवचन ऐकून पद धरी भरत । वदे नाथा ऐका प्रणतार्तिहरणा ।। ४
नाथा न मज काही संदेह । स्वप्नीही न मज शोकमोह ।
लाभले फळ केवळ तुमचा कृपास्नेह । हे कृपानंदकंदा प्रभो ।। ३६
दाविती कृपानिधि धिटाई आता । मी सेवक तुम्ही जनसुखदाता ।
हे रघुनाथा संतांची प्रभुता । बहुपरी पुराण वेद गाती ।। १
तुम्ही निज मुखे स्तविले संतांसी । दाविता बहु प्रेम तयांसी ।
ऐकू इच्छितो तयांचे लक्षणासी । हे ज्ञानगुणनिपुण कृपासिंधो ।। २
संत असंत भेद विलग करून । प्रणतपाळ सांगा मज समजावून ।
वदती राम ऐक बंधो संतांचे लक्षण । अगणित प्रसिद्ध वेद पुराणात ।। ३
कृति ऐसी करितो दुर्जन सज्जन । जणु परशु चंदनांचे आचरण ।
बंधो तोडी कुठार तरु चंदन । परि निज गुण सुगंध देई चंदन तया ।। ४

सुरमस्तकी बैसे चंदन चढून । यास्तव जगा प्रिय वाटे चंदन ।
घणाचे घाव साहणें अग्नीतणे जळून । ऐसी मानहानि परशूच्या मुखाची ।।३७
विषयी अलिप्त संत शीलगुणखाण । परदुःखे दुःखी सुखी परसुख पाहून ।
अजातशत्रु सम गतमद वैराग्यपूर्ण । करिती त्याग लोभक्रोध हर्षभय यांचा ।।१
दीनांवरी दया कोमलचित्त । कायावाचामने मम भक्ति निष्कपट ।
देती सर्वां मान आपण मानरहित । भरता हे संत प्रिय मज प्राणासम ।। २
विगत कामना मम नाम जपती । प्रसन्ननिकेत विनय विरक्ती ।
मैत्री सरलता शीतलता शांती । प्रेम द्विजपदी धर्माची जननी ।। ३
ही लक्षणे वसती जयाच्या हृदयात । जाणावा हे तात तो सत्य संत सतत ।
शम दम नियम नीति न विचलित । न वदे कधीहि कठोर वचन ।। ४
निंदा स्तुति उभय जयांस सम । मम पदकमली अति प्रेम ।
ते सज्जन प्राणप्रिय मम । सुखनिधान गुणमंदिर ।। ३८
आता असंतांची लक्षणे ऐक । चुकूनहि न धरावी तयांची संगत ।
सहवास तयांचा सदा दुःखदायक । जैसी खटचाळ धेनु विनाशी कपिलेस ।। १
खलहृदयी संताप विशेष । जळती सदा बघता परसंपत्तीस ।
जेथे कोठे ऐकती परनिंदेस । हर्षित जणु पावति द्रव्यनिधी ।। २
कामक्रोधलोभमदपूर्ण । निर्दय कपटी कुटिल पापखाण ।
करिती वैर सकलांसी अकारण । जो करी हित तयाचे करिती अनहित ।। ३
करिती व्यवहार खोटे घेणे खोटे देणे । खोटे भोजन खोटे खाणे ।
जैसे मयूराचे मधुर बोलणे । परि हृदयी कठोर खाई महा सर्प ।। ४
ते परस्त्रीरत परद्रोह करिती । परधन चोरती परास निंदिती ।
ते पामर देहधारी राक्षस असती । पापमय अतिनीच नररूप ।। ३९
लोभ पांघरूण लोभ अंथरूण । नरकाचे न भय शिस्नोदरपरायण ।
प्रभुता कुणाची करिता श्रवण । हिव भरल्यापरी श्वास घेती ।। १
जंव बघती कुणाची विपत्ती । सुखी होती जणु नृपपद पावती ।
कामलोभे लंपट क्रोधी अती । स्वार्थपरायण विरोध आप्तजना ।। २
मातापितागुरुविप्रा न मानिती । होती नष्ट स्वये अन्या नष्ट करिती ।
परद्रोह करिती मोहवश होती । न रुचे हरिकथा संतसंग तया ।। ३
अवगुणसिंधु मंदमति कामयुक्त । परधनस्वामी वेदनिंदक ।
सुवेष घेती परि मनी दंभ कपट । विप्रद्रोही विशेष परद्रोह ।। ४

ऐसे मनुज अधम दुष्ट । नसती कृत युगी वा त्रेता युगात ।
अल्प काही होतील द्वापारात । कलि युगी होतील वृंद बहु ॥ ४०
बंधूंनो नसे धर्म परकल्याणासम । परपीडेसम न अन्य अधर्म ।
तात सकल वेद पुराणांचे हेच मर्म । कथितो मी जाणती पंडित जन ॥ १
नर शरीर घेऊन परपीडा करिती । ते महा भवभय यातना भोगिती ।
मोहवशे जे नर नाना पापे करिती । परलोक न पावती ते स्वार्थरत ॥ २
हे बंधो मी काळरूप तयांसी । देतो शुभाशुभ कर्मफलासी ।
भवदुःख जाणून भजती मजसी । जे परम सुजाण ऐसे चिंतून ॥ ३
ते टाकून कर्म शुभाशुभदायक । भजती मज सुरनर मुनिनायक ।
संतअसंतांचे गुण हे मी वर्णीत । जाणती मनी ते न पडती भवचक्री ॥ ४
असती गुण दोष मायाकृत । असती ते बहुत ऐक हे तात ।
गुणदोष उभयां न जाणणे विवेक उचित । जाणणे उभयास अविवेक हा ॥ ४१
प्रभुमुखाचे वचन भ्राते ऐकती । हृदयी प्रेम समावेना हर्षित अती ।
हनुमान वारंवार करी स्तुती । अपार आनंद तया हृदयी ॥ १
मग निजमंदिरी जाती रघुपती । नित्य नवलीला यापरी करिती ।
अयोध्येस नारदमुनि वारंवार येती । गाती पुनीत रामचरित्र ॥ २
नित नव चरित्र बघून मुनिजाती । ब्रह्म लोकी सकल कथा कथिती ।
ब्रह्मा परिसून मानिती सुख अती । वदती करा रामगुणगान पुन्हा पुन्हा ॥ ३
सनकादिक नारदाची करिती स्तुती । जरी सकल मुनि ब्रह्मनिष्ठ असती ।
ऐकून गुणगान समाधीस विसरती । आदरे परिसती परम अधिकारी ते ॥ ४
ब्रह्मनिरत जीवन्मुक्त मुनिवर । सोडून ध्यान परिसती चरित्र ।
जयांस न प्रेम हरिकथेत साचार । तयांचे हृदय पाषाणासमान ॥ ४२
एकदा बोलाविती राम कृपानिधान । गुरुविप्र सर्व पुरवासी जन ।
बैसति गुरुमुनिद्विजसज्जन । वदती मग भक्तभवभंजक प्रभू ॥ १
ऐका सकल नगर जनहो मम वाणी । न वदतो हृदयी स्वार्थ आणुनी ।
न अनीति वा प्रभुता मम वचनी । ऐकून करा तैसे जर रुचेल तुम्हा ॥ २
तोच सेवक तोच प्रियतम मजसी । जो पाळितो मम आज्ञेसी ।
जर वदेन काही अनीतिवचनासी । तर करा मम निषेध भय टाकून ॥ ३
ही मनुजतनु बहु भाग्ये मिळते । गाती सकल ग्रंथ ही दुर्लभ सुरांते ।
जी साधनांचे स्थान द्वार मोक्षाचे । मिळवून तेही न लाभे परलोक जया ॥ ४

परलोकी तो दुःख पावेल। पस्तावा करून कपाळ बडवील।
म्हणेल मिथ्या ईश्वर कर्म काळ। देईल दोष या सकला ।। ४३
विषय भोग नसे नरदेहाचे सार्थक। स्वर्गभोग अल्प अंती दुःखदायक।
बंधुहो नरतनु पावून जो विषयासक्त। टाकुन अमृत विष घेई तो ।। १
भले तयासी कधीहि कुणी न म्हणेल। जो गुंज स्वीकारून परसमणि गमावील।
हा अविनाशी जीव भ्रमत राहील। चारी कोशांत लक्ष चौऱ्यांशी योनीत ।। २
मायाप्रेरणेने जीव सदा भटकत। काळ कर्म स्वभाव गुण यांनी वेष्टित।
प्रेमळ ईश्वर विना हेतु देत। नरतनु कधी तरी दावून दया ।। ३
नरतनुनौका तराया भवसागरात। मम कृपाप्रसाद हा अनुकूल मरूत।
नौकेस दृढ सद्‌गुरु कर्णधार लाभत। यापरी दुर्लभ साधने सुलभ तया ।। ४
ऐसी सुलभ साधने पावून। जो नर न जाई भवसागर तरून।
तो जाणावा मंदमति कृतघ्न। पावे तो गति जी आत्मघातकी पावे ।। ४४
इह परलोक सुख वांछिता जर। धरा दृढ मम वचन हृदयी तर।
बंधूंनो हाच भक्तिमार्ग सुलभ सुखकर। हेचि गातात श्रुतिपुराण ।। १
ज्ञानमार्ग दुर्गम बहु विघ्ने असती। आधार न मना साधने कठिण अती।
बहु कष्ट करून कुणी पावती। परि ते भक्तिहीन मज न प्रिय ।। २
सकल सुखाची खाण स्वतंत्र भक्ति। सत्संगाविण जन ती न पावती।
पुण्यसंचयाविण संत न भेटती। सत्संग चुकवी जन्ममरणाचे चक्र ।। ३
एकच पुण्य न दुजे यासम जगात। कायावाचामने पुजावे विप्रपद।
जो करी द्विजाची सेवा सोडून कपट। तयावरी प्रसन्न देवमुनी ।। ४
आता अन्य गुपित कथितो सकलांस। विनये जोडून निज करांस।
न होईल प्राप्त मम भक्ति नरास। शंकरभक्ति वाचून ।। ४५
सांगा मग भक्तिपथी कोणते सायास। न योग यज्ञ जप तप वा उपवास।
आवश्यक यथालाभ सदा संतोष। सरळ स्वभाव नसावी कुटिलता मनी ।। १
नर करी आशा म्हणवून मम दास। सांगा तर कैसा धरावा विश्वास।
बहुत वदून विवरण वाढवू कशास। बंधुहो मी वश याच आचरणे ।। २
न करी वैर विग्रह न मानी आशाभयास। दिशा सदा सकल सुखमय तयास।
क्रोधहीन विज्ञानी निष्पापी दक्ष। अनासक्त अनिकेत अभिमानहीन ।। ३
प्रिय सदा सज्जनसहवास। तृणसम मानी विषयभोग स्वर्गमोक्ष।
दूर सारी सकल कुतर्कास। दावी निग्रह भक्तिपथी न मूढता ।। ४

जे मम गुणग्रामी नामी रंगती । ममता मदमोह सकल सोडिती ।
तयांतील सुख भक्तचि जाणती । प्राप्त परमात्मारूप परमानंद जया ।। ४६
रामाचे सुधासम वचन परिसून । सकल धरिती कृपाधामाचे चरण ।
म्हणती प्राणाहून प्रिय हे कृपानिधान । तुम्ही आमुचे मातापिता गुरुबंधू ।। १
तुम्हीच तन धन धाम राम हितकारी । प्रणताचे क्लेश निवारिता सर्वपरी ।
ऐसा उपदेश तुम्हाविण न अन्य करी । माता पिताही असती स्वार्थरत ।। २
दोन उपकारी जगी स्वार्थरहित । हे असुरारि तुम्ही आणि तुमचा भक्त ।
स्वार्थास्तव होती मित्र जगी बहुत । प्रभो स्वप्नीहि न घडे परमार्थ तया ।।३
सकलांचे वचन प्रेमरसपूर्ण । परिसून हृदयी हर्षित रघुनंदन ।
निज गृही जाती सकल आज्ञा घेऊन । वर्णित प्रभुवचन सुंदर ।। ४
हे उमे अयोध्यावासी नारीनर । होती कृतार्थरूप निरंतर ।
ब्रह्म सच्चिदानंदघन रघुवीर । भूप जेथे स्वयें असती ।। ४७
एकदा मुनि वसिष्ठ येती । राम सुखधाम सुंदर जेथे बैसती ।
पद प्रक्षाळून पदतीर्थ घेती । करून आदर तयांचा श्रीराम ।। १
ऐका रामा कर जोडून मुनि वदती । कृपासिंधु ऐकावी मम विनंती ।
होई मम हृदयी मोह अती । बघून तुमचे मनुजचरित्र ।। २
वेदासी अगम्य तुमचा महिमा अमित । कैसा वर्णावा मी तो भगवंत ।
पुरोहितकर्म मंद अति नीच । निंदिती तया वेद पुराण स्मृती ।। ३
जंव न घेई काज ब्रह्मा वदती मजसी । वत्सा भावी लाभ तयात तुजसी ।
परमात्मा ब्रह्म घेऊन नररूपासी । होतील भूप रघुकुलभूषण ।। ४
हृदयी केला मी विचार तंव । करिती योग यज्ञव्रत दान जयास्तव ।
तेच मी पावेन या मम कर्माने राघव । यासमान नसे अन्य धर्म ।। ४८
जपतपयोग वर्णाश्रमधर्म । वेद प्रतिपादित नाना शुभ कर्म ।
तीर्थस्नान ज्ञान दया संयम । उपदेशती जितुके धर्म जे वेद संत ।। १
आगम निगम पुराण अनेक । प्रभो श्रवण पठणाचे तयांचे फळ एक ।
तव पदपंकजी प्रीति संतत । फळ हे सुंदर सकल साधनांचे ।। २
मलिन जळे धुता सुटेल का मळ । जळ घुसळता कैसे घृत मिळेल ।
अंतरीचा कधी न मळ जाईल । रघुराजाच्या भक्तिप्रेमजळाविण ।। ३
तोच सर्वज्ञ तत्त्वज्ञ तोच पंडित । तोच गुणसागर विज्ञानी अखंडित ।
तोच दक्ष सकल गुणयुक्त । जयाचे प्रेम प्रभुपदकमलावरी ।। ४

नाथा मागतो एकच वर । कृपा करून मज द्या रघुवीर ।
रामा जन्मजन्मांतरी न पडो अंतर । प्रभुपदकमली प्रेमात ।। ४९
मग स्वगृही जाती वसिष्ठ मुनि । कृपासिंधु राम अति प्रसन्न मनी ।
जाती भक्तसुखदाता प्रभु संगे घेऊनी । हनुमान भरतादि सकल भ्राते ।। १
मग कृपाळु राम नगराबाहेरी जाती । गजरथअश्व आणवून घेती ।
बघून कृपा करून सकला वाखाणिती । देती जो जे वांछी उचित जाणून ते ।। २
सकलांचे श्रमहारक प्रभु श्रमित होती । मग शीतळ आंबराईत जाती ।
भरत निज वसन पसरता बैसती । प्रभूस सेविती सकल भ्राते ।। ३
तंव विंझणवारा घाली मरुतसुत । लोचनी प्रेमाश्रु तनु पुलकित ।
नसे हनुमानासम अन्य भाग्यवंत । तयासम न कोणी अनुरक्त रामपदी ।। ४
ते अवसरी मुनि नारद येती । घेऊन वीणा निजहस्ती ।
गाती श्रीरामाची यशकीर्ती । नित नवीन अति मधुर ।। ५०
बघा कृपापूर्वक हे पंकज लोचन । कृपाविलोकने होत शोक विमोचन ।
श्रीहरि श्याम नीलतामरससमान । शिवहृदयकंजमकरंदमधुप ।। १
निशाचरगणबलभंजक । मुनिसज्जनरंजक अघनाशक ।
अशरणशरण दीनजनपालक । विप्ररूप धान्यापिकासी नव मेघवृंद ।। २
भुजबळे केले भूभारखंडन । खर दूषण विराधवधी निपुण ।
रावणारि आनंदस्वरूप भूपभूषण । जय राम दशरथकुलकुमुदशशी ।। ३
सुयश निगमागमपुराणी विदित । गाती ते सकल सुरमुनिसंत ।
करुणाकर मिथ्यामदनाशक । सकलपरी कुशल कोशलभूषण ।। ४
नाम कलिमलमंथनममताभंजन । हे तुलसीदासप्रभो रक्ष प्रणत जन ।। ५
अति प्रेमपूर्वक नारद मुनी । रामगुणगणाचे गान करुनी ।
शोभा सिंधु प्रभु हृदयी धरुनी । जाती ब्रह्मलोकासी ।। ५१
गिरिजे ऐक ही उज्ज्वल कथा । कथिली संपूर्ण मम मति यथा ।
वर्णिता स्तब्ध होती श्रुति शारदा । ऐसे रामचरित्र अपार शतकोटी ।। १
राम अनंत गुण अनंत । जन्मकर्म अनंत नामे अगणित ।
मोजवतील जलबिंदु रजःकण अमित । परि रघुपतिचरित्र न संपेल वर्णून ।। २
विमल कथा हरिपददायनी । श्रवणमात्रे प्राप्त भक्ति अनपायनी ।
ही रमणीय कथा कथिली तुज भवानी । जी भुशुंडी निवेदी गरुडास ।। ३

अल्प रामगुण कथिले वर्णुनी । आता काय कथू तुज हे भवानी ।
उमा हर्षित शुभ कथा ऐकुनी । मग वदे ती नम्र मृदु वचन ।। ४
धन्य धन्य मी धन्य त्रिपुरारी । परिसले मी रामगुण भवभयहारी ।। ५
तुमच्या कृपे हे कृपायतन । आता मी कृतकृत्य मोहहीन ।
जाणिला मी रामप्रताप महान । सच्चिदानंदघन प्रभूचा ।। ५२(क)
नाथ तुमच्या मुखचंद्रातून झरत । रघुवीर कथेचे अमृत ।
हे मतिधीर न होई मम मन तृप्त । पान करून तयाचे श्रवणपुटीने ।। ५२(ख)
रामचरित्र ऐकून जें संतृप्त । तयाचा रस विशेष न तया विदित ।
जें महामुनि जीवन्मुक्त । तेहि ऐकती निरंतर हरिगुण ।। १
जो करू इच्छी पार भवसागरास । रामकथा दृढ नौका तयास ।
हरिगुणगण विषयासक्त जनांस । श्रवणा सुखद आनंदप्रद मना ।। २
रघुपतिचरित्र जयास न रुचत । ऐसा कोण जगी श्रवणवंत ।
ते जडजीव आत्मघातक । न प्रिय जयांसी रघुपतिकथा ।। ३
केले रामचरितमानसाचे तुम्ही गान । नाथा पावले अमितसुख ऐकून ।
कथिले तुम्ही हे सुंदर आख्यान । निवेदिले गरुडास जे काकभुशुंडीने ।। ४
ज्ञानविज्ञान वैराग्य परम । रामचरणी अति दृढ प्रेम ।
वायसतनु परि रामभक्ति अनुपम । येई मम मनी संदेह ।। ५३
हे त्रिपुरारि सहस्र नरातुनी । धर्म व्रतधारी निपजेल एखादा कुणी ।
ऐशा कोटि धर्मात्मांमधुनी । विषयविन्मुख वैराग्यरत एखादा ।। १
श्रुति सांगती कोटि विरक्तात । एखादाच करी यथार्थ ज्ञान प्राप्त ।
ऐशा कोटयवधि ज्ञानवंतात । जीवन्मुक्त विरळा जगात ।। २
त्या जीवनमुक्तात सहस्र सुखखाणी । दुर्लभ असे ब्रह्मी लीन विज्ञानी ।
धर्मशील विरक्त ज्ञानी । प्राणी जीवनमुक्त ब्रह्मपर ।। ३
ऐसा सर्वांमाजी तो प्राणी दुर्लभ राया । जो रामभक्तिरत गत मदमाया ।
तो काक कैसा पावे हरिभक्ति या रहस्या । मज समजावून सांगा विश्वनाथा ।।४
श्रीरामपरायण गुणागार । भुशुंडि ज्ञानरत मतिधीर ।
पावला कैसा काकशरीर । कारण सांगा मज नाथा ।। ५४
हे सुंदर प्रभुचरित्र पुनीत । सांगा कृपाळु कोठे पावला काक ।
मदनारि आपणासी ते कैसे ज्ञात । सांगा मज वाटे भारी कुतुहल ।। १

गरूड महा ज्ञानी गुणराशी । हरिसेवक अति निकट निवासी ।
कवण हेतूने जाई वायसापाशी । ऐकावया कथा मुनिवृंद सोडून ।। २
कैसा घडला तो संवाद । काकगरुडाचा दोघे हरिभक्त ।
बोलती शिव आदरे प्रसन्नयुक्त । परिसून गौरीवचन सरळ मधुर ।। ३
हे सती धन्य तू तव मति पवित्र । रघुपतिचरणी तव प्रीति अपार ।
ऐकता जो होई सर्व लोकभ्रम दूर । तो करी श्रवण पुनीत इतिहास ।। ४
उपजवी तो रामचरणी विश्वास । होई भवनिधिपार नर विनासायास ।। ५
विहंगपति ऐसे पुसे प्रश्न । वायसाप्रती जाऊन ।
उमे ऐक ते आता मन लावून । तुज कथितो आदरे ते सर्व ।। ५५
जैसी ऐकिली कथा मी भवमोचनी । ऐक तो प्रसंग सुमुखी सुलोचनी ।
प्रथम जन्मलीस तू दक्षभवनी । तंव नाम सती होते तंव ।। १
दक्षयज्ञी जाहला तव अपमान । क्रोधे सोडला तू निजप्राण ।
करिती यज्ञविध्वंस मम सेवकगण । तू जाणतेस प्रसंग तो ।। २
तंव अति शोके मम मन उद्विग्न । प्रिये तव वियोगे होते दुःखपूर्ण ।
सुंदर गिरि सरिता सरोवर वन । ऐसे दृश्य बघून होतो हिंडत ।। ३
गिरि सुमेरु उत्तर दिशेस दूर । नील शैल एक तेथे अति सुंदर ।
तयाची सुवर्णमय शिखरे चार । अति सुशोभन मना रुचली ती ।। ४
तयावर तरु एकाहून एक विशाल । आम्र वट पाकळ पिंपळ ।
शैलावरी एक सर रम्य शीतल । मन मोहे बघून तेथील रत्नसोपान ।। ५
तयाचे मधुर निर्मल शीतल जळ । शोभती कमळे बहुरंगी विपुल ।
करिती गुंजारव भृंग मंजुळ । मधुर कलरव करिती हंसगण ।। ५६
वसे वायस त्या गिरीवरी सुंदर । तयाचा न नाश कल्पही अखेर ।
मोह काम अविवेकादि विकार । अनेक मायाकृत गुणदोष ।। १
जे विकार करिती सकल जगा व्याप्त । कदापि न ते जाती गिरी निकट ।
तेथे बैसून हरीस भजे काक । ऐक उमे कैसा प्रेमे तो ।। २
पिंपळतरुतळी करी ध्यान । पाकळतळी करी जप यज्ञ ।
आम्रवृक्ष छायेत मानसपूजन । तया हरिभजनाविण न अन्य काज ।। ३
वटतळी करी हरिकथा वर्णन । विहंग अनेक ऐकती तेथे येऊन ।
प्रेमे आदरे करिती गान । नानापरी मनोहर रामचरित्राचे ।। ४

ऐकती सकल विमलमती हंस। जे निरंतर करिती सरी वास।
जंव जाऊन देखिले मी कौतुकास। उपजे मम हृदयी विशेष आनंद ।। ५
तंव काही काल घेऊन हंसतनूस। तेथे जाऊन मी करी वास।
आदरे परिसून रघुपतिगुणास। आलो माघारी मी कैलासा ।। ५७
गिरिजे कथिला तो सकल वृत्तांत। ज्या समयी मी गेलो खगानिकट।
आता ज्या हेतुस्तव गेला ऐक ते वृत्त। गरुड खगकुलकेतु वायसापाशी ।। १
जंव रघुनाथ करिती रणात क्रीडेस। मज उपजे लज्जा स्मरता चरित्रास।
इंद्रजिताकरवी प्रभु झाले बद्धपाश। तंव नारद पाठविती गरुडास ।। २
पाश तोडून गेला गरुड परत। उपजला तया हृदयी प्रचंड विषाद।
खगपति मग मनी चिंता करीत। स्मरून प्रभूचे नागबंधन ।। ३
व्यापक ब्रह्म विकाररहित वागीश्वर। माया मोहातीत परमेश्वर।
ऐकिले मी तयाचाच हा जगी अवतार। परि न दिसला प्रभाव कांहीच ।। ४
जयाचे करिता नामस्मरण। सुटते नराचे भवबंधन।
बांधिती क्षुद्र निशाचरगण। नागपाशात त्याच रामासी ।। ५८
नानापरी समजाविले मनास। ज्ञान न प्रकटे व्यापी भ्रम हृदयास।
खेद खिन्न मनी वाढवी तर्कास। जाहला तुजसम तो मोहवश ।। १
व्याकुळ होऊन गेला देवर्षिपाशी। निज मनातील कथिला संशय तयासी।
ऐकून अति दया येई नारदासी। तंव वदती हे खगा प्रबल राममाया ।। २
जी माया हरण करते ज्ञानी चित्तासी। बलात्कारे करी मोहवश मनासी।
जिने बहु वेळा नाचविले मजसी। तीच व्यापी तुज विहंगपती ।। ३
महामोह उपजला तव उरी। न वेगे मिटेल मम वचने परी।
आदेश मिळेल तैसेच करी। खगेशा जाऊन ब्रह्माप्रती ।। ४
देवर्षि नारद निघाले ऐसे सांगून। प्रेमे करिती रामाचे गुणगान।
परम ज्ञानी मुनि सुजाण। हरिमायेचे बळ वानीत पुन्हा पुन्हा ।। ५९
मग खगपति जाई विरंचीपाशी। निज संदेह निवेदिला तयासी।
ऐकून ब्रह्मा वंदती रामासी। स्मरता प्रताप प्रेम उरी दाटे ।। १
मग मनी विचार करी विधाता। मायावश होती कवि पंडित ज्ञाता।
हरिमायेची अमित प्रभुता। नाचविले तिने मज विपुल वेळा ।। २
घडविले मी विश्व चराचर। न मज विस्मय मायावश खगेश जर।
तंव विधाता वदती वाणी सुंदर। जाणती महेश रामाचा महिमा ।। ३

जा शंकरापाशी तू खगेश्वर। तात न पुसावे कुठे कुणा अन्यत्र।
होईल शंकानिरसन तेथे सत्वर। निघाला मग विहंग ब्रह्मावाणी ऐकून ।। ४
तो परम आतुर विहंगनाथ। आला मजपाशी त्वरित।
तंव मी कुबेरगृही होतो जात। उमे तंव तू होतीस कैलासी ।। ६०
आदरे मम पदी मस्तक ठेवून। गरुड करी निज संदेह निवेदन।
तयाची नम्र मृदु वाणी ऐकून। भवानी वदलो अति प्रेमे मी ।। १
हे गरुडा भेटलास मज मार्गात। कवण प्रकारे करावी समजूत।
र करशील सत्संग काळ बहुत। संशयभंग निश्चित होईल ।। २
ऐक तेथे तू हरिकथा रुचिर। जी गाती वहुपरी मुनीश्वर।
तयात प्रतिपाद्य विषय राम परमेश्वर। आदि मध्य अंतासह ।। ३
जेथें हो.र हरिकथा प्रतिदिन। पाठवितो तेथे ऐक जाऊन।
संदेह फिटेल ते ऐकून। जडेल दृढ प्रेम रामचरणी ।। ४
न लाभे हरिकथा सत्संगाविण। मोह न जाई हरिकथेवाचून।
मोहनाश न होता परिपूर्ण। नुपजे दृढभक्ति रामपदी ।। ६१
न होई रघुपतिप्राप्ती प्रेमाविण। लाधले जरी वैराग्य योग तप ज्ञान।
उत्तर दिशी गिरि नील सुंदर स्थान। सुशील काक भुशुंडि वसे तेथे ।। १
रामभक्तिपंथात परम प्रवीण। अति वृद्ध ज्ञानी गुणनिधान।
सदैव रामकथा करी निवेदन। ऐकती आदरे विविध विहंगवर ।। २
जा ऐक तेथे हरिगुण अपार। होईल मोहजनित दुःख दूर।
हर्षे निघाला वंदून सत्वर। जंव समजाविले मी सकल तया। ३
उमे मी नच उपदेशिले तयाला। रघुपतिकृपे जाणिले मी मर्माला।
केव्हा एकदा तया अभिमान उपजला। दूर करू इच्छिती कृपानिधी ।। ४
तरीच मी न राखिला मजपाशी। जाणती परस्पर खग खग भाषेसी।
कोण ऐसा ज्ञानी न मायामोह जयासी। हे भवानी प्रभुमाया बलवंत ।। ५
जो ज्ञानी भक्त शिरोभूषण। त्रिभुवनपति भगवानाचे वाहन।
भुरळ घाली तयाहि माया अभिमान। मोहवशे नर पामर दावी अहंकार।। ६२ (क)
मायेने मोहित होती ब्रह्माशिव। तेथे काय करील बापुडा मानव।
हे जाणून मुनिवर ठेविती भक्तिभाव। भगवंत मायापति ठायी ।। ६२ (ख)

गरुड जाई भुशुंडि प्रती । देखे अकुंठ मति अखंड हरिभक्ती ।
पाहून शैल जाहला प्रसन्न चित्ती । निमाले माया मोह शोक सर्व ।। १
केले सरोवरी स्नान जलपान । वटासमीप जाई हर्षित होऊन ।
होते तेथे वृद्धवृद्ध विहंगगण । रामचरित्र सुंदर श्रवण करायासी ।। २
कथेचा आरंभ काक करू इच्छित । खगनाथ तेथे पोचला तोच ।
आनंदित वायस समाजासहित । येताना पाहून खगराज ।। ३
खगपतीचा सत्कार करून । कुशल विचारून देई आसन ।
प्रेमे तयाचे करी पूजन । मग मधुर वचन वदे तो ।। ४
तव दर्शनाने हे खगनाथ । जाहलो आज मी कृतार्थ ।
आज्ञा द्याल ते करू तात । कोणत्या काजा केले आगमन ।। ६३ (क)
कृतार्थरूप तुम्ही निरंतर । बोले मृदु वचन खगेश्वर ।
जयास स्वये स्तविती शंकर । आदरपूर्वक निजमुखे ६३ (ख)
ऐका तात आलो ज्या हेतुस्तव । पावलो ते सकल दर्शने तव ।
संशय मोहभ्रम गेले सर्व । तव पावन परम आश्रम पाहून ।। १
आता श्रीरामकथा सदा सुखदायक । अति पावन दुःखविनाशक ।
ऐकवावी मजसी ती तात । हे प्रभो वारंवार विनवितो तुम्हा ।। २
ऐकून गरूडाचे विनम्र वचन । प्रेमळ सरळ सुखद सुपावन ।
मन वायसाचे जाहले उत्साहपूर्ण । कथू लागे रामगुणगाथा ।। ३
प्रथम अति प्रेमे भवानी । रामचरितसार सांगे समजावुनी ।
नारदाचा अपार मोह मग वर्णुनी । पुढे रावणअवतार कथा कथी ।। ४
गाइली मग प्रभूच्या अवताराची कथा । मन लावून कथिले शिशुचरिता ।। ५
वर्णिले नानाविध बाललीलेस । परम उत्साह वाटे तयाचे मनास ।
अयोध्येत विश्वामित्र आगमनास । श्रीरघुवीराचे विवाह वर्णन ।। ६४
मग राम-अभिषेक प्रसंग । नृपवचने राज्याभिषेक रसभंग ।
पुरजनांचे दुःख रामवियोग । पुढे कथिला रामलक्ष्मण संवाद ।। १
विपिनासी गमन निषादाचे प्रेमवर्णन । गंगा उतरून प्रयागी निवासस्थान ।
कथिले भगवान वाल्मीकीसी मीलन । मग प्रभु राहिले कैसे चित्रकुटी ।। २
सचिवाचे आगमन नगरी नृपमरण । भरत-आगमन बहु प्रेमाचे वर्णन ।
नृपक्रिया करून संगे नगरजन । भरताचे गमन सुखराशी प्रभुप्रती ।। ३

मग रघुपतिकृत भरताचे सांत्वन । पादुका घेऊन अयोध्येस प्रयाण ।
भरत राहणी इंद्रसुताचे कारस्थान । मग वर्णन प्रभुअत्रिमुनिभेटीचे ।। ४
पुढे विराधवधाचे कथन । देह सोडून शरभंगाचे मरण ।
मग सुतीक्ष्णप्रीतीचे वर्णन । प्रभु राम अगस्त्य यांचा सत्संग वृत्तांत ।। ६५
केले दंडकवन पावन तयाचे वर्णन । तदनंतर जटायुगृध्रमैत्रीगान ।
मग प्रभुचा पंचवटीवास कथन । भयनिरसन मुनिगणांचे ।। १
मग लक्ष्मणास उपदेश अनूप । कैसी शूर्पणखा केली कुरूप ।
कथिले खरदूषणवधस्वरूप । मर्म जयाचे जाणे दशानन ।। २
दशकंधरमारीच यांचें संभाषण । घडले तैसे केले वर्णन ।
मग कपटे कृत मायासीताहरण । श्रीरघुवीरविरहाचे कथन अल्प ।। ३
जटायुक्रिया कैसी प्रभुकृत । कबंधवध शबरीसी मोक्षप्राप्त ।
रघुवीराचा विरह पुन्हा वर्णीत । जाताना पंपासरोवर तीरी ।। ४
पुढे प्रभुनारद यांचे संभाषण । प्रसंग तदनंतर मारुतिमीलन ।
सुग्रीवाशी मित्रता साधून । वध वालीचा वर्णियेला ।। ६६(क)
करून राज्याभिषेक सुग्रीवास । प्रवर्षण शैलावर प्रभूचा निवास ।
वर्णन वर्षाशरदाचे रामरोष । सुग्रीवाचे भय आदि प्रसंग ।। ६६(ख)
कैसे पाठविती सकल कपींस । कैसा करिती सीताशोध सर्व दिशेस ।
कैसा केला विवरी प्रवेश । पुढे संपाती कपींचे मीलन ।। १
कथा ऐकून मारुति समीरकुमार । उल्लंघी जलनिधि अपार ।
कैसा प्रवेशी लंका कपिवर । कैसा दिला धीर सीतेसी कथियेले ।। २
वनाचा विध्वंसन उपदेश रावणासी । लंका जाळून उल्लंघिले पयोधीसी ।
आला मग हनुमंत रघुरायापाशी । निवेदिले कुशल जानकीचे ।। ३
वर्णिले कैसे सेनेसह रघुपती । सागरतीरी जाऊन उतरती ।
कैसा बिभीषण येऊन भेटे तयाप्रती । मग कथिले सागरबंधन ।। ४
सेतु बांधून सागरावर । कैसी कपिसेना उतरून करी पार ।
कथिले कैसा वालीकुमार । गेला वीरवर अंगद दूत होऊन ।। ६७(क)
मग वर्णिले निशाचर कपियुद्ध । तयांतील प्रकार विविध ।
निवेदिला कुंभकर्णघननाद यांचा वध । वर्णून तयांचे पुरुषार्थ बळ ।। ६७(ख)
नानापरी निशाचर निकरांचे मरण । मग रघुपतिरावण समरवर्णन ।
रावण वध मंदोदरीचा शोक कथन । बिभीषणासी राज्य देव शोकमुक्त ।। १

वानिले मग रघुपतिसीतामीलन । कैसे करिती स्तुति सुर कर जोडून ।
कपीसह पुष्पकयानी चढून । प्रभु कृपानिकेत जाती अयोध्येसी ।। २
जैसे राम येती निजनगरात । तैसे वायस करी चरित्र विशद ।
मग तयाने कथिला राम-अभिषेक । वर्णून अयोध्या अनेक नृपनीती ।। ३
कथा समस्त भुशुंडी वाखाणी । जैसी तुज मी कथिली हे भवानी ।
खगनाथ रामकथा ऐकुनी । वदे अति मुदित मने ।। ४
कथा परिसून मम संदेह गत । ऐकिले मी सकल रघुपतिचरित ।
तव प्रसादे हे वायसतिलक । उपजले प्रेम रामचरणी ।। ६८(क)
उपजला अति मोह मनात । निरखून प्रभूचे बंधन रणात ।
कवण कारणे श्रीराम होती व्यथित । सच्चिदानंदघन प्रभू ।। ६८(ख)
पाहून चरित्र मानवापरी । आला हृदयी मम संशय भारी ।
भ्रम तोच आता वाटे हितकारी । करिती मजवरी अनुग्रह कृपानिधी ।। १
जो रविआतपाने होई अतिव्याकुळ । तोच तरुछायेचे सुख जाणेल ।
जर न होता मज मोह प्रबळ । तात कैसा भेटतो मी तुज आज ।। २
कैची हरिकथा परिसतो सुंदर । तुम्ही गाइली जी बहुपरी विचित्र ।
हेच मत सांगती पुराण वेदशास्त्र । कथिती तेच सिद्ध मुनि न संदेह ।। ३
शुद्ध संत भेटती तयाला । विलोकिती कृपे राम जयाला ।
रामकृपे घडले तव दर्शन मजला । तव प्रसादे जाहलो भ्रमरहित ।। ४
विहंगपतीची ती वाणी । अति प्रेमळ विनम्र ऐकुनी ।
पुलकित गात्रे सजल लोचनी । काक होई हर्षित मनी अती ।। ६९(क)
श्रोता सुशील बुद्धिमान । कथेमाजी रसिक हरीचा दास पावन ।
उमे ऐसा श्रोता पावताच संतजन । प्रकट करिती गुप्त रहस्य ।। ६९ (ख)
बोलला काक भुशुंडि नंतर । अति प्रेम तयाचे गरुडावर ।
अससी तू रघुनायकाचे कृपेस पात्र । नाथा मजसी पूज्य सकलपरी ।। १
तुज न संशय न मोहमाया । मजवरी तूं दाविली दया ।
देती महति मज रघुराया । खगेशा मोहवशे तुज धाडून ।। २
कथिला निज मोह हे खगपती । स्वामी तयात नसे विस्मय अती ।
ब्रह्माशिवनारद सनकादी । जे मुनिनायक आत्मवादी ।। ३
मोहे होई न अंध ऐसा कोण तयात । मदन न नाचवी ऐसा कोण जगात ।
तृष्णा कवणा वेड न लावीत । क्रोधे कवणाचे न हृदय दग्ध ।। ४

ज्ञानी तपस्वी शूर। कविकोविद गुण-आगर।
लोभे विटंबना न होत ऐसा नर। कोण असेल ऐसा संसारी ॥ ७०(क)
लक्ष्मीचा मद कवणा न करी वक्र। कवण न होई प्रभुतेने बधिर।
फेकताच मृगनयना कटाक्षशर। कोण ऐसा जो न होई विद्ध ॥ ७०(ख)
कवणा न होई त्रिगुणकृत सन्निपात। कोण निभावे सोडून मानमद।
कोणा यौवनज्वर न पछाडत। ममता कोणाचे न करी नष्ट यश ॥ १
कोणास न लावी मत्सर कलंक। शोक वायु कवणा न करी कंपित।
चिंता सर्पिणी कोणा न करी गट्ट। माया न व्यापी ऐसा कोण जगी ॥ २
कीटकमनोरथ काष्ठशरीर। न पोखरी जया ऐसा कोण धीर नर।
वासना तीन धन प्रतिष्ठा पुत्र। मति मलिन न करिती कोण ऐसा ॥ ३
हा सकल मायेचा अपार परिवार। अति प्रबळ वानिता न लागे पार।
भये कांपती शिवब्रह्मा थरथर। अन्य जीवाचा तेथे काय पाड ॥ ४
व्यापिली ही संसारसृष्टी। माया सेनेने प्रचंड अती।
कामादि तिचे सेनापती। योद्धे दंभकपटपाखंड ॥ ७१(क)
ती रघुवीराची दासी माया। जरी मानिले तिज मिथ्या।
कथितो मी करून प्रतिज्ञा। न सुटे रामकृपेवीण ती ॥ ७१(ख)
जी माया नाचवी सकल जगास। जिचे चरित्र न कळे कोणास।
हे खगराजा करिताच प्रभु भ्रूविलास। परिवारासह नाचे नटीसम ती ॥ १
तोच सच्चिदानंदघन राम। अज विज्ञानरूप बलधाम।
व्यापक व्याप्य अखंड अनंत अनुपम। अखिल अमोघशक्ति भगवंत ॥ २
महान निर्गुण वाणी इंद्रियातीत। सर्वदर्शी अनिंद्य अजित।
निर्मम निराकार मोहरहित। नित्य निरंजन सुखराशी ॥ ३
सकल हृदयवासी प्रकृति पार। ब्रह्म विरज निरीच्छ अक्षर।
जाईल रविसन्मुख का कधी अंधार। मोहाचे कारण नसे एथे ॥ ४
भक्तास्तव प्रभु भगवान। राम करिती भूपतनु धारण।
दाविती चरित्र परम पावन। सामान्य नरासी अनुरूप ॥ ७२(क)
जैसा अनेक वेष धरून। नट नाचतो भूमिकेसमान।
तैसा तैसा भाव दावून। परि स्वये न होई तैसाच ॥ ७२(ख)
हे सर्पारि रघुपतीची लीला ऐसी। जनसुखकारी मोहवी दनुजासी।
जे कामी मतिमलिन वश वासनेसी। ते मोहाचा आरोप करिती प्रभूवरी ॥ १

जंव जयास उपजे नेत्रदोष। तंव दिसे शशि पीतवर्ण तयास।
जया होई दिशाभ्रम हे खगेश। म्हणतो तो पश्चिमेस सूर्योदय ॥ २
पृथ्वी फिरे भासे नौकारूढास। आपण अचल मानतो तो मोहवश।
गृह फिरे वाटे स्वये भ्रमता बालकास। म्हणती परस्परा वदता असत्य ॥ ३
हरिविषयी ऐसा मोह हे विहंगा। स्वप्नी न देखती प्रभु मोहप्रसंगा।
मायावश मतिमंद अभागी हे खगा। जया हृदयावरी बहु संशयपटल ॥ ४
ते मूर्ख हट्टाने संशयी पडती। निज अज्ञान रामावरी आरोपिती ॥ ५
जे कामक्रोधमदलोभरत। दुःखरूपी गृही आसक्त।
ते कैसे जाणती राम कृपानिकेत। अंधकार कूपात पडलेले ते मूढ ॥ ७३(क)
निर्गुण रूप जाणणे सुलभ अती। सगुण रूप कोणी न जाणती।
जंव मुनि सुलभ, दुर्लभ चरित्र ऐकती। तंव होई भ्रम मुनिमनास ॥ ७३(ख)
ऐक हे खगेशा रघुपतीची प्रभुता। कथितो यथामति ती सुंदर कथा।
जेणे मज मोह उपजला होता। कथा ती तुज आतां ऐकवितो ॥ १
आहात कृपापात्र रामास तुम्ही तात। तुमचे हरिगुणी प्रेम पाहून मी संतुष्ट।
तुम्हापासून काही न ठेवी गुप्त। कथितो रहस्य मनोहर परम ॥ २
ऐक रामाचा स्वभाव सहज सरळ। घालविती भक्ताचा अहंकार सकल।
दुःखद नाना भवचक्राचे मूळ। अति शोकदायक अभिमान हा ॥ ३
कृपानिधि तो दूर करिती। भक्तांवरी तयांची ममता अती।
जैसे व्रण होता शिशुतनुवरती। माता कठिण हृदये काढी कापून ॥ ४
जरी प्रथम दुःख पावे बालक। अधीर होऊन रोदन करीत।
व्याधि विनाशास्तव माता दुर्लक्ष करीत। यातना निज शिशूच्या ॥ ७४(क)
तैसे श्रीराम करिती अभिमानहरण। जाणून निजदासाचे कल्याण।
का न भजसी ऐशा प्रभूस भ्रम टाकून। म्हणे ऐसे तुलसीदास ॥ ७४(ख)
सांगतो खगेशा रामकृपा मम मूढता। ऐक हे गरुडा मन लावून आता।
दाविती राम बहुत लीला भक्तहिता। जंव जंव ते घेती मनुजदेह ॥ १
तंव तंव मी जातो अयोध्येस। होतो हर्षित बघून बाललीलांस।
जाऊन बघतो जन्मोत्सवास। लुब्ध होऊन राहतो तेथे पाच वरुषे ॥ २
बालक राम मम उपास्य दैवत। कोटि शतकामासम कांति झळकत।
गरुडा करितो नेत्रांचे सार्थक। घडी घडी निरखून प्रभुवदन ॥ ३
धरून लघु वायस रूप हरिसंगी। जाऊन बघतो बाल चरित्र बहुरंगी ॥ ४

जेथे जेथे फिरती ते बालपणी। तेथे तेथे संगे जातो उडुनी।
खातो तयांचे उष्टे अन्न वेचुनी। पडलेले जे अंगणात॥ ७५ (क)
एके समयी रघुवीर। करून दाविती अति चमत्कार।
रोमांच उठती वायसदेहावर। प्रभुलीलांचे स्मरण होताच॥ ७५ (ख)
वदे भुशुंडि ऐक हे खगनायक। रामचरित्र सेवकासी सुखदायक।
अयोध्यी नृपमंदिर नाना रत्नखचित। सुवर्णमय बहुपरी सुंदर॥ १
न वर्णवे ते अंगण रुचिर। जेथे नित्य खेळती बंधु चार।
बाल विनोद करिती रघुवीर। क्रीडती अंगणी सुखदायक मातांसी॥ २
नीलमण्यापरी तनु मृदुल श्यामल। अंगी अंगी मदन लावण्य उज्ज्वल।
नव राजीव अरुण चरण मृदुल। अंगुली रुचिर हरती नखे शशिद्युती॥ ३
पदतळी ललित वज्रादिक चिन्हे चार। मधुर छुम छुम करिती नूपुर।
कटी कनक किंकिणी सुंदर। रत्नखचित कलरव मंजुळ॥ ४
रेखात्रय उदरावरी सुंदर। नाभि शोभते रुचिर गंभीर।
विविध बाळ भूषणवस्त्र। शोभती विशाल उरावरी॥ ७६
आरक्त हस्त नखकरांगुली मनोहर। बहु विशाल विभूषण सुंदर।
बालसिंहासम स्कंध दरग्रीवा रुचिर। चारु हनुवटी मुखलावण्यसीमा॥ १
बोल बोबडे अरुण अधर। चिमुकले दंत दोन उज्ज्वल शुभ्र।
ललित गाल नासिका मनोहर। शशिकिरणासम सुखद हास्य॥ २
नीलकंजलोचन भवमोचक। शोभे भाळी गोरोचन तिलक।
सम कर्ण सुंदर भ्रुकुटि विकट। काळे कुरळे केस छबी छान॥ ३
तनुवरी शोभे अंगडे तलम पीत। क्रीडा हास्यदृष्टि मज वाटे मोहक।
रूपराशी शिशुनृप अंगणी खेळत। नाचती पाहून निज प्रतिबिंबास॥ ४
मजसवे क्रीडा करिती विविध। लीला वर्णिता मी होतो लज्जित।
जंव धावती मज धराया खिदळत। मी पळताच दाविती अपूप॥ ५
मी निकट येता प्रभु हसती। मी जाता दूर रोदन करिती।
मी समीप पद धरू जाता पळती। बघती पुन्हा पुन्हा वळुनी॥ ७७ (क)
प्राकृत शिशुपरी लीला पाहून। उपजे मम मनी मोह महान।
प्रभु सच्चिदानंदघन। दाविती चरित्र कवणाचे॥ ७७ (ख)
इतुके मनी येताच खगराया। रघुपतिप्रेरित व्यापी मज माया।
ती माया न दुःखद मम हृदया। वा अन्य जीवापरी न बुडवी संसारी॥ १

हृ नाथ तयाचे अन्य कारण। ऐक हरियाना ठेवून चित्त सावधान।
अखंड ज्ञानस्वरूप एकच सीतारमण। अन्य जड चेतन जीव मायावश ।। २
जर सकलांसी हे अखंड ज्ञान प्राप्त। सांग मग कैसा भेद ईश्वर जीवात।
मायावश जीव अभिमानयुक्त। त्रिगुण खाण माया ईश्वराधीन ।। ३
जीव परवश स्वतंत्र भगवंत। जीव अनेक एक श्रीकांत।
अज्ञानप्रेरक भेद मायाकृत। कोटि उपाये नष्ट न हरिभक्तिविण ।। ४
रामचंद्रभजनावाचून। जो नर वांछी पद निर्वाण।
तो नर ज्ञानवंत असून। जाणावा पशु पुच्छविषाणहीन ।। ७८ (क)
जरी उगवे शशि षोडश कलायुक्त। सकल तारागण समवेत।
सकल गिरीवरी जरी दावाग्नि पेटत। तरी न संपे रात्र सूर्योदया विण ।।७८ (ख)
तैसे हरिभजनाविण खगेश। न मिटती जीवाचे सकल क्लेश।
न व्यापी अविद्या हरि सेवकास। प्रभुप्रेरित विद्या व्यापी तया ।। १
म्हणून न होई दासाचा नाश। भेद भक्ति वाढे हे खगेश।
राम पाहून मज भ्रमचकित मोहवश। हंसती ते चरित्र ऐक आता ।। २
त्या लीलेचे मर्म न जाणे कोणी। न जाणती अनुज वा न पिता जननी।
मज धराया धावती जानुकरांनी। राम श्यामलगात्र अरुणकरचरण ।। ३
हे उरगारी तंव मी निघालो पळत। राम मज धराया पसरती हात।
जैसा जैसा मी उडे दूर आकाशात। तैसे तैसे दिसती हरिभुज मजपाशी ।। ४
गेलो मी ब्रह्मलोकापर्यंत। उडता माघारी वळून बघत।
मी रामभुज उभयांत हे तात। अंतर केवळ दोन अंगुलींचे ।। ७९ (क)
सप्त आवरणे भेदून जोवरी। मज गति लाभली गेलो तोवरी।
तेथे प्रभूचे भुज देखून हे सर्पारी। जाहलो मी व्याकुळ अती ।। ७९ (ख)
नयन मिटले जंव जाहलो त्रस्त। नयन उघडता गेलो अयोध्येत।
विलोकून मज राम हसत। ते हसताच पडलो मुखी शीघ्र ।। १
उदरात हे पक्षिराया ऐक। देखिली मी ब्रह्मांडे अनेक।
अति विचित्र तेथील बहु लोक। रचना एकाहून एक महान। २
कोटचवधि चतुरानन गौरीश। अगणित तारागण रवि रजनीश।
पाहिले अगणित यमकाळदिक्पालांस। विशालभूमि भूधर अगणित ।। ३
सागर सरिता सर विपिन अपार। नानापरी सृष्टीचा विस्तार।
सिद्ध सुर मुनि नाग नर किन्नर। प्रकार चारी चराचर जीवांचे ।। ४

जे कधी न देखिले न ऐकिले । जे कदापि मनी न आले ।
ऐसे सकल अद्‌भुत देखिले । कैसे वानावे ते तरी ।। ८०(क)
एका एका ब्रह्मांडात । राहिलो मी वरुषे शत ।
यापरी फिरलो मी पाहत । अनेक कोटि ब्रह्मांडे ।। ८०(ख)
प्रति लोकी लोकी भिन्न ब्रह्मदेव । भिन्न दिक्पाल मनु विष्णु शिव ।
भूत वेताळ नर गंधर्व । असुर सर्प पशु किन्नर खग ।। १
देवदानवगण जाती अनेक । सकल जीवांचे प्रकार किती एक ।
मही सरिता सागर सर गिरि बहुत । प्रपंच तेथील सर्व भिन्न भिन्न ।। २
प्रति ब्रह्मांडी देखिले निज रूप । देखिल्या वस्तु अनेक अनूप ।
प्रति भुवनी भिन्न अयोध्या स्वरूप । भिन्न शरयु भिन्न नारीनर ।। ३
दशरथ कौसल्या ऐक हे नाना । विविध रूपे भरतादि भ्राता ।
प्रति ब्रह्मांडी रामअवतारचरिता । बाल विनोद अपार देखिले मी ।। ४
भिन्न भिन्न अति विचित्र रचना । पाहिली मी सर्वत्र हे हरियाना ।
गेलो मी अगणित भवना । परि न पाहिले अन्य प्रभु राम ।। ८१(क)
सर्वत्र तीच शोभा तेच शिशूपण । तीच कृपाळु रघुवीरमूर्ति जाण ।
बघत फिरलो प्रति ब्रह्मांड भुवन । मोहरूपी पवनप्रेरित होऊनिया ।। ८१(ख)
भ्रमलो ब्रह्मांडी अनेक । भासले मज गेले कल्प शत एक ।
आलो निज आश्रमी फिरत फिरत । घालविले दिन काही तेथे ।। १
जंव ऐकिले प्रभूचा अवतार अयोध्येत । निर्भर प्रेमे धावलो होऊन हर्षित ।
देखिला जन्महोत्सव मने मुदित । वर्णिला जैसा मी प्रथम ।। २
देखिली नाना जगते रामउदरात । पाहिली परी न वर्णू शकत ।
तेथे देखिले मग राम भगवंत । सुजाण कृपाळु मायापती ।। ३
केला वारंवार विचार मी अती । मोहकर्दमी व्याप्त मम मती ।
दोन घटिका पाहून ही स्थिती । भ्रमले मम मन मोहवशे ।। ४
पाहून मज अति व्याकुळ । हास्य करिती रघुवीर कृपाळ ।
हसतांच ते आलो मी तात्काळ । मुखाबाहेर ऐक हे मतिधीर ।। ८२(क)
दाविती पुन्हा तेच शिशुपण । कृपाळू राम रघुनंदन ।
न लाधले मना समाधान । समजाविले मी बहुपरी मना ।। ८२(ख)
पाहून हे चरित्र प्रभुता स्मरून । हरपलो मी मम देहभान ।
पडलो धरणी शब्द न ये मुखातून । वदून रक्ष रक्ष हे आर्त जन त्राता ।। १

ते सुख जाणती माझे मन कान । रसना न करू शके ते वर्णन ।
प्रभुशोभेचे सुख जाणती नयन । कैसे वानिती ते न वाणी तया ।। २
बहुपरी उपदेशून मज सुख देती । पुन्हा शिशुकौतुक करून दाविती ।
वक्रमुख नयनांतून अश्रू ढाळिती । बघती मातेप्रती अति क्षुधित ।। ३
उठे आतुर माता वत्सा बघून । धरून उराशी बोले मृदु वचन ।
अंकी घेऊन करवी दुग्धपान । करी गान लडिवाळे लीलेचे ।। ४
ज्या सुखप्राप्तीस्तव त्रिपुरारी । सुखद शंभु अशुभ वेष करी ।
ते सुख अयोध्यानगर नरनारी । उपभोगिती संतत हर्षमग्न होऊन ।। ८८(क)
स्वप्नी ते सौख्य लवलेश । लाधले एकवार जयास ।
ते बुद्धिमान सज्जन हे खगेश । तुच्छ मानिती ब्रह्मसौख्यास ।। ८८(ख)
मग राहिलो अयोध्येत काही काळ । पाहिला बालविनोद रसाळ ।
रामप्रसादे पावलो भक्तिवर अनुकूल । प्रभूपदां वंदून आलो निज आश्रमी ।।१
जैंहुनी आपुला मज म्हणती रघुराया । तैंहुनी न व्यापी मज माया ।
कैसी हरिमाया मज नाचवी ते समया । ते सर्व चरित्र गुप्त वर्णिले मी ।। २
कथिला निज अनुभव मी खगेश । हरिभजनाविण न मिटती क्लेश ।
रामाची प्रभुता न कळे कवणास । रामकृपेविण ऐक खगराजा ।। ३
प्रभुता जाणल्याविण न येत प्रतीती । प्रतीतीवाचून न उपजे प्रीती ।
प्रीति विना न होत दृढ भक्ती । जैसा न राही ओलावा विनाजळ ।। ४
कैसे लाभेल ज्ञान गुरूवाचून । मिळेल का ज्ञान वैराग्याविण ।
कथिती हेच वेद पुराण । हरिभक्तिवाचून कैसी सुखप्राप्ती ।। ८९(क)
शांति सुख पावेल कैसे कोण । हे तात सहज संतोषाविण ।
चालेल का नौका जलावाचून । कोटि यत्ने मर मरून कष्ट केले तरी।। ८९(ख)
संतोषाविण न होई कामनानाश । कामना असता न स्वप्नी मिळत सुखास ।
कैसी मिटेल कामना सोडून रामभजनास । धरतीविण कधी उगवेल का तरु ।।१
नसे समभाव विज्ञानाविण । नसे अवकाश नभावाचून ।
विनाश्रद्धा न धर्माचरण । पृथ्वीतत्त्वाविण कुणा गंध मिळेल का ।। २
तपावाचून तेज कैसे पसरेल । जलतत्त्वाविण कैसा रस संसारी मिळेल ।
संतसेवेविना लाभेल का कधी शील । स्वामी जैसे तेजतत्त्वाविण न रूप दिसे।।३
आत्मसुखाविण का होते स्थिर मन । होईल स्पर्श का समीरावाचून ।
कैसी लाधेल सिद्धि विश्वासाविण । न भवभयनाश हरिभजनाविना ।। ४

श्रद्धेवाचून न मिळे भक्ती । भक्तिविना राम न द्रवती ।
स्वप्नी न लाभे जीवा सुखशांती । श्रीरामकृपेवाचून ।। ९० (क)
ऐसे चिंतून हे मतिधीर । सोडावा संदेह कुतर्क अखेर ।
भजावे रघुवीरास सुंदर । राम करुणाकर सुखद ।। ९० (ख)
निज मति-अनुसार गाईली मी नाथा । खगराया प्रभुप्रतापमहिमा कथा ।
देखिली मी नेत्रे यथा । कथिली तैसी न युक्तीने वाढविली ।। १
महिमा नाम रूप गुणखाण । सकल अमित अनंत रघुनंदन ।
यथामति वानिती मुनि हरीचे गुण । वेदशेषशिव न पावती पार ।। २
तुजसह खगादिपासून मशकापर्यंत । नभी उडती परि न लागे अंत ।
तैसा रघुपतीचा महिमा अगाध तात । कोण कैसा केव्हा पावेल का थांग ।।३
राम सुंदर काम शतकोटि तनुसरिस । अमित कोटि शत्रुनाशक दुर्गेसदृश ।
शत कोटि नभासम अमित अवकाश । विलासभोग शतकोटि इंद्रासम ।। ४
शतकोटी विपुलबळ वायुसदृश । शतकोटि रविसम प्रकाश ।
शीतल शतकोटि शशिसरिस । सकल भवदुःखशामक राम ।। ९१ (क)
कोटि शत काळासम प्रभुराम । अति दुरंत दुस्तर दुर्गम ।
शत कोटि धूमकेतुसम । अति प्रबळ भगवंत ।। ९१ (ख)
प्रभु अगाध जैसे शतकोटि पाताळ । शत कोटि यमासम विक्राळ ।
अमित कोटि तीर्थासम पावन निर्मल । संपूर्ण पापसमूह विनाशक नाम ।। १
कोटिहिम गिरिसम अचल रघुवीर । शत कोटि सिंधुसरिस गभीर ।
सकल कामनादायक कोशलेश्वर । शत कोटि कामधेनुपरी ।। २
अमित कोटि शारदेसम चतुरता । ब्रह्मा शतकोटि समान सृष्टि निपुणता ।
कोटिविष्णु सम पालनकर्ता । संहारक कोटिशत रुद्रासम ।। ३
शतकोटि कुबेरासम धनवान । कोटि मायेसम प्रपंचनिधान ।
शतकोटि शेषासम भूभारधरण । निरवधि निरुपम जगदीश ।। ४

उपमा न अन्य । प्रभू निरुपम । रामासम राम। श्रुति गाती ।
जणु शतकोटी । खद्योता सदृश । तुलता रवीस । लघु भासे।
मति-अनुसार । यापरी मुनीश । वानिती हरीस । मनोभावे ।
भावाचा भुकेला । प्रभु कृपाघन । वर्णन ऐकून । सुख मानी ।। १

राम अमित गुणसागर । न लागे कोणा तयाचा पार ।
ऐकिले मी संतांचे अल्प उद्‌गार । तेच तुज निवेदिले मी ।। ९२(क)
भक्तीसी वश भगवान । सुखनिधान करुणाभवन ।
सोडून ममता मद मान । भजावे सीतारमणास सदा ।। ९२(ख)
भुशुंडीचे सुंदर वचन ऐकून । हर्षित खगपती पंख फुलवून ।
नयनी नीर आनंदित मन । हृदयी रघुवीरप्रताप धारण करी ।। १
पस्तावा होई पूर्व मोहास स्मरून । अनादि ब्रह्मास मानिले मनुज म्हणून ।
वारंवार काकपदी शिर नमवून । वाढवी प्रेम प्रभुसम जाणून ।। २
गुरुविना भवनिधि कोणी न तरती । जरी ते विरंचीशंभुसम असती ।
मज संशयसर्पे ग्रासिले अती । कुतर्क रूपी दुःखद लहरी पीडती ।। ३
तव स्वरूपे गारुडी रघुनायक । वाचविती मज भक्तसुखदायक ।
तव प्रसादे मम मोह नष्ट होत । कळले मज अनुपम रामरहस्य ।। ४
नानापरी भुशुंडीस प्रशंसून । शिर नमवी खग कर जोडून ।
मग वदे पुन्हा मृदु वचन । विनयशील प्रेमपूर्ण ।। ९३(क)
निज अविवेके हे प्रभु मी । पुसतो मम शंका स्वामी ।
आदरे कथावे कृपासिंधु तुम्ही । मज निज दास जाणून ।। ९३(ख)
तुम्ही सर्वज्ञ तत्त्वज्ञ तमोगुणपार । सुमति सुशील सरल आचार ।
ज्ञान विज्ञान विरक्ति यांचे आगर । रघुनायकाचे प्रिय दास तुम्ही ।। १
कैसा जाहला हा काकदेह प्राप्त । सकल समजावून सांगा मज तात ।
हे स्वामी रामचरितसर सुंदर अमित । हे नभगामी सांगा कोठे पावलात । २
नाथा ऐसे ऐकले मी शंभूपासून । महा प्रळयीही तुम्हा नसे मरण ।
ईश्वर न वदती मिथ्या वचन । तोहि वसे संदेह मनी ।। ३
जीव चराचर नागनर देव यांस । नाथा काळ भक्षीं सकल जगास ।
करी तो अमित ब्रह्मांडांचा नाश । काळ सदा दुरतिक्रम ।। ४
का न व्यापी तुम्हा काळ । ऐसा तो जरी अति कराल ।
कथन करा कारण मज हे कृपाळ । ज्ञान बळे वा योग बळे ।। ९४(क)
हे प्रभो पोचताच तव आश्रमात । पळाला मम मोह भ्रम तात ।
कारण तयाचे कवण हे नाथ । वदा प्रेमासह सकल ।। ९४(ख)
काक गरुडाची वाणी हर्षे ऐकून । हे उमे वदला तो प्रेमपूर्ण वचन ।
मज रुचले अति तव प्रश्न । धन्य धन्य तव मति हे नागारी ।। १

ऐकून तव रुचिर प्रेमळ प्रश्न । बहु जन्मांचे मज जाहले स्मरण ।
तात ऐक आदरे मन लावून । निज कथा कथितो विस्तारे तुज ।। २
जप तप व्रत यज्ञ योग दान दम । वैराग्य विवेक विज्ञान शम ।
या सकलांचे फळ रामपदी प्रेम । न लाभे कल्याण त्याविण कुणाही ।। ३
लाभली रामभक्ति मज याच देही । मम ममता अधिक तयावरी यास्तव ही ।
जेथे मिळतो निज स्वार्थ काही । तयावरीच ममता सकलांची ।। ४
ऐसी ही श्रुतिसंमत नीती । हे नागरिपु ती सज्जन निवेदिती ।
अति नीचावरी करावी प्रीती । निज परम हित जाणून ।। ९५ (क)
होई कीटकापासून रेशीम । तयाची होत वसने उत्तम ।
कीटकास पाळती कुणी प्राणासम । जरी असती ते अपावन ।। ९५ (ख)
जीवासी हाच सत्य स्वार्थधर्म । कायावाचामने असावे रामपदी प्रेम ।
तीच तनु सुंदर पावन परम । जी तनु भजे रघुवीरासी ।। १
रामविमुख असता पावता ब्रह्मसम तनूस । कवि कोविदहि न प्रशंसतीं तयास ।
याच तनुहृदयात पावलो रामभक्तीस । स्वामी यास्तव मज ही प्रिय परम ।। २
न सोडी मी या तनूस जरी इच्छामरण । वेद वदती न होई भक्ति तनुविण ।
राम विमुख असता न केले सुखे शयन । ग्रासले प्रथम मज मोहाने ।। ३
केली नाना कर्मे घेऊन नाना जन्म । योगयज्ञजपतपदानासम ।
कोणती योनी जगी ऐसी हे खगोत्तम । जी मी न भ्रमलो जन्म घेऊन ।। ४
कर्मे सकल पाहिली करून । न जाहलो सुखी कधी या समान ।
नाथा बहुत जन्मांचे असे मज स्मरण । शिवप्रसादे न घेरी मोह मतीसी ।। ५
घडले चरित्र जे प्रथम जन्मात । खगेशा सांगतो आता ऐक ।
उपजेल प्रभुपदी प्रेम चित्तात । जेणे मिटतील सकल क्लेश ।। ९६ (क)
प्रभो पूर्वी एका कल्प युगांत । होते कलियुग पापमूलक ।
नरनारी सकल अधर्मी रत । वेदश्रुतीसी प्रतिकूल ।। ९६ (ख)
त्या कलियुगी अयोध्येत । घेतला जन्म मी शूद्र योनीत ।
मी काया वाचा मने शिवसेवक । अन्य देवनिंदक अभिमानी ।। १
मी धनमदोन्मत्त परम वाचाळ । उग्र बुद्धि अंतरी दंभ विशाल ।
जरी होतो राम-राजधानीत उज्ज्वल । तरी न जाणिला तिचा महिमा ।। २
आता अयोध्येचा प्रभाव मज ज्ञात । निगमागम पुराण तेच सांगत ।
कोणत्याहि जन्मी वसता अयोध्येत । रामपरायण नर होतो तो ।। ३

तंव अयोध्येचा प्रभाव प्राणी जाणती। जंव हृदयी राम धनुर्धारी वसती।
हे सर्पारि तो कलिकाल कठिण अती। पापपरायण सर्व नरनारी ॥ ४
कलिपाप धर्मासी ग्रासीत। होती सद्ग्रंथ सर्व लुप्त।
करिती निज मतीने कल्पित प्रकट। बहुधर्म पंथ दांभिक जन ॥ ९७(क)
सकल लोक जाहले मोहवश। लोभे जाहला शुभ कर्माचा नाश।
ऐक हे ज्ञाननिधि खगेश। आता कथितो तुज काही कलिधर्म ॥ ९७(ख)
कलियुगी ना वर्णधर्म ना आश्रमचारी। वेदविरोधीरत सर्व नरनारी।
भूप प्रजाभक्षक करिती द्विज वेदविक्री। न मानिती कोणी वेद-आज्ञा ॥ १
तोच धर्ममार्ग जो जया रुचेल। तोच पंडित जो वृथा वाचाळ।
जो मिथ्या आरंभ करून दंभरति दावील। म्हणती तयास सकल संत ॥ २
तोच शहाणा जो परधन हरण करी। जो दांभिक तोच सदाचारी।
असत्य वदून जो करी मस्करी। कलियुगी गुणवंत तया वदती ॥ ३
जो आचारहीन वेदपथ सोडील। तोच कलियुगी ज्ञानी वैरागी होईल।
नख जटा जयाच्या अति विशाल। तोच तपस्वी प्रसिद्ध कलियुगी ॥ ४
अमंगल भूषण अमंगल वेष। जे भक्षती भक्ष्याभक्ष्य।
तेच योगी तेच सिद्ध पुरुष। तेच पूजनीय कलियुगी ॥ ९८(क)
जे करितीं दुसऱ्यावर अपकार। तयांस मान प्रतिष्ठा फार।
कायावाचामने जे लबाड साचार। मानिती तयांना वक्ता कलिकाली ॥ ९८(ख)
हे स्वामी सकल नरनारीस वश। नाचती ते नटमर्कटसदृश।
शूद्र देती द्विजास ज्ञानोपदेश। कुदान घेती जानवे घालून ॥ १
सर्व नर कामलोभरत क्रोधी। देव वेद विप्र संत यांस विरोधी।
गुणमंदिर सुंदर सोडून निज पती। अभागी नारी भजती परनरास ॥ २
सुवासिनी राहती भूषणविहीन। विधवा करिती शृंगार नवीन।
गुरुशिष्य असती अंधबधिरासमान। एका न ऐकूं येई बोध एका न ज्ञानदृष्टी ॥ ३
हरती शिष्य-धन गुरु शोक न हरती। ते गुरु घोर नरकी पडती।
मातापिता निज बालकास बोलाविती। शिकविती तयां उदरंभरण धर्म ॥ ४
ब्रह्मज्ञानाविण नरनारी। करिती न वार्ता दुसरी।
कवडीलागी लोभवश होऊन अंतरी। करिती घात विप्रगुरूंचा ॥ ९९(क)
द्विजासी वितंडवाद करिती शूद्रजन। वदती तुम्हांहून आम्हांत काय न्यून।
तोच श्रेष्ठ ब्राह्मण जो जाणे ब्रह्मज्ञान। ऐसे दापिती वटारून डोळे ॥ ९९(ख)

कपटकुशल परस्त्रीलंपट । मोहद्रोह ममताव्याप्त ।
तेच द्वैतवादी नर ज्ञानी निश्चित । देखिले ऐसे चरित्र मी कलियुगी ।। १
आपण बुडती बुडविती अन्यास । जे सन्मार्ग पाळती नष्ट करिती तयास ।
तर्क करून जे निंदिती वेदास । कल्पभर एक एक न . पिचती ते ।। २
जे वर्णाने नीच तेली कलाल । कोळी किरात कुंभार चांडाळ ।
पत्नी मरता वा गृहसंपत्ति जाता सकल । शिर मुंडन करून होती संन्यासी ।। ३
विप्रांकरवी पूजन घेती । इहपरलोकास निज हस्ते मुकती ।
विप्र मूर्ख निरक्षर लोलुप कामी होती । आचारहीन स्वामी व्यभिचारिणीचे ।।४
शूद्र नाना जपतपव्रत करिती । बैसून उच्च आसनी पुराण कथिती ।
मना रुचेल तैसे नर आचरती । तयांची अपार नीति न वर्णवे ।। ५
कलियुगी होई सर्वत्र वर्णमिश्रण । धर्मबंधने तोडिती जन ।
पावती दुःख पापे करून । त्रस्त होती शोक रोग भय विरह यांनी ।।१००(क)
हरिभक्तिपंथ वेदसंमत । वैराग्यविवेकज्ञानयुक्त ।
नर मोहवशे तया मानीत । कल्पिती अनेक नव पंथ ।। १००(ख)

बहुदामे सजवित धाम यती । विषया भजती न दिसे विरक्ती ।
तपस्वी धनवंत दरिद्रि गृही । कलिकौतुक ते वदवे नचही ।। १
कुलवंत हाकलुनी नारि सती । गृही आणिति दासि सती त्यजती ।
सुत मानिति मातुपिता तंव ते । जंव स्त्रीमुख दृष्टिस ना पडते ।। २
जंव आवडते श्वशुरालय ते । रिपुरूप कुटुंब तदा दिसते ।
नृप पापपरायण धर्म नसे । करि दंड प्रजेसि दुःखी तैसे ।। ३
धनवंत कुलीन जरी पापी । द्विज चिन्हचि जानवं नग्न तपी ।
नच मानत वेदपुराणही जो । हरि-सेवक संत कली युगि तो ।। ४
कविवृंद उदार न ये श्रवणी । गुणि मानिति दोषी न कोणी गुणी ।
कलिमाजि दुकाळ सदा पडती । दुःखी अन्नविना जन ते मरती ।। ५

कलियुगी ऐक हे खगेश । कपट हट्ट पाखंड दंभ द्वेष ।
मान मोह मद कामादि विशेष । व्यापिती ब्रह्मांड अखिल ।। १०१(क)
तामस भावे करिती दान । तैसेचि जपतपव्रत धर्मादि यज्ञ ।
न वर्षती जळ धरणीवरी देवगण । न उगवे बीज पेरलेले ।। १०१(ख)

अबला कचभूषण भारि क्षुधा । धनहीन दुःखी ममता बहुधा ।
सुख वांछिती मूढ न धर्मरती । मति अल्प कठोर न कोमल ती ।। १
नर पीडित रोग न सौख्य मही । अभिमान विरोध अकारणही ।
लघु जीवन संवत पाच दहा । कल्पांत न मृत्यु घमेंड महा ।। २
कलि त्रस्त करीत सदा मनुजा । नच मानत तो अनुजा तनुजा ।
नच तोष विचार न शीतलता । अजि जाती कुजातीत याचकता । ।। ३
ईर्षा कटुबोलचि लोलुपता । भरली जगती समता विगता ।
जनतेस वियोग विशोक तदा । वरणाश्रम धर्म–आचारगता ।। ४
दम दान दया नच जाणकरी । जडता परवंचन फार परी ।
तनुपोषक नारी नर सगळे । परनिंदक ते जगती भरले ।। ५

हा कलिकाल ऐक खगनाथ । पाप अवगुणांचे निकेत ।
परि एक गुण महान कलियुगात । भवबंधन सुटे विना श्रम ।। १०२(क)
कृत युगी त्रेताद्वापारात । पूजा योग यज्ञ यांनी जी गति प्राप्त ।
तीच गति पावती कलिकालात । लोक केवळ हरिनामे ।। १०२(ख)
कलियुगी सकल ज्ञानी विज्ञानी । करून हरीचे ध्यान तरती प्राणी ।
त्रेतायुगी विविध यज्ञ करुनी । प्रभूस कर्म अर्पून भव तरती ।। १
द्वापारी रघुपतीचे पदपूजन । न उपाय दुजा नर भव जाती तरून ।
कलियुगी केवळ हरिगुणगाथागान । करून नर पावती भवसागर ठाव ।। २
कलियुगी न योग न यज्ञ वा ज्ञान । एकच आधार रामगुणगान ।
भजावे रामास अन्य आश्रय सोडून । गावी प्रेमे तयाची गुणगाथा ।। ३
नसे संशय भव तरेल तोच । नामाचा प्रताप प्रकट कलियुगात ।
कलीचा एक प्रताप अति पुनीत । मिळते मानस पुण्य न मानस पाप ।। ४
न अन्य युग कलियुगासमान । नरासी असेल जर श्रद्धास्थान ।
करता रामविमलगुणगान । नर तरेल भव विना सायास ।। १०३(क)
चार प्रसिद्ध प्रकट धर्माचे पद । परि एक दान प्रधान कलियुगात ।
येन केन प्रकारे करिता निश्चित । दान कल्याण करील ।। १०३(ख)
राहती युगधर्म सकल हृदयी नित । होऊन राममायेने ते प्रेरित ।
शुद्ध सत्त्व समता विज्ञान प्रसन्न चित्त । जाणावा हा प्रभाव कृत युगाचा ।। १
सत्त्व बहु रज अल्प कर्मी प्रीती । हा त्रेता धर्म सर्व परी सुखी स्थिती ।
काही तामस स्वल्प सत्त्व रजोगुण अती । हर्षभय चित्ती द्वापार धर्म हा ।। २

रजोगुण अल्प तामस बहुत । हा कलिप्रभाव चारी बाजूंस विरोध ।
मनी युगधर्म जाणून जन बुध । अधर्म सोडून ठेविती धर्मावर प्रीती ।। ३
युग धर्म न व्यापिती तयास । रघुपतिचरणी अति प्रीति जयास ।
नट दाविती कपट चरित्र खगेश । परि न व्यापी माया नटसेवकां ।। ४
हरिमायाकृत दोष गुण । न जाती हरिभजनाविण ।
यापरी निज मनी चिंतून । भजावे रामास वासना सांडून ।। १०४(क)
त्या कलिकाली वरुषे बहुत । हे खगेशा राहिलो मी अयोध्येत ।
दुष्काळ पडता जाहलो विपत्तिअंकित । लागलो देशोधडीस मी तंव ।। १०४ (ख)
मग गेलो उज्जयिनींस ऐक हरियान । होऊन दु:खी दरिद्री दीन मलिन ।
कालांतरे स्वल्प संपत्ति पावून । करू लागलो मी शिवभक्ती ।। १
विप्र एक वैदिक करी शिवपूजन । दुजे न काज तया पूजनावाचून ।
तो साधु जाणत परमार्थज्ञान । शिवोपासक परि न हरिनिंदक ।। २
मी सेवी तया कपटपूर्वक । द्विज दयाळू नीतिनिकेत ।
विप्र शिकवी मज मानून सुत । मम बाह्य नम्रता पाहून ।। ३
शिवाचा मंत्र देई तो द्विजवर । शुभ उपदेश करी बहु प्रकार ।
शिवमंदिरी जाऊन मी जपे मंत्र । परि हृदयी दंभ अहंकार अधिक ।। ४
मी खल पापी मति मलिन । अति नीच जाति मोहा-आधीन ।
देखताच विष्णुभक्त ब्राह्मण । करून विष्णुद्रोह मी मनी जळे ।। १०५(क)
गुरू मज नित्य उपदेशिती । मम आचरण पाहून दु:खी होती ।
उपजे अति क्रोध मम चित्ती । कैसी नीति रुचे दांभिकास ।। १०५(ख)
गुरू एकदा मज बोलावून घेती । बहुपरी नीतिशिक्षण देती ।
पुत्रा असावी अविरल भक्ति रामपदी । सांगती ऐसे शिवसेवेचे फळ ।। १
रामासी भजती शिव ब्रह्मादि हे तात । मग काय कथा तेथे नराची नीच ।
जयाचे चरणी शिवब्रह्मा अनुरक्त । वांछिसी सुख अभाग्या द्रोह करून ।। २
शिवास हरि सेवक मम गुरू म्हणताच । खगनाथा ऐकून मम हृदय जळले साच ।
पावलो विद्या परि जाति नीच । जैसा सर्प उन्मत्त होई पाजता दुग्ध ।। ३
मी अभिमानी अभागी कुजाती दुष्ट । दिनरात्र गुरूचा द्रोह करीत ।
गुरू दयाळु अति तया न स्वल्प क्रोध । करिती मज ज्ञानोपदेश घडी घडी ।। ४
ज्या योगे नीच पावतो प्रतिष्ठेस । प्रथम तयाचा गुरु करी नाश ।
अग्नीतून निघे धूम ऐक खगेश । मेघ पदवी पावता विझवी अग्नीस ।। ५

धूळ पथी पडता होई तिचा अनादर। सदा साहे सर्वांचा लत्ताप्रहार।
प्रथम भरे पवनातच उडवता समीर। मग पडे नृपनयनी मुकुटावरी ॥ ६
ऐक खगपते ऐसा जाणून प्रसंग। बुध न करिती अधमाशी संग।
कवि कोविद गाती ऐसी नीति हे खग। दुष्टासी प्रीति वा कलह न भला ॥७
असावे नित्य उदासीन हे खगेश। श्वानापरी सोडावे दुष्टास।
मी दुष्ट हृदयी कपटी कुटिल विशेष। न रुचती मज गुरूचे हितबोल ॥ ८
एक दिन शिवमंदिरात। शिवनाम मी होतो जपत।
गुरु येती परि अभिमान हृदयात। न करी उठून प्रणाम तया ॥ १०६(क)
न वदती काही गुरु दयाळु विशेष। हृदयी तयांच्या न रोष लवलेश।
परि न साहू शके ते महेश। गुरूचा अपमान महा पाप ॥ १०६ (ख)
मंदिरी दुमदुमली आकाशवाणी। हे हतभाग्य अज्ञ अभिमानी।
जरी तव गुरु चित्ती कृपाळु यथार्थ ज्ञानी। तव गुरूसी नसे क्रोध ॥ १
हे मूर्खा तरी देतो शाप तुजला। नीतीसी विरोध न रुचे मजला।
न करीन जर तुज दंड खला। होतील भ्रष्ट मम वेदमार्ग ॥ २
जे मूर्ख गुरूसी ईर्षा करिती। ते कोटि युगी रौरव नरकी पडती।
तिर्यक् योनीत पुन्हा जन्मा येती। पीडा पावती दश सहस्रजन्म ॥ ३
रे पापी बैसलासी शांत अजगरासमान। होशील भुजंग दुष्टा तव मति मलिन।
रे अधमाधमा अधोगति पावून। बसशील महावृक्षढोलीत ॥ ४
करिती गुरु हाहाकार करुण। ऐकून शिवशाप दारुण।
मी जहालो कंपित विलोकून। अति दुःख उपजे हृदयात ॥ १०७(क)
गुरु प्रेमे दंडवत घालून। शिवसन्मुख कर जोडून।
गद्‌गद स्वरे वदती वचन। समजून मम घोर गती ॥ १०७(ख)

ईशान्येचा ईश। ब्रह्ममोक्षरूप। वेदाचे स्वरूप। नमितो मी।
निर्गुण निरीच्छ। आकाशवसन। चिदानंदघन। भजतो मी ॥ १

निर्विकार विभो। ओंकाराचे मूळ। महाकाळा काळ। निराकार।
गिरा ज्ञानातीत। प्रभो गुणागर। संसाराचा पार। शंभो रक्ष ॥ २

हिमाचलासम। गौर सुगभीर। प्रभा श्री शरीर। कामापरी।
भाळी बाल इंदू। गंगा शिरावरी। सर्प कंठावरी विलसती ॥ ३

कुंडले श्रवणी। लोचन विशाळ। प्रसन्न दयाळ। नीळकंठ।
मुंडमाळा गळा। मृगचर्म वस्त्र। पुरारि शंकर। सर्वनाथ ॥ ४

सूर्यकोटिप्रभा । प्रकृष्ट प्रचंड । प्रगल्भ अखंड । रुद्ररूप ।
शूळपाणी शिव । त्रिशूळ खंडन । शैलजा रमण । भक्तिगम्य ।। ५

शंभो कलातीत । हितकारी सदा । सदानंद दाता । कल्पांतक ।
चिदानंद रूप । मोहा अपहारी । मन्मथाचा अरी । प्रभो रक्ष ।। ६
कमल चरणी । शिवाच्या भक्तीसी । न दावी नरासी । नसे सुख ।
तापनाश शांती । कदा न पावती । इहपर लोकी । नरनारी ।।
गिरिजा रमणा । प्रसीद कामारी । प्रसीद पुरारी । मजवरी ।
सर्वभूतवासी । प्रभो व्हा प्रसन्न । सर्वदा नमन । शंभो तुम्हां ।। ७

न मी जाणे योग । जप वा पूजन । सदा मी शरण । शिव तुम्हां ।
जराजन्मदुःखे । अंतरी जळत । आपत्तीने त्रस्त । रक्ष प्रभो ।। ८
गाइली गुरूने । रुद्राष्टक स्तुती । शिव तुष्ट होती । ऐकूनीया ।
भक्तिभावे गाता । शंकर स्तुतीस । प्रसन्न महेश । तयावरी ।। ९

सर्वज्ञ शिव विप्राची विनंति ऐकून । विलोकिती तयाचे प्रेम महान ।
तोच हे द्विजवरा वर माग म्हणून । जाहली मंदिरी नभोवाणी ।। १०८(क)
वदे द्विज जर प्रभु प्रसन्न मजवर । नाथा तुमचा अति स्नेह या दीनावर ।
प्रभो द्यावा निज चरणभक्तीचा वर । मग द्यावा वर दुसरा ।। १०८(ख)
हे प्रभो तव मायावशे जीव अज्ञानी । संतत भ्रमतो भ्रमिष्ट होऊनी ।
कृपासिंधो भगवान दया दावुनी । क्रोध न करावा तयावरी ।। १०८(ग)
हे दीन दयाळ शंकर । कृपा करावी आपण तयावर ।
जेणे होईल सत्वर । उःशाप अनुकूल तयासी ।। १०८(घ)
जेणे होईल तयाचे कल्याण । तेच आता करावे कृपानिधान ।
परहितपूर्ण विप्रवाणी ऐकून । जाहली आकाशवाणी तथास्तु ।। १
जरी तयाने केले पाप दारुण । दिला शाप मी अति कोपून ।
परि तव साधुता पाहून । करितो विशेष कृपा तयावरी ।। २
हे द्विजा जे क्षमाशील परोपकारी । ते मज प्रिय यथा राम खरारी ।
द्विजा मम शाप वृथा न जाईल परी । जन्म सहस्र हा पावेल ।। ३

परि जन्म मरणाचे दुःख दारुण । हा न होईल अल्पहि तया आधीन ।
कोणत्याही जन्मी न मिटेल याचे ज्ञान । ऐक शूद्रा मम वचन सत्य ॥ ४
जाहला तव जन्म रघुपतिपुरीत । मग मन लावले मम सेवेत ।
अयोध्येचा महिमा मम प्रसाद । तेणे उपजेल रामभक्ति तव हृदयी ॥ ५
हे बंधो मम सत्य वचन ऐक । द्विजसेवा हे हरितोषणाचे व्रत ।
जाणावे अनंतासमान संत । न करावा अपमान विप्राचा ॥ ६
इंद्रवज्र मम शूळ विशाल । काळाचा दंड हरीचे चक्र कराल ।
मारून यांनीही जो न मरेल । विप्रद्रोह पावके जळेल तो ॥ ७
ऐसा विवेक धरता मनात । तुज न काही दुर्लभ जगात ।
ऐक आणखी मम आशीर्वाद । अकुंठित गति तव सर्वत्र होईल ॥ ८
तंव एवमस्तु गुरु म्हणती । शिवाचे वचन ऐकून हर्षित होती ।
मज उपदेशून गृही जाती । शिवाचे चरण हृदयी धरून ॥ १०९ (क)
काळ प्रेरणेने गेलो विंध्य गिरीवर । जहालो मी भुजंग भयंकर ।
विना प्रयास सोडिले शरीर । काही काळ जाताच ॥ १०९ (ख)
मग मी करी जी तनु धारण । ती विना सायास सुटे हे हरियान ।
जैसे नर टाकिती वस्त्रपुराण । परिधान करून नूतन पट ॥ १०९ (ग)
शिवाने केले वेदनीतीचे रक्षण । न पावलो मी क्लेश दारुण ।
यापरी केली विविध तनु धारण । परि गरुडा न जाहले मम ज्ञान नष्ट ॥ १०९ (घ)
तिर्यक् योनी देवनरतनु जी धरीत । मी रामभजन अनुसरीत त्या योनीत ।
एक शल्य मी कदापि न विस्मरत । गुरुचा कोमल शील स्वभाव ॥ १
सुरदुर्लभ वेदपुराणी कथिला । ऐसा द्विज देह मज अखेर लाभला ।
दावी मी रघुनायकलीला । खेळत असता बालक मेळ्यात ॥ २
प्रौढ होताच पिता मज शिकवीत । मी ऐके समजे पुसे परि न रुचत ।
सकल वासना मनीच्या मिटत । केवळ ध्यास मज रामचरणाचा ॥ ३
वद खगेशा ऐसा अभागी कोण । जो गर्दभीस सेवील कामधेनु टाकून ।
न सुचे मज काही मी प्रेममग्न । मज शिकवून सांगून हरले पिता ॥ ४
जंव जाहले कालवश मातापिता । वनी गेलो भजण्यास जगत्राता ।
विपिनी मुनींचे आश्रम पावता । जाऊन तेथे शिर नमवी मी ॥ ५
पुसे तयांना रामगुणगाथा । कथिती ते ऐकून हर्षित मी खगनाथा ।
फिरे ऐकत हरिगुणअनुवादा । शंभूच्या प्रसादे अकुंठित गती ॥ ६

सुटल्या मम प्रबळ वासना त्रिविध । परि वाढली लालसा एक मनात ।
मानीन तंव निजजन्माचे सार्थक । जंव देखेन रामाचे पदकमल ।। ७
ज्या ज्या मुनीस पुसता ते ते कथीत । ईश्वर वसे सर्व भूतमात्रात ।
मज न रुचे निर्गुण सिद्धांत । मम हृदयी सगुणब्रह्मप्रेम अधिक ।। ८
करिता गुरुवचनाचे स्मरण । केवळ रामचरणी लागे माझे मन ।
विचरे मी गाता रघुपतियशगान । प्राप्त नव प्रेम क्षणोक्षणी ।। ११० क
वटछायी मेरुशिखरावर । देखिले लोमेश मुनि आसनावर ।
तंव मी नमवून चरणी शिर । वदलो अति दीन वाणीने ।। ११० (ख)
मम मृदु विनीत वचन ऐकुनी । हे हरियाना पुसती कृपाळु मुनी ।
हे द्विजा कवण हेतु तव मनी । धरून मज प्रति आलासी ।। ११० (ग)
तंव मी वदलो तुम्ही सर्वज्ञ । हे कृपानिधी अति सुजाण ।
कथन करावी मज हे भगवान । सगुण ब्रह्माची उपासना ।। ११० (घ)
रघुपति गुणगाथा तंव मुनीश । आदरे कथिती हे खगेश ।
मुनि ब्रह्मज्ञानरत विज्ञानी विशेष । जाणून मज परम अधिकारी ।। १
करू लागले ब्रह्मोपदेश । अज अद्वैत निर्गुण हृदयेश ।
अकथ अनिच्छ अनाम अरूप विश्वेश । अनुभवगम्य अखंड अनूप ।। २
अमल इंद्रियातीत अविनाशी । निर्विकार निरवधि सुखराशी ।
वेद गाती तत् त्वमसि । जललाटा सम नसे भेद ।। ३
बहुपरी मुनि समजाविती मजसी । परि निर्गुण मत नाकळे हृदयासी ।
वदलो पुन्हा वंदून मुनीसी । सगुण उपासना हे मुनीश सांगावी ।। ४
रामभक्तीजळात मम मन मीन । कैसे विलग होईल हे मुनिवर प्रवीण
निज नयने रघुराया पाहीन । दया करून करा ऐसा उपदेश ।। ५
लोचनभरे बघीन अयोध्येश । तंव ऐकेन निर्गुण उपदेश ।
खंडून सगुण मत वर्णून निर्गुणास । मुनि मग कथिती हरीकथा अनूप ।। ६
तंव निर्गुण मतास मी दूर सारून । हट्टे केले सगुणाचे निरूपण ।
मुनींच्या तनूवर दिसे क्रोधचिन्ह । जंव उत्तर प्रति-उत्तर केले मी ।। ७
ऐका स्वामी अवज्ञा होता बहुत । उपजे क्रोध ज्ञानीयांच्या हृदयात ।
काष्ठचंदन अति संघर्षण होताच । प्रकटेल अग्नि तयांतून ।। ८
मग वारंवार मुनि क्रोधासहित । वर्णिती अद्वैतज्ञान सिद्धांत ।
तंव मी बैसून करी मनात । नानाविध अनुमान ।। १११ (क)

कैसा क्रोध द्वैतबुद्धिविण । कैसे द्वैतमन विनाअज्ञान ।
कैसा जीव होईल ईशसमान । जो जड मायावशे व्यापिलेला ।। १११ (ख)
कैसा दुःखी तो जो वांछी सकलांचे हित । कैसा दारिद्री तो पारस जयाचे निकट
न होई परद्रोही भयरहित । वा न होई कामी जन अकलंकित ।। १
कैसा राहील वंश करिता विप्रछळ । आत्मज्ञान होता कैसे कर्म उरेल ।
राहील का सुमति असता संगे खल । कैसा पावेल सद्गति परस्त्रीगामी नर ।।२
ब्रह्मज्ञानी पडेल का कधी भवचक्रात । कैसा सुखी होईल हरिनिंदक ।
कैसे राहील राज्य नीति विरहित । कैसे उरेल पातक वर्णिता हरिचरित्र ।।३
पुण्यावाचून कैसे प्राप्त यश पावन । न मिळे कुणा अपयश पातकाविण ।
न अन्य लाभ हरिभक्ति समान । जी भक्ति गाती पुराण श्रुति संत ।। ४
हे बंधो जगी कोणती हानि या समान । रामास न भजता नरतनू पावून ।
नसे दयासरिस धर्म हे हरियान । वा पिशुनतेसदृश अन्य पाप ।। ५
यापरी चिंतिले मनी अमित तर्कास । आदरे न मानिला मुनि-उपदेश ।
वारंवार स्थापिले सगुण पक्षास । तंव क्रोधे वदती वचन मुनी ।। ६
हे मूढा न मानसी मम परम बोधासी । उत्तर-प्रतिउत्तर अनेक करिसी ।
मम सत्य वचनी न विश्वास तुजसी । घाबरसी सकलांस वायसापरी ।। ७
मूर्खा हट्टे मानितोसी तव पक्ष विशाल । हो शीघ्र आता तू पक्षी चांडाळ ।
मी शापास शिरी धरिले तात्काळ । न वाटे मज भय न दीनता येई ।। ८
तंव जाहलो मी काक त्वरित । मग मुनिपदी नमवून मस्तक ।
उडून चालली मी मनी हर्षित । स्मरून राम रघुवंशमणी ।। ११२ (क)
उमे जे असती रामचरणी रत । जे काममदक्रोधविगत ।
ते निज प्रभुमय बघती जग । न धरिती वैर कवणासी ।। ११२ (ख)
ऐक खगेशा यात न ऋषीस दूषण । उरी प्रेरणा देती रघुवंशभूषण ।
भुलविती मुनीच्या मतीस कृपानिधान । घेती मम परीक्षा प्रेमाची ।। १
कायावाचामने मज निज भक्त जाणून । पुन्हा मुनीच्या मतीस फिरविती भगवान
ऋषि मम महान शीलता बघून । तैसा मम विश्वास विशेष रामपदी ।। २
मुनि पस्तावती वारंवार दुःखे अती । आदरे मजसी बोलाविती ।
परोपरी मम सांत्वन करिती । प्रसन्न मने देती राममंत्र ।। ३
करावे तू बालकरूपरामाचे ध्यान । सांगती ऐसे मुनि कृपानिधान ।
रुचले ते रूप सुंदर सुखद महान । जे तुज मी प्रथम निवेदिले ।। ४

मुनि काही काळ मज ठेवून घेती । रामचरितमानस वर्णन करिती ।
आदरे मज ही कथा ऐकविती । मग वदती वचन सुंदर मुनी ॥ ५
हे मनोहर रामचरित सर गुप्त । हे तात शंभुप्रसादे मज प्राप्त ।
जाणून तुज विशेष रामभक्त । कथिली कथा मी तुज सर्व विस्तारे ॥ ६
नसे रामभक्ति जयाच्या हृदयात । तयांना ही कथा न कथावी तात ।
मुनि मज समजाविती बहुत । तंव मी प्रेमे वंदिले मुनीस ॥ ७
निज करकमले मम मस्तक स्पर्शती । मुनि हर्षित होऊन आशीर्वाद देती ।
करील वास सदैव रामभक्ती । आता मम प्रसादे तव हृदयी ॥ ८
होवो सदा तू प्रिय रामासी । मानरहित शुभगुणराशी ।
मिळो कामरूप इच्छामरण तुजसी । होवो ज्ञान वैराग्यभांडार तू ॥ ११३ (क)
वसशील जेथे आश्रमांत । श्रीभगवंताचे स्मरण करीत ।
तेथे एक योजनपर्यंत । न व्यापील कदापि अविद्या तुज ॥ ११३ (ख)
दोष स्वभाव कर्म गुण काळ । पीडा तयांची तुज न बाधेल ।
नाना रामरहस्ये रसाळ । इतिहास पुराणी गुप्त प्रकट ॥ १
विनाश्रम तू सकल जाणशील । राहो नित नव रामपदी प्रेम विमल ।
जी इच्छा मनी करशील । हरिप्रसादे तुज न दुर्लभ ती ॥ २
ऐकून मुनींचा आशीर्वाद हे मतिधीरा । ऐक जाहली गगनी गभीर गिरा ।
हा कायावाचामने मम भक्त खरा । तंव तथास्तु म्हणती मुनि ज्ञानी ॥ ३
हर्षित मी नभवाणी ऐकून । संशय फिटून होई प्रेममग्न ।
करून विनंति मुनि-आज्ञा घेऊन । वंदून वारंवार पदकमला ॥ ४
एथे आलो आश्रमी हर्षित होऊन । प्रभुप्रसादे दुर्लभ वर पावून ।
कल्प सत्तावीस गेली निघून । मज वसता येथे ऐक खगेश ॥ ५
करितो सदा रघुपती गुणगान । आदरे ऐकती विहंग सुजाण ।
जंव जंव अयोध्येत रघुनंदन । घेती मनुज देह भक्तहिता ॥ ६
तंव तंव जातो अयोध्येस । सुखी होतो बघून शिशुलीलेस ।
हृदयी साठवून राम शिशुरूप खगेश । निज आश्रमी येतो माघारी ॥ ७
निवेदिला तुज सकल वृत्तांत । कैसा जाहला हा काकदेह प्राप्त ।
कथिले तव सकल प्रश्न हे तात । रामभक्तीमहिमा अति महान ॥ ८
तात मजसी अति प्रिय हा काकजन्म । जडले रामपदी अति प्रेम ।
जाहला नष्ट सकल भ्रम । निजप्रभूचे दर्शन मज घडले ॥ ११४ (क)

हट्टे धरिला मी भक्तिपक्ष । जरी देती महर्षि घोर शापास ।
लाधला वर जो दुर्लभ मुनीस । पाहा हा भक्तीचा महिमा ।। ११४(ख)
हे जाणून जे सोडती भक्तिपक्षास । केवळ ज्ञानास्तव करिती सायास ।
ते मूर्ख गृही टाकून कामधेनूस । शोधत फिरती रुईवृक्षास दुग्धास्तव ।। १
ऐक खगेशा सोडून हरिभक्ती । अन्य उपाये जे सुख वांछिती ।
महासिंधु पार करू इच्छिती । विना नौका ते मूर्ख भाग्यहीन ।। २
हे भवानी भुशुंडीचे वचन ऐकूनी । बोले गरुड हर्षे मृदुवाणी ।
तव प्रसादे प्रभो मम हृदयातुनी । गेला संशय शोक मोह भ्रम ।। ३
ऐकिली रामगुणगाथा पुनीत । तव कृपे जाहले चित्त शांत ।
पुसतो आता एक गोष्ट कृपानिकेत । प्रभो मज समजावून सांगा ।। ४
कथिती मुनि संत वेद पुराण । न अन्य दुर्लभ जगी ज्ञानासमान ।
स्वामी कथिले मुनींनी तुम्हा तेच ज्ञान । परि न आदरिले तुम्ही भक्तिसम ।।५
प्रभो अंतर किती ज्ञानभक्तीत । सकल सांगा हे कृपानिकेत ।
बोले आदरे मग सुजाण काक ।´सुख मानून ऐकतां खगवचन ।। ६
भक्तिज्ञानात नसे काही भेद । उभय नष्ट करती भवसंभवखेद ।
हे विहंगवर ऐक सावधान चित्त । अंतर काही दाविती मुनीश हे नाथ ।। ७
ज्ञान वैराग्य योग विज्ञान । हे सकल पुरुष हे हरियाना जाण ।
सर्वपरी पुरुष प्रताप महान । अबला निर्बल सहज मंदमती ।। ८
स्थितप्रज्ञ विरक्त पुरुष । सोडू शकतो निज पत्नीस ।
परि न सोडी कामुक विषयवश । जो विमुख रघुवीरचरणासी ।। ११५(क)
जे असती ज्ञाननिधान मुनी । चंद्रमुखी मृगनयना निरखुनी ।
हे हरियाना होती ते विव्हळ मनी । विष्णुमाया प्रकट नारीरूपाने ।।११५(ख)
एथे मी न करी पक्षपात । कथितो वेद पुराणसंत यांचा सिद्धांत ।
नारी नारीरूपासी न भुलत । हे नागारि ही रीती विचित्र अती ।। १
ऐक या दोघी मायाभक्ती । नारी वर्गातील सकल जाणती ।
रघुवीराची भक्तीवर प्रीती । माया बिचारी नर्तकी साच ।। २
रघुराया सानुकुल भक्तीस । म्हणून तिचे अति भय मायेस ।
जयाच्या हृदयी करी सदा अबाधित वास । निरुपम निर्मल रामभक्ती ।। ३
पाहून तिज माया संकोचित अती । दावू न शके निज प्रभुता ती
मुनि ज्ञानी जे ऐसे चिंतिती । ते याचिती भक्ति सुखखाण ।। ४

हे रघुनाथाचे रहस्य गुप्त । न कोणी जाणत ते त्वरित ।
जो रघुवीर कृपे ते जाणत । न मोह स्वप्नीही तयासी ॥ ११६ (क)
हे गरुडा ऐक तू चतुर । ज्ञानभक्तीत अन्य अंतर ।
ऐकून ते रामपदी निरंतर । राहील प्रीति अविच्छिन्न ॥ ११६ (ख)
ऐक कहाणी ही अकथनीय तात । समजे परी न वानू शकत ।
जीव ईश्वरअंश अविनाशी अनंत । चेतन निर्मल सहज सुखराशी ॥ १
हे स्वामी तो मायावश होउनी । शुकमर्कटासम पडे बंधनी ।
यापरी पडता गाठ जडचेतनी । यद्यपि मिथ्या ती उकलणे कठिण ॥ २
तंव तो जीव पडे संसारात । सुटे न ग्रंथि न सुखी होत ।
श्रुतिपुराणविदित उपाय बहुत । परि न सुटे ती होई दृढ अधिक ॥ ३
जीव हृदयी विशेष अज्ञान-अंधार । न दिसे ग्रंथि ती कैसी सुटणार ।
जंव घडवील संयोग ईश्वर । तंव सुटेल कदाचित ती ॥ ४
श्रद्धाधेनु सात्त्विक सुंदर । हरिकृपे हृदयगृही वसेल जर ।
जपतपव्रतयमनियम अपार । तैसे शुभधर्मआचार श्रुतिकथित ॥ ५
ते धर्माचार हरिततृण धेनु भक्षील । भाववत्स शिशूस बघून पान्हवेल ।
रज्जुनिवृत्ति विश्वास दुग्ध पात्र होईल । निर्मळ मन निजदास गवळी हा ॥ ६
बंधो हे परम धर्ममय दुग्ध दोहून । निष्काम अग्नीवर तापवून ।
क्षमासंतोष वायूने निववून । करी दधि धृतिशम विरजण लावुनी ॥ ७
प्रसन्नता कुंभपात्र रवि तत्त्वविचार । सत्यसुवाणीरज्जु दमस्तंभ आधार ।
मथिता तंव निघे नवनीत पवित्र । परम विमल वैराग्यरूप ॥ ८
योग अग्नि मग प्रकट करून । शुभाशुभ कर्म इंधन पेटवून ।
नवनीतातील ममतामळ जाळुन । ज्ञानघृत निश्चयात्मक बुद्धीने निववी ११७ (क)
तंव बुद्धि विज्ञानरूपिणी । ते विशुद्ध घृत पावुनी ।
चित्तदीपात तया घालुनी । ठेवी तया समता दिवटीवरी ॥ ११७ (ख)
तीन अवस्था तीन गुण । हा जणु कापूस घेऊन ।
तुरीय अवस्थारूपी रुई काढून । वळून तिज करी वात जाडी ॥ ११७ (ग)
पाजळता ऐसा विज्ञानयुक्त । तेजोराशी सोज्ज्वल दीपक ।
जाताच जयाच्या निकट । जळतील मदादिक सकल शलभ ॥ ११७ (घ)
सोहमस्मि ऐसी अखंड वृत्ती । तीच परम प्रचंड दीपज्योती ।
आत्मानुभव सुखप्रकाशदीप्ती । पसरता भवमूलक भेदभ्रमनष्ट ॥ १

अविद्येचा प्रेमळ परिवार। मिटवी मोहादि अंधकार।
तंव बुद्धिप्रकाश पावून अखेर। हृदयगृही बैसून उकली गाठ ॥ २
जंव गाठ उकलेल त्वरित। तंव गरुडा हा होईल जीव कृतार्थ।
माया करी नाना विघ्ने उपस्थित। खगेशा ग्रंथी सुटली जाणताच ॥ ३
हे बंधो माया पाठवी ऋद्धिसिद्धीस। येऊन दाविती लोभबुद्धीस।
अंचल वायूने मालविती दीपास। जाऊन निकट कलाबळकपट दावून ॥ ४
जर बुद्धि असेल चतुर अती। अहित जाणून लक्ष न देईल ती।
जंव मायाविघ्ने बुद्धीस न बाधती। विघ्ने आणती मग सुरगण ॥ ५
इंद्रियद्वारी अनेक झरोके। ठाण मांडून देवता बैसती तेथे।
जंव बघती वाहता विषय वायूते। तंव द्वारे बळेच उघडती ॥ ६
जंव वायुप्रबळ हृदयगृही शिरेल। विज्ञानदीप तंव मालवेल।
न सुटेल गाठ जर प्रकाश मिटेल। बुद्धीस व्याकुळ करी विषयवायू ॥ ७
न रुचे ज्ञान इंद्रिय देवतांस। विषयभोग सदा प्रिय तयांस।
विषयवायु करी भोळी बुद्धीस। तंव तैसा ज्ञान दीप पाजळेल कोण ॥ ८
जीव पडे मागुति संसारात। विविधविध क्लेश भोगीत।
हरीची माया अति दुस्तर हे तात। ती तरणे सहज न शक्य खगेशा ॥११८क
निवेदणे कठिण समजणे कठिण। आचरणे कठिण ते ज्ञान।
येती तयात अनेक विघ्ने फिरून। जरी प्राप्त ते घुणाक्षरन्यायानें ॥ ११८(ख)
ज्ञानपथ कृपाणधारेसमान। खगेशा न लागे वेळ पडावया तेथून।
जो निभावेल पथ विघ्नावाचून। तोच पोचेल मोक्षरूप परमपद ॥ १
अति दुर्लभ कैवल्यपरमपद। संतपुराणनिगमागम तेच कथीत।
हे स्वामी रामास भजता तीच मुक्ति प्राप्त। बळेच मिळे ती इच्छा नसताही॥२
स्थळाविण जळ कधी न राहू शकते। करिता कोटि विविध उपायाते।
तैसे खगराया मोक्षसुख न मिळते। त्याग करून हरिभक्तीचा ॥ ३
बुद्धिमंत हरिभक्त ऐसे चिंतून। भक्तीवर लुब्ध होती मुक्ति तिरस्कारून।
भक्ति करिता कष्टयत्नावाचून। नष्ट होई अविद्या जन्ममृत्यूचे मूळ ॥ ४
जैसे तृप्तीस्तव करिती भोजन। परि स्वये जठराग्नि पचवी ते भोजन।
सुगम सुखद तैसे हरिभक्तिसाधन। कोण मूर्ख ऐसा न रुचे जया ॥ ५
सेव्य भगवान मी सेवक या भावाविण। खगेशा अति कठिण भवतरण।
ऐसा सिद्धांत मनी धरून। भजावे रामपदकमलांसी ॥ ११९ (क)

जो चेतनासी करी अचेतन। अचेतनासी करी चेतन।
ऐसे समर्थ रघुनंदन। तया भजती जे जीव ते धन्य धन्य ॥ ११९ (ख)
समजाविला तुज ज्ञान-सिद्धान्त पक्षीवर। ऐक आता भक्तिरत्नाचा महिमा अपार।
रामभक्ति चिंतामणि सुंदर। वसे जयाच्या हृदयांतरी गरुडा ॥ १
परम प्रकाशरूप तो दिनरात्र राहत। न लागे तया दीपघृत वा वात।
मोह दारिद्र्य तयाच्या न येई निकट। लोभरूपी वायु तया न मालवेल ॥ २
मिटेल मग अविद्या अंधकार प्रबळ। मदादि शलभ सकल हरतील।
न येती समीप तयाच्या कामादि खल। जयाच्या वसे हृदयी भक्तिभाव ॥ ३
तयासी विष सुधासम शत्रु मित्र होती। चिंतामणिविना कोणी न सुख पावती
ज्या रोगवशे जीव दुःख भोगती। ते मानस रोग न व्यापिती तया ॥ ४
रामभक्तिमणि वसे जयाच्या हृदयात। न दुःख लवलेश तया स्वप्नात।
तेच चतुर शिरोमणि जगात। जे सुयत्न करिती मणिलागी ॥ ५
जरी चिंतामणि प्रकट जगात। रामकृपेविण तो कुणा न लाभत।
सुगम उपाये मणि पावत। परि हतभागी लाथाडती तया ॥ ६
वेदपुराण हे पर्वत पावन। रामकथा तयात नाना रुचिर खाण।
कुदळ सुमति मर्मज्ञ सज्जन। सर्पारि नयन तयांचे ज्ञान वैराग्य ॥ ७
सद्भावे मणीसी शोधती जे प्राणी। पावती ते सुखरूपीखाण भक्तिमणि।
हे प्रभो ऐसा विश्वास मम मनी। रामाहून थोर रामाचे भक्त ॥ ८
राम सिंधु संत घन धीर। श्रीहरि चंदनतरु संत समीर।
सकलांचे फळ हरिभक्ति सुंदर। ती संतावाचून न कुणा प्राप्त ॥ ९
ऐसे जाणून जो करील सत्संग। रामभक्ति तया सुलभ हे विहंग ॥ १०
वेद पयोनिधि ज्ञान पर्वतमंदर। मंथिती तयास संतरूपी सुर।
मंथून काढिती कथामृतसार। भक्तिरूपी मधुरता वसे जयात ॥ १२० (क)
ज्ञान तलवार ढाल विरक्ति। तयाने मदमोहलोभ रिपूस वधिती।
मग पावती विजय तीच हरिभक्ती। पाहा खगराजा चिंतून मनी ॥ १२० (ख)
मग बोले प्रेमे खगेश। हे कृपाळु जर मजवरी प्रेम विशेष।
नाथा जाणावे मज निज दास। सप्त प्रश्न मज सांगावे वर्णून ॥ १
प्रथम सांगा हे नाथा मतिधीर। सर्वात कोणते दुर्लभ शरीर।
वदा संक्षेपे करून विचार। कवण महादुःख कवण सुख महान ॥ २

तुम्हां संतअसंतभेदाचे ज्ञान । तयांचे करा सहज स्वभाववर्णन ।
श्रुतिविदित विशाल पुण्य ते कवण । सांगा कोणते पाप परम भयंकर ।। ३
सांगा मानसरोग समजावून । तुम्ही अति कृपाळु सर्वज्ञ ।
मी संक्षेपे करितो नीतिकथन । हे तात वदे काक सादर प्रेमाने ।। ४
नसे अन्य योनी नरदेहासदृश । याचिती जीव चराचर तयास ।
देई जो शुभज्ञानवैराग्यभक्तीस । जो नरकस्वर्गमोक्षाचा सोपान ।। ५
नरदेह धरून जे हरीस भजती । जयांना नीचतम विषयभोगी प्रीती ।
ते हातातील पारस रत्न फेकिती । बदला घेती काचखंड ।। ६
खगेशा दारिद्र्यासम नसे दुःख जगात । संतमीलनासम न सुख कशात ।
संतांचा हा सहज स्वभाव जाण हे तात। करिती ते परोपकार कायावाचामने ।।७
परहितास्तव साहती दुःख संत । परदुःखास्तव साहती दुःख असंत ।
भूर्जतरुसम संत कृपाळु हे तात । साहती विपत्ति परहितास्तव ।। ८
सणरज्जुपरी करिती खल परबंधन । तयास्तव मरती विपत्तीत त्वचा सोलून ।
खल पर-अपकार करिती स्वार्थाविण । हे नागारि सर्पमूषकासम ।। ९
परसंपदा विनाशून स्वये नष्ट होती । जैसे शेती नष्ट करून गारा वितळती ।
जैसा ग्रहकेतु अधम प्रसिद्ध जगी । तैसा जगपीडार्थ दुष्टाचा उदय ।। १०
संतांचा उदय सुखकर संतत । रविशशिसम जगास सुखद ।
अहिंसा परमधर्म श्रुतिविदित । नसे महापातक परनिंदेसम ।। ११
शिवगुरुनिंदक पुढील जन्मी होती भेक । घेती ऐसे जन्म सहस्र त्या योनीत ।
विविध नरक भोगती नर द्विजनिंदक । जगी जन्मती मग वायसदेहाने ।। १२
जे अभिमानी सुरश्रुतीचे निंदक । ते प्राणी पडती रौरव नरकात ।
संत निंदारत राहून होती उलुक । मोहनिशा प्रिय तया ज्ञानभानु अस्त ।। १३
जे मूढ सकलासी निंदिती । ते वटवाघुळ होऊन जन्मा येती ।
सकल लोक जे दुःख पावती । तयांचे मानस रोग आता ऐक ।। १४
मोह सकल व्याधीचे मूळ । व्याधीतून उपजे बहु शूळ ।
काम वात कफ लोभ प्रबळ । क्रोधपित्त जाळी नित्य छातीस ।। १५
हे बंधु तिघे हे प्रीति करितील । तंव दुःखद सन्निपात उपजेल ।
विषयमनोरथ अति दुर्गम विपुल । ते सकल रोगशूळ कोण जाणत नाम ।।१६

ईर्षा कंडु गजकर्ण ममता । हर्षविषाद कंठरोगाची विविधता ।
क्षयी तोच जो जळे परसुख पाहता । दुष्टता मनी कुटिलता हा कुष्ठ रोग ।।१७

अहंकार गाठीचा रोग अति दुःखद । नारु दंभ कपट मान मद ।
तृष्णा जलोदर घोर तापद । त्रिविध इच्छा प्रबळ त्रिदिन ज्वर ।। १८

दोन प्रकारचे ज्वर मत्सरअविवेक । किती वानू हे कुरोग अनेक ।। १९

एका व्याधिवशे मृत्यु नरास । हे रोग अन्य असाध्य विशेष ।
पीडती संतत हे जीवास । कैसी लाभे तया आत्मशांती ।। १२१ (क)

नेम धर्म आचार ज्ञान । जप तप यज्ञ दान ।
असती कोटि औषधे हे हरियान । परि तयाने न नष्ट होती हे रोग ।। १२१ (ख)

ऐसे रोगी जीव जगी समस्त । हर्षशोकभयप्रीतिवियोगे दुःखित ।
कथिले मी काही रोग ऐसे मानसिक । व्यापिती सकला परि जाणे विरळाच।।१

हे पापी रोग जाणता क्षीण होती । परि नाश न पावती जना पीडती ।
विषय कुपथ्य घडताच अंकुरती । मुनिहृदयातही नर तर बापुडेची ।। २

रामकृपे नष्ट होती सकल रोग । जर यापरी लाभेल संयोग ।
संयम हा की विषयी न आशाभोग । सद्गुरूरूपी वैद्याच्या वचनी विश्वास ।। ३

संजीवनी औषध ही रघुपतिभक्ती । अनुपान श्रद्धापूर्ण सुमती ।
यापरी संयोगे रोग नष्ट होती । न तो न जाती कोटि यत्नेही ।। ४

जाणावे तंव मन निरोगी हे तात । जंव हृदयी वाढेल वैराग्यबलविवेक ।
क्षुधा सुमति नित नवी वृद्धिगत । दुर्बल होईल विषयभोगआशा ।। ५

जंव करील स्नान ज्ञानजले विमल । तंव रामभक्ति हृदयी व्यापून राहील ।
शिवअजसनकादिक सकल । मुनि जे ब्रह्मज्ञानी निपुण ।। ६

हे खगनायका या सकलांचे हेच मत । राहावे रामपदपंकजी रत ।
श्रुतिपुराण सद्ग्रंथ हेच कथीत । नसे सुख रामभक्तिविना ।। ७

कासवपृष्ठी केस उगवतील । वंध्येचा सुत कोणास तरी वधील ।
नभी नानाविध फुले फुलतील । परि हरीस विमुख होता न सुख जीवा ।। ८

मृगजळपान करून तृषा शमेल । सश्याच्या शिरी शिंगे फुटतील ।
अंधकार रवीचा नाश करील । परि राम विमुखासी न लाभे जीवसुख ।। ९

अग्नीतून हिम प्रकटेल। रामविन्मुख होता कोणी न सुख पावेल ।। १०

जळ घुसळता घृत निघेल। वाळु रगडता निघेल तेल।
हरिभक्तिविण न कोणी भव तरेल। हा सिद्धांत न टळेल कधी ।। १२२(क)

प्रभु करिती ब्रह्मा मशकासी। मशकाहून ही न ब्रह्मासी।
ऐसे चिंतून भजती रामासी। संशय सांडून ज्ञानीजन ।। १२२ (ख)

कथितो हा निश्चित सिद्धांत तुजसी। न वदे मी मिथ्यावचनासी।
जे नर भजती हरीसी। अति दुस्तर भवसागर तरती ते ।। १२२ (ग)

कथिले नाथा अनुपम हरिचरित्र। संक्षेपे विस्तारे स्वमति-अनुसार।
हाच श्रुतिसिद्धांत हे गरुडवर। सर्व काज विसरून भजावे रामास ।। १

कुणा भजावे सोडून रघुपती। जयाची मजसम मूर्खावर प्रीती।
नाथ केली कृपा मजवरी अती। तुम्ही विज्ञानरूप न मोह तुम्हा ।। २

वदला सांगा रामकथा पावन अती। रुचली शिवशुकसनकादिमनास ती।
असे संसारी दुर्लभ सत्संगती। घडिभर पळभर वा एक वार ।। ३

गरुडा बघ करावा विचार निजांतरीं। मी रघुवीरभजनाचा अधिकारी।
मी अधम अपावन खगात सर्वपरी। प्रभूने मज केले पावन जगा विदित ।। ४

आज धन्य मी धन्य अति हे हरियान। जरी मी असलो सर्वपरी हीन।
मानिती श्रीराम मज निज जन। घडविला मज संतसमागम तयांनी ।।१२३(क)

कथिले यथामति रामचरित हे नाथ। न राखिले तुजपासून काही गुप्त।
जाणावे सिंधुसम रघुनायकचरित। ठाव तयाचा न लागे कवणास ।।१२३(ख)

स्मरून रामाचे नाना गुणगण। जाहला घडी घडी हर्षित काक सुजाण।
जयाचा महिमा गाती वेद नेति म्हणून। जयाची बळप्रतापप्रभुता अतुलित ।।१

शिवब्रह्मास पूज्य रघुवीरचरण। मजवरी कृपा तयांची ही मृदुलता जाण।
खगेशा कोणास लेखू मी रघुपतीसमान। ऐसा स्वभाव न ऐकिला देखिला कोठे ।।२

साधक सिद्ध तपस्वी जीवन्मुक्त। कवि कृतज्ञ संन्यासी पंडित।
योगी शूरज्ञानी विरक्त। धर्मनिरत विज्ञानी विद्वान ।। ३

हे न तरतील मम स्वामीसेवेविण। मी करितो रामासी वारंवार नमन।
मजसम पापराशी जाता शरण। होती शुद्ध नमामि अविनाशी ।। ४

जयाचे नाम भवरोगासी औषधी। जी हरण करते तापत्रयव्याधी।
मजवरी ते श्रीराम कृपानिधी। सदा राहो सुप्रसन्न ।। १२४ (क)

ऐकून भुशुंडीचे शुभ वचन। तयाचा रामपदी स्नेह पाहून।
प्रेमे मग वदे हरियान। फिटला जयाचा सकल संदेह ।। १२४ (ख)

जाहलो कृतकृत्य मी ऐकुनी। तव रामभक्तिरसपूर्ण वाणी।
जडली नूतन प्रीति रामचरणी। मिटली विपत्ति जी निर्मित मायेनें ।। १

जाहला मज नौका तुम्ही मोहजलधीत। नाथा मज दिले सुख बहुत।
स्वामी प्रत्युपकाराची फेड मज न करवत। मी वारंवार तव पदा वंदितो ।।२

तुम्ही पूर्णकाम रामभक्त। तुम्हासम तात न कुणी भाग्यवंत।
धरणीगिरिसरितातरुसंत। कृति तयांची परहितास्तव ।। ३

नवनीतसमान संतांचे हृदय। वर्णिती कवि परि न जाणती रहस्य।
द्रवे नवनीत मिळता तापसहाय्य। परदु:खे द्रवती परम पवित्र संत ।। ४

जाहले मम जन्म जीवन सुफलित। तव प्रसादे संशय होत नष्ट।
निज किंकर मज जाणावे संतत। उमे विहंगवर वदे ऐसे पुन्हा पुन्हा ।। ५

प्रेमे तो खगवर मतिधीर। काकचरणी नमवून शिर।
हृदयी साठवून श्रीरघुवीर। गेला गरुड मग वैकुंठा ।। १२५ (क)

गिरिजे संतसमागमासमान। नसे जगी लाभ आन।
न मिळे तो हरिकृपेवाचून। गाती वेदपुराण यापरी ।। १२५ (ख)

कथिला हा परम पुनीत इतिहास। ऐकताच तुटतो भवपाश।
शरणांगत कल्पतरु करुणेश। त्या रामपदकमली प्रीति उपजते ।। १

कायावाचामने निर्मित पाप होई भग्न। रामकथा ऐकता मन लावून।
सकल साधने तीर्थाटन। ज्ञान निपुणता योग वैराग्य ।। २

नानाकर्म यज्ञव्रतधर्म। नाना साधने जपतपदानदम।
द्विज गुरु यांची सेवा भूतदया संयम। विद्या विनय महिमा विवेकाचा ।। ३

ऐसी साधने जितुकी वेद वर्णिती। हे भवानी सर्वांचे फल एक हरिभक्ती।
तीच रघुनाथभक्ति श्रुति गाती। पावे ती एकदाच रामकृपे ।। ४

मुनीसी जी दुर्लभ हरिभक्ती । ती नर विना सायास पावती ।
जे ही कथा निरंतर ऐकती । मनी दृढ विश्वास ठेवून ।। १२६
तोच ज्ञाता तोच गुणी सर्वज्ञ । तोच दाता पंडित महीस भूषण ।
तोच कुलउद्धारक धर्मपरायण । जयाचे मन रत रामचरणी ।। १
तोच बुद्धिमंत नीतीनिपुण । जयासी वेद सिद्धांताचे उत्तम ज्ञान ।
तोच रणधीर तोच कवि विद्वान । कपट सोडून जो भजे रघुवीरास ।। २
धन्य देश तो वाहे गंगा सरिता जेथे । धन्य नारी जी अनुसरी पतिव्रतधर्माते
धन्य भूप जो आचरी न्यायनीतीते । निज धर्म जो न टाळी तो धन्य द्विज।।३
वेचिले जे दानी तेच धन्य धन । जी पुण्य कर्मी रत ती मति धन्य पावन ।
जो सत्संग देई तोच धन्य क्षण । जेथे द्विजभक्ति अखंड तो धन्य जन्म ।। ४
तेचि कुल धन्य हे उमे ऐक । जे जगात पूजनीय सुपुनीत ।
जयात उपजती नर विनीत । जे अनन्य भक्त रघुवीराचे ।। १२७
कथा वर्णिली मी यथामती । जरी प्रथम गुप्त राखिली ती ।
तव मनी देखिली अधिक प्रीती । निवेदिली तंव तुज ही रामकथा ।। १
ही न कथावी हट्टी मूर्खास । जे मन लावून न ऐकती हरिलीलेस ।
न कथावी ती कामी क्रोधी लोभी जनांस । जे न भजती चराचर स्वामी राम ।।२
न निवेदावी ती द्विजद्रोह्यास । जरी असे नृप तो इंद्रासरिस ।
सत्संगति अति प्रिय जयांस । तेच रामकथेचे अधिकारी ।। ३
जयां गुरुपदी प्रीती जे नीतिरत । तेच अधिकारी द्विजसेवकासहित ।
तयांस ही विशेष सुखदायक । जयांस रघुराया प्राणप्रिय ।। ४
जो वांछी रामपदी प्रेम सतत । वा इच्छी मोक्षधामपद ।
तो या कथेचे भावामृतासहित । करो पान श्रवणपुटीने १२८
उमे मी केले हे रामकथेचे वर्णन । ती कलिमलहरणी मनोमलशमन ।
संसृति रोगासी ती मूळ संजीवन । यापरी वदती वेद विद्वान पुरुष ।। १
या कथेत सप्त सोपान सुंदर । रामभक्तीचे पंथ मनोहर ।
विशेष हरिकृपा होई जयावर । तोच या मार्गावरी पद ठेवी ।। २
जे ही कथा कपट सोडून गाती । तयांच्या मनोकामना पूर्ण होती ।
जे कथिती ऐकती स्तुति करिती । ते भवसागर तरती गोपदासम ।। ३

ऐकता शुभ कथा ती हृदया रुचली । मग प्रेमळ गिरा गिरिजा वदली ।
रामचरणी नव प्रीति उपजली । स्वामीकृपेने मम संदेह गत ।। ४

तव प्रसादे हे विश्वनाथ । जाहले मी आता कृतार्थ ।
उपजली रामभक्ति दृढ हृदयात । मिटले मम सकल क्लेश ।। १२९

हा शुभ उमाशंभुसंवाद । सुखदायक करी नष्ट विषाद ।
भवभंजक करी संदेह नष्ट । जो भक्तजनासी रंजक प्रिय संतांस ।। १
जे राम-उपासक असती महीवर । कथा यासम तयास न अन्य प्रियकर ।
रघुपतिकृपे गाइले मति-अनुसार । हे सुंदर चरित्र पावन मी ।। २
या कलिकालात न दुजे साधन । योगयज्ञ वा जपतपव्रतपूजन ।
करावे रामस्मरण रामगुणगान । ऐकावे संतत रामगुणगणास ।। ३
पतित पावन जयाचे ब्रीद महान । ऐसे वदती कवि श्रुति संत पुराण ।
रे मना भज त्या रामास कुटिलता टाकून । कोण न पावे गति भजता रामास ।।४

भजता रामास । ऐक मूढ मना । का न मिळे कोणा । मोक्षपद ।
गजेंद्र गणिका । व्याध अजामिळ । गृध्रादिक खल । उद्धरिले ।
अभीर यवन । चांडाळ किरात । पापमूर्तिमंत । नीच जाती ।
केवळ रामाचे । नाम उच्चारून । होती ते पावन । नमामी ते ।। १

रघुवंशमणी । चरित्र रामाचे । गाती पामर जे । परिसती ।
त्यांचा कलिमल । जाई मनोमल । सहज जातील । रामधामी ।
जाणे पाच सात । चौपाई सुंदर । समजून नर । उरी धरी ।
दारुण मायेचे । दुःखद विकार । करितात दूर । रघुनाथ । २

अनाथावरी जो । सुंदर सुजाण । कृपानिकेतन । करी प्रीती ।
एक तो श्रीराम । हितकर्ता जाण । तयासम कोण । मोक्षदाता ।
अतिमतिमंद । तुलसीदासाने । कृपाप्रसादाने । लेश मात्र ।
मिळविली शांती । श्रीरामासमान । तैसा प्रभु आन । नसे कोठे ।। ३

हे रघुवीर मज सम न अन्य दीन । दीनांचा हितकर्ता नसे अन्य तुजसमान ।
हे रघुवंशभूषण ऐसे जाणून । मम भवभय भीषण दूर सारा ।। १३०(क)
जैसी प्रिय नारी कामी जनास । वा धन प्रिय लोभी नरास ।
हे रघुनाथा रामा सर्वेश । व्हावे मज प्रिय निरंतर तैसेच ।। १३०(ख)

सुकवि महेशे । कृत रामायण । बहुत कठिण । पुरातन ।
रामपदाब्जाच्या । नित भक्तिस्तव । रामायण नव । रचियेले ।
मानून चरित्र । नामाने निरत । निज तम शांत । होण्यास्तव ।
भाषाबद्ध केले । तुलसीदासाने । मानसरूपाने । चरित्रास ॥ १

पुण्य पापहारी । श्रीराम चरित । ज्ञानभक्तिप्रद । शिवंकर ।
प्रेमांबूने पूर्ण । पुनीत विमल । मायामोहमल । दूर सारी ।
श्रीरामचंद्राच्या । मानस चरिती । मनुज डुंबती । भक्तिभावे ।
संसाररवीच्या । किरणांनी घोर । दग्ध न ते नर । कदापी ही ॥ २

॥ कलियुगातील संपूर्ण पापांचा नाश करणारा
श्रीरामचरितमानसाचा सप्तम सोपान समाप्त ॥

(उत्तरकांड समाप्त)

आरती तुलसीदासांची

आरती तुलसीदासा । प्रिय जनांच्या मानसा ।
मानस रचूनीया । विश्ववंदनीय झाला ।। धृ० ।।
रामाची गुणगाथा । स्वांतः सुखाय गायिली ।
सर्वांतः सुखद ती । ऐसी संपादिली कीर्ती ।
निज प्रज्ञा प्रतिभेने । रामचंद्राचा आदर्श ।
साधाया लोककल्याणा । जना सन्मुख ठेविला ।। १ ।।
वेदशास्त्रसार वर्णन । जनवाणीत करून ।
गेयता अनुप्रास । लयबद्ध सुमधूर ।
मेळवून भाषाभगिनी । ब्रज संस्कृत अवधी ।
राष्ट्रीय ऐक्यभाव । केला जनात जागृत ।। २ ।।
सदाचार नीतिमत्ता । प्रेम समता बंधुता ।
सेवाभाव स्वार्थत्याग । रुजविले हें सद्‌गुण ।
स्वराज्य स्वधर्माचा । अभिमान चेतविला ।
पुरस्कार केला सदा । भारतीय संस्कृतीचा ।। ३ ।।
सुशील गुणवंत । श्रद्धावान रामभक्त ।
लोककवि लोकप्रिय । काव्य राष्ट्रीय रचून ।
जिंकिले जनमानस । प्राप्त सम्राटाचे पद ।
वेचिले दीर्घायुष्य । करावया लोकोद्धार ।। ४ ।।
मंदमती दीन अबला । वंदुनिया पदकमला ।
भावपुष्प अनुवाद । भक्तिभावें श्रद्धायुक्त ।
समर्पिते तव चरणी । सेवा मानावी ही गोड ।
याचीतसे कृपाप्रसाद । एक भोळी तव भक्त ।। ५ ।।

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४	२७	देवेष	सुवेष
६	५	जाणन	जाणून
६	११	ओवीक्रम ५	ओवीक्रम ९
७	२२	रुईस	रुई रास
१२	१८	सुत	शब्द गाळणे
१४	२८	मनि	मुनी
१५	१८	हुलैसीसम	हुलसीसम
१६	२४	करिता	करितो
१७	१७	कथसी	कथेसी
२०	१८	संतोष	संतोषा
२४	४	ज्ञान	ज्ञात
३१	२२	रामगण	रामगुण
३५	१८	दुरोधर्ष	दुराधर्ष
३८	३०	नतन	नूतन
३९	२	नटन	नटून
४७	२०	उभें	उमे
४८	१५	जोडन	जोडून
४८	२८	ता	ती
४९	२५	जगी ते	जगी
५१	३	मदत	मदन
५२	३	शतयोजत	शतयोजन
५२	३०	लाभता	लाभत
५३	११	करावे	करवे
५८	१७	सांगावे	सांगवे
६४	७	एसे	ऐसे
६६	१३	मनीचा	मुनीचा
८५	१८	ना	न
८७	२१	स्मरण होताच नारदवचनाचे	होताच नारदवचनस्मरण
८७	२१	उमजली	उपजली
८७	२६	निंमी	निमी

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१०६	२९	करितो	करिती
११६	७	मूळ वरास	मूळ आणावया वरास
११६	९	पडला घाव	पडली टिपरी
११७	१६	तथा	गाळणे
१२३	१४	बोलतो	बोलती
१३२	१२	वस्त्ररत्नगणात	वस्त्ररत्नगणास
१३९	१५	भवन	भुवन
१४२	११	५	८
१५०	२८	बाल	बोल
१६१	९	कसी	कैसी
१६५	११	पुर	शब्द गाळणे
१७२	१६	जलविण	जलाविण
१८७	२	मोक्षपणाचे	मोक्षपदाचे
१८८	२०	दर्शन	वर्णन
१९४	४	दुःखी (देखे)	दुःखी देखे
१९९	६	सकलांचे कल्याण	कल्याण सकलांचे
२०१	४	उपहास साहून	साहून उपहास
२०३	१०	त्याजिली	त्यजिली
२०५	१०	वाणीस	वाणीसी
२१५	१५,२०	करावे करावे	करवे
२१५	२६	करितो	करिती
२१७	२४	चिती	चित्ती
२१८	१३	एथ, यता	येंथ येत
२२६	२३	किरात अभंग भाग्यास	किरात भाग्यास
२२७	३	होईल	होई
२३०	१६	पर्थी	पथी
२३३	२१	महीत	महती
२३४	४	२	३
२३७	४	संहारीन	संहारीत
२३९	२१	मनाणे	मानणे
२४१	२४	रामसमीप	रामासमीप
२४२	१८	समजसमान	मजसमान
२७२	२८	गौरवश्यामल	गौर श्यामल
२७३	१	सुरम	सुरस
२७५	२०	कदंम	कदंब

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२७६	१९,२०	अर्ध पंक्ती	एकत्र जोडणे
२७७	१२		४
२७९	४	सीताशोधसिद्ध	सीताशोधा सिद्ध
२८२	५	हिन	हित
२८२	१२	दुदुभीच्या	दुंदुभीच्या
२९६	२२	स्मरतातच	स्मरताच
२९८	१५	जळू	न जाळावे
३००	२१	उद्वस्त	उध्वस्त
३०८	१८		४
३०८	२८	संपति	संपत्ति
३१३	२५	वर्ण	वर्णू
३२४	१४	तनु पुलकित	तनु गाळणे
३२९	१९	एक	ऐक
३३६	६	भीषण	बिभीषण
३४३	२४	(ओवी संख्या)	४
३४३	२६	निजकर्ममत	निजकर्मंमन
३४४	२९	कपिलदास	कपिदलास
३४८	२४	संगेत	संगे
३४९	२८	देईना	देईन
३४९	३०	४ ओवी क्रमांक	खोडणे
३५०	१	"	ओवी क्रमांक १
३५१	९	नियम	नियमन
३५४	२८	रुधिसरिता	रुधिरसरिता
३६२	३	सपे	संपे
३६३	३	ह्प	हूप
३६३	३०	वापावरी	चापावरी
३६५	२२	मंदोदरीस	मंदोदरी
३६५	२६	करी	करा
३६९	२४	मारिला। नाथ	मारिला नाथ।
३७८	२९	नवनीता	नववीता
३८३	१४	भमता	ममता
३८३	१८	तपा	तदा
३८३	२१	वैभवा	वैभव वा
३८९	१९	दिशेम	दिशेस
३९३	२	अग्नीतणे	अग्नीत
४१७	१०	नीति	अनीति
४१७	१५	विरक्ती	विरती

❀ ❀ ❀